# पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम - २०२४
## (वय वर्षे ३ ते ८)

(बालवाटिका १, २ व ३, इयत्ता पहिली व दुसरी)

**भाषेतर : भाग २**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम - २०२४ (वय वर्षे ३ ते ८) भाषेतर : भाग २


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **मार्गदर्शन** : **मा. सचिन्द्र प्रताप सिंह (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. संजय यादव (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **श्रीम. अनुराधा ओक**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. कमलादेवी आवटे**
  उपसंचालक, समन्वय विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी सहसंपादक** : **श्री. राजेंद्र वाकडे**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, अभ्यासक्रम विकसन विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन साहाय्य** : **श्रीम. उषा शेलार**
  कार्यक्रम अधिकारी, अभ्यासक्रम विकसन विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. अशोक पानसरे**
  विस्तार अधिकारी तथा विषय सहायक, अभ्यासक्रम विकसन विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती** : मार्च २०२५
- **अर्थसाहाय्य** : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम - २०२४ (वय वर्षे ३ ते ८)

(बालवाटिका १, २ व ३, इयत्ता पहिली व दुसरी)

## भाषेतर : भाग २

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | भाषेतर : भाग २ | |
| १. | गणित | ३१-१६२ |
| २. | कलाशिक्षण | १६३-२२२ |
| ३. | कार्यशिक्षण | २२३-२७६ |
| ४. | आरोग्य व शारीरिक शिक्षण | २७७-३७२ |

# प्रस्तावना

**पार्श्वभूमी :**

**१) शिक्षणाचे प्रयोजन आणि सार्वत्रिकीकरण :**

शालेय शिक्षणाचा प्रारंभ हा बालकाच्या विकासाच्या मार्गावरचा महत्त्वाचा टप्पा असतो. परिसरातून घडणाऱ्या सहज शिक्षणातून, बालकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते. या जडणघडणीला कालमर्यादित अशा शिक्षणशास्त्रीय तत्त्वांवर आधारित नियोजनाची जोड मिळते. हे नियोजन साध्य करण्यासाठी, शाळा, शिक्षक आणि पर्यवेक्षीय यंत्रणांचे पाठबळ प्राप्त होते. समाजाच्या विकासाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठीही शिक्षित व्यक्ती अधिक सक्षम ठरते. व्यक्ती, समाज आणि राष्ट्राचे व्यक्तिमत्त्व सक्षम आणि समृद्ध करण्यास शिक्षण हे केंद्रभूत ठरते.

शिक्षणाचे हे विलक्षण सामर्थ्य जाणून, प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी समाजसुधारकांनी निरंतर आणि प्रसंगी संघर्षपूर्ण प्रयत्न केले. महाराष्ट्रामध्ये थोर समाजसुधारकांनी निरनिराळ्या पर्यायांचा अवलंब करून, आर्थिक-सामाजिकदृष्ट्या दुर्बल गटातील मुले आणि मुली अशा वंचितांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची एक प्रेरणादायी परंपरा निर्माण झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वांपर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी शासनाने विविध योजना राबवल्या, तरीही गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे ध्येय साध्य करण्यासाठी, अजूनही बरीच वाटचाल बाकी आहे. या वाटचालीची गती कायम राखण्यासाठी, अनेक सुजाण व्यक्ती/संस्था, समग्र शिक्षा यांसारखे निश्चित दिशा आणि कालमर्यादा असणारे कार्यक्रम मदत करीत आहेत. भारत सरकारने बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ हा कायदा पारित करून, त्याची अंमलबजावणी सुरू केली. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला एक निश्चित व्याप्ती आणि शक्ती लाभली आहे.

**२) प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाची वाटचाल :**

शिक्षणातून अपेक्षित व्यक्तिमत्त्व विकास साध्य करण्यात, अभ्यासक्रमाची महत्त्वाची भूमिका आहे. कोणत्या वयात काय, किती आणि कसे शिकायचे, हे अभ्यासक्रम निश्चित करत असल्यामुळे, अभ्यासक्रम हे शिक्षणाच्या गुणवत्तेचे अविभाज्य अंग आहे, त्यामुळे सुयोग्य आणि परिपूर्ण अभ्यासक्रमाची निर्मिती, हे गुणवत्ता साधण्याच्या वाटेवरचे महत्त्वाचे पाऊल ठरते. समाजाच्या गरजा व आशा आकांक्षा, इतिहास, वैज्ञानिक प्रगती, इतर सामाजिक व राजकीय घडामोडी, शिक्षणशास्त्रामधील प्रगती, राष्ट्रीय व राज्याची धोरणे यांची दखल घेणारा अभ्यासक्रम कालसुसंगत व दर्जेदार होतो; परंतु या सर्वच घटकांमध्ये बदल होत असल्याने, अभ्यासक्रमही लवचीक असावा लागतो. राज्याच्या अभ्यासक्रमात अनेक वेळा परिस्थितीनुसार बदल झाले आहेत. त्यांचा धावता आढावा घेणे उपयुक्त ठरेल.

**२.१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – १९६८ :** डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या राष्ट्रीय शिक्षण आयोगाने (१९६४–६६) केलेल्या शिफारशींचा विचार करून, हे धोरण निश्चित करण्यात आले. या धोरणामुळे भारतातील निरनिराळ्या राज्यांचे भाषाविषयक धोरण, शिक्षणाचा आकृतिबंध यांमध्ये समानता येण्यास चालना मिळाली, तसेच कार्यानुभव विषयास चालना मिळण्यास मदत झाली.

**२.२) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, १९६८ :** महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, त्यावेळी नागपूर, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या तीन विभागांत निरनिराळे अभ्यासक्रम सुरू होते. त्यांचे सुसूत्रीकरण करून व त्यांची व्याप्ती वाढवून, शास्त्रीय पद्धतीने प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम १९६८ तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाच्या १० मूलभूत उद्दिष्टांपैकी प्रथम उद्दिष्ट हे 'शिक्षणाविषयी आवड निर्माण होऊन, अध्ययनाच्या पायाभूत आशयावर पुरेसे प्रभुत्व संपादता यावे' असे होते.

**२.३) शिक्षण विषयाचा समवर्ती सूचीमध्ये समावेश :** शिक्षणामध्ये राष्ट्रीय स्तरावर एकसूत्रता आणण्याबरोबरच, शिक्षणाचे नियोजन करताना राज्याच्या स्थानिक गरजा आणि परंपरा यांचीही दखल घेणे गरजेचे होते; त्यादृष्टीने राज्याच्या अखत्यारित असणारा हा विषय राज्य व केंद्र या दोन्हीच्या समवर्ती सूचीमध्ये असणे आवश्यक होते, म्हणून त्यानुसार १९७६ मध्ये संविधानात दुरुस्ती करून, शिक्षण या विषयाचा समावेश समवर्ती सूचीमध्ये करण्यात आला.

**२.४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – १९८६ :** देशभरात शैक्षणिक विचारमंथन घडवून आणून, हे धोरण निश्चित करण्यात आले. या धोरणामध्ये शिक्षणापासून वंचित असणाऱ्या सर्व प्रकारच्या गटांना, शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. 'खडू–फळा मोहिमेद्वारे' शाळांच्या मूलभूत भौतिक गरजांची पूर्तता, मुक्त विद्यापीठ, बालक केंद्रित शिक्षण, राष्ट्रीय गाभा घटक ही या धोरणाची महत्त्वाची फलिते आहेत. या धोरणातील उद्दिष्टांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी, १९९२ मध्ये एक कृतिकार्यक्रमही तयार करण्यात आला.

**२.५) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, १९८८ :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून, या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली. कोणताही आशय शिकवताना, त्यातून विद्यार्थ्यांच्या वर्तनात नेमके कोणते बदल अपेक्षित आहेत हे स्पष्ट करणाऱ्या 'अध्ययन निष्पत्ती' हे या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य होते, त्याचप्रमाणे मूल्यमापनाविषयीच्या नेमक्या सूचनांचा त्यात समावेश होता.

**२.६) क्षमताधिष्ठित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, १९९५ :** डॉ. आर. एच. दवे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने, १९९० मध्ये इयत्ता पहिली ते पाचवी या स्तरासाठी मातृभाषा, गणित व परिसर अभ्यास या विषयांसाठी श्रेणीबद्ध मांडणी असणाऱ्या, किमान अध्ययन क्षमता निश्चित करण्यात आल्या. त्यामध्ये राज्याच्या दृष्टिकोनातून योग्य ते बदल करून, भाषा, गणित (इ. १ ली ते ५ वी), तसेच विज्ञान (इ. ३ री ते ५ वी) या विषयांच्या क्षमतांचा समावेश असणारा, क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम तयार करण्यात आला.

**२.७) इंग्रजी विषय अभ्यासक्रम :** (इयत्ता पहिली ते चौथी) जागतिकीकरणाचे युग सुरू झाल्यावर, विज्ञान–तंत्रज्ञानाची भाषा म्हणून, तसेच आंतरराष्ट्रीय संपर्क भाषा म्हणून इंग्रजी भाषेचे महत्त्व वाढू लागले. समाजामध्येही या भाषेचे आकर्षण वाढू लागले; परंतु इंग्रजी भाषेची अपुरी तयारी व व्यवहारात इंग्रजीचा वापर करताना आत्मविश्वासाचा अभाव, यांमुळे राज्यातील बालके मागे पडत असल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने इंग्रजी माध्यमाशिवाय अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये जून २००० मध्ये, इयत्ता पहिलीपासून इंग्रजी हा एक पाठ्यविषय म्हणून सुरू करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार इंग्रजीचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला.

**२.८) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००० :** या आराखड्यामधील काही महत्त्वाचे शैक्षणिक मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

- प्रयोग आणि काळाच्या कसोटीवर उतरलेल्या अनुभवांच्या आधारे, अभ्यासक्रम आणि अध्ययन–अध्यापन साहित्य बालकेंद्रित करणे.
- परीक्षा पद्धतीत सुधारणा करणे, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करणे, मूल्यमापन पद्धतीमध्ये अशा प्रकारे केलेल्या बदलांद्वारे अध्ययन–अध्यापन पद्धतींमध्ये बदल घडवून आणणे.

**२.९) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, २००४ :** हा अभ्यासक्रम राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००० च्या आधारे तयार करण्यात आला.

**२.१०) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००५ :** प्रा. यशपाल समितीच्या **ओझ्याविना अध्ययन (Learning without Burden)** या अहवालातील शिफारशींच्या संदर्भात, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००० चे पुनर्विलोकन करण्यासाठी प्रा. यशपाल यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा एक राष्ट्रीय सुकाणू समिती नियुक्त करण्यात आली, तसेच शालेय विषय, शिक्षण प्रक्रिया व जाणिवा यांच्या सद्य:स्थितीचा वेध आणि पुढील कार्यवाही, या विषयाच्या चिंतनासाठी २१ झोत गटांची (focus groups) स्थापना करण्यात आली. निरनिराळ्या राज्यांतील एससीईआरटी/समकक्ष संस्था, शैक्षणिक संस्था व स्वयंसेवी संस्था, तसेच शिक्षणतज्ज्ञ यांच्याशी या गटांमार्फत सल्लामसलत करण्यात आली. यातून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ (एनसीएफ २००५) ची निर्मिती झाली. या आराखड्याच्या आधारे, प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, २०१२ ची पुनर्रचना करण्यात आली.

**२.११) महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० :** प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवरील अभ्यासक्रम आतापर्यंत भिन्नवेळी तयार झाल्यामुळे, त्यातील दृष्टिकोन, आशय, उद्दिष्टे यात सलगता, एकसूत्रता राखताना अडचणी जाणवल्या; परंतु यावेळी प्रथमच संबंधित संस्थांनी एकत्रितपणे इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतचा आराखडा, **महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा, २०१०** विकसित केला.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे; महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई; राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे या संस्थांनी परस्परांशी समन्वय साधून, या आराखड्याची निर्मिती केली.

हा आराखडा तयार करताना NCF-2005 चा आधार असणाऱ्या २१ शैक्षणिक विषयांवरील सद्य:स्थितीदर्शक अहवालांचे (पोझिशन पेपर्स), राज्यातील परिस्थिती संदर्भात अवलोकन करण्यात आले. त्याआधारे राज्यातील शालेय विषय, अध्ययन–अध्यापन पद्धती, मूल्यमापन आणि आनुषंगिक विषयांवर राज्यात कोणती कार्यवाही आवश्यक आहे, हे दाखवणारे दस्तऐवज तयार करण्यात आले. या सर्व दस्तऐवजांचे एका समन्वय समितीमार्फत संकलन करून, राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० तयार करण्यात आला.

**२.१२) आकार बालशिक्षण अभ्यासक्रम–२०१४ :** बालकाच्या जन्मापासून सहाव्या वर्षापर्यंत, बालकाचे शरीर, मन आणि बुद्धी यांमध्ये अतिशय वेगाने बदल घडून येतो. या वयात बालकांना योग्य शैक्षणिक अनुभव दिले, तर त्यांच्या विकासाला गती देता येते; हा विचार मध्यवर्ती ठेवून, ३ ते ५ + वयोगटातील बालकांसाठी 'आकार' हा बालशिक्षणक्रम तयार करण्यात आला. बालविकासाच्या तत्त्वांवर आधारित विकासाच्या सर्व क्षेत्रांना चालना देणारा, उपक्रम आधारित अभ्यासक्रम तयार करताना, बालकांविषयी झालेल्या संशोधनातून वाढ व विकास या संदर्भात आढळलेली वैशिष्ट्ये आधारभूत मानली गेली. या प्रकारचा अभ्यासक्रम तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होते. हा अभ्यासक्रम शासनप्रणीत एकात्मिक बालकविकास सेवा कार्यक्रमांतर्गत चालवल्या जाणाऱ्या अंगणवाड्यांमध्ये लागू करण्यात आला आहे.

**२.१३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० :** केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दिनांक २९ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीमध्ये, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी देण्यात आली आहे. सदर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी राज्यात टप्प्याटप्प्याने सुरू झाली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'सार्थक' ही नियोजन पुस्तिका तयार करण्यात आली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये पूर्वीच्या १० + २ या रचनेमध्ये बदल करून ५ + ३ + ३ + ४ याप्रमाणे रचनात्मक बदल केला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मधील शिफारशींवर आधारित, पायाभूत स्तरासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा दिनांक २० ऑक्टोबर २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मध्ये, भारतीय लोकमानसात रुजलेल्या शिक्षण व्यवस्थेची कल्पना केली आहे. ही व्यवस्था समाजात परिवर्तन घडवेल, शाश्वतपणे समान आणि चैतन्यपूर्ण ज्ञान देईल, तसेच सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन, भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवेल. अभ्यासक्रम

आणि अध्यापनशास्त्राच्या माध्यमातून, विद्यार्थ्यांमध्ये देशाबद्दल मूलभूत कर्तव्ये, घटनात्मक मूल्यांबाबत आदराची भावना, नातेसंबंध, बदलत्या जगात आपल्या भूमिका तसेच जबाबदाऱ्या यांबद्दल जाणीवपूर्वक जागरूकता निर्माण होईल असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मध्ये नमूद केले आहे.

२.१४) **राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर – २०२२ :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० ची प्रभावीरीत्या अंमलबजावणी करण्यासाठी, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून 'सार्थक' ही नियोजन पुस्तिका प्रकाशित करण्यात आलेली आहे. सार्थक पुस्तिकेमध्ये टास्क क्रमांक ९५ नुसार, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा–पायाभूत शिक्षण–२०२२ तयार करण्यात आलेला आहे.

शालेय विषय, शिक्षण प्रक्रिया जाणीव यांच्या सद्य:स्थितीचा वेध आणि पुढील कार्यवाहीविषयी चिंतनासाठी २५ झोत गटांची स्थापना करण्यात आली. निरनिराळ्या राज्यांतील सलग्न संस्था, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, तसेच शिक्षण तज्ज्ञ यांच्याशी या गटांमार्फत सल्ला मसलत करण्यात आली. यातून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा–२०२२ ची निर्मिती झाली. या आराखड्याच्या आधारे, पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम–२०२३ ची पुनर्रचना करण्यात आली.

२.१५) **राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर–२०२३ :** राज्य अभ्यासक्रम आराखडा–पायाभूत शिक्षण – २०२३ तयार करताना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा–२०२२ चा आधार घेण्यात आलेला आहे. त्या आधारे राज्यातील पायाभूत स्तर विषय, अध्ययन–अध्यापन पद्धती, मूल्यमापन आणि अनुषंगिक विषय व त्यांची राज्यातील कार्यवाही यांविषयी चर्चा करण्यात आली आहे. राज्यस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करून, राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर २०२३ चा मसुदा तयार करण्यात आला आहे. हा मसूदा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र वेबसाईटवर प्रकाशित करून, प्राप्त प्रतिसादांमधून अंतिम करण्यात आला.

२.१६) **विद्याविषयक प्राधिकरणाची नियुक्ती :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मध्ये सूचित केल्यानुसार, ७ मार्च २०१२ च्या अधिसूचनेद्वारे, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेस 'विद्याविषयक प्राधिकरण' म्हणून नियुक्त करण्यात आले. या प्राधिकरणाकडे अभ्यासक्रम व मूल्यमापन पद्धती निश्चिती करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम क्र. २९ (२) मध्ये या जबाबदारीचा अधिक तपशील पुढीलप्रमाणे नमूद केला आहे.

१) संविधानात्मक मूल्यांशी सुसंगती राखणे.

२) बालकांचा सर्वांगीण विकास साधणे.

३) बालकांचे ज्ञान, कार्यक्षमता व बुद्धिमत्ता यांचा विकास करणे.

४) बालकांच्या शारीरिक व मानसिक क्षमतांचा परिपूर्ण विकास करणे.

५) शोध घेणाऱ्या, तसेच इतर उचित कृतींमधून, बालकेंद्रित पद्धतीने बालस्नेही वातावरणात बालकांचे अध्ययन घडवून आणणे.

६) बालकाला शक्यतो मातृभाषेतून शिक्षण देणे.

७) बालकांना भीती आणि तीव्र दडपण यांपासून मुक्त ठेवणे. त्यांना त्यांच्या कल्पना मनमोकळेपणे मांडण्यासाठी संधी देणे.

८) बालकांनी मिळवलेल्या ज्ञानाचे आकलन व त्याचे उपयोजन करण्याची क्षमता, यांच्या प्रगतीचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करणे.

## ३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० चा दृष्टिकोन :

भारतीय असण्याचा अभिमान, बालकांचा आत्मा, बुद्धी आणि कृती यांमध्ये खोलवर बिंबवणे, तसेच ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि भाववृत्ती विकसित करणे हा या धोरणाचा दृष्टिकोन आहे, त्यामुळे मानवी हक्कांची जाणीव असणारा, शाश्वत विकास झालेला आणि विश्वबंधुत्व जोपासणारा बालक एक जागतिक नागरिक बनू शकेल.

## ३.१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मधील सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्वे :

ज्या संस्थेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वागत केले जाते, काळजी घेतली जाते, अध्ययनासाठी सुरक्षित आणि उत्साहपूर्ण वातावरण असते, अध्ययनाच्या अनुभवांची विस्तृत श्रेणी दिली जाते, उत्तम दर्जाच्या भौतिक पायाभूत सुविधा आणि शिक्षणासाठी उपयुक्त संसाधने विद्यार्थ्यांना उपलब्ध असतात, ती चांगली संस्था असते. वरील सर्व बाबी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे, हे सर्व शैक्षणिक संस्थांचे ध्येय असावे. त्याच वेळी विविध संस्थांमध्ये आणि शिक्षणाच्या सर्व टप्प्यांवर एकात्मीकरण आणि समन्वय असणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मधील मुख्य मार्गदर्शक तत्त्वे :**

क) विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी, शिक्षकांना तसेच पालकांना संवेदनशील करून, प्रत्येक विद्यार्थ्याच्या अद्वितीय व वेगळ्या क्षमता ओळखणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे.

ख) इयत्ता तिसरीपर्यंत सर्व विद्यार्थी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान साध्य करतील याला सर्वोच्च प्राधान्य देणे.

ग) शिकत असताना विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रतिभेनुसार आणि आवडीनुसार, विविध कार्यक्रमांद्वारे स्वत:च्या जीवनातील मार्ग निवडण्याची शैक्षणिक लवचिकता देणे.

घ) कला, वाणिज्य आणि विज्ञान, अभ्यास आणि अभ्यासेतर कृती, व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवाह हे एकमेकांपासून पूर्णत: वेगळे नसावेत.

च) बहुविद्याशाखीय जगामध्ये सर्व ज्ञानाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करण्यासाठी, विज्ञान, सामाजिक विज्ञान, कला, मानव्य आणि क्रीडा यांमधील बहुविद्याशाखीय आणि समग्र शिक्षण असावे.

छ) घोकंपट्टी करून अध्ययन करणे व परीक्षेसाठी अध्ययन करणे यांपेक्षा, संकल्पनात्मक आकलनावर भर दिला जावा.

ज) विवेकपूर्ण निर्णय घेण्यासाठी आणि नवनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी, संकल्पनात्मक आकलन, समस्या निराकरण, सर्जनशीलता आणि निर्णायक विचार करणे आवश्यक आहे.

झ) नैतिकता आणि मानवी व संवैधानिक मूल्ये; जसे की, समानानुभूती, इतरांबद्दल आदर, स्वच्छता, सौजन्य, लोकशाहीची भावना, सेवेची भावना, सार्वजनिक मालमत्तेचा आदर, विज्ञानाची ओढ, स्वातंत्र्य, जबाबदारी, विविधता, समानता आणि न्याय यांसारखी नैतिक, मानवी व संविधानिक मूल्ये रुजविणे.

त) बहुभाषिकतेला आणि अध्ययन व अध्यापन यांमधील भाषेच्या सामर्थ्याला चालना देणे.

थ) संवाद, सहकार्य, गटकार्य आणि लवचिकता अशी जीवन कौशल्ये जोपासणे.

द) आजच्या 'कोचिंग कल्चर'ला प्रोत्साहन देणाऱ्या संकलित (Summative) मूल्यमापनापेक्षा, अध्ययनाच्या आकारिक (Formative) मूल्यमापनावर भर देणे.

ध) शिक्षणात आणि अध्ययनात तंत्रज्ञानाचा व्यापक उपयोग करणे, भाषेतील अडथळे दूर करणे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रवेश आणि शैक्षणिक नियोजन व व्यवस्थापन करणे.

न) सर्व अभ्यासक्रम, शिक्षण पद्धती व धोरणांमध्ये वैविध्य व स्थानिक संदर्भाचा आदर करणे.

ट) शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थ्यांचा उत्कर्ष होण्यासाठी, समता आणि सर्वसमावेशकता या बाबी शैक्षणिक निर्णयांचा आधार असतील.

ठ) प्रारंभिक बाल्यावस्था शिक्षण ते शालेय शिक्षण व उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्व स्तरांवरील अभ्यासक्रमात सुसूत्रता असावी.

ड) शिक्षक अध्ययन प्रक्रियेचे महत्त्वाचे घटक असतात. शिक्षक भरती, शिक्षकांचा व्यावसायिक विकास, सकारात्मक कार्य वातावरण आणि सेवाविषयक अटी व शर्ती यांची सुनिश्चितता हवी.

ढ) स्वायत्तता, सुशासन आणि सशक्तीकरण यांद्वारे, नावीन्यपूर्ण आणि चौकटीबाहेरच्या कल्पनांना प्रोत्साहन दिले जावे. त्यासाठी परीक्षण आणि सार्वजनिक प्रकटीकरणाद्वारे शैक्षणिक प्रणालीची

अखंडता, पारदर्शकता आणि संसाधन कार्यक्षमता निश्चित केली जावी. यासाठी नियामक आराखडा ठाम परंतु लवचीक असावा.

ण) विकासासाठी उत्कृष्ट शिक्षणाबरोबरच संशोधनही आवश्यक आहे.

प) शिक्षण तज्ज्ञांमार्फत शाश्वत संशोधन आणि नियमित मूल्यांकनावर आधारित प्रगतीचा सतत आढावा घेणे.

फ) भारताचा गौरवशाली समृद्ध वारसा, वैविध्यपूर्णता, तसेच प्राचीन व आधुनिक संस्कृती, ज्ञानप्रणाली व परंपरा यांचा समावेश शिक्षण प्रक्रियेत केला गेला पाहिजे.

ब) शिक्षण ही सार्वजनिक सेवा आहे, त्यामुळे दर्जेदार शिक्षण मिळणे, हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार मानला गेला पाहिजे.

## ३.२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार, राज्य अभ्यासक्रम आराखड्यासाठी मार्गदर्शनात्मक बदल

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार, शालेय शिक्षणासंदर्भात तीन मार्गदर्शनात्मक बदल पुढीलप्रमाणे..

### १) बहुविद्याशाखीय आणि समग्र शिक्षणाकडे संक्रमण (Transitioning)

क) करुणा व सहानुभूती, लवचिकता, वैज्ञानिक दृष्टिकोन व सर्जनशील कल्पनाशक्ती असणारा, नैतिक विचार व मूल्यांसह तार्किक विचार करणारा आणि भारतीय परंपरेशी नाते असणाऱ्या चांगल्या व्यक्तीचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय होय.

ख) बालकांच्या बौद्धिक, सामाजिक, शारीरिक, नैतिक आणि भावनिक सर्वंकष विकासासाठी, अभ्यासक्रमात विज्ञान, सामाजिक शास्त्रे, कला, भाषा, खेळ, गणित आणि व्यावसायिक शिक्षण यांसारख्या विषयांवर भर दिला गेला पाहिजे.

ग) कला आणि विज्ञान, शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवाह किंवा अभ्यासक्रम व अभ्यासेतर उपक्रम यांमध्ये फरक करू नये.

घ) विद्यार्थ्यांना कला, मानव्य विद्या, विज्ञान, क्रीडा आणि व्यावसायिक विषय यांपैकी विषय निवड करण्याचे स्वातंत्र्य असेल.

च) ज्ञान आणि कौशल्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सौंदर्यशास्त्र व कला, मौखिक व लेखी संवाद, नैतिक तर्क, शाश्वत जीवन, भारतीय ज्ञान प्रणाली, डिजिटल साक्षरता व संगणकीय विचार, देशाचे ज्ञान, चालू घडामोडी आणि जगासमोरील गंभीर समस्या अशा सर्व विषयांचे विद्यार्थ्यांनी अध्ययन केले पाहिजे.

### २) घोकंपट्टी ऐवजी चिकित्सक आणि विश्लेषणात्मक विचारांवर भर

क) विद्यार्थ्यांनी विश्लेषणात्मक विचार करण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. चर्चांमध्ये भाग घेतला पाहिजे. संभाषण, लेखन आणि एकविसाव्या शतकातील इतर कौशल्ये आत्मसात

केली पाहिजेत आणि ती कशी शिकावीत हेही शिकले पाहिजे.

ख) मुख्य संकल्पना, अनुभवाधारित अध्ययन, विश्लेषण आणि चिंतन, मूल्ये आणि जीवन कौशल्ये शिकणे यांवर भर असावा.

ग) आपल्या शालेय शिक्षण प्रणालीतील मूल्यमापनाची पद्धती, मुख्यतः घोकंपट्टीची चाचणी करणारी आहे. ती बदलून अधिक रचनात्मक, अध्ययन आणि विकासाला चालना देणारी आणि उच्चस्तरीय कौशल्यांची पडताळणी करणारी असावी.

**३) नवीन अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रीय संरचनेचा स्वीकार**

अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोन, बालकाच्या विकासाच्या टप्प्यांशी सुसंगत असले पाहिजेत; जेणेकरून विद्यार्थ्यांच्या विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर त्यांच्या गरजा अधिक प्रभावीपणे पूर्ण होतील. या बाबी म्हणून, चार स्तरांच्या ५ + ३ + ३ + ४ या रचनेद्वारे सुनिश्चित केले जाईल.

क) पायाभूत स्तर : लवचीक, बहुस्तरीय, खेळ आधारित शिक्षण

ख) पूर्वतयारी स्तर : वाचन, लेखन, भाषण, शारीरिक शिक्षण, कला, भाषा, विज्ञान आणि गणित यांमध्ये भक्कम पाया तयार करण्यासाठी, औपचारिक परस्परसंवादी वर्गातील वर्गशिक्षणासह, शोध आणि कृती आधारित शिक्षण.

ग) पूर्व माध्यमिक स्तर : पूर्वतयारी स्तरावर विभिन्न विषयांचा परिचय आणि अधिक अमूर्त संकल्पनांचे शिक्षण आणि चर्चेवर आधारित अध्यापनशास्त्रीय आणि अभ्यासक्रम शैली.

घ) माध्यमिक स्तर : विषयांचा सखोल आणि बहुविद्याशाखीय अभ्यास, विश्लेषणात्मक विचारांवर भर, जीवनाच्या आकांक्षा आणि विद्यार्थ्यांसाठी विषयांचे विकल्प व निवड करण्यातील लवचिकता.

## ३.३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये दिलेली प्रारंभिक बालसंगोपन व शिक्षणाची विशिष्ट उद्दिष्टे

**अ) गुणवत्तापूर्ण प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, शक्य तितक्या लवकर साध्य करणे. (राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील २०२०, परिच्छेद १.१)**

**ब) विकास क्षेत्रातील अध्ययन निष्पत्ती सर्व बालकांनी प्राप्त करणे :**

१) शारीरिक आणि कारक विकास

२) बोधात्मक विकास

३) सामाजिक-भावनिक-नैतिक विकास

४) सांस्कृतिक/कलात्मक विकास

५) संप्रेषण आणि प्रारंभिक भाषा विकास, साक्षरता आणि संख्याज्ञान (NEP-2020, परिच्छेद १.२)

**क) शैक्षणिक संस्थांनी लवचिक, बहुआयामी, बहुस्तरीय, खेळ, कृती आणि पृच्छा आधारित अध्ययन घडवून आणण्यासाठी, त्यामध्ये भाषा, संख्या, मोजणी, रंग, आकार, वर्गातील आणि बाहेरील खेळ, चित्रकोडी, तार्किक विचार, समस्या निराकरण, चित्रकला आणि इतर दृश्य कला, हस्तकला, नाटक, कठपुतळी, संगीत आणि शारीरिक हालचाली यांचा अवलंब करावा. या सर्वांचे संस्थात्मिकीकरण व्हावे आणि त्याबरोबर सामाजिक क्षमता, संवेदनशीलता, चांगले वर्तन, सौजन्य, नैतिकता, वैयक्तिक स्वच्छता, गटकार्य आणि सहकार्य वृत्ती विकसित करण्यावर भर द्यावा. (NEP-2020, परिच्छेद १.२)**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार, पायाभूत स्तर वय वर्षे ३ ते ८ असा असेल. या पाच वर्षांच्या शालेय शिक्षणात, पूर्व शालेय शिक्षणापासून इयत्ता दुसरीपर्यंतचे शिक्षण समाविष्ट आहे. म्हणून वय वर्षे ६ पूर्ण झालेली बालके पहिलीत असावीत.**

## ३.४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार, पायाभूत स्तरासाठी मार्गदर्शक तत्त्वे :

१) जन्माची परिस्थिती किंवा पार्श्वभूमी काहीही असली, तरी प्रत्येक बालक शिकण्यास सक्षम असते.

२) प्रत्येक बालक वेगळे असते आणि स्वतःच्या गतीने वाढते, शिकते आणि विकसित होते.

३) बालके उत्तम निरीक्षण कौशल्य असणारे नैसर्गिक संशोधक असतात. ती स्वत: शिकण्याच्या अनुभवांचे निर्माते असतात आणि विविधप्रकारे आपल्या भावना आणि कल्पना व्यक्त करतात.

४) बालके समाजाचा घटक आहेत. ती निरीक्षण, अनुकरण आणि सहकार्य यांद्वारे शिकतात. बालके प्रत्यक्ष अनुभवांतून, त्यांच्या ज्ञानेंद्रियांचा वापर करून आणि पर्यावरणाबरोबर आंतरक्रिया करून शिकतात.

५) बालकांचे अनुभव आणि अध्ययनाच्या पद्धती स्वीकारल्या पाहिजेत. जेव्हा बालकांचा आदर केला जातो, त्यांना महत्त्व दिले जाते, शिक्षण प्रक्रियेत त्यांचा पूर्ण सहभाग घेतला जातो, तेव्हा बालके उत्तम प्रकारे शिकतात.

६) खेळ आणि कृती हे बालकांच्या शिकण्याचे आणि विकासाचे प्रमुख मार्ग आहेत. बालकांना वातावरणाचा अनुभव घेण्याची, शोध घेण्याची आणि प्रयोग करण्याची संधी मिळावी.

७) विकासात्मक आणि सांस्कृतिकदृष्ट्या योग्य असलेली सामग्री, तसेच संकल्पनांचे आकलन व समस्या निराकरण क्षमता विकसनासाठी कृती आणि वातावरण यांमध्ये बालकांचा सहभाग घेतला पाहिजे.

८) बालकांच्या अनुभवांतून शिक्षणाचा आशय तयार केला पाहिजे. आशयाची नावीन्यता किंवा त्यातील आव्हाने, बालकांच्या परिचित अनुभवांवर आधारित असावीत.

९) बालकांच्या विकासाच्या गरजांनुरूप शिक्षणाचा आशय असावा. कला, संगीत, कल्पना रंजक खेळ, गोष्टी सांगणे यांसाठी त्यांना अनेक संधी दिल्या जाव्यात.

१०) आशयामध्ये लिंग, जात, वर्ग आणि दिव्यांगत्व यांसारख्या मुद्द्यांसाठी समानतेवर भर दिला पाहिजे.

११) शिक्षकांनी बालकांचे सुलभक म्हणून काम करावे. मुक्त प्रश्न विचारून, शोध घेण्याच्या प्रवृत्तीला चालना देऊन, बालकांना साहाय्य करावे.

१२) कुटुंब व समाज हे दोन्ही या प्रक्रियेतील भागधारक/जबाबदार घटक असून, त्यांना विविध मार्गांनी सहभागी करून घ्यावे.

१३) बालशिक्षण केंद्रांत बालकांची काळजी घेतली जाते. परिचित प्रौढांकडे बालके सहजपणे काळजीवाहक म्हणूनच पाहतात. शिक्षक हा बालकांच्या गरजा आणि भावनिकतेप्रति संवेदनशील आणि जबाबदार असावा. वर्गातील कृतींमध्ये शिकण्याच्या भावनात्मक पैलूंवर भर असावा. (उदा., अभिनय कलेचा उपयोग करून गोष्ट सांगणे.)

पायाभूत स्तर हा अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्राचा एक असा टप्पा आहे; ज्यामध्ये ३ ते ८ वर्षे वयोगटातील बालकांसाठी पाच वर्षे लवचीक, बहुस्तरीय, खेळ आणि कृती आधारित शिक्षण यांचा समावेश आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२०, हे बालकाची सुरुवातीची वर्षे विकास आणि अध्ययनासाठी महत्त्वाची मानते.

या पायाभूत वर्षांतील शिक्षणाने, मूलभूत क्षमता आणि कौशल्ये विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. यामध्ये बोधात्मक, भाषिक आणि सामाजिक–भावनिक कौशल्यांचा समावेश आहे. या सर्व विकासासाठी सुरुवातीच्या वर्षांचा कालावधी हा अधिक संवेदनशील असतो. या काळात बालकांचा वाचन–लेखन आणि संख्याज्ञानाचा भक्कम पाया तयार होतो. बालके जसजशी परिपक्व होतात, तसतशी त्यांच्या पुढील शिक्षणाची पायाभरणी होत जाते.

## ३.५) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० नुसार, प्राधान्याने घ्यावयाचे उपक्रम :

### अ) निपुण भारत

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० नुसार, देशात पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) यांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, 'निपुण भारत' हे एक राष्ट्रीय अभियान सुरू करण्यात आले. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यांद्वारे देशातील सर्व बालकांसाठी सन २०२६–२७ पर्यंत 'निपुण भारत' अभियानाची उद्दिष्टे साध्य करणे अपेक्षित आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मधील प्रकरण २ मध्ये नमूद केलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी, तसेच 'निपुण भारत' ची धोरणात्मक अंमलबजावणी करण्यासाठी, आवश्यक संरचनांची स्पष्ट नियामके दिली आहेत, तसेच अभियानाशी संबंधित व्यक्ती व संस्था यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या यांवर लक्ष केंद्रित केले आहे. हे अभियान देशभरात सुरू झाले आहे. पूर्ण प्रेरणेने हे महत्त्वपूर्ण काम चालू ठेवले पाहिजे.

अभ्यासक्रमविषयक असणारे 'निपुण भारत' अभियानचे घटक (उदा., अभ्यासक्रमाची ध्येये आणि क्षमता) राज्य अभ्यासक्रम आराखड्याशी (SCF) संरेखित केले आहेत.

**ब) विद्याप्रवेश**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० नुसार, पायाभूत साक्षरता आणि संख्यासाक्षरता (FLN) ही उद्दिष्टे सर्व बालकांनी साध्य करण्यावर भर देणे हा विद्याप्रवेश कार्यक्रमाचा आधार आहे. प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण याचे सार्वत्रिकीकरण झाले नसल्यामुळे, खूप मोठ्या प्रमाणात बालके इयत्ता पहिलीच्या पहिल्या काही आठवड्यांतच मागे पडतात. अध्ययनाच्या या कमतरतेवर मात करण्यासाठी, अंतरिम उपाय म्हणून, तीन महिन्यांकरिता, खेळ–आधारित शालेय तयारी कृतिपुस्तिका, शिक्षक हस्तपुस्तिका इ. साहित्य तयार करण्यात आले आहे.

विद्याप्रवेश कार्यक्रम हा भाषा व गणितीय साक्षरतेचा पाया रचण्यासाठी तयार झाला आहे. यामध्ये 'निपुण भारत' मधील निर्धारित अध्ययन निष्पत्तींना देखील महत्त्व दिले जात आहे.

**क) बालवाटिका**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० नुसार, प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण यांमधील अर्हताधारक असलेले शिक्षक असावेत, अशा 'पूर्वप्राथमिक वर्गात' वयाची ५ वर्षे पूर्ण होण्याअगोदर प्रत्येक बालक प्रवेश घेईल; यालाच 'बालवाटिका' संबोधले आहे. (NEP २०२०, परिच्छेद १.६)

बालवाटिका कार्यक्रमाची आखणी, इयत्ता पहिलीच्या अगोदर एक वर्षाचा कार्यक्रम म्हणून करण्यात आली आहे. याचा उद्देश खेळ आधारित दृष्टिकोनाद्वारे संख्याज्ञान विकसित करून, बालकांमध्ये बोधात्मक आणि भाषिक क्षमता विकसित करून, बालकांना तयार करणे असा आहे. NCERT ने पूर्वप्राथमिक शाळेच्या तीन वर्षांसाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि प्रक्रिया विकसित केल्या आहेत, ज्यामध्ये बालवाटिकेचाही समावेश आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी 'उन्मुख' ही शिक्षक मार्गदर्शिका माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये प्रसिद्ध केली आहे. त्यामध्ये बालशिक्षण केंद्रातील ३ ते ४, ४ ते ५ आणि ५ ते ६ या वयोगटाच्या वर्गांना बालवाटिका असे संबोधले आहे.

### ड) शाळापूर्व तयारी अभियान (पहिले पाऊल)

इयत्ता पहिलीमध्ये दाखलपात्र बालकांची शाळापूर्व तयारी व्हावी व त्यांचे इयत्ता पहिलीत सहज संक्रमण घडून यावे, या उद्देशाने सन २०२२-२३ मध्ये 'STARS' प्रकल्पांतर्गत शाळापूर्व तयारी अभियान (पहिले पाऊल) उपक्रमाचे राज्यामध्ये आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत शाळास्तरावर शाळापूर्व तयारी मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले. बालकांसाठी विकासपत्र, कृतिपुस्तिका, कृतिपत्रिका, पालकांसाठी आयडिया कार्ड, तसेच स्वयंसेवकांसाठी प्रमाणपत्र हे साहित्य या उपक्रमांतर्गत देण्यात आले. मेळावा क्रमांक एक नंतर साधारणपणे आठ आठवडे 'शाळेतील पहिले पाऊल' पुस्तिकेच्या आधारे, बालकांकडून शारीरिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक आणि भावनात्मक विकास, भाषा विकास, गणनपूर्व तयारी या विकास क्षेत्रांतील कृती पालकांनी घरी करून घेतल्या. बालकांच्या कृती घेण्यासाठी शिक्षक, अंगणवाडी सेविका, स्वयंसेवक यांनी साहाय्य केले. माहे जूनमध्ये शाळा सुरू झाल्यानंतर, शाळा स्तरावर शाळापूर्व तयारी मेळावा क्रमांक दोनचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमामुळे इयत्ता पहिलीला दाखलपात्र बालकांची आवश्यक शाळापूर्व तयारी करून घेण्यास मदत झाली. शिक्षण व एकात्मिक बालविकास सेवा योजना विभाग, यांनी समन्वयाने या उपक्रमाची अंमलबजावणी केली. या उपक्रमाच्या माध्यमातून बालकांच्या शाळापूर्व तयारीबाबत पालकांचे उद्‌बोधन करण्यात आले व त्यांचा सक्रिय सहभाग घेण्यात आला. दाखलपात्र बालकांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले, त्यामुळे बालकांचे इयत्ता पहिलीत सहज संक्रमण घडून येण्यास मदत झाली.

## ४) अभ्यासक्रम पुनर्रचना प्रक्रिया :

अभ्यासक्रमाची रचना करताना संपूर्ण जीवनाचा आवाका लक्षात घेणे आवश्यक ठरते. मानवी जीवनाचे ध्येय गाठण्यासाठी निरनिराळ्या विषयांच्या माध्यमातून कोणकोणते अनुभव द्यावेत, याविषयीचे एक भव्य तसेच सुस्पष्ट चित्र अभ्यासक्रम तयार करणाऱ्या तज्ज्ञांसमोर असणे आवश्यक असते. यासाठी निरनिराळ्या क्षेत्रांतील जाणकार व्यक्तींची निवड करून, अभ्यासक्रम निर्मितीसाठी आवश्यक तत्त्वे व त्यांचा निर्मितीमध्ये परिणामकारक वापर करण्यासाठी प्रगल्भ असे धोरण विकसित करण्याची गरज असते. हे आव्हानात्मक काम करण्यासाठी परिषदेने या वेळी अभ्यासक्रम निर्मिती प्रक्रियेत अनेक बदल करून, ती परिपूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या प्रयत्नांचा संक्षिप्त मागोवा पुढे घेतला आहे.

## ४.१) पायाभूत दस्तऐवज :

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२२ (NCF-2022), यातील सामान्य शैक्षणिक तत्त्वे, तसेच प्रत्येक विषयामधील महत्त्वाची तत्त्वे यांचे प्रतिबिंब राज्याच्या अभ्यासक्रमात पडण्याच्या दृष्टीने, हा आराखडा आधारभूत मानण्यात आला. NCF-2022 मधील धोरण आणि शिफारशींचा राज्याच्या परंपरा व परिस्थितीसंदर्भात विचार करून, राज्यासाठी सुयोग्य धोरणाचा विचार होऊन, राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२३ (SCF-2023) तयार करून, त्याला शासनमान्यता घेतली. तोही पायाभूत दस्तऐवज म्हणून वापरण्यात आला. राज्य अभ्यासक्रम आराखडा–पायाभूत स्तर २०२३ च्या अनुषंगाने, पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम २०२४ विकसित करण्यात आला.

**पूरक दस्तऐवज :**

या आधारभूत दस्तऐवजांबरोबर इतर अनेक पूरक दस्तऐवजांचा परामर्श, अभ्यासक्रम विकसन करताना घेण्यात आला. त्यातील काही दस्तऐवज पुढीलप्रमाणे आहेत.

- प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम–२०१२
- एनसीईआरटी मार्फत राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा विकसित करत असताना, २५ गट नेमून अभ्यासक्रमातील विविध शालेय विषय, अध्ययन–अध्यापन प्रक्रिया, मूल्यमापन व इतर घटकांसंदर्भात सद्य:स्थिती व पुढील विकसनाची दिशा दर्शविणारे दस्ताऐवज (पोझिशन पेपर्स)
- एस. एस. सी. बोर्डाचा अभ्यासक्रम
- सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन संबंधित शासननिर्णय
- जीवन कौशल्यांवर आधारित शिक्षक मार्गदर्शिका
- आकार बालशिक्षणक्रम

या सर्व दस्तऐवजांमुळे आपापल्या विषयाचा पाठ्यक्रम तयार करण्याविषयी, एक दर्जेदार धोरण तयार होण्यास मदत मिळाली.

## ४.२) राष्ट्रीय विद्याविषयक प्राधिकरणामधील अभ्यासक्रम विकसनाचा अभ्यास :

एनसीईआरटी, नवी दिल्ली ही संस्था राष्ट्रीय विद्याविषयक प्राधिकरण म्हणून घोषित केलेली आहे. या संस्थेमार्फत अभ्यासक्रम विकसन कसे केले जाते, हे जाणून घेण्यासाठी एससीईआरटी, पुणे या संस्थेच्या प्रतिनिधींनी एनसीईआरटी मधील निरनिराळ्या विभागांतील अधिकाऱ्यांशी समक्ष चर्चेतून माहिती घेतली. अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके तयार करण्याची प्रक्रिया कशी होते, हेही चर्चेतून जाणून घेतले. यातून अभ्यासक्रम निर्मिती विषयीच्या तात्त्विक आणि व्यावहारिक पैलूंविषयीची दृष्टी विस्तृत होण्यास मदत झाली.

### ४.३) अभ्यासक्रम समिती नियुक्ती :

अभ्यासक्रमाच्या पुनर्रचनेसाठी विषयनिहाय अभ्यास समिती स्थापन करण्यात आली. पुनर्रचनेसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे, अभ्यास समितीच्या विविध शैक्षणिक शिफारशींवर आवश्यक कार्यवाही करणे व त्यांच्या कामांवर नियंत्रण ठेवणे इत्यादी कामांसाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती – मा. मंत्री, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आली. पाठ्यक्रमाचा पाठ्यपुस्तकांशी समन्वय राखण्यासाठी, पाठ्यपुस्तक मंडळातील प्रतिनिधींचा समावेश अभ्यासमंडळात करण्यात आला. अभ्यासमंडळातील सदस्यांच्या निवडीसाठी अशा पद्धतीचा वापर प्रथमच करण्यात आला.

### ४.४) परिषदस्तरावरील मार्गदर्शन :

राज्यस्तरावरील तज्ज्ञ व परिषदेतील अधिकाऱ्यांनी, मूल्यशिक्षण, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाविषयी शासन निर्णयातील अपेक्षा, आरटीई २००९ मधील शैक्षणिक तत्त्वांचा व अध्ययन–अध्यापन–मूल्यमापन यांविषयीच्या अपेक्षांचा अभ्यासक्रम विकसनात कशा प्रकारे समन्वय साधता येईल, याविषयी विस्तृत चर्चा घडवून आणली, तसेच अभ्यासमंडळ सदस्यांशी वेळोवेळी चर्चा करून पाठ्यक्रम विकसन प्रक्रियेचा आढावा घेतला.

### ४.५) विषय योजना :

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील कलम क्र. २९ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी, केंद्रशासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाकडून, शैक्षणिक प्राधिकरणांना मार्गदर्शन प्राप्त झाले. त्यामध्ये विषयांचा समतोल राखण्याबाबत, तसेच अनेक विषयांचा अकारण होणारा बोजा कमी करण्याबाबत सूचित करण्यात आले. या सूचना व राज्याच्या गरजा यांचा विचार करून, पायाभूत शिक्षण स्तरासाठी विषय योजना तयार करण्यात आलेली आहे. विषययोजनेची वैशिष्ट्ये पुढे दिली आहेत.

**विषययोजनेची वैशिष्ट्ये** :

१) पायाभूत स्तरांमध्ये पूर्व प्राथमिकच्या तीन वर्षांकरता बालवाटिका–१, बालवाटिका–२, बालवाटिका–३ यासाठी शिक्षक हस्तपुस्तिका, विद्यार्थी कृतिपुस्तिका असतील.

२) इयत्ता पहिली व दुसरीकरता भाषा (मराठी, इंग्रजी), गणित, कार्यशिक्षण, कलाशिक्षण, शारीरिक शिक्षण हे विषय राहतील आणि भाषा व गणित या विषयांमध्येच परिसर अभ्यास हा विषय समाविष्ट असेल.

### ४.६) विषयनिहाय पाठ्यक्रमाच्या आराखड्याची निश्चिती :

विषयनिहाय पाठ्यक्रमाचे आराखडे व त्यांची मांडणी निश्चित करण्यासाठी, परिषदेने एनसीईआरटीच्या अभ्यासक्रम मांडणीच्या आराखड्यावर चर्चा घडवून आणली, तसेच प्रत्येक विषय अभ्यास मंडळास

विषयाच्या गरजेनुसार आपापल्या विषयाचा आराखडा निश्चित करण्याचे स्वातंत्र्य दिले. प्रत्येक विषयगटाने इयत्तानिहाय घटक व उपघटक ठरवून, विषयाच्या गरजेनुसार त्यांची मांडणी केली व आपापल्या पाठ्यक्रमाचा आराखडा तयार केला व त्यामध्ये इतर आवश्यक तपशिलाचा समावेश केला.

### ४.७) पाठ्यक्रमाचा मसुदा समाजाच्या अभिप्रायासाठी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध :

विषयनिहाय पाठ्यक्रम मसुदा तयार झाल्यानंतर, सदर मसुदा समाजातील विविध घटकांचे अभिप्राय घेण्यासाठी, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला. आलेल्या अभिप्रायांनुसार पाठ्यक्रम मसुद्यामध्ये योग्य ते बदल करून, पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम–२०२४ अंतिम करण्यात आला.

अभ्यास मंडळांनी तयार केलेल्या अभ्यासक्रम/पाठ्यक्रमास राज्यस्तर सुकाणू समितीमध्ये मान्यता देण्यात आली.

### ४.८) प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षण :

बालकाच्या आयुष्याची पहिली आठ वर्षे ही अत्यंत महत्त्वाची असतात. याच काळामध्ये त्याच्या भावी जीवनाची पायाभरणी होते व शारीरिक, भाषिक, बोधात्मक आणि सामाजिक–भावनिक या आयामांसह त्याचा पंचकोशाच्या अनुषंगाने विकास होत असतो.

व्यक्तीच्या जीवनातील इतर कोणत्याही टप्प्यातील विकासाच्या गतीपेक्षा, या आठ वर्षांच्या कालावधीमध्ये मेंदूच्या विकासाची गती ही अधिक वेगवान असते. मेंदूशास्त्रामधील (Neuro Science) संशोधनानुसार, व्यक्तीच्या मेंदूचा ८५ टक्क्यांपेक्षा जास्त विकास, वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत होतो. प्रारंभिक बाल्यावस्थेतील सुजाण संगोपनाचे महत्त्व, मेंदूशास्त्राने अधोरेखित केले आहे. बालकाच्या जीवनातील सुरुवातीच्या वर्षांमध्ये, सुजाण संगोपन व उद्दीपन मिळाल्यास, त्याच्या मेंदूचा निकोप व चिरंतन विकास होतो, असे अनेक संशोधनाच्या निष्कर्षातून सिद्ध झाले आहे.

अगदी अलीकडे झालेल्या संशोधनांमध्ये, असेही निदर्शनास आले आहे की, आठ वर्षापेक्षा लहान बालके सरळ रेषेत विशिष्ट टप्प्यांनी किंवा विशिष्ट मार्गांनी शिकतात असे नाही. वयाच्या आठव्या वर्षापासून मात्र बहुतांश बालकांची अध्ययन प्रक्रिया निश्चित अशा टप्प्यांनी मार्गक्रमण करताना दिसते. मात्र या वयातही काही बालकांचा विकास अरेखीय पद्धतीने व कमी जास्त वेगाने चालू राहतो. बालकाची वाढ आणि विकास यामध्ये, वयाच्या आठव्या वर्षापर्यंत जरी वेगवेगळ्या प्रकारचे फरक दिसत असले, तरी सकृतदर्शनी विचार करता, वयाच्या आठव्या वर्षाकडे एका स्तरातून दुसऱ्या स्तरात जाण्याचा संक्रमण बिंदू म्हणून बघता येईल. विशेषतः वयाच्या आठव्या वर्षीच बालके अधिक संरचित अध्ययनाशी जुळवून घेण्यास सुरुवात करतात.

'प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षण' या संकल्पनेची व्याख्या जन्मापासून ते वय वर्षे आठ पर्यंतच्या बालकांचे संगोपन आणि शिक्षण अशी केली जाते.

## ४.९) पायाभूत स्तर

### अ) प्रामुख्याने घरामध्ये व्यतीत होणारा कालावधी : वय वर्षे ० ते ३

बहुतांशी बालकांचा जन्म ते वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंतचा काळ, हा प्रामुख्याने घरातील वातावरणात कुटुंबासमवेत जात असतो, तर काही बालकांचा हाच काळ पाळणाघरात जातो. वयाची तीन वर्षे पूर्ण केल्यानंतर, बहुतांशी बालके त्यांच्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण काळ हा अंगणवाडी आणि पूर्वप्राथमिक शाळा अशा प्रकारच्या संस्थात्मक व्यवस्थेमध्ये घालवतात. वय वर्षे तीनपेक्षा अधिक वयाच्या बालकांना, संस्थात्मक व्यवस्थेमार्फत गुणवत्तापूर्ण व शास्त्रशुद्ध शाळापूर्व शिक्षण देण्यात यावे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० मधील अनेक प्राधान्यांपैकी एक प्राधान्यक्रम आहे.

वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत घरातील वातावरण हे प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षणाचा पाया असतो. पोषक आहार, आरोग्याच्या चांगल्या सवयी, सुजाण संगोपन, सुरक्षा आणि संरक्षण, तसेच प्रारंभिक बाल्यावस्थेतील अध्ययनासाठी दिले जाणारे उत्तेजन इ. घटकांनी मिळून या वयोगटाची पायाभरणी होते.

वयाच्या तिसऱ्या वर्षाच्या आधी, घरातून मिळणाऱ्या प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षणामध्ये केवळ खेळ, सुरक्षितता व पोषण यांचा समावेश होतो असे नाही, तर संभाषण, खेळ, हालचाल, संगीत व ध्वनींचे श्रवण, तसेच दृष्टी व स्पर्श या संवेदनांचे उत्तेजन यांचाही समावेश होतो, त्यामुळे तिसऱ्या वर्षाच्या शेवटी सर्वांगीण विकासाचा शारीरिक व कारक, बोधात्मक, सामाजिक व भावनिक, संख्याज्ञान व भाषा विकासाच्या या सर्व क्षेत्रांमध्ये कमाल निष्पत्ती साध्य होते. याठिकाणी लक्षात घेतले पाहिजे, की सर्वांगीण विकासाची सर्व क्षेत्रे परस्परव्यापी अर्थातच परस्परावलंबी आहेत.

वय वर्षे ० ते ३ वयोगटाच्या बालकांसाठी घरामध्ये उच्च–गुणवत्तेचे प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण सक्षम करण्यासाठी, मार्गदर्शक तत्त्वे आणि सुचविण्यात येणाऱ्या पद्धती, महिला आणि बाल विकास विभागामार्फत (DWCD) विकसित आणि प्रसारित करण्यात आल्या आहेत.

### ब) संस्थात्मक व्यवस्थेमध्ये व्यतीत होणारा कालावधी : वय वर्षे ३ ते ८

वय वर्षे ३ ते ८ वयोगटातील बालकांसाठी संस्थात्मक व्यवस्थेमध्ये उपलब्ध करून देण्यात येणारे सुयोग्य आणि गुणवत्तापूर्ण प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण (ECCE), हे

सर्व बालकांसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. राज्यात संस्थात्मक व्यवस्थेतर्फे सामान्यतः प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण सर्वसामान्यपणे खालीलप्रमाणे राबवले जाते.

१) वय वर्षे ३ ते ६ : वय वर्षे ३ ते ६ वयोगटातील बालकांसाठी अंगणवाड्या, बालवाड्या आणि बालशिक्षण केंद्रांतून आवश्यक प्रारंभिक बाल्यावस्था शिक्षण दिले जाते.

२) वय वर्षे ६ ते ८ : वय वर्षे ६ ते ८ या वयोगटातील बालकांसाठी प्राथमिक शिक्षण (इयत्ता पहिली आणि इयत्ता दुसरी)

बालकांच्या वयाच्या तिसऱ्या वर्षापासून ते आठव्या वर्षांपर्यंत, प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण यांमध्ये आरोग्य, सुरक्षितता, संगोपन आणि पोषण या बाबींकडे सातत्याने लक्ष देणे आवश्यक आहे. विशेषत: पुढील घटक जास्त महत्त्वाचे आहेत. स्वयं-मदत कौशल्ये, कारक कौशल्ये, स्वच्छता, इतरांपासून दुरावण्याची चिंता हाताळणे, हालचाल आणि व्यायामाद्‌वारे शारीरिक विकास, पालक व इतरांपर्यंत विचार आणि भावना संप्रेषित करणे आणि व्यक्त होणे, आपल्या समवयस्कांच्या बरोबर सहजतेने वावरणे, काम पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ देणे, नैतिक विकास व चांगल्या सवयी रुजविणे इ.

वय वर्षे ३ ते ८ या वयोगटामधील बालकांसाठी, गटांमध्ये आणि व्यक्तिगत पातळीवर, देखरेखीखाली खेळ आधारित शिक्षणाला विशेष महत्त्व आहे, ज्यामुळे बालकाच्या जन्मजात क्षमता आणि कुतूहल, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, सहकार्य, गटकार्य, सामाजिक आंतरक्रिया, समानानुभूती, करुणा, सर्वसमावेशकता, संवाद, सांस्कृतिक ओळख व आदर, खेळकर वृत्ती, सभोवतालच्या वातावरणाबाबतची ओळख इत्यादी क्षमतांबरोबरच, शिक्षक, सहाध्यायी आणि इतरांशी यशस्वीरीत्या आणि आदरपूर्वक आंतरक्रिया साधण्याची क्षमता यांचे संवर्धन आणि विकास साधता येईल.

**क) साक्षरता आणि संख्याज्ञानाचे महत्त्व :**

वय वर्षे ३ ते ८ या काळात, प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणामध्ये प्रारंभिक साक्षरता आणि संख्याज्ञानाचा विकास यांसह वर्णमाला, भाषा, मोजणी, रंग, आकार, रेखाचित्र/चित्रकला, मैदानी आणि वर्गातील खेळ, कोडी आणि तार्किक विचार, कला, हस्तकला, सांगीतिक हालचाली इत्यादींबाबत शिकण्याचा देखील समावेश आहे. प्रारंभिक साक्षरता व संख्याज्ञान आणि सभोवतालच्या पर्यावरणाबद्‌दल जागरूकता, यांवर लक्ष केंद्रित करून, वर नमूद केलेल्या सर्व क्षेत्रांमधील विकासात्मक निष्पत्तींची बांधणी करणे हे उद्‌दिष्ट आहे. विशेषतः वय वर्षे ६-८ या वयोगटासाठी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाच्या प्राप्तीसाठी हे आधारभूत ठरते.

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याला संपूर्ण शिक्षण व्यवस्थेमध्ये असणारे स्थान लक्षात घेऊन, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये यावर अधिक भर देण्यात आला आहे.

**ड) पायाभूत स्तरासाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF-FS)**

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, वय वर्षे ३ ते ८ हा वयोगट 'पायाभूत स्तर' म्हणून संबोधण्यात आला आहे.

सदरच्या राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा उद्देश, हा प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाच्या संदर्भात संस्थात्मक व्यवस्थेमधील पायाभूत स्तराचा विचार करणे असा आहे. प्रस्तुतच्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये (SCF-FS-2023), जरी संस्थात्मक व्यवस्थेवर लक्ष केंद्रित केलेले असले; तरी प्रामुख्याने वय वर्षे ३ ते ८ वयोगटातील बालकांवर घरातील वातावरण म्हणजेच कुटुंब, विस्तारित कुटुंब, शेजारी आणि इतर समाज इत्यादींच्या असणाऱ्या लक्षणीय प्रभावाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. बालकाच्या विकासामध्ये पालक आणि समाज यांची भूमिका महत्त्वाची असल्यामुळे, राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये या घटकांना प्राधान्य देण्यात आले आहे. वय वर्षे ३ पूर्वीच्या वयोगटातील सर्व पैलूंचा विचार या आराखड्यामध्ये केलेला नाही.

**इ) राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF-FS 2023) चे ध्येय :**

व्यक्तीच्या तसेच संपूर्ण समाजाच्या दीर्घकालीन विकासासाठी, पायाभूत स्तराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, हे लक्षात घेऊन, राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये (SCF 2023) पुढील ध्येय स्पष्टपणे मांडले आहे. **''वय वर्षे ३ ते ८ वयोगटातील प्रत्येक बालकाला, २०२५ पर्यंत मोफत, सुरक्षित, गुणवत्तापूर्ण, वैकासिकदृष्ट्या सुयोग्य वातावरण मिळवून देणारे प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण सहज उपलब्ध व्हायला हवे.''**

बालकाच्या जन्माच्यावेळची परिस्थिती किंवा पार्श्वभूमी काहीही असो; गुणवत्तापूर्ण प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण हे बालकांना, त्यांच्या संपूर्ण आयुष्यभर शैक्षणिक व्यवस्थेमध्ये सहभागी होण्यास आणि स्वतःची प्रगती करण्यास सक्षम करते. पायाभूत स्तरामधील गुणवत्तापूर्ण प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण हे सर्व बालकांना सुजाण, नैतिक, विचारशील, सर्जनशील, समानानुभूतिशील (empathetic) आणि उत्पादक मनुष्य बनण्याची उत्तम संधी देते.

आपल्या देशाच्या प्रगतीसाठी, बालकाचे कुटुंब, शाळा, समाज, धोरणकर्ते, प्रशासक हे घटक महत्त्वाचे आहेत. या घटकांशी संबंधित सर्व सदस्यांनी एकत्र येऊन, पायाभूत स्तरावरच बालकाला सुयोग्य पोषण देण्याबरोबरच, त्याच्या सर्वांगीण विकासाला उत्तेजन मिळत आहे याची खात्री करायला हवी.

प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणामध्ये गुंतवणूक का करावी, या प्रश्नाचे उत्तर देणारे तात्त्विक विवेचन पुढील भागात तपशीलवारपणे दिलेले आहे.

## ४.१०) प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षणाचे तात्त्विक अधिष्ठान :

जगभरातील शिक्षण, मेंदूशास्त्र आणि अर्थशास्त्र या शाखांमधील संशोधने स्पष्टपणे निदर्शनास आणून देतात, की कोणत्याही देशाच्या भविष्यासाठी तेथील बालकांना मोफत, सहजगत्या उपलब्ध असणारे, शास्त्रशुद्‌ध, उच्च दर्जाचे, प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाची व्यवस्था सुनिश्चित करणे, ही त्या देशाने केलेली सर्वोत्तम गुंतवणूक असते.

बालकांच्या जीवनातील सुरुवातीच्या आठ वर्षापर्यंतच्या काळात मेंदूचा विकास सर्वाधिक वेगाने होतो, त्यामुळे बालकांच्या सर्वांगीण विकासामध्ये हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा आहे.



बालकांना विविध विकास क्षेत्रांशी निगडित व वयानुरूप खेळ आधारित उपक्रम करण्याची संधी दिली जावी, त्यामुळे ती चांगली शिकतात आणि त्यांची वाढ व विकास उत्तमरीतीने होतो.

ज्ञानेंद्रियांमार्फत मिळणारे वैविध्यपूर्ण अनुभव, सहाय्य व पालनपोषण गुणवत्तापूर्ण असल्यास बालकाच्या सर्वांगीण विकासास मदत होते.

बालपणाचा काळ हा आयुष्यभराच्या अध्ययनाची आणि विकासाची पायाभरणी करतो आणि भविष्यातील जीवनाच्या गुणवत्तेचा दर्जा निश्चित करतो.

सुरुवातीच्या काळात विविध कृती–कार्यक्रमांच्या साहाय्याने, अध्ययनातील दरी मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकते.

अशाप्रकारे प्रारंभिक बालविकास सुधारण्यासाठीचे कार्यक्रम हा खर्च नाही, तर ती एक गुंतवणूक आहे, दर्जेदार प्रारंभिक शिक्षणामधील गुंतवणूक, ही राष्ट्राच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाला चालना देते.

सर्व बालकांसाठी प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षण यामध्ये भरीव गुंतवणूक करणे आवश्यक आहे. प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षण सहजपणे उपलब्ध असावे व त्याचा दर्जा सुयोग्य राखण्यासाठी सुलभ नियमावली केली जावी.

## ४.११) भारतीय विचारधारेवर प्रकाशझोत


भारताच्या प्राचीन काळापासून, बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाचे (ECCE) महत्त्व हा भारतीय परंपरेचा एक अविभाज्य भाग आहे. भारताच्या वैविध्यपूर्ण सर्वप्रांतीय सांस्कृतिक भूभागांमध्ये, लहान बालकांच्या आयुष्याच्या सुरुवातीच्या वर्षांना अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे.

बालकांमध्ये मूल्ये आणि सामाजिक क्षमता विकसित करण्यासह, सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आपल्या देशामध्ये काही समृद्ध परंपरा आणि पद्धती आहेत. अशा पारंपरिक पद्धतीत बालकांचे संगोपन हे एकत्र कुटुंबांमध्ये आणि सामाजिक समुदायांमध्ये होणे आवश्यक असून, बालके ही सतत अशा काळजी घेणाऱ्या प्रौढ व्यक्ती आणि समवयस्कांच्या गटात असायला हवीत.

शिक्षणाचा भारतीय दृष्टिकोन व्यापक आणि सखोल आहे, ज्यामध्ये शिक्षणाने व्यक्तीच्या आंतर–बाह्य अशा दोन्ही प्रकारच्या विकासाला चालना दिली पाहिजे या कल्पनेचा समावेश केलेला आहे. शिकणे हे बाह्य जगाबद्दल, आंतरिक जाणीवेबद्दल आणि स्वतःबद्दल शिकण्याशी सुसंगत असायला हवे. चांगले आरोग्य आणि सामाजिक–भावनिक कौशल्ये विकसित करणे आणि विचार करण्याची क्षमता विकसित करणे आणि जगात चांगल्या प्रकारे आणि तर्कसुसंगत गोष्टींची निवड करणे व निर्णय घेणे, एकात्मिक आणि सर्वांगीण पद्धतीने घडणे, हादेखील एक ठळक व्यावहारिक दृष्टिकोन आहे. शिकणे म्हणजे केवळ माहिती गोळा करणे नव्हे, तर इतरांशी असलेल्या आपल्या नातेसंबंधांचा विचार करून, स्वतःचा विकास साधणे, ज्ञानाच्या विविध प्रकारांमधला भेद ओळखण्यास सक्षम असणे, व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकासासाठी शिकलेल्या गोष्टींचे सफल उपयोजन करण्यास समर्थ बनणे होय.

चौकट १.२ अ

भारतीय तत्त्वचिंतनात मनुष्य हा पाच कोशांनी तयार झालेला असून, हे कोश म्हणजे त्या जीवावरील आवरणे आहेत. त्यांचा विकास करणे म्हणजे या आवरणातील क्षमता विकसित करणे होय. शिक्षणाद्वारे या क्षमता विकसित करत, हळूहळू बालकाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास करता येतो. त्यामुळेच या पंचकोश विकास प्रक्रियेचा योग्य विचार करून कार्य करणे आवश्यक आहे.



पंचकोश विकास

**पंचकोश :**

१) अन्नमय कोश – अर्थात, स्थूल शरीर म्हणजेच शारीरिक विकास (Physical development)

२) प्राणमय कोश – अर्थात, जीवनशक्ती प्राणिक विकास (Vital development)

३) मनोमय कोश – मनोव्यापार– मानसिक विकास (Mental development)

४) विज्ञानमय कोश – विवेकबुद्धी–बौद्धिक क्षमता–बौद्धिक विकास (Intellectual development)

५) आनंदमय कोश – आत्मिक, आध्यात्मिक विकास (Bliss development)

**१) अन्नमय कोश (Physical development) :** स्थूल शरीर – अन्नमय कोश हा अन्नापासून निर्माण होतो व अन्नात विलीन होतो. त्यालाच आपण स्थूल शरीर असे म्हणतो. यात मुख्यतः पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये यांचा सुयोग्य पद्धतीने वापर करून, बालक जगाचे ज्ञान करून घेत असतो व त्याला प्रतिसाद देत असतो. त्यामुळे या दोन्हींचे सक्षमीकरण करणे, तसेच शरीर पंचमहाभूतांनी बनलेले आहे, त्याचा अनुभव प्राप्त करणे हे आवश्यक असते. शरीर सुदृढ व सर्व क्षमतांनी युक्त तयार करणे हा या कोशाचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी आहार, व्यायाम, खेळ, श्रम, स्वावलंबन, स्वच्छता, विश्रांती या विविध घटकांचा उपयोग करावा लागतो.

**२) प्राणमय कोश (Vital development) :** प्राणमय कोश म्हणजे; सूक्ष्म शरीर स्थूल शरीराला नियंत्रित करण्यासाठी, व्यक्तीच्या शरीरातील प्राणऊर्जेद्वारे शरीरातील सर्व क्रियांचे संचालन केले जाते. हे कार्य पाच वायूंद्वारे चालते, त्याला आपण पंचप्राण असे म्हणतो व हा प्राण सबल करणे हा याचा मुख्य उद्देश आहे. प्राणमय कोशामुळे शरीरातील विविध अंगांचा एकमेकांशी योग्य संबंध राहतो, त्यामुळे विविध कौशल्ये प्राप्त करण्यासाठी याचा उपयोग होतो. उदा. उत्तम हस्ताक्षर, सुंदर गाणी म्हणणे, विविध तांत्रिक कौशल्ये प्राप्त करणे हे याने घडते, श्वासावर नियंत्रण आणणे, स्थिर बसणे यांमुळे याचा हळूहळू विकास होतो.

**३) मनोमय कोश (Mental development) :** मानसिक विकास–मन हे विविध प्रकारच्या इच्छा करते, विचार करते व मनात विविध भावना निर्माण होतात. या सर्व मनोव्यापारांना मनोमय कोश असे म्हणायचे. पंच ज्ञानेंद्रियांद्वारे ग्रहण केलेले अनुभव, मनावर परिणाम करत असतात. या अनुभवांनाच आपण संस्कार असे म्हणतो. त्यामुळेच मनावर योग्य नियंत्रण व योग्य संवेदना निर्माण होण्यासाठी, मनोमय कोशाच्या विकासाची आवश्यकता आहे. सेवा, सहकार्य, भक्ती, शांतता, संयम असे विविध गुण निर्माण करणे व त्यांचे सवयीत रूपांतर करणे आवश्यक असते. या दृष्टीने कथा, गाणी, विविध नाटके, प्रसंग निर्मिती, संवाद अशा घटकांचा वापर करता येतो.

**४) विज्ञानमय कोश (Intellectual development) :** विज्ञानमय कोश म्हणजे; व्यक्तीमध्ये असलेल्या विवेकबुद्धीचा विकास करणे व सर्व बौद्धिक कसोटीवर तपासून घेणे, निरीक्षण,

परीक्षण, विश्लेषण, अनुमान, निर्णय या पद्धतीने विविध गोष्टी, घडामोडी, प्रसंग यांना तर्क बुद्धीच्या साहाय्याने तपासता येते, यातून दूरदृष्टी विकसित होते यासाठी प्रयोग करणे, संदर्भ लावणे अशा घटकांचा वापर करावा.

५) **आनंदमय कोश (Bliss development) :** आनंदमय कोश म्हणजे अशा वृत्तीचा विकास करणे; जी या चराचर सृष्टीमध्ये, जे पवित्र, उत्तम, उदात्त असे आहे, त्याचा आनंद घेऊ शकेल. यासाठी बालकांना स्वतःपेक्षा बाहेरचे असे समजण्याचा व त्यासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळेल. विविध प्रकारच्या कला, त्याचा आस्वाद घेणे, पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न करणे, समर्पण, त्याग या भावनांचा परिपोष करणे, यांतून या कोशाचा विकास होतो. यादृष्टीने दृक्‌कला व प्रदर्शनीय कला यांचा आनंद घेणे, विविध सण–समारंभ यांचे आयोजन करणे अशा गोष्टी कराव्या लागतील.

सर्व कोश हे एकमेकांशी संबंधित आहेत. बालकांकडून होणाऱ्या प्रत्येक कृतीतून जरी आपण एखाद्या कोशाच्या विकसनाचा विचार केला, तरी त्याचबरोबर अन्य कोशांचेही विकसन होऊ शकते, त्यामुळे प्रत्येक कोश वेगवेगळा विकसित न होता एकाचवेळी सर्व कोशांचा विकास समांतर सुरू असेल, त्यामुळे त्यादृष्टीने बालकांना योग्य पद्धतीने विकसित करण्याचा प्रयत्न करता येईल.

चौकट १.२ ब

**अंतर्दृष्टीचा विस्तार :** जगातील सर्वांत जुन्या गुरुकुल शिक्षण प्रणालीने, केवळ सर्वांगीण विकासाला चालना दिली नाही, तर शिक्षक आणि विद्यार्थी यांबरोबरच अध्ययन आणि विकास यांच्यातील परस्परसंबंधावर ही भर दिला. अध्ययनाची इच्छा सक्षम करते आणि ज्ञानाचे उपयोजन करण्याची संधी देते, ते अध्ययनासाठी आदर्श वातावरण होय. अध्ययनामुळे अंतर्मनाचा शोध घेण्याचे आणि परीक्षण करता येण्याची संधी उपलब्ध होते.

प्राचीन भारतीय विचारांमध्ये मानवाच्या सर्वांगीण विकासात स्मरण किंवा स्मृती या मानसिक कौशल्याला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. यालाच घोकंपट्टीचे नाव देऊन, पाठांतर या स्मृती कौशल्याबद्दल गैरसमज निर्माण झाला आहे. खरे तर तत्त्वावर आधारित आणि निष्ठेने सराव करताना घोकंपट्टी होत नाही.

अलीकडील बोधात्मक क्षेत्रातील संशोधनांनी स्पष्ट होते, की कार्यरत स्मृती आणि दीर्घकालीन स्मृती या दोन्ही बोध आणि आकलन यांबाबत महत्त्वाची भूमिका निभावतात. स्मरणशक्तीवर पुरेशा प्रमाणात भर न दिल्याने, वर्गामध्ये अनेकदा अपुऱ्या फलनिष्पत्ती दिसून येतात.

वर्ग अध्ययनामध्ये स्मृती वापरणे यात विविध कृतींचा समावेश होतो – जाणीवपूर्वक आणि नियमित सराव, सखोल प्रक्रिया, संकेत निर्माण करणे, संबंध निर्माण करणे आणि जोडण्या करणे, हे राज्य अभ्यासक्रम आराखड्यामधील (SCF) उद्दिष्टांमध्ये किंवा अध्यापनशास्त्राच्या दृष्टिकोनात प्रतिबिंबित होते.

*शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवर, विशेषतः पूर्वमाध्यमिक आणि माध्यमिक टप्प्यांमध्ये हे अंतर्भूत आहे.*

बालकांमध्ये विशिष्ट प्रवृत्ती असल्याचे मानले जाते, ज्या बालकाच्या सभोवतालच्या जगाशी असलेल्या संबंधांवर प्रभाव टाकतात. बालक स्वत:च्या आवडीनिवडीनुसार, सभोवतालच्या वातावरणाने प्रभावित होतो. त्यामुळे त्याला एक अद्‌वितीय व्यक्ती तसेच सामाजिक प्राणी म्हणून देखील ओळखले जाते. अध्ययनातून बालक कृती करण्यास आणि त्याच्या परिणामांना सामोरे जाण्यास तयार व्हायला हवा. व्यक्तिमत्त्वाचा विकास हा शिक्षणाचा महत्त्वाचा पैलू सांस्कृतिक दृष्टिकोनातून समजून घ्यायला हवा. वैदिक काळापासून चालत आलेली, आयुर्वेदाची प्राचीन भारतीय वैद्यकीय प्रणाली बालसंगोपन पद्‌धतींसाठी मार्गदर्शक आहे. या प्रणालीच्या आठ शाखांपैकी एक, लहान बालकांचे संगोपन यासाठी समर्पित आहे. आयुर्वेदिक ग्रंथांमधील बालसंगोपनाचे ज्ञान आणि बालसंगोपन समजून घेण्याचा दृष्टिकोन सर्वंकष आहे. यात जैविक, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय आणि सांस्कृतिक दृष्टिकोन यांच्याकडे परस्पर समावेशक म्हणून पाहिले गेले आहे.

आयुर्वेदाच्या समकालीन अभ्यासामध्ये, कश्यप संहितेच्या कौमारभृत्य या पहिल्या विभागाचा संदर्भ बालरोग, स्त्रीरोग आणि प्रसूतिशास्त्रात अनेकदा उपयोगात आणला जातो. हे ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात लिहिण्यात आल्याची नोंद आहे. आयुर्वेदिक ग्रंथात बालविकासाविषयी विस्तृतपणे माहिती दिली आहे.

उदाहरणार्थ –

अ) ताजी हवा, हिरवळ आणि भरपूर सूर्यप्रकाश असलेले वातावरण बालकाच्या सर्वांगीण स्वास्थ्यासाठी प्रोत्साहन देते.

ब) 'वेखंड' ही एक औषधी वनस्पती, जी चवीला कडू असते. ही वनस्पती वाळलेल्या स्वरूपात वापरल्याने, बालकाच्या मज्जासंस्थेवर सकारात्मक परिणाम होतो. संस्कृतमध्ये वेखंड म्हणजे 'वाचा', म्हणजेच स्पष्टपणे बोलणे. ही औषधी वनस्पती बुद्धिमत्ता आणि अभिव्यक्ती यांना उत्तेजन देते. 'वेखंड' दररोज मधासोबत घेतल्याने वाचा सुधारण्यास मदत होते (उदा. स्मरणशक्ती, उच्चार, स्वराची गुणवत्ता). कार्यात्मकदृष्ट्या वेद हे माता आणि बालक दोघांनाही एक सहजीवन घटक म्हणून पाहतात आणि विकासात्मक दृष्टिकोन आणि बालसंगोपन पद्‌धतींसह

संस्कारांवर भर देतात. बालकाच्या विशिष्ट वयाच्या आधारे, हे संस्कार बालकाच्या जीवनाच्या प्रत्येक वैकासिक टप्प्यावर, इष्टतम शारीरिक आणि मनोवैज्ञानिक प्रगती साधण्यास मदत करतात.

उदा., अन्नप्राशन (बाळांना प्रथमच घन आहार, साधारणतः जन्मानंतर सहाव्या महिन्यात) आणि विद्यारंभ किंवा अक्षराभ्यास. (बालकाला वर्णमालेचा औपचारिकरीत्या परिचय करून देणे.) बालकाच्या विकासाशी संबंधित हे संस्कार वयाच्या आठ वर्षांच्या आत केले जातात. हे संस्कार म्हणजे, बालकाला जीवनाच्या प्रवासात धर्म (धार्मिकता), अर्थ (संपत्ती), काम (इच्छा) आणि मोक्ष (आत्मज्ञान–मी कोण? हे समजणे) या चार पुरुषार्थ प्राप्तीकडे वाटचाल करण्याचे एक साधन आहे.

प्रामुख्याने घर आणि कुटुंबातून दिला जाणारा बालसंगोपनाचा सांस्कृतिक वारसा, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केला जातो. यामध्ये लहान बालकांसाठी मालिश, खेळ आणि अंगाई, लोककथा, बडबडगीते, शब्दकोडी, लोककलेतून निर्माण झालेली खेळणी, या बाबींचा समावेश होतो.

संस्कार संबंधित टप्प्यांचा आणि बालसंगोपनाचा, आधुनिक विचार व ज्ञानाशी जवळचा संबंध दिसून येतो. एक उदाहरण म्हणजे आताच्या काळात जन्मानंतर पहिले सहा महिने फक्त स्तनपान करावे असे विज्ञान सांगते, याच्याशी जुन्या काळात सांगितल्याप्रमाणे सहा महिन्यानंतर अन्नप्राशनाची पहिली सवय हळूहळू बदलावी व खिरीसारखे पातळ पदार्थ देण्यात यावे असे सांगितले आहे, हे किती मिळतेजुळते आहे.

पूर्वी भोवरा, बासरी आणि पाणी भरण्याची मातीची भांडी अशा पारंपरिक लोककलेतील खेळणी आणि वस्तू यांचा वापर बालकांना मूलभूत वैज्ञानिक तत्त्वे विशद करण्यासाठी केला जात असे. पियाजे यांनी सांगितलेल्या, अर्भकांच्या वैकासिक टप्प्याशी सुसंगत व त्यांच्या तत्त्वावर आधारित संवेदीकारक स्वरूपाचे खेळ, तसेच बालकांना आनंद देणारी बडबडगीते, शब्दकोडी आणि कथा बालकांसाठी भाषेचे समृद्ध वातावरण तयार करते व त्यांना बराच काळ गुंतवून ठेवते. यांपैकी काही प्रथा अजूनही एकत्र कुटुंबांमध्ये दिसून येत असल्या तरी, कौटुंबिक रचनेतील बदल आणि विभक्त कुटुंबांकडे असलेला कल यांमुळे या प्रथा लुप्त होत चालल्या आहेत.

या अनुषंगाने स्थानिक संदर्भ आणि हजारो वर्षांपासून भारतामध्ये चालत आलेल्या प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षणाच्या (ECCE) वैविध्यपूर्ण आणि चैतन्यपूर्ण समृद्ध परंपरा टिकवून ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रस्तुत आराखड्यामध्ये या बाबींचा समावेश करण्यात आला आहे, यामुळे आनंद, उत्साह, स्थानिक संस्कृती, भारतीय परंपरेशी तादात्म्यता आणि संघभावना

याबाबत जाणिवा तयार होतील. प्रस्तुत आराखड्यात बालकांचे संगोपन, पालनपोषण आणि शिक्षण याबाबत कुटुंबांच्या भूमिकेचा प्रामुख्याने विचार केला आहे.

## ४.१२) अभ्यासक्रमातील काही महत्त्वाचे मुद्दे : भूमिका

राष्ट्रीय व राज्य पातळीवरील आस्थेचे विषय (National and State Concerns)

**अ) पर्यावरण शिक्षण :**

राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व वाढते आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी, तंत्रज्ञानाचा आणि निरनिराळ्या ऊर्जासाधनांचा शोध आणि वाढता वापर अपरिहार्य आहे; परंतु त्यातून होणाऱ्या पर्यावरण हानीमुळे नजीकच्या भविष्यकाळात मानवजात अस्तित्वात राहील की नाही असा प्रश्न उभा राहिला आहे, त्यामुळे याविषयी जागरूकता, प्रत्येकाने आपल्या स्तरावर करावयाच्या उपाययोजना, यांचे भान अधिकाधिक प्रमाणात निर्माण होण्याची जबाबदारी प्रत्येक अभ्यासक्रमास स्वीकारावी लागणार आहे. पर्यावरण शिक्षण हा स्वतंत्र विषय न ठेवता, पूर्वीप्रमाणेच निरनिराळे विषय आणि सहशालेय नावीन्यपूर्ण कृतियुक्त उपक्रम यांतून विद्यार्थ्यांपर्यंत एकात्मिक पद्धतीने पोहोचविणे अपेक्षित आहे, तसेच त्यांच्या माध्यमातून योग्य जागरूकता आणि कृतिशीलता विकसित करणे अपेक्षित आहे. 'पर्यावरणाचा समतोल राखून विकास' हे तत्त्व विविध उपक्रमांतून रुजवणे आवश्यक आहे.

**ब) मूल्यशिक्षण :**

परिसरात जे घडते, त्याचे अनुकरण मुलांकडून होत असते, त्यामुळे चांगली मूल्ये रुजायची असतील, तर किमान शाळेत व घरात ती मूल्ये पाळली जात आहेत हे निरनिराळ्या प्रसंगांतून विद्यार्थ्याला जाणवायला हवे. बोधप्रद कथा, गीते यांपुरते मूल्यशिक्षण मर्यादित राहता कामा नये. याविषयी शिक्षक-पालक यांनी सामाईक कार्यक्रम आखणे उपयुक्त होईल.

मूल्यशिक्षण हा स्वतंत्रपणे शिकवायचा भाग नाही. निरनिराळे विषय शिकवताना योग्य ठिकाणी त्यांची गुंफण आणि रुजवण पूर्वीप्रमाणेच अपेक्षित आहे. एखाद्या उपक्रमातून अनेक मूल्ये साध्य होऊ शकतात, हे लक्षात घेतल्यास अनेक मूल्ये रुजवण्याचा बोजा वाटणार नाही.

**क) स्त्री-पुरुष समानता :**

स्त्री-पुरुष समानता हे मूल्य निरनिराळ्या विषयांतून रुजवण्याबरोबर, त्याविषयी स्थानिक परिस्थितीनुसार नियोजन उपयोगी ठरणार आहे. स्त्री-पुरुष असमानता शाळेत व घरी कोठे कोठे आढळते, हे शोधण्यासाठी व एकत्र चर्चेतून ती दूर करण्यासाठी व्यावहारिक कार्यक्रम निश्चित केल्यास अधिक चांगला परिणाम दिसू शकेल. स्त्रियांमध्ये पुरुषांप्रमाणे सर्व क्षमता

आहेत, हे ठसवताना, केवळ लोकोत्तर महिलांची उदाहरणे न निवडता, अलीकडच्या काळातील, आसपासच्या परिसरातील उदाहरणे निवडल्यास, मुलांना ती अधिक भावतील व शक्यतेच्या पातळीवरची वाटतील.

**ड) शांततेसाठी शिक्षण :**

एकविसावे शतक तंत्रज्ञानातील विस्मयजनक आविष्कार आणि निरनिराळ्या क्षेत्रांतील समृद्धीबरोबर, अशांती आणि ताणतणावही बरोबर घेऊन आले आहे. ते कमी करण्यासाठी, मनात ताण कशामुळे निर्माण होतो याविषयी आत्मनिरीक्षण करण्यास प्रोत्साहन द्यायला हवे, तसेच विश्वशांतीविषयी उद्‌बोधन करताना, कुटुंब आणि मित्रपरिवारात शांतिपूर्ण संबंध राखणे कसे महत्त्वाचे आहे आणि त्यातूनच जागतिक पातळीवरील शांततेचा मार्ग सापडण्याची शक्यता आहे हे ठसविले पाहिजे. व्यक्तिगत, कौटुंबिक व मित्रपरिवारातील, तसेच समाजातील ताणतणाव व त्यामागील कारणे, यांवर चर्चा घडवून आणावी. ते दूर करण्यासाठी उपक्रमांचे नियोजन करावे.

**इ) मानवी हक्कांची जपणूक :**

भारतीय राज्य घटनेमध्ये जीवन, स्वातंत्र्य, समता, प्रतिष्ठा (dignity) यांविषयी हक्कांचा समावेश आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावरील काही हक्क मानवी हक्क कायद्यात समाविष्ट आहेत. या हक्कांचा परिचय अभ्यासक्रमात व्हावा, तसेच त्यांच्या अंमलबजावणीविषयी निरनिराळ्या विषयांच्या माध्यमातून उद्‌बोधन व्हावे अशी अपेक्षा आहे.

**ई) श्रमसंस्कार :**

शारीरिक व बौद्‌धिक श्रमातून, माणसाने अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे प्रगत व कल्पक मार्ग शोधले आहेत. त्यापलीकडे जाऊन विविध रसायने, भव्य–सुंदर वास्तू, संगणक, अवकाशयान इ. थक्क करणारी यंत्रसामग्री, अशी स्वतंत्र मानवनिर्मित सृष्टी तयार केली आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमातून श्रमसंस्काराचा समावेश मूलभूत व अपरिहार्य आहे. हे संस्कार करताना काही महत्त्वाची तत्त्वे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे अपेक्षित आहे. पहिले तत्त्व म्हणजे, शारीरिक श्रमाबद्‌दल आदर बाळगणे. यामध्ये दुसऱ्या व्यक्तीने केलेल्या श्रमांची दखल, प्रशंसा एवढेच अपेक्षित नसून, निरनिराळ्या प्रसंगी आवश्यक श्रमात स्वत: सहजपणे सहभागी होणे अपेक्षित आहे. कलाशिक्षण, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण यांखेरीज इतर सर्वच शालेय विषयांतून व सहशालेय उपक्रमांतून, श्रमसंस्कार एकात्मिक रीतीने व्हावा असे नियोजन पाठ्यपुस्तके व अध्ययन–अध्यापन प्रक्रिया यांमध्ये अपेक्षित आहे.

## ४.१३) अभ्यासक्रमाची अंमलबजावणी :

### अ) अध्ययन–अध्यापन प्रक्रिया :

वर्गातील शिक्षक–विद्यार्थी आंतरक्रियेमध्ये, अध्यापनापेक्षा अध्ययनाला महत्त्वाचे स्थान राहणार आहे. विद्यार्थ्यांना स्वयंशिक्षणासाठी प्रवृत्त करणे, त्यांना ज्ञाननिर्मितीसाठी विविध स्रोत उपलब्ध करून देणे, ज्ञाननिर्मितीमध्ये विद्यार्थ्यांना अडचण अथवा अडथळा निर्माण झाला, तर त्याचे स्वरूप समजावून घेऊन, योग्य तो स्रोत सुचविणे अथवा त्यांच्या विचारात दिसणाऱ्या त्रुटी, त्यांचा उत्साह कमी होणार नाही अशा रीतीने लक्षात आणून देणे, सूचक प्रश्न विचारून चिकित्सक विचारप्रक्रिया सुरू करून देणे, हे शिक्षकांचे मुख्य काम आहे.

यासाठी त्यांना जुनी भूमिका विसरून, नवी भूमिका स्वीकारावी लागणार आहे. हे सुरुवातीला कठीण वाटेल, पण २१ व्या शतकातील नागरिक म्हणून आपल्या विद्यार्थ्यांना तयार करायचे आहे. या नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. समस्यांचे स्वरूप समजावून घेणे, त्यांतील कळीचा मुद्दा शोधणे, यासाठी लागणारी कौशल्ये आत्मसात करण्याची पूर्वतयारी लहान वयात झाली, तरच पुढे निभाव लागतो. ही तयारी करून घ्यायची, तर आपल्यालाही जुन्या सवयी सोडाव्या लागतील आणि नवीन सवयी अंगी बाणवून घ्याव्या लागतील.

आपल्या जुन्या सवयीप्रमाणे विद्यार्थ्यांना तयार उत्तरे पुरविण्याकडे आपला कल होता. आता या भूमिकेमध्ये बदल करावा लागणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या समस्येचे उत्तर स्वत: किंवा सहाध्यायींबरोबर मिळून, प्रयत्न करून, शोधून काढावयाचे आहे. ती क्षमता त्यांच्याकडे असते. आपण ती क्षमता जोपासावयाची आहे. त्यासाठी यापुढे आपली भूमिका सुलभकाची (Facilitator) राहणार आहे. ती पार पाडण्यासाठी आपल्याला पुढील सवयी लावून घ्याव्या लागणार आहेत–

१) विद्यार्थ्यांना ज्ञाननिर्मितीची प्रेरणा देऊन, अनुभवांचे नियोजन करणे व त्यांची जिज्ञासा जागृत करणे, हा यासाठीचा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यांच्यापुढे एखादी समस्या मांडून अथवा प्रश्न उपस्थित करून, हे साधता येईल किंवा एखाद्या घटकाचे व्यापक स्वरूप सादर करून त्यातील उपघटकांची विविधांगांनी माहिती गोळा करायला सुचविता येईल.

२) जिज्ञासा निर्माण झाल्यावर त्यांचे शोधकार्य सुरू व्हावे, म्हणून प्रयोगशाळा अथवा ग्रंथालयातील साधने आणि साहित्य उपलब्ध करून देणे किंवा कार्यक्षेत्रात नेऊन कर्मचाऱ्यांच्या कार्याचे निरीक्षण करण्याची, त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून देणे किंवा निसर्गात वृक्ष, वेली, पशू, पक्षी यांचे निरीक्षण करण्याची संधी देणे.

३) जिज्ञासेपोटी गोळा केलेल्या माहितीचे तपशील नोंदवणे, तर्काच्या आधारे विश्लेषण करणे, परस्परसंबंध शोधणे, त्यावर चिंतन करणे, निष्कर्ष काढणे, आपले निष्कर्ष गटासमोर

मांडणे, त्यावर चर्चा करणे, इत्यादींसाठी विद्यार्थ्यांना वेळ आणि जागा उपलब्ध करून देणे.

४) त्यांच्या चर्चेवर लक्ष ठेवून, तर्कशुद्ध मांडणीचे, योग्य कामाचे कौतुक करणे आणि आवश्यक तेथे आणि आवश्यक तेवढेच मार्गदर्शन करणे.

**ब) अध्ययन साहित्य :**

वर वर्णन केल्याप्रमाणे वर्गात आणि वर्गाबाहेरही अध्ययनप्रक्रियेलाच महत्त्व येणार असल्यामुळे, यापुढे अध्ययन साहित्याचे महत्त्व अनन्यसाधारण मानले जाणार आहे. जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी, विद्यार्थ्यांना पुस्तके, ग्रंथ, संदर्भग्रंथ यांचा तर उपयोग करावा लागणारच आहे, पण त्याचबरोबर आकाशवाणी, दूरचित्रवाणी, संगणक–आंतरजाल यांच्या साहाय्याने जगभरातील ज्ञानाचे खजिनेही शाळेत उपलब्ध होणार आहेत. गरज पडणार आहे, ती या साऱ्यातून आवश्यक ते संदर्भ कसे शोधायचे, त्यातून मिळणाऱ्या माहितीतील आपल्या कामाशी संबंधित तपशील कसा शोधायचा, पद्धतशीर कसा नोंदवायचा आणि आपल्या कामात त्याचा नेमका कुठे आणि कसा उपयोग करावयाचा या संबंधी निर्णय घेण्याची, पण त्याचबरोबर ही बाब लक्षात घ्यावी लागणार आहे, की हे सारे माहितीचे दुय्यम स्रोत आहेत. त्यांच्यापेक्षाही अधिक उपयुक्त आहेत, ते माहितीचे प्रत्यक्ष स्रोत. हे स्त्रोत जीवनाच्या विविध क्षेत्रांत आणि निसर्गात आढळतात. तिथे जाण्यापूर्वी कोणत्या हेतूने ही माहिती मिळवावयाची, ती नेमकी कोठे सापडेल, ती कशी गोळा करायची, कशी साठवायची याचे नियोजन करावे लागेल. अर्थात विविध क्षेत्रांत आणि निसर्गाच्या सान्निध्यात जात असल्याने, नियोजनात न आलेल्या अनेक जिवंत स्रोतांची अचानक गाठ पडणार आहे. त्याचा समयसूचकतने कसा उपयोग करायचा हेही माहीत असायला हवे; नसेल तर त्यासंबंधीचे मार्गदर्शन घ्यावे लागेल.

हे सारे अनुभवांतून साकारणार आहे, पण त्यासाठी शिक्षकांच्या वर्तनाचे निरीक्षण करून, त्यांना शंका विचारून विद्यार्थ्यांना सुरुवात करावी लागणार आहे आणि शेवटी निर्णय स्वत: घ्यावे लागणार आहेत.

**क) मूल्यमापन :**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम (२००९), लागू झाल्यानंतर, त्यातील कलम २९(२) च्या अंमलबजावणीचा भाग म्हणून, २० ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयाद्वारे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन योजना लागू करण्यात आली व सर्वांनी ती विधायकपणे स्वीकारली आहे. हीच योजना पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करताना सुरू ठेवायची आहे. या योजनेनुसार शिक्षकांनी आकारिक व संकलित मूल्यमापनासाठी साधनतंत्रे वापरायची आहेत.

**ड) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करून अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी :**

अभ्यासक्रमातील अपेक्षा साध्य होण्यासाठी वर्गामध्ये दर्जेदार पाठ्यसाहित्यसंच, प्रभावी शिक्षक–प्रशिक्षण, शिक्षकांची विद्यार्थ्यांना उत्स्फूर्तपणे अध्ययनाला प्रवृत्त करणारी अध्ययन–अध्यापन पद्धती व विकासात्मक, प्रेरक मूल्यमापन योजना या सर्वच घटकांची उत्तम साथ आवश्यक आहे. या सर्व प्रक्रियांची परिणामकारकता वाढवून, त्यात अर्थपूर्ण विविधता आणण्यासाठी माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा दैनंदिन वापर करणे, ही काळाची गरज ठरली आहे.

शिक्षकांना वर्गाबाहेरील, गुंतागुंतीचे तसेच चलत् स्वरूपाचे, एरवी आयोजनासाठी अवघड असे अध्ययन अनुभव, तंत्रज्ञान वापरून सहजपणे देणे शक्य होणार आहे. त्यासाठी आंतरजालावरील लाखोंपैकी योग्य वेबसाईटची निवड करता यायला हवी, याचबरोबर शिक्षकांनीही संगणकाचा वापर करून, शिकवण्यासाठी नेमके साहित्य संकलित करण्याचे कौशल्य यथावकाश आत्मसात करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांशी कृतियुक्त संवाद साधणारे (interactive) सॉफ्टवेअर पायरी–पायरीने अध्ययन नियोजनासाठी, तसेच कल्पक व विविधता असणारा सराव देण्यासाठी तयार करावे लागेल.

❑❑❑

# पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम - २०२४

## (वय वर्षे ३ ते ८)

## विषय : गणित

### प्रस्तावना

- **पायाभूत स्तरावरील गणित शिक्षण** :

  बालके त्यांचा परिसर व संस्कृती यांमधून विकसित झालेली विशिष्ट गणितीय कौशल्ये घेऊन वर्गात प्रवेश करतात. ही कौशल्ये त्यांच्या गणित अध्ययनाचा पाया असावीत. बालक वर्गात प्रवेश घेताना विविध गणितीय अनुभव उदा. गणनपूर्व कौशल्य घेऊन वर्गात येते. त्या सर्व पूर्वअध्ययन अनुभवांची जोडणी गणिताशी व्हावी.

- **उच्च स्तर ध्येये व आशय विशिष्ट ध्येये** :

  गणित अध्ययन ध्येयांचे पुढील प्रमाणे वर्गीकरण केले जाऊ शकते.

  **उच्च स्तर ध्येयांमध्ये** पुढील गोष्टींचा समावेश होतो. बालकांच्या विचारप्रक्रियेचे गणितीकरण उदा., अमूर्त विचार करण्याची क्षमता, समस्या निराकरण, कल्पनाचित्रण, मांडणी, तर्क आणि इतर घटकांसह गणिताच्या संकल्पनांचा संबंध जोडणे. **आशय विशिष्ट ध्येयांमध्ये** पुढील गोष्टींचा समावेश होतो. गणितातील विविध संकल्पना उदा., संख्याज्ञान, आकार, आकृतिबंध इत्यादी.

  बालकांनी गणितामध्ये प्रावीण्य संपादित केल्यावर, बालके आशय विशिष्ट ध्येये साध्य करतात, म्हणून प्रारंभिक स्तरावरील अध्ययन–अध्यापनामध्ये, उच्चस्तरीय ध्येये आणि आशय विशिष्ट ध्येये बालकांनी संपादित करण्यावर शिक्षकांनी भर दिला पाहिजे. ही दोन्ही ध्येये परस्परावलंबी आणि परस्परांशी जोडलेली आहेत.

  गणितीय कौशल्यांच्या अध्ययनासाठी 'सोप्यापासून कठिणाकडे' या अध्ययन सूत्राचा अवलंब करणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा, की बालके पायाभूत स्तरावर गणितीय शब्दसंपदा आत्मसात करतात. उदा. जुळवणे, क्रमवारी, जोड्या लावणे, क्रमागतता, आकृतिबंध, वर्गीकरण, एकासएक संगती आणि संख्या, आकार, अवकाशीय संबोध आणि मापनाशी संबंधित गणिती संकल्पना शिकतात. प्रत्येक इयत्तेत तेव्हा अपेक्षित असलेल्या संकल्पनांची उच्च स्तर कौशल्ये प्राप्त केली जावीत. पुढील इयत्तांमध्ये ही कौशल्ये हळूहळू अधिक विस्तारित होतात. उच्च स्तरांच्या कौशल्यांकडे उदा. प्रमाण, आकार आणि अवकाश व मापन, वास्तविक जीवनामध्ये उपयोगात येणारी विविध गणितीय कौशल्ये उदा., आकलन, निराकरण, कार्यकारणभाव, गणितीय संवाद, निर्णयप्रक्रिया यांवर अधिक भर देणे गरजेचे आहे.

अशा अनेक गणितीय प्रक्रिया आहेत, ज्या मुलांना आशय विशिष्ट ध्येये आणि उच्च स्तर ध्येये साध्य करण्यास मदत करतात.

या प्रक्रियांचा वर्गात समावेश करून, मुले त्यांची गणिताची सर्वंकष समज वाढवू शकतात. वैचारिक समज, प्रक्रियात्मक समज, उपयोजन, तर्क आणि गणिताबद्दल सकारात्मक दृष्टिकोन जोपासणे यांसह विविध क्षेत्रांत कुशल बनू शकतात.

- **गणित शिक्षणातील काही आव्हाने :**

सध्याच्या शिक्षण प्रणालीमध्ये गणित शिक्षणाच्या संदर्भात पुढील आव्हाने दिसून येतात.

१) सुरुवातीच्या काही इयत्तांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाशी संबंधित क्षमतांचा अभाव दिसून येतो.

२) गणित शिक्षण हे जास्त यांत्रिक व प्रक्रियात्मक आहे. ते अधिक सर्जनशील करण्यासाठी प्रयत्नांचा अभाव असणे.

३) पाठ्यपुस्तकामधील गणितीय संकल्पना विद्यार्थ्यांच्या जीवनाशी (वास्तव संदर्भांशी) निगडित नसणे.

४) गणितीय मूल्यांकनाच्या पद्धती या घोकंपट्टी व अर्थहीन सरावावर भर देतात.

५) विद्यार्थ्यांमध्ये गणिताची भीती व अपयशाची भावना असणे.

६) वर्गामध्ये विविध क्षमतांच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे, याची पुरेशी दखल न घेणे.

७) अध्ययन–अध्यापनात रंजकतेचा अभाव.

वरील समस्यांची पूर्तता करण्यासाठी, पायाभूत स्तरावरील गणित शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना केलेली आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भीती दूर करण्यासाठी, शिक्षकांचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. गणित विषयाच्या स्वरूपामुळेही काही आव्हाने निर्माण होतात, जसे – गणित हा एक अमूर्त विषय आहे. त्याला मूर्त रूप देण्यासाठी पायाभूत स्तराच्या अभ्यासक्रमासाठी या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

- **गणित शिक्षणाची ध्येये :**

बालकांची गणितीय समज आणि क्षमता विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करून जग समजून घेऊ शकतात. गणितातून केवळ मूलभूत अंकगणितीय कौशल्यांचा विकास होत नाही, तर त्याद्वारे तार्किक अनुमान, सर्जनशील समस्या निराकरण, नेमक्या व स्पष्ट संप्रेषण कौशल्याचा (तोंडी व लेखी) विकास साधण्यास मदत होत असते.

गणित विषय इतर शालेय विषयांतील मूलभूत संकल्पना समजून घेण्यामध्ये आणि पायाभूत स्तराच्या शिक्षणाची ध्येये साध्य करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतो.

गणित शिक्षणाची महत्त्वाची ध्येये पुढीलप्रमाणे –

**१) मूलभूत संख्याज्ञान :** संख्या व राशी, दैनंदिन आंतरक्रिया करण्यासाठी व सभोवतालचे जग समजून घेण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. गणित शिक्षणातून सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत

संख्याज्ञान अवगत करण्याची हमी दिली गेली पाहिजे. केवळ आकडेमोडीवर भर न देता, अवकाश व मापनाचा समावेश असलेली परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाले पाहिजे.

२) **गणितीय विचारप्रक्रिया :** यामध्ये सुयोग्य व तार्किक पद्धतीने विचार करणे व जगाचा अन्वयार्थ लावणे यांचा समावेश होतो.

३) **समस्या निराकरण :** गणितीय विचाराच्या साहाय्याने समस्या निराकरण करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हे गणित शिक्षणाचे एक महत्त्वाचे अंग आहे.

४) **गणितीय अंतर्ज्ञान/अंत:प्रेरणा :** गणितामध्ये काय सत्य असले पाहिजे किंवा काय नसले पाहिजे याचे अंतर्ज्ञान विकसित करणे हे पेपर, पेन्सिलच्या साहाय्याने गणित सोडवण्यापेक्षा महत्त्वाचे आहे.

५) **आनंद, जिज्ञासा व आश्चर्य :** गणित शिक्षणातून आनंद, जिज्ञासा, सौंदर्यशास्त्र, सर्जनशीलता व आश्चर्य यांची दृष्टी (अर्थ) रुजवली पाहिजे.

उपयोक्त ध्येये ही गणित विषयाची सर्वसमावेशक ध्येये असून, बालकांना केवळ गणन पाठांतर या पर्यंत मर्यादित न ठेवता, गणित विषयाची गोडी, गणिताचा आनंद, दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्याची क्षमता प्राप्त होणे यांचा विचार करण्यात आला आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा – पायाभूत स्तर, राज्य अभ्यासक्रम आराखडा – पायाभूत स्तरानुसार पाच वैकासिक क्षेत्रे, त्यांच्याशी संबंधित अभ्यासक्रमविषयक ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती यांची मांडणी केली आहे. सदर भागामध्ये वैकासिक क्षेत्र क्र. ४ बोधात्मक क्षेत्राशी संबंधित ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती, आवश्यक अध्ययन अनुभव, मूल्यमापन यांचा सर्वंकष विचार करण्यात आला आहे.

पायाभूत स्तरावर अपेक्षित करण्यात आलेल्या क्षमता व अध्ययन निष्पत्ती, या सर्वसमावेशक आहेत. या स्तरावर गणित विषयाच्या क्षमता या गणित विषयाबरोबरच, सर्व विषयांच्या एकत्रित अध्ययन अनुभवांतून साध्य होतात. त्याकरता अध्ययन अनुभवांची योजना करताना, इतर विषयांशी एकात्मिक समभाव साधणे आवश्यक आहे.

- **पायाभूत स्तरावरील बोधात्मक शिक्षणक्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रमीय ध्येये आणि क्षमता**
  **पायाभूत स्तरावरील बोधात्मक शिक्षणाची ध्येये :**

CG - 7 बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.

CG - 8 बालके राशी, आकार, मोजमापे यांच्याद्वारे गणितीय आकलन, समज व जगाला समजून घेण्याची क्षमता विकसित करतात.

**पायाभूत स्तरावरील बोधात्मक शिक्षणाच्या क्षमता :**

C-7.1 वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध, यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.

C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.

C-7.3 दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो.

C-8.1 एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे, वस्तू गटात आणि उपगटात वेगळ्या करतो.

C-8.2 आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्या आधारे, साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.

C-8.3 १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (दोन्ही प्रकारे पुढे आणि मागे) मोजतो.

C-8.4 चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करतो.

C-8.5 स्थानिक किमतीचा वापर करून, ९९ पर्यंतच्या संख्या दर्शवण्यासाठी संख्याचिन्हांचा वापर करतो आणि संख्या ओळखतो.

C-8.6 संख्यांची जोड (composition) व फोड (decomposition) आणि संख्यांचे गट करणे यांसारख्या लवचिक कार्यनीतींचा वापर करून, दोन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी अचूकपणे करतो.

C-8.7 गुणाकार म्हणजे पुन्हा–पुन्हा बेरीज आणि भागाकार म्हणजे समान वाटणी हे समजतो.

C-8.8 मूलभूत भौमितिक आकार ओळखतो व ते तयार करतो, त्याचे वर्गीकरण करतो, समजून घेतो आणि समजावून सांगतो.

C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार, साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतो.

C-8.10 मिनिटे, तास, दिवस, आठवडे आणि महिने या एककांमध्ये कालमापन करतो.


C-8.11 १०० रुपयांपर्यंतचे साधे व्यवहार करतो.

C-8.12 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो.

C-8.13 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संदर्भात, सोपी उदाहरणे सोडवतो व तयारही करतो.

- **गणित अध्यापनाचा दृष्टिकोन (ELPS Approach of mathematics Teaching)**

गुणवत्तापूर्ण पायाभूत संख्याज्ञान मुलांनी प्राप्त करण्यासाठी, आपल्याला शास्त्रीय दृष्टिकोनातून अध्यापनाकडे पाहावे लागेल. मुलांना गणिताच्या अध्ययनात गुंतवून ठेवणे, निरीक्षण, तर्कशुद्ध विचार, समस्या मांडणी व निराकरण इ. अध्यापनशास्त्रीय प्रक्रियेच्या माध्यमातून निश्चित केलेली पायाभूत संख्याज्ञानाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, शिक्षकांनी आपल्या अध्यापनात खालील दृष्टिकोनाचा वापर करण्याची आवश्यकता आहे.




**अ) अनुभव (Experience) :** प्राथमिक स्तरावरील गणित अध्यापनात बहुतांश वेळा चिन्हे/प्रतीके वापरून होणारी सुरुवात, ही खरे तर चिंतेची बाब आहे. 'मुलांना प्रत्यक्ष कृती करण्याचा अनुभव देऊन सुरुवात करणे, हा गणित अध्यापनाचा मुख्य भाग असावा.' मुलांना गणितीय संकल्पनांचे आकलन होण्यासाठी साहित्य, गणितीय खेळ यांची मदत घेऊन, अध्ययन अनुभवांची रचना करावी. गणित पेटीतील साहित्य, साधने, काही खेळणी, सभोवतालच्या परिसरातील सहज उपलब्ध वस्तू यांचा वापर मुलांना गणितीय संकल्पना स्पष्ट होण्यासाठी (Visualization) उपयुक्त ठरतो. प्रत्यक्ष अनुभव देत असताना, शिक्षकांनी मार्गदर्शकाच्या भूमिकेतून सुविधा दात्याच्या (Facilitator) भूमिकेत जायला हवे.

**ब) भाषा (Language) :** मूल घरी ज्या भाषेत बोलते, ती घरची भाषा गणिताच्या वर्गात गणित शिकताना खूप महत्त्वाची भूमिका बजावते. मुलांना त्यांच्या बोलीभाषेत अध्यापन केले, तर गणितीय संकल्पनांचे आकलन सहज होते. भाषा ही शिक्षकांकडून अध्ययन अनुभवांच्या आधारे विशिष्ट संदर्भ वापरून, विकसित होत असते. गणिताची भाषा आणि मुलांची घरची भाषा यांची घट्ट सांगड मुलांना संकल्पनांचे आकलन व गणितीय संवाद साधण्यास मदत करते; म्हणूनच प्राथमिक शिक्षणात गणित व भाषा एकात्मिक पद्धतीने शिकवणे गरजेचे आहे.

**क) चित्रे (Picture) :** प्रत्यक्ष अनुभव दिल्यानंतर व गणितीय भाषेची समज विकसित झाल्यावर गणितीय संकल्पना चित्र स्वरूपात सादर करणे. उदा., ३ चेंडू मोजायचे असतील, तर ३ चेंडू चित्राद्वारे दाखवणे.

**ड) लिखित चिन्हे (Written Symbols) :** प्रत्यक्ष वस्तू, चित्रे इत्यादी मूर्त स्वरूपात अनुभवत शिकलेल्या गणितीय संकल्पना, लिखित चिन्हांच्या माध्यमातून कशा लिहिल्या जाऊ शकतात

ते सांगणे. उदा., ३ चेंडूंचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ३ अंकाचा वापर करणे. ४ मधून २ वजा केल्यावर २ शिल्लक राहतात. ४ – २ = २

- **गणितीय अनुदेशनाचे आयाम (Four Block Approach of mathematics instruction)**

गणित अध्यापनात विविध क्रिया करण्यासाठी प्रमाणित/प्रचलित पद्धती यांत्रिकपणे शिकवण्याकडे कल असतो. त्याऐवजी प्रथम क्रिया समजून घेणे व स्वतःच्या पद्धतीने ती करण्याची संधी बालकाला देणे व त्यानंतर प्रमाणित/प्रचलित पद्धतीचा परिचय व वापर करण्यात यावा.

बालकांनी गणितात प्रवीण व्हावे, म्हणून संकल्पनात्मक समज, प्रक्रियात्मक समज, पद्धती, संभाषण, तर्क कौशल्ये आणि गणिताबद्दलचा सकारात्मक दृष्टिकोन त्यांनी आत्मसात केला पाहिजे.

या सर्व कौशल्यांची चार गटांमध्ये विभागणी करून, दैनंदिन वर्ग प्रक्रियांमध्ये त्यांचा समावेश केला जाऊ शकतो. गणितीय दृष्टिकोन हा कृतींवर आधारित किंवा कृतींच्या स्वरूपानुसार असावा.

| | |
|---|---|
| **आयाम १**<br>**गणित गप्पा/मौखिक गणिती चर्चा**<br>(गणिताचे गाणे/कविता म्हणणे, तोंडी गणन, बालकांचे अनुभव) | **आयाम २**<br>**कौशल्य अध्यापन**<br>(प्रभुत्व संपादनाच्या पैलूंचे एकत्रीकरण) |
| **आयाम ३**<br>**कौशल्य सराव**<br>(प्रक्रियात्मक, संकल्पनात्मक, समस्या निराकरण, तर्क) | **आयाम ४**<br>**गणितीय खेळ**<br>(अध्ययनाचे दृढीकरण, समस्या निराकरण) |

**गणित अनुदेशनाचे आयाम**

**अ) आयाम १ : गणित गप्पा/मौखिक गणिती चर्चा :** तासिकेच्या सुरुवातीला, ५–१० मिनिटे बालके अंकावर आधारित एक गाणे गातात, तसेच त्यांचे गणिताशी संबंधित अनुभव किंवा त्यांच्या जीवनात येणाऱ्या समस्यांबद्दल चर्चा करतात. चर्चा ही मौखिक गणन, संबोध, पद्धती आणि तर्क यांबद्दल असू शकते. या कृतींमधून प्रत्यक्ष अध्यापनाला सुरुवात करण्यापूर्वी बालकांचे पूर्वज्ञान जागृत केले जाते.

**ब) आयाम २ : कौशल्य अध्यापन (प्रभुत्व संपादनाच्या पैलूंचे एकत्रीकरण) :** शिक्षकांनी बालकांना मूर्त अनुभव, पद्धतशीर कृती व अनुदेशन यांद्वारे गणितीय संकल्पना शिकणे, समस्या निराकरण करणे व ते कसे केले आहे हे इतरांना सांगणे या गोष्टींची जबाबदारी टप्प्याटप्प्याने त्यांच्यावर सोपवावी.

प्रत्येक कृती किंवा गणितीय कार्य एकाच क्रमाने घेणे आवश्यक नाही. शिक्षक मुलांना मदत करण्याआधी अंदाज घेऊन, स्वतंत्रपणे गणिती क्रिया सोडवण्यास सांगू शकतात. प्रत्येक मुलाला अध्ययनाची, स्पष्टीकरण देण्याची आणि त्यानुसार शिक्षकांकडून अभिप्राय घेण्याची संधी मिळावी.

क) **आयाम ३ : कौशल्य सराव :** बालकांना गणिती कौशल्यांचा सराव करण्यासाठी संकल्पना, प्रक्रिया, समस्या निराकरण, तर्क आणि संवाद यांवर आधारित विविध प्रकारचे समृद्ध गणितीय अनुभव देणे आवश्यक असते. हे अनुभव कृतिपत्रिका, कार्यपुस्तिका, पाठ्यपुस्तक किंवा शिक्षकांनी तयार केलेल्या कृती-संचाद्वारे देता येतील.

ड) **आयाम ४ : अध्ययनाचे दृढीकरण करण्यासाठी/समस्या निराकरणासाठी गणितीय खेळ :** मुलांना खेळ खेळायला मजा येते. गणितीय खेळ विविध प्रकारचे असू शकतात, जे बालकांना विविध मार्गांनी त्यांचे अध्ययन दृढ करण्यास मदत करतात. हे खेळ समस्या निराकरण, संकल्पना तसेच तर्कांवर आधारित असले पाहिजेत. बालकांच्या अध्ययन पातळीनुसार गटवार खेळांचे नियोजनही करता येते.

- **पायाभूत स्तरावरील गणित अध्ययनाचे घटक (संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा- पायाभूत स्तर)**

प्राथमिक स्तरावरील पायाभूत संख्याज्ञानविषयक क्षमता व कौशल्ये ही खालील सात क्षेत्रांमध्ये विभागली आहेत.




१) **संख्यापूर्व संबोध (Pre-number Concepts) :** संख्यांची समज विकसित होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या संबोधांना 'संख्यापूर्व संबोध' असे म्हणतात. संख्या समजून घेण्यासाठी, वस्तू मोजण्यासाठी तुलनावाचक शब्द, वर्गीकरण, क्रमबद्धता किंवा क्रमवारी, एकास एक संगती या संबोधांवर प्रभुत्व मिळवणे गरजेचे असते.

अ) **वर्गीकरण (Classification) :** साम्य-भेद लक्षात घेऊन समान वैशिष्ट्ये असणाऱ्या वस्तू एकत्र करणे, यास 'वर्गीकरण' असे म्हणतात. रंगानुसार, आकारानुसार याप्रमाणे वर्गीकरणाच्या विविध संधी विविध वस्तूंच्या माध्यमातून देण्यात याव्यात.

ब) **क्रमबद्धता किंवा क्रमवारी (Seriation) :** एखाद्या विशिष्ट नियमांच्या आधारे (उदा., उंची, आकार इत्यादी) वस्तूंचा क्रम लावणे, हे या कौशल्यात अपेक्षित आहे. आकृतिबंध शिकण्यासाठी क्रमवारी हा महत्त्वाचा आधार असतो.

क) **एकास एक संगती (One to one correspondence) :** वस्तूंची जोडी लावणे किंवा जुळवणे याला एकास एक संगती असे म्हणतात. एकास एक संगतीच्या आधारे कमी आणि जास्त, पेक्षा जास्त–पेक्षा कमी, जेवढे तेवढे यांसारख्या संकल्पना समजून घेता येतात

संख्यापूर्व संबोधाचे अध्यापन करताना, जास्तीत जास्त कृतींचे नियोजन विविध प्रकारच्या साहित्याच्या मदतीने करण्यात यावे. कृती करताना प्रत्येक स्तरावर विद्यार्थी काय करत आहेत, कसे करत आहेत याची चर्चा विद्यार्थ्यांसोबत करावी. परिसरातील उपलब्ध वस्तू, खेळणी यांचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये संख्यापूर्व संबोध विकसित होण्यासाठी त्यांना संधी द्यावी.

२) **संख्या आणि त्यावरील क्रिया (Number and Number Operations) :** समूहाची तुलना करण्यासाठी आणि विविध बाबींचे मापन करण्यासाठी, संख्या हे महत्त्वाचे गणितीय साधन आहे. संख्या या वेगवेगळ्या रूपात वापरल्या जातात; जसे की, समूहदर्शक संख्या (Cardinal), क्रमदर्शक संख्या (Ordinal), नामदर्शक संख्या (Nominal). संख्यांचे हे विविध संदर्भातील अर्थ विद्यार्थ्यांना समजणे आवश्यक असते. संख्यांचे वाचन, लेखन (अंकात व अक्षरांत) संख्यांची तुलना, संख्येचा प्रतिकात्मक वापर व एकमेकांचा असणारा संबंध इ. कौशल्येदेखील आत्मसात करणे गरजेचे असते. वेगवेगळ्या परिस्थितीतील समस्यांमध्ये बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार या क्रियांचा उपयोग करता येणे हे एक महत्त्वाचे कौशल्य आहे, की जे पुढील गणित शिक्षणाचा पाया आहे. या चार मूलभूत क्रिया फक्त गणन क्षमता विकसित करण्यासाठी नाही, तर दैनंदिन जीवनातील समस्या सोडवण्यासाठी एक साधन म्हणून उपयोगी पडतात.

३) **आकार आणि अवकाशीय संकल्पना (Shapes and Spatial Understanding) :** अवकाशीय संबोधाची समज हे गणिताचे असे क्षेत्र आहे, ज्यात आकार, माप, अंतर, स्थान/स्थिती, दिशा इत्यादींचा समावेश होतो. अवकाशीय समज ही विद्यार्थ्याला, तो राहत असलेल्या परिसराचे, जगाचे वर्णन आणि वर्गीकरण करण्यास मदत करते. विद्यार्थी त्याच्या सभोवताली आढळणाऱ्या वस्तूंशी, आकारांशी परिचित असतो. वस्तूला विविध गुणधर्म असतात. त्या वस्तूमधील, आकारांमधील साम्य–भेद ओळखून आकारांचे किंवा त्या वस्तूंचे वर्गीकरण करण्याची क्षमता विकसित करण्याच्या संधी देणे महत्त्वाचे आहे. द्विमितीय व त्रिमितीय आकार, सपाट व वक्रपृष्ठभाग, कडा व कोपरे इत्यादी मुख्य संकल्पनांचा यात समावेश होतो.

४) **मापन (Measurement) :** मापन हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. दैनंदिन जीवनातील अनेक परिस्थितींमध्ये/व्यवहारामध्ये आपल्याला मापन करावे लागते; जसे की, खरेदी करणे,

खाद्यपदार्थ बनवणे, इमारत बांधणे, विविध प्रकारच्या वस्तू बनवणे इत्यादी. मापनात प्रामुख्याने लांबी/अंतर, वजन/वस्तुमान, आकारमान/धारकता, वेळ, तापमान इत्यादी राशींचा समावेश होतो. राशीचे मापन करणे म्हणजे निवडलेल्या एककांशी तुलना करणे होय. मोजमाप करताना मुलांना प्रथम अंदाज करण्यासाठी आणि नंतर पद्धतशीरपणे प्रत्यक्ष मापन करून पडताळा घेण्याची संधी द्यावी.

५) **आकृतिबंध (Pattern) :** आपल्या अवतीभोवती सर्वत्र आकृतिबंध आढळतात. आकृतिबंध ही संकल्पना आपल्या दैनंदिन व्यवहारात बऱ्याच ठिकाणी वापरली जाते; जसे की, वेगवेगळ्या सजावटींमध्ये दिसणारी डिझाईन्स, कपडे, इमारती, आकार इत्यादी. गणितीयदृष्ट्या आकृतिबंध हा विशिष्ट नियमाने होणाऱ्या पुनरावृत्तीचा एक क्रम असतो. आकृतिबंधाच्या अभ्यासाने निरीक्षण व विश्लेषणात्मक कौशल्य वाढण्यास मदत होते. संख्या, आकार, रंग, तसेच सममितीवर आधारित असे अनेक प्रकारचे आकृतिबंध असतात. आकृतिबंध ओळखणे, आकृतिबंधांचे वर्णन करणे, आकृतिबंधाचा विस्तार, नवीन आकृतिबंधाची रचना करणे या प्रमुख चार पायऱ्यांच्या आधारे वर्गात व वर्गाबाहेर विविध अध्ययन–अध्यापन कृतींचे नियोजन करून, शिक्षकांनी आकृतिबंधाविषयी अध्ययन अनुभव द्यावेत. आकृतिबंधाचे निरीक्षण करून नियम तयार करून घ्यावा.

६) **माहितीचे व्यवस्थापन (Data Handling and management) :** जेव्हा आपल्याला एखाद्या विशिष्ट प्रश्नाचे/समस्येचे उत्तर द्यायचे असते किंवा आपल्याला एखादी परिस्थिती समजून घ्यायची असते, तेव्हा आपण माहिती गोळा करतो. ही माहिती विविध स्रोतांकडून गोळा केली जाते. माहिती गोळा करणे, माहितीची मांडणी करणे, अर्थ लावणे आणि शेवटी निष्कर्ष काढणे इत्यादी कौशल्यांचा माहिती व्यवस्थापनात समावेश होतो. या कौशल्यांच्या विकसनासाठी विद्यार्थ्यांना वैयक्तिक किंवा गटात कृती देऊन, चर्चेत सहभागी होण्यासाठी, माहितीचे संकलन करणे व ती सादर करून, त्यावर आधारित अनुमान काढणे यांसाठी प्रोत्साहन द्यावे.

- **गणितीय संप्रेषण (Mathematical Communication) :** गणितीय संकेत, चिन्हे, आकृत्या, आलेख इत्यादींच्या माध्यमातून माहितीची होणारी देवाणघेवाण म्हणजे 'गणितीय संप्रेषण' होय. ज्ञानाची निर्मिती होत असताना, भाषा महत्त्वाची भूमिका बजावते. प्रत्येक विद्याशाखेची एक विशिष्ट भाषा असते. गणिताची सुद्धा एक विशेष भाषा आहे, ज्याच्या माध्यमातून विद्यार्थी–विद्यार्थी, शिक्षक–विद्यार्थी वर्गात संवाद साधत असतात. तुला किती नंबरचा शर्ट लागतो? तुझ्या चप्पलचा नंबर काय आहे? विराटने अर्ध शतक केले. ही गणिताच्या भाषेची काही उदाहरणे आहेत, ज्यातून गणितीय संवाद सतत चालू असतो. विद्यार्थी त्याची घरची भाषा व गणिताची भाषा यांचे एकत्रीकरण करून, एखाद्या समस्येचे/प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी, एकमेकांशी चर्चा करत असतात, संवाद साधत असतात म्हणून शिक्षकांनी गणित संकल्पनांची ओळख करून देत असताना, विद्यार्थ्यांच्या घरच्या भाषेतून संवाद साधत, विद्यार्थ्यांना गणितीय भाषेकडे घेऊन जावे.

- **पायाभूत संख्याज्ञान : अध्यापनशास्त्रीय प्रक्रिया**

**अध्यापनशास्त्रीय प्रक्रिया :** विद्यार्थी त्यांच्या सभोवतालचे वातावरण आणि सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीतून, विविध प्रारंभिक गणितीय कौशल्ये शिकून वर्गात येत असतात. ही कौशल्ये पुढील गणित शिक्षणाचा आधार असतात. गुणवत्तापूर्ण पायाभूत गणित शिक्षणासाठी प्राथमिक स्तरावरील गणिती कौशल्यांचा, संकल्पनांचा, प्रक्रियांचा विकास करणे आवश्यक असते. गणित अध्ययन-अध्यापनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, विविध गणितीय प्रक्रिया विद्यार्थ्यांना मदत करतात. काही महत्त्वाच्या गणितीय प्रक्रिया पुढीलप्रमाणे :

१) **समस्या निराकरण (Problem Solving) :** दैनंदिन व्यवहारातील प्रश्न सोडवण्यासाठी गणितीय संकल्पनांचा उपयोग करणे, याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये समस्या निराकरण कौशल्य विकसित करणे हा गणित शिक्षणाचा एक महत्त्वाचा हेतू आहे, तसेच विद्यार्थ्यांना प्रश्नाच्या उत्तरामागचा तर्कशुद्ध विचार आणि कारणमीमांसा स्पष्ट करण्याची संधी देऊन, गणिताकडे समस्या निराकरणाचे एक साधन म्हणून पाहणे आवश्यक आहे.

२) **समवाय (Connection Making) :** गणित हा फक्त विषय नसून, त्याची एक विशिष्ट भाषा असते, जिचा उपयोग विविध विषय शिकण्यासाठी केला जातो, म्हणून गणिताचा गणितातील संकल्पनांशी, विद्यार्थ्यांच्या पूर्वानुभवांशी तसेच इतर विषयांशी समवाय साधावा.

३) **गणितीय मांडणी (Representation) :** मूर्त वस्तू, चिन्हे, प्रतीके, आकृत्या इ. च्या मदतीने गणिती संबोध, संकल्पनांची दृश्य रूपात मांडणी करण्याची संधी विद्यार्थ्यांना द्यावी; जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारची विचार कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल.

४) **अंदाज करणे (Estimation) :** दैनंदिन व्यवहारात विविध बाबींचे प्रत्यक्ष मापन करण्यापूर्वी, त्याचा अंदाज करण्यासाठी विविध पद्धतींचा वापर करण्याची संधी द्यावी. राशींच्या मापनाबाबतचा अंदाज व प्रत्यक्ष पडताळा घेता येईल अशा कृतींचा समावेश वर्ग अध्यापनात करावा.


गणिताचे समृद्ध अध्ययन अनुभव देण्यासाठी या प्रक्रिया वर्गात घडणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रक्रियांच्या मदतीने, गणितीय संकल्पनांचे आकलन, उपयोजन, गणितावर प्रभुत्व आणि गणित विषयाबद्दलचा एक सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यास मदत होईल.

- **गणित शिक्षणासाठी आशयाची निवड :**

**भाषेप्रमाणेच गणितातील आशय परिसराशी जोडून घेतला पाहिजे. गणिती कृती; मग ते आकार समजणे असो किंवा मोजणे असो, नैसर्गिक आणि मानवी जीवनाशी जोडल्या गेल्या पाहिजेत.**

अ) इयत्ता पहिली आणि दुसरी मधील गणिताचा संकल्पनात्मक आशय, पाठ्यपुस्तके आणि कृतिपुस्तिकांमध्ये बालकांसाठी आकर्षक चित्रांमध्ये अंतर्भूत असणे आवश्यक आहे. उदा., लहान आणि मोठी, लांब आणि आखूड ही संकल्पना पुढील चित्रात स्पष्ट होते.

उदा.









**गणिताच्या पाठ्यपुस्तकातील एक उदाहरण**

ब) पाठ्यपुस्तके आणि कृतिपुस्तिकांमधील आशय एकमेकांना पूरक असावा. मोजणे, आकार, क्रमवारिता या संकल्पना शिकवताना, सुरुवातीला वस्तूंच्या साहाय्याने शिकवाव्यात, त्या समजल्यानंतर कागद व पेन्सिलचा उपयोग करावा.






















- **इयत्ता पहिली आणि दुसरीसाठी गणित अध्ययन-अध्यापन साहित्य (LTM)**











काही मूलभूत अध्ययन-अध्यापन साहित्य (LTM) हे स्थानिकरीत्या उपलब्ध सामग्रीपासून बनविणे सोपे आहे, तसेच काही साहित्य बाजारातून उपलब्ध करून घेता येईल. हे साहित्य बालकांना गणित अध्ययनाचे मूर्त अनुभव देतात. ही आनुषंगिक साहित्य यादी पुढीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| **मोजता येणाऱ्या वस्तू :** खडे, बिया, बटणे, मणी इत्यादी, तसेच पॅकिंग साहित्यातील पुठ्ठे हेसुद्धा गणनासाठी वापरता येतील. |  |
| **काड्यांचा गठ्ठा :** समान आकाराच्या काड्यांचा/काठ्यांचा गट्ठा बनवता येतो. आईसक्रीम काड्या, खराट्याच्या काड्या, (अंदाजे १० से.मी. लांब तुकडे), टूथपिक्स, वाळलेली स्केच पेन्स - या सर्वांचे संच बनवण्यासाठी रबर बँडचा वापर केला जाऊ शकतो. जेव्हा बालके ०-१०० पर्यंत संख्या शिकत असतात, तेव्हा त्यांना संख्यांचा परिचय करून द्यावा आणि १०-१० काड्यांचे संच बनवण्याचा भरपूर सराव द्यावा. १० संच एकत्र करून १०० चा मोठा संच बनवता येतो. हे स्थानिक किंमत (दशांश किंवा दशमानपद्धती) समजण्यासाठी, संख्यांची तुलना करण्यासाठी, तसेच बेरीज आणि वजाबाकीसाठी खूप उपयुक्त आहे. |  |
| **मणी माळ :** दोन रंगांत असणारी १०० - मण्यांची माळ ही पूर्ण संख्या, तसेच संख्येवरील क्रिया करण्यास मदत करते. वर्गामध्ये ही माळ कायम मुलांच्या हाताला येईल इतक्या उंचीवर अडकवलेली असावी. |  |

| | |
|---|---|
| **संख्याकार्ड :** स्थानिक किंमत समजण्यास उपयुक्त संख्याकार्ड |   |
| **शतक पाटी – दशक दांडे आणि सुटे :** पूर्ण संख्यांसाठी त्रिमितीय आकाराचे चौकोन |  |
| **विविध भौमितिक आकार :** आकारांची समज विकसित करण्यासाठी पुठ्ठ्यातून कापलेले भौमितिक आकार. |  |
| **स्ट्रॉ मॉडेल्स/जोडो स्ट्रॉ :** कोन आणि बहुभुजाकृतींसाठी स्ट्रॉ, जोडो. |  |
| **जोडो ब्लॉक :** हे चौकोनी तुकडे असून, ते एकमेकांना जोडून अनेक आकार तयार करता येतात. |  |
| **टॅन ग्रॅम :** विशिष्ट आकाराचे सात तुकडे एकमेकांस जोडून मुक्त व भौमितिक आकार बनवता येतात. |  |

• **गणित अध्ययन अध्यापनासाठी पूरक साहित्य**

| पूरक साहित्य यादी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) |  पेपर कप/ग्लास | २) |  स्ट्रॉ | ३) |  बांगडी | ४) |  फासा |
| ५) |  मणी माळ | ६) |  खडू | ७) |  तेलखडू/रंगीत कांड्या | ८) |  काडेपेटीतील काड्या |
| ९) |  चेंडू | १०) |  सुटे मणी | ११) |  नाणी-नोटा प्रतीक | १२) |  पाण्याची बाटली |
| १३) |  शतक पाटी | १४) |  खडूचा बॉक्स | १५) |  दशक दांडे, सुटे एकक | १६) |  पाने, फुले |
| १७) |  दशक माळा | १८) |  वाट्या | १९) |  सापशिडी व फासा | २०) |  फुगे |
| २१) |  रंगीत फुले-प्लॅस्टिक | २२) |  गोट्या | २३) |  पेन्सिली | २४) |   संख्याकार्ड १ ते १०० |
| २५) |  कपड्याचे चिमटे | २६) |  तराजू | २७) |  जोडो ब्लॉक्स | २८) |  आकार |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २९) |  क्रॉसलिंग फोमचे विविध भौमितिक आकार फोमचे तुकडे (रंगीत) | ३०) |  दिनदर्शिका | ३१) |  जिओ बोर्ड | ३२) |  गणितीय जाळी |
| ३३) |  आइस्क्रीम काड्या | ३४) |  मापन टेप | ३५) |  पट्टी | ३६) |  दोरा |
| ३७) |  ठिपक्यांचा कागद | ३८) |  आलेख कागद | ३९) |   संख्यानाम कार्डे १ ते १०० | ४०) |  रंगीत कागद |

सदर साहित्याची यादी नमुन्यादाखल आहे. सुलभक स्थानिक परिस्थिती व संदर्भानुसार यात भर घालू शकतात.

## विषय : गणित

**विकासक्षेत्र : बोधात्मक विकास क्षेत्र** अंतर्गत समाविष्ट असणाऱ्या 7 क्रमांकाचे अभ्यासक्रमीय ध्येय, अध्ययन निष्पत्ती, या पायाभूत स्तरावरील सर्व क्षेत्रांशी, विषयांशी संबंधित आहेत. त्यामुळे त्यांचा एकात्मिक पद्धतीने विचार होणे आवश्यक आहे. याकरता सदर अंतर्गत देण्यात आलेल्या कृती, या अध्ययन अनुभव संबंधित विषय/आशय अध्यापन करत असताना, त्याच्याशी सांगड घालणे आवश्यक आहे. सदर अभ्यासक्रम ध्येय हे एकात्मिक स्वरूपात संपादित होणे अपेक्षित आहे.

**ध्येय : 7.1** वेगवेगळ्या वर्गांतील/गटांतील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.

**क्षमता :**

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | परिसराची ओळख | वस्तू, घटना, चित्रे, प्राणी, पक्षी यांची ओळख. | वस्तू, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो. | (१) परिसरातील वस्तूंची, प्राण्यांची, व्यक्तींची नावे सांगावीत.<br>(२) प्राणी, व्यक्ती, वस्तू यांची चित्रे किंवा चित्रफीत दाखवावी व त्यातील नावे सांगावीत. जसे – हत्ती, वाघ, हरीण, डॉक्टर, वकील, पोलीस, घरातील दैनंदिन वापरातील वस्तू. | दृक्‌श्राव्य साधने, चित्र, चित्रफीत | दाखवलेल्या वस्तूंची नावे ओळखतो, सांगतो. याच्या निरीक्षणातून नोंदी कराव्यात. |
| | परिसराची ओळख | वस्तू, घटना, चित्रे, प्राणी, पक्षी यांची ओळख. | परिचित वस्तू किंवा चित्र, यांतील हरवलेला भाग ओळखतो. | (१) परिसरातील एक वस्तू, प्राणी, पक्षी यांचे चित्र दाखवा व त्या चित्राचे काही काप (चित्राचे तुकडे) घेऊन, चित्राची पुन्हा जुळवाजुळव करून (जोडून) चित्र पूर्ण करावे. जसे – एका पक्ष्याचे (पोपट) चित्राचे काप करा व ते काप जोडून पुन्हा चित्र पूर्ण करण्यास सांगावे. | रंगीत चित्रे | विद्यार्थी कृतीचे निरीक्षण करून तोंडी नोंदी करण्यास सांगावे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | परिसर ओळख | प्रसंग, घटना, पशु–पक्षी नावासह, वैशिष्ट्यांसह ओळख. | नावासह वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो. | (१) परिसरातील प्राणी, पक्षी, घटना यांची चित्रे दाखवावीत व त्यांचे नाव ओळखण्यास सांगावे. उदा. घोडा, कुत्रा, मांजर, चिमणी, कावळा, मोर, दवाखाना, बाजार इत्यादी.<br>(२) विषय देऊन त्याविषयी अनुभव व्यक्त करण्यास प्रेरित करावे. सोपे फरक असणारी | चित्र, चित्रफीत | चित्रातील वस्तू, प्राणी यांच्या आवाजावरून नाव ओळखतो का, यांचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (१ ते २) चित्रे देऊन फरक ओळखण्यास सांगावे. | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | परिसर ओळख | परिसर निरीक्षण | परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेले ३ ते ५ भाग ओळखतो. | (१) फळ्यावर, कागदावर एक मानवी चेहरा, चित्र काढून त्यातील काही भाग अपूर्ण ठेवावेत व मुलांना ते अपूर्ण भाग ओळखण्यास सांगावे. उदा. मानवी चेहरा काढून, त्यातील एक डोळा, एक कान, एखादा दात चित्रातून काढून टाकावा. | Jigsaw puzzles सारखी साधने. | वर्तमानपत्रातील विविध परिचित चित्रे कापून पुन्हा जोडण्यास सांगणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | परिसर ओळख | परिसरातील वस्तू, चित्रे, प्राणी यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये, फरक. | लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदा. घराचा मोठा दरवाजा) | (१) परिचित दैनंदिन वस्तू व व्यक्ती यांची चित्रे मुलांना दाखवावीत.<br>(२) दोन चित्रांमधील फरक ओळखण्यास सांगावे.<br>(३) पैकी एका चित्रातील तपशील विचारणे. उदा. बाजाराचे चित्र दाखवून त्यातील दुकाने, व्यक्ती, ठिकाण, वाहनांची संख्या इत्यादी. | चित्र, चित्रफित | निरीक्षणाद्वारे नोंदी करणे.<br>प्राणी, पक्षी यांची तुलनात्मक वैशिष्ट्ये सांगण्यास चित्रवर्णन करण्यास सांगणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | परिसर निरीक्षण | चित्र, घटना यांमधील फरक, निरीक्षण | परिचित वस्तूच्या चित्रामधील हरवलेले ४ ते ६ भाग ओळखतो. | (१) परिचित प्रसंगाचे एक पूर्ण चित्र दाखवणे व तेच अपूर्ण किंवा काही भाग खोडून दाखवणे व त्या चित्रातील खोडलेला भाग ओळखण्यास सांगणे.<br>उदा. बागेत खेळणारी मुले व बागेतील पूर्ण चित्र<br>(२) विविध अपरिचित परंतु काही भाग अपूर्ण असणारी चित्रे Jigsaw puzzles जोडणे यांसारख्या कृती घ्याव्यात. | चित्र व चित्रफीत, Jigsaw कोडी. | निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | परिसर ओळख | परिसरातील वस्तू, प्राणी, व्यक्ती, पक्षी यांच्या वैशिष्ट्यांचे तपशीलवार वर्णन. | लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती/ चित्रे ओळखतो. त्यांचे बारीकसारीक तपशिलासह वर्णन करतो. (एका छोट्या पिवळ्या घराचे लाल मोठे दार) | (१) परिसरातील वस्तू, प्राणी, पक्षी यांची चित्राकृती किंवा शिल्पकृती दाखवावी. त्याबद्दल वर्णनात्मक माहिती विचारावी. प्राण्यांच्या अवयवांबद्दल माहिती सांगावी. उदा. मांजराला पाय किती, कान किती, शेपट्या किती व त्याचे कोणते अवयव दिसत नाहीत ते सांगा.<br>(२) परिचित प्राणी, पक्षी, वस्तू यांची चित्रे काढून वैशिष्ट्यांबाबत व्यक्त करण्यास सांगावे. | चित्र, चित्रफिती | निरीक्षण करून नोंद करणे.<br>निरीक्षणावर आधारित कृती.<br>परिसर भेट घेऊन परिसरातील वस्तू, प्राणी, पक्षी यांच्या वैशिष्ट्यांवर व्यक्त होतात का पाहावे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | परिसर निरीक्षण | हेतूपूर्वक निरीक्षण | दिलेल्या वस्तू/ चित्रांमध्ये तुलना करतो आणि त्यातील साम्य, भेद ओळखतो. | (१) वस्तू किंवा प्राणी यांचे चित्र दाखवताना, त्यातील काही भाग लपवावा व लपवलेला भाग ओळखण्यास सांगावे. उदा. निसर्गचित्र, किल्ल्याचे चित्र, चित्राच्या लपवलेल्या भागांची नावे ओळखा व सांगा.<br>(२) प्रत्यक्ष क्षेत्रभेट. | चित्र, चित्रफिती | निरीक्षण व चर्चा.<br>सर्व साम्य व भेद शोधतो का याची खात्री करावी. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | परिसर ओळख | परिसरातील घटकांचे तपशीलवार वर्णन. | लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी यांच्या प्रतिकृती चित्रे ओळखतो. त्यांचे बारीकसारीक तपशिलासह वर्णन करतो. उदा. (एका छोट्या पिवळ्या घराचे लाल मोठे दार | (१) परिसरातील कोणत्याही वस्तू, प्राणी, पक्षी, व्यक्ती यांचे प्रतीक किंवा प्रतिकात्मक चित्र किंवा प्रतिकृती दाखवावी व त्याची वर्णनात्मक माहिती विचारावी.<br>(२) घडलेल्या घटनेबाबत सविस्तर तपशीलवार वर्णन करण्यास सांगणे. | चित्र व चित्रफिती | चित्र/घटना देऊन चर्चा, प्रत्यक्ष निरीक्षण नोंदी कराव्या. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | | | दिलेल्या वस्तू/ चित्रांमध्ये तुलना करतो आणि त्यातील साम्य, भेद ओळखतो. | (१) परिचित वस्तूंच्या एकाच प्रकारातील दोन चित्रांमधील फरक ओळखण्यास सांगणे. उदा. दोन झाडांतील फरक, दोन दगडांमधील फरक | चित्र व चित्रफिती | कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | परिसर ओळख | गटातील श्रेणीबद्ध संबंध, तुलना (प्राणी, पक्षी) | एकाच प्रवर्गातील श्रेणीबद्ध नातेसंबंध ओळखतो. उदा. प्राणी व त्यांची पिल्ले. | (१) प्राणी व त्यांची पिल्ले यांच्या चित्रांच्या जोड्या लावण्याचा अनुभव देणे.<br>(२)परिसरातील प्राणी व त्यांची पिल्ले यांचे निरीक्षण करून व्यक्त होण्यास संधी देणे. | चित्रे, प्रत्यक्ष निरीक्षण, चित्रफीत | तोंडीकाम, कृतीद्वारे |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | | | | (२) प्राणी व पिल्ले यांच्याविषयी चर्चा. | | तोंडीकाम, कृतीद्वारे |
| | | | | (३) परिचयाच्या प्राण्यांच्या पिल्लांची नावे सांगण्यास सांगणे. | | तोंडीकाम, कृतीद्वारे |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | | | एकाच प्रवर्गामध्ये आणि भिन्न प्रवर्गां-मध्ये तुलना करतो. | (१) पक्षी व प्राणी यांची चित्रे वेगळी करणे.<br>(२) प्राण्यातील समान प्रकारचे प्राणी वेगळे करणे.<br>(३) प्राण्यांच्या अवयवांवरून तुलना करणे. | विविध व एकाच प्रकारचे प्राणी, पक्षी | कृती, तोंडीकाम प्राणी व पक्षी यांची तुलना करताना योग्य निकष वापरतो ला पहावे. |
| | | | वस्तूंसाठी पर्यायी वस्तू वापरून खेळतो. उदा. (फोनसाठी– कंपासपेटी) | (१) खेळांमध्ये पर्यायी वस्तू वापरून खेळ घेणे. चहाऐवजी पाणी, खुर्चीऐवजी डबा, कपाऐवजी झाकण/टोपण.<br>(२) भाज्यांऐवजी पाने, गवत यांचा उपयोग करून खेळ घेणे. | खेळास आवश्यक साहित्य | कृतींचे निरीक्षण |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | | वस्तू व उपयोग परस्परसंबंध. | वस्तू आणि त्यांचे उपयोग, व्यक्ती व त्यांचे काम यांचा संबंध जोडणे.<br>उदा. चमचा – खाणे<br>बादली – अंघोळ<br>डॉक्टर – रुग्णालय | (१) वस्तू व त्यांचे उपयोग यांचा अनुभव देणे व तो सांगता येणे.<br>(२) व्यक्ती, व्यवसाय व कामे यांतील संबंध जोडणे व सांगणे.<br>(३) पालक परिसरातील व्यक्ती व त्यांचे व्यवसाय याविषयी अनुभव व्यक्त करण्यास सांगणे. | रोजच्या वापरातील वस्तू, व्यक्ती व व्यवसाय यांची चित्रे | चर्चा |
| **विकास क्षेत्र :** बोधात्मक<br>**अभ्यासक्रमाचे ध्येय : 7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने, सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>**अध्ययन क्षमता : 7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणाऱ्या साध्या परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरता/ पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>सदर अध्ययन क्षमता, अभ्यासक्रमातील सर्व घटकांच्या अध्ययन–अध्यापनातून एकत्रित साध्य होणे अपेक्षित आहे. याकरता स्वतंत्रपणे घटक/उपघटक न देता, पर्यावरण ओळख किंवा परिसर अभ्यास संबंधित अध्ययन अनुभव मांडणी करताना, या अध्ययन निष्पत्तींचा विचार व्हावा. | | | | | | |
| अ–१ (३ ते ४ वर्षे) | – | – | – | – | – | – |
| ब–१ (४ ते ५ वर्षे) | – | – | – | – | – | – |
| क–१ (५ ते ६ वर्षे) | परिसर विज्ञान | | • एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूवर होणारा परिणाम ओळखतो. | (१) विविध कृती प्रत्यक्ष करून, एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूवर कसा व काय परिणाम होतो हे दाखवणे व सांगणे.<br>(२) कृती पाहून काय परिणाम झाला याविषयी चर्चा करणे. | परिसरातील विविध वस्तू, बर्फ, मीठ, पाणी, साखर किंवा | तोंडीकाम, प्रात्यक्षिक कृती, उपक्रम |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | (उदा. मीठ पाण्यात घातले तर ते पाण्यात विरघळते, बर्फ उन्हात ठेवला तर तो वितळतो.) | (३) बालकांचे गट करून त्यांना विविध वस्तूंवर काय परिणाम होतो याची कृती करण्यास सांगणे व काय परिणाम झाला विचारणे. | कृतीकरता आवश्यक इतर साहित्य. | प्रत्यक्ष सोप्या कृती करून घेऊन चर्चेत सहभाग घेतात का पहावे. |
| क–१ (५ ते ६ वर्षे) | | | • वस्तूवरील साध्या क्रियांचे परिणाम स्पष्ट करतो. (उदा. चेंडूला जोरात पाय मारल्यानंतर तो पुढे जाईल.) | (१) वस्तूवर क्रिया करून, त्या क्रियेचा त्या वस्तूवर काय परिणाम झाला ते दाखवणे व चर्चा करणे.<br>उदा. बालकाने खुर्ची जोरात ओढली; तिची जागा बदलली, दरवाजा ढकलला, तो पुढे गेला.<br>(२) बालकाला कृती करण्यास सांगून, त्या क्रियेचा काय परिणाम झाला ते विचारणे. | परिसरातील व घरातील विविध वस्तू, चेंडू, दरवाजा, खुर्ची | तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक<br>प्रत्यक्ष सोप्या कृती करताना चिकित्सक प्रश्न विचारतो, का परिणामांविषयी चर्चा करतो का तपासावे. |
| | | | • कार्यकारणभाव जोडतो. (उदा. अब्दुल आजारी असल्यामुळे तो शाळेत आला नाही, पाणी न घातल्यामुळे रोप जगले नाही.) | (१) सभोवताली घडणारी एखादी घटना का घडते व त्यामुळे इतर कोणत्या गोष्टी घडतात याविषयी माहिती सांगणे, चर्चा करणे. उदा. तुम्ही आजारी असता, तेव्हा शाळेत येता का? का येत नाही याविषयी चर्चा करणे. | चित्र, तक्ता, परिसरातील प्रसंग | तोंडीकाम, उपक्रम, कृती, प्रात्यक्षिक, चर्चा. |
| | | | • कार्यकारण संबंधांवर आधारित अंदाज बांधतो. | (१) सभोवतालची परिचित घटना ऐकवणे/वर्णन करणे व पुढे काय होईल याविषयी अंदाज वर्तवणे व चर्चा करणे. | चित्र, तक्ता, परिसरातील प्रसंग | (१) तोंडीकाम, उपक्रम, कृती, प्रात्यक्षिक |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | (उदा. आकाशात पांढरे ढग असल्यास पाऊस पडणार नाही.) | (२) बालकास चित्र दाखवून/प्रसंग वर्णन करून पुढे काय होईल याविषयी अंदाज वर्तवण्यास सांगणे व चर्चा करणे.<br>(३) बालकांचे गट करून प्रसंग व त्याचा कार्यकारण संबंध यावर अंदाज वर्तवणे कृती करून घेणे. | चित्र, तक्ता, परिसरातील प्रसंग<br>चित्र, तक्ता, परिसरातील प्रसंग. | (२) तोंडीकाम, उपक्रम, कृती, प्रात्यक्षिक<br>(३) तोंडीकाम, उपक्रम, कृती, प्रात्यक्षिक |
| ड-१ (६ ते ७ वर्षे) | | | • एका वस्तूचा दुसऱ्यावर होणारा परिणाम ओळखतो. (उदा. मीठ घातले तर ते पाण्यात विरघळेल.) | (१) विविध कृती करून एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूवर कसा व काय परिणाम होतो हे दाखवणे व सांगणे.<br>(२) बालकांचे गट करून, त्यांना एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूवर काय परिणाम होतो हे ओळखण्यास सांगणे. | परिसरातील विविध वस्तू, मीठ, पाणी, साखर | तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक कृती करताना जिज्ञासा कुतूहल दर्शवितो का पहावे. |
| | | | • वस्तूंवरील साध्या क्रियांचे परिणाम स्पष्ट करतो. (उदा. चेंडू पायाने जोरात लाथ मारल्यावर तो पुढे जाईल.) | (१) वस्तूवर क्रिया करून, त्या क्रियेचा त्या वस्तूवर काय परिणाम झाला ते दाखवणे व चर्चा करणे.<br>(२) बालकाला क्रिया करून तिचा त्या वस्तूवर काय परिणाम झाला ते विचारणे.<br>(३) बालकाचे गट करून कृतींचा सराव घेणे. | चेंडू, खुर्ची, दरवाजा | तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक परिणामाविषयी चिकित्सक चर्चा करतो का? इतरांना सांगतो का पहावे. |
| | | | • कार्यकारणभाव जोडतो. (उदा. अब्दुल आजारी असल्यामुळे तो शाळेत आला | (१) सभोवताली घडणाऱ्या विविध घटना व प्रसंग ऐकवणे व त्याचा काय परिणाम होईल याचा कार्यकारणभाव सांगणे. उदा. गोपाळ तीन दिवसांपासून शाळेत आला नाही याचा कार्यकारणभाव सांगतात. | घटना/प्रसंग चित्रे | तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक उपक्रम घटना व परिणाम यांमधील परस्पर-संबंध पडताळतो का पहावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | नाही, पाणी न घातल्यामुळे रोप जगले नाही)<br>• कार्यकारण संबंधांवर आधारित अंदाज बांधतो. (उदा. आकाशात पांढरे ढग असल्यास पाऊस पडणार नाही.) | (२) निसर्गात किंवा सभोवताली घडणारी घटना सांगून चर्चा करावी. त्याचा कार्यकारण संबंध सांगण्यास प्रोत्साहन द्यावे व अंदाज वर्तवण्यास सांगावे. उदा. आकाशात काळे ढग असतील, तर पाऊस पडू शकतो. कळीचे ढग होईल. अशी उदाहरणे सांगून चर्चा घ्यावी. | चित्र, तक्ता, निसर्गातील घटना | तोंडीकाम, उपक्रम, कृती |
| इ-१ (७-८ वर्षे) | | | • एका वस्तूचा दुसऱ्यावर होणारा परिणाम ओळखतो. (उदा. मीठ घातले तर ते पाण्यात विरघळेल.) | (१) कृती करून एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूवर काय परिणाम होतो हे दाखवणे. उदा. चुंबक व टाचण्या, हळद आणि पाणी, नीळ आणि पाणी, पाणी आणि लिंबू, हळद व धुण्याचा सोडा एकत्रित करणे. दुधात दही टाकून दुसऱ्या दिवशी पाहणे.<br>(२) वरील उदाहरणांमध्ये कोणता बदल झाला हे तक्ता स्वरूपात मांडणे. | पाणी, निळ, हळद, धुण्याचा सोडा, दूध, दही, चुंबक, टाचण्या, लिंबू | तोंडीकाम, वर्गीकरण, प्रात्यक्षिक निरीक्षण व चर्चा निष्कर्ष |
| | | | • वस्तूंवरील साध्या क्रियांचे परिणाम स्पष्ट करतो. (उदा. चेंडूला जोरात लाथ मारल्यावर तो पुढे जाईल.) | (१) कृती करून वस्तूवरील साध्या क्रियांचे परिणाम सांगणे. उदा. चेंडूला बॅटने मारले, भिंतीवर लाथ मारली, पेटत्या मेणबत्तीवर जोराने फुंकर मारली, कॅरमच्या स्ट्रायकरवर जोराची टिचकी मारली, खूप सारे कागद हवेमध्ये भिरकावले, जोराचा पाऊस झाला. इत्यादी.<br>(२) बालकांचे गट करून वेगवेगळ्या कृती करून घेणे व परिणामाबाबत चर्चा करणे. | चेंडू, बॅट, मेणबत्ती, कॅरम, कागद | कृती, उपक्रम, प्रात्यक्षिक, तोंडीकाम, चर्चा, निष्कर्षापर्यंत पोहोचते का? कार्यकारण समजून घेतो का पहावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | • कार्यकारणभाव जोडतो. (उदा. अब्दुल आजारी असल्यामुळे तो शाळेत आला नाही, पाणी न घातल्यामुळे रोप जगले नाही.) | (१) परिसरामध्ये घडलेल्या विविध घटनांचे परिणाम सांगतात व कारण विचारतात. उदा. रस्त्याच्या आजूबाजूला कचऱ्याचे ढीग का जमा झाले आहेत; दात का किडले आहेत, नदीला पूर का आला आहे, नखे अस्वच्छ का आहेत, दात रोज का घासले पाहिजेत. | परिसरातील विविध अनुभवात्मक चित्रे, प्रसंग, व्हिडिओ क्लिप | कृती, उपक्रम, प्रात्यक्षिक, तोंडीकाम घटनेमागील कार्यकारण संबंध शोधून चर्चा करतो का पहावे. |
| इ–१ (७ ते ८ वर्षे) | | | • कार्यकारण संबंधांवर आधारित अंदाज बांधतो. (उदा. आकाशात पांढरे ढग असल्यास पाऊस पडणार नाही.) | (१) परिसरातील घटनांचे कार्यकारण संबंध समजून घेऊन, त्याबाबतचे अंदाज बांधतो. उदा.<br>• आकाशात काळे ढग आले तर, पाऊस पडेल.<br>• खूप पाऊस पडू लागला, तर पूर येईल.<br>• मोबाईल चार्जिंग केला नाही तर...<br>• लाईट गेले तर...<br>• दोन दिवस जेवण केले नाही तर...<br>• खूप वेगाने गाडी चालवली तर... | चित्रे, तक्ते, व्हिडिओ | तोंडीकाम उपक्रम, चित्रकाम दैनंदिन जीवनातील घटनांविषयी अंदाज मांडतो का पडताळावे. |
| अ–२ (३ ते ४ वर्षे) | – | – | • निरीक्षणावर आधारित कल्पना किंवा युक्त्यांचा वापर करतो. | (१) दैनंदिन जीवनात आपण वापरत असणाऱ्या विविध कल्पना व युक्त्या सांगणे व चर्चा करणे.<br>(२) निरीक्षण करून स्वतः कल्पना व युक्त्या यांचा वापर करतो. | चित्र, चित्रफीत, तक्ते, मोबाईल | तोंडीकाम, कृती, उपक्रम दैनंदिन जीवनात सोप्या क्लृप्त्या शोधतो का तपासावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | (उदा. गरम अन्नावर फुंकर घालण्याच्या प्रौढांच्या कृतींचे अनुकरण करतो.) | | | |
| ब–२ (४ ते ५ वर्षे) | – | – | • ज्ञात माहितीचा नवीन संदर्भात वापर करतो. (उदा. पुस्तकातील चित्राप्रमाणे ठोकळ्यांचा महाल, मनोरा बनवणे.) | (१) शाळेतील उपलब्ध वस्तूंपासून विविध मनोरे व प्रतिकृती तयार करून दाखवणे व चर्चा करणे.<br>(२) जोडो ब्लॉक देऊन विविध आकार करण्यास सांगावे. | गणित व मराठी पेटीतील साहित्य, शाळेतील उपलब्ध वस्तू | कृती, प्रात्यक्षिक, तोंडीकाम |
| क–२ (५ ते ६ वर्षे) | | | • निरीक्षण करून सामान्यीकरण करतो. (उदा. गोल फिरणाऱ्या वस्तूंचे अवलोकन/ निरीक्षण करतो. चाके, बांगड्या यांचा आकार वर्तुळाकार असतो. | (१) परिसरातील/सभोवतालच्या विविध वस्तू व घटकांचे निरीक्षण करावयास सांगणे व त्यातून काय बोध होतो, याविषयी चर्चा करणे.<br>उदा. गोलाकार व वर्तुळाकार वस्तू गोल–गोल फिरते. | परिसरातील वस्तू, चाके, वर्तुळाकृती कडे, बांगड्या | प्रात्यक्षिक कृती, उपक्रम, तोंडीकाम |
| ड–२ (६ ते ७ वर्षे) | | | • सोप्या परिकल्पना तयार करतो आणि त्याचे परीक्षण करतो. | (१) दैनंदिन जीवनातील सोप्या कल्पना दाखवणे व त्यावर चर्चा करणे. उदा. पाण्यात काय बुडते व काय बुडत नाही याविषयी चर्चा करणे, दगड, प्लॅस्टिक, पेन्सिल, पेन, | दगड, प्लॅस्टिक, पेन्सिल, चेंडू, खोडरबर, | उपक्रम, कृती, प्रात्यक्षिक तोंडीकाम |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | (उदा. कागदी थाळी तरंगते व पीन बुडते. कागदाचा तुकडा व दगड एकाच वेळी पाण्यात टाकल्यास पृष्ठभागावर कोणती वस्तू लवकर येते. | टाचणी, पट्टी, बांगडी, केस, प्लॅस्टिक चेंडू.<br>(२) वरील वस्तूंचे बुडणारी व तरंगणारी गटात वर्गीकरण करतो. | टाचणी, पट्टी, बांगडी, केस | कृतीविषयक चर्चेमध्ये सहभागी होणाऱ्या नोंदी. |
| ड–२ (६ ते ७ वर्षे) | | | • सोपे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांच्या समजेचा वापर करतो. (उदा. वाळूचे, मातीचे) घर बनवताना आधारासाठी काठी किंवा ते स्थिर राहण्यासाठी पाण्याचा उपयोग करतो.) | (१) सोपे प्रश्न सोडवण्यासाठी आपली समज कशी वापरावी याविषयी चर्चा करणे.<br>उदा. सायकल उभी करण्यासाठी काय करावे?<br>(२) पाऊस पडत असताना शाळेत जायचे आहे, काय कराल?<br>(३) परिस्थितीनुसार विद्यार्थ्यांना स्वत: प्रश्न तयार करण्यास सांगावे. | प्रसंग चित्रे | तोंडीकाम, प्रात्यक्षिक, चर्चा सोपे प्रकल्प देऊन पडताळावे. |
| इ–२ (७ ते ८ वर्षे) | – | – | • सोप्या परिकल्पना तयार करतो आणि त्यांचे परिक्षण करतो. | (१) दैनंदिन जीवनातील सोप्या परिकल्पना दाखवणे व त्यावर चर्चा करणे.<br>उदा. दैनंदिन जीवनात/परिसरात घडणाऱ्या घटना व त्यांचे परिणाम, याविषयी उदाहरणे, चित्रे, प्रत्यक्ष कृती दाखवून चर्चा करणे. | खडे, पेन्सिल, खडू, रबर, पट्टी, गणित पेटीतील साहित्य, | प्रात्यक्षिक (वर्गीकरणाचे लेखन) तोंडीकाम |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | उदा. कागदी थाळी तरंगते व पीन बुडते. कागदाचा तुकडा व दगड एकाच वेळी पाण्यात टाकल्यास पृष्ठभागावर कोणती वस्तू लवकर येते. | जसे एकाच वेळी विविध वस्तू पाण्यात टाकून त्यातील कोणत्या वस्तू वर येतील याचा अंदाज व प्रत्यक्ष निरीक्षण. | टाचणी, चुंबक, लाकडाचा भुसा | सोपे उपक्रम देऊन मार्ग शोधतो का तपासावे. |
| इ–२ (७ ते ८ वर्षे) | – | – | • सोपे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांच्या समजेचा वापर करतो. उदा. वाळूचे घर बनवताना आधारासाठी किंवा ते स्थिर राहण्यासाठी पाण्याचा उपयोग करतो. | (१) दैनंदिन जीवनातील सोपे प्रसंग/घटना/प्रश्न सांगून ते सोडवण्यासाठीचे मार्ग सुचवण्यास सांगणे. उदा.<br>• हात चिकट न करता फणस कसा कापाल? (हाताला तेल लावून)<br>• मातीची फळे बनवण्यासाठी चिखल चांगला मळतात व फळे अधिक वेळ सुकवतात.<br>• सरळ रेषेत कागद कापण्यास कात्री नाही? काय कराल? या प्रकारचे दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक उपाय याविषयी चर्चा करावी. | तेल, फणस, सुरी, माती, पाणी, दूध, गव्हाचे पीठ | कृती, प्रात्यक्षिक उपक्रम, तोंडीकाम कृती करत असताना सोप्या क्लृप्त्या वापरतो का याचे निरीक्षण करावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **विकास क्षेत्र :** बोधात्मक<br>**अध्ययन क्षमता : 7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शवणाऱ्या साध्या परिकल्पना मांडतो व त्यांच्या स्पष्टीकरणाकरता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>सदर अध्ययन क्षमता, अभ्यासक्रमातील सर्व घटकांच्या अध्ययन–अध्यापनातून एकत्रित साध्य होणे अपेक्षित आहे. याकरता स्वतंत्रपणे घटक/उपघटक न देता, पर्यावरण ओळख किंवा परिसर अभ्यास संबंधित अध्ययन अनुभवांची मांडणी करताना या अध्ययन निष्पत्तींचा विचार व्हावा. | | | | | | |
| अ–३ (३ ते ४ वर्षे) | – | – | • दिवस–रात्रीत फरक करतो. | (१) उजेड व अंधाराची स्थिती बालकांनी कधी व कोठे अनुभवली यावर चर्चा करणे. (चित्रे दाखवून)<br>(२) वर्गखोलीत अंधार करून व उजेड करून सदर प्रात्यक्षिक दिवस व रात्रीच्या संकल्पनेला जोडणे.<br>(३) दिवस व रात्र ही संकल्पना स्पष्ट करून त्याचे अनुभव विचारतात. कोणत्या कृती केव्हा करतो याची चर्चा करणे. | टॉर्च, ट्यूबलाईट अशी प्रकाशाची साधने, चित्रे | कृती, प्रात्यक्षिक |
| ब–३ (४ ते ५ वर्षे) | | | • उन्हाळा आणि हिवाळा ओळखतो. | (१) उन्हाळ्यात वापरल्या जाणाऱ्या वस्तू दाखवून त्या का वापरतो याबाबत चर्चा करावी.<br>(२) बालकाने अनुभवलेल्या उन्हाळ्याबाबत गोल गप्पा घ्याव्यात.<br>(३) ऋतूविषयक भूमिका पालन करून घ्यावे.<br>(४) चित्रे व साहित्य यावरून उन्हाळा व हिवाळा हे ऋतू ओळखण्यास सांगावे. | गरम व थंड वस्तू उन्हाळ्यात व हिवाळ्यात वापरल्या जाणाऱ्या वस्तू | कृती, प्रात्यक्षिक, तोंडीकाम<br>प्रत्यक्ष अनुभवबाबत चर्चा करून पडताळावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | • आकाशातील खगोलशास्त्रीय गोष्टी ओळखतो. (सूर्य, चंद्र, तारे, ढग) | (१) बालकांना 'निसर्ग शोध' आकाश निरीक्षण (Nature hunt) साठी नेतात व आकाशात दिसणाऱ्या गोष्टींबाबत चर्चा करून सूर्य, ढग या घटकांकडे लक्ष केंद्रित करतात.<br>(२) तसेच रात्री आकाशात दिसणाऱ्या चमकदार गोष्टी कोणत्या याविषयी चित्रांच्या माध्यमातून चर्चा करतात.<br>(३) रात्री आकाशात काय दिसते याचे गृहकार्य देतील व दुसऱ्या दिवशी सूर्य, ढग, चंद्र व तारे यांच्या चित्रातून ते निवडण्यास सांगतील.<br>(४) रात्रीचे आकाश व दिवसाचे आकाश याविषयी तुलनात्मक चर्चा करणे. | चित्रफीत<br>चित्रफीत | (१) कृती<br>(२) तोंडीकाम<br>(३) गृहकार्य, कृती |
| क–३ (५ ते ६ वर्षे) | – | – | • उन्हाळा आणि हिवाळा ऋतूनुसार कपडे आणि अन्नपदार्थ ओळखतो. | (१) या ऋतूंमध्ये घातले जाणारे कपडे दाखवून ते कधी घालतात यावर चर्चा करावी.<br>(२) पूर्वानुभवावरून ऋतूनुसार कपड्यांचे गट करावे.<br>(३) आईस्क्रिम, थंड रस यांसारखे पदार्थ केव्हा सेवन करतात याविषयी चर्चा करून ऋतूंनुसार अन्नपदार्थांत फरक पडतो ही संकल्पना स्पष्ट करावी.<br>(४) ऋतूंनुसार अन्नाचे वर्गीकरण करावे.<br>कृती : आनंद मेळावा/अन्न महोत्सव या उपक्रमांतून विविध अन्नपदार्थांची ओळख करून देणे. | कपड्यांचे नमुने/चित्रे | (१) तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक<br>(२) तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक<br>(३) तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | • दिवस–रात्रीचा संबंध सूर्योदय व सूर्यास्त यांच्याशी जोडतो. | (१) दिवस १ : बालकांना झोपून उठल्यावर, त्याला घराबाहेर, आकाशात काय बदल दिसून येतो याचे निरीक्षण करण्यास सांगतात तसेच संध्याकाळी खेळायच्या वेळी सभोवताल व आकाशात होणाऱ्या बदलांचे निरीक्षण करण्यास सांगतात. (भूपाळी, वासुदेव, प्राणी, पक्षी यांचा संबंध जोडावा.)<br>(२) दिवस २ : बालकांशी त्यांच्या अनुभवांविषयी व बदलांविषयी, त्यामागील कारणांविषयी चर्चा करावी. (Concept)<br>(३) बालकांच्या अनुभवांना जोडून दिवस व सूर्योदय आणि रात्र व सूर्यास्त यांचा संबंध व कार्यकारणभाव या संकल्पना स्पष्ट कराव्यात. | चित्रे<br>चित्रे | (१) तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक (Art work)<br>(२) तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक (Art work)<br>(३) तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक (Art work) |
| ड–३ (६ ते ७ वर्षे) | – | – | • उन्हाळा, पावसाळा व हिवाळा ऋतू यांत फरक करतो. | (१) गीत, कथा यांच्या माध्यमातून 'पाऊस' व नंतर 'पावसाळा' या संकल्पनेचा परिचय करून देणे. (चित्रे, व्हिडिओ, ध्वनिफीत यांचाही उपयोग करता येईल.)<br>(२) पावसाळा – पाऊस, चिखल, गवत, हिरवळ, रानफुले, बेडूक, पूर, मोर, इंद्रधनुष्य, ढग, वीज, कडकडाट, रेनकोट, छत्री, गमबूट या घटकांची चित्रे, प्रत्यक्ष अनुभव यांवर चर्चा व कृतिपत्रिका (रंगवणे, जोडणे, माइंडमॅप) यांतून संकल्पना स्पष्ट करणे. | कथा, गीत, चित्रे, व्हिडिओ, ध्वनिफीत<br>कृतिपत्रिका, फळा, खडू, रंगखडू | (१) कृती<br>(२) कृती, तोंडीकाम |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| ड–३ (६ ते ७ वर्षे) | | | | (३) बालकांची ऋतूनुसार तीन गटांत विभागणी करतात व त्या ऋतूंनुसार मूकाभिनय, कविता, गायन, अनुभव कथन करावयास सांगतात. | गीत | (३) कृती, प्रात्यक्षिक |
| | | | | (४) तीन ऋतूंशी संबंधित घटकांना (अन्न, कपडे, निसर्गातील बदल) रेषेने जोडणे यांसारख्या कृती करवून घेणे. (कमी–जास्त संकल्पनेसाठी पाऊस, ऊन, थंडी यांचाही समावेश करावा.) | कृतिपत्रिका चित्रे | (४) कृती, गृहकार्य |
| | – | – | • सूर्य आणि चंद्र यांचा उदय व अस्ताची दिशा दाखवितो. | (१) कृती/गृहकार्य यांतून बालकास सूर्य/चंद्र उगवण्याच्या, मावळण्याच्या दिशेचे निरीक्षण करण्यास सांगणे, अनुभव कथन घेणे याला साहाय्य म्हणून व्हिडिओ दाखवणे. | फळा, धुळपाटी | (१) कृती |
| | | | | (२) सुलभक गावाचा/रहिवासी भागाचा सूचक नकाशा काढतात. त्यात बालकांची घरे दर्शवतात. क्षितिजाशी संबंधित मोठे नैसर्गिक घटक (धरण, डोंगर, जंगल, मोठा रस्ता) यांचा वापर दिशा ठरवण्यासाठी करतात. उदा. पूर्वेकडे डोंगर असेल/पश्चिमेकडे धरण असेल) त्यांचा संदर्भ घेऊन दिशांची नावे न घेता सूर्य व चंद्र एकाच दिशेस उगवतात व मावळतात याचे निरीक्षण करण्यास सांगावे. | | (२) कृती, प्रात्यक्षिक |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ–३ (७ ते ८ वर्षे) | | – | • दिशांची नावे सांगतो. (पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर) | (१) दिशांची संकल्पना चेहऱ्याचा रोख लक्षात घेऊन स्पष्ट करावी.<br>(२) पुढे–मागे, डावीकडे–उजवीकडे, उड्या मारणे यांवर आधारित खेळांतून बाजूंच्या संकल्पनांचे दृढीकरण.<br>(३) सूर्याकडे पाहिल्यावर ती बाजू पूर्व, मागे पश्चिम (मावळण्याची दिशा), डावीकडे उत्तर, उजवीकडे दक्षिण दिशा हे कृती, अनुभवासह स्पष्ट करतात. (खेळांच्या माध्यमातून हेतूपूर्वक दिशांच्या नावांचे दृढीकरण करणे.) | –<br>दिशा चार्ट<br>खेळ | (१) प्रात्यक्षिक, कृती<br>(२) प्रात्यक्षिक, कृती<br>(३) कृती |
| अ–४ (३ ते ४ वर्षे) | | | • आवडीनिवडीनुसार प्राधान्यक्रम ठरवतो. | (१) बालकाच्या ओळखीच्या गोष्टींचे दोन दोनचे गट समोर मांडावे. बालक त्यातील एका गोष्टीला त्याच्या आवडीनिवडीनुसार निवडतो. उदा. खेळणी, खाद्यपदार्थ, ओळखीच्या/नेहमी वापरल्या जाणाऱ्या वस्तू, खुर्ची.<br>(२) गृहकार्य : आवडीचे कपडे, खेळणी निवडीला वाव देणे. (पालकांनी) | खेळणी, खाद्यपदार्थ, इतर वस्तू, खुर्ची, बसण्याची जागा, चित्रे (प्राणी, पक्षी, फळे) | (१) कृती, तोंडीकाम<br>(२) गृहकार्य |
| ब–४ (४ ते ५ वर्षे) | – | – | • स्वत:चे प्राधान्यक्रम, आवड व्यक्त करतो आणि त्यानुसार निवड करतो. | (१) बालकाला आवडणाऱ्या वस्तूंच्या दोन गटांची यादी करण्यास सांगावी. आता त्यातील सर्वांत जास्त आवडणारी वस्तू निवडण्यास सांगावी, कारणे विचारावीत. | खेळणी, खाद्यपदार्थ, इतर वस्तू, खुर्ची बसण्याची जागा, चित्रे (प्राणी, पक्षी, फळे) | (१) कृती, तोंडीकाम स्वत:ची आवड विकसित होत आहे याच्या नोंदी |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| क–४ (४ ते ५ वर्षे) | – | – | • स्वतःची आवड आणि प्राधान्यक्रम विचारात घेऊन जबाबदारीने निवड करतो. | (१) वर्गातील वस्तू, साहित्य, खेळणी पसरून ठेवतात व बालकांना त्या त्यांच्या योग्य ठिकाणी ठेवण्यास सांगतात.<br>(२) खेळणे, कृती करणे यांसाठी ते बालकांना त्यांच्या आवडीच्या वस्तू निवडण्यास सांगतात. (आवश्यकतेनुसार साहित्य ठेवावे.)<br>(३) तीच वस्तू का निवडली याबाबत सर्वांशी चर्चा करावी.<br>(४) कृती खेळ झाल्यावर वस्तू त्याच जागी ठेवण्यास सांगावे.<br>(सदर कृती, सर्वच कृती पूर्ण झाल्यानंतर करणे अपेक्षित. या प्रकारची शिस्त/सवय लावावी.) | खेळणी, कृतीशी संबंधित साहित्य | (१) कृती, तोंडीकाम निरीक्षण नोंदी |
| ड–४ (५ ते ६ वर्षे) | – | – | • कृतीमध्ये सहभागी होतो, खेळतो. स्वतःच्या आवडी–निवडी व प्राधान्यावर आधारित मित्र बनवतो. | (१) बालकांना विविध खेळ व कृतींसाठी त्यांच्या आवडी–निवडी व प्राधान्यावर आधारित निकषांनुसार गट/संघ बनवण्याचे स्वातंत्र्य द्यावे. (खेळ/कृतींचा हेतू सांगणे अपेक्षित आहे.)<br>(२) खेळ/कृतींनुसार बालक गट/संघ बनवतात व खेळतात/कृती करतात.<br>(३) गट निवडताना बालकांनी निवडीसाठी कोणते निकष लावले, याचे निरीक्षण करून नोंद करावी.<br>उदा. विशिष्ट खेळासाठी बालक पूर्वानुभवानुसार त्या खेळातील चांगला खेळाडू किंवा ज्याच्याशी विचार/भावना जुळतात असे सवंगडी निवडतात. | खेळ व संबंधित कृतीला लागणारे साहित्य | (१) कृती, तोंडीकाम<br>(२) कृती<br>(३) दैनंदिन निरीक्षण |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | • स्वतःच्या आवडी– निवडी व प्राधान्याप्रमाणे खेळ आणि खेळाशी संबंधित साहित्य निवडतो. | (१) मैदानी खेळ, तसेच प्रत्येक विषयातील खेळ (बिल्डिंग ब्लॉक्स, शब्द तयार करणे, मातीकाम, कार्यानुभवांतर्गत तयार करावयाच्या वस्तू) यांसाठी बालकांना विस्तृत प्रकारच्या साहित्यातून, त्यांना हवे ते व आवड/निवड/प्राधान्यानुसार साहित्य निवडण्याच्या संधी प्रदान करणे व त्यांचे निरीक्षण करणे. | खेळाचे साहित्य, कृती आधारित साहित्य | (१) कृती, दैनंदिन निरीक्षण नोंदी |
| अ–५ (३ ते ४ वर्षे) | – | – | | (१) निवडलेले साहित्य/कृती रुचीपूर्वक करतो का याकरिता चर्चा करावी. | | |
| ब–५ (४ ते ५ वर्षे) | | | • शिक्षक व समवयस्कांच्या मदतीने पर्यावरणातील घटना व प्रसंगांबाबतच्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देतो. | (१) यापूर्वी अनुभव दिलेल्या घटकांतील पर्यावरणातील घटना व प्रसंगाबाबत सोपे प्रश्न विचारतात.<br>(२) बालक स्वतःहून/त्यांचे समवयस्क/शिक्षक/सुलभकांच्या मदतीने चर्चा करून या प्रश्नांची उत्तरे देईल याकरिता प्रोत्साहन देतात.<br>उदा. दिवस व रात्र, सूर्य, चंद्र, ढग, मित्र, उन्हाळा, हिवाळा यांबाबतचे प्रश्न. कळीचे फूल होणे. | अ–२ ते ब–४ मधील कृतींशी संबंधित साहित्य | (१) तोंडीकाम पर्यावरणीय घटनांबाबत चिकित्सक प्रश्न विचारतो का? निरीक्षण करावे. |
| क–५ (५ ते ६ वर्षे) | – | – | • नैसर्गिक घटनांबाबत चिकित्सक प्रश्न विचारून, उत्तरे मिळवण्यासाठी समवयस्कांसोबत | (१) दिवस, रात्र, सूर्योदय, सूर्यास्त, उन्हाळा, हिवाळा या नैसर्गिक घटनांवर आधारित प्रश्न विचारावेत.<br>(२) नंतर त्यांचा संबंध विविध घटनांशी जोडून गटात करण्यासाठी कृती देतात. त्यांची | कृतीनुसार संबंधित साहित्य | (१) तोंडीकाम, प्रात्यक्षिक कृती |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | समन्वय साधतो/ शोध घेतो.<br>उदा. काय बुडते?, काय तरंगते?, लोहचुंबकाकडे कोणत्या वस्तू आकर्षित होतात? | उत्तरे बालके स्वत: कृती/प्रयोग करून मिळवतील.<br>(३) वेगळा विचार करायला लावणारे प्रश्न, जसे – 'तर काय होईल?' यांची उत्तरे स्वत: शोधण्याची कृती घेणे. | | (२) घटनेमागील कार्यकारण– भाव विचारतो का तपासावे. |
| ड–५ (६ ते ७ वर्षे) | | • नैसर्गिक घटना व पर्यावरण | • नैसर्गिक घटनेबाबतच्या मोठ्या प्रश्नाचे छोट्या प्रश्नांच्या यादीत रूपांतरण करतात.<br><br><br><br><br>• नैसर्गिक पर्यावरणातील आकृतिबंधाबाबत | (१) मार्गदर्शक कृती : प्रश्न कसे तयार करायचे?<br>मुख्य प्रश्न : पाऊस पडताना काय घडते?<br>(१) आकाशाचा रंग बदलतो का?<br>(२) वीज का कडाडते?<br>(३) वारा का सुटतो?<br>(४) पावसाच्या धारा कशा पडतात?<br>(२) मुख्य प्रश्न : 'बी'चे रोपटे होताना काय काय घडते?<br>उप प्रश्न<br>(१) 'बी' जमीन रुजायला टाकताना कोणती काळजी घ्यावी?<br>(२) रुजलेल्या बी ला पाणी दिले नाही तर काय होईल?<br>(३) रोपटे कुठे ठेवल्यास वाढ चांगली होईल?<br>या प्रकारचे नैसर्गिक घटनांवर आधारित प्रश्न विचारावेत व बालकांच्या अभिव्यक्तीला चालना द्यावी. | –<br><br><br><br><br><br>निसर्गातील आकृतिबंध असणाऱ्या वस्तू/चित्रे | (१) तोंडीकाम, कृती<br><br>(१) तोंडीकाम, कृती<br><br>(३) तोंडीकाम, कृती |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रश्न विचारतो. उदा. विविध पाने व फुलांचे आकार, सूर्योदय व सूर्यास्त | (२) बालके निसर्गातील पाने, फुले, सूर्योदय, सूर्यास्त अशा घटकांतून तयार होणाऱ्या आकृतिबंधांचे निरीक्षण करून प्रश्न विचारतात. (C 8.2 चा संदर्भ घ्यावा.) | | |
| इ–५ (७ ते ८ वर्षे) | | | • नैसर्गिक घटनांबाबत 'का' व मुक्त प्रश्न विचारून, संवाद किंवा शोधनाद्वारे उत्तरांचा शोध घेतो. (उदा. पाऊस का पडतो? सूर्यप्रकाश नसला तर काय होईल?) | (१) निसर्गातील विविध चित्रे दाखवावीत. ते दाखवून बालकांना त्यांच्या मनात तयार होणारे प्रश्न विचारण्यास सांगावे. याद्वारे प्रश्नांची मालिका सुरू होईल. तिचा रोख निसर्गातील घटनांकडे न्यावा.<br>(२) यासाठी चर्चा, संवाद, शोधन यांचा उपयोग करावा.<br>(३) बालके प्रश्न विचारण्यास प्रवृत्त होतील अशी परिस्थिती निर्माण करणे. उदा. पक्षी उंच उडतात. पक्षी म्हशीच्या पाठीवर का बसला आहे? | – | (१) तोंडीकाम घटनांबाबत स्वत: शोध घेण्यासाठी उत्सुक आहे का पहावे. |
| अ–६ (३ ते ४ वर्षे) | | | • एखाद्याच्या कृतीचा किंवा वर्तनाचा इतरांवर होणारा परिणाम स्पष्ट करतो. उदा. कुत्र्याला दगड मारल्याने मुक्या प्राण्याला त्रास होतो, नळ बंद न केल्याने पाणी वाया जाते. | (१) गोष्ट सांगून (मुक्या प्राण्यांना माणूस देत असलेल्या त्रासा संदर्भात) पारंपरिक कथा/ इसापनीतीच्या कथा, आपल्या चांगल्या किंवा वाईट वर्तनाचा इतरांवर काय परिणाम होतो हे स्पष्ट करणे व चर्चा करणे.<br>(२) बोलक्या बाहुल्यांच्या मदतीने इतरांना होणारा त्रास नाटकातून दाखवावा व प्रश्न विचारावेत. | व्हिडिओ, ऑडिओ, बोलक्या बाहुल्या | (१) रोल प्ले, नाट्यीकरण, तोंडीकाम एखाद्या कृतीचा परिणाम ओळखतो का? तपासावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| ब–६ (४ ते ५ वर्षे) | | | • झाडे, प्राणी, पक्षी यांच्या गरजांविषयी स्वत:चे मत मांडतो. | (१) पारंपरिक कथा/इसापनीती व स्वरचित कथा, कविता, गाणी, लोकगीते यांच्या माध्यमातून झाडे, प्राणी व पक्षी यांच्या गरजांविषयी जाणीव निर्माण करावी.<br>(२) गटामध्ये बसून प्राणी, पक्षी, झाडे यांच्या गरजांविषयी चर्चा करावी. | कथा, कविता संग्रह ऑडिओ, व्हिडिओ | (१) तोंडीकाम, चर्चा, नोंदी. |
| क–६ (५ ते ६ वर्षे) | | | • सामाईक नैसर्गिक संसाधनाची संकल्पना स्पष्ट करतो.<br>उदा. आपल्याला पाणी गरजेचे आहे त्याचप्रमाणे प्राणी, पक्षी व वनस्पती यांनाही गरजेचे आहे. | (१) परिसरातील पाण्याच्या स्रोताबाबत चर्चा करतो. हे पाणी कोणकोणत्या कारणासाठी वापरले जाते, याबाबत बालकांमध्ये चर्चा करणे.<br>(२) पाण्यावर एकाचाच अधिकार असणे किती धोकादायक आहे याबाबत चर्चा करावी.<br>(३) अशीच इतर संसाधने (हवा, जंगल, जमीन, समुद्रकिनारा, सूर्यप्रकाश) इत्यादींबाबत चर्चा करणे. कथा सांगावी. | – | (१) तोंडीकाम, नाट्यीकरण, रोल प्ले |
| ड–६ (६ ते ७ वर्षे) | | | • नैसर्गिक पर्यावरण व मानव यांतील परस्परावलंबनाचे वर्णन करतो.<br>उदा. पाण्याच्या विविध स्रोतांद्वारे आपल्या घरी पाणी येते. | (१) मानव निसर्गावर कशा पद्धतीने अवलंबून आहे हे खाण्यापिण्याच्या पदार्थांवरून स्पष्ट करणे.<br>(२) मानव पेहरावासाठी जी वस्त्रे वापरतो, ती निसर्गामधून कशाप्रकारे उपलब्ध होतात याबाबत विवेचन करणे.<br>(३) मानवाला निवाऱ्यासाठी जे साहित्य लागते, ते तो निसर्गामधून कशा पद्धतीने मिळवतो हे स्पष्ट करावे. | कागद, पेन्सिल, खडू, रंग, पाणी, ब्रश | (१) चित्रकाम (घर, वस्त्र, अन्न यांबाबत)<br>चित्रकामावर तोंडीकाम |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ–६ (७ ते ८ वर्षे) | | | • मानवी समाज, गरजा व नैसर्गिक वातावरण यांमध्ये समतोल कसा साधायला पाहिजे याचे वर्णन करतो. (उदा. आजारां–पासून बचाव करण्यासाठी, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली पाहिजे.) | (१) साथीचे रोग कसे पसरतात याबाबत व्हिडिओ दाखवून चर्चा करावी.<br>(२) साथीचे रोग टाळण्यासाठी काय करावे, याबाबत चर्चा करावी.<br>(३) वाढता कचरा कशाप्रकारे मानवाला अपायकारक ठरतो, याबाबत चर्चा करतात.<br>(४) पाण्याचा सुयोग्य वापर.<br>(५) प्रदूषण यासारख्या मानवी समाज गरजा व नैसर्गिक वातावरण यांविषयी चर्चा घडवून आणणे. | चित्र, तक्ता, गाणी, गोष्टी | (१) तोंडीकाम, कृती, प्रात्यक्षिक<br>(२) प्रत्यक्ष निरीक्षण |
| **क्षमता : C.7.3 : दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो.** | | | | | | |
| अ (३ ते ४ वर्षे) | कला | विविध कलाप्रकारांशी निगडित उपक्रम व कृती | • चित्रकाम व रंगकाम करताना साधी साधने वापरण्यात निपुणता दर्शवतो. | (१) विविध वस्तू वापरून रंगांची नावे स्पष्ट करावीत. रंगांचे गाणे म्हणण्याचा सराव घ्यावा.<br>(२) हाताचे, बोटांचे ठसे वापरून, मुक्त चित्र तयार करण्याची संधी द्यावी.<br>(३) विविध वस्तू वापरून आकृतिबंध तयार करण्याचा किंवा दिलेल्या चित्रात रंग भरण्याचा सराव द्यावा.<br>जसे – कापलेल्या भेंडीचा, कागदाच्या किंवा कापसाच्या बोळ्याचा वापर करून चित्र काढणे किंवा रंगवणे. | विविध रंगांच्या वस्तू, रंगीत खडू, रंग, भेंडी व इतर भाज्यांचे काप, पेपर इत्यादी. | (१) तोंडीकाम, प्रात्यक्षिक साधने वापराना निरीक्षण |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| ब (४ ते ५ वर्षे) | खेळ | सोपे, पारंपरिक खेळ व साधने. | • खेळताना बालक साधी साधने वापरण्याकडे कल दर्शवतो. | (१) विविध रंगांचे जोडोब्लॉक एकत्रित जोडून, त्यापासून एखादी आकृती बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवावे.<br>(२) विद्यार्थ्यांना स्वत: वरीलप्रमाणे आकृती/आकार बनवण्याची संधी द्यावी.<br>(३) स्थायूरूप, द्रवरूप पदार्थ कोणत्या साधनांचा वापर करून उचलता/एकत्रित करता येतील हे करून पाहण्याची संधी देणे.<br>जसे – वाळू, पाणी, गोट्या, मणी इत्यादी वस्तू गोळा करण्यासाठी वाटी, चमचा आदि पैकी काय वापरता येईल हे चर्चेद्वारे ठरवणे.<br>(४) भांडीकुंडी सारखे खेळ खेळून त्याद्वारे गप्पा मारण्याची संधी देणे. | जोडो ब्लॉक, वाळू, गोट्या, मणी, पाणी, कप, बकेट, चमचा, सुपली इत्यादी. | (१) तोंडीकाम, प्रात्यक्षिक, निरीक्षण नोंदी, चर्चा, अनुभवकथन. |
| | तंत्रज्ञान | तंत्रज्ञानविषयक सोप्या साधनांची ओळख, उपयोग व हाताळणी. | • डिजिटल व दृक्‌श्राव्य साधने वापरताना काळजीपूर्वक लक्ष देतो. | (१) वर्गात उपलब्ध डिजिटल व दृक्‌श्राव्य साधनांची ओळख करून द्यावी.<br>(२) वरीलप्रमाणे साधने/चित्रे/फोटो दाखवून, त्यांच्या उपयोगाबाबत चर्चा करण्याची संधी द्यावी.<br>(३) वरीलप्रमाणे साहित्य वापरताना घ्यावयाच्या काळजीची व्यवस्थित माहिती द्यावी. | दृक्‌श्राव्य साधने, (प्रत्यक्ष किंवा तक्ता) | (१) तंत्रज्ञान–विषयक साधने कुतूहलाने पण काळजीपूर्वक हाताळतो का तपासावे. |
| क (५ ते ६ वर्षे) | हस्तकला /हस्तकृती | हस्तकलेशी निगडित सोप्या कृती व साधने. | • मातीकाम किंवा शिल्पकला/ कलाकाम करताना | (१) मातीकाम, शिल्पकाम/कलाकाम करताना लागणाऱ्या विविध साहित्यांची प्रात्यक्षिकांद्वारे ओळख करून द्यावी. | मातकामा–साठी लागणारे साहित्य, | (१) तोंडीकाम, प्रात्यक्षिक |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | योग्य कामासाठी योग्य साधने निवडतो. | (२) सुचवलेल्या कामासाठी योग्य साहित्यांची निवड करून, प्रात्यक्षिक करण्याची संधी द्यावी. जसे – माती खोदणे, चिखल बनवणे, चित्राला रंग देण्यासाठी योग्य रंग व आकाराची निवड करणे. | वर्गात उपलब्ध डिजिटल साहित्य | (२) चर्चा व निरीक्षण नोंदी. |
| | | | • शिक्षकांच्या मदतीने डिजिटल तंत्रज्ञान, जसे की, स्मार्टफोन, टॅबलेट्सचा वापर करतो. | (१) स्मार्टफोन, टॅबलेट आणि तत्सम डिजिटल साधने वापरण्यासंबंधी प्रात्यक्षिक द्यावे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वापरण्याची संधी द्यावी. आवश्यक तेथे मदत करावी. | विविध डिजिटल साहित्यांचे चित्र/फोटो इ. | (१) डिजिटल साधने सुलभतेने वापरतो का? तपासावे. |
| ड (६ ते ७ वर्षे) | | | • कृती करताना परिणामकारकपणे साधनांचा वापर करतो. | (१) कोणतीही कृती/काम करताना साधनांचा वापर परिणामकारक करण्यासंबंधी प्रात्यक्षिक करून दाखवणे.<br>जसे – मातीपासून विविध आकार/वस्तू बनवताना, माती खोदणे, चिखल बनवणे इत्यादी पायऱ्यांमध्ये योग्य साहित्य कसे वापरावे याचे प्रात्यक्षिक देणे.<br>(२) विद्यार्थ्यांना सुचवलेले काम/कृती योग्य साहित्यांचा वापर करून, सहजतेने करण्याची संधी द्यावी. | मातकामा–साठी लागणारे साहित्य, वर्गात उपलब्ध डिजिटल साहित्य, विविध डिजिटल साहित्यांचे चित्र/फोटो इ. | (१) तोंडीकाम, प्रात्यक्षिक योग्य साधनांची निवड करतो का पडताळावे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | तंत्रज्ञान | डिजिटल साधनांची ओळख, वापर व उपयोग. | • अध्ययन करताना डिजिटल साधनांचा सहज वापर करतो. उदा. दृक्श्राव्य साधन सुरू करणे/मध्येच थांबवणे. | (१) वर्गात उपलब्ध असणारी डिजिटल साधने (स्मार्टफोन, लॅपटॉप, टि.व्ही. इ.) सुरू करणे, बंद करणे, आवश्यक तेथे थांबवणे इत्यादी बाबींचे प्रात्यक्षिक द्यावे.<br>(२) वरीलप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला साधने हाताळण्याची संधी द्यावी. | | |
| ३ (७ ते ८ वर्षे) | कार्यानुभव /शारीरिक शिक्षण विषयक कृती | शारीरिक कृती व हालचाल, साधनतंत्राचा वापर. | • सोपी साधने तयार करतो व दैनंदिन कृतींमध्ये त्यांचा वापर करतो. | (१) एखाद्या साधनाच्या ऐवजी, पर्यायी साधनांचा शोध घेण्याची संधी द्यावी. जसे – खोदकामासाठी कुदळ नसल्यास उपलब्ध गज किंवा लाकूड यांसारखी साधने वापरून खोदणे.<br>(२) कामाच्या गरजेनुसार उपलब्ध टाकाऊ साधनांपासून, कामाची साधने तयार करण्याची संधी द्यावी. जसे – लाकूड व लोखंडी तुकड्यांचा वापर करून कुदळ/फावडे तयार करणे. | मातकामा–साठी लागणारे साहित्य, वर्गात उपलब्ध डिजिटल साहित्य, विविध डिजिटल साहित्यांचे चित्र/फोटो इ. | (१) तोंडीकाम, प्रात्यक्षिक, निरीक्षण नोंदी. |
| | तंत्रज्ञान | तंत्रज्ञानविषयक साधनांची हाताळणी व निपुणता. | • अध्ययन करताना डिजिटल व दृक्श्राव्य साधने सहजपणे व निपुणपणे वापरतो. | (१) अध्ययनासंबंधी विविध ॲपचा वापर करताना आवश्यक पूर्वतयारी (इंटरनेट, साऊंड इ. जोडणी) करणे, प्रात्यक्षिक द्यावे. तत्सम ॲप उघडून त्यातून योग्य घटक/आशय शोधण्याचे प्रात्यक्षिक द्यावे.<br>(२) वरीलप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला साधने हाताळण्याची पुरेशी संधी द्यावी. | दृक्श्राव्य साधने | (१) प्रत्यक्ष हाताळणी निरीक्षण |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **विकास क्षेत्र :** बोधात्मक<br>**अभ्यासक्रमाचे ध्येय :** बालके राशी, आकार व मापन यांच्याद्वारे गणितीय आकलन (समज) आणि जगाला समजून घेण्याची क्षमता विकसित करतात.<br>**अध्ययन क्षमता : C 8.1** एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे वस्तू गटांत आणि उपगटांत वेगळ्या करतो.<br>**अध्ययन क्षेत्र/घटक :** माहितीचे व्यवस्थापन | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | **माहितीचे वर्गीकरण** | वस्तूंचे वर्गीकरण (दोन गटांत)<br>• आकार (लहान–मोठा)<br>• लांबी (लांब–आखूड)<br>• वजन (जड–हलका)<br>• उंची (उंच–ठेंगणा) | • आकार, लांबी, उंची व वजन यांवर आधारित वस्तू दोन गटात वेगवेगळ्या करतो.<br>जसे :<br>लहान–मोठा,<br>लांब–आखूड,<br>जड–हलका. | (१) विद्यार्थ्यांना त्यांच्या समोर ठेवलेल्या विविध वस्तू, चित्रे, कार्डे यांची मुक्तपणे विभागणी करू द्यावी.<br>(२) विभागलेल्या वस्तू, चित्रे, कार्डे त्यांनी अशा का विभागल्या? यांबाबत बालकांशी चर्चा करावी.<br>(३) दिलेल्या वस्तू गटात विभागण्यासाठी सूचना द्यावी. सूचना देत असताना विभागणीचा निकष सांगावा.<br>(४) वस्तू वेगळ्या करत असताना, बालके तुलनादर्शक शब्दांचा योग्य वापर करतात का हे पाहावे.<br>जसे :<br>(१) पेनपेक्षा पट्टी लांब आहे. पट्टीपेक्षा पेन आखूड आहे.<br>(२) चित्रातील लहान वस्तूवर खडा ठेव, मोठ्या वस्तूवर चिंचोका ठेव असा खेळ द्यावा. | परिसरात आढळणाऱ्या विविध वस्तू.<br>जसे :<br>निसर्गात आढळणारी पाने, खडे, फुले, बिया, भाज्या, फळे, प्राणी, घरात आढळणाऱ्या वेगवेगळ्या वस्तू, गणित पेटीतील विविध प्रकारचे साहित्य, भौमितिक आकार, रंगीत तुकडे, | (१) विद्यार्थी कृती करत असताना वर्गीकरण क्षमता, तार्किक विचार, भाषा विकास, सर्जनशीलता, गटात काम करण्याची क्षमता, प्रत्यक्ष कृती यांचे निरीक्षण |


| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (५) वेगवेगळ्या वस्तू देऊन, जड वस्तू टेबलवर ठेव, तर हलकी वस्तू पिशवीत ठेव यांसारखी प्रात्यक्षिके करून घ्यावीत.<br>(६) वेगवेगळ्या वस्तू देऊन, किती गट करता येतील हे सकारण विचारावे. | मणी, माळा यांसारख्या वस्तू विविध चित्रे | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | **माहितीचे वर्गीकरण** | वस्तूंचे वर्गीकरण<br>• आकार (लहान–मोठा, सर्वात मोठा)<br>• लांबी (लांब–आखूड, सर्वात आखूड)<br>• वजन (जड–हलका, सर्वात हलका)<br>• उंची<br>• (उंच ठेंगणा सर्वात ठेंगणा) | • आकार, लांबी, उंची व वजन यांवर आधारित वस्तू तीन गटांत वेगवेगळ्या करतो<br>• लहान आकार<br>– मोठा आकार<br>– सर्वात मोठा आकार | (१) बालकांसमोर विविध वस्तू ठेवाव्यात. त्यांची तीन गटात मुक्तपणे विभागणी करू द्यावी.<br>• विभागलेल्या वस्तू त्यांनी अशा का विभागल्या? याबाबत त्यांच्याशी चर्चा करावी.<br>(२) वेगवेगळ्या लांबीच्या तीन–तीन वस्तू घ्याव्यात. त्यांचे लांबीनुसार तीन गट तयार करण्यास सांगावे.<br>जसे : आखूड, लांब व सर्वांत लांब याप्रमाणे वजन व उंची यांसाठीची प्रात्यक्षिके करून घ्यावीत.<br>(३) दिलेल्या विविध वस्तू गटात विभागण्यासाठी सूचना द्यावी. सूचना देत असताना विभागणीचे निकष सांगावेत. उदा. लांबीनुसार, वजनानुसार वस्तूंच्या विभागणीचे प्रात्यक्षिक करून घ्यावे.<br>जसे : आकाराने लहान–मोठी, सर्वांत मोठी वस्तू, आखूड, लांब व सर्वांत लांब वस्तू, हलकी–जड, सर्वांत जड वस्तू. | परिसरात आढळणाऱ्या विविध वस्तू. जसे : निसर्गात आढळणारी फुले, पाने, खडे, भाज्या, बिया, प्राणी, वनस्पती. वेगवेगळ्या घरात आढळणाऱ्या वस्तू, गणित पेटीतील विविध प्रकारचे साहित्य, भौमितिक आकार, | (१) आकारानुसार वर्गीकरण का? कसे केले? याबाबत चर्चेद्वारे.<br>(१) प्रत्यक्ष कृती करून घेणे कृतिपत्रिकेच्या आधारे |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (४) वस्तू वेगळ्या करत असताना, मुले तुलनादर्शक शब्दांचा योग्य वापर करतात हे पाहावे. जसे :<br>(१) पेनपेक्षा पट्टी लांब आहे व सर्वांत लांब काठी आहे.<br>(२) चित्रातील सर्वांत लहान वस्तूवर खडा ठेव, मोठ्या वस्तूवर चिंचोका ठेव असा खेळ द्यावा.<br>(३) वेगवेगळ्या वस्तू देऊन सर्वांत जड वस्तू, हलकी वस्तू व सर्वांत हलकी वस्तू या क्रमाने वस्तू ठेवण्याचा खेळ घ्यावा.<br>(४) वस्तूंची विभागणी तीन गटांत करण्यासाठी तुलनात्मक शब्दांचा वापर करून, वस्तू ठेवण्याच्या कृती पूर्ण करून घ्याव्यात. | रंगीत तुकडे, मणी, माळा यांसारख्या वस्तू, कृतिपत्रिका | (१) निकषानुसार योग्य प्रकारे वर्गीकरण करतो का? तपासावे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | **माहितीचे व्यवस्थापन** | वस्तूंचे गुणधर्मांनुसार वर्गीकरण, उदा.<br>• आकार<br>• लांबी<br>• वजन<br>• उंची<br>• रंग<br>इत्यादींनुसार | • विद्यार्थी परिचित गुणधर्मांनुसार वस्तूंचे वर्गीकरण करतो. | (१) बालकांसमोर विविध वस्तू ठेवाव्यात. त्यांची विविध गटात त्यांना मुक्तपणे विभागणी करू द्यावी. विभागलेल्या वस्तू त्यांनी अशा का विभागल्या? या बाबत त्यांच्याशी चर्चा करावी.<br>(२) साधारणपणे वेगवेगळे गुणधर्म असणाऱ्या वस्तू द्याव्यात. त्यांचे गुणधर्मांनुसार गट तयार करण्यास सांगावे. किती गट होतील? असे गट करताना त्यांनी कोणता विचार केला, हे व्यक्त करण्याची संधी द्यावी. | परिसरात आढळणाऱ्या विविध वस्तू. जसे : निसर्गात आढळणारी पाने, खडे, फुले, बिया, भाज्या, प्राणी, | (१) प्रत्यक्ष क्षेत्रभेट व निरीक्षण जसे की बाग, शेती इ. |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (३) दिलेल्या वस्तू गटात विभागण्यासाठी सूचना द्यावी. सूचना देत असताना विभागणीचे निकष सांगावेत. जसे : आकारानुसार, लांबीनुसार, उंची-नुसार, वजनानुसार, रंगानुसार<br>(४) वस्तूंची विभागणी करत असताना, बालके तुलनादर्शक व संख्यादर्शक शब्दांचा वापर करतात का हे पाहावे. जसे : चार पिवळ्या रंगाचे त्रिकोण, सात निळ्या रंगाचे चौकोन<br>(५) वेगवेगळ्या प्रकारे गुणधर्म लक्षात घेत, तुलनात्मक शब्दांचा वापर करत, वस्तू क्रमवार ठेवण्याच्या कृती पूर्ण करून घ्याव्यात.<br>(६) दिलेल्या गुणधर्माशी सुसंगत वस्तूंची निवड करून, गटात ठेवण्याचा खेळ घेणे.<br>(७) गुणधर्मांवर आधारित गणितीय कोड्याद्वारे वस्तू/प्राणी/पक्षी ओळखण्याचा खेळ घ्यावा. | वनस्पती, वेगवेगळ्या घरात आढळणाऱ्या वस्तू, गणित पेटीतील विविध प्रकारचे साहित्य, भौमितिक आकार, रंगीत तुकडे, मणी, माळा यांसारख्या वस्तू, चित्रकार्डे. | (१) निकषानुसार व ठरावीक गुणधर्मानुसार वर्गीकरण करतो का याची खात्री करावी. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | **माहितीचे व्यवस्थापन** | गुणधर्मानुसार निकषानुसार गट व उपगटांत वर्गीकरण | • विद्यार्थी परिचित गुणधर्मानुसार, वस्तू वेगळ्या करतो आणि वेगळे करण्यामागील नियमांचे वर्णन करतो. | (१) मुक्तपणे निकष ठरवून विभागणी करता येईल अशी प्रसंगचित्रे/घटना/गोष्टी/वनस्पती या संबंधाने बालकांशी चर्चा करून, विभागणी करण्यास सांगावे. बालकांना गुणधर्मानुसार गटात मांडणी करण्याची संधी द्यावी. वस्तूंची विविध गुणधर्मांनुसार | परिसरात आढळणाऱ्या विविध वस्तू. जसे : निसर्गात आढळणारी पाने, खडे, | (१) वर्गीकरण का केले याची चर्चा व नोंदी. |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | उदा. समान वातावरणात राहणारे प्राणी वेगळे करतो. जसे – कुत्रे, मांजर, उंदीर, साप यांमध्ये शाकाहारी प्राणी (गवत खाणारे) व मांसाहारी प्राणी असे वर्गीकरण करतो. | विभागणी केल्यानंतर त्यांची संख्यात्मक मांडणी करण्यास सांगावी.<br>(२) माहीत असलेले गुणधर्म; जसे शाकाहारी, मांसाहारी, पाण्यात वाढणारे, जमिनीवर असणारे, निसर्गातून मिळणारे, घरात असणारे, शेतात असणारे अशा गटात व उपगटात वर्गीकरण करण्याची संधी द्यावी.<br>(३) बालकांसमोर वस्तूंचे लांबी/उंची/वजन यांसारखे विशिष्ट गुणधर्म वापरून तयार केलेले गट/उपगट ठेवावेत. कोणत्या गुणधर्मानुसार गट व उपगट झाले आहेत ते विचारावे.<br>(४) माहीत असलेले गुणधर्म; जसे – शाकाहारी, मांसाहारी, पाण्यात वाढणारे, जमिनीवर असणारे, निसर्गातून मिळणारे, घरात असणारे, शेतात असणारे असे गट व उपगट यांचे गुणधर्म ओळखण्याची व वर्णन करण्याची संधी द्यावी.<br>(५) एकापेक्षा जास्त गुणधर्म असणाऱ्या वस्तू ओळखण्यासाठी, विविध आकार व रंग असणाऱ्या वस्तू द्याव्यात. जसे : निळा–पिवळा, लाल, त्रिकोण, चौकोन गोलाकार देऊन, त्यातून पिवळ्या रंगाचे त्रिकोण, लाल रंगाचे गोल इ. आकार ओळखण्याची, वर्गीकरण करण्याची संधी द्यावी. | वनस्पती, प्राणी, बिया, पाने, फुले, भाज्या, वेगवेगळ्या घरात आढळणाऱ्या वस्तू, गणित पेटीतील विविध प्रकारचे साहित्य, भौमितिक आकार, रंगीत तुकडे, मणी, माळा यांसारख्या वस्तू, चित्रे, कृतिपत्रिका. | (१) विविध गुणधर्मांनुसार प्रत्यक्ष वर्गीकरण करण्यास सांगून, प्रत्यक्ष कृतीद्वारे कारणमीमांसा करण्यास सांगावे. |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ २ री (७ ते ८ वर्षे) | **माहितीचे व्यवस्थापन** | निकषांनुसार गट व उपगटांत वर्गीकरण | • गटांत व उपगटांत वस्तू वेगळ्या करतो. (उदा. ठोकळ्यांच्या गटात, प्रथम रंगांवर आधारित व नंतर त्या रंगाच्या आत आकारांवर आधारित, त्यानंतर मापावर आधारित, ठोकळे वेगळे करतो, बनवतो. झाडांचे आकार व वेली ओळखतो व यामध्ये फळ येणारी व फळ न येणारी, तसेच त्यातील खाण्यायोग्य व खाण्यास अयोग्य असे वर्गीकरण करतो. | (१) वस्तूच्या एकाच गटाचे, उपगटानुसार निकष बदलत गेले, की गट कसे वेगळे होतात, हे सांगण्यासाठी वस्तूंची गटात उपगटात विभागणी केलेले गट सादर करावेत व ते कसे तयार झाले याची चर्चा घडवून आणावी. जसे : ठोकळे; त्यातील लहान ठोकळे मोठे ठोकळे त्यापैकी लाल-निळ्या रंगाचे ठोकळे, त्यापैकी गुळगुळीत-खडबडीत ठोकळे इत्यादी.<br>(२) परिसरातील वेगवेगळ्या बाबींचे निरीक्षण करून, त्यांचे गुणधर्मानुसार गट करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. गट कसे केले, त्यामागील विचार व्यक्त होण्याची संधी द्यावी. जसे : परिसरात आढळणारी फुले, सुगंधी फुले, गंध नसलेली फुले, पांढरी फुले, लाल फुले, वेलीवरची फुले, झाडावरची फुले, प्राणी, पाळीव, जंगली, दूध देणारे, दूध न देणारे, अंडी देणारे, पिलांना जन्म देणारे.<br>(३) एकापेक्षा जास्त गुणधर्म असणाऱ्या वस्तू ओळखण्यासाठी, विविध आकार व रंग असणाऱ्या वस्तू द्याव्यात. जसे : लहान व मोठ्या आकारातील, लाल, निळ्या व पिवळ्या रंगाच्या त्रिकोणी, चौकोनी व गोलाकार वस्तू द्याव्यात व त्यातून | परिसरात आढळणाऱ्या विविध वस्तू जसे ; : निसर्गात आढळणारी पाने, खडे, फुले, भाज्या, बिया, प्राणी, वनस्पती, वेगवेगळ्या घरात आढळणाऱ्या वस्तू, गणित पेटीतील विविध प्रकारचे साहित्य, भौमितिक आकार, रंगीत तुकडे मणी, माळा यांसारख्या वस्तू, चित्रे, कृतिपत्रिका | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे पडताळणी<br>(२) निकषानुसार वर्गीकरण, कृती सराव व नियमांवर चर्चा. |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पिवळ्या रंगाच्या वस्तू, त्यातून त्रिकोणी व चौकोनी, लहान व मोठ्या आकाराच्या वस्तू ओळखण्याची व गुणधर्मांनुसार विभागणी करण्याची संधी द्यावी. जसे :  (४) वस्तूंची वरीलप्रमाणे विभागणी केल्यानंतर त्यांची वर्गीकरणानंतर संख्यात्मक मांडणी करावी. | विविध रंग व आकाराच्या वस्तू | (१) योग्य प्रकारे वर्गीकरण करतो का? पडताळावे. |



**विकास क्षेत्र :** बोधात्मक

**अभ्यासक्रमाचे ध्येय : 8** : बालके प्रमाण, आकार व मापन यांच्या मदतीने, गणितीय आकलन आणि क्षमता विकसित करतात व त्याद्वारे सभोवतालचे जग समजून घेतात.

**अध्ययन क्षमता : C 8.2** आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्यातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.

**अध्ययन क्षेत्र :** आकृतिबंध

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका (३ ते ४ वर्षे) | **आकृतिबंध** | वस्तू, चित्र, आकार यांच्यातील आकृतिबंध ओळखणे | • आकृतिबंध ओळखतो. आकार, पाने-फुले यांच्या पुनरावृत्तीनुसार | (१) विविध वस्तूंमधून दोन वस्तू पुन्हा-पुन्हा वापरून, आकृतिबंध ओळखण्याची संधी देणे व तयार करून घेणे. | उपलब्ध साहित्य, पाने, फुले, लहान दगड, | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे पडताळणी |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | आकृतिबंध तयार करतो. (पान–फूल, पान–फूल, अ–ब, अ–ब, अ–ब) | (२) आकृतिबंधाच्या दिलेल्या नमुन्यांप्रमाणे त्यांची पुढे मांडणी करण्यास बालकाला साहाय्य करणे.<br>(३) बालकाला मणी, दोरा, फुले दिलेल्या साहित्यातून आकृतिबंध तयार करण्यास सांगणे. (स्नायूंचा विकास)<br>(४) परिसरात दोन वस्तूंच्या मदतीने झालेल्या आकृतिबंधाचे निरीक्षण करण्यास सांगणे. जसे : घरातील फरशा, हार, तोरण तयार होणाऱ्या आकृतिबंधावर चर्चा घडवून आणणे.<br>(५) परिसरातील वस्तू, आकार, पाने–फुले यांसारख्या दोन वस्तू देऊन त्यांच्या मदतीने आकृतिबंध तयार करून घेणे. त्यांचे प्रदर्शन भरवणे. | छोटी फळे, बिया, पंख, कापडाचे तुकडे विविध आकारांचे तुकडे Block, Buttons | (१) परिसरातील आकृति–बंधाचे निरीक्षण, व्याख्याची संधी देऊन, तसे अन्य आकृतिबंध शोधण्यास सांगणे.<br>(२) वस्तूंच्या आधारे प्रत्यक्ष आकृतिबंध तयार करून घेणे.<br>(३) कृति–पत्रिकेतील आकृतिबंध विस्तार करणे. |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | आकृतिबंध | ध्वनींचे आकृतिबंध ओळखणे व पुनरावृत्ती करणे. | • आवाजांमधील आकृतिबंध ओळखतो व | (१) दोन ध्वनींच्या आकृतिबंधाच्या उच्चारणातील आनंद घेणे. जसे : पट–पट, टप–टप, कट–कट, टक–टक, चम–चम इ. | चमचा, वाटी, टेबल यांचे आवाज उपलब्ध वाद्ये. | (१) प्रात्यक्षिक, कृती तोंडी कार्य चर्चा |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुनरावृत्ती करतो. उदा. सारेगम – सारेगम ध–म–ग ध–म–ग | (२) दोन आवाजांचा आकृतिबंध ऐकवणे, ती कृती सोबत करून घेणे. (उदा. टाळी–चुटकी, टाळी–चुटकी...टाळी–पायांचा आवाज, टाळी पायांचा आवाज)<br>(३) आवाजांच्या आकृतिबंधांची पुनरावृत्ती करून घेणे.<br>(४) आवाजाच्या मदतीने स्वत:चे आकृतिबंध तयार करण्याची संधी देणे. | | (१) स्वत: आकृतिबंध तयार करतो का, त्याविषयी चर्चा करतो का पडताळावे. |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | | हालचाल विषयक आकृतिबंध ओळखणे आणि पुनरावृत्ती करणे. | • हालचालींचे आकृतिबंध ओळखतो आणि पुनरावृत्ती करतो. उदा. हात खाली–हात वर, हात खाली–हात वर, उडी मार, उभा राहा, उडी मार उभा राहा. | (१) दोन टप्प्यांच्या हालचालींच्या कृती करून दाखवणे. (वाकणे, सरळ उभे राहणे, वाकणे, सरळ उभे रहावे.)<br>(२) हालचालींचे निरीक्षण करून, कृती करण्यास सांगणे.<br>(३) सूचनेनुसार कृती करणे.<br>(४) शरीराच्या, पायाच्या लयबद्ध हालचालींच्या मदतीने होणाऱ्या आकृतिबंधाच्या मदतीने नृत्य करणे.<br>(५) शरीराच्या, हालचालीतून तयार होणाऱ्या आकृतिबंधाच्या मदतीने नृत्याचे प्रात्यक्षिक दर्शवणे.<br>(६) नृत्य किंवा हालचालीतील आकृतिबंध ओळखून, त्याप्रमाणे हालचाली करणे. | | (१) प्रात्यक्षिक, कृती<br>(२) निरीक्षण नोंदी<br>(३) विविध आकृतिबंध तयार करण्याचा सराव. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (७) विविध प्रकारे आकृतिबंधात्मक शारीरिक हालचाली करून, त्याची प्रात्यक्षिके दर्शवण्याची संधी देणे. | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आकृतिबंध | वस्तू, आकार, चित्रे यांतील आकृतिबंध ओळखणे, विस्तार करणे व तयार करणे. | • आकृतिबंधातील पुनरावृत्ती असणारा घटक ओळखतो.<br>३ ते ४ वस्तू, आकार, चित्रे यांना वापरून आकृतिबंध तयार करतो.<br>(पेन–पुस्तक–पेन्सिल, पेन–पुस्तक–पेन्सिल)<br>अ–ब–क,<br>अ–ब–क | (१) ३ ते ४ वस्तूंच्या मांडणीतील आकृतिबंधांचे निरीक्षण करण्यास सांगणे, घटक व त्यांचा क्रम ओळखण्यास सांगणे. (तीन–चार घटकांचा/वस्तूंचा एकत्रित वापर करून तयार आकृतिबंधाचे निरीक्षण व त्यांच्या वैशिष्ट्यांवर चर्चा घडवणे.)<br>(२) दिलेल्या आकृतिबंधातील पुनरावृत्तीचे निरीक्षण करणे व आकृतिबंध पूर्ण करणे. △□○, △□○, △□○, ...., ....<br>(३) बालकाने दिलेल्या ३ ते ४ वस्तूंपासून आकृतिबंध स्वत: कृतींच्या निरीक्षणाद्वारे तयार करणे.<br>(४) आकृतिबंधाची वैशिष्ट्ये लक्षात घेत, आकृतिबंधांचा विस्तार करणे/पूर्ण करणे.<br>जसे :  ...., ....<br>(५) ३ ते ४ घटकांचा एकत्रित वापर करत, आकृतिबंधाचे विकसन करण्याची संधी देणे. त्यांच्या वैशिष्ट्यांबद्दल चर्चा करणे. | पेन, पुस्तके, पाने, फुले, फळे, आकार, बिया | (१) प्रात्यक्षिक, कृती, तोंडी कार्यचर्चा<br>(२) कृतिपत्रिका<br>(३) प्रत्यक्ष सोपे आकृतिबंध तयार करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (६) कात्रीने पट्ट्या, आकार मुलाकडून कापून त्यातून आकृतिबंध तयार करणे. (स्नायू हालचाल, हस्त नेत्र समन्वय) | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आकृतिबंध | ध्वनीविषयक आकृतिबंध ओळखणे, विस्तार करणे व तयार करणे. | • आवाज किंवा विशिष्ट कृतीमधील आकृतिबंध ओळखतो व पुनरावृत्ती करतो आणि विस्तार करतो. | (१) तीन आवाजांचा आकृतिबंध ऐकवणे किंवा तीन कृतींचा आकृतिबंध दाखवणे.<br>(२) आकृतिबंध ऐकून, सोबत पुनरावृत्ती करायला सांगणे.<br>(३) बालकाने स्वतःहून आवाज/कृतींच्या आकृतिबंधाचा विस्तार करणे. | चमचा, वाटी, टेबल उपलब्ध वाद्ये. | (१) प्रात्यक्षिक कृती, तोंडी कार्य, चर्चा |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आकृतिबंध | हालचालविषयक आकृतिबंध ओळखणे, विस्तार करणे व तयार करणे. | • तीन विविध शारीरिक हालचालींचा आकृतिबंध स्पष्टपणे ओळखतो आणि विस्तारित करतो. | (१) विद्यार्थ्यांचा सहभाग घेत, शारीरिक हाल–चालींचे वेगवेगळे आकृतिबंध तयार करणे. त्यांच्या वैशिष्ट्यांची चर्चा घडवून आणणे.<br>(२) विद्यार्थ्यांना स्वतःचे आकृतिबंध तयार करण्याची संधी देणे. त्यांना गटात सादरीकरण करण्यास सांगणे.<br>(३) पाठ्यपुस्तक/परिसरातील गाणी अभिनया–सह सादर करण्यास, शारीरिक हालचालींतून तयार होणारे आकृतिबंध कसे उपयुक्त ठरतात हे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून किंवा परिसरातील कलाकारांच्या मदतीने सांगणे. | चित्रफीत, प्रत्यक्ष हालचाली. | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे<br>(२) आकृतिबंधाचा विस्तार करतो का? तपासावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (४) कार्यानुभवातून ठसेकाम, water colour, पेन्टिंग यांच्या मदतीने आकृतिबंध तयार करून घेणे. | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | आकृतिबंध | रंग, आकार व आकृत्या यांतील आकृतिबंध ओळखणे व तयार करणे. | • रंग, आकार, माप या विविध वैशिष्ट्यांनुसार नवीन आकृतिबंध स्वतंत्रपणे तयार करतो. | (१) बालकास रंग, आकार, मापे यांवर आधारीत आकृतिबंधाचा नमुना दाखवणे, त्यावर चर्चा करणे.<br>(२) बालकांस स्वत: पूर्वानुभवावरून रंग, आकार, मापे या वैशिष्ट्यांनुसार नवीन आकृतिबंध तयार करण्याची संधी देणे.<br>उदा. विविध रंगांच्या (३ ते ४) त्रिकोणांचा आकृतिबंध पिवळा, निळा, हिरवा-पिवळा, निळा, हिरवा...<br>△△△, △△△, ...............<br>(३) विद्यार्थ्यांना वेगवेगळे रंग, आकार, आकृत्या उपलब्ध करून द्यावेत. त्यांच्या मदतीने विविध प्रकारचे आकृतिबंध तयार करून घ्यावेत.<br>(४) तयार झालेल्या रचनेतील आकृतिबंधाची वैशिष्ट्ये, याबद्दल बोलते करावे. | रंगीत, आकार, विविध आकार, विविध मापांच्या वस्तू. (परिसरात उपलब्ध वस्तू) | (१) तोंडी काम, प्रात्यक्षिक कृती<br>(२) आकृति-बंधातील घटक निश्चित करून स्वत: विस्तार करतो का तपासावे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | आकृतिबंध | आकृतिबंधातील नियम ओळखणे. | • आकृतिबंधातील नियम सांगतो व वेगवेगळ्या वस्तूंमध्ये नवीन | (१) बालकांस दैनंदिन जीवनातील विविध आकृतिबंध निरीक्षणास देणे. जसे : दिनचर्या, त्याच्या क्रमाबद्दल/नियमांबद्दल चर्चा करणे. | रांगोळी, तोरण, चित्रे | |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | आकृतिबंध तयार करतो. उदा. पाने, फुले यांच्या साहाय्याने तोरण तयार करतो. | (२) बालकाकडून आकृतिबंधाचा नियम जाणून घेणे.<br>(३) साहित्य देऊन बालकाला नवीन आकृतिबंध तयार करण्यास संधी देणे.<br>(४) परिसरातील आकृतिबंधाची वैशिष्ट्ये सांगण्याची संधी द्यावी.<br>(५) परिसरातील अनुभवलेले आकृतिबंध मांडण्याची संधी द्यावी.<br>(६) वेगवेगळ्या आकृतिबंधातील वैशिष्ट्यांची मदत घेत, स्वतंत्रपणे आकृतिबंध तयार करण्याची संधी द्यावी. | पाने, फुले, विविध रंगांचे आकाराचे ठोकळे | (१) स्वत: आकृतिबंध तयार करतो, ओळखतो का पडताळावे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | आकृतिबंध | आकृतिबंध पूर्ण करणे.<br>विस्तार तयार करणे. | • मोठ्यांच्या मदतीने सोप्या आकृतिबंधातील हरवलेला घटक शोधतो/भरतो. (लाल–निळा, लाल–निळा, लाल–.....) | (१) दोन घटकांचा आकृतिबंध बालकासमोर मांडणे व त्याच्या क्रमाबाबत चर्चा करणे.<br>(२) त्यातील एखादा घटक काढून घेणे व काढलेला घटक कोणता हे ओळखण्यास सांगणे. अपूर्ण आकृतिबंध देत, तो कसा पूर्ण करावा, याबद्दल चर्चा घडवून आणणे. वेगवेगळे अपूर्ण आकृतिबंध पूर्ण करण्याच्या संधी देणे.<br>(३) वेगवेगळे अपूर्ण आकृतिबंध, मित्राच्या मदतीने किंवा स्वतंत्रपणे पूर्ण करण्याच्या संधी देणे. | वस्तू, चित्र, आकार | (१) तोंडी काम, प्रात्यक्षिक कृती |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (४) हरवलेले शोधा/पूर्ण करा/विस्तार करा अशा कृतींच्या माध्यमातून आकृतिबंधाचा सराव घेणे. | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | आकृतिबंध | संख्यांमधील आकृतिबंध शोधणे.<br> | • आकृतिबंधातील नियमांचे वर्णन करतो व संख्या, चिन्हे, तर्कावर आधारित अमूर्त आकृतिबंधामध्ये त्याचा वापर करतो. उदा. चित्र काढताना आणि रंगवताना रंगांचा वापर करून आकृतिबंध तयार करणे, समान ठिपक्यांचा/ चिन्हांचा विविध आकृतिबंधात वापर करणे. | (१) दिलेल्या आकृतिबंधातील नियम व तर्क ओळखतो.<br>(२) स्वतःच्या मनाने काढलेल्या चित्रात संख्या, चिन्हे, तर्क यांचा उपयोग करून आकृतिबंध तयार करणे व रंगविणे. उदा., निसर्गचित्रात फुलांच्या पाकळ्यांचा आकृतिबंध, घरांवरील कौले, खिडक्या, दारे, भिंतींच्या विटा यांतील आकृतिबंध.<br>(३) विविध प्रकारचे आकृतिबंध तयार करताना, त्यातील वैशिष्ट्ये ओळखण्याची व आकृतिबंध पूर्ण करण्याची संधी देणे.<br>जसे : सममित आकृत्या, फुलपाखरे, पक्षी, फूल, पान इत्यादी. | रांगोळी, तोरण, चित्रे | (१) कृतींच्या निरीक्षणा- द्वारे<br>(२) विविध आकृति- बंधातून तयार झालेल्या नक्षी/रचना याबाबत चर्चा करतो का?, परिसरातील आकृतिबंध शोधतो का तपासावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **विकासात्मक क्षेत्र – बोधात्मक**<br>**अभ्यासक्रमाचे ध्येय :** बालके राशी, आकार व मापन यांच्या मदतीने, गणितीय आकलन आणि क्षमता विकसित करतात. त्याद्वारे सभोवतालचे जग समजून घेतात.<br>**अध्यय‌न क्षमता : C 8.3 :** १० आणि २० च्या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या दोन्ही प्रकारे (पुढे व मागे) मोजतो.<br>**अध्ययन क्षेत्र/घटक :** संख्याज्ञान/संख्या आकलन/संख्याबोध. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | संख्याबोध, संख्यांची ओळख | संख्यानामे (१ ते ५) | • संदर्भासह क्रमाने ५ पर्यंतच्या संख्यांचे गाणे गातो. संख्या नामे सांगतो. | (१) १ ते ५ संख्या ओळखीसाठी कृतियुक्त बडबडगीते ऐकवणे, म्हणून घेणे. (सामूहिक गटात, वैयक्तिक)<br>(२) १ ते ५ संख्यानामे क्रमाने म्हणण्याचा सराव घेणे. (उलट–सुलट क्रम)<br>(३) दिलेल्या संख्यांच्या मागील व पुढील संख्यांची नामे विचारणे/सांगण्याची संधी देणे.<br>(४) गाण्यातील ऐकलेल्या संदर्भाला संख्या नामे जोडतो.<br>जसे : पाच बाई चिमण्या भारी चिव चिव | बडबड गीतांचा संग्रह | (१) तोंडी कामाद्वारे, निरीक्षणा–द्वारे |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते ५) | • ३ पर्यंतच्या संख्यांची नावे आणि वस्तूंमधील एकास एक संगती वापरून मोजणी करताना मोठ्यांचे अनुकरण करतो. | (१) ३ पर्यंतच्या वस्तूंचे/चित्रांचे गट द्यावेत व गटांची/चित्रांची एकास एक संगतीने संख्या नामे ओळखावीत.<br>(२) ३ पर्यंतची संख्या नामे ओळखण्यासाठी<br>• ३ पर्यंतच्या वस्तू ठेवून त्यांची एकेका संख्यानामाशी संबंध (एकास एक संगती)<br>• यासाठी जोड्या लावणे ही कृती करून दाखवावी व त्याचे अनुकरण करण्याची बालकांना संधी द्यावी. | वस्तू, चित्रे | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते ५) | • ३ पर्यंत वस्तूंची मोजणी करतो आणि त्याला तीन असे म्हणण्याची समज विकसित करतो. (तीन पर्यंत मोजणे आणि त्याला तीन म्हणणे.) | (१) गटात वस्तू द्याव्यात व एक संख्येसाठी एक वस्तू मोजणे. दोन संख्येसाठी एक, दोन अशा दोन वस्तू मोजणे आणि तीन संख्येसाठी एक, दोन व तीन अशी मोजणी करून तीन वस्तू दर्शवणे अशा कृती करून घ्याव्यात.<br>जसे : (•) (••) (•••)<br>१ २ ३<br>(२) एक एक ने वस्तूसमूह वाढवून/कमी करून संख्यांची ओळख करून देणे.<br>(३) सांगितलेल्या संख्या नामांसाठी वस्तूंचा गट दाखविणे.<br>(४) कृतीतून/खेळातून ३ पर्यंतचा वस्तूसमूह व संख्यानाम यांची सांगड घालून सराव घेणे. | वस्तू, चित्रे | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते ५) | • दिलेल्या वस्तूसमूहातून वस्तू किंवा खेळणी मोजतो आणि त्यातील पाच पर्यंतच्या वस्तू/ खेळणी उचलून/ काढून देतो. (उदा. ३ ठोकळे देणे) | (१) विद्यार्थ्यांना ५ वस्तूंचा समूह द्यावा. त्यांतील वस्तू मोजण्याची संधी द्यावी.<br>• दिलेल्या वस्तू समूहातील सुचवलेल्या संख्यांएवढ्या वस्तू बाजूला काढण्यास सांगावे. जसे : दोन चेंडू, तीन खडे काढून दाखवणे. | विविध वस्तू/ वस्तूसमूह | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते ५) | • तीनपर्यंतच्या वस्तूंच्या दोन गटांची तुलना करतो. कोणत्या गटात कमी, जास्त किंवा समान वस्तू आहेत हे सांगतो. (फरक करतो.) | (१) ३ पर्यंतच्या वस्तूंचे गट दाखवणे. दोन गटांतील वस्तूंच्या संख्यांची तुलना करणे. दोन गटांतील वस्तूंच्या संख्येत काय फरक आहे हे ओळखण्यास सांगणे. जसे : एका गटात दुसऱ्या गटापेक्षा वस्तू कमी आहेत/जास्त आहेत/समान आहेत.<br>(२) हा फरक ओळखण्यासाठी एकास एक संगतीने कृती करण्याची संधी द्यावी. | विविध वस्तू/ वस्तू समूह | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते ५) | • दोन किंवा तीन वस्तूंचा गट तात्काळ ओळखतो | (१) वेगवेगळे वस्तूसमूह/चित्रे दोन/तीनच्या गटांत द्यावीत. एका दृष्टिक्षेपात सांगण्याची संधी द्यावी.<br>(२) दोन/तीन याप्रमाणे वस्तू/बोटे चित्रे/खुणा दाखवून, एका दृष्टिक्षेपात सांगण्याची संधी द्यावी. | विविध वस्तू/ वस्तूसमूह | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | संख्यानामे | संख्यानामे (१ ते १०) | • १० पर्यंतची संख्यानामे योग्य क्रमाने सांगतो/गातो आणि ५ पर्यंतची संख्यानामे व वस्तू यांची एकास एक संगती लावतो. | (१) १० पर्यंतची संख्यानामे क्रमाने म्हणता यावीत, म्हणून कृतियुक्त बडबडगीते ऐकवतात. (समूहात/गटात/वैयक्तिक)<br>(२) १० पर्यंतची संख्यानामे क्रमाने म्हणण्याचा सराव घ्यावा. (उलट/सुलट)<br>(३) १० पर्यंतचा वस्तूसमूह देऊन ५ पर्यंतची संख्यानामे व वस्तूसमूह यांची एकास एक संगती लावून दाखवावी, त्याप्रमाणे एकास एक संगती लावण्याची बालकांना संधी द्यावी. | विविध वस्तू/ वस्तूसमूह | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते १०) | • संख्येचे मूल्य समजून ५ पर्यंतच्या वस्तूंची मोजणी करतो. (५ पर्यंतचा संच ओळखतो.) | (१) परिसरातील सुचवलेल्या ५ पर्यंतच्या वस्तू मोजण्यास सांगणे.<br>(२) बालकांना दिलेल्या वस्तूसमूहातून ५ पर्यंतच्या वस्तूंचा गट बाजूला काढून दाखवण्याची संधी देणे.<br>(३) ५ पर्यंतच्या वस्तूंचे/चित्रांचे विविध गट बालकांसमोर ठेवावेत त्यात किती वस्तू आहेत? ते ओळखण्याचा खेळ घेणे. | परिसरात उपलब्ध विविध वस्तू | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते १०) | • संख्येची समज व्यक्त करतो. (उदा. ५ म्हणजे ५ विविध वस्तू – ५ व्यक्ती, ५ पुस्तके, ५ पेन्सिली इत्यादी.) | (१) ५ पर्यंतची समज योग्य प्रकारे झाली आहे की नाही, हे पडताळण्यासाठी संख्यानाम उच्चारावे. त्यासाठी त्याच्या परिसरातील तेवढ्याच कोणत्याही वस्तू/चित्रे दाखवण्यास सांगणे. जसे : ३ या संख्यानामासाठी बालक ३ फुले, ३ फळे, ३ चित्रे इ. दाखवेल. | परिसरातील ५ वस्तू/चित्रे | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते १०) | • ५ पर्यंत मूर्त बाबी, सुट्या वस्तू व अमूर्त गोष्टी सहजतेने मोजतो. ५ पावले, ५ टाळ्या) | (१) ५ पर्यंतच्या वस्तू/प्रतीके/चित्रे यांच्या मदतीने ५ गोष्टी मोजण्याची संधी द्यावी.<br>(२) एखादी कृती किती वेळा केली आहे हे मोजण्यास सांगावे.<br>जसे : ५ उड्या मारणे.<br>२ गिरक्या घेणे. इत्यादी.<br>बालकांचे दोन गट करून, एका गटातील बालकांनी उड्या मारून दुसऱ्या गटाला मोजण्यास सांगावे. | विविध वस्तू, प्रतीके, चित्रे. | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते १०) | • स्मृतीच्या आधारे १० पर्यंतच्या संख्या योग्य क्रमाने पुढे मोजतो.) | (१) कृतियुक्त व बडबडगीतांतून १० पर्यंतच्या संख्या आठवून क्रमाने मोजण्याचा सराव देणे/कृती करून दाखवणे. | बडबडगीतांचा संग्रह | (१) कृतींच्या निरीक्षणा-द्वारे |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते २०) | • २० पर्यंतच्या संख्या मोजण्यास सुरुवात करतो. | (१) १० पर्यंतच्या संख्या मोजण्याच्या अनुभवाचा आधार घेत एक एक ने संख्या वाढवीत २० पर्यंतच्या संख्या, वस्तू प्रतीके यांच्या साहाय्याने मोजण्याची संधी देणे.<br>जसे : १० आणि १ = ११<br>१० आणि २ = १२ याप्रमाणे.<br>१० आणि १० = २०.<br>(२) १ ते २० संख्या सलगपणे मोजण्याचा सराव घेणे. | वस्तू, प्रतीके | (१) कृतींच्या निरीक्षणा-द्वारे |
| बालवाटिका ४ ते ५ वर्षे | संख्याबोध | संख्यानामे (१ ते १०) | • चार वस्तूंचे गट तात्काळ ओळखतो. | (१) वेगवेगळे वस्तूसमूह/चित्रे चार-चार च्या गटात द्यावीत व एका दृष्टिक्षेपात सांगण्याची संधी द्यावी.<br>(२) चार चार याप्रमाणे वस्तू/चित्रे/प्रतिके/बोटे दाखवून एका दृष्टिक्षेपात मोजण्याची संधी देणे. | चित्रे, वस्तू, प्रतीके | (१) कृतींच्या निरीक्षणा-द्वारे |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते २०) | • २० पर्यंतची संख्यानामे म्हणतो आणि मोजतो. | (१) १० पर्यंतच्या संख्यांची नामे ओळखण्यासाठी २० पर्यंतच्या वस्तू ठेवून, त्यांची एका एका गटाच्या संख्या नामाशी एकास एक संगतीने संबंध जोडण्याची कृती करून, दाखवावी. (१० पर्यंत) या कृतीचे अनुकरण करण्याची संधी बालकांना द्यावी. | वस्तू, संख्यानामे चित्रे, प्रतीके, कृतिपत्रिका | (१) कृतींच्या निरीक्षणा-द्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १० पर्यंतची संख्यानामे व वस्तू यांची एकास एक संगती लावतो. | (२) संख्यानामे व वस्तू यांचा तक्ता दाखवून एकास एक संगती लावण्यास सांगणे. (१ ते १०)<br>(३) संख्या नामांपुढे तेवढ्या वस्तू ठेवण्यास सांगण्याची कृती करून घेणे. (१ ते १०) | वस्तू, चित्रे, संख्यानामे, कृतिपत्रिका | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते २०) | • १० पर्यंतच्या संख्यांचे मूल्य समजून, १० पर्यंतच्या वस्तूंची अचूक मोजणी करतो. | (१) सुचवलेल्या संख्येइतक्या वस्तू दर्शवण्याचा खेळ घेणे.<br>(२) दिलेल्या वस्तूसाठी संख्यानामे सांगण्याची संधी देणे.<br>(३) एक गट १० पर्यंतच्या वस्तू दाखवेल व दुसरा गट त्यासंबंधित संख्या सांगेल. याप्रकारे गटात प्रात्यक्षिक घ्यावे. | वस्तू, प्रतीके | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे, रुब्रिकद्वारे |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (१ ते २०) | • दिलेल्या वस्तूसमूहातील वस्तू कोणत्याही क्रमाने अचूक मोजतो आणि कोणत्याही क्रमाने मोजल्यास वस्तूच्या समूहातील वस्तूंची संख्या सारखीच राहते हे समजून घेतो. | (१) बालकासमोर गटांत विविध वस्तूंचे गट द्यावेत. प्रत्येकाला वेगवेगळ्या/पद्धतीने (स्वत:च्या) क्रमाने मोजण्याची संधी द्यावी. प्रत्येकाने मोजलेली संख्या वेगवेगळ्या पद्धतीने मोजली, तरी बदलत नाही याचा पडताळा घेण्याची संधी द्यावी. (१ ते १०)<br>(२) बालकांना गोलाकार उभे करावे. प्रत्येकास स्वत:पासून गोलावरील बालकांची संख्या मोजण्याची संधी द्यावी. सर्वांची मोजण्याची कृती झाल्यावर, संख्या व मोजण्याचा क्रम याबाबत निष्कर्ष काढून चर्चा करावी. | वस्तू, प्रतीके, मणी, गोट्या इ. | (१) कृतींच्या निरीक्षणांच्या द्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | (उदा. ओंजळभर मणी दिले असता कोणत्याही क्रमाने मोजणी करतो व वस्तूसंख्या अचूकपणे सांगतो.) | (३) वस्तूसमूहातील वस्तू डावीकडून–उजवीकडे, उजवीकडून–डावीकडे, खालून वर–वरून खाली, अशा विविध प्रकारे मोजल्या, तरीही त्यांची संख्या बदलत नाही यासाठी वर्गातील मुले, बिस्किट पुड्यातील बिस्किटे, ट्रेमधील अंडी, केळी, बरणीतील लाडू यांसारख्या वस्तू मोजण्याची संधी द्यावी. | वस्तू, चित्रे | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | संख्याबोध | शून्याची ओळख | • दिलेल्या संचातील वस्तू कमी करून, (उलट मोजून) शून्य '०' ही संकल्पना समजून घेतो. (उदा. ३ मण्यांची उलट क्रमाने मोजणी करत, एक नंतर किती राहील?) हे सांगतो. | (१) प्रसंग, घटना, बडबडगीते यांद्वारे शून्य ही संकल्पना समजून देणे. जसे : डब्यात तीन लाडू होते. मीनाने तीन लाडू खाल्ले शिल्लक राहिले शून्य.<br>(२) तीन वस्तूंच्या गटातून एक–एक वस्तू कमी करून वस्तू किती शिल्लक राहिल्या हे प्रत्येक वेळी विचारावे. शेवटी एक नंतर वस्तू काढून घेतल्यावर किती शिल्लक राहतात याचे उत्तर 'काही नाही' म्हणजेच शून्य '०' हे लक्षात आणून देणे. | विविध वस्तू, चित्रे | (१) कृतिपत्रिका, प्रत्यक्ष प्रात्यक्षिक |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | संख्याबोध | संख्येची दर्शनी किंमत आणि स्थानदर्शक किंमत | • संख्येची दर्शनी किंमत (Face Value) व स्थानिक किंमत | (१) विविध चित्रे, फळे, खेळणी एका रांगेत मांडून कृतीतून, गीतातून पहिला, दुसरा, तिसरा या क्रमवाचक नामांची ओळख करून देणे. | विविध वस्तू | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | उजवीकडून डावीकडे | (क्रमागतता) (Co-ordinality) तसेच वस्तूचे डावीकडून उजवीकडे आणि क्रमागत स्थान यांची समज दर्शवतो. उदा. खालील क्रमानुसार उजवीकडून तिसरे स्थान<br>→<br>१ २ [३] ४ ५ ६ ७<br>• • [•] • • • •<br>७ ६ [५] ४ ३ २ १<br>←<br>डावीकडून पाचवे स्थान | (२) क्रमाने ठेवलेल्या वस्तूं डावीकडून उजवीकडे व उजवीकडून डावीकडे मोजताना, पहिला, दुसरा, तिसरा अशी मोजण्याची कृती करून घेणे.<br>(३) रांगेतील एखाद्या वस्तूचे डावीकडून, उजवीकडून स्थान कितवे याचा सराव घेणे.<br>(४) गणित गप्पांच्या माध्यमातून दैनंदिन व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या संख्या याविषयी चर्चा करावी. | – | (१) स्थानिक किंमत व दर्शनी किंमत याबाबत योग्य समज विकसित झाली का पडताळावे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे १ ते २० | • ६ वस्तूंचा गट एका दृष्टिक्षेपात तात्काळ ओळखतो. उदा. ६ गोळ्या, बिस्किटे, ठोकळे न मोजता ओळखतो. | (१) वेगवेगळे वस्तूसमूह/चित्रे सहा–सहा च्या गटात द्यावेत व एका दृष्टिक्षेपात सांगण्याची संधी द्यावी.<br>(२) सहा–सहा याप्रमाणे वस्तू/चित्रे/प्रतीके/बोटे दाखवून एका दृष्टिक्षेपात मोजण्याची संधी देणे. | चित्रे, वस्तू, प्रतीके | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (२० ते ९९) | • २० पेक्षा जास्त वस्तूंना ९९ पर्यंतच्या संख्यानामांनी मोजतो आणि १०–१० च्या गटाने ९९ पर्यंतच्या संख्या मोजतो. | (१) दोन दशक गठ्ठे यामध्ये एक–एक वस्तू वाढवत न्यावी. एकवीस ते एकोणतीस ही संख्यानामे जोडून दाखवावीत. याप्रमाणे संख्यानामांची पुनरावृत्ती करण्याची संधी देणे.<br>(२) दशक गठ्ठे वाढवत न्यावेत. त्यामध्ये एक एक वस्तू वाढवत न्यावी.<br>२१ ते २९ प्रमाणे संख्यानामे व वस्तू यांचा सहसंबंध जोडत २१ ते ९९ संख्यानामांची ओळख देणे. | दशक गठ्ठे, प्रतीके, दशक माळा, दशक कांड्या, वस्तू इ. | (१) योग्य समूह व संख्यानाम यांच्या जोड्या लावतो का यांचे निरीक्षण |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (० ते ९९) | • विशिष्ट संख्येपासून क्रमाने पुढे व मागे मोजतो. (० ते ९९) | (१) सुचवलेल्या विशिष्ट संख्येपासून, पुढे क्रमाने ९९ पर्यंत संख्या/वस्तू मोजण्यास सांगावे.<br>(२) सुचवलेल्या विशिष्ट संख्येपासून मागे क्रमाने '०' पर्यंत संख्या/वस्तू मोजण्यास सांगावे.<br>(३) मणीमाळ, छोटे ठोकळे, जोडो ब्लॉक्स, दशक पाट्या वापराव्यात. | वस्तू, चित्रे<br>मणी माळ<br>जोडो ब्लॉक | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (० ते ९९) | • दोन गटांमधील राशी ओळखतो. उदा. १० चे दोन गट मिळून २० बनतात. | (१) वेगवेगळे वस्तूसमूह/चित्रे दहा–दहा च्या गटांत द्यावीत व एका दृष्टिक्षेपात सांगण्याची संधी द्यावी. (९० पर्यंत)<br>(२) दहा–दहा याप्रमाणे वस्तू/चित्रे/प्रतीके/बोटे दाखवून एका दृष्टिक्षेपात मोजण्याची संधी द्यावी. (९० पर्यंत) | वस्तू, चित्रे | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | संख्याबोध | संख्यानामे (२० ते ९९) | • संख्यारेषेवर/ चौकटीच्या कागदावर, ठोकळ्यांवरून/ चित्रांवरून २ किंवा ३ च्या टप्प्याने अंक वगळून मोजणी करतो. | (१) क्रमाने संख्या असलेली संख्यारेषा/ ठोकळे/चित्रे इत्यादींच्या मदतीने, २-३ च्या टप्प्याने संख्या गाळून येणाऱ्या संख्या दर्शवण्यास सांगणे.<br>(२) सुचवलेल्या टप्प्याने संख्या रेषेवर वस्तू/ कार्डे ठेवण्यास सांगणे. | चौकटीचा कागद, चित्रे, संख्यारेषा<br>वस्तू, संख्यारेषा, संख्याकार्डे | (१) कृतींच्या निरीक्षणा-द्वारे |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | संख्याबोध | | • संख्यानामे ० ते ९९ दशक संकल्पना ९९ पर्यंतच्या भारतीय संख्यांचे वाचन व लेखन करतो. | (१) दशक माळा, दशक दांडे, दशक गठ्ठे बांधण्यास, सुटे (एकक) करण्यास लावणे व दहा सुट्यांचा, एककांचा एक दशक तयार होतो आणि एका दशकात दहा सुटे असतात, याच्या दृढीकरणासाठी कृती घेणे.<br>(२) दशक व सुट्यांची मदत घेत, संख्याचिन्हांची ओळख करून द्यावी. (भारतीय संख्याचिन्ह लिपीमध्ये) वाचन घ्यावे.<br>(३) गठ्ठे (दशक) व सुटे (एकक) स्वरूपात वस्तूंच्या मदतीने, स्थानिक किंमत दशक व एकक स्वरूपांत संख्या ओळखणे, वाचणे व लिहिणे, यांसाठी कृती व सराव घेणे.<br>(४) संख्येतील दशक व एकक स्वतंत्रपणे ओळखण्याची संधी द्यावी.<br>(५) दशक व एकक संख्याकार्डे दाखवून, त्यासाठी दशक एकक गठ्ठे बांधण्याची प्रात्यक्षिके घ्यावीत. | दशक दांडे, सुटे मणी, दशकमान | (१) कृतींच्या निरीक्षणा-द्वारे |



| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | संख्याबोध | पूर्ण दशक संख्यांची ओळख | • १०, २०, ३० च्या गटाने ९९ पर्यंत संख्या मोजतो. | (१) वेगवेगळे वस्तूसमूह, चित्रे १०–१० च्या गटात द्यावीत. एका दृष्टिक्षेपात १०, २० व ३० च्या गटात संख्या ओळखण्याची संधी द्यावी.<br>जसे : ४५ ही संख्या<br>१० चे ४ गट आणि ५<br>२० चे २ गट आणि ५<br>३० चे १ गट आणि १५<br>अशाप्रकारे ओळखता येणे. | वस्तू, प्रतीके, चित्रे | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | संख्याबोध | पूर्ण दशक संख्यांची ओळख | • दोन गटातील संख्या/राशी ओळखतो. (उदा. १० चे २ गट म्हणजे २०) | (१) वेगवेगळे वस्तूसमूह, चित्रे १०–१० च्या गटात द्यावीत व एका दृष्टिक्षेपात सांगण्याची संधी द्यावी. (९० पर्यंत)<br>(२) दहा–दहा याप्रमाणे वस्तू, चित्रे, प्रतीके दाखवून, एका दृष्टिक्षेपात वाचण्याची व लिहिण्याची संधी देणे. | वस्तू, प्रतीके, चित्रे | (१) कृतींच्या निरीक्षणा–द्वारे |
| **विकासात्मक क्षेत्र :** बोधात्मक<br>**ध्येय :** बालके राशी, आकार व मापन यांच्या मदतीने गणितीय आकलन विकसित करतात व त्याद्वारे सभोवतालचे जग समजून घेतात.<br>**क्षमता :** C 8.4 चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करतो.<br>**अध्ययन क्षेत्र :** संख्याज्ञान/संख्या आकलन | | | | | | |
| बालवाटीका १ (३ ते ४ वर्षे) | क्रमसंबंध | घटनांचा क्रमसंबंध | • परिचित घटना/प्रसंग वस्तू क्रमाने मांडतो. (उदा. दैनंदिन दिनचर्या, गोष्टी, आकार, मापे) | (१) दोन घटना/प्रसंग सांगून आधीची घटना/प्रसंग व नंतरची घटना/प्रसंग या संबंधाने चर्चा घडवून आणणे.<br>(जसे – कळी, फूल, धागा, कपडे, फुले, हार) | चित्रे, वस्तू, गोष्टींची कार्डे प्रसंग/कथा चित्रे | कृतींच्या निरीक्षणाद्वारे |



| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (२) दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांचा क्रम लावणे (४-५ घटना) याबाबत कृती घेणे. (जसे पाककृतींचा क्रम).<br>(३) वेगवेगळे आकार देऊन, त्यांची उंची, वजन, जाडी या एकेका निकषानुसार तुलना करण्यास सांगणे. (चढता-उतरता क्रम) | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | क्रमसंबंध | वस्तूंचा आकारानुसार क्रमसंबंध (३ वस्तू पर्यंत) | • ३ स्तरापर्यंत आकाराच्या आधारावर वस्तूंची क्रमवारी लावतो आणि त्यांचे स्तर तोंडी सांगतो. मोठे-लहान-जास्त लहान, लांब-आखूड, जास्त आखूड | (१) तीन वस्तूंची उंचीनुसार तीन स्तरांत तुलना करणे. (जसे - ठेंगणा, उंच, सर्वात उंच) याबाबत कृती करण्याची संधी देणे.<br>(२) लांबीनुसार, आकारानुसार, जाडीनुसार तीन स्तरांत (जसे - लांब आखूड, जास्त आखूड व मोठे-लहान, सर्वांत लहान) मांडणी करण्याची संधी देणे, तसेच त्याचे स्तर शब्दबद्ध करण्यास सांगणे.<br>(३) वस्तूंची क्रमवार मांडणी करताना सर्वात उंच, सर्वात ठेंगणा, सर्वात लांब, सर्वात आखूड यांसारख्या तुलनात्मक व संदर्भ दर्शक शब्दांचा वापर करण्याची संधी देणे.<br>(४) विविध आकारांच्या तीन राशी देऊन त्यातील लहान, मोठी, सर्वांत मोठी राशी ओळखण्याची संधी द्यावी. | विविध वस्तू जसे फोमचे विविध आकार, काड्या, गणित पेटीतील वस्तू, परीसरातील विविध वस्तू | (१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | क्रमसंबंध | वस्तूंचा आकारानुसार क्रमसंबंध (५ वस्तूं पर्यंत) | • आकार, लांबी / वजनावर आधारित ५ वस्तू चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडतो. | (१) एकाच प्रकारच्या विविध आकाराच्या ५ वस्तू द्याव्यात. आकारानुसार चढत्या व उतरत्या क्रमाने मांडणी करून घ्यावी.<br>(२) विविध वस्तू ५-५ च्या गटात द्याव्यात त्यांची आकार, लांबी, वजन यांनुसार | विविध वस्तू, चित्रे | (१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | चढत्या व उतरत्या क्रमाने मांडणी करण्याची संधी द्यावी.<br>(३) मांडलेल्या वस्तू योग्य प्रकारे चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडल्या आहेत का? याचा पडताळा घेण्याची संधी देणे.<br>(४) दिलेल्या वस्तू चढत्या–उतरत्या क्रमाने मांडताना कोणता विचार केला, हे गणिती शब्दांत व्यक्त करण्याची संधी देणे. | | |
| इयत्ता १ ली (६ ते ७ वर्षे) | क्रमसंबंध | क्रमसंबंध – चढता–उतरता क्रम | • एकाच गटातील वस्तूंची त्यांच्या विविध गुणधर्मांनुसार मांडणी करतो. (उदा. आकार, माप, लांबी, वजन)<br>• दिलेल्या संख्यांची चढत्या व उतऱ्या क्रमाने मांडणी करतो. (१ ते ९) | (१) विद्यार्थ्यांना वस्तू द्याव्यात व त्यांच्या गुणधर्मांची तुलनात्मक चर्चा घडवून आणावी. जसे – आकार, लांबी, माप, वजन इ.<br>(२) दिलेल्या वस्तूंची मांडणी, त्यांच्या गुणधर्मानुसार चढत्या उतरत्या क्रमाने करण्याची संधी द्यावी. जसे – पोकळ नळी, भरीव लोखंडी सळई, काडी यांसारख्या वस्तू दिल्यानंतर त्यांचे आकार, माप, लांबी वजन या गुणधर्मांनुसार मांडणी करताना, कोणत्या प्रकारे विचार करावा लागतो, यासाठी कृतियुक्त संधी देणे. यांबाबत कृती करण्याची संधी देणे.<br>(३) दिलेल्या वस्तू आणि वस्तू दर्शक संख्या यांच्या मदतीने, चढत्या व उतरत्या क्रमाने मांडणी करण्याची संधी देणे (१ ते ९).<br>(४) जोडोब्लॉक/आलेख कागद, वस्तू व वस्तूदर्शक संख्या यांच्या मदतीने १ ते ९ | विविध वस्तू चित्रे, तक्ते, संख्याकार्ड | (१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकांचा लहानपणा, मोठेपणा स्पष्ट करून चढता व उतरता क्रम सांगणे. | | |
| इयत्ता २ री | क्रमसंबंध | संख्यांचा क्रमसंबंध | • दिलेल्या संख्यांची चढत्या आणि उतरत्या क्रमाने मांडणी करतो. (९९ पर्यंतच्या) | (१) दोन–तीन वस्तू समूह देऊन, सर्वांत मोठा, सर्वात लहान वस्तू समूह याचा अंदाज करावयास सांगणे, केलेला अंदाज किती अचूक ते पडताळण्याची संधी देणे. (हळू–हळू गट मोठे करावे. ९९ पर्यंतच्या मर्यादेत)<br>(२) वस्तूसमूह व वस्तूसमूह दर्शक संख्या यांच्या साहचर्याने, संख्यांची तुलना करण्याची संधी देणे.<br>(३) दिलेली संख्या कार्डे क्रमवार मांडण्याची संधी देणे. (चढता–उतरता क्रम)<br>(४) सुचवलेल्या संख्येच्या मागे, पुढे क्रमाने येणाऱ्या संख्या लिहिण्याची संधी देणे. | विविध वस्तू चित्रे, प्रतीके, संख्याकार्ड | (१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे कृतिपत्रिका |
| **विकासात्मक क्षेत्र :** बोधात्मक<br>**ध्येय :** बालके राशी, आकार व मापन यांच्या मदतीने, गणितीय आकलन विकसित करतात व त्याद्वारे सभोवतालचे जग समजून घेतात.<br>**क्षमता : C 8.5** स्थानिक किमतीचा वापर करून, ९९ पर्यंतच्या संख्या दर्शवण्यासाठी संख्याचिन्हांचा वापर करतो आणि संख्या ओळखतो.<br>**क्षेत्र :** संख्याज्ञान/संख्या आकलन. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | संख्या आणि त्यांचा संबंध | संख्येची तुलना | • ३ पर्यंत दोन संख्यांची तोंडी तुलना करतो व जास्त–कमी असे शब्द वापरतो. | (१) ३ पर्यंतच्या वस्तू दाखवून, त्या वस्तूदर्शक संख्या ओळखण्यास सांगावे व त्या वस्तूंची तुलना करावी.<br>जसे – एक नाक, दोन डोळे, नाकांपेक्षा डोळे जास्त याप्रमाणे<br>(२) वस्तूसमूह घेऊन एक–अनेक, कमी–जास्त अशा शब्दांचा उपयोग करण्याची संधी देणे. | वस्तू, चित्रे, प्रतीके, संख्याकार्डे | (१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे कृतिपत्रिका |



<table>
<tr><th>स्तर/ इयत्ता</th><th>घटक</th><th>उपघटक</th><th>अध्ययन निष्पत्ती</th><th>अध्ययन अनुभव</th><th>आवश्यक साहित्य</th><th>मूल्यमापन निर्देश</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td>जसे – एका बास्केटमध्ये १ लाल, २ निळे व ३ हिरवे चेंडू आहेत, तर निळ्यापेक्षा हिरवे चेंडू जास्त आहेत असे ओळखण्याची व शब्द वापरण्याची संधी देणे.
<table>
<tr><td>१</td><td>●</td><td>एक</td><td>१</td></tr>
<tr><td>२</td><td>●●</td><td>दोन</td><td>२</td></tr>
<tr><td>३</td><td>●●●</td><td>तीन</td><td>३</td></tr>
</table></td><td></td><td></td></tr>
<tr><td>बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे)</td><td>संख्या आणि त्यांचा संबंध</td><td>संख्यांची तुलना</td><td>• ५ पर्यंतच्या संख्या ओळखतो.<br>• ५ पर्यंत दोन संख्यांची तुलना करतो आणि च्या पेक्षा जास्त, च्या पेक्षा कमी अशा शब्दांचा वापर करतो.</td><td>(१) वस्तू, चित्र, कार्ड दाखवून, त्यासाठीची संख्या, चिन्हे ओळखतो. जसे –
<br>
<table>
<tr><td>१</td><td>चेंडू</td></tr>
<tr><td>२</td><td>पुस्तके</td></tr>
<tr><td>३</td><td>पेन्सिली</td></tr>
<tr><td>४</td><td>लाडू</td></tr>
<tr><td>५</td><td>पाने</td></tr>
</table>
(२) ५ पर्यंतच्या वस्तू दाखवून, त्या वस्तूदर्शक संख्या ओळखण्यास सांगावे व वस्तूच्या साहाय्याने संख्यांची तुलना करणे.<br>
(३) वस्तूंचे समूह देऊन, त्यातून विशिष्ट संदर्भ देऊन, च्या पेक्षा कमी, च्या पेक्षा जास्त अशा तुलना दर्शक शब्दांचा उपयोग करण्याची संधी देणे (५ पर्यंत). जसे – डोळ्यांची संख्या हातांच्या बोटापेक्षा कमी आहे.</td><td>वस्तू, चित्रे, कार्ड.</td><td>(१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे कृतिपत्रिका</td></tr>
</table>



| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (४) पेक्षा कमी, पेक्षा जास्त   <br>• ‘ब’ गटात ‘क’ गटापेक्षा कमी चेंडू आहेत.<br>• ‘क’ गटात ‘ब’ गटापेक्षा जास्त चेंडू आहेत.<br>• ‘ब’ गटात ‘अ’ गटापेक्षा जास्त चेंडू आहेत. | | (१) दैनंदिन व्यवहारात योग्य तुलनात्मक शब्द वापरतो का? पडताळावे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | संख्या आणि त्यांचा संबंध | संख्या चिन्हांची ओळख (१ ते ९) | • ९ पर्यंत भारतीय लिपीतील संख्या ओळखतो. | (१) हाताच्या बोटांच्या साहाय्याने १ ते ९ संख्यांची व त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या संख्या चिन्हांची ओळख करून देणे. व लिहीण्याची संधी देणे. जसे –   | संख्या कार्ड | (१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या आणि त्यांचा संबंध | संख्या चिन्हांची ओळख (१ ते ९) | • ९ पर्यंतच्या संख्या सहजतेने लिहितो. |  | प्रत्यक्ष वस्तू, संख्या नाम कार्डे, कृतिपत्रिका | (१) वस्तूचे गट आणि संख्या यांची सांगड घालतात का तपासावे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | संख्या आणि त्यांचा संबंध | संख्या चिन्हांची ओळख (१ ते ९) | • ९ पर्यंत दोन संख्यांची तुलना करतो. च्या पेक्षा जास्त, च्या पेक्षा कमी असे शब्द वापरतो. | (१) ९ पर्यंतच्या वस्तू दाखवून, त्या वस्तू दर्शक संख्या ओळखण्यास सांगावे व वस्तूंच्या साहाय्याने संख्यांची तुलना करणे.<br><br>• ५ पेक्षा ३ कमी आहे.<br>• ३ पाने ५ पानांपेक्षा कमी आहेत.<br>(२) वस्तूंचे समूह देऊन, वेगवेगळ्या उदाहरणांच्या मदतीने च्या पेक्षा कमी, च्या पेक्षा जास्त अशा तुलना दर्शक शब्दांचा उपयोग करण्याची संधी देणे.<br>(३) १ ते ९ मधील एक संख्या कार्ड देऊन च्या पेक्षा कमी व जास्त वस्तूसमूह दाखवणे. | वस्तू / संख्याकार्डे | (१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे साहित्याच्या आधारे प्रत्यक्ष कृती |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जसे – लिहीणे या सारख्या कृती घेणे.<br>कमी \| ● ● ● ● \| जास्त<br> \| ४ \| | | |
| इयत्ता १ ली (६ ते ७ वर्षे) | संख्या आणि त्यांचा संबंध | शून्याची ओळख | • वस्तू/बाबींची अनुपस्थिती दाखवण्यासाठी शून्याचे चिन्ह ओळखतो/ वापरतो. | (१) डब्यात वस्तू/खडे ठेवून आवाज ऐकवणे नंतर वस्तू/खडे काढून घेतल्यानंतर आवाज येत नाही म्हणून डब्यात आता काहीच नाही म्हणजे शून्य '०' वस्तू आहेत.<br>उदा. रिकामी पिशवी, रिकामा डबा इ.<br>(२) एका प्लेटमध्ये ठरावीक वस्तू घेऊन त्या काढून घेतल्यावर प्लेटमध्ये काहीच शिल्लक राहत नाहीत. काहीच नाही म्हणजे शून्य.<br><br>प्लेटमध्ये ३ लाडू आहेत \| प्लेटमध्ये शून्य (०) लाडू आहेत | वस्तू/समूह संख्याकार्डे, वस्तू | (१) शून्याची गोष्ट सांगण्यास सांगणे. व्यवहारात ० कोठे वापरतो? याविषयी चर्चा करतो का पहावे. |
| इयत्ता १ ली (६ ते ७ वर्षे) | संख्या आणि त्यांचा संबंध | संख्यांची ओळख (वाचन–लेखन) | • २० पर्यंतची संख्या ओळखतो व लिहितो आणि १० पर्यंत संख्यानामे लिहितो. | (१) विविध वस्तू, प्रतीके यांच्या साहाय्याने 'दहा' ची ओळख करून देणे. जसे –<br>● ● ● ● ● ● ● ● ● ● १० दहा<br>(२) विविध प्रकारे १ ते १० संख्या, वस्तूरूपात दर्शवून, संख्याकार्डद्वारे संख्यानाम व संख्या चिन्ह यांची सांगड घालण्याची कृती घेणे. जसे – | विविध वस्तू, चित्रे, तक्ते, संख्याकार्ड | (१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (३) १ ते २० संख्यांची वस्तूच्या स्वरूपात ओळख करून देणे तसेच वस्तूसमूह ओळखून कृती घेणे.<br>जसे –<br>★★★★★★<br>★★★★★★ १२ बारा<br>(४) या प्रमाणे १ ते २० संख्यांचे वाचन व लेखन याबाबत सरावासाठी कृती घेणे.<br>९ + १ = १०<br>१० + १ = ११<br>१० + २ = १२<br>१० + ३ = १३<br>१० + ४ = १४<br>१० + ५ = १५<br>१० + ६ = १६<br>१० + ७ = १७<br>१० + ८ = १८<br>१० + ९ = १९<br>१० + १० = २०<br>(५) १ ते १० पर्यंतच्या संख्या ओळखून, संख्यानामे लिहिणे यासारखी कृती घेणे. | संख्याकार्ड, वस्तू, कृतिपत्रिका | (२) कृतींच्या निरीक्षणाद्वारे, प्रकल्प.<br>(१) कृतिपत्रिका |



| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता १ ली (६ ते ७ वर्षे) | संख्या आणि त्यांचा संबंध | संख्यांची तुलना १ ते २० | • २० पर्यंतच्या दोन संख्यांची तुलना करतो व च्यापेक्षा मोठा किंवा च्यापेक्षा लहान अशा शब्दांचा वापर करतो. | (१) दोन वस्तू, वस्तू गट, समूह ठेवून त्या वस्तूदर्शक संख्यांची तुलना करतो. जसे–   | वस्तू / समूह, संख्याकार्ड | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| | | | | • ५ ठिपके ६ ठिपक्यांपेक्षा कमी आहेत. म्हणून ५ ही संख्या ६ पेक्षा लहान आहे.<br>• ६ ही संख्या ५ पेक्षा मोठी परंतु ९ पेक्षा लहान आहे. | | |
| | | | | (२) सुचवलेल्या संख्येपेक्षा मोठी व लहान संख्या सांगण्याची संधी देणे. (१ ते २०)<br>जसे –<br>• ११ पेक्षा मोठी संख्या कोणती?<br>• ११ पेक्षा लहान संख्या कोणती? | वस्तू / प्रतीके चित्रे कार्ड | (२) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| | | | | (३) वस्तू–वस्तू, वस्तू–चित्र, वस्तू–चित्र संख्या, नामकार्ड, वस्तू–चित्र, संख्यानाम कार्ड, संख्या कार्ड, अशा संबंध दर्शक कृती घेणे.   | | (३) वस्तू समूह व संख्या याबाबत योग्य तुलनात्मक शब्द वापरतो का याची खात्री करावी. |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (४) विविध प्रकारची/पाने, फुले देऊन फुलांच्या पाकळ्यांची/पानांची संख्या मोजण्यास सांगून कोणत्या फुलांच्या पाकळ्यांची, पानांची संख्या जास्त आहेत याची पेक्षा जास्त, पेक्षा कमी शब्द प्रयोग करून तुलना करण्याची संधी देणे. | प्रत्यक्ष वस्तू | (३) प्रकल्प/ प्रात्यक्षिक निरीक्षण |
| इयत्ता २ री (७ ते ८ वर्षे) | संख्या आणि त्याचा संबंध | संख्यांची तुलना, संख्यांचे वाचन | • स्थानिक किंमत संकल्पना वापरून, ९९ पर्यंतच्या संख्या ओळखतो, वाचतो, संख्यानामे लिहितो. | (१) संख्या व्यक्त करण्यासाठी दशक माळा व मणी, दशक दांडे व मणी यांच्या साहाय्याने दशक-एकक स्वरूपात वस्तू मांडणे व त्याद्वारे संख्या तयार करून घेणे याप्रमाणे कृती करून घेणे.<br> = २३<br>१० — १० ३ तेवीस<br>दोन दशक ३ सुटे<br> = १५<br>१० ५<br>१ दशक ५ एकक पंधरा<br>(२) सुचवलेली संख्या दशक-एकक स्वरूपात व सुट्या स्वरूपात व्यक्त करण्यासाठी व त्याचे वाचन व लेखन करणे यासाठी, वस्तू व प्रतीकांच्या मदतीने कृतियुक्त अनुभव देणे. | विविध वस्तू, प्रतिके, संख्यानाम व संख्याकार्ड<br><br>वस्तू/प्रतीके | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (१ ते ९९) जसे –<br>१३<br>दशक– एकक स्वरूपात — सुट्या स्वरूपात<br>१० + ३ — १३<br><br>एक दशक ३ एकक = तेरा सुटे | | |
| इयत्ता २ री (७ ते ८ वर्षे) | संख्या आणि त्यांचा संबंध | संख्यांची तुलना, संख्याज्ञान | मोठ्यात मोठी आणि लहानात लहान दोन अंकी संख्या तयार करतो व त्यांची तुलना करतो. (दिलेल्या अंकांची पुनरावृत्ती करून व पुनरावृत्ती न करता दोन अंकी संख्या तयार करतो.) | (१) विविध अंकांची कार्डे देऊन, त्यांच्या पासून दोन अंकी संख्या तयार करणे व त्यातील मोठ्यात मोठी व लहानात लहान संख्या ओळखण्यास सांगणे. जसे –<br>६ ३ ३६ ३३<br>६३ ६६<br>अंकाच्या पुनरावृत्तीने<br>लहानात लहान ३३<br>मोठ्यात मोठी ६६<br>पुनरावृत्तीशिवाय<br>लहानात लहान ३६<br>मोठ्यात मोठी ६३<br>(२) विविध अंकांपासून विविध सूचनांप्रमाणे २ संख्या तयार करण्याची संधी देणे. | संख्याकार्डे | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे<br>(२) कृतिपत्रिका आधारे |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जसे –<br>• एकक स्थानी ५ असणारी मोठ्यात मोठी दोन अंकी संख्या<br>• दशक स्थान ९ असणारी लहानात लहान संख्या<br>• एक अंक एकदाच वापरून तयार होणारी मोठ्यात मोठी संख्या इ. | | |
| **अभ्यासक्रमाचे ध्येय : C 8.6** - संख्यांची जोड व फोड आणि संख्यांचे गट करणे यांसारख्या लवचीक कार्यनीतीचा वापर करून, दोन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी अचूकपणे करता येणे.<br>**अध्ययनाचे क्षेत्र :** मूलभूत गणिती क्रिया. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज–वजाबाकी पूर्वतयारी | • तोंडी उत्तर देण्याऐवजी गटात ठेवून किंवा गटातून काढून, तीनपर्यंतच्या वस्तूंचा गट तयार करतो. | (१) बालकांना तीनपर्यंतच्या वस्तू वापरून परस्पर देवाणघेवाण यातून शाब्दिक प्रसंगाची निर्मिती करण्याची संधी देणे यातून संबोध विकसित करण्यासाठी खेळ घेणे.<br>जसे – सरलाकडे २ आंबे आहेत, राधाकडे १ आंबा आहे, तर दोघींकडे मिळून किती आंबे आहेत?<br>(२) दिलेल्या वस्तूसमूहातून १/२/३ वस्तूंचा गट तयार करणे.<br>(३) ३ पर्यंतच्या वस्तूसमूहातून, काही वस्तू कमी करून, तयार होणाऱ्या गटातील वस्तूंची संख्या सांगणे.<br>(४) वस्तू एकत्र करणे व विभागणे या कृती कराव्या लागतील असे प्रसंग बडबडगीते, कृतियुक्त | परिसरातील विविध वस्तू | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गाणी, गोष्टी याद्वारे एकत्र करणे, विभागणे या संकल्पना लक्षात आणून देणे.<br>(५) एकत्र करणे आणि विभागणे यासाठी, बालकांना विविध शब्दप्रयोग वापरण्याची संधी देणे. जसे – एकत्र करणे, तोडणे, काढून देणे, मिसळणे, वाढवणे, सुटे करणे इत्यादी.<br>Oral Work with demonstration :<br>(१) दिलेल्या वस्तूंच्या गटात ५ किंवा ६ वस्तू द्याव्यात. त्यातून १ वस्तू दे, २ वस्तू काढ, ३ वस्तू बाजूला काढ. (Ungrouping)<br>(२) एक वस्तू ठेव, २ वस्तू ठेव, ३ वस्तूंचा गट कर. (Grouping) | | (१) प्रत्यक्ष कृती व निरीक्षण कृतिपत्रिका |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज–वजाबाकी | • ५ पर्यंतच्या वस्तूंचे दोन गट एकत्र करतो व पुन्हा मोजतो (उदा. माझ्याकडे २ आणि माझ्या बहिणीकडे ३ लाडू आहेत, त्यांना एकत्र करून आणि मोजून मला सांगा, की माझ्याकडे एकूण किती लाडू आहेत? | (१) ५ पर्यंतच्या वस्तू संदर्भाने बालकांना परस्परांना वस्तूंची देवाणघेवाण यासाठी शाब्दिक प्रसंगाची निर्मिती करणे. यातून संबोध विकसित करण्यासाठी खेळ घेणे. जसे – मीनाकडे ३ चेंडू आहेत, सीमाकडे १ चेंडू आहे, तर दोघींकडे मिळून किती चेंडू होतील?<br>(२) दिलेल्या वस्तूसमूहातून १/२/३/४/५ वस्तूंचा गट तयार करणे.<br>(३) ५ पर्यंतच्या वस्तूसमूहातून, काही वस्तू कमी करून, तयार होणाऱ्या गटातील वस्तूंची संख्या सांगणे व पुन्हा मोजणे. | विविध वस्तू<br>विविध बडबडगीते/ गोष्टी यांचा संग्रह | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वस्तूंच्या गटातून वस्तू बाजूला काढतो व पुन्हा मोजतो. | (४) एकत्र करणे, विभागणे या कृती कराव्या लागतील असे प्रसंग, बडबडगीते/कृतियुक्त गीते/गाणी, गोष्टी यांतून लक्षात आणून देणे.<br>(५) व्यावहारिक व पूर्वानुभवावर आधारित वेगवेगळी शाब्दिक उदाहरणे, प्रात्यक्षिक रूपात देऊन, एकत्र किती होतात? याचा सराव द्यावा. बेरजेवरील गोष्ट (बेरीज ५ पर्यंत येईल.)<br>(६) रियाकडे २ सफरचंदे होती. शुभमने आणखी ३ सफरचंदे दिली, तर रियाकडे एकूण किती सफरचंदे झाली. (addition by augmentation)<br>(७) पुढे मोजून बेरीज करणे.<br><br>(८) सर्व वस्तू परत मोजून एकूण सांगणे.<br><br>तीन गटांतील वस्तूंची बेरीज<br>उदा. १ + २ + २ = ५ | | (१) प्रात्यक्षिक<br>(१) कृतिपत्रिका |
| | | | | **प्रात्यक्षिक :**<br>(१) ७ किंवा ८ वस्तूंच्या गटातून १ ते ५ पर्यंतच्या वस्तू सांगितल्यानुसार काढून देतो. (Ungrouping)<br>(२) २ वस्तूंचा गट करून दाखव.<br>३ वस्तूंचा गट करून दाखव. | | |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | मूलभूत गणिती प्रक्रिया | बेरीज–वजाबाकी | • ९ पर्यंत च्या वस्तूंचे दोन गट एकत्र करतो व पुन्हा मोजतो. उदा. माझ्याकडे ५ आणि माझ्या बहिणीकडे ३ मणी आहेत. त्यांना एकत्र करून आणि मोजून मला सांगा, की माझ्याकडे एकूण किती मणी आहेत? | (१) ९ पर्यंतच्या वस्तू संदर्भाने बालकांना परस्परांना वस्तूंची देवाणघेवाण यासाठी शाब्दिक प्रसंगाची निर्मिती करणे, एकत्र करणे व विभागणे यातून संबोध विकसित करण्यासाठी खेळ घेणे.<br>जसे – विनोदकडे ६ पेन्सिली आहेत. त्याने त्यातील ४ पेन्सिली प्रकाशला दिल्या, तर त्याच्याकडे किती पेन्सिली शिल्लक राहतील.<br>(२) एकत्र करणे, विभागणे या कृती कराव्या लागतील असे प्रसंग, बडबडगीते, गाणी, गोष्टी, कृती सादर करणे व त्यातून एकत्र करणे, विभागणे या संकल्पना लक्षात आणून देणे.<br>(३) दिलेल्या वस्तूसमूहातून १/२/३ याप्रमाणे ९ पर्यंत वस्तूंचा गट तयार करणे, यांसारख्या कृतींचा सराव घेणे. | वस्तू<br>गाणी, गोष्ट, बडबडगीते यांचा संग्रह | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| | | | | **प्रात्यक्षिक**<br>(१) व्यावहारिक व पूर्वानुभव आधारित वेगवेगळी शाब्दिक उदाहरणे गोष्टीरुपात सांगून, एकूण किती? याचा सराव घ्यावा. बेरजेसाठी वेगवेगळ्या पद्धतीने एकूण किती? ते विद्यार्थ्यांना करू द्यावे. त्याची स्वतःची किंवा त्याला जमेल त्यानुसार, बेरजेची कृती करून द्यावी. वेगवेगळ्या प्रकारचे रंगीत आकार, मणी, दगड, बिया इत्यादी वापरावे. पाने, फुले, खेळणी<br>◯ + ◯ + ◯ = ९ | | विचार करून सोडव.<br><br>बेरीज आडवी, उभी, तिरपी ९ येईल अशा प्रकारे रिकाम्या चौकटीत योग्य संख्या लिहा. |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | • वस्तूंच्या गटातून ९ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो व पुन्हा मोजतो. | (१) ९ पर्यंतच्या वस्तू समूहातून १/२/३ या प्रमाणे विविध वस्तूंचा गट करून, गट व गटातील वस्तू पुन्हा मोजण्याची संधी देणे. | वस्तू | (१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे |
| | | | | **प्रात्यक्षिक**<br>(१) १०–१२ वस्तू टोपलीत ठेवून, त्यापैकी ९ पर्यंतच्या ५,६,७,८,९ वस्तू काढून दे अशी कृती करून घेणे.<br> ही कृती जोडीत करता येईल.<br>४,५,६,७,८,९ ठिपके असलेला फासा बनवून, फासावर जी संख्या येईल तेवढ्या वस्तू देणे–घेणे असा खेळ घेता येईल. | | वस्तू :<br>(खेळणी, बिया, पाने, फूले...इ.)<br>फासा तयार करणे.<br>जोडो ब्लॉक्स,<br>मण्यांच्या माळा या साहाय्याने पडताळा घेणे. |
| | | | | **प्रात्यक्षिक कृती**<br>८ ब्लॉक्स जोडून एखादी रचना तयार कर, ७ मणी ओवून माळा तयार कर इत्यादी. | | |
| इयत्ता १ ली (६ ते ७ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज–वजाबाकी | • दैनंदिन जीवनातील परिस्थिती आणि मूर्त वस्तूंचा उपयोग करून, बेरजेसाठी (addition fact) वापरून १८ पर्यंत उत्तर येईल, अशी उदाहरणे मांडणी करून सोडवतो. | (१) बालकांना दैनंदिन जीवनातील बेरीज करावी लागेल असे प्रसंग, घटना यांच्या शाब्दिक उदाहरणांद्वारे गाणी, चित्रांद्वारे एकत्र करणे. मिसळणे, एकूण किती असे बेरजेसाठीचे विविध शब्दप्रयोग वापरण्याची संधी देणे. | वस्तू, संख्याकार्डे | (१) कृतींच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (२) एका गटास दोन संख्याकार्डे दाखवण्यास सांगावे, दुसऱ्या गटास त्या संख्येप्रमाणे वस्तू बाजूला काढण्यास सांगावे. तिसऱ्या गटाने वस्तू एकत्र तयार करून जी संख्या मिळते, त्या संख्यांसाठी संख्याकार्डे दाखवणे, असा खेळ घेणे. ही कृती शाब्दिक उदाहरण तयार करण्यासाठी वापरणे.<br>जसे –<br><br>आडवी मांडणी: $८ + ४ = १२$<br>उभी मांडणी: $\begin{array}{r} ८ \\ + ४ \\ \hline १२ \end{array}$ | वस्तू, संख्याकार्ड | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |



| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (३) एक वस्तूसमूह द्यावा. त्यासाठी संख्या दाखवण्यास सांगावे. तो वस्तूसमूह विभागावा. त्याची संख्यारूपात मांडणी करण्यास सांगावी. अशी किती प्रकारे मांडणी करता येते ते विचारावे.<br>(४) गोलाकारात बसून, बेरजेवरील विविध प्रश्न, कृती दाखवून सोडवून घेणे. उदा. माझ्याकडे ८ गोट्या आहेत. राजूने आणखी ४ गोट्या दिल्या. तर एकूण किती गोट्या झाल्या? हातचे म्हणजे काय?<br>(५) वर्गात छोटा बाजार भरवून दुकानदार–ग्राहक असा खेळ घेऊन, नाणी–नोटा संबंधी उदाहरणे वापरून, बेरीज संकल्पना स्पष्ट करावी.<br>(६) साभिनय गोष्टी–गाण्यांच्या (अभिनय गीत) रूपात बेरजेची कहाणी (Addition facts) ९+१, ९+२, ९+३, ९+४, ९+५... ९+९<br>१० = ९+१, ८+२, ७+३, ६+४, ५+५, ४+६, ३+७, २+८, १+९, ०+१० | | (१) प्रत्यक्ष दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्या–साठी बेरजेचा योग्य प्रकारे उपाय |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वस्तूंचे दोन वेगळे गट देऊन एकूण किती ते विचारणे.<br>८+४= ८ च्या पुढे ४<br>९, १०, ११, १२<br>∴ ८ + ४ = १२<br>मांडणी आडवी उभी<br>  ८ गोट्या<br>+ ४ गोट्या<br>———<br>  १२<br>हातचा<br>दशक / एकक: ० ८; ० ४; १ २<br>(७) (Print Rich Classroom) प्रिंट/मजकूर समृद्ध वर्ग वस्तू-वस्तू, वस्तू-चित्र, चित्र-चित्र, चित्र-अंक, अंक-अंक बेरीज चार्ट लावावेत. संख्यापट्टी/संख्यारेषा वापरून<br>(८) Picture reading book on addition<br>(९) Worksheet on addition<br>(१०) Game, Quiz, puzzles math Buzz on addition | | वाचन ८ गोट्या अधिक ४ गोट्या बरोबर १२ गोट्या<br>+ 'अधिक' = 'बरोबर' चिन्ह ओळखणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता १ ली (६ ते ७ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज–वजाबाकी | • दैनंदिन जीवनातील परिस्थिती आणि मूर्त वस्तूंचा उपयोग करून, वजाबाकी साठी ९ पर्यंत उत्तर येईल. अशी उदाहरणे तयार करतो आणि सोडवतो. (उदा. दिलेल्या गटातून बिया/मणी/खडे वेगळे करणे/काढणे.) | (१) दैनंदिन जीवनातील, वजाबाकी करावी लागेल असे प्रसंग, घटना यांची शाब्दिक उदाहरणे, गाणी, चित्रे यांद्वारे बालकांना, काढून टाकणे, गाळणे, कमी करणे, फुटणे, उडून जाणे, खर्च होणे, उरणे, शिल्लक राहणे, बाकी राहणे, कितीने कमी, कितीने जास्त असे वजाबाकीसाठीचे विविध शब्दप्रयोग, वापरण्याची संधी देणे.<br>(१) वरीलप्रमाणे कृतींसह उदाहरणे (नाणी–नोटा) चित्रांच्या साहाय्याने<br>१८ − ९ = ९   १७ − ९ = ८<br><br>आडवी मांडणी<br>१७ − ९ = ८<br>शाब्दिक उदा. १७ फुले आहेत त्यातील ९ फुले वाळली, तर ताजी फुले किती राहिली?<br>(२) संख्यापट्टी/संख्यारेषा वापरून वजाबाकी करणे. 'वजा' करून 'बाकी' लिहिणे – वजाबाकी. – चिन्ह वजा करणे (क्रिया) = बरोबर. शिल्लक, उरले, बाकी, गेले इत्यादी. | घटना, प्रसंग, गाणी इत्यादी दर्शक चित्र. | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| इयत्ता १ ली (६ ते ७ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज–वजाबाकी | • संख्यांची बेरीज आणि वजाबाकी यांच्यातील परस्पर संबंध सांगतो. | (१) कोणत्याही तीन संख्या घेऊन, त्यातील मोठ्या संख्येतून उर्वरित दोनपैकी कोणतीही एक संख्या कमी केल्यास, तिसरी संख्या शिल्लक राहते, तसेच याउलट दोन संख्या | संख्याकार्डे, वस्तू | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकमेकांत मिसळल्यास, तिसरी संख्या मिळते. यासारख्या उदाहरणातून बेरीज – वजाबाकी यातील संबंध समजून घेण्याची संधी देणे. जसे –<br>• ७ मधून ४ वजा केल्यास ३ शिल्लक राहतात.<br>• ७ मधून ३ वजा केल्यास ४ शिल्लक राहतात.<br>• ४ आणि ३ एकत्र केल्यास ७ मिळतात.<br>७ – ४ = ३<br>७ – ३ = ४<br>३ + ४ = ७<br>• वस्तू दाखवून बेरीज करणे.<br><br>४ + १ = ५<br>खडू खडू खडू<br>५ – १ = ४<br>खडू खडू खडू<br>④ ① ⑤ किती मिळवले?<br>किती कमी केले?<br>**Key :** त्याच त्याच संख्या वापरल्या आहेत. | **(Plan) :** अध्ययन साहित्य – चित्रे, पाने, फुले, पेन, खडू, बिया, मणी, इत्यादी. | (१) बेरीज व वजाबाकी सहसंबंधावरील उदाहरणे सोडविताना योग्य प्रकारे क्रियांची निवड करता येते का पडताळावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **पद्धत (Process)**<br>४ + ३ = ७<br>७ − ३ = ☐<br>७ − ☐ = ३<br>+ ४ / ३ / ७ ; − ७ / ३ / ४ ; − ७ / ४ / ३ ; + ३ / ४ / ७<br>**सराव (Process)** ७ − ६ = ?<br>∴ ☐ ☐ ☐ = ☐<br>संख्या चिन्ह संख्या<br>बेरजे वरून वजाबाकी ⟷<br>वजाबाकी वरून बेरीज ⟷<br>७ + २ = ९ → ☐ ∴ ☐<br>घटक संख्या, समान संख्या<br>४ + ४ = ८ → ∴ ☐<br>वजाबाकीची उदा. लिहा.<br>घटक संख्या, समान संख्या<br>५ + ० = ५ → ५ − ५ = ० ; ५ − ० = ५<br>वजाबाकीची किती उदा. तयार होतील? | | |
| इयत्ता १ली (६ ते ७ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज–वजाबाकी | • बेरीज/वजाबाकी क्रियांसाठीचे +/− चिन्हे ओळखतो. | (१) दैनंदिन जीवनात संख्यांची बेरीज करावी लागते, अशा प्रसंगी एकूण किती मिसळले, एकत्र केले, जोडले अशा शब्द प्रयोगासाठी बेरजेचे '+' चिन्ह वापरण्याची संधी देणे.<br>जसे – ७ मुले आणि ९ मुली आहेत, तर वर्गात एकूण किती बालके आहेत. | वस्तू – चिन्हकार्ड | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | | ७ + ९ = ☐  | वस्तू | |
| | | | | (२) दैनंदिन जीवनात, संख्यांची वजाबाकी करावी लागेल, अशा प्रसंगातील किती शिल्लक राहिले, तुटले, फुटले, खराब झाले, खर्च झाले, लपवले, कितीने कमी, कितीने जास्त अशा शब्द प्रयोगांसाठी वजाबाकीचे '–' चिन्ह वापरण्याची संधी देणे. | | |
| | | | | जसे – एका डब्यात ८ लाडू आहेत, रमाने त्यांतील २ लाडू खाल्ले, तर डब्यात किती लाडू शिल्लक राहिले.  ८ – २ = ☐ | वस्तू | (१) प्रत्यक्ष कृती<br>(२) कृतिपत्रिका |
| | | | | (१) +/– वरील उदाहरणे देऊन, क्रिया ठरवून, त्यानुसार चिन्ह देऊन, मांडणी करण्याची संधी देणे.<br>(२) +/– चिन्ह पाहून उदाहरणे सोडवण्याची संधी देणे.<br>(३) कोड्याच्या रूपात +/– ओळखणे. | विविध वस्तू, गणित पेटीतील साहित्य | (१) कृती निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जसे : □ (९ + ५ = १४) □ (९ − ५ = ४) योग्य चिन्ह ठेवा.<br>(४) उदाहरणांत चूक आहे की नाही? ते ओळखण्यास सांगावे. चूक असल्यास दुरुस्त करणे. अशा उदाहरणांचा सराव घ्यावा. जसे –<br>(१) (•) ७ + ५ = १३ (••) ५ − २ = २<br>(२) (•••) ९ − ६ = ३ (••••) ९ + ८ = १६<br>(३) १० + ५ = १० उत्तर बरोबर आहे का? जर नाही, तर काय चुकले?<br>(५) मुक्तोत्तरी प्रश्न : प्रश्न तयार करणे व सोडवण्याची संधी देणे.<br>∴ □ ± □ = □ | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज वजाबाकी (२० ते ९९) | • बेरीज व वजाबाकी करण्यासाठी 'संख्यांचे गट करणे किंवा फोड करणे' यांसारख्या लवचीक कार्यनीतींचा वापर करतो. उदा. ५७ + ३३ यांत ३३ पैकी ३ घेऊन ५७ | (१) बेरीज उत्तर ९९ येईल अशी उदाहरणे घेणे.<br>बेरीज → बिन हातच्याची / हातच्याची<br>बिन हातच्याची – दशक (द) एकक (ए): १५ + ६४ = ७९<br>हातच्याची – दशक (द) एकक (ए): (हातचा १) ५६ + १९ = ७५ | संख्या तक्ता, कार्ड, फासे, मण्यांची माळ | (१) कृतिपत्रिका<br>(२) तोंडी गणित |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मध्ये मिळवून ६० ही संख्या मिळवतो व नंतर ३० मिळवून ९० उत्तर काढतो. | १५ + २० = ३५, ४० + २४ = ६४,<br>३० + २० = ५०<br>बेरजेसाठी विविध कार्यनीती वापरणे. जसे –<br>बेरीज शतक मणी माळेवर (पुढे मोजून)<br>(१) जोड : २५ + ५ (लहान संख्या मिळवणे.)<br>२५ २६ २७ २८ २९ ३०<br>(२) बेरीज : मोठी संख्या मिळवणे.<br>२५ + ३३<br>+१० +१० +१०<br>२५ ३५ ४५ ५५ ५६ ५७ ५८<br>(फोड) २५+१०+१०+१०+३ = ५८<br>(३) १ ते १०० संख्यारेषेवर बेरीज करणे.<br>उभी मांडणी–आडवी मांडणी,<br>दशक दांडे व सुटे ठोकळे वापरून, दोन अंकी संख्यांची बेरीज करणे. | | (१) बेरीज व वजाबाकी करण्यासाठी स्वत:च्या कार्यनीती विकसित करता येतात का याची खात्री करावी. |
| | – | बेरीज व वजाबाकी | • स्थानिक किंमत, ही संकल्पना वापरून, दोन संख्यांची बेरीज करतो (ज्यांची बेरीज ९९ पेक्षा जास्त नको) आणि दैनंदिन जीवनातील समस्या सोडवण्यासाठी त्याचा वापर करतो. | शाब्दिक उदाहरणे : व्यावहारिक, नाणी नोटांवरील<br>(१) रहीमने ७५ मातीचे दिवे व १५ लाईटचे दिवे विक्रीसाठी आणले, तर एकूण किती दिवे विक्रीसाठी आणले?<br>(२) शाब्दिक उदाहरणे स्वत: तयार करून सोडविण्याची संधी व सराव घ्यावा. | | (१) प्रत्यक्ष व्यवहारात वापर<br>(२) निरीक्षण<br>(३) कृतिपत्रिका |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज–वजाबाकी | • स्थानिक किंमत ही संकल्पना वापरून ९९ पर्यंतच्या दोन संख्यांची वजाबाकी करतो आणि दैनंदिन जीवनातील समस्या सोडवण्यासाठी त्यांचा वापर करतो. | वजाबाकी<br>बिन हातच्याची<br>• १९ – १५<br>• १९–१०–१–१–१–१–१ संख्यारेषेवर मागे मोजून<br>• १४ – ०<br>• १४ – १४<br><br>हातच्याची<br>• संख्यारेषेवर १८ – ९, ३० – १८ (मागे मोजून)<br>द ए<br>२ १५<br>~~३~~ ~~५~~<br>१ ६<br>१ ९<br>दशक सुटा करणे<br>(१) शाब्दिक उदाहरणे : व्यावहारिक व नाणी नोटांवरील<br>(२) शाब्दिक उदाहरणे तयार करून सोडविण्याची संधी द्यावी. | | (१) कृती निरीक्षणासाठी<br>(२) कृतिपत्रिका |
| ७ ते ८ वर्षे | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज व वजाबाकी | • बेरीज–वजाबाकी मधील सहसंबंध ओळखतो आणि त्याचे उपयोजन करतो. | (१) • बेरीज म्हणजे दोन गटातील वस्तू एकत्रित करून मोजणे. वजाबाकी म्हणजे एका गटातून हव्या तेवढ्या वस्तू बाजूला काढणे व किती शिल्लक/बाकी राहिल्या ते मोजणे. एकातून दोन गट करणे.<br>• बेरीज व वजाबाकी एकमेकांच्या विरोधी क्रिया आहेत, म्हणजे त्यांच्यात सहसंबंध आहे. हे कृतीतून समजून देणे. मांडणी करून दाखवणे. | गणित पेटीतील साहित्य<br>विविध वस्तू | (१) कृती निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | • **बेरीज व वजाबाकी तथ्ये (Addition<sup></sup> Subtraction Facts) :** तीन दोन अंकी संख्या खालीलप्रमाणे घ्याव्यात.<br>जसे : १०, २०, ३०<br>३० – १० = ........ ३० – २० = ........ (३०, १०, २०) १० + २० = ........ २० + १० = ........<br>**उपयोजन** : माझ्याकडे ७५ रु. आहेत. त्यातून २५ रु. ची वही व ४० रु. चे पेन घेतले तर एकूण खर्च किती झाला? पैसे शिल्लक राहतील का? किती राहतील, का कमी पडतील ते ठरवा.<br>सोडवलेले उदाहरण तपासा.<br>४५ – १८ = ३३ | | (१) प्रत्यक्ष व्यवहारात उपयोजन. |
| ७ ते ८ वर्षे | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज व वजाबाकी | | वजाबाकीचे उत्तर बरोबर आहे की चूक ते ठरविण्यासाठी बेरीज वापरून पडताळा घेणे.<br>उदा. ४५ – १८ = ३३<br>तर ३३ + १८ = ५१ म्हणजे चूक आहे. | गणित पेटीतील साहित्य, विविध वस्तू | (१) कृती निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | • परिचित परिस्थितीतील उदाहरणे सोडवण्यासाठी योग्य गणिती क्रिया ओळखतो. (बेरीज किंवा वजाबाकी)<br><br>• साधी शाब्दिक उदाहरणे समजून घेतो आणि सोडवतो. | (५) शाब्दिक उदाहरण :<br>४० फुग्यांपैकी ५ फुगे फुटले, तर किती उरले?<br>• बेरीज की वजाबाकी? का? मांड व सोडव.<br>• ३५ फुग्यांत आणखी किती फुगे मिळवले, तर एकूण फुगे ४० होतील?<br>अ) ३५ + ☐ = ४०<br>ब) ४० - ३५ = ☐<br>(६) बेरीज–वजाबाकीवरील संमिश्र उदाहरणे वाचून कोणकोणती क्रिया करायची? उत्तर कसे काढायचे? हे समजून घेऊन समस्यांची योग्य गणिती मांडणी करून सोडविण्यास सांगावे. | कृतिपत्रिका | (१) दैनंदिन परिस्थितीत कोणती मूलभूत क्रिया करावी लागेल हे ठरवता येते का पडताळावे. |

**विकास क्षेत्र :** बोधात्मक

**अभ्यासक्रमाचे ध्येय :** बालके राशी, आकार व मापन यांच्या मदतीने, गणितीय आकलन आणि क्षमता विकसित करतात व त्याद्वारे सभोवतालचे जग समजून घेतात.



**अध्ययन क्षमता :** **C.8.7** गुणाकार म्हणजे पुन्हा पुन्हा बेरीज आणि भागाकार म्हणजे समान वाटणी हे समजतो.

**अध्ययन क्षेत्र :** मूलभूत गणिती क्रिया

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | गुणाकार व भागाकार – भागाकाराची पूर्वतयारी | • दिलेल्या वस्तूंचे एकापेक्षा जास्त जणांमध्ये वाटप करतो. | (१) मुलांना काही वस्तू देऊन, ते सोबत्यांमध्ये वाटण्यास सांगावे. (३ पर्यंत)<br>(२) वस्तू समान गटात वाटप करताना कमी पडल्या अथवा जास्त झाल्या तर काय | मणी, खडे, गणित पेटी | कृती निरीक्षणाद्वारे |




| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | करावे असे प्रश्न विचारावेत. (वाटता न येणारी वस्तू बाजूला काढून ठेवावी.)<br>(३) सुट्या वस्तू/पातळ/द्रव पदार्थ/फळासारखे कापून वापर करावयाचे पदार्थ यांच्या वाटपासाठी कोणता विचार करावा या संबंधाने चर्चा घडवून आणावी. | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | भागाकाराची पूर्वतयारी | • २ जणांमध्ये वस्तूंचे समान वाटप करतो. (६ पर्यंत) | (१) प्रत्यक्ष ६ पर्यंतच्या वस्तूंची/बियांची/फुलांची गोष्टीरूपात वाटणी समजावून देणे. वस्तूसंच देऊन तो गटात समान वाटण्यास सांगणे. किती वस्तू/किती जणांना वाटता आल्या/समान वाटप झाले का?/उरले का? अशी चर्चा घडवून आणणे.<br>(२) समान वाटणी झाल्यावर चित्ररूपात मांडणी करण्यास सांगावी. | मणी, खडे, गणितपेटी | (१) कृती निरीक्षणाद्वारे |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | गुणाकारपूर्व तयारी | • वस्तूंचे गट करतो. गटातील वस्तू व गटांची संख्या मोजतो. | (१) ४ मणी दोन मुलांना समान एक-एक करून वाटण्यास सांगावे. प्रत्येकाला किती मिळाले? (तेरा मणी) मण्यांची संख्या वाढवावी? मुलांची संख्या वाढवून वाटण्यास सांगावे. मूल वाढल्यास मणी कमी मिळतात. मुले तेवढीच ठेवून मणी वाटले, तर जास्त मणी मिळतात हा संबंध कृती चित्रातून लक्षात आणून द्यावा.<br>(२) २-२/३-३/४-४/५-५ च्या गटात वस्तू समूह द्यावेत. गट करण्यास सांगावे. सर्व | परिसरातील वस्तू, गणितपेटीतील साहित्य | (१) कृती निरीक्षणाद्वारे<br>(२) प्रत्यक्ष कृती |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गटांत एकूण किती वस्तू आहेत? किती गट झाले? याबद्दल चर्चा घडवून आणणे. गटातील वस्तूंची संख्या कमी केली/वाढवली, तर काय बदल होतो यावर चर्चा घडवून आणावी.<br>(३) समान गट झाले? किती वस्तूंचे झाले? किती गट झाले? गटातील वस्तू किती अशी चर्चा करणे.<br>(४) एकच वस्तू समूह, समान गटात कितीप्रकारे विभागता येतो, याचे प्रात्यक्षिक करण्याची संधी द्यावी.<br>(५) अनेक चित्रे असलेले चित्रकार्ड देऊन, त्यामध्ये, विविध प्रकारे समान गट करण्याची संधी द्यावी. चित्रकार्ड देऊन त्याबद्दल कितीचे गट केले/किती गट झाले? असे प्रश्न विचारणे.<br>(६) त्याच चित्रकार्डावरील गटातील चित्रसंख्या वाढवली/कमी केली, तर काय बदल होतो यावर चर्चा घडवून आणावी.<br>(७) कमी वेळेत समान गट होत नाहीत अशा स्थितीबाबत चर्चा करावी. | | (३) प्रात्यक्षिक |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | गुणाकारपूर्व तयारी | गट करून लहान संख्यांची गुणाकाराची उदाहरणे सोडवितो. | (१) २-२/३-३ चे गट करून द्यावेत. गटातील वस्तू एका दृष्टिक्षेपात मोजाव्यात. (गटातील एकूण वस्तूंची संख्या १८ पेक्षा कमी असावी.) | गणितपेटी, चित्रे, पेन्सिल, इतर वस्तू | (१) कृती निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (२) गटात विभागणी केलेले प्रसंगचित्र द्यावे. एकूण संख्या काढण्यासाठी गटात काम द्यावे. कोणती क्रिया करावी लागेल हे विद्यार्थ्यांकडून काढून घ्यावे. एकूण गट किती? प्रत्येक गटात किती? चर्चा करावी, सराव घ्यावा.<br>उदा. एका केकवर दोन चेरी. अशा ३ केकवर एकूण चेरी किती?<br> २ + २ + २ = ☐<br>एका केकवर चेरी = ☐<br>एकूण केक = ☐<br>(३) वस्तूसमूह, चित्रसमूह द्यावा. त्याची समान गटात विभागणी करून घ्यावी. गटातील वस्तू काढून घ्याव्यात.<br> = चारचे दोन गट<br>☐ = एकूण वस्तू<br>(४) वस्तूसंच/गटाचे प्रसंग चित्र/कृतिपत्रिका यांच्या साहाय्याने पुन्हा पुन्हा बेरीज करतो. पट शब्दाचा वापर करून उदाहरणे सोडवतो.<br>(५) १० पेन्सिलींसाठी किती बॉक्स अशी समस्या निर्माण करणारी कोडी घालणे. | | |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | गुणाकार | • गुणाकार चिन्ह ओळखतो. | (१) प्रसंगाद्वारे गुणाकार करण्याची गरज लक्षात आणून देणे.<br>(२) प्रसंगचित्र द्यावे. त्यावर आधारित गुणाकाराचे उदाहरण सोडविण्यासाठी पुढीलप्रमाणे चर्चा करावी.<br>एकूण गट = ☐<br>प्रत्येक गटात वस्तू = ☐<br>एकूण ☐ वस्तू<br>बेरीज रूपात मांडणी, पट शब्द वापरून मांडणी, गुणाकार चिन्हाची (×) ओळख करून द्यावी. | प्रसंग चित्रे | (१) तोंडीकाम |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | भागाकाराची पूर्वतयारी | • भागाकाराची उदाहरणे सोडवताना गटात विभागणी करण्यासाठी प्रयत्न प्रमाद (Trial and error) पद्धतीचा वापर करतो. | (१) शाब्दिक उदाहरणाद्वारे व चित्र यांचे गट करणे. प्रत्येक गटातील वस्तू संख्या सांगणे. (२० पर्यंत संख्या)<br>(२) ठिपक्यांचा/चौकटीचा कागद देऊन त्यांच्याकडून एकूण ठिपके मोजून घ्या. सूचनेप्रमाणे ठिपक्यांचे गट करा. किती गट पूर्ण झाले? कसे केले? किती गट अपूर्ण राहिले अशी चर्चा घडवून आणावी. | परिसरातील वस्तू, चौकट कागद | (१) प्रत्यक्ष भागाकार कृती |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | | | • भागाकाराचे चिन्ह ओळखतो. | (१) काही वस्तू देऊन (१२ वस्तूंचे) समान गटात विभागणी करण्याची संधी देणे.<br>• २–२ चे किती गट होतात.<br>एकूण वस्तू = १२<br>गटातील वस्तू २<br>समान गटात विभागणी = ☐<br>१२ ÷ २ = ६<br>या मांडणीसाठी १२ ÷ २ असे लिहितात व १२ भागिले (÷) दोन असे वाचतात.<br>म्हणजेच १२ मधून २ किती वेळा वजा करता येईल अशी चर्चा घडवावी. याप्रमाणे वेगवेगळ्या उदाहरणांच्या (प्रसंगाच्या) माध्यमांतून संधी द्यावी.<br>(२) गणिती विधान आणि त्याची मांडणी तसेच मांडणीचे विधान सांगण्याची संधी द्यावी. | मणी, गोट्या | (१) कृती प्रात्यक्षिक निरीक्षण |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | गुणाकार | • पुन्हा पुन्हा बेरीज करून ९९ पर्यंतच्या संख्येचे सोपे गुणाकार करतो. (उत्तर : ९९ पर्यंतच्या संख्या) | (१) मूळ गटातील वस्तू/चित्रे यांची संख्या कायम ठेवून छोट्या गटातील चित्रांची/वस्तूंची संख्या वाढवली/कमी केली, तर काय बदल होतो ते लक्षात आणून द्यावे. गुणाकार तथ्ये/शोध वाक्य सांगावी. शेवटी पट व गुणाकार चिन्हाचा वापर करावा. | वस्तू चित्रे | (१) कृती निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उदा.<br> दोनचे तीन गट = २ ची ३ पट<br>= २ × ३ = ६<br>=  तीनचे दोन गट<br>= <br>गटात वस्तू द्याव्यात. गटाची संख्या कमी अधिक करावी. त्याच्या गटाची पुन्हा गट पद्धतीने बेरीज करावी. कितीचे गट, गटांची संख्या किती अशी चर्चा करावी.<br>पुन्हा पुन्हा बेरीज माध्यमातून पाढे कसे तयार होतात याची कृती घ्यावी. | प्रत्यक्ष वस्तू कार्ड, अंक तक्ता | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | भागाकाराची पूर्वतयारी | • ४–५ जणांमध्ये वस्तूंचे समान वाटप करतो. (२० पर्यंत) | (१) टोपलीत ९ पर्यंत वस्तू ठेवाव्यात. २, ३, ४, ५ याप्रमाणे वस्तूंचे समान गट करण्यास सांगावे. सुचवलेल्या वस्तूंएवढे समान गटात वस्तू वाटप करताना काय होते–<br>• एक एक वाटप करताना<br>• दोन–दोन वाटप करताना<br>याप्रमाणे गटातील वस्तू वाटप करताना गटातील संख्येत काय बदल होतो, याबद्दल त्यांना विचारावे. वाटणीची गोष्ट करण्यास सांगावे. | मोजता येणाऱ्या वस्तूंचा संच<br>गणित पेटीतील साहित्य | (१) कृती प्रात्यक्षिक निरीक्षण |



| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (२) एका मोठ्या वस्तू समूहातून सुचवलेल्या गटात वस्तू पुन्हा कमी करणे म्हणजे समान गटात वाटप हे लक्षात आणून देणे.<br>समान वाटणी झाल्यावर चित्ररूपात मांडणी करण्यास सांगावे. | | (२) चित्ररूपात मांडणी |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | मूलभूत गणिती क्रिया | भागाकार | • पुन्हा पुन्हा वजाबाकीचा वापर करून भागाकार करण्यासाठी ९९ पर्यंतच्या संख्यांचे किती गट करावे लागतात हे सांगतो. | (१) ९९ पर्यंतचा वस्तूसमूह बालकांना द्यावा.<br>(२) समूहाचे सूचनेनुसार गट करण्यास सांगावे.<br>(३) या केलेल्या गटानुसार वाटणी करण्यास सांगावे.<br>(४) ही वाटणी करताना मूळ संचात घट कशी होते याची चर्चा घडवून आणणे.<br>(५) त्याच त्या संख्येची, वाटणीत पुन्हा पुन्हा वजाबाकी होते हे लक्षात आणून देणे.<br>(६) कितीचे गट कितीवेळा वजा झाले, याप्रमाणे चर्चा घडवून आणावी.<br>जसे :<br>१२ − २ = १०<br>१० − २ = ८<br>८ − २ = ६<br>६ − २ = ४<br>४ − २ = २<br>२ − २ = ० | मण्यांच्या माळा, शतकमाळा, शतक पारी | (१) कृती प्रात्यक्षिक निरीक्षण |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (७) ठिपक्यांच्या कागदावर, चित्रकार्डांच्या मदतीने संख्यांचा वापर करून, वरीलप्रमाणे कृती घ्याव्यात, चर्चा घडवून आणावी. | | |
| **विकास क्षेत्र :** बोधात्मक<br>**अभ्यासक्रमाचे ध्येय :** बालके राशी, आकार व मापन यांच्या मदतीने, गणितीय आकलन आणि क्षमता विकसित करतात व त्याद्वारे सभोवतालचे जग समजून घेतात.<br>**अध्ययन क्षमता : C 8.8 :** मूलभूत भौमितिक आकार, त्यांच्या निरीक्षणक्षम गुणधर्मांसह ओळखतो, तयार करतो व वर्गीकरण करतो, तसेच वस्तूंचे अवकाशीय सापेक्ष संबंध समजून घेतो आणि स्पष्ट करतो.<br>**अध्ययन क्षेत्र :** आकार आणि अवकाशीय समज | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | **आकार आणि अवकाशीय समज** | विविध आकारांची ओळख | • आकार, माप, रंग यांपैकी एका वैशिष्ट्यानुसार जोड्या लावतो. | (१) विविध आकार<br>(२) विविध रंगांच्या वस्तू आणि रंगकार्डे देऊन रंग आणि वस्तू यांच्या जोड्या लावण्याची संधी देणे.<br>(३) समान रंगाच्या वस्तूमध्ये, एक भिन्न रंगाची वस्तू ओळखणे.<br>(४) ज्ञात असलेले प्राणी आणि त्यांच्या सावलीतील साम्य यांतील संबंध ओळखणे.<br>(५) विविध आकारांच्या वैशिष्ट्यांनुसार भिन्नता/साम्य लक्षात घेण्यासाठी विविध कृती करणे. उदा. जसे :<br>(१) विविध आकार भेंडी/बटाटा/ड्रायफ्रूट/लांब वांगी यांचे काप रंगात बुडवून ठसे काम करणे. | रंगकार्ड, रंगीत वस्तू, गणित पेटी, भाज्या, फुले | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे पडताळणी |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (२) विविध आकार (△/□/○) मुलांना वाटणे, पळण्यास सांगणे. हात वर केल्यावर समान आकाराचे गट करण्यास सांगावे. | | (२) प्रत्यक्ष कृती |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | आकार आणि अवकाशीय समज | आकारांचे वर्गीकरण | • आकार, रंग आणि माप यांसारख्या वस्तूंची एका गुणधर्माद्वारे तुलना आणि वर्गीकरण करतो. | (१) दिलेल्या विविध समान आकारांच्या/ रंगांच्या/मापाच्या वस्तूंचे वर्गीकरण करण्यासाठी विविध कृती करणे.<br>१) उदा. △/□/○ अशा विविध आकारांतून सारखे आकार शोधून, सोप्या आकृत्या तयार करतो. जसे. फुलपाखरू, सूर्य. | विविध आकार | (१) गटकार्य |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | आकार आणि अवकाशीय समज | आकारांचे वर्गीकरण | • आकार, रंग आणि स्थान यांवर आधारित दिलेल्या साध्या सूचनांचे पालन करून, वस्तू जागेवर ठेवतो. उदा. लाल फुगा इकडे आण आणि गोल चेंडू टेबलावर ठेव. | (१) आत-बाहेर/इथे-तिथे/इकडे-तिकडे/ वर-खाली या संकल्पना खेळ/कृतीतून/ कृतिपत्रिकांतून समजावून घेतात.<br>उदा. तळ्यात-मळ्यात सारख्या खेळातून आत-बाहेर ही संकल्पना समजावून देणे.<br>कृतिपुस्तिकेतील चित्रातून वर खाली संकल्पना/समजावून देणे. उदा. टेबलवर असलेला चेंडू लाल रंगाने रंगव व खाली असलेला चेंडू पिवळ्या रंगाने रंगव. उदा. सूचनेनुसार विविध रंगांचे कागद घेऊन पताका तयार करतात. | कृतिपत्रिका<br>विविध आकार<br>फुगे, कागद, चेंडू, कृतिपत्रिका | (१) खेळातून मूल्यमापन<br>(२) कृतीद्वारे निरीक्षण |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आकार आणि अवकाशीय समज | आकारांचे वर्गीकरण | • भिन्न माप आणि रंग यांच्या आधारे, आकारांच्या जोड्या लावतो. | (१) भिन्न प्रकारच्या आकारमानातील समान आकार समजावून घेतो. विविध कृती/खेळ यासाठी त्याचा उपयोग करतो.<br>१) उदा. लहान-मोठ्या आकारावर डाळी लावणे. सुतळी लावून बोट फिरवणे अशा कृती घेणे.<br>२) परिसरात फेरफटका मारून, एकाच झाडाच्या दोन लहान-मोठ्या पानांच्या सहसंबंधाचे निरीक्षण करण्याची संधी देणे. | डाळी, गोंद, पाने | (१) कृतीद्वारे निरीक्षण |
| | आकार आणि अवकाशीय समज | वर्गीकरण | • दोन गुणधर्मानुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो.<br>उदा. आकार व रंग, रंग व माप | (१) भिन्न भिन्न आकाराच्या-आकारमानाच्या/ रंगांच्या/कागदी आकृत्या/Foam चे आकार/मणी यांचे प्रथम एका घटकानुसार वर्गीकरण करतो. वर्गीकरण केलेल्या गटाचे, परत दुसऱ्या घटकानुसार वर्गीकरण करण्यासाठी विविध कृती करण्याची संधी देणे.<br> | मणी, आकृत्या, कागदी तुकडे | (१) कृतीद्वारे निरीक्षण |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आकार आणि अवकाशीय समज | घरंगळणे, घसरणे | • विविध घनाकृती/ आकार यांच्या भौतिक वैशिष्ट्यांचे, त्यांच्या स्वत:च्या भाषेत वर्णन करतात. | (१) 'चल रे भोपळ्या टुणूक टुणूक', गोष्ट सांगतात आणि प्रत्यक्ष घरंगळण्याची कृती करत चल रे भोपळ्याची नाटिका सादर करतात.<br>(२) जाड पुठ्ठ्याच्या साहाय्याने घसरगुंडी स्लाइडर तयार करून, त्यावरून विविध | व्हिडिओ, दृक्श्राव्य, साधने, पुठ्ठे, चेंडू | (१) कृतीद्वारे निरीक्षण |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | उदा. चेंडू घरंगळते आणि त्याला कोपरे नसतात. खोके घसरते आणि त्याला कोपरे असतात. | त्रिमितीय आकृत्या घरंगळणे–घसरणे याचा अनुभव देतात. स्वत:च्या भाषेत का घरंगळली–घसरली हे सांगतात. | | (१) प्रत्यक्ष कृती, निरीक्षण कृतिपत्रिका |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आकार आणि अवकाशीय समज | स्थितीदर्शक/ स्थानदर्शक शब्दसंपदा व वापर | • स्थितीदर्शक शब्द समजून, आकृतिबंध तयार करण्यासाठी आकार, रंग, स्थान यांचा वापर करून, टप्प्याटप्प्याने दिलेल्या सूचनांचे पालन करतो; जसे की ठिपक्यांची रांगोळी काढणे, कोलाज बनवणे, त्यासाठी मध्यभागी, वर, खाली हे स्थानदर्शक शब्द समजून घेतो. | (१) स्थिती व स्थानदर्शक शब्द, विविध आकार, रंग यांचा वापर करून, सूचनांच्या मदतीने चित्र काढणे/रंगवणे/रांगोळी काढणे/वर्गखोली सजवणे अशा कृती करण्याची संधी निर्माण करणे. उदा. मध्यभागी, वर–खाली अशा स्थानदर्शक शब्दांचा वापर करून माळ तयार करणे/कोलाज काम करणे. उदा. विविध चौकोनी रूमालांच्या विविध आकारांच्या घडी घालण्यास सांगणे. | रांगोळी, विविध आकार | (१) कृतीद्वारे निरीक्षण |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | आकार | आकार आणि अभिमुखता | • भिन्न आकारमान आणि अभिमुखता (orientation) असलेल्या | (१) प्रत्येक आकारासाठी विशिष्ट रंग द्यावा आणि भिन्न आकारमान व अभिमुखता असलेल्या आकारामध्ये त्या आकारासाठी ठरवलेला रंग द्यावा. | विविध आकार असलेल्या कृतिपत्रिका | |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | आकारांच्या जोड्या लावतो. (उदा. भिन्न अभिमुखता/दिशा दर्शविणारे त्रिकोण आणि माप) | (२) एकाच आकारासाठी असलेल्या भिन्न आकारमान आणि अभिमुखता यांचा सहसंबंध समजेल अशा कृतीतून संधी निर्माण करणे.  | गणितपेटी साहित्य | (१) कृतिपत्रिका |
| | | तुलना व वर्गीकरण | • तीन गुणधर्मानुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. (उदा. आकार, माप, रंग) | (१) भिन्न भिन्न आकार, आकारमान, रंगांच्या कागदी आकृत्या/Foam चे आकार/मणी यांचे प्रथम एका घटकानुसार वर्गीकरण करतो. वर्गीकरण केलेल्या गटाचे, परत दुसऱ्या निकष घटकानुसार वर्गीकरण, तयार झालेल्या उपगटाचे परत एकदा तिसऱ्या निकष घटकानुसार वर्गीकरण करण्याची संधी देणे.   | मणी, फोमचे आकार, कागदी आकृत्या | (१) कृती, प्रात्यक्षिक, निरीक्षण |
| | | स्थानदर्शक व स्थितीदर्शक संकल्पनांचा वापर | • वस्तूचे वर्णन करण्यासाठी स्थानदर्शक शब्दांचा वापर करतो. (उदा. वर/खाली, बाजूला, आत, बाहेर.) | (१) टोपले, पाईप/ड्रम यांच्या आत, बाहेर, बाजूला वस्तू ठेवून स्थानदर्शक शब्द वापरण्याची संधी द्यावी. वस्तूंचे स्थान बदलून या सापेक्ष संज्ञा आहेत, हे लक्षात आणून द्यावे. | खेळणी, पाईप ड्रम, टोपले | (१) कृती प्रात्यक्षिक निरीक्षण |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | आकार | आकार, कडा-कोपरे | • विविध घनाकृती वस्तू/आकारांचे, त्यांच्या भौतिक वैशिष्ट्यांचे वर्णन स्वत:च्या भाषेत करतो. उदा. चेंडू घरंगळतो आणि त्याला कोपरे नसतात, खोका घसरतो आणि त्याला कोपरे असतात. | (१) जाड पुठ्ठ्याच्या साहाय्याने घसरगुंडी तयार करून, त्यावरून वेगवेगळ्या घनाकृती आकार ठेवून, त्यांच्या मदतीने घसरणे, घरंगळणे संकल्पना समजण्याची संधी देणे. तक्त्यामध्ये घनाकृतीनुसार कोपऱ्यांची संख्या नोंदण्याची संधी द्यावी.<br>(२) घनाकृतीची अभिमुखता बदलून वरील कृती परत करावी. घरंगळणे-घसरण्यातील बदल नोंदवावा, चर्चा करावी. 'चल रे भोपळ्या टुणूक टुणूक' गोष्ट सांगून भोपळ्याच्या जागी विविध वस्तू ठेवल्या असता होणारी गंमत, यावर चर्चा घडवून आणावी. | वेगवेगळ्या भिंती/वस्तू, चेंडू खोके | (१) कृती प्रात्यक्षिक निरीक्षण |
| | त्रिमितीय आकार | कडा रेखाटन | • त्रिमितीय आकारांच्या पृष्ठांचे सपाट पृष्ठभागावर रेखाटन करून द्विमितीय आकार काढतो व ओळखतो. | (१) भिन्न घनाकृतीची वेगवेगळ्या स्थितीत कागदावर ठेवून, त्याच्या पृष्ठांच्या कडांचे कागदावर रेखाटन करून, तयार होणाऱ्या द्विमितीय आकाराचे निरीक्षण करण्याची संधी देणे. | विविध त्रिमितीय वस्तू | (१) कृती प्रात्यक्षिक निरीक्षण |
| | | | • थोडी अचूकता आणि नियंत्रणासोबत मुक्त हस्ते द्विमितीय आकार काढतो. | (१) विविध द्विमितीय आकार दाखवून, मुक्त हस्ते द्विमितीय आकार काढण्याची संधी देणे. | त्रिकोण चौकोन आयत चित्रे/आकार | (१) कृती प्रात्यक्षिक निरीक्षण |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | अवकाशीय संबोध | | • अवकाशीय संबोध वापरतो व शब्दसंग्रह विकसित करतो आणि त्यांचा उपयोग करतो उदा. वर–खाली, आत–बाहेर, जवळ–दूर, आधी–नंतर | (१) गोष्टचित्र, प्रसंगचित्र देऊन, त्यावर प्रश्नोत्तराच्या स्वरूपात चर्चा घडवून, अवकाशीय संबोधाबाबत शब्दप्रयोग वापरण्याची संधी द्यावी.<br>(२) परिसराच्या संदर्भाने अवकाशीय संबोधाचा प्रात्यक्षिक/कृतीच्या साहाय्याने सराव देणे, शब्दसंग्रह वापरण्याची संधी देणे. | गोष्टींची चित्रे, प्रसंगचित्रे, रंग | (१) कृती तोंडीकाम |
| | | | • आजूबाजूच्या परिसरातून विविध आकार आणि मापांच्या वस्तू गोळा करतो. (उदा. खडे, खोके, चेंडू, शंकू, पाईप) | (१) दर्शवलेल्या आकाराच्या, परिसरात आढळणाऱ्या वस्तूंची नावे सांगण्याचा, चित्रे जमवण्याचा उपक्रम घेणे.<br>(२) सुचवलेल्या आकाराप्रमाणे परिसरातून विविध वस्तू जमा करणे व प्रदर्शन भरवण्याची संधी देणे.<br>(३) दिलेल्या आकारांच्या मदतीने सौंदर्याकृती तयार करणे. | खडे, खोके, शंकू, चेंडू, पाईप | (१) उपक्रम कृती |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | आकार व अवकाशीय संबोध | विविध आकारांची ओळख | • आकार व त्यांच्या इतर निरीक्षणक्षम गुणधर्मांच्या आधारे वस्तू वेगळ्या करतो, वर्गीकरण करतो आणि वर्णन करतो. | (१) विविध रंगांचे, विविध आकार घेऊन, त्यांच्या गुणधर्मांनुसार वर्गीकरण करण्यास सांगावे. (रंगांनुसार, आकारानुसार, मापानुसार)<br>(२) विद्यार्थी केलेल्या वर्गीकरणाचे वर्णन करतो. | भौमितिक आकार, इतर आकार वस्तू, रंग, माप | (१) कृतींचे निरीक्षण, तोंडीकाम |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | | | • विविध घनाकृती आकारांच्या विविध भौतिक वैशिष्ट्यांचे निरीक्षण करतो व स्वतःच्या भाषेत वर्णन करतो. उदा. चेंडू घरंगळतो, खोके घसरते. | (१) जाड पुठ्ठ्याच्या साहाय्याने घसरगुंडी तयार करून त्यावरून वेगवेगळे आकार/ घनाकृती ठेवून, त्यांच्या मदतीने घसरणे/ घरंगळणे यांचा कृतीसह अनुभव घेतो. निरीक्षण करून वर्णन करतो.<br>(२) प्रत्यक्ष वस्तूंच्या आधारे घरंगळेल की घसरेल? चर्चा करणे. | खोके, डबा, पेन्सिल, लाटणे | (१) कृतींचे निरीक्षण तोंडी काम |
| | | | • विशिष्ट गुणधर्मांच्या आधारे आकारांची तुलना करतो. (जसे की; लांबी, क्षेत्रफळ, घनफळ) | (१) दोन किंवा दोनपेक्षा जास्त लांबीच्या क्षेत्रफळाच्या व घनफळाच्या वस्तू देऊन, त्यांची तुलना करण्याची संधी देणे. | पट्ट्या, रूमाल, घनाकृती, वस्तू | (१) कृतींचे निरीक्षण |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | त्रिमितीय आकार | त्रिमितीय आकार व वैशिष्ट्ये | • त्रिमितीय आकार त्यांच्या नावावरून ओळखतो. (उदा. इष्टिकाचिती, घन, शंकू, दंडगोल, गोल) आणि त्यांच्या निरीक्षणक्षम वैशिष्ट्यांच्या आधारे त्यांचे वर्णन करतो. | (१) गटात वेगवेगळ्या त्रिमितीय आकाराच्या वस्तू घ्याव्यात. परिसरात अशा वस्तू कोठे आढळतात हे विचारावे, चर्चा घडवून आणावी.<br>(२) परिसरातील विशिष्ट समूह उदा. स्वयंपाकातील भांडी, खेळाचे साहित्य, वाद्य यांमध्ये त्रिमितीय आकार शोधण्याचे प्रात्यक्षिक कृतिपत्रिकेद्वारे संधी द्यावी.<br>(३) या आकाराला तुम्ही काय म्हणता असे विचारून ते उत्तर स्वीकारावे. | शंकू, दंडगोल, गोल, खेळणी | (१) तोंडीकाम |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | त्रिमितीय आकार | त्रिमितीय आकार कडा, कोपरे, वैशिष्ट्ये | उदा. घनाला ६ पृष्ठभाग असतात. | (४) त्रिमितीयसदृश आकारास, वेगवेगळी नावे आहेत. सोय म्हणून गोल, दंडगोल, घन, शंकू, इष्टिकाचिती नावे आहेत हे लक्षात आणून द्यावे व खेळाच्या माध्यमातून नावांचा सराव घ्यावा.<br>(५) घसरणे, घरंगळणे यांसारख्या शब्दांचा वापर आणि प्रात्यक्षिक यांच्या मदतीने, कडा/ कोपरे, पृष्ठभाग यांच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करण्याची संधी द्यावी. वर्णन तक्त्यात मांडण्यास सांगावे.<br>उदा. गटात विविध त्रिमितीय आकार देऊन, त्याला भेटवस्तू सारखे सजवण्यास सांगावे. ज्या ठिकाणी कडा, कोपरे, पृष्ठभाग आहे, त्या जागी विशिष्ट सजावट करण्यास सांगावी.<br>(६) वैशिष्ट्यांचे वर्णन कोड्याच्या रूपात करून, त्रिमितीय आकार ओळखण्याची संधी द्यावी.<br>उदा. मी कोण : पृष्ठे सहा, कडा बारा आहे मी कोण? घसरगुंडीतून माझी होते पाहा घसरण. | | (१) प्रत्यक्ष कडा, कोपरे मोजणे. |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | द्विमितीय आकार | विविध आकार– चौरस, आयत, त्रिकोण, वर्तुळ, कडा व कोपरे | • द्विमितीय आकार त्यांच्या नावावरून ओळखतो. (उदा. चौरस, आयत, त्रिकोण, वर्तुळ) निरीक्षणक्षम वैशिष्ट्यांच्या आधारे त्यांचे वर्णन करतो. (उदा. पुस्तकाची पाने आयताकृती असून त्याला चार कडा व चार कोपरे असतात.) | (१) विविध आकार दाखवून अशा दिसणाऱ्या वस्तूंची यादी करून, चित्र काढण्यास सांगावे.<br>(२) बोलीभाषेतील आकारांची नावे जाणून घेऊन, आकारांची नावे सांगावीत. उदा. त्रिकोण, चौरस, वर्तुळ, आयत, नावांच्या जोड्या लावणे/खेळ यांद्वारे सराव घ्यावा.<br>(३) आकारांची तुलना, निरीक्षण करून विद्यार्थ्यांना वैशिष्ट्ये लिहिण्यास/शोधण्यास सांगावीत. रूमाल चौरसच का आहे? चौरसाचे कोणते गुणधर्म आहेत याबाबत चर्चा घडवून आणावी. तक्त्यांमध्ये गुणधर्म मांडण्याची संधी द्यावी. पाककृती दिवस – बीट/गाजर, खोबरे, साखर यांच्या साहाय्याने खोबऱ्याच्या वड्या करून विविध आकार बनवावेत. | त्रिकोण, चौकोण, आयताकार वस्तू | (१) तोंडीकाम कृती |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | आकार | सरळ व वक्र रेषा अभिमुखता | • सरळ रेषा आणि वक्र रेषा यांतील फरक ओळखतो. सरळ रेषा वेगवेगळ्या अभिमुखतेने (orientation) काढतो/दाखवतो. उदा. उभी, आडवी, तिरपी.) | (१) परिसरात सरळ रेषा, वक्र रेषा कोठे दिसतात, हे शोधण्याची संधी द्यावी. चित्रामध्ये सरळ व वक्र रेषा शोधण्याची संधी द्यावी.<br>(२) सरळ रेषा, वक्र रेषा काढून त्यावरून चालण्याची संधी द्यावी. दोन्हींमधील फरक शोधण्यास सांगावा.<br>(३) विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारे रेषा काढण्यास सांगाव्यात. त्यांचे वैशिष्ट्यानुसार | कृतिपत्रिका | (१) कृती, तोंडीकाम |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गट करण्यास सांगावे. नंतर गटाचे निरीक्षण करून, उभ्या रेषा, तिरप्या रेषा, आडव्या रेषा या संकल्पना सांगाव्यात.<br>(४) कागदाची घडी/दोरा यातून बनणारी उभी–आडवी रेष याची गंमत सांगावी.<br>(५) सरळ रेषा, वक्र रेषा यातून नक्षी तयार करण्यास सांगावी. | कागद, दोरा | (२) प्रत्यक्ष कृती व निरीक्षण |
| | | | • त्रिमितीय वस्तूंच्या साहाय्याने (tracing) द्विमितीय आकृत्या काढतो. | (१) एखादी त्रिमितीय वस्तू तयार होण्यापूर्वी, तिचे द्विमितीय चित्र तयार करावे लागते. ग्राफिक डिझायनर मुलाखत/3D, 2D रेखाटनाची चित्रफीत दाखवावी. उदा. कारचे 2D रेखाटन.<br>(२) चित्रकलेच्या शिक्षकांच्या मदतीने, त्रिमितीय वस्तू विविध प्रकारे ठेवून, त्याचे रेखाटन व रंगवण्याची संधी द्यावी.<br>(३) स्वत:च्या शाळेच्या नकाशाचे निरीक्षण करतो. | त्रिमितीय वस्तू, व्हिडिओ चित्रे | (१) कृती उपक्रम |
| | | | • वस्तूंच्या सावलीचे निरीक्षण करून वस्तू ओळखतो. | (१) वस्तूंच्या सावलीची गोष्ट सांगावी/सावलीचे बाहुली नाट्य वर्गात करून घ्यावे.<br>(२) विविध 3D, 2D वस्तू घ्याव्यात. विविध बाजूने प्रकाश टाकून, त्यांच्या सावलीतील फरक शोधण्यास सांगावा. | विविध वस्तू | (१) सावलीवरून वस्तूचा अंदाज करतो का पडताळावे. |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (३) 3D वस्तूंचे सावलीसह रेखाटन करावे/ वस्तूंच्या सावलीचे निरीक्षण करून, ती वस्तू ओळखण्यास सांगावे.<br>(४) हाताने तयार होणाऱ्या सावल्यांचे खेळ दाखवावे/संगीत आणि सावल्यांचा खेळ दाखववा.<br>(५) चंद्रग्रहणातील सावलीचा संबंध चित्रपटाद्वारे दाखवणे. | | |

**विकास क्षेत्र :** बोधात्मक

**अभ्यासक्रमाचे ध्येय** : बालके राशी, आकार व मापन यांच्या मदतीने, गणितीय आकलन आणि क्षमता विकसित करतात व त्याद्वारे सभोवतालचे जग समजून घेतात.

**अध्ययन क्षमता :** C 8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधने व एकके निवडतो.

**अध्ययन क्षेत्र/घटक :** मापन

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | **मापन** | लांबीचे मापन | • कविता आणि गोष्टीद्वारे लांबी व्यक्त करण्यासाठी, शब्दसंग्रह वापरतो. (उदा. लांबी, रुंदी, उंची अंतर) | (१) परिसरातील बागेस क्षेत्रभेट देऊन, बागेतील वनस्पती, खेळणी, पाने, फुले यांच्या लांबी, रुंदी, उंची व अंतरासाठी विविध शब्द प्रयोग करतो.<br>उदा. • **नारळाचे झाड उंच आहे.**<br>• **हाताचे मधले बोट सर्वात लांब आहे.**<br>• **आंब्याचे खोड जाड आहे.**<br>• **विहिरीची रुंदी जास्त आहे.**<br>(२) लांबी, रुंदी, उंची, अंतर हे शब्द आलेल्या विविध कथा सांगणे व कृतियुक्त गीते, कविता सादर करण्याची संधी देणे. | विविध कथा कविता संग्रह | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (३) बालकांच्या नावांची लांबी किती आहे यावरुन कोणाचे नाव लांब याचा खेळ घेणे.<br>(४) वर्गातील बालके रांगेत जाताना, काही विशिष्ट अंतर ठेवण्याची कृती घेणे. | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मापन | लांबीचे मापन | • लांबीच्या संदर्भात दोन वस्तूंची तुलना करतो. पेक्षा लहान, पेक्षा उंच, पेक्षा आखूड | (१) बालकांनी स्वत:च्या संदर्भात वस्तूंची उंची, लांबी, जाडी, यांची तुलना करावी.<br>जसे – • माझ्या हातापेक्षा पायांची लांबी जास्त आहे. • माझ्या पोटापेक्षा हातांची जाडी कमी आहे. • माझ्या हाताच्या बोटांची लांबी, पायाच्या बोटांच्या लांबी पेक्षा जास्त आहे.<br>(२) बालकांची भिंतीवर उंची मोजून नोंदवण्यास सांगणे व दोन बालकांच्या उंचीची तुलना करण्यास सांगणे.<br>(३) बालकांना स्वत:च्या जागेपासून विविध ठिकाणचे अंतर जाणून घेण्यासाठी, जाण्यास सांगणे व अंतरांची तुलना करण्याची संधी देणे.<br>जसे, माझ्या बाकापासुन इ. पहिलीच्या वर्गाचे अंतर दुसरीच्या वर्गापेक्षा कमी आहे.<br>(४) परीसरातील बागेस क्षेत्रभेट देऊन, वनस्पती, प्राणी, पाने, फुले यांच्या लांबी, रुंदी, जाडी व अंतर ओळखून, तुलना करण्याची संधी देणे. | बागेतील विविध खेळणी | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | मापन | लांबीचे मापन | • लांबीच्या संदर्भात तीन वस्तूंची तुलना करतो. (सर्वांत लांब / सर्वात लहान, सर्वात उंच / सर्वात आखूड) | (१) वर्गातील बालकांच्या उंचीचे निरीक्षण करण्यास सांगून, सर्वांत उंच बालकाचे नाव ओळखण्याची संधी देणे.<br>(२) बालकांना परिसरातील / गणित पेटीतील विविध लांबी, जाडी, उंचीच्या ३ वस्तू देणे व सर्वात लांब, सर्वात जाड, सर्वात उंच वस्तू ओळखण्याची संधी देणे.<br>(३) विविध लांबीच्या / जाडीच्या आकृत्या देऊन, सर्वात लांब, सर्वांत जाड आकृती रंगवण्याची कृती घेणे.<br>(४) विविध खेळांतून सर्वांत लांब, सर्वांत उंच, कृती घेणे. जसे की, सर्वांत उंच उडी, सर्वांत लांब उडी. | गणित पेटीतील साहित्य<br><br>विविध आकाराची चित्रे खेळाचे साहित्य | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे<br><br>(२) कृतीच्या निरीक्षणाद्वारे ओळखण्याची संधी देणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | मापन | लांबीचे मापन | • जवळ–दूर–बारीक/पातळ–जाड, आखूड–लांब, उंच–बुटका, जास्त–कमी यांतील फरक ओळखतो. | (१) चित्र वर्णनातून/चित्ररूप गोष्टीतून जवळ दूर, पातळ–जाड, आखूड–लांब, वर–खाली यांतील फरक ओळखण्याची संधी देणे.<br>(२) परिसरातील/वर्गातील विविध वस्तूंचे निरीक्षण करुन जवळ–दूर, बारीक/पातळ – जाड, आखूड–लांब, वर–खाली अशा संदर्भाने वस्तूंचे स्थान/आकार ओळखणे व सांगणे याची संधी देणे. | चित्रवर्णना–साठी चित्र<br><br>परीसर / वर्गातील वस्तू | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे<br><br>(१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | मापन | लांबीचे मापन | • असमान (अप्रमाणित) एककांच्या साहाय्याने छोटी लांबी मोजतो. (उदा. खेळाच्या संदर्भात उदा. विटीदांडू, गोट्या) | (१) बालकांनी स्वत:चे हात, वीत पावले यांच्या मदतीने परिसरातील/वर्गातील विविध वस्तूंची लांबी, उंची, अंतर मोजण्याची संधी देणे. जसे– टेबलाची रुंदी वितीने मोजणे.<br>(२) विविध खेळांच्या माध्यमातून अप्रमाणित एककांच्या मदतीने अंतर / लांबी मोजण्याची संधी देणे. जसे – (१) खो–खो खेळताना दोन मुलांमधील अंतर किती पावले आहे मोजणे. (२) स्टिक पझलमध्ये स्टिकच्या साहाय्याने अंतर मोजणे. (३) विटीदांडूच्या खेळातील विटी पडलेल्या ठिकाणचे अंतर दांडूने मोजणे इ. (४) काठी, दोरी, पेन्सिल, पाईप यांच्या मदतीने वर्गाची लांबी, मैदानावरील अंतर मोजणे. | विविध वस्तू<br>गोट्या, विटीदांडू, काठी, दोरी, पेन्सिल | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| इ.१ ली (६ ते ७ वर्षे) | | | • कमी अंतराचा व लांबीचा असमान व अप्रमाणित एककांच्या साहाय्याने अंदाज बांधतो व पडताळा घेतो. उदा. वीत, कोपरापासून पुढचा हात, पाऊल, बोटे | (१) बालकांना स्वत:च्या हाताची बोटे, वीत, हात, पाऊल यांसारख्या अप्रमाणित लांबीच्या एककाने मापन करून, परिसरातील वस्तूंच्या लांबीबाबत, व अंतराबाबत अंदाज बांधण्याची व पडताळा घेण्याची संधी देणे. जसे – वर्गातील फलकाची लांबी ७ वीत असेल, असा अंदाज बांधून प्रत्यक्ष वितीने मोजून पडताळा घेणे.<br>(२) हत्तीला व मांजराला एखादे विशिष्ट अंतर पार करावयाचे झाल्यास कोणत्या प्राण्याला कमी पावले लागतील व का कमी लागतील याबाबत अंदाज बांधण्याची संधी देणे. | मापनविषयक साधने (अप्रमाणित) | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | मापन | लांबीचे मापन | • समान (अप्रमाणित) एककाच्या साहाय्याने लहान आणि लांब मार्गावरील लांबी आणि अंतर मोजतो.<br>• पेन्सिल, काडी, कप, बादली, चमचा यांसारख्या समान अप्रमाणित एककांचा वापर करून, धारकता, लांबी, अंतर यांबाबत अंदाज आणि मापन करतो. | (१) बालकांना दोन ठिकाणांमधील अंतर विविध अप्रमाणित एककांच्या मदतीने मोजण्याची संधी देणे. जसे – शाळेच्या मैदानाचे वर्गापासूनचे अंतर काठीने मोजणे.<br>(२) अप्रमाणित एककांची लांबी बदलल्यास, अंतर मोजताना काय फरक पडू शकतो याबाबत अंदाज करण्याची संधी देणे. | विविध अप्रमाणित एककासाठी वस्तू<br>विविध वस्तू, गणित पेटीतील साहित्य | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | मापन | वजनाचे मापन | • कविता आणि गोष्टीद्वारे, वजन संकल्पना व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो. | (१) वजन या संकल्पनेवर आधारित, विविध कविता व कथा कृतींमधून वजन संकल्पनेचा अनुभव देणे.<br>(२) विविध वस्तू हाताळण्याची संधी देऊन, वजन संदर्भात हलका जड असे शब्दप्रयोग वापरण्याची संधी देणे. जसे – पुस्तक वजनाने हलके आहे, टेबल जड आहे इ. | विविध कथा कविता प्रसंग चित्रे | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मापन | वजनाचे मापन | • वजनाच्या संदर्भात दोन वस्तूंची तुलना करतो<br>जसे : च्यापेक्षा जड/ च्यापेक्षा हलका. | (१) बालकांना दोन भिन्न वजनाच्या वस्तू देऊन, त्यांच्या वजनाचा अनुभव देणे, तुलना करण्याची संधी देणे.<br>जसे – भोपळ्याचे वजन वांग्याच्या वजनापेक्षा जास्त आहे.<br>खडूचे वजन चेंडूच्या वजनापेक्षा कमी आहे. | विविध वस्तू | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | मापन | वजनाचे मापन | • वजनाच्या संदर्भात तीन वस्तूंची तुलना करतो.<br>(सर्वांत जड, सर्वांत हलक्या) | (१) बालकांना परिसरातील, गणित पेटीतील विविध वजनाच्या ३ वस्तू देणे व त्यांची वजनासंदर्भात तुलना करण्यास सांगून, सर्वांत जड, सर्वात हलकी वस्तू ओळखण्याची संधी देणे. | विविध वस्तू | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | मापन | वजनाचे मापन | • तुलना करून, हलक्या ते जड वस्तू किंवा उलट क्रमाने क्रमवारी लावतो. | (१) बालकांना विविध वजनाच्या वस्तू देऊन, त्यांची तुलना करण्यास सांगणे, तसेच त्यांची सर्वात हलकी ते सर्वात जड अथवा उलट क्रमाने, क्रमवारी लावण्यास सांगणे. जसे – पुस्तक, पेन, दप्तर, यांची पेन, पुस्तक, दप्तर अशी क्रमवारी लावणे. | विविध वस्तू | (१) प्रात्यक्षिक कृती |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | **मापन** | वजनाचे मापन | • साधा वजनकाटा वापरण्याची गरज ओळखतो.<br>• साधा वजनकाटा वापरून, दिलेल्या वस्तूंच्या वजनांची तुलना करतो. | (१) विद्यार्थ्यांना विविध वस्तू वापरून, स्वत:चा साधा तराजू तयार करण्याची संधी देणे.<br>(२) दोन वस्तूंच्या वजनाची तुलना निरीक्षणाने करता येणे अथवा अंदाज बांधणे शक्य नसल्यास, साध्या तराजूने जड, हलका अशी तुलना करण्याची संधी देणे. | विविध वस्तू<br>साधा तराजू | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (३) साधा वजन काटा वापरून दैनंदिन व्यवहारातील परिसरातील विविध वस्तूंचे वजन करून वस्तूंची तुलना करण्याची संधी देणे. | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आकारमान | आकारमानाचे मापन | • कविता आणि गोष्टींद्वारे आकारमान व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो | (१) आकारमान या संकल्पनेवर आधारीत विविध कथा कविता कृतीमुक्त गाणी याद्वारे आकारमान संकल्पनेचा अनुभव देणे.<br>(२) विविध वस्तू हाताळण्याची संधी देऊन आकारमाना संदर्भात शब्दप्रयोग वापरण्याची संधी देणे. जसे – (१) तांब्यात पाणी भरले आहे. (२) डबा लाडूने भरला आहे. | विविध वस्तू | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| (५ ते ६ वर्षे) | मापन | आकारमानाचे / धारकतेचे मापन | • दोन भांड्यांच्या आकारमानाची तुलना करतो. जसे : बाटल्या, पेले, बादली | (१) विद्यार्थ्यांना वेगवेगळे आकारमान असलेली २ भांडी देऊन त्याची धारकता किती आहे याची त्यात प्रत्यक्ष द्रव / स्थायू पदार्थ भरुन तुलना करण्याची संधी देणे. जसे :<br>१) पेल्यामध्ये तांब्यापेक्षा कमी पाणी मावते.<br>२) बादलीपेक्षा पिंपामध्ये जास्त पाणी मावते. | विविध भांडी / डबे, धारकतेच्या वस्तू | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| (६ ते ७ वर्षे) | मापन | आकारमानाचे / धारकतेचे मापन | • कप, चमचा, मग यांसारख्या समान अप्रमाणित एककांच्या साहाय्याने, आकारमानाचा अंदाज करतो व मोजतो. | (१) बालकांना विविध अप्रमाणित एकके देऊन वस्तूच्या आकारामानांची / धारकतेची तुलना करण्याची व अंदाज करण्याची संधी देणे.<br>जसे : एका बादलीत किती मग पाणी मावेल ? | धारकतेच्या आकारमा–नाच्या विविध अप्रमाणित एकके / वस्तू | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |

| स्तर/ वयोगट | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| (७ ते ८ वर्षे) | **मापन** | आकारमानाचे/ धारकतेचे मापन | • भांड्यांची त्यांच्या आकारमानानुसार क्रमवारी लावतो आणि पडताळा घेतो किंवा प्रत्यक्ष भरून रिकामे करून पडताळा घेतो. | (१) एकच अप्रमाणित एकक वापरून, भिन्न भिन्न भांड्यांची/डब्यांची धारकता, आकारमान मोजणे. व धारकतेनुसार/आकारमानानुसार वस्तूंचा क्रम लावण्याची संधी देणे.<br>(२) भिन्न भिन्न आकारमानांच्या वस्तूंची क्रमवारी, अंदाज बांधणे व पडताळा घेणे याची संधी देणे. | विविध वस्तू | (१) कृतीच्या निरीक्षणाद्वारे |
| **विकास क्षेत्र :** बोधात्मक<br>**अभ्यासक्रमाचे ध्येय :** बालके आकार व मोजमापे यांचे गणितीय आकलन आणि सभोवतालचे जग समजून घेण्याची क्षमता विकसित करतात.<br>**अध्ययन क्षमता :** C 8.10 मिनिटे, तास, दिवस, आठवडे आणि महिने यांमध्ये काळाचे साधे मापन करतो.<br>**अध्ययन क्षेत्र :** मापन | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | कालमापन | आज, उद्या, काल | • दैनंदिन जीवनात आज, उद्या आणि काल या शब्दांचा वापर करतो. | (१) दैनंदिन प्रसंगांच्या संदर्भाने, घटना, कथा, कविता यांच्या मदतीने आज/काल/उद्या या शब्दांकडे लक्ष वेधणे.<br>(२) विद्यार्थ्यांच्या स्वानुभवाशी काल/आज/उद्या यांच्याशी संबंध जोडणे.<br>(३) विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आज/काल/उद्या या शब्दांच्या वापराची संधी देणे.<br>मी काल ⟶ गावाला गेले.<br>मी आज ⟶ शाळेत आलो.<br>मी उद्या ⟶ बाजारात जाणार.<br>(४) डिसप्लेबोर्डवर तारीख, वार, महिना, हवामान दाखवा. आज/काल/उद्या या संदर्भाने रोज प्रश्न विचारावेत. | कथा, घटना, कवितेचे चार्ट्स | (१) आज, काल, उद्या यांचा वापर दैनंदिन संभाषणामध्ये योग्य प्रकारे करतो का, ते पाहणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | कालमापन | वार आणि विशेष वार/दिन | • विशेष दिवस ओळखतो. जसे – शनिवार, रविवार सुट्टीचा दिवस (उदा. रविवारी सुट्टी आहे.) | (१) दैनंदिन दिनचर्येतून आधी, नंतरचा घटनाक्रम विचारणे. चित्रकार्डांचा वापर, चर्चा. (२ घटना)<br>(२) आधी/नंतरचा वार सांगणे. बडबडगीते, गाणे साभिनय करण्याची संधी द्यावी.<br>(३) साप्ताहिक सुट्टी/बाजाराचा दिवस/ वार अशी दिवसांची वैशिष्ट्ये आणि दिवस सांगतो. | वारांची गाडी, तक्ता इ.<br>दिनदर्शिका | (१) काल, आज, उद्याचा वार योग्य पद्धतीने सांगण्यासाठी चर्चा करणे.<br>विशेष दिवस, सुट्टीचे दिवस सांगण्यासाठी चर्चा करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | कालमापन | आठवड्यातील वार, वर्षातील महिन्यांची नावे | • आठवड्यातील वार आणि वर्षातील महिन्यांची नावे ओळखतो. | (१) आठवड्यातील वारांची नावे गाणी/गोष्टी क्रमाने सांगणे.<br>(२) सुचवलेल्या वाराच्या लगतच्या पुढील/मागील वाराचे नाव सांगण्याची संधी देणे.<br>(३) दिवसाचे महत्त्व/वैशिष्ट्य आणि वार ओळखणे. जसे : १) गावात/गावाशेजारी आठवडी बाजाराचा दिवस<br>(४) महिन्यांची नावे ओळखणे. महिना, आधीचा/ नंतरचा आणि घटना यांचा संबंध जोडणे.<br>• शाळा सुरू होण्याचा महिना<br>• वाढदिवसाचा महिना.<br>• विशिष्ट सण/उत्सव असणारा महिना असे संबंध दर्शवत चर्चा घडवून आणणे. महिन्यांची नावे क्रमाने/मागचा, पुढचा महिना सांगणे.<br>(५) विद्यार्थ्यांना घड्याळ बनवण्याची संधी द्यावी. | महिन्यांची नावे असलेला तक्ता<br>दिनदर्शिका<br>जानेवारी ते डिसेंबर | (१) दिनदर्शिके–च्या साहाय्याने महिन्यांची नावे क्रमाने विचारावी. विशिष्ट सण/उत्सव असलेला महिना विचारणे. |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | कालमापन | आधी/नंतर/ घटना/प्रसंग/ कृतींचा क्रम | • आधी आणि नंतर यांसारख्या शब्दांचा वापर करून, वेळेवर घडणाऱ्या घटनांमध्ये फरक करतो. | (१) दोन/पाच घटना सांगाव्यात. आधीची घटना/नंतरची घटना कोणती, अशी चर्चा घडवावी. जसे (कळी व फूल) (ब्रश करणे, जेवणे, झोपणे इ.) (सकाळ–दुपार–संध्याकाळ–रात्र) सूर्याचे निरीक्षण करणे.<br>(२) विद्यार्थ्यांचा स्वानुभवाशी संबंध जोडणे.<br>(३) विद्यार्थ्यांनी आधी, नंतर यांसारख्या शब्दांचा वापर करत, स्वत: अनुभवलेल्या घटना सांगण्याचा अनुभव देणे. जसे : आधी हातपाय धुतले. नंतर जेवण केले. | घटना/प्रसंग चित्रे यांचा तक्ता | (१) आधी/ नंतर यावर आधारित चित्रे दाखवून घटनांचा क्रम ओळखण्यास सांगणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | कालमापन | कमी/अधिक कालावधी | • सुट्टीचा आणि शाळेचा कालावधी यांतील कमी आणि अधिक कालावधीची गुणात्मक अनुभूती घेतो. | (१) विद्यार्थ्यांना घड्याळ बनवण्याची संधी द्यावी. विद्यार्थी दैनंदिन जीवनात अनुभवत असलेल्या घटनांसाठी लागणारा कमी–अधिक कालावधी, यांबाबत चर्चा घडवून आणणे.<br>जसे : भाकरी लवकर होते की पोळी? गाईचे पोट लवकर भरते की शेळीचे? एकाच प्रकारच्या पाईपने पिंप भरण्यास जास्त वेळ लागेल की घागर भरण्यास?<br>(२) विद्यार्थ्यांना लवकर–उशीर/कमी–अधिक वेळ, असा घटना संबंधाने अंदाज व्यक्त करण्याची व केलेला अंदाज पडताळण्याची संधी देणे. | वेळ, वस्तू<br>डिस्प्ले बोर्ड,वार, महिना, | (१) आनंददायी व कंटाळवाणा कालावधी यांची तुलना |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | | | | (३) रविवारची/उन्हाळी/दिवाळी सुट्टी व शाळेचा कालावधी यात कमी/जास्त यांविषयी चर्चा करून, अनुभव देणे.<br>(४) दिनदर्शिकेवर/डिस्प्लेबोर्डवर चर्चा करणे. | हवामान तक्ता, दिनदर्शिका | |
| | | | • दिवसातील घटना/प्रसंग यांचा क्रम लावतो. | (१) विद्यार्थ्यांना त्यांनी दिवसभरात केलेल्या कृती विचारणे. सांगितलेल्या कृतींचा क्रम लावण्यास सांगणे. (४–५ घटना)<br>(२) काही घटना/प्रसंग/गोष्ट सांगणे. त्यातील घटनांचा क्रम त्यांच्या शब्दात व्यक्त करण्याची संधी देणे. | चित्रे तक्ता | (१) दिनचर्येतील घटनाक्रम विचारणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | कालमापन | ऋतू – उन्हाळा, पावसाळा, हिवाळा | • क्रमाने येणाऱ्या ऋतूंची अनुभूती घेतो (स्थानिक विविधता लक्षात घेऊन) | (१) ऋतू आणि ऋतूंची वैशिष्ट्ये या संबंधाने चर्चा घडवून आणणे; जसे उन्हाळ्यातील/पावसाळा/हिवाळा परिस्थितीचे वर्णन ऐकवणे व ऋतू ओळखणे.<br>(२) विद्यार्थी ऋतूचे वर्णन स्वत:च्या शब्दात करतो. कपडे/खाणे यांमध्ये होणारे बदल समजून घेण्याची संधी देणे. उदा. ऋतूनिहाय वस्तू, कपडे गोळा करणे. | स्वेटर, रेनकोट, छत्री, गॉगल | (१) वर्णनांद्वारे ऋतू ओळखण्यास सांगणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | कालमापन | प्रमाणित एकके (दिवस व तास) | • दिवस व तास या प्रमाणित एककांच्या आधारे, वेळेचे मापन करतो उदा. आठवड्यात ७ दिवस, आणि दिवसाचे २४ तास | (१) दोन घटनांच्या वारांच्या संबंधाने कालावधी विचारणे. उदा. दिनचर्या पुस्तिका/महिन्याची दिनदर्शिका तयार करतो, सोमवारपासून बुधवारपर्यंत काम केले. किती दिवस काम झाले? | वारांचे तक्ते | (१) दोन घटना सांगून त्यातील तास मोजण्यास सांगणे. दोन वारांमधील दिवस |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (२) दोन घटनांमधील कालावधीस किती तास झाले हे सांगण्याची संधी देणे. उदा. नळाला पाणी सकाळी सात वाजता आले आणि सकाळी ११ वाजता गेले तर किती तास नळाला पाणी होते? <br> (३) सकाळी एका ठरवलेल्या वेळेपासून, दुसऱ्या दिवशी त्याच वेळेपर्यंत २४ तास लागतात; म्हणजे एक दिवस लागतो हे लक्षात आणून देणे. <br> (४) सकाळ/दुपार, संध्याकाळ/रात्र सूर्य, चंद्राच्या स्थितीचे चित्र काढण्याची संधी देणे. | | मोजण्यास सांगणे. |
| **विकास क्षेत्र :** बोधात्मक <br> **अभ्यासक्रमाचे ध्येय :** बालके आकार व मोजमापे यांचे गणितीय आकलन आणि सभोवतालचे जग समजून घेण्याची क्षमता विकसित करतात. <br> **अध्ययन क्षमता :** C 8.11 - १०० रुपयांपर्यंतचे साधे व्यवहार करतो. <br> **अध्ययन क्षेत्र :** मापन | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | नाणी, नोटा | भारतीय नाणी, नोटा (शब्दसंपत्ती या अर्थाने) तोंडओळख <br> पैसे, रुपये हा संबोध समजणे. | • कविता आणि गोष्टींच्या आधारे पैशाशी संबंधित शब्दसंग्रहाचा वापर करतो. | (१) घटना, प्रसंग ज्यात रुपये, पैसे यांचा संदर्भ आहे, अशा गोष्टी, कविता ऐकवणे. <br> (२) पैसे, रुपये यांच्याशी निगडित, त्यांचे अनुभव सांगण्याची संधी देणे. <br> (३) शक्यतो तोंडओळखी–साठी खऱ्या नोटा व नाणी शिक्षकांनी दाखवाव्यात. | गणित पेटीतील, खेळातील नाणी, नोटा | (१) नाणी, नोटा ओळखण्या–साठी बालकांसमोर ठेवणे. (या गटासाठी संख्यानामे १ ते ५ पर्यंत असल्यामुळे गाणी/गोष्टी |


| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वा प्रत्यक्ष नाणी ही या संख्येपर्यंत मर्यादित असावीत. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | | सहज उपलब्ध १ ते १० पर्यंतची नाणी, नाण्यांची तोंडओळख | • भारतीय चलनातील नाणी ओळखतो. | (१) मुलांनी पाहिलेली नाणी तक्त्यामध्ये दाखवून ओळखण्यास सांगून बोलते करणे.<br>(२) दिलेल्या नाणी संचातील १, २, ५ ची नाणी वेगळी करतो. | नाणी, नोटा | (१) विविध नाणी ठेवून ओळखायला लावणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | | १ ते ५०० पर्यंतच्या नोटांची तोंडओळख जसे : ₹ १०, ₹ २०, ₹ ५०, ₹ १००, ₹ २००, ₹ ५०० | • भारतीय चलनातील नोटा ओळखतो. | (१) नाणी-नोटा आणि दैनंदिन व्यवहार यांची सांगड घालत नाणी-नोटांची ओळख करून देणे.<br>(२) कागदाची नाणी-नोटा तयार करून घेणे.<br>(३) 'अभिरूप बाजार' नाणी-नोटांच्या मदतीने खेळ घेणे.<br>(४) सुचवलेली नाणी, नोटा दाखवण्यास सांगणे. | नाणी व नोटा | (१) विविध नोटा ठेवून ओळखायला लावणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | नाणी व नोटांची बेरीज | नाणी व नोटांची २० पर्यंतची बेरीज | • नाणी व नोटा वापरून, रु. २० पर्यंतची रक्कम तयार करतो. | (१) सुचवलेल्या मूल्याची नाणी व नोटा दाखवण्यास सांगणे.<br>(२) रु. २० पर्यंतची रक्कम तयार करताना, ती रक्कम नाणी व नोटा वापरून, विविध प्रकारे तयार करता येते याचा अनुभव देणे.<br>(३) नाणी व नोटा वापरून, रु. २० पर्यंतच्या रकमेची देवाणघेवाण करण्याची संधी देणे.<br>(४) या घटकावरील चित्रयुक्त शाब्दिक उदाहरणे देऊन, सोडवण्याची संधी देतील.<br>(५) उदाहरण निर्मिती करण्याची संधी द्यावी. | खेळातील नाणी व नोटा | (१) नाणी व नोटा दाखवून, त्यांचे मूल्य सांगणे.<br>(२) विविध उदाहरणे सोडवून घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | – | – | • विविध नाणी व नोटा वापरून १०० रु. पर्यंतची रक्कम तयार करतो. | (१) अभिरूप बाजार हा खेळ घेणे.<br>(२) सुचवलेल्या व्यवहारासाठी एवढी नाणी–नोटा आहेत. (कमी–जास्त देऊन) आणखी कोणती नाणी–नोटा लागतील असे प्रश्न विचारणे.<br>(३) अभिरूप बाजार–व्यापार हा खेळ खेळण्याची संधी देणे.<br>(४) या घटकावरील शाब्दिक उदाहरणे सोडविण्याची संधी द्यावी.<br>(५) उदाहरण निर्मिती करण्याची संधी द्यावी. | खेळातील नाणी व नोटा | (१) प्रत्यक्ष अनुभव |
| **विकास क्षेत्र :** बोधात्मक<br>**अभ्यासक्रमाचे ध्येय :** बालके आकार व मोजमापे यांचे गणितीय आकलन आणि सभोवतालचे जग समजून घेण्याची क्षमता विकसित करतात.<br>**अध्ययन क्षमता :** C 8.12 : राशी, आकार, अवकाश आणि मापन यांचे आकलन, संकल्पना व संबंधित प्रक्रिया व्यक्त करण्यासाठी, पुरेशी व योग्य शब्दसंपत्ती विकसित करणे.<br>**अध्ययन क्षेत्र :** गणितीय संप्रेषण | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | नियमित व अनियमित गणितीय संप्रेषण | आकारनामे, व त्यांचे काही गुणधर्म, नियमित व अनियमित भौमितिक आकार, गुणधर्म, अंडाकृती, स्टार, बदाम पतंग, पानाचा आकार, पाण्याचे थेंब | • आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतो. | (१) वर्गातील, घरातील व परिसरातील वस्तू यांतून नियमित व अनियमित भौमितिक आकार संकल्पना स्पष्ट करून सांगणे.<br>(२) बालके आकारांची नावे ओळखतो व त्यांचे गुणधर्म सांगण्याची संधी द्यावी.<br>(३) परिसरात 'आकार शोध' (शेप हंट) खेळ घेणे.<br>(४) अभौमितिक आकार पाहून, त्याबाबत स्वअनुभव सांगण्यास प्रेरणा देणे. | त्रिकोणी, चौकोनी, वर्तुळाकार वस्तू. अभौमितिक आकार | (१) तोंडीकाम, कृती प्रात्यक्षिक |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | गणितीय संप्रेषण | आकारनामे, संख्यानामे सहसंबंध | • संख्यानामे आणि आकारांच्या नावांचा उपयोग करून, साध्या सूचना ऐकतो आणि अर्थ लावतो.<br>• संख्यानामे व आकाराच्या नावांचा योग्य प्रकारे उपयोग करतो. | (१) उपलब्ध खेळ साहित्यातील 'तीन वर्तुळ, दोन त्रिकोण, एक चौकोन दे', 'चार बदाम दे' अशा प्रकारच्या सूचना देणे.<br>(२) बालक सूचनेचा अर्थ समजून, सूचना पालन करतो.<br>(३) बालके गटामध्ये एकमेकांना सूचना देतात व कृती करतात.<br>(४) आकार शोधणे व सापडलेल्या आकारांची संख्या सांगण्यास सांगणे/चर्चा करणे/उदा. स्टार आकार कोठे दिसतो? | परिसरातील विविध वस्तू/गणित पेटीतील साहित्य, अनियमित भौमितिक आकार | (१) तोंडीकाम, कृती, उपक्रम, कृती |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | गणितीय संप्रेषण | आकारनामे, संख्यानामे, संख्येवरील क्रिया, मापन सहसंबंध | • संख्यानामे, आकारनामे आणि मापन, क्रिया यांचा योग्य वापर करतो. | (१) दोन गटातील आकार वेगवेगळे व एकत्र मोजण्यास सांगणे. (दोन ते नऊ बेरीज येईल असे)<br><br>(२) दोन ते नऊच्या गटातून सांगितलेल्या संख्येएवढे आकार काढणे व शिल्लक राहिलेले आकार मोजणे.<br> | गणित पेटीतील विविध वस्तू, आकार | (१) कृती, तोंडीकाम, उपक्रम |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (३) योग्य खाच्यात योग्य आकार ठेवणे. शब्दात व्यक्त करण्याची संधी देणे.  (४) भिन्न भिन्न मापाचे त्रिकोण एकत्र करणे. मापानुसार त्रिकोण वेगवेगळे करणे. कोणते त्रिकोण जास्त कमी तुलना शब्दांत व्यक्त करणे. | | |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गणितीय संप्रेषण | गणितीय भाषेत प्रश्न मांडतो. | • राशी, आकार, अवकाश आणि मापन यांच्याशी संबंधित, गणितीय समस्यांचे वर्णन करण्यासाठी पूर्ण विधाने तयार करतो. | (१) राशी, आकार, अवकाश व मापन या संकल्पनांशी संबंधित गणितीय प्रश्न तयार करण्याचा अनुभव देणे.<br>उदा. एका टोपलीत दहा चेंडू आहेत. त्यातील तीन चेंडू बाहेर ठेवले, तर टोपलीत किती चेंडू राहतील.<br>(२) बालकांकडून गणितीय प्रश्नांचे वर्णन करण्यासाठी विधाने तयार करून घेणे.<br>उदा. आत–बाहेर या संकल्पनेसाठी टोपलीत व टोपलीबाहेर काही वस्तू ठेवणे व गटात एकमेकांना प्रश्न विचारण्यास सांगणे :<br>(३) दिलेले चित्र व शब्दांचा वापर करून गणितीय समस्या लिहिणे. उदा. झाड, फुले, टोकरी, आत, बाहेर यांच्यामधून विधाने तयार करणे. | परिसरातील विविध वस्तू,<br>गणित पेटीतील साहित्य. | (१) कृती, तोंडीकाम, उपक्रम |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | गणितीय संप्रेषण | समस्या निराकरण | • मजकुराचा अर्थ लावून, त्यात समाविष्ट असलेली साधी गणितीय समस्या वेगळी करतो. | (१) दिलेल्या मजकुरातील नेमकी गणिती समस्या ओळखण्याचा अनुभव देणे व सराव घेणे.<br>(२) दिलेल्या शाब्दिक उदाहरणात, नेमकी कोणती क्रिया करायची हे ओळखणे. | गणित | (१) तोंडीकाम, कृती, उपक्रम |
| | गणितीय संप्रेषण | समस्या निराकरण | • साधी गणितीय कोडी व कूट प्रश्न तयार करतो. | (१) गणितीय कोडी व कूटप्रश्नांचा सराव द्यावा. उदा. हत्तीचे चार पाय व वीस नखे, तर हत्तीच्या एका पायाला नखे किती?<br>(२) वरील अनुभवाच्या आधारे बालक साधी गणितीय कोडी व कूटप्रश्न सोडविण्याची व तयार करण्याची संधी द्यावी. | गणित | (१) विविध कोडी व कूटप्रश्नांचा सराव. |
| **अभ्यासक्रमाचे ध्येय :** बालके प्रमाण, आकार व मोजमापे या गणितीय आकलन आणि क्षमतेद्वारे सभोवतालचे जग समजून घेण्याची क्षमता विकसित करतात.<br>**अध्ययन क्षमता :** C 8.13 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे यांच्याशी संबंधित, सोपी गणिते सोडवतो व तयारही करतो.<br>**अध्ययन क्षेत्र :** गणिती संप्रेषण | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | गणितीय कोडी | भौमितिक आकार वर्तुळ, त्रिकोण आणि चौकोन यांवर आधारित कोडी | • भौमितिक व इतर आकारावर आधारित सोपी कोडी सोडवतो. | (१) कोड्यावर आधारित खेळ : ऐका आणि उत्तर द्या. जसे– 'सांगा सांगा, लवकर सांगा', 'एका गोलाकार वस्तूचे नाव सांगा' याप्रमाणे विविध खेळ घ्यावेत.<br>(२) विद्यार्थ्यांना मनोरंजक भाषा वापरून, कोडी तयार करून, प्रश्न विचारावेत. जसे : 'मी आहे गोलाकार, खेळताना वाटते मजा फार, सांगा पाहू मी कोण?'<br>(३) परिसरातील विविध वस्तूंची नावे सांगून त्या कोणत्या आकारात आढळतात ते विचारावे. | परिसरातील गोल, त्रिकोण, चौकोन या आकारांच्या वस्तू, ब्लॉक | (१) तोंडी व प्रात्यक्षिक |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभवाचे स्वरूप | आवश्यक साहित्य | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | | | | जसे : सामोसा, बर्फी, चेंडू, बिस्किटचा पुडा, फळा, वही, गोलाकार फळे इ.<br>(४) दोन–तीन तुकड्यांतील आकाराचे कोडे सोडवण्यास सांगावे.<br>(५) ब्लॉकच्या साहाय्याने बिल्डिंगचे वेगवेगळे डिझाईन करणे.<br>(६) खाचेमध्ये योग्य आकार बसवणे. | परिसरातील गोल, त्रिकोण, चौकोन या आकारांच्या वस्तू, ब्लॉक | (१) तोंडी व प्रात्यक्षिक |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | गणितीय कोडी | भौमितिक आकार तयार करणे, भौमितिक आकारांचा वापर करून इतर परिचित आकृत्या तयार करणे. | • टॅनग्रॅम (Tangram) चा वापर करून विशिष्ट आकृत्यांची रचना करतो. | (१) टॅनग्रॅम (Tangram) चे विविध आकार दाखवून, त्यापासून एखादी आकृती/आकार तयार करून दाखविण्यास सांगावे.<br><br>(२) विद्यार्थ्यांना टॅनग्रॅम हाताळण्याची व त्यातील आकार ओळखण्याची संधी द्यावी.<br>(३) विद्यार्थ्यांना विविध आकार जोडून, नवीन आकार/आकृती तयार करण्याची संधी द्यावी.<br>(४) सुचवल्याप्रमाणे दिलेल्या आकारांपासून, नवीन आकृती/आकार तयार करण्याची संधी देणे.<br>जसे : चांदणी, पक्षी, रोबोट, कार इत्यादी.<br>(५) जिओ बोर्डचा वापर करून, विविध आकार तयार करण्याची संधी देणे. | टॅनग्रॅम (Tangram) | (१) तोंडी, प्रात्यक्षिक |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (६) अर्धवट आकृती पूर्ण करणे.<br>(७) कूट आकृतिबंध पूर्ण करणे. | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | गणितीय कोडी | संख्याज्ञानावरील कोडी व कूट प्रश्न | • साधी कोडी, कूट प्रश्न सोडवण्यासाठी संख्याज्ञानाचा वापर करतो. | (१) विद्यार्थ्यांना कूट प्रश्नांवर आधारित सोपी उदाहरणे सोडवण्याची संधी द्यावी, सुरुवातीला मुलांची उत्तरे घ्यावीत. प्रश्न विचारत योग्य विचार करण्यास प्रवृत्त करावे.<br>१) कूट आकृतिबंध पूर्ण करणे.<br>२) ☐ + ☐ = ८<br>३) १, २, ☆, ४, ५, ⬭, ७, ▽, ९<br>☆ = ___ ⬭ = ___ ▽ = ___<br>४) ४ + ☐ = ९ | | (१) तोंडी, प्रात्यक्षिक |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गणितीय कोडी | कूट प्रश्न/कोडी | • साध्या गणितीय समस्यांच्या स्वरूपात वास्तव जगातील प्रसंग ओळखतो. | (१) व्यवहारातील छोटीशी समस्या सोडवण्यासाठी गणिताचा वापर करून त्याची उकल काढण्याची संधी देणे. मुलांची उत्तरे घ्यावीत. प्रश्न विचारत योग्य विचार करण्यास प्रवृत्त करावे.<br>जसे : चिंटूने मित्राला दोन पेरू दिले व स्वतः दोन पेरू घेतले आणि एक पेरू टोपलीत शिल्लक राहिला, तर टोपलीत सुरुवातीला किती पेरू होते?<br>जसे : तारेवर चार चिमण्या बसल्या होत्या. त्यातील एक चिमणी उडून गेली, तर तारेवरील चिमण्यांच्या पायांची संख्या किती? | कोड्यांची उदाहरणे चित्रे | (१) तोंडी, प्रात्यक्षिक |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जसे : सायलीने व चिंटूने सारखेच पेढे खाल्ले. जर सायलीने ३ पेढे खाल्ले, तर दोघांनी मिळून किती पेढे खाल्ले असतील? | | |
| | | | • विविध कार्यनीतींचा वापर करून, साध्या अंकगणितीय समस्या सोडवतो. | (२) व्यवहारातील एखादी समस्या विविध कार्यनीती वापरून सोडवता येते पण अधिक सोपी कार्यनीती/पद्धती वापरून, समस्या सोडवण्याची संधी देणे. जसे : बाजारातून तीन टरबूज खरेदी केले. अमान आणि त्याच्या छोट्या बहिणीला ते टरबूज घरी न्यायचे आहेत, तर ते कसे नेतील? | | तोंडीकाम |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | गणितीय कोडी | कूट प्रश्न/कोडी | • साध्या गणितीय समस्या सोडवण्याच्या विविध मार्गांची चर्चा करतो.<br><br>• त्रुटी शोधण्यासाठी उत्तरांची पुनर्तपासणी करतो. | (१) व्यवहारातील विविध समस्या दर्शवणारी उदाहरणे देऊन, ती सोडवण्याच्या संभाव्य मार्गांपैकी, अधिक सुकर मार्ग निवडण्याची संधी देणे. मुलांची उत्तरे घ्यावीत. प्रश्न विचारत योग्य विचार करण्यास प्रवृत्त करावे; जसे : दुकानदाराला बारा रुपये द्यायचे आहेत. तुझ्याजवळ एक दहाची व एक पाचची नोट आहे. दुकानदाराजवळ सुट्टे नसल्यास, तू कोणत्या नोटेचे सुट्टे करवून आणशील?<br>(१) दिलेल्या उदाहरणात त्रुटी/चूक आहे की नाही, हे शोधण्याची संधी द्यावी.<br>(२) त्रुटी असणारी उदाहरणे द्यावीत. त्या उदाहरणांतील चूक दुरुस्ती करण्याची संधी द्यावी. मुलांची उत्तरे घ्यावीत. प्रश्न | नाणी, नोटा, मणी, माळा | तोंडीकाम |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विचारत योग्य विचार करण्यास प्रवृत्त करावे.<br>जसे :<br>१) २ + ३ = ४, ५ – २ = ४ यासारखी त्रुटी असणारी तत्सम शाब्दिक उदाहरणे.<br>२) दोन/एक अंकी संख्येची बेरीज २३ येते. | | (१) तोंडी, प्रात्यक्षिक |
| | | | • परिणामांशी निगडित असलेले खेळ आणि कोडी यांत गुंतून राहतो. | (१) अंतिम परिणाम देऊन ते परिणाम येण्यासाठीच्या संभाव्य मार्गांचा शोध घेण्याची संधी देणे. प्रथम स्वतः एक उदाहरण सोडवण्याचे प्रात्यक्षिक देणे. जसे :<br>१) माझ्याजवळ १०० रुपये आहेत, तर माझ्याजवळ किती रुपयांच्या किती नोटा असू शकतील?<br>२) बेरीज ४० येईल, अशी वेगवेगळी उदाहरणे मांडा.<br>३) १० लीटर पाणी मोजण्यासाठी, किती लीटरची मापे किती वेळा वापरावी लागतील?<br>८ येण्यासाठी २ मध्ये किती वेळा २ मिळवावे लागतील?<br>४) हरवलेले शोधा.<br>५) ब्लॉकच्या साहाय्याने उदाहरण तयार करणे. | | (१) खेळ व कोडी सोडविताना चिकित्सक प्रश्न विचारतो का?, कोडे सोडविण्यासाठी नावीन्यपूर्ण मार्ग शोधतो का याचा पडताळा घ्यावा. |

# पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम - २०२४

## (वय वर्षे ३ ते ८)

## विषय : कलाशिक्षण

### प्रस्तावना

मानवाचा सुसंस्कृतपणा हा कलांमुळे विकसित होतो. आपली भारतीय संस्कृती ही कलांच्या बाबतीत खूप समृद्ध आहे. या संस्कृतीची वैशिष्ट्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कलांद्वारे हस्तांतरित होतात. संगीत, गायन, वादन, नृत्य तसेच नाट्य, लेखन, चित्रकला, शिल्पकला या सर्व कलांचा समावेश ललितकलांमध्ये होतो. प्रामुख्याने सौंदर्य, भावना आणि तांत्रिक कौशल्ये ही ललितकलांमध्ये वैशिष्ट्ये मानली जातात. जीवन जगण्यासाठी जसे अन्न व पाणी ही महत्त्वाची गरज असते, तसेच चांगले जीवन जगण्यासाठी एखादी कला अवगत असणे गरजेचे असते. लहानपणापासून भारतातील समृद्ध कलांचे शिक्षण जर बालकांना दिले गेले, तर त्यांना पुढील आयुष्य चांगल्यारीतीने जगण्यासाठी या कलाशिक्षणाचा उपयोग निश्चितपणे होईल. कला ही सर्जनशीलतेचा आविष्कार असते आणि मानवी स्वभावाचे वैशिष्ट्य लक्षात घेता, त्याला सतत काहीतरी नावीन्यपूर्ण करण्याची आवड असते. त्याची ही आवड कलांमुळे सहज पूर्ण होऊ शकते.

कलाशिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन, 'राष्ट्रीय शिक्षण धोरण' (NEP) - २०२० मध्ये वय वर्षे ३ ते ८ वयोगटासाठी, शालेय शिक्षणात कलांचा अंतर्भाव करण्याची खास शिफारस करण्यात आली आहे. तसेही राष्ट्रीय शिक्षण धोरणात (NEP) 'कलेद्वारे शिक्षण' हा महत्त्वाचा मुद्दा आहेच. कला हा विषय बहुस्पर्शी आहे, अर्थात सर्वच विषय आनंददायी रीतीने शिकण्यासाठी कला महत्त्वाच्या ठरतात.

विद्यार्थ्यांच्या सुयोग्य व्यक्तिमत्त्वाचा विकास घडून यावा, यासाठी त्या कलांचे शिक्षण घेणे आवश्यक ठरते, कारण स्वयंशिस्त, आत्मसंतुलन, संवेदनशीलता, राष्ट्रीय एकात्मता, सामूहिक भावना इत्यादी समाजाभिमुख गोष्टी या कलेद्वारे सहजपणे अंगी बाणवता येतात. कला आणि सौंदर्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे सौंदर्य निर्मिती आणि कलांचा रसास्वाद घेण्याची वृत्ती विकसित होते.

सदर अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन, त्यांचे आयुष्य धकाधकीच्या तणावपूर्ण, स्पर्धात्मक युगात कोमेजून न जाता, आनंददायी रीतीने व्यतीत व्हावे हा मूलभूत विचार केला गेला आहे. या पाठ्यक्रमाचा कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक स्तरांतून आलेल्या विद्यार्थ्यांना, एका समपातळीवर आणून उदात्त असा जीवनानुभव देणे हा, उद्देश आहे. कला अध्ययनाशी तादात्म्य पावल्यावर लिंग, जात, धर्म या सर्व गोष्टी विसरून, सामूहिक भावना वाढीला लागते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा

विकास होण्यासाठी, हा पाठ्यक्रम पूरक ठरेल. प्रभावी नेतृत्वगुण, रसग्रहण, सौंदर्यदृष्टी, क्षमता, जबाबदारी, कल्पकता, जागरूकता इत्यादींचा विकास होईल.

हा अभ्यासक्रम राबवताना, विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या परिसरात उपलब्ध असलेल्या साहित्याचा पुरेपूर वापर त्याला करता यावा याचा विचार केला गेलेला आहे. परिसरातील निसर्ग, प्राणी, पक्षी, वस्तू एवढेच नव्हे, तर स्वतःचे शरीर, साहित्य वापरून कलाकृती कशी निर्माण करायची हे त्यांना शिकता येईल. निसर्गातील आवाज, रोजच्या वापरातील वस्तू इत्यादींचा वापर करून, नादमधुर संगीत निर्माण करता येऊ शकते. माती, चिखल, रंग, रांगोळ्या इत्यादींपासून, सुंदर निसर्गाशी जुळलेली नाळ अजून दृढ करता येऊ शकते. मुलांना उन्मुक्त आविष्काराची संधी देऊन, स्वतंत्र विचार कौशल्य वाढीस लागावे हे या नवीन अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट आहे. फक्त नैसर्गिक घटकच नव्हे, तर आजच्या जीवनाचे अत्यावश्यक अंग बनलेल्या तांत्रिक बाबींचासुद्धा योग्य तो समर्पक वापर, हे या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य आहे.

मुले जेव्हा एखाद्या गोष्टीचा आनंद घेतात, तेव्हा ते कोणत्याही दडपणाखाली नसतात; या गोष्टीचा प्रभावी विचार या अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. खेळीमेळीच्या वातावरणात जेव्हा शिकणे आणि शिकवणे होते, तेव्हा अध्ययन, आकलन, सराव, मूल्यमापन या मूलभूत गोष्टी साधल्या जातात. त्याच अनुषंगाने सादरीकरणाच्या कला, म्हणजेच ज्यात गायन, वादन, नृत्य, नाट्य आणि दृश्यकला; ज्यात चित्र आणि शिल्प या कलांचा समावेश नवीन शैक्षणिक धोरणाचा विचार करून, या पाठ्यक्रमात करण्यात आला आहे. बुद्धीची कुशाग्रता ही कलेमुळे विकसित होते. कलेतून शिक्षण, कलेचे शिक्षण आणि कला हेच शिक्षण ही त्रिसूत्री जोपासली जावी, यासाठी विविध अध्ययन अनुभव दिलेले आहेत. त्यातून कला शिक्षणासाठी पोषक व अनुकूल वातावरण तयार होण्याबरोबरच कलेची आवडही निर्माण होते.

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु.ल. देशपांडे म्हणतात, 'उपजीविकेसाठी आवश्यक असणाऱ्या विषयांचे शिक्षण जरूर घ्या. पोटापाण्याचा उद्योग जिद्दीने करा, पण एवढ्यावरच थांबू नका. साहित्य, चित्र, संगीत, नाट्य, शिल्प यातल्या एखाद्या तरी कलेशी मैत्री करा. पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवेल, पण कलेशी केलेली मैत्री तुम्ही का जगायचे, हे सांगून जाईल.'

देशातील बहुविध कलेची परंपरा, स्थानिक कलेची परंपरा, कलावंत यांचा जवळून परिचय व अभ्यास करण्याची संधी प्रस्तुत अभ्यासक्रमातून मिळते, तसेच नवीन निर्मितीसाठी आनुषंगिक साधन-साहित्य हाताळण्याचे कौशल्य, नवनवीन तंत्रे व आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यासाठी यातून प्रोत्साहित केले आहे.

बालकाच्या शारीरिक विकासाबरोबरच, भावनिक विकासदेखील तितकाच महत्त्वाचा आहे, त्यामुळे बालकामध्ये आत्मविश्वास, सभाधीटपणा इत्यादी गुण वाढीस लागतात. त्याच्यात जर न्यूनगंडाची भावना निर्माण झाली, तर ती समूहाच्या मदतीने कमी करायला मदत होते, त्यामुळे सामूहिकतेची, एकतेची भावना विकसित व्हावी, यासाठी या अभ्यासक्रमात प्रयत्न केले गेले आहेत. मनाची शांतता आणि संतुलन टिकून राहावे, ही बाबदेखील सध्याच्या युगात फार आवश्यक आणि अपरिहार्य ठरली आहे. चित्रांच्या रेखाटनाद्वारे,

गायनातील सुरावटींद्वारे, नृत्यांतील पदन्यासाद्वारे, नाट्यातील अभिनयाद्वारे एकाग्रता साधली जाते आणि कलाकृती साकार झाल्यानंतर अभूतपूर्व अशी मनःशांती अनुभवास येते.

सदरील अभ्यासक्रमातून राज्यातील सर्व बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. शहरी बालकांना सर्व तांत्रिक साधने उपलब्ध असतात, पण ती निसर्गापासून काहीशी दुरावलेली असतात. त्यांना निसर्गाच्या जवळ नेण्यासाठी, तशा अध्ययन अनुभवांची उदाहरणे देण्यात आलेली आहेत, तर ग्रामीण किंवा अगदी गरीब परिस्थितीतून आलेली बालके, ही निसर्गाच्या कुशीत वाढतात, पण तांत्रिक गोष्टींशी त्यांचा फारसा संपर्क येत नाही, अशा बालकांना नवीन तांत्रिक घटकांशी जोडण्याचा प्रयत्न येथे केला गेलेला आहे.

एक प्रभावी उपचारपद्धती म्हणून देखील आज कलेचा फार मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. म्युझिक थेरपी, कलर थेरपी इत्यादींद्वारे आज कुठल्याही दुष्परिणामांशिवाय रोगचिकित्सा केली जाते, इतकी सक्षमता कलेमध्ये असते, त्यामुळे अगदी लहानवयापासून मुलांना कलेचे शिक्षण दिले गेले, तर त्यांचे संपूर्ण आयुष्य नक्कीच समृद्ध, संपन्न होईल, हाच विचार या अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

- **कलाशिक्षण :** कलाशिक्षण हे शिक्षणातील सगळ्यात रंजक व हवेहवेसे वाटणारे शिक्षण आहे. यात कलेचे शिक्षण आणि कलेद्वारे शिक्षण या दोघांचाही समावेश होतो. पायाभूत स्तरावर याचे विशेष महत्त्व आहे, कारण या वयातील बालकांना आनंददायी शिक्षण देण्याची मुख्य जबाबदारी कलेतून दिलेल्या शिक्षणामुळेच पार पाडली जाऊ शकते, म्हणूनच कलाशिक्षणाचा विचार करताना, वरील बाबींचा विचार करावा. कलाशिक्षणात मूलतः प्राणमय व आनंदमय या दोन गोष्टींचा विशेष समावेश असला, तरीही अन्य कोश या शिक्षणासाठी पूरक आहेत हे लक्षात घेऊन, त्याविषयीची माहिती आपण घेऊ.
- **अन्नमय कोश :** कला शिकण्यासाठी तसेच अभिव्यक्तीसाठीसुद्धा निरोगी शरीराची आवश्यकता असते. यात पंच ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिय या दोघांचाही उपयोग होतो, म्हणूनच शारीरिकदृष्ट्या सक्षम असणे तसेच सुडौल असणे आवश्यक आहे. चित्र काढणे, वादन करणे, गाणे म्हणणे, नाटक सादर करणे अशा सगळ्या प्रकारच्या कलांच्या अभिव्यक्तीसाठी त्याची आवश्यकता आहे, त्याचबरोबर त्या उत्तम प्रकारे आत्मसात करण्यासाठी पाचही ज्ञानेंद्रिये चांगल्या पद्धतीने सक्षम असावी लागतील; म्हणजेच कलाविष्कार व सुदृढ शरीर यांचा जवळचा संबंध आहे, हे लक्षात घेऊन लहान वयातच हळूहळू दोन्ही बरोबरीने जर कार्य करू लागले, तर त्यामध्ये यश प्राप्ती होते. कला शिकण्यासाठी किंवा सादर करण्यासाठी, जी साधना करावी लागते, त्यासाठी शारीरिक क्षमता उत्तम असणे नितांत गरजेचे आहे.
- **प्राणमय कोश :** कला आत्मसात केल्यानंतर, तिचे प्रकटीकरण करण्यासाठी कौशल्यांची आवश्यकता आहे. दोन्ही प्रकारच्या कला म्हणजेच 'दृक्' कला व 'प्रदर्शनीय' कला या दोन्ही कलांसाठी त्या

त्या प्रकारची कौशल्ये आवश्यक असतात, म्हणून पंचेद्रिंये व कर्मेंद्रिये यांची कौशल्ये प्राप्त करणे हे प्राणमय कोशाचे मुख्य उद्‌दिष्ट आहे. उत्तम गाता येणे, उत्तम वादन करता येणे, चांगले वक्तृत्व करणे, अभिनयासह गीत, कथा सादर करता येणे, या सगळ्यांसाठी प्राणमय कोश आवश्यक आहे. पायाभूत स्तरावर या सगळ्यांची अंतिम कौशल्ये प्राप्त होणे शक्य नाही, तरीसुद्‌धा त्या दिशेने हळूहळू वाटचाल करायला याच कालावधीत सुरुवात करता येऊ शकते, उदा., गाणे म्हणायला सांगितल्यावर त्याप्रमाणे म्हणण्याचा प्रयत्न करणे, एखादे वाद्य शिकण्यापूर्वी त्या पद्‌धतीच्या ठेक्यांचा सराव करणे आणि त्यामध्ये निरंतरता आणत हळूहळू त्या वयाला अपेक्षित असे कौशल्य प्राप्त करणे असे करता येईल, म्हणूनच प्राणमय कोशाचे महत्त्व अधिक आहे. स्थिरता असल्यावरच हे शक्य होईल आणि यासाठी श्वसनाचे नियमन करून, हे साध्य करता येईल.

- **मनोमय कोश :** एखादी कला जर मनापासून शिकण्याचा प्रयत्न केला, तर ती लवकर साध्य होते, तसेच जेव्हा ती मनापासून सादर केली जाते, तेव्हाच ती इतरांना देखील आवडते. याशिवाय रसास्वादामुळे बालकांच्या मनावर चांगला परिणाम होऊ शकतो उदा., कथा, गीत, संगीत, चित्र यांद्‌वारे, म्हणून अध्यापकांनी या सर्व गोष्टी साभिनय सादर केल्या, तर त्याचे अनुकरण करत बालके सकारात्मक ऊर्जा प्राप्त करू शकतात.
- **विज्ञानमय कोश :** कला शिकत असताना काही नियम व काही अटी आहेत, बंदिशी आहेत हे समजून घ्यावे लागते, परंतु पायाभूत स्तरावर याची आवश्यकता नाही, तरीसुद्‌धा कला सादर करताना त्याचे छोटे छोटे नियम व त्यामध्ये असलेले शब्द लक्षात ठेवून, ते शिकावे लागतील. याची सुरुवात याच वयात करावी लागेल. या ठिकाणी विज्ञानमय कोशाचा प्रामुख्याने उपयोग होऊ शकतो. उदा. चित्रात रंग भरणे, कोलाज करणे.
- **आनंदमय कोश :** पायाभूत स्तरावर कलाकौशल्य यांचा विशेष करून आनंदमय कोशासाठीच उपयोग केलेला आहे. कला शिकताना किंवा सादर करताना, त्यातून विद्यार्थ्यांना आनंद मिळेल हे बघितले पाहिजे. विविध प्रकारची गाणी, गोष्टी, रंगकाम, हस्तकाम यांतून त्यांना नियम शिकवण्यापेक्षा, निर्मितीचा आनंद मिळवून देता येतो. एकमेकांना सहकार्य करत, जे उपक्रम केले जातात, त्यातही कलेचा मुक्त वापर केला, तर तो आनंददायी आहे, म्हणून या स्तरावर सर्व प्रकारच्या कला या बंदिस्त न करता, विद्यार्थ्यांना अभिव्यक्तीसाठी द्याव्यात. रंगमंचाचा उपयोगसुद्‌धा यासाठीच करता येईल. काही प्रमाणात यातून ते कला शिकतील, तसेच आपण काहीतरी करत आहोत याचा आनंद त्यांना विशेष करून प्राप्त होईल याची खबरदारी अध्यापकांनी घेणे आवश्यक आहे.

❑❑❑

| क्षेत्र | क्षमता | अध्ययन निष्पत्ती | क्रियाकलाप |
|---|---|---|---|
| अन्नमय कोश | शारीरिक विकास, ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रियांद्वारे प्रत्यक्ष कृती करणे. | • कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये सक्षम करणे, शरीराचे संतुलन साधणे, लवचिकता, लक्षपूर्वक ऐकणे, सौंदर्य दृष्टीने पाहणे. वाक्‌चातुर्य | • वेगवेगळी साहित्य – साधने हाताळणे, वेगवेगळी वाद्ये हाताळणे, ऐकणे, अनुभवणे, वेगवेगळ्या प्रकारच्या हालचाली करणे, वेगवेगळी रंगीत चित्रे पाहणे, प्रसंगानुरूप बोलणे. |
| प्राणमय कोश | प्राणिक विकास/कौशल्य विकास ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रियांचा समन्वय साधून, कार्य करणे व कौशल्य प्राप्त करणे. | • वेगवेगळ्या कृतींतून संतुलन साधणे, श्वासावर नियंत्रण आणण्यासाठी कृती करणे, एकाग्रता विकसित करणे, सातत्य अंगीकारणे, दृश्य व प्रदर्शनीय कलाकौशल्य विकसित करण्यासाठी कार्य करणे. | • छोट्या छोट्या योग कृती करणे, ओमकार उच्चारण करणे, श्लोक, सूत्र मंत्र उच्चारणे, वेगवेगळ्या आकारांमध्ये नेटकेपणाने रंग भरणे, चित्र, रांगोळी रेखाटणे, मणी, फूल, वस्तू ओवणे, शिवणपाट्या शिवणे, वेगवेगळ्या आवाजाच्या पट्टीत घोषणा देणे, आरोळ्या ठोकणे, शरीराच्या लवचिकतेसाठी पूरक हालचाली कौशल्यपूर्वक करणे. |
| मनोमय कोश | मानसिक विकास, भावनिक विकास | • आवड व्यक्त करणे, भाव व्यक्त करणे, संवेदनशीलता येणे, संयम येणे, एकरूप होणे, सहकार्याने कार्य करणे. | • गायन, वादन, चित्र, अभिनय, नृत्य, वक्तृत्व, सौंदर्यदृष्टी इत्यादींसाठी पाहणे, ऐकण्यास देणे, प्रत्यक्ष कृती करणे. |
| विज्ञानमय कोश | बोधात्मक विकास, सृजनात्मक विकास | • ग्रहणशक्ती, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती, निरीक्षण, तर्क लावणे, अनुमान करणे, निर्णय घेणे. | • संगीतातील लय, सूर, ताल, सम, कायदे हे लक्षात घेऊन, सादरीकरण करणे, आकार, रंगसंगती यांची योजना करून कार्य करणे. |
| आनंदमय कोश | आत्मिक विकास | • सौंदर्यदृष्टी, उत्स्फूर्त सहभाग, तल्लीनता, आनंद | • कलेचे सादरीकरण करणे, अभिव्यक्त होणे. |

## विषय : कलाशिक्षण

**विकासक्षेत्र :** बोधात्मक विकास

**क्षमता :** 7.1 वेगवेगळ्या वर्गांतील, गटांतील व वस्तूंमधील फरक आणि वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | चित्रकला | व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांची ओळख | वस्तू, व्यक्ती चित्रे, प्राणी, पक्षी, घटना नावासहित ओळखतो. | (१) प्राणी, व्यक्ती, वस्तू यांची वेगवेगळी चित्रे आणि चित्रफीत यांच्या साहाय्याने ओळखतो.<br>जसे : विविध प्राणी, पक्षी, व्यक्ती, परिसरातील दैनंदिन वापरातील वस्तू व घटना. | रंगीत चित्रे, दृक्श्राव्य साधने | दाखवलेल्या वस्तूंची नावे ओळखतो, सांगतो.<br>यांच्या निरीक्षणातून नोंदी कराव्यात. |
| | चित्रकला | आकारांची ओळख | परिचित वस्तूचा किंवा चित्रातील हरवलेला भाग ओळखतो. | (१) परिसरातील एक वस्तू, प्राणी, पक्षी यांचे चित्र दाखवा व त्या चित्राचे काही काप (चित्राचे तुकडे) घेऊन, चित्राची पुन्हा जुळवाजुळव करून (जोडून) चित्र पूर्ण करावे.<br>जसे – एका पक्ष्याच्या (पोपट) चित्राचे काप करा व ते काप जोडून चित्र (पक्षी) पूर्ण करण्यास सांगावे. | | विद्यार्थी कृतींचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | चित्र | आकारांची ओळख | वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. नावासह ओळखून स्वत: त्याचे वर्णन करतो. | (१) परिसरातील प्राणी, पक्षी, घटना यांची चित्रे दाखवावीत व त्यांची नावे ओळखण्यास सांगावे. उदा. घोडा, कुत्रा, मांजर, चिमणी, कावळा, मोर, दवाखाना, बाजार, इ. | चित्र, चित्रफित | चित्रातील वस्तू, प्राणी यांच्या आवाजावरून नावे ओळखतो.<br>यांचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | चित्र | आकारांची ओळख | परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेले ३ ते ५ भाग ओळखतो. | (१) फळ्यावर, कागदावर एका मानवी चेहऱ्याचे चित्र काढून, त्यातील काही भाग अपूर्ण ठेवावे व मुलांना ते अपूर्ण भाग ओळखण्यास सांगावे. उदा., मानवी चेहरा काढून, त्यातील एक डोळा, एक कान, एखादा दात चित्रातून काढून टाकावा किंवा लपवावा. | फळा, कागद, रंग, खडू | निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | चित्र | आकारांची ओळख | लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदा. घराचा मोठा दरवाजा) | (१) परिचित दैनंदिन वस्तू व व्यक्ती यांची चित्रे मुलांना दाखवावीत.<br>(२) दोन चित्रांमधील फरक ओळखण्यास सांगावे.<br>(३) पैकी एका चित्रातील वैशिष्ट्ये विचारावे.<br>उदा. बाजाराचे चित्र दाखवून त्यातील दुकाने, व्यक्ती, ठिकाण, वाहनांची संख्या इत्यादी. | चित्र, चित्रफीत | निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | चित्र | आकारांची ओळख | परिचित वस्तूच्या चित्रामधील हरवलेले ४ ते ६ भाग ओळखतो. | (१) परिचित प्रसंगाचे एक पूर्ण चित्र दाखवणे व तेच अपूर्ण किंवा काही भाग बंद करून (खोडून) दाखवणे व त्या चित्रातील खोडलेला भाग ओळखण्यास सांगणे. उदा. (बागेत खेळणारी मुले व बागेतील पूर्ण चित्र) | चित्र व चित्रफीत | निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | चित्र | आकारांची ओळख | लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती /चित्रे ओळखतो. त्यांचे बारकाव्यांसह वर्णन करतो. उदा. एका छोट्या पिवळ्या घराचे लाल मोठे दार | (१) परिसरातील वस्तू, प्राणी, पक्षी यांची चित्रकृती किंवा शिल्पकृती दाखवावी. त्याबद्दल वर्णनात्मक माहिती विचारावी प्राण्यांच्या अवयवांबद्दल माहिती सांगावी. उदा., मांजराचे पाय किती?, कान किती?, नाक किती?, शेपटी किती व कोणते अवयव दिसत नाहीत ते सांगा. | चित्र, चित्रफिती | विद्यार्थी कृतींचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | चित्र | आकारांची ओळख | दिलेल्या वस्तू/ चित्रांमध्ये तुलना करतो आणि त्यातील साम्य, भेद ओळखतो. | (१) वस्तू किंवा प्राणी यांचे चित्र दाखवताना त्यातील काही भाग लपवावा व लपवलेला भाग ओळखण्यास सांगावे. उदा., निसर्गचित्र, किल्ल्याचे चित्र, चित्रात लपलेल्या भागांची नावे ओळखा व सांगा. | चित्र, चित्रफिती | निरीक्षण करून नोंदी करणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | चित्र | आकारांची ओळख (रसग्रहण) | लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो. त्यांचे बारकाव्यांसह वर्णन करतो. उदा. एका छोट्या पिवळ्या घराचे लाल दार | (१) परिसरातील कोणत्याही वस्तू, प्राणी, पक्षी, व्यक्ती यांचे प्रतीक किंवा प्रतिकात्मक चित्र किंवा प्रतिकृती दाखवावी व त्याची वर्णनात्मक माहिती विचारावी. उदा. शाळेची इमारत, गावातील/शहरातील मोठी इमारत. | चित्र व चित्रफिती | कृतींचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | चित्र | आकारांची ओळख | दिलेल्या वस्तू/ चित्रांमध्ये तुलना करतो आणि त्यातील साम्य, भेद ओळखतो. | (१) परिचित वस्तूंच्या चित्रांतील फरक ओळखण्यास सांगणे. उदा. दोन झाडांतील फरक, दोन दगडांमधील फरक. | चित्र व चित्रफिती | कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| **क्षमता :** 7.3 दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | चित्र | रंगांची ओळख | चित्रकाम व रंगकाम करताना साधी साधने वापरण्यात कसब, हस्तकौशल्य दर्शवतो. | (१) विविध रंगीत वस्तू वापरून, रंगांची नावे स्पष्ट करावीत.<br>(२) रंगांची गाणी म्हणण्याचा सराव घ्यावा.<br>(३) हाताचे, बोटांचे रंगीत ठसे वापरून मुक्त चित्र तयार करण्याची संधी द्यावी.<br>(४) विविध वस्तू वापरून, आकृतिबंध तयार करण्याचा किंवा दिलेल्या चित्रात रंग भरण्याचा सराव द्यावा. जसे – कापलेल्या भेंडीचा, कागदाच्या किंवा कापसाच्या बोळ्याचा वापर करून चित्र काढणे किंवा रंगवणे. | रंगीत खडू, रंगीत वस्तू, भेंडी, कागद, कापूस | चित्र किंवा रंगकाम करताना, साधने योग्य पद्धतीने हाताळतो की कसे याची निरिक्षणाद्वारे नोंद करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | शिल्प | मातकाम | मातकाम किंवा शिल्पकला/हस्तकला करताना योग्य कामासाठी योग्य साधने निवडतो. | (१) मातकाम, शिल्पकाम/कलाकाम करताना लागणाऱ्या विविध साहित्यांची प्रात्यक्षिका–द्वारे ओळख करून द्यावी. सुचवलेल्या कामासाठी योग्य साहित्यांची निवड करून प्रात्यक्षिक करण्याची संधी द्यावी. जसे : माती खोदणे, चिखल बनवणे, चित्राला रंग देण्यासाठी योग्य रंग व आकाराची निवड करणे. | माती, रंग | मातकाम करताना योग्य आकार व रंग यांची निवड करतो की कसे याची निरीक्षणाद्वारे नोंद करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | डिजिटल साधनांचा वापर | वेगवेगळ्या डिजिटल साहित्यांची ओळख | शिक्षकांच्या मदतीने डिजिटल तंत्रज्ञान; जसे की, स्मार्टफोन, Tablet चा वापर करतो. | (१) स्मार्टफोन, Tablet आणि तत्सम डिजिटल साधने वापरण्यासंबंधी प्रात्यक्षिक द्यावे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वापरण्याची संधी द्यावी. आवश्यक तेथे मदत करावी. | स्मार्टफोन, Tablet व तत्सम डिजिटल साहित्यांचे चित्र/फोटो | डिजिटल साधने योग्य प्रकारे वापरतोय की कसे, निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | शिल्प | साधने | कृती करताना परिणामकारकपणे साधनांचा वापर करतो. | (१) कोणतीही कृती/काम करताना साधनांचा वापर परिणामकारक करण्यासंबंधी प्रात्यक्षिक करून दाखवणे.<br>जसे – मातीपासून विविध आकार, वस्तू बनवताना माती खोदणे, चिखल बनवणे इ. क्रमाने योग्य साहित्य कसे वापरावे याचे प्रात्यक्षिक देणे. विद्यार्थ्यांना सुचवलेली कामे, कृती योग्य साहित्याचा वापर करून सहजतेने करण्याची संधी द्यावी. | मातकामा– साठी लागणारे साहित्य | कृती करताना साहित्याचा योग्य प्रकारे वापर करतो की कसे, निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | डिजिटल साधनांचा वापर | वेगवेगळ्या डिजिटल साधनांचा वापर | अध्ययन करताना डिजिटल साधनांचा सहज वापर करतो. उदा. श्राव्य साधन सुरू करणे, मध्येच थांबवणे. | (१) वर्गात उपलब्ध असणारी डिजिटल साधने उदा. स्मार्टफोन, टीव्ही, लॅपटॉप इ. सुरू करणे, बंद करणे, आवश्यक तेथे थांबवणे इ. बाबींचे प्रात्यक्षिक द्यावे. वरीलप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला साधने हाताळण्याची संधी द्यावी. | डिजिटल साधने उदा. दूरदर्शन स्मार्टफोन, संगणक इ. | डिजिटल साधनांचा सहज वापर करतो की कसे, निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | शिल्पकला | उपलब्ध साधनांचा प्रभावी वापर | सोपी साधने तयार करतो व दैनंदिन कृतीमध्ये त्यांचा वापर करतो. | (१) एखाद्या साधनाच्या अनुपलब्धित पर्यायी साधनांचा शोध घेण्याची संधी द्यावी. जसे : खोदकामासाठी कुदळ नसल्यास उपलब्ध गज किंवा लाकूड यांसारखी साधने वापरून खोदणे. <br>(१) गज/लाकडाचा वापर करून कुदळ/फावडे तयार करणे. <br>(२) कागदापासून किंवा कपड्यापासून चेंडू तयार करणे. <br>(३) बाटलीपासून पिचकारी करणे इ. | लाकूड, गज, कागद, पाण्याची बाटली | कल्पकतेने साधने तयार करतो की कसे, हे निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | डिजिटल साधनांचा वापर | डिजिटल साधनांचा उपयोग | अध्ययन करताना डिजिटल व दृक्श्राव्य साधने सहजपणे व निपुणपणे दाखवतो. | (१) अध्ययनासंबंधी विविध Mob app चा वापर करताना, आवश्यक पूर्वतयारी; जसे इंटरनेट, आवाज इ. जोडणी करणे याचे प्रात्यक्षिक द्यावे. तत्सम ॲप उघडून शोधण्याचे प्रात्यक्षिक द्यावे. उदा. दीक्षा ॲपप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांला साधने हाताळण्याची पुरेशी संधी द्यावी. | विविध डिजिटल साधने उदा. स्मार्टफोन, टॅब, दूरदर्शन संगणक | अध्ययन करताना डिजिटल साधने सहजपणे हाताळतो की कसे, निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |
| **क्षमता :** C 2.1 आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यातील फरक ओळखतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे | चित्र | रंग ओळख | प्राथमिक रंग (लाल, पिवळा, निळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो. (काळा, पांढरा, तपकिरी) | (१) बालकांना प्राथमिक रंग दाखवणे. त्याची माहिती देणे. त्यापासून तयार होणाऱ्या अन्य रंगांची माहिती देणे. <br>(२) वेगवेगळ्या रंगांचे चित्र बालकांना दाखवणे व त्यातील रंगांची नावे ओळखण्यास सांगणे. | रंग साहित्य, विविध रंगांचे तक्ते | रंगांतील फरक ओळखतो की नाही याचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे | रंगज्ञान | रंग ओळख | वस्तूंची त्यांच्या रंगानुसार विभागणी, गट करतो. (उदा. सगळ्या लाल वस्तू एकत्रित करतो.) | (१) बालकांना विविध रंगांच्या, विविध आकारांच्या वस्तू दाखवणे, त्याची माहिती देणे.<br>(२) दाखवलेल्या वस्तूंची रंगानुसार विभागणी करण्यास सांगणे. (उदा. पानांचा रंग हिरवा असतो. हिरव्या रंगांच्या सर्व वस्तू एकत्रित करतो.) | विविध रंगांच्या विविध वस्तू उपलब्धते–नुसार | वस्तूच्या रंगातील फरक ओळखतो, एकाच रंगाच्या वस्तू एकत्रित करतो याचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | चित्र | रंग ओळख | प्राथमिक व द्वितीय रंगांमधील छटा यांतील फरक ओळखतो. उदा. फिकट निळा, गडद निळा, फिकट हिरवा, गडद हिरवा | (१) प्राथमिक रंग आणि द्वितीय रंग यांची माहिती देणे.<br>(२) प्राथमिक रंगाच्या कोणत्या दोन रंगांच्या मिश्रणातून कोणता द्वितीय रंग तयार होतो. ते सांगणे (उदा. पिवळा + निळा = हिरवा)<br>(३) प्राथमिक रंग आणि द्वितीय रंग या रंगांमध्ये पांढरा रंग किंवा पाण्याचे प्रमाण कमी अधिक करून, त्याच्या फिकट रंगाची छटा तयार करणे.<br>(४) फिकट आणि गडद रंगांची विविध चित्रे, वस्तू दाखवणे व त्यांतील फरक ओळखण्यास सांगणे. (उदा. पान, पेरू, पानाचा रंग गडद हिरवा असतो, तर पेरूचा रंग फिकट हिरवा असतो.) | रंग, रंगांचे तक्ते | प्राथमिक रंग, द्वितीय रंग यातील फरक, फिकट, गडद रंगांतील फरक ओळखतो याचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | शिल्प | गट करणे. | लांबी, रुंदी, उंची व मितींच्या आधारावर वस्तूंचे गट करतो. | (१) विविध आकारांतील, रंगातील वस्तू दाखवणे व त्यातील फरक ओळखण्यास सांगणे.<br>(२) एकाच आकाराच्या वस्तू एकत्रित करण्यास सांगणे. (उदा. गोल, चौकोनी इ.) | विविध आकारांतील उपलब्ध वस्तू | आकारमानानुसार वस्तूंचे गट करतो का, याचे निरीक्षण करून नोंद करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | चित्र | रंग ओळख | दोन रंग मिसळल्यावर, एकत्र केल्यावर कोणता नवीन रंग तयार होईल, याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतो. (उदा. निळा आणि पिवळा एकत्र केल्यावर हिरवा दिसतो आणि लाल व पांढरा एकत्र केल्यावर गुलाबी दिसतो. | (१) तांबडा, पिवळा, निळा, काळा, पांढरा या रंगांची ओळख/माहिती करून देणे.<br>(२) दोन रंग एकत्र केल्यावर कोणता रंग तयार होतो याची माहिती करून देणे. उदा. लाल आणि पिवळा एकत्र केल्यावर नारिंगी दिसतो. निळा आणि पिवळा एकत्र केल्यावर हिरवा दिसतो. लाल आणि निळा एकत्र केल्यावर जांभळा दिसतो.<br>(३) एखाद्या रंगात काळा रंग मिसळल्यास, गडद रंग तयार होतो आणि पांढरा रंग मिसळल्यास फिकट रंग तयार होतो. | रंग | दोन रंगांच्या मिश्रणातून तयार होणारा रंग ओळखतो, याचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | चित्र | रंग ओळख | रंग आणि आकार यांच्या वैशिष्ट्यां–नुसार वस्तुंचे गट करतो. (उदा. सगळे लाल रंगाचे त्रिकोण एकत्र, सर्व मोठी हिरवी पाने एकत्र करतो.) | (१) विविध रंगांच्या, आकारांच्या वस्तू दाखवणे.<br>(२) रंगानुसार, आकारानुसार एकत्रित गट तयार करण्यास सांगणे. | उपलब्धते–नुसार विविध रंगांच्या, आकारांच्या वस्तू, चेंडू, पान, फूल, ठोकळे | रंगानुसार, आकारानुसार वस्तूंचे गट करतो की नाही, याचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | चित्र | रंग ओळख | दोन रंग एकत्र केल्यावर कोणता रंग तयार होईल, याबाबत अंदाज बांधतो. | (१) दोन रंग दाखवणे व त्या दोन रंगांच्या मिश्रणातून कोणता रंग तयार होईल, हे ओळखण्यास/अंदाज व्यक्त करण्यास सांगावे. उदा. लाल आणि पिवळा असे दोन रंग दाखवणे व हे दोन रंग एकत्र केल्यास नारिंगी तयार होतो याप्रमाणे पिवळा आणि निळा एकत्र केल्यास कोणता रंग तयार होतो हे विचारावे. | रंग | तयार होणाऱ्या रंगांचा अंदाज बांधतो का, याचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | चित्र | रंग ओळख | विविध रंग, आकार आणि त्यांच्या छटा यांनुसार गट करून, आकृतिबंध तयार करतो, कोडी सोडवतो व खेळ खेळतो. | (१) परिसरातील विविध रंगांच्या, विविध आकारांच्या वस्तू एकत्र करण्यास सांगावे.<br>(२) एकत्र केलेल्या वस्तूंमधून एकसारख्या रंगांच्या, आकारांच्या वस्तूंचा गट करण्यास सांगावे.<br>(३) त्यापासून एखादा खेळ, कोडी सोडवण्यास सांगावे. | पाने, फुले | वस्तूंचे गट, रंग, आकारानुसार करतो, याचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | चित्र | रंगकाम व सजावट | कलाकृती तयार करताना, चित्रामध्ये सजावट आणि रंगकाम यामध्ये रंगाचा वापर विविध प्रकारे करतो. | १) चित्र रंगवताना विविध रंगांचा कलात्मकतेने वापर करून चित्र अधिकाधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न करतो.<br>२) वाढदिवसानिमित्त घर सुंदर सजवतो. | कागद, रंग, सजावटीचे साहित्य | दिलेल्या कृतीचे निरीक्षण करून, नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | चित्र | रंग ओळख | विविध रंग, आकार आणि त्यांच्या छटा यांनुसार गट तयार करून, आकृतिबंध तयार करतो, कोडी सोडवतो व खेळ खेळतो. | (१) परिसरातील वस्तू एकत्रित करणे, एकत्रित केलेल्या वस्तूंचे रंगानुसार, आकारानुसार गट करणे.<br>(२) एकत्र केलेल्या वस्तूंमधून एखादी कलाकृती तयार करणे. (उदा. फूल, बॅट, बॉल) | परिसरातील उपलब्ध वस्तू, पाने, फुले इ. | दिलेल्या कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| **क्षमता :** CG 2 बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>**क्षमता :** C 2.3 आवाजातील चढ–उतार (आरोह–अवरोह) सूर, ताल, लय यांनुसार आवाजातील फरक ओळखतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | गायन | आवाजाची ओळख | मानव, प्राणी, वाहने, टाळ्या यांचा आवाज, पाण्याचा आवाज इ. व वातावरणातील आवाज यांतील वेगळेपणा ओळखतो. | (१) विद्यार्थ्यांना तोंडाने व हातापायांनी विविध आवाज काढण्यास सांगणे. उदा. तोंडाचे आवाज, मॅव मॅव, अ, ब डा...ना..... शरीर अवयवांचे आवाज उदा. टाळ्या, पाय आपटणे, हाताच्या बोटांनी वाजवणे इ.<br>(२) विद्यार्थ्यांना वेगवेगळे पक्षी, प्राणी यांचे आवाज ओळखण्यास सांगणे. उदा. मांजर, कुत्रा, चिमणी, कावळा इ.<br>(३) विविध वाहनांचे आवाज ओळखण्यास सांगणे. उदा. मोटारगाडी, रेल्वे, विमान, इ.<br>(४) परिसरातील वेगवेगळ्या आवाजाची ओळख करून देणे. उदा. पाण्याचे टपटपणे, नळाचे पाणी, टेबलावर आवाज करणे इ.<br>(५) वरील वेगवेगळ्या आवाजांतील फरक ओळखण्यास सांगणे. उदा. तोंडाचा, प्राण्यांचा, टेबलावर आघात, पाण्याचा आवाज इ. | परिसरातील उपलब्ध साहित्य/वस्तू | विद्यार्थी वेगवेगळ्या आवाजातील फरक ओळखतात व सांगतात. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | संगीत | मृदू आवाज व कर्कश आवाज | कर्कश व मृदू आवाजांतील फरक करतो. | (१) विद्यार्थ्यांना मृदू (गोड) आवाजाची ओळख करून देणे. उदा. हळू आवाजात, नम्रतेने बोलणे (प्रेमाने), प्रेमाने समजून सांगणे. उदा. टाळ्यांचा आवाज, चिमणीचा आवाज इ.<br>(२) विद्यार्थ्यांना कर्कश आवाजाची ओळख करून देणे. उदा. पत्र्याचा डबा जमिनीवर घासणे, पक्ष्यांचे आवाज (कर्कश) मोराचा केकारव, कोकिळेचा आवाज, पोपटाचा आवाज, स्वत:चे जोरात ओरडणे इ.<br>(३) विद्यार्थ्यांना मृदू व कर्कश आवाज ओळखण्यास सांगणे. वरील विविध उदाहरणांतून फरक ओळखण्यास सांगणे. | परिसरातील उपलब्ध साधने, प्राण्यांच्या आवाजासाठी दृक्श्राव्य माध्यम | विद्यार्थी मृदू व कर्कश आवाज ओळखतो व फरक सांगतो. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | गायन | परिसरातील आवाज<br><br>आवाजातील चढ–उतार | पक्षी, प्राणी, वाद्ये आणि मानवी आवाज यांच्या आवाजाच्या पातळीतील, चढ–उतारातील फरक ओळखतो. | (१) परिसरातील पक्षी, प्राणी यांचे आवाज, तसेच इतर आवाजांची ओळख करून देणे. उदा. चिमणी, कावळा, पोपट, मोर, तसेच कुत्रा, गाय, म्हैस या प्राण्यांच्या आवाजाचा परिचय करून देणे, तसेच वाद्यांचे आवाज यांची ओळख करून देणे.<br>उदा. भांड्याचा आवाज, डफली, टाळ, खंजिरी या आवाजांची ओळख करून देणे.<br>(२) स्वत:च्या बोलण्याच्या आवाजातील चढउतार ओळखणे व वर्गीकरण करणे. (फरक ओळखणे) | दृक्श्राव्य साधने तसेच उपलब्ध सांगितीक साधने व वस्तूंचा उपयोग करणे. | निरीक्षणाद्वारे मूल्यमापन करणे व नोंद करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | वादन | ठेका आणि लय | तालबद्‍ध ठेक्यातील मंद व वेगवान लयीमधे फरक करतो. | (१) तालबद्‍ध टाळ्यांचा आवाज, तसेच वाद्यांचा आवाज, बोलण्याचा आवाज, चालण्याचा वेग<br>(२) हातावर ठेका धरून (टाळी वाजवून), गाण्याची लय समजावणे. उदा. एक टाळी, दोन टाळ्या, वेगाने टाळ्या वाजवणे.<br>(३) बडबडगीताला ठेका धरून म्हणणे.<br>(४) सावकाश गाणे व वेगाने गाणे.<br>(५) टाळ, झांज, खंजिरी यांसारख्या व अन्य उपलब्ध वाद्यांचा उपयोग करून ठेका धरणे व लय समजावणे. | परिसरातील उपलब्ध साधने तसेच वाद्यांचा उपयोग करणे. | निरीक्षणाद्‍वारे मूल्यमापन करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | स्वरांची ओळख | मध्यम स्वर | आवाजाच्या पातळीमधील मध्यम स्वर ओळखतो. | (१) विद्यार्थ्यांना विविध प्रसंगानुरूप आवाजाची ओळख करून देणे. (ज्यामध्ये आवाजाची पातळी कमी जास्त असेल.) उदा.<br>(१) एकमेकांच्या कानात बोलणे, एकमेकांशी सहज बोलणे, एकमेकांशी ठामपणे बोलणे, एकमेकांशी जोरात बोलणे.<br>(२) टेबलावर हळू वाजवणे, जोराचा आघात, व फार जोराचा आघात करून, फरक ओळखण्यास सांगणे इ.<br>(३) वरील उदाहरणामधून आवाजाच्या पातळीचा फरक ओळखण्यास सांगणे.<br>(४) मध्यम आवाज, स्वर पातळी समजण्यासाठी विविध उदाहरणे देणे. (उदा. वरीलपैकी) | परिसरातील उपलब्ध साहित्य | विद्यार्थी आवाजाच्या पातळीमधील खालचा आवाज, मध्यम आवाज व उंच आवाज ओळखतात. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | वादन | मात्रा व लय | मात्रा व लय यामधील मध्यम श्रेणी ओळखतो. | (१) विद्यार्थ्यांना मात्रा समजून सांगण्यासाठी विविध उदाहरणे देणे.<br>उदा. चालत असतानाचा क्रम, टाळ्या वाजवतानाचा क्रम, सेकंद मोजतानाचा क्रम इ.<br>(२) विद्यार्थ्यांना लय (गती) मध्ये संथ–मध्यम–जलद गती समजावून सांगणे.<br>उदा. हळू चालणे (संथ गती) मध्यम वेगात चालणे (मध्यम गती) अति वेगात चालणे (जलद गती) इ. उदा. टाळ्यांची गती (कमी–मध्यम–जलद)<br>(३) वरील उदाहरणामधून मध्यम लय ओळखण्यास सांगणे. (उदा. हळू चालणे–चालणे–पळणे) | शरीर अवयव व उपलब्ध साधने | विद्यार्थी मात्रा व लय यांतील मध्यम गती ओळखतात व सहजपणे सांगतात. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | स्वर | स्वरांची ओळख | ध्वनी आणि आवाजाची पातळी व मात्रा संदर्भात कोणतेही दोन ध्वनी, स्वर जुळत असल्यास ते ओळखतो. | (१) विद्यार्थ्यांना आवाजाची पातळी समजावून सांगणे.<br>उदा. लहान–मध्यम–मोठा आवाज<br>(२) मात्रांची ओळख करून देणे.<br>उदा. चालतानाचा क्रम १–२–३ (मात्रांची गती) कमी–अधिक<br>(३) विद्यार्थ्यांचा आवाज आपल्या (गुरुजींच्या) आवाजात जुळवून घेण्यास सांगणे.<br>उदा. अलंकार स्वरात म्हणणे.<br>आरोह – सा रे ग म प ध नि सा<br>अवरोह – सां नि ध प म ग रे सा | परिसरातील उपलब्ध साधने, स्वर, ध्वनीकरता दृक्श्राव्य साधने | विद्यार्थी आवाजाची पट्टी/पातळी जुळवून घेतो व ध्वनीचा फरक सांगतो. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गायन | लय | गीताच्या कडव्यांमधील आवाजातील चढ–उतार/लयीमधील बदल ओळखतो. | (१) विद्यार्थ्यांकडून पाठ्यक्रमातील कविता ताल–स्वरात म्हणून घेणे.<br>(२) पाठ्यक्रमातील कवितेसोबतच परिसरातील छोटी–छोटी गीते म्हणवून घेणे. (व्हिडिओ क्लीप दाखवणे.) उदा. बडबडगीते, अभिनय, गीते इ.<br>(३) विद्यार्थ्यांना लहान–लहान गीते म्हणण्यास सांगणे.<br>उदा. कविता, बडबडगीते.<br>(४) वरील गीते लय (गती) कमी–अधिक करून म्हणून घेणे. उदा. गीतांचा वेग कमी जास्त | दृक्‌श्राव्य साधने | विद्यार्थी आवाजातील चढ–उतार व लयीतील फरक ओळखतो व सांगतो. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | गायन | स्वर | आवाजाच्या दिलेल्या पातळीतील स्वरचिन्हांच्या रेखीव व अरेखीव प्रगतिपथामध्ये फरक ओळखतो. | (१) विद्यार्थ्यांना आवाजाची पातळी समजून सांगणे. (उदा. आवाजात चढ–उतार करून कविता, बडबडगीते म्हणवून घेणे)<br>(२) दृक्‌श्राव्य यंत्राद्वारे विद्यार्थ्यांना विविध गीते ऐकवून, चालीवर म्हणून घेणे. (उदा. पाठ्यक्रमातील कविता, बडबडगीते, लोकगीते इ.)<br>(३) वरील गीते विद्यार्थ्यांकडून तालासुरात म्हणून घेणे (सराव घेणे) | उपलब्ध साहित्य व दृक्‌श्राव्य माध्यम | विद्यार्थी स्वर ओळखतात व कविता गीते ताल–स्वरात म्हणतात. |

**विकासक्षेत्र :** सौंदर्यात्मक आणि सांस्कृतिक विकास

**ध्येय :** CG - 12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये, आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.

**क्षमता :** C 12.1 - विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्यांबरोबर खेळतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | दृश्यकला, चित्र | कला साधने हाताळणे. | अ–१ योग्य कला साहित्य, साधने आणि उपकरणे हाताळतो. | (१) कलेसाठी लागणारी विविध साधने हाताळण्याची संधी देणे. जसे – खडूने जमिनीवर गिरगिटण्यास सांगणे. कागद सरळ फाडण्यास सांगणे.<br>(२) कलेसाठी लागणारे विविध साहित्य हाताळण्याची संधी देणे. जसे – मातीचा गोळा करणे, भिजवलेल्या पिठाला आकार देणे.<br>(३) विविध उपकरणे हाताळण्याची संधी देणे.<br>(४) वेगवेगळ्या कला अनुभवांचे उपक्रम घेताना, विविध कला साहित्य, साधने हाताळून दाखवावे व बालकास स्वतंत्रपणे हाताळण्यास देणे. | खडू, रांगोळी, वेगवेगळ्या जाडीचे, रंगांचे कागद, पुठ्ठा, पाटी, दगड, खडे, पेंटब्रश, दोरे, क्ले, ओली माती इ. | (१) विविध कलासाधने आणि साहित्य, उपकरणे हाताळतो आहे, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | दृश्यकला, चित्र | द्विमितीय, त्रिमितीय प्रतिमा | दृश्य कलाकृतीमध्ये ठसे, रेघा आणि इतर द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) प्रतिमा तयार करताना लहान व मोठा आकार शोधतो. | (१) द्विमितीय प्रतिमेत रंग देताना, चिकटकाम, ठसेकाम करताना लहान, मोठ्या आकारांचा समावेश करणे.<br>जसे – कागदाचा बोळा तयार करून, लहान वर्तुळ ठसे वापरून रंगवणे. लहान, मोठ्या बोळ्याचा वापर करणे.<br>(२) टिकल्या कागदावर चिकटविण्यास सांगणे. यावेळी लहान, मोठ्या टिकल्यांचा वापर करणे.<br>(३) फाडकाम करून द्विमितीय, त्रिमितीय प्रतिमा तयार करणे.<br>उदा. रंगीत कागद फाडून ते दिलेल्या आकारात चिकटवण्यास सांगणे. बॉक्सवर लहान, मोठे स्टार चिकटविणे.<br>(४) विविध मापाच्या रेघोट्या मारण्यास सांगणे.<br>उदा. बालकांना मैदानावर अथवा वर्गात माती/वाळू खोक्यात ठेवून, त्यात काठीने, काडीने रेघोट्या मारण्यास सांगणे. मुक्तपणे वेगवेगळ्या आकारांच्या, मापाच्या रेघोट्या मारण्याची संधी द्यावी. | कागदाचे तुकडे, बोळे (विविध आकाराचे), टिकल्या, रंगीत कागद, खोका, माती इ. | (१) सांगितलेल्या कृती योग्यरीतीने करतो की नाही, याचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | दृश्यकला – चित्र | ठसे उमटवणे | साहित्य एकत्रित मिसळून छापे व आकृती तयार करतो. (उदा. माती आणि पाणी, वाळू आणि पाणी, पीठ आणि पाणी, रंग आणि पाणी) | (१) उपलब्ध रंगांच्या माध्यमातून ठसे घेण्यास सांगावे. उदा. भेंडीच्या कापाचा ठसा<br>(२) वेगवेगळ्या रंगांचे, वेगवेगळ्या आकारांचे ठसे घ्यावे. कागदाच्या वेगवेगळ्या बोळ्याचे दोरा गुंडाळून ठसे.<br>(३) माती, वाळू, पीठ वापरून ओल्या मातीचे, पिठाचे, वेगवेगळे आकार तयार करणे, त्यावर वस्तूंचे छाप घेणे. | हात, रंग, हाताची बोटे, ठसे, पीठ, वाळू इ. | (१) दिलेल्या कृतीचे निरीक्षण करून नोंद करणे. |
| | चित्र | ठसेकाम | ठोकळे, स्टेन्सील्स, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांचे ठसे उमटवतो. | (१) ठसेकामात उपयोगी ठरेल असे वर्गातील उपलब्ध साहित्य गोळा करणे. उदा. बांगडी, ठोकळे, स्टेन्सिल्स, खोडरबर, कागद, पाने, फुले, फळे<br>(२) त्यांचे विविध रंगातील ठसे घेणे.<br>(३) खोडरबर, स्टेन्सिल्स, ठोकळ्यांचा वापर करून कागदावर, वर्तमानपत्रावर विविध रंगांचे ठसे घेणे. | बांगडी, ठोकळे, स्टेन्सील्स, खोडरबर, रंग इ. | (१) कृतीचे निरीक्षण करून नोंद करणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | दृश्यकला – शिल्प | कला साधने हाताळणे. | साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदा. काड्या, बिया, खडू, दगड, खडे दोरा, पेन्सील, ब्रश, भुकटी, कात्री इ.) | (१) वेगवेगळ्या कलानुभवांचे उपक्रम घेताना बालकांची विविध प्रकारच्या साहित्य साधनांवर योग्यरीत्या पकड येण्यासाठी सराव करून घेणे.<br>जसे – रांगोळी हाताळणे, एक रिकामा खोका देऊन पाच बोटांनी रांगोळी खोक्यात सांडण्यास सांगावे. नंतर चार बोटांनी, नंतर तीन, नंतर दोन बोटांनी. | रांगोळी, पुठ्ठा, पाटी, ब्रश, भुकटी, काड्या इ. | (१) साहित्य विविध प्रकारांनी हाताळतो की नाही, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | दृश्यकला – चित्र | सजावट | समवयस्क, सुलभक आणि स्थानिक, समुदायाच्या सहयोगाने, मोठ्या स्वरूपाची कामे करतो. (उदा. जमिनीवरील रांगोळी, भित्तिचित्र, शिल्पकृती) | (१) विविध उत्सवांच्या निमित्ताने वर्ग सजावट करणे. उदा. भित्तिचित्रे काढणे, रंगवणे (मुक्तपणे) वरील कृती गटात घेणे. उदा. खडूच्या साहाय्याने रेघा मारणे व विविध आकार तयार करणे.<br>(२) मण्यांचा वापर करून जमिनीवर विविध आकार बनवणे.<br>(३) काड्यांचा वापर करून, जमिनीवर विविध आकार बनवणे.<br>(४) सहकाऱ्यांच्या मदतीने हाताच्या बोटाचे ठसे उमटवून चित्र तयार करणे. | क्ले, माती, खडू, रांगोळी, जलरंग | (१) बोटांचा वापर करून कामे करतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | शिल्प | त्रिमितीय कलाकृती | माती किंवा कणिक यांसारखे साहित्य थापून किंवा वळकटी करून त्रिमितीय (3D) आकार तयार करणे. | (१) माती कुटणे, चाळणे, पीठ भिजवणे, पीठ मळणे, छोटे–मोठे गोळे करणे, थापणे अशा कृती करून घेणे.<br>(२) मातीचे गोळे, पिठाचे गोळे देऊन, मनाप्रमाणे आकार करण्याची, वस्तू करण्याची संधी देणे. | माती, वाळू, पीठ इ. | (१) दिलेल्या साहित्यातून विविध आकार तयार करतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | दृश्यकला – चित्र | ठसेकाम (मुद्राचित्रण) | ठोकळे, स्टेन्सिल्स, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांच्या सोप्या रचना करतो. | (१) ठसेकामात उपयोगी ठरेल असे परिसरातील नैसर्गिक साहित्य गोळा करण्यास सांगणे; जसे की, पाने, फुले इ.<br>(२) मुलांना कागदावर, वर्तमानपत्रावर साहित्यांचे ठसे उमटवण्यास सांगणे. | पाने, फुले इ. | (१) निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | दृश्यकला – चित्र | कलेची साधने | साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदा. काड्या, बिया, खडे, दगड, खडू, दोरा, पेन्सिल, ब्रश, भुकटी, कात्री इ.) | (१) वेगवेगळ्या कलानुभवांचे उपक्रम घेताना, विविध प्रकारच्या साहित्य, साधनांवर योग्यरीत्या पकड आणता येईल. यासाठी सराव करून घेणे.<br>जसे – रांगोळीत रंग भरताना व तर्जनी व अंगठ्याच्या चिमटीत रांगोळी पकडण्याचा, सोडण्याचा सराव.<br>(२) रंगीत खडू, कोळसा, पेन्सिलच्या साहाय्याने फरशी, कागद, भिंतीवर मुक्त आकार काढणे. | रंगीत खडू, कागद, रांगोळी पेन्सील इ. | (१) निरीक्षणाद्वारे मूल्यमापन करणे. |
| | शिल्प | द्विमितीय, त्रिमितीय कलाकृती | समवयस्क, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या सहयोगाने मोठ्या स्वरूपाची कामे करतो. | (१) वर्गातील वर्ग सजावटीसाठी, समवयस्कांचे गट तयार करणे व विविध कृती करणे.<br>उदा. पताका तयार करणे, तोरण तयार करणे, कागदी फुलांच्या माळा तयार करणे.<br>(२) मातीचा वापर करून विविध शिल्पांचे आकार बनवणे. उदा. पोळपाट, लाटणे, चमचा इत्यादींचे आकार.<br>(३) मातीच्या भांड्यांचे विविध आकार बनवणे. | रंगीत कागद, माती, क्ले, दोरा | (१) निरीक्षणाद्वारे मूल्यमापन करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | दृश्यकला – चित्र | कोलाज | स्वत:च्या रचनेमध्ये वेगवेगळ्या घनतेचे, रंगांचे आणि पोतांचे साहित्य एकत्र करून, कोलाज तयार करतो. | (१) वेगवेगळ्या आकारांचे, रंगांचे, पोतांचे साहित्य गोळा करण्यास सांगणे व रंग, आकारांनुसार वर्गीकरण करण्यास सांगणे. जसे – रंगीत कागदाचे तुकडे, झाडांची रंगीत पाने.<br>(२) त्या साहित्याची रचना करण्यास सांगणे. पृष्ठभागावर रंगीत कागदांचे तुकडे चिकटवणे. वस्तूंचे आकार रेखाटून, त्यात रंगाचे कागदी तुकडे, विविध झाडांची पाने चिकटवून कोलाज तयार करणे. जसे – घर, झाड, मासा, फूल यांचे बाह्य आकार | रंगीत कागदाचे तुकडे, झाडांची पाने. | (१) कलाकृतींचे निरीक्षणाद्वारे मूल्यमापन करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | दृश्यकला – शिल्प | त्रिमितीय आकार | परिसरातून मिळालेले साहित्य व वस्तू यांची सरमिसळ करून त्रिमितीय रचना/जोडणी करणे. | (१) परिसरातील सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तू गोळा करण्यास सांगणे. उदा. कागद, पुठ्ठा, झाडाची फांदी, पाने, फुले, रिकामी खोकी, विविध प्रकारच्या भाज्या इ.<br>(२) गोळा केलेल्या वस्तू हाताळण्यास देणे, दिलेल्या वस्तूंच्या मदतीने रचना करण्यास सांगणे. (मुक्तपणे रचना करण्याची संधी द्यावी.) उदा. झाडाच्या फांदीला कागद गुंडाळणे, रिकामे खोके वापरणे. | कागद, पुठ्ठा, झाडांची पाने, फुले, रिकामे खोके इ. | (१) निरीक्षणाद्वारे मूल्यमापन करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | शिल्प | त्रिमितीय कलाकृती | ठोकळे, स्टेन्सिल्स, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांच्या सोप्या रचना करतो. | (१) नैसर्गिक साहित्य (पाने, फुले, बिया, खडे, काड्या) रचना करणे.<br>(२) लाकडी ठोकळे, मणी वापरून रचना करणे.<br>(३) स्टेन्सिल्स वापरून रचना करणे. | पाने, फुले, खडे, बिया, ठोकळे, मणी, स्टेन्सील्स | (१) निरीक्षणाद्वारे मूल्यमापन करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | चित्र | नक्षीकाम | दृक् कलांमध्ये गडद व फिकट छाप/ठसे/रेघा काढण्यासाठी हातांचा कमी–जास्त दाब देता येण्यासाठी सक्षम होतो. | (१) दोरा रंगात बुडवून विविध आकार काढणे. जसे : रंग, हळद, कुंकू, पाने, फुले इ.<br>(२) उपलब्ध साहित्यांचा वापर करून, रंगाच्या साहाय्याने ठसे घेणे. कांदा, भेंडी, बटाटा यांसारख्या गोष्टींचा वापर करून, कमी अधिक दाबाने ठशांची पुनरावृत्ती करणे. यानंतर घेतलेल्या छापांचे, गडद रंगांचे, फिकट रंगांचे निरीक्षण करणे. | कांदा, भेंडी, बटाटा किंवा इतर भाज्या | (१) कृतीच्या आधारे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| | शिल्प | त्रिमितीय कलाकृती | उपलब्ध जागा व साहित्यानुसार लहान व मोठ्या आकारमानामध्ये स्वत:चे काम स्वत: करतो. | (१) माती, पाणी, इ. साहित्य उपलब्ध करून देणे. मातीपासून विविध आकार बनवणे. जसे : गोल, चौकोन, दंडगोल इ.<br>(२) मूळ आकारातून परिचित वस्तूंची शिल्पाकृती बनवणे. उदा. गोलाकारापासून सफरचंद, मडके इ. आकार बनवणे. | माती, पाणी, क्ले, मात–कामासाठी आवश्यक इतर वस्तू | (१) कृतीच्या आधारे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| | चित्र | कोलाज | स्वत:च्या रचनेमध्ये वेगवेगळ्या घनतेचे, रंगांचे आणि पोताचे साहित्य एकत्र करून कोलाज तयार करतो. | (१) ठरावीक आकारांचे रेखाटन करून, त्यात अनेक प्रकारच्या कोलाज साहित्याचा एकत्रित वापर करण्यास सांगणे. उदा. पृष्ठभागावर फुलपाखराचे रेखाटन करून, त्यात कागदाचे छोटे गोळे, कापडाच्या पट्ट्या, झाडांची पाने/फुले, एकत्रित चिकटवण्यास सांगणे. | कागद, विविध कापडाचे तुकडे, पाने, फुले इ. | (१) कृतीच्या आधारे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | चित्रकला | नक्षीकाम | एकाच साहित्याची विविध प्रकारे हाताळणी करून, त्याचे विविध पोत तयार करतो. उदा. माती, कापड, कागद, रबर, लाकूड | (१) विविध आकार तयार करण्यास सांगणे, वेगवेगळे आकार, पोत, साहित्य तसेच रंग गोळा करण्यास सांगणे.<br>जसे : झाडाच्या पानाला रंग लावून पोत तयार करणे. वेगवेगळे आकार, पोत तसेच रंग इ. साहित्य वापरून विविध नक्षीकामाच्या रचना तयार करण्यास सांगणे. (पुनरावृत्ती करून) | पाने, फुले, रंग, पोत, साहित्य | (१) कृतीच्या आधारे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | चित्रकला | ठसेकाम | परिसरात न मिळालेले साहित्य व वस्तू यांची सरमिसळ करून, त्रिमितीय रचना जोडणी करतो. | (१) उपलब्ध साहित्याचा वापर करून, ठशांच्या साहाय्याने चित्रनिर्मिती करणे. उदा. कुठल्याही वस्तूला एकदाच रंग लावून दोन पेक्षा जास्त वेळा छाप घेण्यास सांगावे व त्यातून एखादा आकृतिबंध तयार करावा. | जलरंग, नैसर्गिक रंग, ठसे कामासाठी परिसरात उपलब्ध साहित्य | (१) साहित्य वापर व आकृतीसंबंधीचे निरीक्षण करून, आकृतिबंध कसे तयार करतो याचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| | शिल्पकला | मातकाम | उपलब्ध जागा व साहित्यानुसार लहान व मोठ्या आकार–मानामध्ये स्वत:चे काम स्वत: करतो. छोटी बाहुली किंवा कागदाची मोठी बाहुली करणे. | (१) मातकामासाठी साहित्य उपलब्ध करून देणे. मातीच्या गोळ्यापासून विविध आकार बनवून, त्यांची जुळवाजुळव करून त्यापासून शिल्पाकृती बनवणे.<br>उदा. प्राणी, पक्षी, गणपती, बाहुली इ. | माती/क्ले, मातकामासाठी आवश्यक साहित्य | (१) कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | चित्रकला | कोलाज | दृक्कलांमध्ये गडद, फिकट छाप/ठसे/ रेघा काढण्यासाठी, हातांचा कमी–जास्त दाब देता येण्यासाठी सक्षम होतो. | (१) वर्ग सजावटीसाठी कोलाज पद्धतीचा वापर करण्यास सांगणे. उदा. एका रिकाम्या खोक्यावर रंगीत कागद, कापड, माती, रांगोळी, पाने, फुले यांचा एकत्रित वापर करून, वस्तू सजवणे; जसे : कागदाचे गोळे, कागदाची सुरळी, कागदाच्या पट्टीची सुरळी (पेपर क्विलिंग) | कागदाचे गोळे, कापडाचे तुकडे, गोंद, कागदी पट्ट्या इ. | (१) कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | चित्रकला | नक्षीकाम | एकाच साहित्याची विविध प्रकारे हाताळणी करून, त्यांचे विविध पोत तयार करतो. उदा. माती, कापड, कागद, रबर, लाकूड. | (१) पोताचे वेगवेगळे नमुने दाखवणे, उदा. कापड, गोणपाटाच्या पोताचे निरीक्षण करण्यास सांगणे.<br>(२) पोताकरता लागणाऱ्या साहित्याची यादी तयार करणे. उदा. कागद, कापड, गोणपाट यांच्या साहाय्याने, रंगांच्या साहाय्याने ठशांद्वारे आकर्षक पोत निर्मिती करण्यास सांगणे. | कापड, गोणपाट, कागद, लाकूड, रबर. | |
| **विकासक्षेत्र :** सौंदर्यात्मक आणि सांस्कृतिक विकास (आनंदमय कोष विकास)<br>**ध्येय : -** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.<br>**क्षमता :** C 12.2 - संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी, स्वत:चा आवाज, शरीर, जागा, विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | आवाज/ ध्वनी | आवाजातील फरक | स्वत:च्या आवाजाचा आणि शरीराचा वापर करून, तालबद्धतेचा शोध समजून घेतो. | (१) तोंडाने विविध आवाज करण्यास सांगणे. उदा. प्राण्यांचे आवाज, ओठांचा, जिभेचा वापर करून, अ, अ, अ, टप, टप, आ, आ असे आवाज इत्यादी. | स्वत:चे शारीरिक अवयव | (१) तालबद्धता समजली का, याचे निरीक्षण करून नोंदी घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | | | (टाळ्या, चुटक्या पावलांचा आवाज, हातांच्या लयबद्ध हालचाली, बडबडगीतातील शब्दोच्चार) | (२) शारीरिक अवयवांचा वापर करून, विविध शारीरिक हालचाली तालात करून घेणे.<br>उदा. टाळ्या वाजवत नाचणे, पाय वाजवणे, डोलणे, हात वर, खाली करणे इत्यादी. | | |
| | आवाजाची ओळख | आवाजाची निर्मिती | स्वतःचा आवाज, शरीर, वस्तू, वाद्यांचा वापर करून, विविध ध्वनी निर्माण करतो. | (१) वर्गातील विद्यार्थ्यांना एकत्र करून एकेका विद्यार्थ्यास तोंडाद्वारे विविध आवाज काढण्यास सांगणे.<br>उदा. काव-काव, म्याव-म्याव, भू-भू, धडाम-धूम, हसण्याचा आवाज, रडण्याचा आवाज, अ-अ, आ-आ इत्यादी.<br>(२) शरीराच्या अवयवांद्वारे विविध आवाज काढण्यास सांगणे.<br>उदा. टाळ्या वाजवणे, पाय आपटणे, हात आपटणे, बाकावर १ बोट, २ बोटे, ३ बोटे आपटून आवाज करणे, दंडावर थोपटणे, मांडीवर थोपटणे इ. आवाज.<br>(३) वस्तू व वाद्यांचा वापर करून, आवाज काढण्यास सांगणे.<br>उदा. पेन, पेन्सिल, टिपरी, टेबल, कपाट, भांडे, वाटी, चमचा, वाळलेल्या शेंगा इत्यादी. | स्वतःचे शरीर, परिसरातील उपलब्ध वाद्य, साहित्य, बाक, टिपरी, पेन, घुंगरू इत्यादी. | (१) शरीर, वाद्य, वस्तू इ. चा वापर करून आवाज निर्माण करतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (४) उपलब्ध वाद्यांचा वापर करून, आवाज निर्माण करण्यास सांगणे.<br>उदा. घुंगरू, घंटी, शिट्टी, टाळ, खंजिरी, हार्मोनिअम इत्यादी. | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | संगीत | आवाजातील चढ–उतार | आवाज, शरीर, वस्तू यांचा वापर करताना किंवा साधनांबरोबर खेळताना आवाज (लहान आणि मोठा) आवाजाची पट्टी (तीव्र आणि मृदू) यांच्या बरोबर प्रयोग करतो. | (१) लहान आवाज आणि मोठा आवाज करून, दोन्हींतील फरक ओळखण्यास सांगणे.<br>उदा. मोठ्याने बोलणे, ओरडणे, हळू बोलणे, कुजबुजणे इत्यादी. | उपलब्ध साधने | (१) आवाजाची मात्रा आणि आवाजातील चढउतार यांचा प्रयोग करतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |
| | जीवन कौशल्य | शांतता आणि स्थिरता | रोजच्या प्रसंगात शांतता आणि स्थिरता यांचा वापर करतो. | (१) प्रार्थनेच्या वेळी शांत राहण्यास सांगणे आणि राष्ट्रगीताच्या वेळेस स्थिर उभे राहण्यास सांगणे.<br>(२) शरीराच्या कोणत्याही अवयवाची हालचाल न करता, शांत बसणे किंवा स्थिर राहायला सांगणे. उदा. ३० सेकंद शांत बसण्यास सांगणे, हळूहळू कालावधी वाढवणे.<br>(३) स्थिरतेचे वेगवेगळे खेळ घेणे. उदा. स्टॅच्यू, सावधान, विश्राम इत्यादी. शिक्षक ओमकार | दृक्‌श्राव्य साधने, दिवा, तेल, वाती इ. | (१) रोजच्या प्रसंगात शांतता आणि स्थिरता यांचा वापर करतो का याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | म्हणेपर्यंत शांत बसण्यास सांगणे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा हात धरून दीप प्रज्वलन करणे, दिव्याने दिवा लावणे इ. | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | संगीत | संथ लय व द्रुत लय | स्वत:चा आवाज शरीर, वाद्य व इतर साधनांचा वापर करून, तालबद्धतेचा शोध घेताना द्रुत व | (१) संथ लयीतील (सावकाश) स्थानिक बोलीभाषेतील गीतांचा वापर करणे. उदा. बडबडगीते, कृतिगीते इ.<br>(२) उपलब्ध असलेल्या विविध वस्तूंवर/ वाद्यांवर संथ गतीने आघात करवून घेणे. | परिसरातील उपलब्ध वाद्य, वस्तू साहित्य, | (१) संथ व द्रुत लयीत फरक करतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | | | संथ लय यांच्यातील फरक समजून घेतो. | उदा. टेबल, बेंच, भांडे, उपलब्ध वाद्ये इत्यादी.<br>(१) संथ लयीतील, स्थानिक बोलीभाषेतील गीत जलद लयीत म्हणणे.<br>(२) शरीराच्या साहाय्याने काही कृती जलद गतीने करून घेणे. उदा. बडबडगीते, कृतिगीते, समूहगीते, जलद उड्या मारणे, दोरीवरच्या उड्या इत्यादी.<br>(३) शिक्षकांनी उपलब्ध वाद्य, साधने, संथ व द्रुत लयीत वाजवण्यास सांगणे.<br>(४) उपलब्ध वाद्य किंवा वस्तूंवर संथ गतीने किंवा जलद गतीने आघात करावयास लावणे. उदा. टाळ, टिपरी इत्यादी. | दृक्‌श्राव्य माध्यमे | |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | संगीत | आवाजाची निर्मिती | आवाज, शरीर किंवा साधने यांचा वापर करून, संदर्भ, परिस्थितीनुसार विविध ध्वनी निर्माण करतो. (भूमिका, अभिनय, एकल किंवा समूहामध्ये संगीतमय व्यवस्थित रचना, नकला यांमध्ये | (१) विविध प्राण्यांचे आवाज काढण्यास व अभिनय किंवा नक्कल करण्यास सांगणे. उदा. कुत्रा, मांजर, चिमणी, कावळा, घोड्यांच्या टापा इत्यादी.<br>(२) कथेतील प्रसंगातून विविध प्राणी, पक्षी इत्यादींचे आवाज काढण्यास सांगणे.<br>(३) बडबडगीत, कृतिगीत इ. गात असताना, त्याला साथ म्हणून टाळ्या, पाय वाजवणे याप्रमाणे कृती करणे.<br>(४) जलतरंग, (पाण्याची वाटी, ग्लास वापरून) पानांची पुंगळी, पेनचे टोपण, कागदाचा कोन इ. | परिसरातील उपलब्ध वस्तू<br><br>प्राण्यांचे आवाज इ. | (१) विद्यार्थी संदर्भ, परिस्थितीनुसार, विविध ध्वनी निर्माण करतात का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | संगीत | आवाजाचे वर्गीकरण | आवाज, शरीर, वस्तू यांचा वापर करताना, आवाजाची पट्टी (तीव्र व मृदू) बरोबर प्रयोग करतो. | (१) परिसरातील विविध आवाजांची तीव्रता समजणे. उदा. कुजबुजणे, पुटपुटणे, किंचाळणे. हळू आवाजातील चुटकी व मोठ्या आवाजातील टाळी, पत्र्याचा डबा, झांज, घुंगरू यांचा कोमल व तीव्र आवाज.<br>(२) परिसरातील पशुपक्ष्यांच्या आवाजातील फरक ओळखण्यास सांगणे. उदा. गाय, म्हैस, शेळी, वासरू, कुत्रा, मांजर, कोंबडा, पोपट, चिमणी, कोकिळा इ.<br>वरील उपलब्ध साधने, नैसर्गिक घटक | निसर्गातील उपलब्ध साधने, दृक श्राव्य साधने | (१) आवाजाची तीव्रता, मृदूता यांचा प्रयोग करतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | यांतील तीव्र व कोमल आवाज ओळखण्यास सांगणे. | | |
| | अभिनय | शांतता व स्थिरता | संगीत, नाट्य आणि हालचाली यांच्या साहाय्याने शांतता आणि स्थिरता यांच्या बाबतीत प्रयोग करतो. | (१) संगीत किंवा नाट्य हालचालीत शांतता, स्थिरता अनुभवणे. उदा. विद्यार्थ्यांना ठेक्यावर चालायला सांगून, मधेच थांबवणे, खाली बसून, डोळे मिटून, श्वासाचा आवाज ऐकण्यास सांगणे, तालाच्या ठेक्यावर लयबद्ध हालचाल करण्यास सांगून, मधेच ती थांबवणे.<br>(२) एखादे छोटे बालनाट्य किंवा प्रसंग, फक्त हालचालीद्वारे करण्यास सांगणे.<br>उदा. विद्यार्थ्यांच्या रोजच्या जीवनातील एखादा प्रसंग. घरातील सकाळचा आवराआवरीचा प्रसंग.<br>(३) स्थिरतेचा अनुभव देण्यासाठी कृती करून घेणे. उदा. गाणं, बासरी ऐकणे, गोष्ट सांगतानाची शांतता, गाणं म्हणणे, थांबणे, संगीत खुर्ची इत्यादी. | परिसरात उपलब्ध विविध साधने, दृक्‌श्राव्य साधने | (१) शांतता आणि स्थिरता यांचा प्रयोग करतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | संगीत | संथ, मध्यम व जलद | आवाज, शरीर, वाद्य व इतर साधनांसोबत खेळताना द्रुत, मध्यम व संथ लय यांच्यातील फरक समजून घेतो. | (१) संथ लयीत टाळ्या वाजवण्यास सांगणे.<br>(२) वेळेच्या अंतराने एकच कृती जलदपणे करण्यास सांगणे.<br>उदा. हात हालवणे, चालणे, खंजिरी, वाटी, चमच्याने वाजवणे.<br>(३) बडबडगीते संथ व जलद गतीने म्हणणे.<br>(४) संथपेक्षा जास्त आणि जलदपेक्षा कमी अशा मध्यम लयीत कृती घेणे.<br>उदा. मध्यम लयीत म्हणणे, उपलब्ध वाद्यांवर मध्यम लयीत थाप मारणे इ.<br>(५) संथ, मध्यम, जलद कृती एका मागे एक करण्यास सांगणे.<br>उदा. ठेक्याची लय क्रमाने म्हणजे संथ, मध्यम, जलद अशी वाढवत नेऊन, त्या वेगाप्रमाणे शारीरिक हालचाली करून घेणे.<br>(६) संथ, मध्यम व जलद ठेका वाजवून, त्यावर विविध गीते म्हणवून घेणे.<br>उदा. बडबडगीत, कृतिगीत इत्यादी. | खंजिरी, वाटी, चमचा इ. उपलब्ध साहित्य | (१) संथ, मध्यम व जलद लय यांच्यातील फरक समजून घेतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |
| | गायन | बोलणे व गाणे | स्वतःच्या गाण्याचा आणि बोलण्याचा आवाज यांत फरक करतो आणि दोन्हींचा खेळकरपणे वापर करतो. | (१) विद्यार्थ्यांना स्वतःच्या आवाजात म्हणण्यास सांगणे. वेगवेगळी वाक्ये परत परत म्हणवून घेणे. एकच वाक्य परत परत, वेगवेगळे भाव व्यक्त करत म्हणवून घेणे. उदा. मला खाऊ दे (प्रेमाने म्हणणे, हसत म्हणणे, रडत म्हणणे, रागाने म्हणणे) यासारखी वाक्ये. | दृक्‌श्राव्य साधनांचा वापर | (१) गाण्याचा, बोलण्याचा आवाज यांत फरक करून वापर करतो का याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | | | | (२) विद्यार्थ्यांकडून वरील कृती तालासुरात ठेक्यावर (गीत रूपात) म्हणून घेणे.<br>उदा. ज्या गीतात अंक, अक्षरे यांचा वापर आहे अशी गीते)<br>वरील कृती सातत्याने करणे अपेक्षित आहे. | | |
| | संगीत | वाद्यसंगीत (वादन)<br><br>कंठसंगीत (गायन) | वाद्यसंगीत आणि कंठसंगीत यांच्यातील फरक ओळखतो आणि दोन्हीही करतो. | (१) परिसरात उपलब्ध होणाऱ्या वाद्यांची ओळख करून देणे.<br>उदा. ढोल, खंजिरी, घंटा, टिपरी, लेझीम इ.<br>(२) उपलब्ध विविध वाद्यांद्वारे वेगवेगळे आवाज निर्माण करून, आनंद घेण्यास सांगणे.<br>उदा. पानाची पुंगळी, पेनचे टोपण, बाटलीचे टोपण, हार्मोनिअम, तबला इत्यादी.<br>(३) विद्यार्थ्यांकडून बोलीभाषेतील गीतांचा सराव करून घेणे.<br>उदा. बडबडगीते, लोकगीते, कृतिगीते इ.<br>(४) उपलब्ध दृक्‌श्राव्य माध्यमाद्वारे गाण्याचा सराव घेणे.<br>उदा. बडबडगीते, अभिनय गीते, कृतिगीते इ. | परिसरात उपलब्ध विविध वस्तू आणि वाद्ये, वाद्यांची चित्रे<br><br>दृक्‌श्राव्य माध्यमे | (१) वाद्यसंगीत आणि कंठसंगीत यांच्यातील फरक ओळखतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |
| | नाटक | आवाजातील विविधता व प्रसंग निर्मिती | कल्पना व भावना व्यक्त करतो, संगीत निर्मिती करतो, भूमिका रंगवतो आणि प्रसंग निर्माण करतो. | (१) हसण्याचे, रडण्याचे, चालण्याचे, धावण्याचे, टेबलावरच्या थापांचे, बोलण्याचे, यांसारखे विविध आवाज काढताना निर्माण होणाऱ्या भावना दर्शविणे. | अभिनय करण्यासाठी उपयुक्त साधने | (१) आवाजाची मात्रा, पट्टी यांचा वापर करतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | | | यासाठी आवाजाची मात्रा व आवाजाची पट्टी यांचा वापर करतो. | (२) दैनंदिन जीवनातील घडणाऱ्या घटना प्रसंग रूपाने सादर करून घेणे. उदा. भाजीवाल्याचा अभिनय, भेळवाला, आजी–आजोबांचा अभिनय, विविध धातूंच्या वाट्या एकाच चमच्याने वाजवणे, विविध प्राणी, पक्षी यांचे आवाज, प्राण्यांचा मृदू व तीव्र आवाज. उदा. काडीने भिंतीवर, मातीवर, टेबलावर मारणे.<br>(३) कृतीतून व आवाजातून, तसेच चेहऱ्यावरील हावभावांतून भूमिका व प्रसंग निर्मिती करणे. उदा. झोपणे, झोपताना विविध तीव्रतेत घोरणे इत्यादी. | | |
| | अभिनय | शांतता व स्थिरता | संगीत, नाट्य आणि हालचाली यांच्या साहाय्याने शांतता आणि स्थिरता यांच्या बाबतीत प्रयोग करतो. | (१) दोन वेगवेगळे भाव असलेले प्रसंग, गोष्टीद्वारे अथवा अभिनयाद्वारे सादर करून, त्यातील प्रसंगानंतरची शांतता अनुभवणे.<br>उदा. सुखकारक असलेले प्रसंग, विद्यार्थ्यांना शांत बसण्यास सांगणे. ३० सेकंद, ४० सेकंद ते १ मिनिट इ.<br>(२) हालचाल आणि स्थिरता यांचा अनुभव देण्यासाठी, कृतियुक्त खेळांचा उपयोग. उदा. संगीत खुर्चीचा खेळ घेणे. | व्हिडिओ, ऑडिओ क्लिप | (१) शांतता आणि स्थिरता यांचा प्रयोग करतो की नाही, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | संगीत | ताल, नृत्य | संथ, मध्यम लयीतील विविध व सोप्या ताल प्रकारांमध्ये हालचाली करतो. | (१) सोप्या तालातील छोट्या कृतियुक्त गीतांवर लयबद्ध हालचाली करून घेणे. उदा. बोलीभाषेतील बडबडगीते, लोकगीते, इ. वर विद्यार्थ्यांकडून नृत्य करून घेणे.<br>(२) खंजिरी, टाळ इ. वाद्ये संथ व मध्यम लयीत वाजवायला सांगणे व नृत्य करून घेणे. | दृक्‌श्राव्य साहित्य, वाद्य | (१) विविध ताल प्रकारांमध्ये हालचाली करतात का, हे तपासणे. |
| | गायन | सहअभिनय, गीतगायन | आवाज, शरीर, वस्तू आणि साधने यांचा वापर करून, परिचित गाणी व प्रसंग यांमध्ये साध्या ध्वनीद्वारा सुधारणा करतो. | (१) विद्यार्थ्यांना तालासुरात परिचित गाणी म्हणण्यास सांगणे. उदा. अभिनय गीते, बडबडगीते, कृतिगीते इ. (वरील गाणी तालामध्ये, टाळी देऊन म्हणवून घ्यावीत.)<br>(२) पाठ्यक्रमातील कविता कृतींसह तालासुरात म्हणवून घेणे. याकरिता विद्यार्थ्यांच्या सहभागातून सहज उपलब्ध विविध वाद्य साधनांचा उपयोग करणे.<br>(३) अभिनयातून पात्रांची ओळख करून देणे. उदा. भाजीवाली, फुगेवाला, डॉक्टर–पेशंट आई–बाबा संवाद इ. | उपलब्ध दृक्‌श्राव्य, साधने आवश्यकते–नुसार) | (१) विविध ताल प्रकारांमध्ये हालचाली करतात का, हे तपासणे.<br>(२) गीत गायन व अभिनय करण्याचा प्रयत्न करतो का, हे तपासणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गायन | आवाजातील मात्रा व पट्टी यातील फरक | संगीत रचना, जागा, संदर्भ आणि प्रसंग यांनुसार आवाजाची मात्रा आणि | १) शालेय प्रार्थना, देशभक्तिपर गीते, घोषणा या रचनांतील आवाजाचा चढ–उतार, यांची जाणीव करून देणे.<br>२) बंदिस्त खोलीतील आवाज व खुल्या मैदानातील आवाज कशा प्रकारे असतो याची जाणीव करून देणे. | दृक्‌श्राव्य साधने, उपलब्ध वाद्य | (१) आवाजाची मात्रा आणि आवाजाची पट्टी यात बदल करतो की नाही, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | आवाजाची पट्टी यामध्ये बदल करतो. | ३) संगीतातील आरोह-अवरोहानुसार स्वर म्हणवून घेणे.<br>उदा. आरोह-सा, रे, ग, म, प, ध, नि, सा<br>अवरोह - सा, नि, ध, प, म, ग, रे, सा, इत्यादी.<br>आरोह-अवरोहानुसार आवाजातील खालचा स्वर, मधला स्वर आणि उंच स्वर यांतील फरक दाखवणे. | | |
| | गायन | शांतता व स्थिरता | जागा, प्रसंग आणि संदर्भ यांनुसार, शांतता आणि स्थिरता याबाबत विविध काळासाठी प्रयोग करतो. | १) विद्यार्थ्यांतील एकाग्रता व स्थिरता या गोष्टींची अनुभूती निर्माण करणे.<br>उदा. डोळे बंद करून, दिवसभरामध्ये घडलेल्या सर्व गोष्टींची उजळणी करणे. (आठवणे)<br>२) भावनिक प्रसंग, ध्यान साधना, योग शिबिर या माध्यमातून शांतता व स्थिरता निर्माण करणे अपेक्षित आहे.<br>३) भ्रामरी प्राणायाम<br>३) दीर्घ श्वसन घेणे | दृक्श्राव्य साधने | (१) शांतता आणि स्थिरता यांचा प्रयोग करतो की नाही, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | संगीत | ताल<br>नृत्य | गाणे आणि हालचाली प्रमाणे ठेका धरतो आणि परिचित ताल प्रकारामध्ये वैविध्य आणण्यासाठी प्रयत्न करतो. | (१) उपलब्ध वाद्यांच्या साथीने लयबद्ध कवायत करून घेणे.<br>(२) बालगीत किंवा लोकगीतावर नृत्य करून घेणे.<br>(३) १–२–३ किंवा १–२–३–४ अशा प्रकारच्या तालाच्या नमुन्यानुसार हालचाली करून घेणे. | दृक्श्राव्य माध्यमांचा वापर | (१) ठेका आणि ताल यांचा वापर करतो का याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |
| | संगीत | गायन, वादन व नृत्य, नाट्य | गाण्यासाठी शरीराचे अवयव/वाद्य यांचा वापर करून, ठेका देणे, ध्वनीद्वारा नाटकातील प्रसंगासाठी पार्श्वभूमी तयार करणे. | (१) विविध प्रसंगांनुरूप गाणी विद्यार्थ्यांना ऐकवणे. दृक्श्राव्य माध्यमातून गीतगायन दाखवणे व गीतांचा सराव करून घेणे. उदा. सण–उत्सवांचे वर्णन, ऋतू वर्णन इ.<br>(२) विविध प्रसंगांनुरूप गीत गायन करणे. उदा. वाढदिवस गीत, दिवाळीवर्णन गीत, रक्षाबंधन गीत, इत्यादी.<br>(३) विविध वाद्यांचा वापर करून अभ्यास–क्रमातील कविता तालासुरात म्हणून घेणे.<br>(४) प्रसंगानुरूप नाट्यीकरण करणे. विविध वाद्यांचा, साधनांचा वापर करणे. उदा. जत्रेतील प्रसंग, खेळण्यांचा आवाज, डमरूचा आवाज इ. | दृक्श्राव्य माध्यमांचा वापर | (१) वाद्यांचा ठेका समजून घेतो व नाटकातील प्रसंगानुरूप हालचाली करतो. निरीक्षण करणे. |
| | गायन | स्वर–ताल | आवाज किंवा साधन यांचा वापर करून आवाजाची पट्टी जुळवून घेतो. | (१) अक्षरगीते, अंकगीते, कथागीते, नृत्य अभिनय, संचलन, देशभक्तिपर गीते इ. आवाजाचा योग्य उपयोग करणे.<br>(२) ताल व अलंकार शिकवणे. (सोपे) | उपलब्ध दृक्श्राव्य साधने | (१) आवाजाची पट्टी जुळवून घेतो का, याचे निरीक्षण करून नोंद घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उदा. ताल, दादरा, ताल–तीनताल, केहरवा इ.<br>धा, धी, ना–धा ती ना<br>धा गे न ती न क धी न<br>उदा. सासा रेरे गग मम पप धध निनि सासा इत्यादी.<br>(३) आवाजातील लय, ताल, स्वर या मूलभूत तत्वांचे ज्ञान करून देणे. | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | नाटक | शांतता<br><br><br><br><br>स्थिरता | जागा, संदर्भ आणि प्रसंग यांनुसार, शांतता आणि स्थिरता यांच्याबाबत विविध कालावधीसाठी प्रयोग करतो. | (१) विद्यार्थ्यांना जागा व प्रसंगानुसार संदर्भ देऊन, शांत बसण्यासाठी प्रयत्न करण्यास सांगणे.<br>उदा. १) घरामध्ये मोठ्या व्यक्ती चर्चा करत असताना. २) रुग्णालयामध्ये गेल्यानंतर शांत बसणे.<br>(२) विद्यार्थ्यांना प्रसंगानुरूप स्थिर होण्यासाठी सांगणे. उदा. प्रार्थना, राष्ट्रगीत म्हणताना, संगीत खुर्ची खेळ खेळताना मौन पाळणे इ.<br>**उपक्रम :**<br>(१) शिक्षक विद्यार्थ्यांना प्राणिसंग्रहालयात घेऊन जातात, ते संग्रहालयातील प्राणी पाहताना, त्यांना त्रास न देता शांतपणे प्राण्यांचे निरीक्षण करतात.<br>(२) शाळेमध्ये परिपाठाचे वेळी कमीतकमी ५ मिनिटे ते १० मिनिटांपर्यंत शांत बसण्यासाठी सांगणे.<br>(३) कोणत्याही कलेचे (गायन व नृत्य) सादरीकरण ऐकताना/पाहताना (एकाग्र होऊन) शांततेने रसग्रहण करणे. | दृक्‌श्राव्य माध्यमे, व्हिडिओ, ऑडिओ क्लिप | (१) कृती, निरीक्षणाद्वारे नोंद करणे.<br>(२) शांतता आणि स्थिरता यांचा वापर करतो की नाही, हे तपासणे.<br>(३) प्राणी पाहताना विद्यार्थ्यांच्या शांततेची नोंद घ्यावी.<br>(४) ऑडिओ, व्हिडिओ क्लिपद्वारे एखादी कला ऐकवून, त्यांच्या नोंदी घेणे. |

**क्षमता :** 12.3 बालक कलेच्या माध्यामातून स्वत:च्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेने उपयोग करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | शिल्प | क्षेत्रभेट | परिसर, स्थानिक संस्कृती आणि कलेचे नमुने यांचे निरीक्षण करतो आणि त्याचा स्व–अभिव्यक्तीशी सहसंबंध जोडतो. | (१) उपलब्धतेनुसार परिसरातील ऐतिहासिक, सांस्कृतिक स्थळांना प्रत्यक्ष भेट देणे, चर्चा करणे.<br>(२) चित्रकार्ड, चित्राकृती, छायाचित्र, दृक्श्राव्य माध्यमांद्वारे ऐतिहासिक, सांस्कृतिक स्थळांची माहिती देणे, चर्चा करणे.<br>(३) वर्गात विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करणे, त्यांवर चर्चा करणे. | ऐतिहासिक, सांस्कृतिक स्थळे, त्यांची चित्रे, फोटो, व्हिडिओ इ. | (१) विविध माध्यमांद्वारे दिलेल्या शिल्पांबाबत, चर्चेत सहभाग घेतो किंवा नाही, याचे निरीक्षण करून नोंदी करणे.<br>(२) स्वत:चा या शिल्पाशी प्रत्यक्ष किंवा कल्पनेद्वारे सहसंबंध लावतो किंवा कसे, याचे निरीक्षण करून नोंद करणे. |
| | नृत्य | वाद्यांच्या तालावर मुक्त हालचाली | वस्तू, व्यक्ती आणि भावनिक अनुभव यांची प्रतिकात्मक अभिव्यक्ती करण्यासाठी विविध दृश्य, प्रतिमा, | (१) आवाज निर्माण करणाऱ्या परिसरातील उपलब्ध वस्तूंची ओळख करून देणे. आवाज कमी जास्त करणे, ठरावीक अंतराने ठेका वाढवणे किंवा कमी करणे. उदा. ताट, वाटी, चमचा, बाक इ. | ताट, वाटी, चमचा, बाक इत्यादी. | (१) आवाजातील फरक ओळखतो किंवा कसे, हे पाहून नोंद करणे.<br>(२) आवाजातील ठेक्याला प्रतिसाद देतो. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | आणि आवाज निर्माण करतो.<br>शारीरिक हालचाली करतो. | (२) वाद्य वाजवताना वाद्याच्या तालावर ठेका धरून, मुक्त हालचाली करणे. उदा. चालणे, आनंदाने नाचणे इ.<br>(३) एखाद्या मुलाला नायक बनवून, इतर मुलांनी त्याच्या कृतीचे अनुकरण करणे.<br>(४) दु:खाने प्रतिसादात्मक रडणे, मुसमुसणे, आनंदाने हसणे इ. | | याचे निरीक्षण करून नोंदी घेणे.<br>(३) भावनिक अनुभवांचे प्रतिकात्मक सादरीकरण करतो किंवा कसे करतो, याचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | नाट्य | सर्जनशीलता | कलेबाबतच्या स्वत:च्या कल्पना, साधने आणि पद्धती इतरांना सांगतो आणि परिचित उदाहरणांच्या मदतीने त्यात सुधारणा करतो. | (१) स्वत:ची प्रतिमा मोठ्या आरशात पाहतो. परिसरातील विविध व्यक्तींचे निरीक्षण करतो. आई-वडील, शिक्षक, ड्रायव्हर, शिपाई काका इत्यादी. घरातील विविध वस्तू हाताळतो व फरक ओळखतो. भातुकलीच्या खेळातील साहित्य आणि घरातील वस्तूंमधील फरक ओळखतो. | भातुकलीच्या खेळातील वस्तू आणि घरातील वस्तू, आरसा | (१) निरीक्षण करून नोंद करणे. |
| | | अभिनय | दृश्य आणि ललित कलांच्या माध्यमातून व्यक्ती, प्राणी, वनस्पती, वस्तू | (१) चित्र किंवा व्हिडिओच्या माध्यमातून विविध व्यक्तिरेखा दाखवणे. उदा. वैमानिक, सैनिक, डॉक्टर, पोस्टमन काका इ.<br>(२) मुलांना डॉक्टर, शिक्षक, भाजी विक्रेता इत्यादींच्या भूमिका करण्याची संधी उपलब्ध करून देणे. | दृक्श्राव्य साधने | (१) परिसरातील विविध गोष्टी फरकासह ओळखता येतात याचे निरीक्षण व नोंद. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | इत्यादी ओळखतो. येण्याजोग्या शारीरिक आणि वर्तन वैशिष्ट्यांची नक्कल करतो. | (३) विविध प्राणी, पक्ष्यांचे आवाज काढणे.<br>(४) हत्ती, कावळा, कोकीळ इत्यादींची नक्कल, बागेतील फुलपाखरांची नक्कल इ.<br>(५) वनस्पतीचे डोलणे, सळसळणे इत्यादींची नक्कल. | | (२)मूकाभिनयाद्वारे व्यक्ती, वनस्पती, प्राणी, वस्तू इ. ओळखता येतात का, याचे निरीक्षण व नोंदी करणे.<br>(३) नक्कल करता येते का, याचे निरीक्षण व नोंदी. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | नाट्य | अभिनय | कलेच्या माध्यमातून स्वत:च्या कल्पना, साधने आणि कार्यपद्धती यांची देवाणघेवाण करतो व परिचित उदाहरणांतून सुधारणा करतो. | (१) भातुकलीतील खेळण्यांचा वापर करून, आईच्या स्वयंपाक करण्याच्या कृतीची नक्कल करतो.<br>(२) वाघ, सिंह, हत्ती, माकड इत्यादींचे आवाज ऐकतो व काढतो. मोर, बदक, कावळा, चिमणी, पोपट इत्यादींचे आवाज ऐकतो व काढतो.<br>(३) विविध व्यक्तींची नक्कल करतो आणि संवाद म्हणतो. उदा. आजी–आजोबा, आई–वडील, बहीण–भाऊ इ. | भातुकलीच्या खेळातील संच | (१) कृतीचे निरीक्षण करून नोंद करणे. |
| | | | स्वत:च्या कल्पना आणि अनुभव व्यक्त करण्यासाठी रूप,रंग, भूमिका, आवाज, जागा आणि प्रसंग यांचे कल्पकतेने एकत्रीकरण करतो. | (१) विविध उपलब्ध वाद्ये वाजवून, ध्वनी निर्माण करतो. आवाजाच्या वेगवेगळ्या क्रिया करतो. उदा. हळू आवाजात/मोठ्या आवाजात कुजबुजणे, बोलणे, मोबाइलवर बोलणे इ. भाजीवाला, भंगारवाला, रद्दीवाला इत्यादींचा अभिनय करतो. | विविध वाद्ये | (१) कृतीचे निरीक्षण करून नोंद करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | नाट्य | अभिनय | विशिष्ट कल्पना आणि भावना व्यक्त करताना विविधांगी दृष्टिकोन किंवा त्यात वैविध्य ठेवतो. | (१) परिसरातील विविध व्यक्तींच्या वेशभूषा करतो. उदा. डॉक्टर, दूधवाला भाजीविक्रेता, वैमानिक, वकील, नेता, अभिनेता, पोलीस इ. ग्राहक–विक्रेता, शिक्षक–विद्यार्थी यांचे संवाद सादर करतो.<br>मूकाभिनय करणे. उदा. दात घासणे, केस विंचरणे, झोपणे, धोबी, दूधवाला इ. | विविध व्यक्तींच्या वेशभूषा | (१) कृतीचे निरीक्षण करून नोंद करणे. |
| | | प्रसंगानुरूप सादरीकरण | अनेक उपाय आणि स्वत:चे स्रोत शोधून आव्हानात्मक परिस्थितीमध्ये टिकून राहतो. | (१) दैनंदिन जीवनातील व्यक्तिरेखा सादर करतो. व्यक्तिरेखा सादर करताना आवश्यक साहित्याचा स्वत: शोध घेतो. व त्या साहित्याचा परिस्थितीनुसार योग्य वापर करतो.<br>जसे – सैनिक, दुकानदार इ. | परिसरातील उपलब्ध साहित्य | (१) कृतीचे निरीक्षण करून नोंद करणे. |
| | चित्र | ठसेकाम, पोत ओळखणे | कलाकृतीची निर्मिती करताना व त्या पाहताना विषयानुरूप तपशील, साहित्याची वैशिष्ट्ये यांकडे लक्ष देतो. | (१) विविध वस्तूंच्या पृष्ठभागाचे ठसे घेणे. उदा. झाडांचे खोड, भिंत, नाणी इ.<br>(२) परिसरातील विविध वस्तूंचा पृष्ठभाग स्पर्शाद्वारे अनुभवण्यास देणे.<br>(३) पोत म्हणजे पृष्ठभागाच्या खडबडीत भागाचे अनुभव घेणे. उदा. फरशी, काच, गोणपाट, चादर, दगड, कापूस इ. | पेन्सिल, पेन, कागद, फरशी, काच इत्यादी. | (१) कृतीचे निरीक्षण करून नोंद करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | नाट्य | नाट्यीकरण, सादरीकरण | विशिष्ट विचार आणि भावना व्यक्त करताना अनेक दृष्टिकोन किंवा विविधता शोधतो. | (१) मुखवटा घालून विविध प्राण्यांचे/पक्ष्यांचे आवाज काढतो. स्वतःची ओळख करून देतो. परिसरातील विविध व्यक्तींच्या वेशभूषा सर्जनशीलतेने करून संवाद साधतो.<br>(२) स्वतःची ओळख करून देतो. ऐतिहासिक व्यक्तीची वेशभूषा करून, अभिनयासह संवाद म्हणतो. उदा. शिवाजी महाराज, राणी लक्ष्मीबाई, लोकमान्य टिळक इत्यादी.<br>(३) विविध वाहनांचे आवाज काढणे.<br>उदा. मोटारसायकल, रिक्षा, विमान, बस, रेल्वे, बैलगाडी, घोडागाडी इत्यादी.<br>(४) विशिष्ट व्यक्तिरेखा नाट्यीकरणाद्वारे साकारतो. | कागदी मुखवटे, विविध वेशभूषा | (१) सादरीकरण करताना विविध दृष्टिकोन वापरतो का, याचे निरिक्षण करणे, नोंद करणे.<br>(२) सादरीकरणात सर्जनशीलता उपयोगात आणतो का, याचे निरीक्षण करणे, नोंद करणे. |
| | नाट्य | प्रसंगानुरूप सादरीकरण | अनेक उपाय आणि स्वतःचे स्रोत शोधून आव्हानात्मक परिस्थितीमध्ये टिकून राहतो. | (१) दैनंदिन जीवनातील प्रसंग सादर करताना स्वानुभव, स्वतःचे साहित्य वापरतो.<br>(२) सहकाऱ्यांच्या मदतीने प्रसंग सादर करण्यासाठी स्वतःचे स्रोत वापरतो. उदा. पुस्तकाचे दुकान, फळ विक्रेता, शेतकरी, शेतमजूर इत्यादी.<br>(३) प्रसंग सादरीकरण करताना लागणारे साहित्य स्वतः आणतो व त्याचा वापर सादरीकरणात करतो. | प्रसंगानुरूप लागणारे परिसरातील साहित्य | (१) आव्हानात्मक परिस्थितीत स्वतःचे स्रोत वापरतो, कल्पकता वापरतो का, याचे निरीक्षण करून नोंद करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | चित्र | ठसेकाम (नक्षीकाम) | कलाकृतीची निर्मिती करताना व त्या पाहताना विषयानुरूप तपशील, साहित्याची वैशिष्ट्ये यांकडे लक्ष देतो. | (१) परिसरातील विविध रंगांच्या, विविध वस्तू एकत्र करतो व संग्रह करतो. संग्रह केलेल्या साहित्याच्या मदतीने कलाकृती तयार करतो. विषयानुसार प्रसंग उभा करताना, त्याचा योग्य प्रकारे वापर करतो. उदा. राष्ट्रीय सण, उत्सवासाठी विशिष्ट साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विशिष्ट साहित्य इत्यादी. | परिसरातील पाने, कपडे इत्यादी. | (१) विषयाच्या आवश्यकतेनुसार कार्यक्रमासाठी/ सादरीकरणासाठी अनुरूप साहित्य वापरतो किंवा कसे, याचे निरीक्षण व नोंद करतो. |
| **क्षमता :** 12.4 कला माध्यमामध्ये सहयोगाने काम करतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | नाट्य | आवाजावर आधारित शारीरिक हालचाली | व्यक्तिशः किंवा गटात विविध आवाज किंवा हालचाली यांचे प्रयोग करतो. | (१) मुलांचे छोटे गट तयार करून, कृतियुक्त हालचाली करतात. जसे : हसणे, रडणे, ओरडणे, चिरकणे, रुसणे, चालणे, धावणे इ.<br>(२) परिसरातील प्राणी, पक्षी यांचे आवाज काढतात. जसे : मांजर, कोंबडी, कुत्रा, गाय यांचे आवाज काढतो.<br>(३) गटामध्ये विविध प्राणी, पक्ष्यांचे हुबेहूब आवाज काढण्यास सांगणे. उदा. मांजर, कुत्रा, गाढव, चिमणी, इत्यादी.<br>(४) प्राण्यांचे आवाज काढतो. | दृक्‌श्राव्य साधने | (१) निरीक्षणाद्वारे नोंदी करणे. |
| | चित्र | सजावट (नक्षीकाम) | व्यक्तिशः किंवा गटात विविध आवाज किंवा हालचाली यांचे प्रयोग करतो. | (१) मुलांचे गट तयार करून, सामूहिक कृती तयार करतात. उदा. एका मोठ्या कागदावर किंवा भिंतीवर रंगाच्या साहाय्याने चित्र काढून व्यक्त होतात. | कागद, रंग | (१) कृतींचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | नाट्य | आवाजाची नक्कल | समवयस्कांच्या साहाय्याने विविध संभाषण, हालचाली, ध्वनी आणि दृश्यकलेचे नमुने तयार करतो. | (१) परिचित प्रसंगात जोडीजोडीने/गटागटात विद्यार्थी भूमिका करतात. संवाद निश्चित करून ते सादर करतात. जसे : दैनंदिन परिचयाचे प्रसंग, आई–बाबा, आजी–आजोबा, तसेच परिसरात त्यांनी अनुभवलेले संवाद. | | (१) गटांनी, दोघादोघांनी केलेल्या नाट्य सादरीकरणाचे निरीक्षण व नोंदी घेणे. |
| | चित्र | कोलाज | समवयस्कांच्या साहाय्याने विविध संभाषण, हालचाली, ध्वनी आणि दृश्य कलेचे नमुने तयार करतो. | (१) परिसरातील वस्तू समूहाने एकत्रित करून कलाकृती तयार करतो. जसे– रांगोळी, रंगीत दगड, माती, मणी इ. गटातून कल्पकतेने मांडणी व रचना करून, कलाकृती सादर करतो. | रंगीत दगड, माती, रांगोळी, पाने, फुले इ. | (१) निरिक्षणाद्वारे नोंदी करणे. |
| **क्षमता :** 12.4- ‘क’ | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | नाट्य, नृत्य | सादरीकरण | क–१ गटामध्ये पाय आणि हात यांच्या साहाय्याने लयबद्ध हालचाली करतो. जोडी किंवा गटामध्ये खेळताना किंवा सादरीकरण करताना संभाषण, हालचाली आणि आवाज यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न करतो. | (१) गटांमध्ये साभिनयासह बडबडगीत सादर करतो. जसे : बडबडगीत (दृक्‌श्राव्य) संभाषण लकबीसह भाजी विक्रेता, फळ विक्रेता, दूधवाला यांचा ग्राहकांशी होणारा संवाद, अभिनयातून समूहात सादर करतो. | दृक्‌श्राव्य माध्यमाचा वापर करावा. | (१) केलेल्या लकबीचे, कृतींचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | चित्र | रांगोळी | कलाकृती दर्शवताना किंवा अवकाशीय रचना करताना समवयस्क आणि सुलभक यांना साहाय्य करतो. | गटांमध्ये सामूहिकरीत्या रांगोळीची निर्मिती करणे. उदा. पाने, फुले, दगड, माती, वाळू, काड्या यांचा वापर करून, जमिनीवर रांगोळी तयार करणे. | पाने, फुले, दगड, माती काड्या इ. | (१) उत्स्फूर्त आहेत किंवा कसे, याचे निरीक्षण करणे व नोंदी घेणे. |
| | चित्र<br><br>नाट्य | नक्षीकाम सजावट<br><br>समूहातील सादरीकरण | कलाकृती दर्शवताना किंवा अवकाशीय रचना करताना, समवयस्क आणि सुलभक यांना साहाय्य करतो. | (१) राष्ट्रीय सणाच्या निमित्ताने विविध रंगांचे फुगे, कागदी फुले, पताका यांचा वापर करून, समवयस्क व सुलभकाच्या साहाय्याने सजावट करणे. उदा. वर्गाची सजावट, शालेय परिसर सजावट इत्यादी.<br>(२) विविध सण आणि उत्सव साजरे करताना, सहयोगाने समूहात काम करता येणे. जसे ग्रंथदिंडी, रक्षाबंधन, ईद, दिवाळी, ख्रिसमस इत्यादी. | गरजेनुसार व उपलब्धते– नुसार साहित्य वापरणे, दृक्श्राव्य माध्यमांचा वापर करणे, गरजेप्रमाणे स्थानिक साहित्याचा वापर करणे. | (१) स्वत: व समवयस्कांच्या साहाय्याने दिलेली कृती कशी करतो, याची निरीक्षणात्मक नोंद करणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | संगीत | आवाज/लय | सहकारी/गट यांच्यात सहभागी होताना, स्वत:च्या आवाजाची मात्रा, आवाजाची पट्टी आणि लय मर्यादेत ठेवतो. | (१) दिलेले गीत गटात समूहाने योग्य लयीत म्हणतो. उदा. जन गण मन, शालेय प्रार्थना, घोषणा, इत्यादी. वाहन, वाद्य, प्राणी, पक्षी, वातावरणातील आवाजाचे वर्गीकरण करतो. उदा. लहान – मोठा आवाज विद्यार्थी लयीमध्ये उजळणी, बाराखडी म्हणतात. उदा. १, २, ३, ४, ... (संथ गतीने) अ... ई... औ... (जलद गतीने) विद्यार्थी समूहात कृती करतो. | दृक्श्राव्य साधने | (१) निरीक्षणाच्या आधारे नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | नाट्य | अभिनय | भूमिकाभिनय, संगीत, नृत्य आणि हालचाली करताना त्यांच्या क्रमाकडे लक्ष देतो. | (१) निरनिराळ्या व्यक्तींच्या हालचालींचे निरीक्षण करून अभिनय करतो. उदा. वृद्ध व्यक्ती; शेतकरी, फुगेवाला, धावणारी व्यक्ती, हळूहळू पाय न वाजता चालणारी व्यक्ती. | दृक्श्राव्य माध्यमे | (१) निरीक्षणातून नोंदी करणे. |
| | संगीत | गायन | भूमिकाभिनय, संगीत, नृत्य आणि हालचाली करताना त्यांच्या कामाकडे लक्ष देतो. | (२) विद्यार्थ्यांना शारीरिक हालचाली, लयीचा क्रम समजतो. उदा. अभिनयगीते, बडबडगीते, कृतिगीते, इत्यादी. (साहित्य उपलब्ध नसल्यास टाळीच्या ठेक्यावर सराव घ्यावा.) | दृक्श्राव्य साधने | (१) निरीक्षणातून नोंदी करणे. |
| | | नृत्य | | ३) शिक्षकांनी शब्द न उच्चारता केलेल्या हालचाली मुले करून दाखवतात व त्या ओळखतात.<br>उदा. फूल उमलणे, हरिणासारख्या उड्या मारणे, झोपणे, पोहणे, लाथ मारणे, नागमोडी वळणे, भोवऱ्याचे फिरणे इ. | दृक्श्राव्य साधने | (१) विद्यार्थी कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| **क्षमता :** 12.5 विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना, विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | चित्रकला | रंग आणि आकार | कलाकृतीबाबत आवडी–निवडी व इतर मते व्यक्त करताना, शाब्दिक/ अशाब्दिक प्रतिसाद देतो. | (१) चित्रातील रंग, आकार यांविषयी स्वमत व्यक्त करतो. उदा. प्राणी, पक्षी, फुले, पाने इ. (स्थानिक भागात उपलब्ध घटकांचा व चित्रांचा वापर करावा.)<br>(२) विद्यार्थ्यांचे गट तयार करून, प्रत्येक गटास एक चित्र देऊन, निरीक्षण करून स्वमत व्यक्त करण्यास सांगणे.<br>(३) चर्चेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चित्रा–बद्दल बोलण्यास सांगणे. त्याची चित्राबद्दल इतर मते व्यक्त करण्यास सांगणे. | परिसरातील नैसर्गिक व मानवनिर्मित घटकांची चित्रे, छायाचित्रे/ व्हिडिओ क्लिप | (१) स्वतःच्या आवडीनिवडी व्यक्त करताना निरीक्षण करणे, त्याच्या नोंदी घेणे. विद्यार्थ्यांची इतर मते ऐकून घेणे व त्याची नोंद ठेवणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | चित्रकला | रंग व आकार यांची ओळख | कलेशी संबंधित कृतींमध्ये, इतरांच्या उपस्थितीची दखल घेतो. | (१) स्वत: काढलेले चित्र इतर पाहत असताना, चित्राबाबत मुद्दे स्पष्ट करतो.<br>(२) कलाकृती तयार करताना इतरांच्या उपस्थितीची दखल घेतो. त्यांच्या समवेत कलाकृतीच्या कामात सहभाग घेतो.<br>(३) विविध रंगांची खेळणी/रंगीत ठोकळे यांचे रंग आणि आकारानुसार इतरांच्या मदतीने गट तयार करतो. | रंगांचे तक्ते, फ्लेक्स इ.<br>रंगीत खेळणी, रंगीत ठोकळे | (१) दिलेल्या कृतींचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | नाट्य | स्थानिक नाट्यातील पात्र, स्थानिक शिल्प, ऐतिहासिक स्थळे | कलाकृती किंवा स्थानिक, सांस्कृतिक अभिव्यक्ती, यांच्या विविध पैलूंबाबत संवाद साधतो. (कलाकृती सादर करणाऱ्या पात्राचा टिपेचा व भीतिदायक आवाज) | (१) स्थानिक स्तरावरील प्रसिद्ध कलाकृती पाहतो. त्यातील पात्रांबद्दलचे विविध पैलू उलगडतो/सांगतो.<br>(२) परिसरातील वारसा स्थळे, कलाकृती यांबद्दल व्यक्त होतो, इतरांशी संवाद साधतो. | प्रत्यक्ष नाट्य चित्रफीत, छायाचित्र, प्रत्यक्ष कलाकृती | (१) उपक्रमाद्वारे विद्यार्थी विविध पैलू सांगतो याचे निरीक्षण करणे व नोंद घेणे.<br>(२) विद्यार्थी कलाकृतीबद्दल संवाद कसा साधतो, किती मुद्देसूदपणे बोलतो, याचे निरीक्षण करणे व नोंदी घेणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | नाट्य | सादरीकरण | कलेच्या प्रक्रियेदरम्यान समवयस्कांसोबत प्रतिसाद व कल्पनेची देवाणघेवाण करतो. | (१) वर्गांमध्ये सहाध्यायींसोबत 'फॅन्सी ड्रेस' सादरीकरणासाठी चर्चा करतो. या दरम्यान विविध वेशभूषांबाबतच्या कल्पना सांगतो. चर्चेत सहभागी होऊन प्रतिसाद देतो.<br>(१) ओरोगामी कलेसाठी एकत्रित काम करताना, समवयस्कांसोबत चर्चा करतो, कल्पनांची देवाणघेवाण करतो.<br>उदा. कागदाचे घडीकाम | वेशभूषा, कागदी मुखवटे | (१) समवयस्कां–सोबत देत असलेल्या प्रतिसादांचे व कलेसंदर्भातील कल्पनांच्या देवाणघेवाणीचे निरीक्षण करणे व नोंद करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | चित्र/शिल्प | कलाकृतींचे निरीक्षण व तुलना | विविध कलाकृती/रचना सांस्कृतिक अभिव्यक्ती यांची तुलना करतो आणि विविध प्रतिसाद शब्दांमध्ये स्पष्ट करतो. | (१) विविध चित्रे किंवा शिल्प दाखवून, त्याविषयी माहिती देणे. चित्र व शिल्प या दोन्ही विषयी दृक्श्राव्य/छायाचित्राच्या माध्यमातून माहिती देणे. चित्र हे द्विमितीय व शिल्प हे त्रिमितीय असते याची समज करून देणे.<br>उदा. परिसरातील उपलब्ध असलेली चित्रे व शिल्प दाखवणे. प्रसिद्ध शिल्पाची छायाचित्रे/व्हिडिओ क्लिप्स दाखवतात तसेच स्थानिक भागात चौकात असलेला पुतळा दाखवतात.<br>(२) गायन वादन यांतील फरक सांगणे गायन वादन याच्याशी संबंधित चित्रे/व्हिडिओ दृक्श्राव्य दाखवणे व त्यांची माहिती देणे. प्रश्नोत्तरांतून मुलांना बोलते करून, त्यातील फरक व साम्य विचारणे. | विविध चित्रे, शिल्प चित्र, शिल्पाची छायाचित्रे, दृक्श्राव्य साधने<br>चित्रे/ दृक्श्राव्य | (१) दिलेल्या कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | नृत्य व नाट्य | गायन व नाट्य यांतील साम्य व फरक | कलेबाबत प्रत्येक व्यक्तीचा प्राधान्य क्रम हा वेगळा असू शकतो, हे लक्षात घेतो. | (१) विद्यार्थ्यांचे गट बनवून, काही गटांना नृत्य व काहींना नाटिका सादर करण्यास प्रोत्साहित करणे. त्यानंतर दोन्हींमधील फरक व साम्य यांविषयी विचारणे. (जास्तीत जास्त मुलांना संधी देणे.) | दृक्‌श्राव्य माध्यम व वाद्ये इ. | (१) दिलेल्या कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| | चित्र | रेखाटणे व रंगवणे | कलेबाबत प्रत्येक व्यक्तीचा प्राधान्यक्रम हा वेगळा असू शकतो, हे लक्षात घेतो. | (१) रंग, कागद, खपट (पुठ्ठा), माती, रांगोळी, पेन्सिल, रंगीत खडू, इत्यादी साहित्यांमधून, स्वत:च्या आवडीने एक कलाकृती तयार करण्यास द्यावी.<br>उदा. चित्र, शिल्प, कोलाज, कागदी शिल्प, इत्यादी. | रंग, कागद, पुठ्ठा, माती, रांगोळी, रंगीत खडू | (१) दिलेल्या कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| | गायन | बडबडगीताचे सादरीकरण | कलेबाबत प्रत्येक व्यक्तीचा प्राधान्यक्रम हा वेगळा असू शकतो, हे लक्षात घेतो. | (१) तालासुरात बडबडगीताचे सादरीकरण करावे. उदा. ये रे ये रे पावसा, नाच रे मोरा इ. समूह गायनाकडून (मुलांच्या आवडीनुसार) वैयक्तिक सहभागासाठी प्रोत्साहन देणे. | दृक्‌श्राव्य साधने | (१) दिलेल्या कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| | नाट्य | सादरीकरण | कलेबाबत प्रत्येक व्यक्तीचा प्राधान्यक्रम हा वेगळा असू शकतो, हे लक्षात घेतो. | (१) वैयक्तिक सहभाग तथा चांगले सादरीकरण करणाऱ्या बालकांना प्रतिसाद देणे, प्रशंसा करणे. उदा. विविध कलांचे, सादरीकरण करण्यास संधी देणे. | दृक्‌श्राव्य साधने | (१) दिलेल्या कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | नाट्य, चित्रकला | मुखवट्याचा वापर करून नाट्य सादर करणे. | विविध कलाकृती/ रचना किंवा सांस्कृतिक अभिव्यक्ती यांची तुलना करतो आणि विविध प्रतिसाद शब्दांमध्ये स्पष्ट करतो. | (१) मुले शिक्षकांच्या साहाय्याने कागदाचा/इतर उपलब्ध साहित्याचा वापर करून मुखवटे बनवतील.<br>(२) मुखवटे लावून नाट्य सादर करतील व या नवीन नाट्य प्रकाराविषयी तुलनात्मक प्रतिसाद शब्दात व्यक्त करतील.<br>(कृती – कागद, कापड, पुठ्ठा इ. च्या साहाय्याने मुखवटा तयार करून घेणे.) | रंगीत कागद, मुखवट्याची बाह्यरेषा असलेला नमुना, गोंद चिकटपट्टी, काठ्या, आईस्क्रिम स्टिक इ. | (१) मुलांच्या कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| | गायन, वादन<br><br>चित्र | रसग्रहण<br><br>रेखाटन व रंगकाम | कलात्मक विचार आणि अभिव्यक्ती यांबाबत विविध प्रकारे प्रतिसादाची देवाणघेवाण करतो व त्यांची प्रशंसा करतो. | (१) एखादे गाणे ऐकवून त्याविषयी मुलांना प्रश्नोत्तर पद्धतीच्या माध्यमातून बोलते करणे. (उदा. गाण्यातील तुम्हांला काय आवडले, आवाज कसा वाटला इ.)<br>(२) एखादा प्रसंग सांगून, त्याचे अभिनय रूपात सादर करून घ्यावे. उदा. बस, रेल्वे प्रवास, वाढदिवस प्रसंग, डॉक्टर–पेशंट संवाद.<br>(३) भौमितिक आकारांची साधी–सोपी रचना करून, प्राथमिक श्रेणीच्या विविध छटांचा वापर करणे.<br>(४) दैनंदिन वापरातील विविध वस्तू, खेळणी, आवडणारे खेळ इत्यादींचे सोपे रेखाटन करून रंगवणे. उदा. मी आणि माझी बाहुली, बॅट–बॉल, फळे–फुले, प्राणी, पक्षी, इ. | दृक्‌श्राव्य साधने, स्पिकर<br><br>कागद, पेन्सिल, रबर, रंग, इ. | (१) मुलांच्या कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | नाट्य | सादरीकरण | कलात्मक विचार आणि अभिव्यक्ती यांबाबत विविध प्रकारे प्रतिसादाची देवाणघेवाण करतो व त्यांची प्रशंसा करतो. | (५) छोटे-छोटे संवाद सादर करण्याची संधी देणे. उदा. मी सिंह बोलतोय, मी सैनिक बोलतोय इ.<br>(६) सोबतच आवाजातील चढ-उताराविषयी प्राथमिक स्वरूपात अवगत करून देणे किंवा ऑडिओ संवादाबरोबर अभिनय, हालचाली करण्याची संधी उपलब्ध करून देणे. | माईक, स्पिकर बॉक्स, पेन ड्राईव्ह इ. | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | नाट्य, | सादरीकरण व रसग्रहण (बाहुलीनाट्य) | विविध कलाकृती/ रचना किंवा सांस्कृतिक अभिव्यक्ती यांची तुलना करतो आणि विविध प्रतिसाद शब्दांमध्ये स्पष्ट करतो. | (१) मुले शिक्षकांच्या मदतीने परिसरातील उपलब्ध साहित्याचा वापर करून पपेट्स बनवतील. त्यांचा वापर करून सोप्या संवादाद्वारे नाटिका सादर करतील व शिक्षक मुलांना नाट्य व बाहुली नाट्य (पपेट शो) यांतील फरक व साम्य विचारतील आणि मार्गदर्शन करतील. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतील. | नारळाच्या करवंट्या, फुगे, कागद, जुन्या प्लॅस्टिकची बाटली इ. परिसरातील उपलब्ध साहित्य. | (१) मुलांच्या कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| | चित्र, शिल्प, नृत्य, नाट्य, गायन, वादन | रसग्रहण फरक/ साम्य समजणे, स्पष्ट करणे. | विविध कलाकृती/ रचना किंवा सांस्कृतिक अभिव्यक्ती यांची तुलना करतो आणि विविध प्रतिसाद शब्दांमध्ये स्पष्ट करतो. | (१) छायाचित्रे किंवा दृक्श्राव्य माध्यमातून मुलांना कलेचे विविध प्रकार. चित्र, शिल्प, गायन, वादन, नृत्य, नाट्य यांबद्दलची समज आहे का, याची माहिती घेतील. मुलांना शब्दात प्रतिसाद देण्यास प्रोत्साहित करतील. | छायाचित्रे, दृक्श्राव्य साधने | (१) मुलांच्या कृतीचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | चित्र | वस्तूचित्र | कलात्मक विचार आणि अभिव्यक्ती यांबाबत विविध प्रकारे प्रतिसादाची देवाणघेवाण करतो व त्याची प्रशंसा करतो. | (१) भौमितिक, नैसर्गिक आकारांची सहज, सोपी रचना करणे व उपलब्ध रंगांच्या माध्यमाचा वापर करणे. वस्तूंच्या आकारमानाचे निरीक्षण करणे. उदा. लांबी, रुंदी, उंची, रंग, आकार (रेखाटन करणे आणि रंगवणे.) | ड्रॉईंग कागद, रंग साहित्य, कंपासपेटी | (१) मुलांच्या विविध कलाकृतींचे निरीक्षण करून नोंदी करणे. |
| | | | | (२) परिसराचे निरीक्षण करण्याची संधी उपलब्ध करून देणे व सूर्योदय, सूर्यास्त, निसर्गचित्र, झाडाची फांदी, झाडे, वृक्ष, पर्वत, शिखरे यांची सोप्या पद्धतीने रेखाटने करणे. | ड्रॉईंग कागद, रंग साहित्य, कंपासपेटी | |
| | नाट्य | सादरीकरण | | (३) एकापेक्षा अधिक पात्रे निवडून शालेय पाठ्यक्रमातील छोटे संवाद सादर करण्याची समूहात संधी देणे. मूकाभिनयाचादेखील यामध्ये समावेश करावा. आवाजातील चढ–उतार आणि सुस्पष्ट उच्चार करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, मार्गदर्शन करावे. परिपाठाच्या वेळी दिनविशेषाप्रमाणे नियोजन करावे. (वाचन प्रेरणा दिन) थोर व्यक्तींच्या व्यक्तिरेखा साकारतील. | मुखवटे, स्पीकर बॉक्स माईक, वेशभूषा इ. | |

**विकासात्मक क्षेत्र :** सकारात्मक अध्ययन सवयी

**क्षमता :** C 13.1.3.1 अवधान आणि हेतुपुरस्सर कृती : नियोजन, अवधान आणि विशिष्ट ध्येयप्राप्तीसाठी कृती करणे अशी कौशल्ये संपादित करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | सकारात्मक सवयी | एकाग्रता | कमी कालावधीसाठी स्वत:च्या कृतीवर लक्ष केंद्रित करतो. (उदा. कोडी सोडवणे) | (१) वेगवेगळ्या चित्रांच्या जोड्या लावणे.<br>(२) मोठ्या चित्रांतील फरक सांगणे.<br>(३) रंगांच्या जोड्या लावणे. | वेगवेगळी चित्रे (रंगीत) | (१) लक्ष एकाग्र करतो व दिलेली कृती करतो. |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | सकारात्मक सवयी | एकाग्रता | गुंतवून ठेवणाऱ्या एक किंवा दोन कृतींमध्ये अभिरुची टिकवून ठेवतो. (उदा. ५ ते १० मिनिटांसाठी) | (१) वेगवेगळ्या वस्तूंचे रंगानुसार वर्गीकरण करणे.<br>(२) वेगवेगळ्या चित्रांचे निरीक्षण करणे.<br>(३) चित्र रंगवणे/गिरगिटणे.<br>(४) ठसेकाम. | वेगवेगळ्या वस्तू, चित्र, रंग | (१) कृतीमध्ये अभिरुची टिकवून ठेवतो. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | सकारात्मक सवयी | एकाग्रता (अवधान) | प्रौढांच्या मदतीने सुरू असणारे प्रकटवाचन, कथाकथन यांसारख्या कृतींमध्ये काही काळासाठी लक्ष विचलित न होता एकाग्र होतो. | (१) विविध प्रसंग, गोष्ट ऐकताना लक्षपूर्वक ऐकण्यास सांगणे.<br>(२) विविध प्रसंगांचे व गोष्टींचे नाटक पाहताना, लक्षपूर्वक पाहण्यास सांगणे. | अभिनय करताना लागणारे काही कपडे व वस्तू | (१) लक्ष विचलित न होता गोष्ट ऐकतो व पाहतो. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | सकारात्मक सवयी | एकाग्रता | आवडणाऱ्या विविध कृती करत राहतो. (नाट्यात्मक खेळ आणि ठोकळे ठेवलेल्या ठिकाणी १० मिनिटांसाठी खेळतो.) | (१) सांगितलेल्या वेगवेगळ्या छोट्या गोष्टींच्या नाट्यात्मक कृती मन लावून करतो. | कृतीसाठी लागणाऱ्या वस्तू | (१) विविध कृती एकाग्रतेने करतो. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | सकारात्मक सवयी | नियोजन व एकाग्रता | रंगकाम, ब्लॉक जोडणे यांसारख्या कृती व कार्यावर जास्त कालावधीसाठी लक्ष केंद्रित करतो व आधिक्याने स्वतंत्रपणे करतो. | (१) मुलांकडून दिलेल्या आकृतीमध्ये नियोजनाप्रमाणे रंगकाम करून घेणे व कृती करून घेणे.<br>(२) रंग व आकाराप्रमाणे ठोकळे (ब्लॉक) जोडणीचे नियोजन करून, कृती करून घेणे. | रंग चित्र, ठोकळे | (१) सांगितलेली कृती नियोजन करून एकाग्रतेने करतो. |
| | सकारात्मक सवयी | एकाग्रता | आवडणाऱ्या कृतींमध्ये जास्त कालावधीसाठी गुंतून राहतो. (२० मिनिटे चित्र रंगवणे) | (१) दिलेल्या आकृतीमध्ये रंगकाम करून घेणे आणि ते पूर्ण करून घेणे.<br>(२) जास्तीत जास्त वेळ, न कंटाळता रंगकाम करून घेणे. | चित्र, रंग | (१) पूर्ण वेळ बसून लक्षपूर्वक कृती करतो. |
| | सकारात्मक सवयी | चिकाटी | प्रौढ व्यक्तींनी सुरू केलेल्या व बालकाला फारशी रुची नसणाऱ्या | १) शिक्षकांनी सांगितलेल्या कृती (जसे की, चित्र रंगवणे, गाणे म्हणणे, नृत्य करणे) मुलांचे लक्ष वेधून घेऊन, रुची तयार होण्यासाठी कृती वेगवेगळ्या प्रकारे करून घेणे. | कृतीसाठी लागणारे साहित्य | (१) रुची नसलेल्या कृतीमध्ये ही सहभागी होतो. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | कृतींकडे लक्ष देण्याची सुरुवात करतो. (उदा. शिक्षक केंद्रित नेतृत्व असणाऱ्या लहान गटामध्ये सहभागी होणे.) | | | |
| **क्षमता :** C 13.1.4.1 अवधान आणि हेतुपुरस्सर कृती : नियोजन, अवधान आणि विशिष्ट ध्येयप्राप्तीसाठी कृती करणे अशी कौशल्ये संपादित करतो. | | | | | | |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | सकारात्मक सवयी | चिकाटी | प्रौढ व्यक्तींनी सुरू केलेल्या व बालकाला फारशी रुची नसणाऱ्या कृतींकडेदेखील लक्ष देतो. (उदा. शिक्षक केंद्रित नेतृत्व असणाऱ्या लहान गटामध्ये सहभागी होणे.) | (१) शिक्षकांनी सांगितलेल्या कृती (जसे की, चित्र रेखाटणे, रंग भरणे, चिकटकाम करणे, मातीला आकार देणे, गाणे म्हणणे, नृत्य करणे) आवडत नसले, तरी लक्ष देऊन करून घेणे. | कृतीसाठी लागणारे साहित्य | (१) न आवडणाऱ्या कृतींमध्ये लक्ष देऊन सहभागी होतो. |
| | सकारात्मक सवयी | एकाग्रता, अवधान/चिकाटी | कृतींमध्ये जास्त कालावधीसाठी गुंतून राहतो. (२० मिनिटे) | १) शिक्षकांनी सांगितलेल्या कृती आवडीने करण्यासाठी पूर्ण वेळ देऊन करून घेणे. (चित्र रेखाटणे, रंग भरणे, चिकटकाम करणे, मातीला आकार देणे, गाणे म्हणणे, नृत्य करणे) आवडत नसले तरी लक्ष देऊन करून घेणे. | कृतीसाठी लागणारे साहित्य | (१) कृतींमध्ये पूर्ण वेळ गुंतून राहतो. |

**क्षमता :** C 13.1.5.1 अवधान आणि हेतुपुरस्सर कृती : नियोजन, अवधान आणि विशिष्ट ध्येयप्राप्तीसाठी कृती करणे अशी कौशल्ये संपादित करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | सकारात्मक सवयी | चिकाटी | प्रौढ व्यक्तींनी सुरू केलेल्या व बालकाला फारशी रुची नसणाऱ्या कृतींकडे देखील लक्ष देतो. (उदा. शिक्षक केंद्रित नेतृत्व असणाऱ्या लहान गटामध्ये सहभागी होणे.) | १) शिक्षकांनी सांगितलेल्या कृती (जसे की, चित्र रेखाटणे, रंग भरणे, गाणे, नृत्य करणे, चिकटकाम करणे, मातीपासून खेळणी तयार करणे इ.) आवडत नसल्या तरी, लक्ष देऊन कृती करण्यात सहभागी करून घेणे. | कृतींसाठी आवश्यक साहित्य | दिलेली कृती आवडत नसली तरी, लक्ष देऊन करतो. |
| | सकारात्मक सवयी | एकाग्रता, अवधान/चिकाटी | कृतींमध्ये जास्त कालावधीसाठी गुंतून राहतो. (३० मिनिटे) | १) शिक्षकांनी दिलेली कृती (जसे की, चित्र रेखाटणे, रंग भरणे, घडीकाम करणे, माती मळणे व खेळणी तयार करणे. गीत गाणे, नृत्य करणे, वाद्य वाजवणे, इ.) अधिक काळ ३० मिनिटांपर्यंत करून घेणे. | कृतींसाठी आवश्यक साहित्य | दिलेली कृती अधिक वेळेपर्यंत (३० मिनिटे) करतो. |

❑❑❑

# पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम - २०२४
## (वय वर्षे ३ ते ८)
## विषय : कार्यशिक्षण

### प्रस्तावना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० (NEP-2020) मध्ये ५ + ३+ ३ + ४ हा आकृतिबंध स्वीकारण्यात आला आहे. या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे, सुरुवातीची ३ ते ८ वर्षे (पायाभूत स्तर) बालकाच्या वाचन, लेखन, संख्याज्ञान, शारीरिक, भाषिक, बोधात्मक, सामाजिक, नैतिक व भाषा आणि कारक विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. बालकाचे प्रारंभिक बाल्यावस्थेतील वय वर्षे ३ ते ६ चे शिक्षण अंगणवाडी/बालवाडी यांमधून होत असते, तर वय वर्षे ६ ते ८ चे प्राथमिक शिक्षण संस्थात्मक व्यवस्थेमध्ये, अर्थात शाळेत उत्तम पद्धतीने होण्यासाठी, एकूणच संस्थात्मक वातावरण व शाळेशी संबंधित सर्व घटकांवर विशेष लक्ष देण्यावर भर आहे. देशासाठी सर्वगुणसंपन्न, समृद्ध नागरिक घडावा, यासाठी प्रथमच ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या शिक्षणाचा संपूर्ण प्रक्रियेसह विचार केला आहे. पायाभूत शिक्षणाच्या स्तरावरील अभ्यासक्रमात, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) यांवरही भर देण्यात आला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० (NEP-2020) अभ्यासक्रमात पंचकोश विकसनाला महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने, प्रत्येक क्षेत्रात पंचकोश अंतर्भूत करण्यात आले आहेत. पायाभूत स्तराचा विचार करता, बालकाची शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक स्थिती पाहता, कार्यशिक्षणातून पंचकोश विकसनाच्या दृष्टीने वैविध्यपूर्ण उपक्रमांची मांडणी करण्यात आली आहे.

बालकांच्या कारक कौशल्याबरोबरच, एकविसाव्या शतकातील महत्त्वपूर्ण कौशल्ये, तसेच कृषी, पर्यटन व्यावसायिकतेचा पाया, याच पायाभूत स्तरांपासून घातला जाईल, अशा उपक्रमांची मांडणी केलेली आहे. कार्यशिक्षणाच्या उपक्रमांद्वारे, बालकांना 'स्व'ची ओळख, तसेच गृहभाषा, मातृभाषा, कला, स्वतःच्या परिसराविषयी आत्मीयता, सण, समारंभ, स्थानिक खेळ, परंपरा यांचा परिचय एकात्मिक पद्धतीने होणार आहे. कार्यशिक्षणाच्या विविध उपक्रमांद्वारे, बालकांच्या भविष्यातील व्यावसायिकतेची नांदी, याच स्तरामध्ये सुरू होणार आहे.

कार्यशिक्षणाचे उपक्रम प्रत्यक्षपणे वर्गात आणि वर्गाच्या बाहेर सर्वसमावेशकपणे पूर्ण होणार आहेत. विशेष गरजा असणाऱ्या बालकांना सामावून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

भारतीय संस्कृतीची रुजवणूक होण्यासाठी, स्थानिक उत्सव, समारंभ, परंपरा, कला, पिके, भौगोलिक रचना, उपलब्ध साधनसामग्री यांचाही विचार, कार्यशिक्षण विषयाच्या उपक्रमांची मांडणी करताना करण्यात आलेला आहे.

भारत हा कृषिप्रधान देश असल्याने, भारतात कृषिक्षेत्रास अनन्यसाधारण महत्त्व आहे. या संदर्भात भारतातील शेतीचे महत्त्व, कृषिक्षेत्रातील मानवी (मानवी संसाधने) गुंतवणूक, शेतीचे लोकजीवनातील विशेष स्थान, या सर्व बाबींचा विचार करता, सदर आराखड्यात नव्या पिढीची नाळ कृषिक्षेत्राशी जोडण्यासाठी कृषिक्षेत्राचा, कृषितंत्रज्ञानाचा विस्तार होण्यासाठी, माती, पाणी, नैसर्गिक संसाधने, वनस्पती, स्थानिक पशुपक्षी या विषयातील अनेक उपक्रम सुचवलेले आहेत.

पर्यटन हा मानवी जीवनातला अतिशय महत्त्वाचा भाग आहे. बालकांना पर्यटन व्यवसायात विविध संधी उपलब्ध आहेत. पर्यटनक्षेत्राविषयी माहिती, परिचय याच स्तरावर देण्यासाठी उपक्रमांची योजना केलेली आहे.

आपला देश माहिती–तंत्रज्ञान क्षेत्रात एक प्रगत देश म्हणून ओळखला जात आहे. माहिती–तंत्रज्ञानाचा वापर सर्व क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात केला जात आहे. शैक्षणिक क्षेत्रात बालकांना पायाभूत स्तरापासून, माहिती तंत्रज्ञानाचा वापर योग्य पद्धतीने करता यावा, यासाठीचे सोपे व सुलभ उपक्रम मांडलेले आहेत.

कार्यशिक्षणाचे उपक्रम आपल्या वर्गात पूर्ण करताना, शिक्षकांना भरपूर स्वातंत्र्यही देण्यात आले आहे. ते आपला भौगोलिक परिसर, स्थानिक उपलब्ध साधनसामग्री, यात्रा, उत्सव, समारंभ, कला, परंपरा यांनुसार उपक्रमांचे आयोजन आणि कार्यवाही करू शकणार आहेत. वर्गातील वातावरण, बालकांचे वर्तन स्थिरावण्यासाठी सकारात्मक मार्गदर्शन, शिस्त, प्रदर्शन, चैतन्यदायी अध्ययन कोपरे, बोलक्या भिंती, अध्ययन समृद्ध वातावरण यांवर भर देण्यात आलेला आहे. पायाभूत स्तरावर बालकांना आपल्या ज्ञानेंद्रियांचा वापर सक्रियतेने करता येईल. बालकांना जास्तीत जास्त वस्तू हाताळण्याची आणि उपक्रमात सहभागाची संधी मिळेल. बालकांच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी याच स्तरावर होईल, अशाप्रकारे उपक्रमांची योजना आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, अभ्यासक्रमाची मांडणी, ध्येये, क्षेत्रे, क्षमता, अध्ययन निष्पत्ती, अध्ययन अनुभवांची रचना, अध्ययन साधने, मूल्यमापन निर्देश या क्रमाने केलेली आहे. पायाभूत शिक्षण स्तरावर ४० टक्के भारांशासाठी संस्कृती संवर्धन, जलसाक्षरता, आपत्ती व्यवस्थापन, अभिरुचीपूरक आणि कौशल्याधिष्ठित उपक्रम अंतर्भूत केले आहेत.

६० टक्के भारांशासाठी ऐच्छिक उपक्रमांमध्ये उत्पादकतेला प्रेरणा देणारे, अन्न, वस्त्र, निवारा, पर्यटन, कृषी, पशुपक्षी संवर्धन, माहिती–तंत्रज्ञान यांचा विचार करून, संबंधित उपक्रम सुचवण्यात आले आहेत.

अध्ययन निष्पत्ती व पंचकोशीय विकास यांचा सहसंबंध पुढील तक्त्याद्वारे पाहूया.

| विकासक्षेत्र | अभ्यासक्रमाची ध्येय | क्षमता | संबंधित कोश |
|---|---|---|---|
| सामाजिक, भावनिक, नैतिक विकास | C G.4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. | C 4.1 - कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो. | मनोमय कोश |

| विकासक्षेत्र | अभ्यासक्रमाची ध्येय | क्षमता | संबंधित कोश |
|---|---|---|---|
| | | C 4.2 - विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. | मनोमय कोश (भावनिक विकास, भावना ओळख) |
| | | C 4.3 - इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो. | मनोमय कोश (सामाजिक आणि भावनिक विकास) |
| | | C 4.4 - इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो. | मनोमय कोश (सामाजिक विकास, सहकार्य, नेतृत्व) |
| | | C 4.5 - शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो. | मनोमय कोश (नैतिक शिक्षण, सकारात्मक वर्तन) |
| | | C 4.6 - गरजेच्यावेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतींसह) मदत करतो, दया-भाव दर्शवतो. | मनोमय कोश (सामाजिक, भावनिक, नैतिक विकास-सेवावृत्ती, मदत, सहकार्य) |
| | | C 4.7 - इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेऊन, त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो. | विज्ञानमय कोश (बौद्धिक विकास, तुलना) मनोमय कोश (भावनिक विकास-भाव प्रकटीकरण) |
| | C G.5 - बालके उत्पादक कार्याबाबत व सेवेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात. | C 5.1 - इतरांना मदत करण्यासाठी, वयानुरूप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवतो आणि त्यामध्ये सहभागी होतो. | मनोमय कोश (सामाजिक विकास-श्रमप्रतिष्ठा, सद्गुण, सदाचार) |
| | C G.6 - बालके स्वतः भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञता भाव दर्शवितात. | C 6.1 - सर्व प्रकारच्या जीवांची काळजी घेतो व त्यांच्यासोबत राहण्यात आनंद मानतो. | मनोमय कोश (संवेदनशीलता, कृतज्ञता भाव) आनंदमय कोश (एकरूपता) विज्ञानमय कोश (कुतूहल - जाणून घेणे.) |

सर्व कोश हे एकमेकांशी संबंधित आहेत. प्रत्येक होणाऱ्या कृतीतून, जरी आपण एखाद्या कोशाच्या विकसनाचा विचार केला, तरी त्याचबरोबर अन्य कोशाचेही विकसन होऊ शकते, त्यामुळे प्रत्येक कोश वेगवेगळा विकसित न होता, एकाचवेळी सर्व कोशांचे विकास हे समांतर सुरू असतील. त्यादृष्टीने बालकांना योग्य पद्धतीने विकसित करण्याचा प्रयत्न करता येईल.

(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर–२०२४)

सामाजिक, भावनिक, नैतिक या क्षेत्रांतील क्षमता, बालकांमध्ये रुजवण्यासाठी अध्ययन निष्पत्ती दिलेल्या आहेत.

याचबरोबर अध्ययन निष्पत्ती आणि नियोजनपूर्वक अध्ययन अनुभवांची रचना करून, कार्यशिक्षण विषय बालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, मनोरंजक, आशयघन, माहिती–तंत्रज्ञान साधनांचा वापर, अध्ययन–अध्यापन पद्धतीत करणे अपेक्षित आहे.

कार्यशिक्षण उपक्रमांचे मूल्यमापन, अध्ययन निष्पत्तींच्या आधारे करणे गरजेचे आहे. अध्ययन निष्पत्तींचे प्रतिबिंब स्पष्ट होण्यासाठी, संचिका, कार्यशिक्षण कोपरे यांचा वापर अपेक्षित असणार आहे, तसेच समग्र प्रगती पुस्तक (HPC) मूल्यमापनासाठी प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

एकंदरीतच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मध्ये, दिव्यांग बालकांसह सर्व बालक, शिक्षक, पालक, कुटुंब, समाज यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न केलेला आहे. यामध्ये वयोगटानुसार अभ्यासक्रम ध्येयांची व त्यानुसार अनुरूप अध्ययन कृतींची रचना करण्यात आलेली आहे.

चला, आपण मिळून भारत देशाला पायाभूत शिक्षण स्तरावर संपन्न, समृद्ध, सक्षम करण्याच्या प्रक्रियेत एकजुटीने काम करण्यासाठी कटिबद्ध होऊयात.

### कार्यशिक्षण विषयाची ठळक उद्दिष्टे :

१) **श्रमप्रतिष्ठा :** श्रम आणि कौशल्य यांवर आधारित कामे करणे, तसेच श्रमजीवी लोकांबद्दल आदराची भावना ठेवून त्यांचा सन्मान राखणे.

२) **उद्योजकतेचे शिक्षण :** बालकांमध्ये उद्योजकतेविषयी असलेल्या सुप्त गुणांचा विकास करणे, तसेच उपजत असलेल्या गुणांना वाव देऊन, उद्योजकतेविषयीचे आवश्यक ज्ञान देणे.

३) **जीवन क्षमता विकसित करणारी कौशल्ये :** बालकांच्या गरजा व समस्या यांच्याशी निगडित उपक्रमांद्वारे निरोगी व आनंदमय जीवन जगण्यासाठी, कौशल्ये विकसित करण्यात मदत करणे.

४) **समाजोपयोगिता व कार्यजगताचे समन्वेषण :** कार्यशिक्षणातील उपक्रमांतून, समाजातील उद्योगमूलक कार्यांची ओळख करून घेण्याची संधी प्राप्त करून देणे आणि समाज विकसनासाठी त्यांचा उपयोग करण्याची क्षमता निर्माण करणे.

५) **कार्यातील स्व–भूमिकेची समज :** विविध उपक्रमांतील कार्य निश्चितीनंतर त्या कार्यातील स्व–भूमिका समजावून घेऊन त्यातील कार्यकारणभाव, शास्त्रीय तत्त्वे व क्रमवारिता यांची माहिती घेणे.

६) **अर्थोत्पादन क्षमता :** उत्पादक उपक्रमाचा सराव करत असताना, बालकांमध्ये उत्पादनास आवश्यक अशी प्राथमिक कौशल्ये निर्माण करणे व शक्य तेथे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात मर्यादित अर्थोत्पादन करण्याची क्षमता निर्माण करणे.

७) **कार्यकौशल्य विकास :** उत्पादक कार्यातील सुबकता, अचूकता, आकर्षकता, गतिमानता, प्रदर्शन व विक्री यांबाबतची कौशल्ये विकसित करणे.

८) **कार्यसंस्कृतीचे जतन व संवर्धन :** परिसरातील विविध कार्यांची ओळख करून घेणे. सामाजिक रूढी–परंपरा आणि प्रथा यांमागील कार्याची ओळख करून घेणे. कार्यकारणभाव जाणून त्यांचे जतन व संवर्धन करण्यास मदत करणे.

९) **अनिवार्य उपक्रम :** सर्व शाळांमध्ये उपक्रमाच्या बाबतीत एकसूत्रीपणा आणण्यासाठी व बालकांमध्ये समाजोपयोगी कार्याची वृत्ती जोपासण्यासाठी अनिवार्य उपक्रमांची योजना करणे.

१०) **कार्यशिक्षणातून पर्यावरणाची जाणीव :** अनिवार्य उपक्रमांतून तसेच उत्पादक उपक्रमांतून पर्यावरण संरक्षण व संवर्धन यांची जाणीव निर्माण करणे.

**कार्यशिक्षणाची सामान्य उद्‌दिष्टे :**

१) आधुनिक तंत्रज्ञान, राष्ट्रीय परंपरा, संस्कृती यांचा समन्वय साधण्यासाठी कार्यशिक्षणाची आवश्यकता समजून घेणे.

२) स्थानिक, वैश्विक व मुक्त व्यवस्था यांचा होणारा सकारात्मक व नकारात्मक प्रभाव जाणून घेणे.

३) नैसर्गिक, सामाजिक व मानवी आंतरक्रियेची जाणीव निर्माण करणे.

४) मानवी जीवनातील ताणतणाव दूर करण्याचे मार्ग व त्यांची साधने जाणून घेणे.

५) दैनंदिन जीवनातील माहितीचे आकलन व उपयोजन करून निश्चित दिशा विकसित करणे.

६) नैतिक, सामाजिक व राष्ट्रीय मूल्यांवर आधारित व्यक्तीचे गुण विकसित करून समाजाला उपयोगी नागरिक घडविणे.

७) पूर्व व्यावसायिक व व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे.

८) आधुनिक तंत्रज्ञान व मानवी कार्यक्षमता या एकमेकांस पूरक राहतील, याची जाणीव निर्माण करणे.

९) दृक्‌श्राव्य कलांच्या सादरीकरणातून सर्जनशील व स्वयं–प्रकटीकरण क्षमता जोपासणे.

१०) सार्वजनिक साधनसंपत्तीची जपणूक करणे.

बालकांमध्ये भारतीय असण्याचा अभिमान, हा विचार मन, बुद्‌धी, कृतीतही खोलवर बिंबवणे, तसेच ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि भावना विकसित करणे हा या धोरणाचा दृष्टिकोन आहे.

## कार्यशिक्षण विषयाचे स्वरूप व भारांश

### पायाभूत स्तर (वय ३ ते ८ वर्षे )

- अनिवार्य उपक्रम ४०%
  - गरजाधिष्ठित उपक्रम २०%
    - संस्कृती कार्यजगताची ओळख
    - जलसाक्षरता
    - आपत्ती व्यवस्थापन (परिपाठ, दैनंदिन कामकाजाचे नियोजन, राष्ट्रीय उत्सव, समारंभ)

    **या उपक्रमांतर्गत अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण करून घ्यावा.**
  - अभिरुचिपूरक उपक्रम १०%
    - **या उपक्रमांतर्गत वर्षभरात किमान दोन उपक्रम विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार करून घ्यावेत.**
  - कौशल्याधिष्ठित उपक्रम १०%
    - **या उपक्रमांतर्गत वर्षभरात किमान दोन उपक्रम विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार करून घ्यावेत.**
- ऐच्छिक उपक्रम ६०% (कोणताही एक उपक्रम)
  - उत्पादक क्षेत्र ३०%
    - अन्न १०%
    - वस्त्र १०%
    - निवारा १०%
  - इतर क्षेत्र ३०% (कोणतेही एक क्षेत्र)
    - क्षेत्र १ (३०%) → शेती (कृषी)
    - क्षेत्र २ (३०%) → पशु-पक्षी संवर्धन
    - क्षेत्र ३ (३०%) → तंत्रज्ञान
    - क्षेत्र ४ (३०%) → पर्यटन

**शाळेने स्थानिक परिस्थिती आणि उपलब्ध साधन-सुविधा लक्षात घेऊन, नवीन उपक्रमाची निवड, इतर क्षेत्रांमध्ये करता येईल, यासाठी नवीन उपक्रमाचा अभ्यासक्रम तयार करून, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांची मान्यता घेण्यात यावी.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे, २०२५ पर्यंत शाळा आणि उच्च शिक्षण प्रणालीतील किमान ५०% विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा परिचय करून देणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना विविध व्यवसायाची, कामाची ओळख व्हावी, कार्यसंस्कृती रुजावी, पुढील व्यवसाय शिक्षणाची आवड निर्माण होऊन पूर्वतयारी व्हावी, या हेतूने कार्यशिक्षण विषयांतर्गत उपक्रम सुचवण्यात आले आहेत. पाठ्यपुस्तक तयार करत असताना वरील उद्दिष्टे, अध्ययन निष्पत्ती साध्य होण्यासाठी विद्यार्थ्यांना आवडतील व पेलवतील अशा योग्य उपक्रमाची निवड केल्याने विद्यार्थ्यांची भविष्यातील व्यवसाय शिक्षणाची तयारी होईल.

## विषय : कार्यशिक्षण

**विकासक्षेत्र :** मनोमय कोश विकास

**ध्येय :** CG - 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. (सामाजिक विकास)

**क्षमता :** C 4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वत:ला ओळखायला सुरुवात करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | गरजाधिष्ठित, सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | सामाजिक विकास ('स्व' चा परिचय)<br><br>भाषिक कौशल्य | • स्वत:ची स्वतंत्र व्यक्ती म्हणून ओळख दर्शवतो आणि आवड सांगतो. (उदा. आवडता शर्ट, बॅग, वस्तू)<br>• स्वत:चे नाव व आडनाव सांगतो. | (१) माझी आवडती वस्तू : बालकांना विविध वस्तू दाखवून, त्यांची आवडती वस्तू विचारणे. उदा. तुझा आवडता रंग कोणता? तुझे आवडते फळ सांग.<br>(१) कृतियुक्त हजेरी : शिक्षकांनी बालकांच्या आवडीच्या चित्रांचे (फळ, फूल इ.) बालकांच्या नावाचे कार्ड तयार करावे. ते हाताळण्यास द्यावे. दुसऱ्या दिवशी त्यांच्या स्वत:च्या नावासह असलेले कार्ड घेऊन, खोक्यामध्ये टाकून हजेरी घ्यावी. | दैनंदिन वापरातील विविध वस्तू उदा. फळे, भाजीपाला, रंग, खेळण्यातील प्राणी, खाद्य पदार्थ, चित्रे, आवडती वस्तू, नावासह चित्रकार्ड | बालकांच्या आवडीच्या वस्तूंची पदार्थांची नोंद करणे.<br>(१) बालकांच्या आवडीचे चित्रकार्ड निवडण्याचे व स्वत:चे नाव सांगण्याचे निरिक्षण करणे.<br>(२) बालक स्वत:च्या नावाचे कार्ड निवडतो का याची नोंद करणे. |

**ध्येय :** CG - 4 बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. (भावनिक विकास)

**क्षमता :** C 4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | अभिरुचिपूरक | भावनिक विकास, स्वत:च्या भावना | • स्वत:ला काय हवे ते सांगतो आणि स्वत:च्या भावना ओळखतो. | (१) इच्छा कोपरा : वर्गातील ४ कोपऱ्यांत १) खेळणी २) भाजीपाला, फळे ३) रंगकाम ४) खाण्यास योग्य पोषक अन्नपदार्थांची नावे सांगते. उदा. दूध–दुग्धजन्य पदार्थ, कडधान्ये, भाज्या, फळे इ. वस्तूंची मांडणी करून | खेळणी, भांडी, भाजीपाला, फळे, रंगकाम साहित्य | (१) बालक स्वत:ची आवड व भावना ओळखून कृती करतो का? याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | (आवड) ओळखतो. | जसे–आज मला चित्र रंगवायचे आहे/नाही, मला बाहेर जायचे आहे.<br>• सोप्या भाषेत ओळखतो. जसे – आनंद, भीती, दु:ख | विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या कोपऱ्याची निवड करण्याची संधी द्यावी.<br>(२) विविध भावना दर्शवणारी बालकांची चित्रे मुलांना साभिनय दाखवून, त्यातील भाव ओळखण्यास सांगणे. असे तुम्हांला केव्हा वाटते हे विचारणे. | विविध भाव दर्शवणारी बालकांची चित्रे | (२) बालकांच्या कृतीचे निरीक्षण करणे. तो भावना कशा व्यक्त करतो याचे निरीक्षण व नोंद करणे. |
| **ध्येय :** CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. (सामाजिक व भावनिक विकास)<br>**क्षमता :** C 4.3 इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | संस्कृती कार्य– जगताची ओळख, सामाजिक व भावनिक विकास कुटुंबातील व्यक्ती परिचय व प्रेम व्यक्त करणे. | • कुटुंबातील जवळच्या ठरावीक सदस्यांना ओळखतो, नावे सांगतो.<br>• परिचित मोठ्या व्यक्तींशी सहजतेने संवाद साधतो. | (१) परिचय पालकांचा : बालकांना गटात बसवावे. उपलब्धतेनुसार पालकांना बालवाटिकेत पाचारण करून, बालकांना आपल्या पालकांसोबत बसायला सांगावे. बालकांना आपल्या गटात आपल्या पालकांचा परिचय करून द्यायला लावावे.<br>(२) निरोप सांगणे : बालकांना शाळेतील/बालवाटिकेतील मुले/ताई/शिक्षक/सेविका यांना बोलावून आणण्यास सांगणे. | बैठक व्यवस्थेसाठी आवश्यक साहित्य | (१) बालक आपल्याच पालकांना ओळखतो का? व त्यांचे नाव इतरांना सांगतो का? याचे निरीक्षण करणे.<br>(२) बालक दिलेला निरोप शाळेतील बालवाटिकेतील मुले/ताई/ शिक्षक/सेविका यांना बोलवताना सहजतेने संवाद साधतो का? याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | कौशल्या–धिष्ठित उपक्रम, जीवन कौशल्ये | भावनिक आत्मनिर्भरता | • वर्गामध्ये पालकांशिवाय किंवा कुटुंबातील मोठ्या व्यक्तीशिवाय सहजपणे राहतो. | (१) वर्गात बालकांना सहज दिसतील, सहजतेने हाताळता येतील, आवडतील अशा पद्धतीने खेळणी मांडावीत/रचना करावी अणि त्यांना त्या खेळण्यांसोबत मुक्तपणे खेळण्यासाठी संधी द्यावी. जसे – भातुकली खेळ | भातुकलीची खेळणी | (१) बालक कुटुंबातील व्यक्तीशिवाय वर्गातील खेळण्यासोबत खेळतो का, खेळताना इतर मुलांशी संवाद साधतो का? याचे निरीक्षण करणे. |
| **ध्येय :** CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. (सामाजिक विकास)<br>**क्षमता :** C 4.4 इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | अनिवार्य अभिरुची पूरक उपक्रम | सहकार्य/ नेतृत्व (सामाजिक) | • इतर बालकांसोबत खेळायला सुरुवात करतो. | (१) बालकांना वर्गाबाहेरील खेळ खेळण्यासाठी संधी उपलब्ध करून द्यावी.<br>जसे – पकडापकडी, लपाछपी, मोठा चेंडू पायाने मारणे. | खेळानुसार साहित्य | (१) इतर बालकांसोबत खेळतो का? याचे निरीक्षण करणे. |
| **ध्येय :** CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. (नैतिक विकास)<br>**क्षमता :** C 4.5 शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम, संस्कृती कार्यजगताची ओळख | नैतिक शिक्षण | • दैनंदिन कृतीमध्ये सहभागी होतो. | (१) बालकांना बालवाटिकेतील दैनंदिन कृतीमध्ये सहभागी होण्यास संधी द्यावी/प्रोत्साहित करावे.<br>जसे – प्रार्थना, भोजन, खेळ | विविध कृतींची रचना करावी. | (१) बालक दैनंदिन कृतीमध्ये सहभागी होतो का? याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | | नैतिक शिक्षण, सकारात्मक वर्तन | • शिक्षकांच्या मदतीने साध्या सूचनांचे पालन करतो. | (२) बालकांना दोन ते तीन शब्दांच्या सूचना द्याव्यात.<br>जसे – उभे रहा, खाली बसा, हात धुवा, डबा उघडा. | | (१) बालक शिक्षकांनी दिलेल्या सूचनांचे पालन करतो का? याचे निरीक्षण करणे. |
| **ध्येय :** CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. (सामाजिक, भावनिक, नैतिक विकास)<br>**क्षमता :** C 4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतीसह) मदत करतो. दयाभाव दर्शवितो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम, सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | सामाजिक, भावनिक, नैतिक (सेवावृत्ती, मदत/ सहकार्य) | • इतर बालके आणि प्रौढांबद्दल आपुलकी दाखवतो. | (१) इतरांना मदत करण्यासंदर्भातील आशयावर आधारित गप्पागोष्टी करणे. जसे –<br>(१) डबा न आणलेल्या आपल्या वर्गातील बालकाला खाऊ देणे.<br>(२) आईबाबांना कामात मदत करणे.<br>(३) खेळताना मित्र-मैत्रिणींना आपली खेळणी देणे.<br>(४) आजी-आजोबांचे पाय चेपणे.<br>(५) गोष्ट सांगावी. | – | (१) बालवाटिकेत/ घरात इतरांना आपुलकीने मदत करतात का? याचे पालकांच्या साहाय्याने निरीक्षण करणे. |
| **ध्येय :** CG 5 – बालके उत्पादक कार्याबाबत व सेवेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.<br>**क्षमता :** C 5.1 इतरांना मदत करण्यासाठी, वयानुरूप सुयोग्य, शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवितो आणि त्यामध्ये सहभागी होतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | गरजाधिष्ठित | नैतिक शिक्षण | • खेळून झाल्यावर खेळणी आणि इतर साहित्य जागच्या जागी ठेवतो. | (१) बालकांना बालवाटिकेतील साधन सामग्रीचा वापर करून, विविध रचना करावयास सांगावे. खेळून झाल्यानंतर सर्व साहित्य जागच्या जागी ठेवण्यास प्रोत्साहित करावे. जसे –<br>(१) ठोकळे (२) मणी (३) बाहुल्या | रचनात्मक खेळाचे साहित्य | (१) खेळून झाल्यावर खेळणी आणि इतर साहित्य जागेवर ठेवतो का? याचे निरीक्षण करावे. |

**ध्येय :** CG 6 - बालके स्वत: भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञता भाव दर्शवतात. (नैतिक विकास)

**क्षमता :** C 6.1 सर्व प्रकारच्या सजीवांबाबत काळजी घेतो व त्यांच्याबरोबर राहण्याबाबत आनंद व्यक्त करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम, | नैतिक शिक्षण (भूतदया, एकात्मता/ एकरूपता) | • वनस्पती आणि प्राण्यांचे निरीक्षण करताना कुतूहल दर्शवतो. | (१) परिसरातील वनस्पती व प्राणी व पक्षी (पाळीव) यांचे निरीक्षण करण्यास प्रोत्साहित करणे. जसे – शाळेला येताना कोणता प्राणी/पक्षी दिसला. यावर गप्पा मारणे.<br>(१) प्राण्यांच्या/पक्ष्यांच्या प्रतिकृती दाखवून, त्यांचे निरीक्षण करण्यास सांगणे व त्यावर गप्पा मारणे.<br>(२) घर व शाळा या दरम्यानच्या परिसरातील, विविध वनस्पतींचे/फुलांचे निरीक्षण करण्यास सांगून गप्पा मारणे. | प्रतिकृती, प्राणी व पक्षी | (१) वनस्पती आणि प्राण्यांचे निरीक्षण करतो का व त्यावरील गप्पागोष्टींमध्ये कुतूहल दर्शवतो का? याचे निरीक्षण करणे. |

**ध्येय :** CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. (सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास)

**क्षमता :** C 4.1 कुटुंब अणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वत:ला ओळखायला सुरुवात करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | सामाजिक विकास, स्व ची ओळख | • स्वत:ला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो; जिथे वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात. | (१) कुटुंबातील व्यक्तींची नावे सांगणे व इतर माहिती देणे. उदा. ............ माझी आई आहे. ती गृहिणी/शिक्षिका आहे.<br>(२) कुटुंबातील व्यक्तींच्या माध्यमातून समाजातील विविध मदतनीसांची ओळख करून देणे. | विविध मदतनीसांची चित्रे, कुटुंबातील व्यक्तींचे फोटो | (१) कुटुंबातील व्यक्तींची माहिती सांगतो का, याचे निरीक्षण करणे.<br>(२) विविध मदतनीस ओळखतो का? याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | | भाषिक कौशल्य | • स्वत:च्या ओळखीबाबतची इतर माहिती देतो. जसे – पालकांचे नाव | | | |
| **ध्येय :** CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. (भावनिक विकास)<br>**क्षमता :** C 4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | अनिवार्य व कौशल्या–धिष्ठित | भावनिक विकास (भावना व्यक्त करणे व ओळखणे)<br><br>भाषिक कौशल्य | • चेहऱ्यावरील हावभाव व शब्द यांच्या भावनांशी सांगड घालतो.<br>• शब्दाद्वारे भावना, हावभाव व्यक्त करतो. जसे – चित्र रेखाटन/ देहबोलीतून. | (१) जोडी भावना : भीती, आनंद, राग, दु:ख, प्रेम या भावनांची चित्रकार्ड तयार करून, (बालकांच्या संख्येनुसार) जमिनीवर मधोमध ठेवून, प्रत्येक बालकाने त्याच्या आवडीनुसार चित्रकार्ड उचलून, त्यातील हावभावांची प्रत्यक्ष कृती करून दाखविणे.<br>(२) बालकांना आपल्या हातात असणाऱ्या भावनांचे चित्रकार्ड बघून, तसेच चित्रकार्ड कोणाच्या हातात आहे याचे निरीक्षण करून जोडी तयार करण्यास सांगणे. | विविध भाव दर्शवणारी चित्रकार्ड (बालकांच्या संख्येनुसार) | (१) योग्य शब्दांची तोंडी निवड करतो का? याचे निरीक्षण करणे. (व्यक्त करतो का? याचे निरीक्षण करणे.)<br>(२) हातातील कार्डावरचे भाव ओळखून, योग्य जोडी तयार करतो का? याचे निरीक्षण करणे. |

CG - 4

**ध्येय :** सामाजिक विकास

**क्षमता :** C 4.3 इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम व सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | सामाजिक विकास – कुटुंबातील व्यक्तींचा परिचय, भाषिक कौशल्य | • कुटुंबातील जवळच्या ठरावीक सदस्यांना ओळखतो, नावे सांगतो. | (१) बालकांना गप्पागोष्टींच्या माध्यमातून कुटुंबातील व्यक्तींचा परिचय करून द्यायला सांगणे. (उदा. आई, बाबा, ताई, दादा, आजी, आजोबा, आत्या, मामा इ.) | पालकांशी चर्चा करून, बालकाच्या कुटुंबाची माहिती घेणे. फोटो, चित्र किंवा बाहुल्या | १) बालक स्वत:च्या कुटुंबातील व्यक्ती ओळखतो का, याचे निरीक्षण करणे. त्याच्या मनातील 'कुटुंब' या शब्दाची व्याप्ती काय आहे, याचे निरीक्षण करणे. हे निरीक्षण पालकांच्या मदतीने करणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | | भाव प्रकटी–करण (प्रेम) | • परिचित मोठ्या व्यक्तींशी सहजतेने संवाद साधतो/बोलतो | (१) कुटुंबातील मोठ्या व्यक्ती, शेजारी राहणाऱ्या मोठ्या व्यक्ती, मोठ्या व्यक्ती यांच्याशी गप्पा मारणे. (उदा. नाव विचारणे, तब्बेत कशी आहे हे विचारणे, खाऊ खाणार का, तुम्ही काय करता, इ.) | – | १) पालकांच्या मदतीने मोठ्या व्यक्तींशी संवाद साधतो का? याची नोंद करणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम व सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | सामाजिक विकास (मैत्रीभाव व सहकार्य) | • ओळखीच्या मुलांसोबत खेळताना सहजतेने | (१) शिक्षकांनी बालकांना सहजतेने खेळता येतील, कृती करता येईल असे खेळ व गटकार्य द्यावेत. खेळ – उदा. रचना करणे, ओवणे, रंगकाम, मातीकाम. | खेळाचे साहित्य, रंग, कागद, पिस्त्याच्या साली, मणी, | १) बालक गटकार्य, खेळात सहजतेने सहभागी होतो का? याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मनोमय कोश | | उत्स्फूर्तपणे, सहभागी होतो.<br>• आवश्यकते–नुसार मोठ्यांच्या मदतीने खेळणाऱ्या बालकांच्या गटात सहभागी होतो. | गटकार्य – उदा. खेळणी भरून ठेवणे, पिशव्या व्यवस्थित लावणे, बिया/साली भरून ठेवणे, भातुकलीची खेळणी, किल्ला तयार करणे, बिया/पाने इ. गोळा करणे.<br>(२) गटकार्यात एखाद्या मित्र–मैत्रिणींचे काम करून झाल्यावर, दुसऱ्यांच्या मदतीला जायचे असल्यास, तसे करू देणे व जिथे आवश्यकता आहे तिथे त्याला मदत करणे. | खेळणी व कृतीनुसार साहित्य | २) बालक आवश्यकता असल्यास गटात खेळण्यासाठी ताईंची मदत घेतो का? याचे निरीक्षण करणे. |
| C-4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**ध्येय :** भावनिक विकास, सामाजिक विकास<br>**क्षमता :** C 4.4 इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो. | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | सामाजिक विकास (सहकार्य) | इतर बालकांसोबत खेळताना आनंद घेतो.<br>आनंदाची अनुभूती | • इतर मुलांसोबत खेळताना आनंद घेतो. | (१) बालकांना जोडी पद्धत, गट पद्धतीचे खेळ खेळावयास देणे. जोडी पद्धत उदा. तीन पायांची शर्यत, जोड साखळी इ.<br>गट पद्धत खेळ : रंग कोणता? आईचे/मामाचे पत्र हरवले, वडा, डोसा, लाडू, लपाछपी, रस्सीखेच | वेगवेगळे खेळ काढून ठेवणे, क्रीडांगण | १) बालक इतर मित्र–मैत्रिणीं–बरोबर खेळताना आनंद घेत सहकार्याने वागतो का, याचे निरीक्षण करणे. |

CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास

**क्षमता :** C 4.5 शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम व सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | सामाजिक विकास (सहकार्य व सद्‌गुण सदाचार) नैतिक शिक्षण | • इतर मुलांसोबत दैनंदिन कृतींचा आनंद घेतो. | (१) प्रार्थना : प्रार्थनेची तयारी करणे,<br>भोजन : बैठका घालणे, भोजनानंतरची स्वच्छता, चिऊ-काऊला घास देणे, गटकार्याच्या साहित्याचे वाटप करण्यास मदत करणे, गाणी, खेळ यांत सहभागी होणे. | बैठका, प्रतिमा, गटकार्यानुसार साहित्य | १) प्रार्थनेच्या वेळी भोजनाच्या वेळी, गटकार्याच्या वेळी, बालक इतर मुलांना व शिक्षिकेला आनंदाने मदत करतो का, याचे निरीक्षण करणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | | नैतिक शिक्षण | • आपली वेळ येण्याची वाट बघतात. | (१) भोजनापूर्वी हात धुण्यासाठी रांगेत उभे राहणे.<br>(२) टायरची रचना करून, त्यात उड्या मारण्यासाठी रांगेत उभे राहणे.<br>(३) टेबलावरून उडी मारण्यासाठी, दोरीचा जिना चढण्यासाठी रांगेत उभे राहणे व आपली वेळ आल्यावर कृती करणे. | साबण, टायर, टेबल, दोरीचा जिना इ. | १) कृती करताना बालक संयमाने वागतो का? व आपली वेळ येण्याची वाट बघू शकतो का? याचे निरीक्षण करणे. |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | | सामाजिक विकास, नैतिक शिक्षण (सद्‌गुण, सदाचार) | • साध्या छोट्या-छोट्या सूचनांचे पालन करतो. | (१) खेळ : ............... म्हणतो.<br>कृती : घडीकाम - होडी बनविणे, ठसेकाम - दिलेल्या चित्रावर भेंडीचे ठसेकाम करणे. या कृतीमध्ये शिक्षिकेने दाखवल्याप्रमाणे/ सांगितल्याप्रमाणे कार्य करतो. | कागद, चित्रे, भेंडी, रंग इ. व कृतीनुसार साहित्य | १) खेळताना व कार्य करताना शिक्षिकेने ज्या सूचना किंवा निर्देश दिले आहेत, त्याचे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आज्ञापालन | | | | पालन करून कृती करतो का, याचे निरीक्षण करणे. |
| **ध्येय :** CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. (सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास)<br>**क्षमता :** C 4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतीसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवितो. | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | अनिवार्य उपक्रम गरजाधिष्ठित उपक्रम व संस्कृती कार्यजगताची ओळख (मनोमय कोश) | सामाजिक विकास (सद्गुण, सदाचार) नैतिक शिक्षण | • इतर बालके आणि प्रौढांबद्दल आपुलकी दाखवतो. | (१) संकटसमयी आपल्या मित्रांना मदत केली पाहिजे या आशयाची गोष्ट सांगणे. उदा. कबुतर-मुंगी, प्रौढांप्रति आदर, प्रेम, स्नेहभाव दर्शवला पाहिजे, त्यांची सेवा केली पाहिजे, या आशयाची गोष्ट सांगणे.<br>(२) गप्पागोष्टी : मोठ्या माणसांशी व आपल्या मित्र-मैत्रिणींशी कसे वागावे.<br>(३) घरी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करण्याची प्रत्यक्ष कृती करून घेणे.<br>(४) गप्पागोष्टींमधून झाडांची काळजी कशी घ्यावी, फुले, फळे तोडून काढू नये याची चर्चा करावी. | गोष्टींची चित्रे<br><br>कृतीनुसार साहित्य | १) पालकांच्या मदतीने बालक घरीही मोठ्यांशी, भावंडांशी कसे वागतो, याचे निरीक्षण नोंदविणे.<br>(२) बालवाटिकेत बालक इतर बालकांशी, शिक्षिका यांच्याशी कसे वर्तन करतो, याचे निरीक्षण करून नोंद करणे.<br>(३) पालकांच्या मदतीने प्राण्यांची काळजी घेतो का? यांचे निरीक्षण नोंदविणे. |

CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास

**क्षमता :** C 4.7 इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेऊन, त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | अनिवार्य उपक्रम, गरजाधिष्ठित उपक्रम | सामाजिक विकास, नैतिक शिक्षण (समानता व एकरूपता)<br>भाषिक कौशल्य | • बालक सर्व मुलांशी त्यांची पार्श्वभूमी व क्षमता यांचा विचार न करता खेळतो व संवाद साधतो. | (१) बालदिनाचे औचित्य साधून स्नेह भोजनाचे आयोजन करणे. यात मोठी बालके आधी लहान बालकांना जेवायला वाढतील, मग ती जेवतील.<br>(२) गरीब–श्रीमंत, बलवान–कमकुवत अशा कोणत्याच प्रकारचा भेदभाव न करता मैत्री करणे अशा आशयाच्या गोष्टी सांगण्यासाठी उदा. सिंह व उंदीर अशा गोष्टी सांगाव्यात. | भोजन वाढण्याचे साहित्य– चमचे, पातेले इ.<br>गोष्टींची चित्रे | १) बालक बालवाटिकेतील लहान, मोठ्या बालकांशी कसा खेळतो व संवाद साधतो याचे निरीक्षण करून नोंद करणे. |

CG 5 - बालके उत्पादक कार्याबाबत व सेवेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.

**ध्येय :** नैतिक विकास

**क्षमता :** C 5.1 इतरांना मदत करण्यासाठी, वयानुरूप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवतो आणि त्यामध्ये सहभागी होतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | उत्पादक क्षेत्र, मनोमय कोश | सेवा क्षेत्र, उत्पादक क्षेत्र, श्रमप्रतिष्ठा | • वर्ग सुव्यवस्थित ठेवण्यासाठी शिक्षकांना मदत करतो. | (१) शिक्षकांनी नियमित पाहण्यातील वस्तू, नियमित लागणाऱ्या वस्तू, अगोदर इतर ठिकाणी ठेवाव्यात. आधी शिक्षकांनी वस्तू, साहित्याची आवराआवर करायला सुरुवात करावी व नंतर बालकांना साहित्य योग्य ठिकाणी मांडावयास सांगावे. | बालकांच्या पिशव्या, पायपुसणी, हात धुण्याचा साबण, खेळणी इ. | १) बालके शिक्षकांना साहित्य योग्य ठिकाणी ठेवण्यास मदत करतात का? याचे निरीक्षण करून नोंद करणे. |

CG 6 - बालके स्वत: भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवतात.

**ध्येय :** सामाजिक विकास, भावनिक विकास, नैतिक विकास

**क्षमता :** C 6.1 सर्व प्रकारच्या सजीवांबाबत काळजी घेतो व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | अनिवार्य उपक्रम, गरजाधिष्ठित उपक्रम | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | • झाडे आणि प्राणी यांची काळजी घेतो. | (१) परिसरातील वनस्पती व प्राणी यांची काळजी घेण्यास प्रोत्साहित करणे. उदा. झाडांना पाणी घालणे, आळे करणे, पशुपक्ष्यांना दाणापाणी ठेवणे, उन्हाळ्यात पशुपक्ष्यांसाठी पाणी ठेवणे, गाईला चारापाणी घालणे यांसारख्या कृती करावयास सांगणे.<br>(२) परिसरातील (शाळा व घर) वनस्पतींची निगा राखणे व काळजी घेणे. उदा. झाडांना आळे करणे, त्यांना खत व पाणी घालणे, बागेची स्वच्छता करणे, उमललेलीच फुले खुडणे. | कृतीनुसार साहित्य | (१) पालकांच्या मदतीने परिसरातील प्राणी व वनस्पती यांची काळजी घेतो का, याचे निरीक्षण नोंदविणे.<br>(२) पालकांच्या मदतीने वनस्पतींची निगा राखतो का? याचे निरीक्षण नोंदविणे. |

CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** समाजिक, भावनिक आणि नैतिक विकास

**क्षमता :** C 4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वत:ला ओळखायला सुरुवात करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम व सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | सामाजिक विकास, नैतिक शिक्षण | • स्वत:ला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो. | ओळख मदतनीसांची :<br>(१) क्षेत्रभेट बालकांना विविध मदतनिसांच्या कामाच्या ठिकाणी नेऊन, त्यांना त्यांचा परिचय करून देणे.<br>(२) विविध मदतनिसांना बालवाटिकेत बोलावून, बालकांना त्यांच्याशी मुक्त गप्पागोष्टी करण्यास प्रोत्साहित करावे. | वाहन, क्षेत्रभेट तयारी | (१) क्षेत्रभेटीला गेल्यावर आपले मदतनीस समजून घेतो का, याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | | | जिथे वेगवेगळी व्यक्ती भूमिका पार पाडत असतात. | (३) बालवाटिकेत विविध मदतनिसांच्या वेशभूषेत तयार होऊन येण्यास सांगणे.<br>(४) बालकांना मदतनिसांना त्यांच्या कार्यासाठी लागणारी अवजारे/उपकरणे यांची चित्राद्वारे व प्रत्यक्ष वस्तू आणून ओळख करून द्यावी.<br>(५) गीतरूपी कोडी घालणे. उदा. चाक फिरवतो, गरागरा मडकी बनवतो, भराभरा – ओळखा पाहू मी कोण? | | (२) बालवाटिकेत आलेल्या मदतनिसांशी संवाद साधतो का? याचे निरीक्षण करणे.<br>(३) बालक वेशभूषेशी एकरूप होतो का, याचे निरीक्षण करणे.<br>(४) बालकास व्यवसायिक मदतनीस व त्याची उपकरणे, अवजारे यांची सांगड घालता येते का? याचे निरीक्षण करणे.<br>(५) शब्दरूपी कोड्यातून बालकास व्यावसायिक मदतनीस ओळखता येतात का? याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | गरजाधिष्ठित सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | सामाजिक विकास (स्वतःच्या कुटुंबा–बद्दलची ओळख | • स्वतःबाबतची माहिती देतो. जसे – घरचा पत्ता, कुटुंबातील व्यक्तींची माहिती, शाळेची माहिती | (२) टाळ्या ऐका, ऐका मला – बालकांना गोलाकार बसवून टाळ्यांची संख्या व अपेक्षित माहिती यांविषयी मार्गदर्शन करावे. बसलेल्या बालकांनी जेवढ्या टाळ्या वाजतील त्या क्रमाने माहिती सांगणे.<br>उदा. १ टाळी : शाळेचे नाव सांगा.<br>२ टाळ्या : कुटुंबातील व्यक्तींची संख्या सांगा.<br>३ टाळ्या : घरचा पत्ता सांगा.<br>अशा प्रकारचे विविध खेळ व उपक्रम घेणे. | – | (१) बालक जी टाळी वाजेल, ती समजून घेऊन, योग्य वैयक्तिक माहिती सांगतो का? याचे निरीक्षण करणे. |
| CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**ध्येय :** भावनिक विकास<br>**क्षमता :** C 4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | अनिवार्य कौशल्या–धिष्ठित उपक्रम | भावना ओळखून प्रकट करणे. सकारात्मक बदल करणे. | | (१) बालकांना विविध भावनांच्या (दुःख, आनंद, शौर्य, भीती) गोष्टी सांगणे.<br>उदा. हिरकणी, धाडसी हत्ती इ. | गोष्टींची चित्रे | (१) गोष्ट ऐकताना त्यांनी प्रकट केलेल्या भावनांची कारणे सांगता येतात का? याचे निरीक्षण करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | अनिवार्य कौशल्या–धिष्ठित उपक्रम | भावना बोलून व्यक्त करणे. | • स्वतःच्या भावना परिचित, समवयस्क व इतरांना सांगतो. | (१) विविध स्पर्शानुभव देणे. उदा. विविध वस्तूंचा डोळे बंद करून, स्पर्शाने अनुभव घ्यायला सांगणे व भाव प्रकट करणे.<br>(२) विविध भावना आधारित प्रसंग निर्माण करून, ते प्रकट करण्याची संधी उपलब्ध करून देणे. | विविध स्पर्शाच्या वस्तू. जसे – कडक, मऊ, टोकदार इ. | (१) बालकाने स्पर्श करून त्याचे भाव प्रकट केले का? याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उदा. दु:ख, शौर्य इ. भावना आधारित प्रसंग निर्माण करणे. | | (२) बालकाने प्रकट केलेल्या भावनांचे निरीक्षण करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | अनिवार्य कौशल्या–धिष्ठित उपक्रम | भावनिक नियंत्रण साधून, सकारात्मक बदल करणे. | • जेव्हा रागावलेले किंवा निराश असतात, तेव्हा शांत होण्यासाठी कृती बदलण्याचे मान्य करतो. | (१) राग आल्यानंतर तो शांत करण्यासाठी आवश्यक कृतींचा समावेश करावा.<br>जसे : गाणे, गोष्ट, खेळ इत्यादी. | – | (१) राग शांत करण्यासाठी कोणती कृती करतो याचे निरीक्षण करणे. |
| CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**ध्येय :** भावनिक विकास<br>**क्षमता :** C 4.3 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | गरजाधिष्ठित | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख, सामाजिक विकास.<br><br>भाषिक कौशल्य | • अल्पपरिचित, मोठ्यांशी सहजपणे संवाद साधायला सुरुवात करतो. | (१) पालकांना व नातेवाईकांना बालवाटिकेत पाचारण करून, बालकांसोबत सौंदर्य कृती तयार करण्याची व संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.<br>उदा. पालक आणि बालकांनी मिळून, कोलाज काम करावे, बालसभा.<br>उदा. शाळेतील सेवक, वाहनचालक काका, दुसऱ्या विभागातील शिक्षक यांच्याशी संवाद साधणे. | कृती संबंधित साहित्य, बैठक व्यवस्था | (१) बालक पालक यांच्या एकत्रित कृती व संवाद यांचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | | भाषिक कौशल्य<br><br>नेतृत्व गुण | • इतर बालकांशी काम आणि खेळासंबंधी कार्यनीती बनवतो. (उदा. खेळामध्ये सहभागी होण्यासाठी निमंत्रित करतो. आपापसात नियम समजावतो, वाटाघाटीमध्ये सहभाग घेतो.) | (१) संरचित खेळाची आखणी करतो. उदा. विविध प्रकारच्या उड्या, चेंडूचे टप्पे, ठसेकाम, कोलाजकाम<br>(२) शिक्षकांनी बालकांची गटात विभागणी करून प्रत्येक गटास कोणताही एक खेळ खेळण्यास सांगणे. प्रत्येक गटातील बालक खेळाच्या अनुषंगाने नियम बनवतील व ते नियम अनुसरण्यासाठी एकमेकांत वाटाघाटी करतील. (उदा. लगोरी खेळणे, डोंगर – पाणी) | – | (१) खेळ, खेळांचे नियम आणि नेतृत्व यासंबंधी नोंद करणे, तपासणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | अनिवार्य कौशल्या–धिष्ठित | सामाजिक विकास | • बहुतेक वेळा समवयस्कांशी खेळण्यासाठी, मोठ्यांपासून स्वेच्छेने वेगळा होतो.<br>• किमान एका मुलाशी घट्ट मैत्री करतो आणि टिकवून ठेवतो. | (१) शिक्षकांनी आपल्या वर्गातील बालकांना परिसरातील विविध वस्तू गोळा करण्यास सांगावे (उदा. पाने, दगड, खडे, काड्या) व त्यातून त्यांना आपल्या आवडीप्रमाणे कलात्मक कृती करण्यास सांगावे.<br>(२) शिक्षकांनी वर्गातील बालकांची २–२ च्या गटात विभागणी करण्यासाठी, बालकांना त्यांच्या इच्छेनुसार सहकारी निवडण्याची संधी देऊन, त्यांना बागकाम, पाणी भरणे, कोलाजकाम, वर्गखोली, स्वच्छता इ. करण्यास द्यावे. | पाने, फुले, दगड, गोटे, काड्या इ.<br><br>कृतीनुसार साहित्य | (१) समवयस्कांशी खेळण्यासाठी मोठ्यांपासून स्वेच्छेने वेगळा होतो का? याचे निरीक्षण करणे.<br>(१) बालक एका मित्र/मैत्रिणीची निवड करून, त्याच्या/तिच्या सहकार्याने |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | • परिचित वयस्कांकडे, मोठ्यांकडे मदतीसाठी मागणी करतो. | (३) शिक्षिकांनी बालकांसाठी स्थानिक परिस्थितीत उपलब्ध असलेल्या पाने, फुले, मणी या वस्तूंपासून माळ बनविणे असा उपक्रम द्यावा. ओवण्यासाठी आवश्यक कृतीनुसार, तेथे वर्गमित्र, शिक्षकांची/मोठ्यांची मदत घेण्यास सांगावे. | पाने, फुले, मणी, दोरा, सुई इ. कृतीनुसार साहित्य | दिलेली कृती पूर्ण करतो का, याचे निरीक्षण करणे. (२) बालक कार्य करताना आवश्यक तेथे मदत मागतो का, याचे निरीक्षण करणे. |
| CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**ध्येय :** सामाजिक विकास, भावनिक विकास<br>**क्षमता :** C 4.4 इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो. | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | कौशल्या– धिष्ठित | सामाजिक विकास (नेतृत्व व सहकार्य)<br><br>स्वावलंबन | • इतर बालकांसोबत खेळायला सुरुवात करतात आणि खेळासंबंधी योजना आखतात. उदा. काय खेळू, कसे खेळू, कधी खेळू | (१) शिक्षकांनी बालकांना क्रीडांगणावर आणून त्यांना काय खेळायचे, कसे खेळायचे हे ठरवण्यास सांगावे.<br>उदा. आईचे पत्र हरवलं...<br>............ म्हणतो.... घोषणा देणे,<br>विमानतळ, किल्ला बनवणे इ. | खेळानुसार साहित्य | (१) इतर बालकांसोबत खेळासंबंधी योजना आखतात का? याचे निरीक्षण करणे. |

CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** सामाजिक विकास, भावनिक विकास

**क्षमता :** C 4.5 शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | गरजाधिष्ठित | समाजिक विकास (सद्गुण, सदाचार), नैतिक विकास स्वावलंबन | • दैनंदिन कृतींमध्ये स्वावलंबन दर्शवतो. | (१) दिशा स्वावलंबनाची : बालकांना स्वत:च्या वस्तू चपला, बूट, डबा, पाण्याची बाटली, पिशवी जागेवर ठेवायला सांगणे.<br>(२) प्रार्थनेची तयारी करावयास सांगणे.<br>(३) जेवणापूर्वीची तयारी करणे.<br>(४) जेवणानंतरची आवराआवर करणे.<br>(५) स्वत:च्या सतरंजीची (आसनाची) घडी घालणे, खुर्ची, स्टूल असेल तर उचलून ठेवणे. | पाण्याची बाटली, डबा, पिशवी, चप्पल, बूट,<br>कृतीनुसार साहित्य | (१) बालक स्वत: प्रत्येक कृती नित्यनेमाने करतो का? याचे निरीक्षण करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | कौशल्या–धिष्ठित | सामाजिक विकास, नैतिक विकास, स्वावलंबन | • स्वत:चे काम पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारतो. | (१) कचरा डबा : माझा वापर करा! माझा खाऊ मला द्या.<br>बालकांना एखादे फळ खायला द्यावे. कोपऱ्यात हिरव्या व निळ्या रंगाचे २ डबे ठेवावेत. साली योग्य डब्यात टाकायला सांगाव्यात.<br>(२) परिसरातील, वर्गातील कचरा उचलून योग्य जागी टाकायला सांगावे. पिशव्यांची आवराआवर.<br>(३) भोजनानंतरची स्वच्छता करायला सांगणे. | फळे/खाऊ, कचऱ्याचा डबा, झाडू, सुपली इ.<br>कृतीनुसार साहित्य | (१) बालक योग्य डब्यात साल टाकतो का? याचे निरीक्षण करावे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | गरजाधिष्ठित अनिवार्य | (समाजिक विकास) रस्ता सुरक्षा व नियमांचे पालन भावप्रकटी–करण. | • स्वत:ची गैरसोय/ अस्वस्थता इतरांना सांगतो व गरजेच्या वेळी इतरांची मदत घेतो. | (१) रस्ता ओलांडताना मोठ्या व्यक्तींची मदत घेणे.<br>(२) आपली वस्तू हरवल्यास मोठ्या व्यक्ती, शिक्षक यांची मदत घेणे. | – | (१) बालक जिथे गरज आहे, तिथे मोठ्या व्यक्ती, शिक्षक यांची मदत घेतो का? याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | गरजाधिष्ठित | सद्गुण, सदाचार | • शाळेत मोठ्यांनी आठवण करून दिल्याशिवायही, साध्या नियमांचे पालन करतो. | (१) प्रार्थनेला वेळेवर उपस्थित राहणे.<br>(२) भोजनापूर्वी हात धुणे.<br>(३) आपल्या चपला सांगितलेल्या ठिकाणी ठेवणे.<br>(४) वर्गात दुसऱ्या शिक्षिका/मोठी माणसे आल्यास त्यांना अभिवादन करणे. | कृतीनुसार साहित्य | (१) बालक दैनंदिन कृती करताना नियमांचे पालन स्वत:हून करतो का? याचे निरीक्षण करणे. |
| CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**ध्येय :** सामाजिक, भावनिक, नैतिक विकास<br>**क्षमता :** C 4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतीसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवितो. | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम | इतर क्षेत्रे भावनिक विकास सेवावृत्ती/ दयाभाव | • साहित्य काळजीपूर्वक हाताळतो. (आपले साहित्य इतरांना देतो व इतरांचे साहित्य काळजीपूर्वक हाताळतो.) | (१) शिक्षकांनी बालकांचे गट करावेत. त्यांना दिलेल्या खोक्यावरील चित्रांनुसार वस्तू खेळायला घ्यायला सांगावे. ठरावीक वेळेनंतर आपापल्या खोक्यांमध्ये बंद करून ठेवण्यास सांगावे आणि योग्य ठिकाणी ठेवण्यास सांगावे.<br>(२) झाडाला पाणी घालणे.<br>(३) गायीगुरांना चारा-पाणी देणे. | बाहुल्या, प्राणी, पक्षी, भातुकली, वनस्पतींची चित्रे<br>छोटी बादली, पाणी इत्यादी. | (१) बालके वस्तू काळजीपूर्वक हाताळतात का, योग्य खोक्यांमध्ये बंद करतात का? योग्य ठिकाणी ठेवतात का? यांचे निरीक्षण करणे.<br>(२) बालक वनस्पती, प्राणी यांच्याप्रति दयाभाव दर्शवितो का? याचे निरीक्षण करणे. (पालकांचे सहकार्य घेणे.) |

CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** सामाजिक, भावनिक, मानसिक विकास

**क्षमता :** C 4.7 इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेऊन, त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | अनिवार्य सांस्कृतिक जगताची ओळख | नैतिक शिक्षण | • बालकांमधील सारखेपणा व वेगळेपणा ओळखण्यास सुरुवात करतो. (उदा. उंची, लिंग, बोलण्याची पद्धती व खाण्याच्या आवडीनिवडी) | (१) विविध उंची यांच्यातील सारखेपणा व वेगळेपणा पाहण्यासाठी एका ठरावीक उंचीवर पट्टी धरावी. त्या पट्टीच्या उजवीकडे पट्टीच्या उंचीपेक्षा जास्त असणारे व डावीकडे उंची कमी असणारे उभे राहतील. तद्नंतर वेगळे उभे राहण्यासाठी सांगावे.<br>(एकत्रित मुले व मुली)<br>(उंचीप्रमाणे मुले)<br>(उंचीप्रमाणे मुली) | | (१) बालक उंचीप्रमाणे स्वतंत्रपणे गटात उभे राहतो का? याचे निरीक्षण करणे. |

CG 5 - बालके उत्पादक कार्याबाबत व सेवेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.

**ध्येय :** नैतिक विकास

**क्षमता :** C 5.1 इतरांना मदत करण्यासाठी वयानुरूप, सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवतो आणि त्यामध्ये सहभागी होतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | अनिवार्य गरजाधिष्ठित उपक्रम | नैतिक व सामाजिक विकास, सद्‌गुण व सदाचार (चांगल्या सवयी) | • जेवल्यानंतर स्वत:चे ताट किंवा खाऊचा डबा स्वच्छ करतो. | (१) 'स्वच्छ माझा डबा'<br>शिक्षकांनी बालकांना स्वत:चा डबा क्रमाक्रमाने धुऊन दाखवावा. रुमालाने कोरडा करून पालथा ठेवावा. हात कोरडे केल्यावर बालकांना त्यांचा डबा स्वच्छ धुवायला सांगावा. | डबा, पाणी, साबण, रुमाल, कचरा डबा इ. | (१) बालक डबा स्वच्छ धुण्यापूर्वी खरकटे एकत्र जमा करतो का? क्रमाने डबा खातो का? रुमालाने हात कोरडे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | करतो का? याचे निरीक्षण करणे. |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | कौशल्या–धिष्ठित | चांगल्या सवयी विकसित करणे. सद्गुण विचार | • घरी/शाळेत दैनंदिन कामे करतो. (उदा. खेळणी ठेवणे, झाडांना पाणी देणे.) | (१) शिक्षकांनी टेबलावर काही वाट्यांत पाणी आणि दाणे भरून ठेवावेत. बालकांच्या जोड्या करून, त्यांना शाळेच्या परिसरात पक्ष्यांचा वावर असणाऱ्या ठिकाणी पाणी व दाण्यांच्या वाट्या ठेवायला सांगावे. शाळा सुटण्यापूर्वी वाट्या पुन्हा एकत्र जमा करायला सांगावे.<br>(२) चित्र पुस्तकालयातील पुस्तक घेतले, तर परत जागेवर ठेवायला सांगावे. | वाट्या, दाणे, पाणी | (१) बालक पाणी तसेच दाण्याच्या वाट्या योग्य ठिकाणी ठेवतो का? शाळा सुटण्यापूर्वी वाट्या पुन्हा आणतात का, याचे निरीक्षण करावे. |
| CG 6 - बालके स्वत: भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवतात.<br>**ध्येय :** सामाजिक, भावनिक, नैतिक विकास<br>**क्षमता :** C 6.1 सर्व प्रकारच्या सजीवांची काळजी घेतो व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करतो. | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | अभिरुची | भावनिक विकास – कृतज्ञता व्यक्त करणे. | • स्थानिक परिसरातील झाडे आणि प्राणी यांच्या सहवासात आनंद व्यक्त करतो. | (१) परिसरातील क्षेत्रभेट : शिक्षकांनी परिसरातील बाग/रोपवाटिकेत बालकांना वनभोजनाच्या निमित्ताने घेऊन जावे. तेथील झाडे, प्राणी यांचे निरीक्षण करून, त्यांना आनंद मिळवण्याची संधी देणे व गप्पा मारणे. | वनभोजनासाठी लागणारी तयारी | (१) शिक्षकांनी बालकांशी बागेत मिळालेल्या आनंदाविषयी चर्चा करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | कौशल्या–धिष्ठित | एकरूपता | • निसर्गात प्रत्यक्ष रममाण होत असताना अस्वस्थता दाखवत नाही. (उदा. उद्यानात) | (१) बालकांना नैसर्गिक वातावरणात सहजतेने वावरण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. (जसे – पावसात भिजणे, मातीकाम करणे– मातीची भांडी बनवणे, झाडांना आळे करणे, पशुपक्ष्यांचे निरीक्षण करणे.) | – | (१) निसर्गाच्या सान्निध्यात वावरताना बालक सहजतेने वावरतो का? याचे निरीक्षण करणे. |
| **ध्येय :** CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. सामाजिक, भावनिक, नैतिक विकास<br>**क्षमता :** C 4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने, स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वत:ला ओळखायला सुरुवात करतो. | | | | | | |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | संस्कृती आणि कार्यजगताची ओळख | • समाजासाठी योगदान देण्याच्या दृष्टीने, स्वत:च्या क्षमता आणि आवड सांगण्यास सुरुवात करतो जसे : मी मोठा झाल्यावर शिक्षक/डॉक्टर/शेतकरी/पायलट सैनिक होईन. | (१) वर्गामध्ये विविध व्यावसायिकांची मोठ्या आकाराची चित्रे बालकांच्या उंचीवर लावावीत. बालकांना एक एक टिकली द्यावी व आवडणाऱ्या चित्रावर टिकली लावण्यास सांगावे. नंतर वर्गात बालकांचे दोन गट तयार करून, गटामध्ये मी कोण होणार? का होणार यांसारख्या विषयावर/चित्रावर बोलण्याची संधी द्यावी. जसे – मी शेतकरी होणार धान्य पिकवणार, फळे, भाज्या पिकवणार इ. | | (१) बालक समाजाला योगदान देण्याच्या दृष्टीने, स्वत:च्या क्षमता आणि आवड सांगतो का? याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | सांस्कृतिक जगताची ओळख<br><br>गरजाधिष्ठित श्रमप्रतिष्ठा | • कुटुंबातील व्यक्तींचे व्यवसाय, त्यांचे कामाचे ठिकाण अशा प्रकारची वैयक्तिक माहिती देतो.<br>• आपल्या कुटुंबातील मोठ्या व्यक्तींच्या कामाबाबत आदर बाळगतो. जसे– माझी आई शेतकरी आहे आणि तिच्या कामामुळे मला जेवण मिळते. | (१) बालकांचे गट करून, त्यांना आपल्या गटात कुटुंबातील व्यक्तींचे व्यवसाय व त्यांचे कामाचे ठिकाण यांविषयी माहिती सांगण्यासाठी प्रोत्साहित करावे.<br>(१) परिपाठाच्या दरम्यान बालकांना आपल्या कुटुंबातील व्यक्तींचे व्यवसाय, त्यांचे कामाचे ठिकाण अशा प्रकारची वैयक्तिक माहिती देण्याची संधी उपलब्ध करावी.<br>(३) खाऊचा डबा घेऊन, बालकांना गोलाकार बसवावे. एका डब्यात व्यक्तींच्या नावाच्या चिठ्ठ्या टाकाव्यात. जसे – आई, बाबा, काका. खंजिरी/संगीत वाजवत डबा एकमेकांकडे देत गोलात फिरवावा. संगीत थांबल्यानंतर, ज्या बालकाजवळ डबा असेल, त्याने डब्यातील चिठ्ठी काढून ती वाचावी. त्या चिठ्ठीतील व्यक्तींच्या कामामुळे काय फायदा मिळतो याविषयी पाच वाक्ये सांगण्यास प्रोत्साहित करावे. | डबा, खंजिरी वेगवेगळी नावे असणाऱ्या चिठ्ठ्या | (१) कुटुंबातील व्यक्तीचे व्यवसाय कामाचे ठिकाण अशा प्रकारची वैयक्तिक माहिती देतो का? याचे निरीक्षण करणे.<br><br>(२) कुटुंबातील व्यक्तीचे व्यवसाय माहीत आहेत का, त्याविषयी बालकास बोलता येते का? हे पहावे. |

CG 4 - बालके भावनिक विकास करतात.

**ध्येय :** भावनिक विकास

**क्षमता :** C 4.2 विविध भावना ओळखतो, त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | सांस्कृतिक कार्य– जगताची ओळख | • समाजमान्य मार्गाने स्वत:च्या भावना व्यक्त करतो.<br>जसे – रडणे थांबवून, का? रडत होता हे सांगतो. | (१) भावना आधारित प्रसंगांच्या चिठ्ठ्या तयार कराव्यात. त्यातील एक चिठ्ठी मुलाला निवडण्यास सांगावी. शिक्षकांनी चिठ्ठी वाचून मुलाच्या कानात सांगावे. त्यानुसार बालकाने भावना व्यक्त करावी. शिक्षकांनी कारण विचारावे.<br>(२) संबंधित बालकाने उत्तर द्यावे; जसे की, वाक्य १) तुझी हरवलेली वस्तू सापडली. (पेन्सिल, कंपास पेटी, खाऊचा डबा इ.) (२) तुझी वस्तू हरवली. (३) तुझा मित्र/मैत्रीण पडली.<br>(३) गप्पागोष्टी : बालकांना भावना व्यक्त करण्याचे वेगवेगळे प्रसंग सांगून, त्यावेळी कशाप्रकारे आपली कृती/प्रतिक्रिया राहील यांबाबत चर्चा करणे. जसे –<br>दुकानात गेल्यावर आवडीचे खेळणे मिळाले नाही तर... | खोके , शब्दचिठ्ठया, वाक्यचिठ्ठ्या | (१) कानात संगितल्याप्रमाणे कृती करतो का? व त्याचे कारण सांगतात का? याचे निरीक्षण करणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | कौशल्या– धिष्ठित उपक्रम | • योग्य भावनांनी प्रतिसाद देतो. जसे– एकत्र गप्पांच्या वेळी | (१) भावना दर्शविणारे मुखवटे एका पेटीत ठेवा आवडीनुसार बालकांना त्यातील विविध मुखवटे निवडण्यास सांगावे. त्याने निवडलेल्या मुखवट्याला अनुसरून अभिनय करण्यास लावा. | विविध मुखवटे | (१) मुखवट्यानुसार योग्य भावनांना प्रतिसाद देतो का? यांचे निरीक्षण करावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | भाव प्रकटी–करण | विनोद झाल्यावर हसतो. उदास असताना शांत बसतो. | (२) मुखवटे जसे हसणे, रडणे, रागीट<br>(३) नक्कल करणे –<br>बालकांना प्राणी/कुटुंबातील व्यक्ती यांची नक्कल करण्याची संधी उपलब्ध करून देणे; ज्यामध्ये विविध भावना अभिप्रेत आहेत. | | |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | कौशल्या–धिष्ठित उपक्रम | भावनिक नियंत्रण | • स्वत:ला शांत करण्यासाठी जाणीवपूर्वक काही कृती करतो. जसे – श्वासोच्छ्वा–सावर लक्ष केंद्रित करणे, कृती बदलणे. | (१) शांतता खुर्ची –<br>शिक्षकांनी बालकांना राग आल्यास समोर ठेवलेल्या खुर्चीवर बसायचे असा नियम सांगावा. उदा. राग आलेल्या बालकाला शांतता खुर्चीत बसवून, त्याला इतर बालकांच्या कृतींचे निरीक्षण करण्यास सांगावे.<br>वरील कृती व्यतीरिक्त बालकांकडून आपला राग शांत करण्यासाठी पुढील कृतीचा सराव करून घ्यावा.<br>(१) दीर्घ श्वास घेण्यास सांगावे.<br>(२) आवडती वस्तू, खेळणी घेऊन खेळण्यास सांगावे.<br>(३) डोळे बंद करून बसण्यास सांगावे. | खुर्ची : 'शांतता खुर्ची' असे लेबल. | (१) शांतता खुर्चीत बसलेल्या राग आलेल्या विद्यार्थ्यांचे निरीक्षण करणे.<br>(२) राग आल्यानंतर स्वत:ला शांत करण्यासाठी जाणीवपूर्वक कृतीमध्ये बदल करतो का? यांचे निरीक्षण करावे. |

CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** भावनिक, सामाजिक विकास

**क्षमता :** C 4.3 इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | • परिचित आणि अल्प परिचित मोठ्यांशी, आदरपूर्वक संवाद साधतो. जसे – नमस्ते, कृपया, धन्यवाद, माफ करा. | (१) परिचितांशी संवाद – शाळेच्या परिसरात येणाऱ्या व्यक्तींशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणे. उदा. (१)इतर बालकांचे पालक, मदतनीस, स्वयंपाकी (२)इंधनविरहित पाककृती. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना इंधनविरहित पदार्थ तयार करण्यासाठी आवश्यक साहित्य आणण्यास सांगावे व त्यांच्या आवडीनुसार सामूहिक कृती करण्यास सांगावे. उदा. सरबत, भेळ, पोळीचा रोल, केळीचे शिकरण इत्यादी. | इंधन विरहित पाककृती तयार करण्यास आवश्यक साहित्य. उदा. सरबत, लिंबू, साखर, मीठ, पाणी.<br>भेळ : शेव, चुरमुरे, कांदा, टॉमेटो, तिखट, मीठ, लिंबू,<br>शिकरण : दूध, केळी, साखर | (१) परिचितांशी संवाद साधून कसा प्रतिसाद देतात, याचे निरीक्षण करून नोंद करणे.<br>(१) गटात काम करत असताना इतर विद्यार्थ्यांना सामावून घेतो का? याचे निरीक्षण करणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख, सामाजिक विकास संघभावना | • परस्परांच्या आवडीनिवडी ओळखून, संघभावनेने इतर मुलांशी खेळतो. | (१) बालकांना भातुकलीचा खेळ खेळण्यासाठी साहित्य व संधी उपलब्ध करून द्यावी. बालकांना भातुकली हा खेळ महिन्यातून एकदा तरी देणे आवश्यक आहे. | भातुकलीसाठीचे साहित्य | (१) बालके खेळ खेळताना कोणती भूमिका निवडतात व एकत्रित पणे सहकार्याने खेळतात का? हे पहावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | अभिरुचिपूरक उपक्रम<br><br>(मनोमय कोश) | सामाजिक विकास | • समवयस्कांच्या सहवासात आनंदाने सहभागी होतो. | (१) बालकांना शाळेतील परसबागेत समवयस्कांच्या सहवासात काम करण्याची संधी द्यावी.<br>(१) रोपांना पाणी घालणे.<br>(२) कुड्यांतील तण काढणे<br>(३) झाडे लावणे.<br>(४) भाज्या लावणे (बिया) | कुंड्या, माती, पाणी, बिया, इ. साहित्य, खुरपे घमेले इत्यादी झारी. | (१) बालक समवयस्कांच्या सहवासात आनंदाने सहभागी होत आहे का? यांचे निरीक्षण करणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | अनिवार्य कौशल्या-धिष्ठित | सामाजिक विकास | • मित्र-मैत्रिणींशी घट्ट मैत्री करतो. | (१) वर्गातील बालकांना त्यांच्या इच्छेनुसार सहकारी निवडून २/२ च्या गटाने काम करण्याची संधी द्यावी. जसे - चिकटकाम, चित्र रंगवणे, मातीकाम.<br>(२) बालकांना आपल्या मित्र/ मैत्रिणींसोबत कृती करण्याची संधी द्यावी.<br>जसे की, (१) झाडे लावणे.<br>(२) वेगवेगळे आकार तयार करणे.<br>(३) मातकाम करणे.<br>(३) स्वतःचा मित्र निवडण्याची संधी बालकाला द्यावी व दोघांना मिळून सातत्याने अदलून-बदलून वेगवेगळ्या कृती द्याव्यात;<br>जसे की - खेळणी जागेवर ठेवणे, पझल्स् जोडणे. | चिकटकाम, रंगकाम, मातीकाम यांचे साहित्य<br>सुतळी, दोरी, ओढणी, झाडे लावण्याचे साहित्य<br><br>कृती अनुषंगाने येणारे साहित्य | (१) किमान एका मित्र-मैत्रिणींशी मैत्री करून, टिकवून ठेवतो का? याचे निरीक्षण वारंवार करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | संस्कृती व कार्यजगताची ओळख<br>भाव प्रकटी- करण | • परिचित वयस्कांकडे/ मोठ्यांकडे मदतीसाठी मागणी करतो. | (१) वर्गसजावट करण्यासाठी बालकांना साहित्य उपलब्ध करून द्यावे.<br>जसे – कापणे, पताका उंचावर टांगणे,<br>(२) शिवणकाम – बालकांना साध्या किंवा क्रॉस्टिच कापडावर प्रथम धावदोरा, उलटटीप घालून दाखवावी. सुईत धागा ओवणे, दोऱ्याला गाठ मारणे या कृती दाखवाव्या. शिवणकाम कृती करत असताना बालकांच्या मागणीनुसार मदत उपलब्ध करावी. | पताका, कागद, सुतळी, डिंक, खळ इत्यादी वर्गसजावट करण्यासाठीचे साहित्य,<br>जसे- कागद, सुतळी, डिंक बोथट सुई, रंगीत दोरे, क्रॉस्टिच कापड, असल्यास भरतकामाची रिंग | (१) बालके आपल्या गरजेनुसार मोठ्यांची मदत घेतात का? याचे निरीक्षण करणे.<br>(२) मुले कोणत्या बाबींसाठी मोठ्यांकडे नि:संकोचपणे मदत मागतात, याचे निरीक्षण करणे. |
| CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**ध्येय :** सामाजिक विकास<br>**क्षमता :** C 4..4 इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो. | | | | | | |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | अभिरुचीपूरक उपक्रम | सहकार सदाचार | • खेळादरम्यान इतरांच्या कल्पना स्वेच्छेने स्वीकारण्याची तयारी दर्शवतो. | (१) बालकांचे गट करून, त्यांना आपल्या गटातील सहकाऱ्यांच्या कल्पनेचा स्वीकार करून, सहकार्याने कृती पूर्ण करण्यास सांगावे. कृती करण्यासाठी बालकांना चौकोन/कोपरा / गटात बसण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी.<br>उपलब्ध जागेत विविध कलाकृती करण्यास सांगावे; जसे की – रांगोळी, तोरण, फुलांची बियांची रचना यांसारखे उपक्रम. | पाने-फुले, खडे, काड्या, कागदाचे तुकडे इत्यादी. | (१) गटात काम करताना इतरांच्या कल्पना स्वीकारतो का? हे पहावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | मनोमय कोश | अभिरूची पूरक | • इतरांसोबत खेळताना खेळाचे नियम पाळतो. | बालकांना त्यांच्या आवडीनुसार गटाने खेळ खेळायला सांगणे. खेळासाठी काही नियम असावेत अशा सूचना देणे, त्यानुसार खेळ खेळावयास सांगणे.<br>उदा. कृतींची मालिका : रंगकाम – ठसेकाम मातकाम – कागदकाम – चिकटकाम<br>बालकांना रांगेत उभे करावे. आखलेल्या रंगकाम मार्गावर विविध कार्ये करण्यासाठी मांडणी करावी. ठरावीक वेळेत आपापल्या कार्यगटापर्यंत पोहोचून नियमांप्रमाणे कृती करण्यास सांगावे. | रंगकाम, ठसेकाम, मातकाम, कागदकाम, चिकटकाम, आवश्यक साहित्य | (१) बालके आखून दिलेल्या मार्गावरून जाऊन, आवडीप्रमाणे नियमानुसार कृती करतात का? याचे निरीक्षण करणे. |
| C 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**ध्येय :** सामाजिक व भावनिक विकास<br>**क्षमता :** C 4.5 शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो. | | | | | | |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | • कृती आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतो. | (१) विविध राष्ट्रीय सण/समारंभ करण्यासाठी बालकांना प्रोत्साहन द्यावे. आवडी नुसार काम करण्याची संधी द्यावी. जसे –<br>• स्वच्छता करणे : फळा पुसणे, वर्ग स्वच्छता<br>• पाणी वाटप करणे. • खाऊ वाटणे. | सण/समारंभांना आवश्यक साहित्य | (१) बालक कोणत्या कृतीत पुढाकार घेतो, याचे निरीक्षण करणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | कौशल्या–धिष्ठीत उपक्रम | | • वेगवेगळ्या बालकांसोबत विविध कृती करण्याचे व कामाची विभागणी | (१) रिकाम्या खोक्यांपासून वस्तू तयार करणे. उदा. गाडी, आगगाडी, ट्रक, टेबल, खुर्ची, सोफा.<br>(२) बालकांचे गट करून त्यांना वेगवेगळ्या कृती करण्यास द्याव्यात. जसे –<br>(१) माती चाळणे. | रिकामे खोके, डिंक, रंगीत कागद, बूच, बटण, काडी इ. | (१) बालके गटात कृती करताना कामाची विभागणी करतात का? याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | करण्याचे कौशल्य दाखवतो. | (२) मातीची खेळणी तयार करणे.<br>(३) खोक्यापासून गाड्या तयार करणे.<br>(४) वेगवेगळ्या फळांच्या बिया गोळा करणे व त्याची रचना करणे, रांगोळी काढणे. | | |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख | • सूचना/नियमांचे पालन करतो. | (१) बालकांना नियमित द्याव्या लागणाऱ्या सूचनांचे/ नियमांचे छोटे फलक, सांकेतिक चिन्ह योग्य जागेवर लावावे. त्याविषयी शिक्षकांनी शाळेतील नियम व सूचना यांची चर्चा करावी. ते वर्तन करतील यासाठी आग्रही रहावे,<br>जसे की,<br>• पाणी जपून वापरा.<br>• जेवणापूर्वी – जेवणानंतर हात धुवा.<br>• कचरा कचरापेटीतच टाका.<br>• रांगेचा/ओळीचा वापर करा.<br>• खेळणी, वस्तू खेळून झाल्यावर जागच्या जागी ठेवा.<br>• पाने, फुले तोडणे टाळा. | सूचना पट्ट्या / सांकेतिक चिन्हे | (१) बालके सूचनांचे पालन करतात का? हे पहावे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | | तर्क व अनुमान | • नियम उल्लंघनाचे परिणाम समजतो. | (१) सूचना/नियम यांचे पालन केले नाही, तर काय होते; जसे की : कचरा कचरापेटीतच टाकावा – एक दिवस ठरवून वर्गात कचरापेटी/ कचऱ्याचा डबा वर्गात ठेवू नये. त्यामुळे वर्गात कागद, सांडलेला डबा, पेन्सिलीचा कचरा कसा पसरला आहे हे निदर्शनास आणून द्यावे. असे होऊ नये म्हणून नियम/सूचना पाळणे गरजेचे आहे. | सूचनापट्ट्या सांकेतिक चिन्हे | (१) नियम सूचना न पाळल्यास काय परिणाम होतील, याबाबत चर्चा करून झाल्यावर त्यांच्या कृतीचे निरीक्षण करावे. |

CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

**क्षमता :** C 4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतींसह) मदत करतो, दयाभाव दर्शवितो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | इतर क्षेत्रे (मनोमय कोश) | पशुपक्षी संवर्धन, भावप्रकटी-करण | • इतर सजीवांशी वागताना काळजी व दयाळूपणा दाखवतो | (१) प्राणी, पक्षी यांच्यासाठी, शाळा व घराच्या परिसरात दाणा-पाणी ठेवण्यास प्रोत्साहित करणे.<br>(२) शाळेच्या परिसरातील झाडांची काळजी घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>(३) प्राणिमात्रांवर दया करा, या आशयाची गोष्ट सांगणे. | प्लॅस्टिकचे भांडे, दाणे, पाणी इ. लावलेली झाडे, मडकी, करवंटी गोष्टींचे तक्ते. | (१) इतर सजीवांची काळजी घेतो का? याचे निरीक्षण करणे. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | कौशल्या-धिष्ठित उपक्रम | सामाजिक विकास | • वर्गातील कृती करताना, मिश्र गटात व्यवस्थित काम करतो. | (१) बालकांना परिसरातील वस्तू संग्रहित करण्यास सांगावे. जसे की, पाने, फुले, खडे, माती व त्यापासून गटात रचना कृती करून घ्यावी. | रंगीत कागद, खळ | (१) बालक कागदाच्या व्यवस्थित घड्या घालून वस्तू बनवतो का? हे निरीक्षण करणे. |

CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

**क्षमता :** C 4.7 - इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेऊन, त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सामाजिक विकास | • इतर बालकांमध्ये असणाऱ्या वैविध्यांमुळे त्यांच्याबाबत वर्चस्व वृत्ती / दादागिरी किंवा | (१) बालकांचे गट तयार करून, त्यांना आवडतील अशी खेळणी/वस्तू गटात द्यावीत; जसे की, दिलेल्या ठोकळ्यांचे गटाने घर तयार करणे ही कृती करत असताना, ओढाओढी/एकमेकांना मदत/मित्राचे मत त्याचा विचार/ तक्रार न करणे या बाबींची शिक्षकांनी पाहणी करावी. | ठोकळे | (१) बालकांमधील वागणूक/ विविध गुण/चांगले वर्तन, या बाबींचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | नावे ठेवणे अशा कृती करत नाही. | (२) एका भांड्यात वस्तू/खाऊ ठेवून, आपल्या हाताच्या मुठीने मावेल एवढ्या वस्तू खाऊ घेण्यास बालकाला सांगावे नंतर त्या वस्तू इतर बालकांना दाखवून, इतरांच्याही पाहण्यास सांगावे. | भांडे, खाऊ/ वस्तू | (१) बालकांच्या वागणुकीचे निरीक्षण करणे. |
| CG 5 - बालके उत्पादक कार्याबाबत व सेवेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.<br>**ध्येय :** नैतिक विकास<br>**क्षमता :** C 5.1 इतरांना मदत करण्यासाठी, वयानुरूप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवतो व त्यामध्ये सहभागी होतो. | | | | | | |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम, उत्पादक क्षेत्रे | १ क्षेत्र– अन्न परसातील बागकाम श्रमप्रतिष्ठा | • स्थानिक झाडांचे बी रुजवतो आणि रोपट्याची निगा राखतो. | (१) बालकांना बी रुजविण्यासाठी भांडे, माती व बिया आणण्यास सांगावे. वर्गात स्वत:च्या भांड्यात बिया लावून घ्याव्या. रोज पाणी घालून उन्हात ठेवण्यास व शाळा सुटण्यापूर्वी वर्गात आणून ठेवण्यास सांगावे. दररोज हीच कृती करून घेऊन, झाडाची वाढ होताना पाहण्यास सांगावे; जसे की, धणे, मेथी, टोमॅटोचे बी, राई/मोहरी, तुळस यांसारखी कमी कालावधीत उगवणाऱ्या उपयोगी वनस्पती लावणे. | बिया, एखादे भांडे, सुगड, बोळके, कप, करवंटी, शहाळे, माती, छोटे रोपे | (१) स्थानिक झाडांचे बी रुजवतो व त्याची नियमित निगा राखतो का? याचे निरीक्षण करणे. |

CG 6 - बालके स्वत: भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात.

**ध्येय :** सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

**क्षमता :** C 6.1 सर्व प्रकारच्या जीवांबाबत काळजी घेतो व त्यांच्या सोबत राहण्याबाबत आनंद व्यक्त करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | जीवन क्षमता विकसित करणारी क्षेत्रे | पशुपक्षी संवर्धन | • विशिष्ट वनस्पती आणि प्राणी ओळखण्यात उत्सुकता आणि स्वारस्य दाखवतो. | (१) वेगवेगळ्या प्राण्यांची चित्रे दाखवून त्यांची माहिती, नावे विचारून, प्राणी ओळखून दाखण्यास संधी द्यावी; जसे की – प्राणी संग्रहालयाला भेट, गोठा, पक्षी संग्रहालय, मत्स्यालय, नर्सरी–रोपवाटिका, शेत/शेतमळा<br>(२) प्राण्यांच्या राहण्याची विशिष्ट जागा किंवा निवारा यांविषयी माहिती स्पष्ट करतात.<br>उदा. गाय, बैल यांचा गोठा, पक्ष्यांचे घरटे, घोड्यांचा तबेला इ. | प्राण्यांची चित्रे<br>गोठा, घरटे, तबेला इ. चे चित्र | (१) बालक विविध प्राण्यांची नावे व इतर माहिती सांगतात का, याचे निरीक्षण करणे.<br>(२) क्षेत्रभेटीनंतर बालकांना काय काय अनुभव आले, काय पाहिले, काय आवडले, यासंबंधी गप्पागोष्टी कराव्यात. जिज्ञासा, स्वारस्य, उत्सुकता, जाणून घ्यावी. |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | कौशल्या–धिष्ठित उपक्रम | नैतिक शिक्षण | • रोपे आणि झाडांचे संगोपन आणि काळजी घेण्याची जबाबदारी घेतो. | (१) कुंडीत, शाळेच्या आवारात झाडांचे, बियांचे रोपण करून घ्यावे व त्यांची काळजी घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी; जसे की, शाळेच्या परिसरात/घरी/उपलब्ध जागेत बालकाच्या वाढदिवसाच्या दिवशी एक झाड तरी लावावे याचा आग्रह करावा. त्या. | रोपे, बिया | (१) बालके कशा पद्धतीने काळजी घेतात याचे निरीक्षण करावे.<br>(२) बालकाने लावलेल्या झाडांचे |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रोपाची व संगोपनाची जबाबदारी बालकाला द्यावी. | | योग्य संगोपन केले का? याचा आढावा घ्यावा. |
| CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**ध्येय :** सामाजिक विकास<br>**क्षमता :** C 4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने, स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो. | | | | | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम<br><br>(विज्ञानमय कोश) | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख.<br>निर्णय क्षमता | • समाजाला योगदान देण्याच्या दृष्टीने, स्वत:च्या क्षमता आणि आवड सांगण्यास सुरुवात करतो. जसे – मी मोठा झाल्यावर डॉक्टर होईन, शेतकरी होईन, पायलट होईन, सैनिक होईन, शिक्षक होईन. | (१) गावची जत्रा, बाजार, एखादी आपत्ती, अशा प्रसंगी कार्यजगतातील विविध लोक काम करतात. याविषयी चित्रे दाखवून त्यांपैकी मी कोण होणार? आणि का? हे सांगण्याची संधी देणे.<br>उदा. शेतकरी, शिक्षक, पोलीस ,सैनिक ,डॉक्टर, विक्रेता, दुकानदार, वैमानिक, रुग्णवाहिका चालक, वाचमन (पहारेकरी) इत्यादी. स्वतः निवडलेल्या भूमिकेबद्दल माहिती सांगण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>(२) भूमिका अभिनय : प्रत्यक्ष अभिनयाद्वारे गावची जत्रा, बाजार, एखादी आपत्ती अशा प्रसंगी कार्यजगतातील विविध लोक काम करतात. त्यांपैकी मी कोण होणार? आणि का? हे सांगण्यास सांगणे.उदाहरणार्थ, शेतकरी, शिक्षक, पोलीस, सैनिक, डॉक्टर, विक्रेता, दुकानदार, पायलट, वॉचमन (पहारेकरी) इत्यादी. दोन बालकांना स्वतः निवडलेल्या भूमिकांबद्दल माहिती सांगण्याची संधी उपलब्ध करून देणे. | आपत्ती बाजार, जत्रा याप्रसंगी काम करणाऱ्या महत्त्वाच्या लोकांची चित्रे, छायाचित्रे<br><br>मदतनीसाच्या भूमिकेसाठी आवश्यक वेशभूषा साहित्य. | (१) आपत्ती, बाजार, जत्रा इत्यादी प्रसंगी, महत्त्वाचे काम करणाऱ्या लोकांची ओळख सांगतो आणि स्वतः कोणती भूमिका करणार, याविषयी सांगतो का, याचे निरीक्षण करावे.<br>(२) वेशभूषेसह सादर होणाऱ्या कृतीचे निरीक्षण करावे. आवड सकारण सांगतो याचे निरीक्षण करावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख. | • कुटुंबातील व्यक्तींचे व्यवसाय, त्यांचे कामाचे ठिकाण अशा प्रकारची वैयक्तिक माहिती देतो. | (१) वर्गाबाहेर मांडलेल्या, दूरदर्शन संचाचे चित्र असणाऱ्या सेल्फी विंडोच्या समोर उभे राहून, प्रत्येकाला त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीचे व्यवसाय, त्यांचे कामाचे ठिकाण अशी वैयक्तिक माहिती देण्याची संधी द्यावी. | दूरदर्शनचे चित्र असलेली सेल्फी विंडो | (१) कुटुंबातील व्यक्तींच्या कामाविषयी आत्मविश्वासाने, आत्मीयतेने वैयक्तिक माहिती देतो का? याचे निरीक्षण करावे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम | कौशल्या–धिष्ठित उपक्रम | • कुटुंबातील मोठ्या व्यक्तींच्या कामाबाबत आदर बाळगतो. जसे –माझी आई शेतकरी आहे आणि तिच्या कामामुळे मला जेवण मिळते. | (१) कुटुंबातील कोणत्याही मोठ्या व्यक्तींविषयी आदर व्यक्त करण्यासाठी, भेटकार्ड तयार करून घेणे.<br>उदा. माझ्या आईच्या कष्टामुळे मला जेवण मिळते. या आशयाचा संदेश फळ्यावर लिहून द्यावा व तयार केलेल्या भेटकार्डात नात्या–नुसार, आतील बाजूस योग्य संदेश लिहावयास सांगावे. | भेटकार्डसाठी जाड कागद, रंगीत कागद, रंगीत पेन, चिकट कामासाठी आवश्यक साहित्य | (१) कुटुंबातील मोठ्या व्यक्तींच्या कामाबाबत आदर बाळगण्याच्या व भेटकार्डाचे निरीक्षण करावे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | संस्कृती व कार्यजगताची ओळख. | • समाजमान्य मार्गाने स्वतः च्या भावना व्यक्त करतो जसे– रडणे थांबवून का | (१) टेबलवर समान रंगाची, समान आकाराची दहा खोकी ठेवावीत. त्या सर्व खोक्यांना वरच्या बाजूला हात आत जाईल असे गोल छिद्र ठेवलेले असावे. प्रत्येक खोक्यांमध्ये वेगवेगळ्या वस्तू ठेवलेल्या आहेत हे विद्यार्थ्यांना सांगावे. एकेक मुला–मुलींना बोलावून त्यांच्या | समान आकाराचे व रंगाचे दहा बॉक्स, वस्तू चिंच, लिंबू, टोमॅटो ,बॉल, पेन्सिल, खोडरबर, | (१) वस्तू ओळखल्यानंतर चेहऱ्यावरील आणि व्यक्त केलेल्या भावनांचे निरीक्षण करावे. झालेल्या |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रडत होतो, हे सांगतो. | आवडीनुसार कोणत्याही खोक्यामध्ये हात घालून, वस्तू ओळखायला सांगावी. त्याने वस्तू बरोबर ओळखल्यास ती वस्तू त्याच्या किंवा तिच्या सुपूर्द करावी. न ओळखल्यास ती वस्तू बाहेर काढून, सर्वांना दाखवावी. खोक्यांचा क्रम पुन्हा बदलावा. या उपक्रमात रांगेने सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. | चॉकलेट, सीताफळ, चिकू, एक रुपयाचे नाणे इत्यादी. | नाराजी/आनंदा मागील कारण विचारावे. |
| CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**ध्येय :** सामाजिक भावनिक विकास<br>**क्षमता :** C 4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. | | | | | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख. भाव प्रकटीकरण | • योग्य भावनांनी प्रतिसाद देतो जसे – एकत्र गप्पांच्या वेळी विनोद झाल्यावर हसतो, उदास असताना शांत बसतो. | (१) योग्य भावनांच्या प्रतिसादावर आधारित, हावभावासह गोष्ट सांगावी. चित्रांचा उपयोग करून गोष्ट सांगावी.)<br>उदा. विनोदी कथा ,बोधकथा, साहसी कथा, संस्कार कथा, शौर्य कथा इत्यादी.<br>(२) विद्यार्थ्यांनी स्वतः विनोद सांगावा यासाठी प्रोत्साहन द्यावे.<br>(३) अनुभवलेले मजेशीर अनुभव सांगण्यास सांगावे.<br>(४) नकला करण्यास संधी द्यावी. | गोष्टीवर आधारित चित्रांची मालिका, व्यंगचित्रे | (१) भावना बदलांच्या संदर्भाने प्रश्न विचारणे.<br>चेहऱ्यावरील हावभावांचे निरीक्षण करणे व त्या संदर्भात नोंदी करणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम | कौशल्या–धिष्ठित उपक्रम | • स्वतःला शांत करण्यासाठी जाणीवपूर्वक काही कृती करतो. जसे, | (१) संयम चक्र : राग आला, आनंद झाला असे ओळखून संबंधिताला गोलाकार चक्रावरील एक कृती निवडून, सर्वांसमोर वैयक्तिकरीत्या ती पूर्ण करण्यास सांगावे. उदा. चिकटकाम, ठसेकाम, कागदकाम, रंगकाम इत्यादी. | गोलाकार चक्र : गोलाची चार भागांमध्ये विभागणी केलेली असावी. | (१) वर्तन बदलांचे निरीक्षण करून नोंदी करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | भावनांवर नियंत्रण | श्वासोच्छ्–वासावर लक्ष केंद्रित करणे कृती बदलणे. | | त्यात पुढील कृती असाव्यात. उदा. चिकटकाम, ठसेकाम, कागदकाम, रंगकाम | |
| CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**ध्येय :** सामाजिक व भावनिक विकास<br>**क्षमता :** C 4.3 इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो. | | | | | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | गरजाधिष्ठित उपक्रम | सांस्कृतिक कार्यजगताची ओळख. | • परिचित आणि अल्प परिचित मोठ्यांशी आदरपूर्वक संवाद साधतो. जसे – नमस्ते, कृपया, धन्यवाद, माफ करा. | (१) वर्ग सुरू असताना समोर पाच मुलामुलींना बोलवावे. त्यांच्या हातात प्रत्येकी पाच छोटे फलक द्यावेत. मोठ्या आवाजात एक प्रसंग सांगावा. त्यावर आपण कोणती भावना व्यक्त कराल? त्यानुसार योग्य फलक उंच धरायला सांगावे. इतर विद्यार्थ्यांना त्यांनी योग्य फलक दर्शवले अथवा नाही हे पाहायला सांगावे. या कृतीत सर्वच विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. | ५ फलक ज्यावर लिहिले आहे. – धन्यवाद, माफ करा, नमस्कार, शुभ रात्री, कृपया इत्यादी. | (१) सांगितलेल्या प्रसंगानुसार योग्य बोर्ड उंच धरतात का? याचे निरीक्षण करावे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम<br><br>ऐच्छिक उपक्रम | अभिरुचि– पूरक उपक्रम<br>सामाजिक विकास<br>नियम पालन | • इतर मुलांशी खेळताना खेळातील विशिष्ट नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे प्रतिसाद देतो. | (१) शाळेत आठवडे बाजाराचे आयोजन करावे. विद्यार्थ्यांना आपल्या आवडीप्रमाणे गटागटात सहभागी होण्याची संधी द्यावी. जसे – भाजी विक्रेता, ग्राहक, चहा विक्रेता, कपडे विक्रेता, फुगेवाला, शेतीची अवजारे विक्रेता इत्यादी. | भूमिकेशी संबंधित वेशभूषा आणि फलक उदा. भाजी विक्रेता, ग्राहक, चहा विक्रेता, | (१) कृती करताना योग्य सामजिक नियमानुसार करतात का, याचे निरीक्षण करावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रस्ता सुरक्षा | | (२) वाहतूक नियमांसंदर्भातील खेळ, वाहतूक चिन्हांच्या साहाय्याने गटागटात खेळण्यास संधी उपलब्ध करून द्यावी. उदा. थांबा, पहा, पुढे जा. अशा वाहतूक नियमांसंबंधीचे खेळ. | कपडे विक्रेता, फुगेवाला, शेतीची अवजारे विक्रेता इत्यादी.<br>वाहतूक संदर्भातील चिन्ह चित्रे. | (२) वाहतुकीच्या चिन्हांसंदर्भातील खेळ नियमानुसार खेळतात का, याचे निरीक्षण करावे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम | पर्यटन<br><br>सामाजिक विकास, सहकार्य | • समवयस्कां– सोबत अधिक काळ घालवतो, तसेच मोठ्यांच्या आधाराने अपरिचित वातावरणात राहतो. उदा. क्षेत्रभेट. | (१) गावातील भाजी मंडई, बाजारपेठ, शाळेचा इतर परिसर, चावडी, पोस्ट ऑफिस, पोलीस स्टेशन, दवाखाना, दूध डेअरी इत्यादी ठिकाणी क्षेत्रभेट आयोजित करावी. विद्यार्थ्यांना दिवस भरातील जास्त वेळ उपक्रमांच्या निमित्ताने समवयस्क, अपरिचितांच्या बरोबर राहण्याची संधी द्यावी.<br>(२) 'निवासी वर्ग एक अनोखा दिवस' असा उपक्रम घ्यावा. | क्षेत्रभेटीसाठी आवश्यक साहित्य | (१) समवयस्कांसोबत व मोठ्यांच्या आधाराने अपरिचित वातावरणात अधिक काळ राहतो का, याचे निरीक्षण करणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम | कौशल्या– धिष्ठित उपक्रम<br><br>सामाजिक विकास | • शाळेत मित्रमंडळींचा समूह बनवतो. | (१) काही कृतियुक्त गट तयार करावेत. त्यांच्या आवडीनुसार कृतीच्या गटात सहभागी होऊन, सादरीकरण करावयास सांगावे. जसे – कविता गायन करणारा गट, अभिनय करणारा गट, बागेत काम करणारा गट.<br>(२) गटात सहकार्य/नेतृत्व करण्यासाठी संधी द्यावी. | कवितांचे तक्ते, साफसफाई आणि सजावट करण्यासाठी साहित्य | (१) कोणत्या समूहात सक्रिय सहभागी होऊन सहकार्य, नेतृत्व अशा कृती करतो, त्याचे निरीक्षण करणे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम | आपत्ती व्यवस्थापन | • अल्पपरिचित समवयस्कांकडे अथवा मोठ्यांकडे आवश्यकते–नुसार सहकार्य मागतो. | कोणाची मदत मागाल?<br>(१) प्रथम गोष्ट सांगावी. गोष्टीचा आशय हा मुलांनी गरजेनुसार, अल्पपरिचित व समवयस्कांकडे अथवा मोठ्यांकडे तीन ते चार वेळा मदत मागणे या संदर्भात असावा. त्यानंतर अनुभवावर आधारित विशिष्ट प्रसंगी कोणाची मदत घ्याल असे. प्रश्न विचारावेत.<br>(२) क्षेत्रभेट, गप्पागोष्टी असे उपक्रम घ्यावेत.<br>(३) सुरक्षेसंबंधी नाट्य सादर करून घ्यावे. उदा. आग लागली, जोराचा पाऊस आला, घरातील पंखे, नळ सुरूच राहिले, या प्रसंगी काय कराल असे प्रश्न विचारावेत. | संबधित आशयाच्या गोष्टींचा संग्रह | (१) अल्पपरिचित अथवा मोठ्यांकडे, आवश्यकतेनुसार मदत मागतो याचे निरीक्षण करणे.<br>(२) विशिष्ट प्रसंगी कोणाची मदत मागतो?<br>(३) कोणती कृती करतो? याचे निरीक्षण करणे. नोंदी ठेवणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम | कौशल्या–धिष्ठित उपक्रम | • वयस्क आणि इतर मुलांना गरजेच्या वेळी सहकार्य करतो. | (१) रिकाम्या खोक्यापासून मानवी चेहरा, मोबाईल,संगणक, बाहुली, गाडी, कपाट इ. तयार करणे.<br>विद्यार्थ्यांचे चार गट करावेत. प्रत्येक गटात एक रिकामा खोका, चिकटकामाचे साहित्य, सुशोभनाचे साहित्य द्यावे. त्या प्रत्येक गटात, एक वस्तू तयार करण्यास सांगावे. तयार झालेल्या वस्तूचे प्रदर्शन करावे. | रिकामे खोके, चिकटकामाचे साहित्य, सुशोभनाचे साहित्य इत्यादी. | (१) प्रत्येक गटात काम करताना विद्यार्थी आपल्या समवयस्काला सहकार्य करणे, गरजेच्या वेळी मदत करणे अशी कृती करतात का, याचे निरीक्षण करावे. |

CG 4 - बालके भावनिक बुद्‌धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

**क्षमता :** C 4.4 इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम | आपत्ती व्यवस्थापन, नियम आज्ञापालन | • इतरांसोबत खेळताना नियम तयार करतो व त्याचे पालन करतो. | **योग्य चित्र चिकटवा.**<br>(१) फळ्यावर लावलेले, निसर्गाची ओळख करून देणारे चित्र समजून सांगावे. रिकाम्या चौकटीतील चित्रे, आठ ते दहा विद्यार्थ्यांच्या हातात द्यावीत. योग्य नावावर योग्य चित्र चिकटवण्याचा खेळ खेळण्यासाठी नियम तयार करण्याची संधी द्यावी. ही कृती करताना नियम तयार करणाऱ्यांनीही ते पाळावेत. | निसर्गाची ओळख दाखवणारे मोठे चित्र/तक्ता, रिकाम्या चौकटी असलेला कागद. भूकंप, वणवा, वीज, पाऊस, वादळ, गारा, पूर, दुष्काळ दर्शवणारी जाड पुठ्ठ्यावर चिकटवलेली चित्रे. (ज्यांच्या पार्श्वभूमीवर डिंक लावलेला आहे.) | (१) मित्रांसोबत खेळताना नियम तयार करतो व स्वत:ही पाळतो का? याचे निरीक्षण करावे. |

CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** सामाजिक, भावनिक विकास

**क्षमता :** C 4.5 शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम | कौशल्या–धिष्ठित उपक्रम<br>अभिव्यक्ती | • एकत्र खेळताना किंवा काम करताना स्वतःचे मत मांडतो. | (१) गट तयार करावे. प्रत्येक गटाला वेगवेगळ्या रंगांसह रांगोळी द्यावी. त्यांच्या आवडीप्रमाणे विविध आकारात रंगांचा वापर करून, ठरावीक वेळेत रांगोळी काढण्याची संधी द्यावी. सजावटीसाठी रांगोळीच्या रंगांऐवजी, वाळलेली पाने, खडे, माती, खडूचे तुकडे, इत्यादी वस्तू द्याव्यात. | रांगोळीचे रंग, वाळलेली पाने, विविध रंगांची माती, खडे, परिसरातील सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तू. | (१) समूहाने खेळताना, एकत्र काम करताना आपले स्वतःचे मत मांडतात का? याचे निरीक्षण करावे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम | कौशल्या–धिष्ठित उपक्रम<br>सकारात्मक वर्तन | • काम स्वीकारतो आणि ते पूर्ण करतो. | (१) वर्गात आणि वर्गा बाहेर, परंतु गटात करावयाची विविध कामे सुचवावीत. बालकांना काम आणि सहकारी निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे. स्वीकारलेले काम ठरावीक वेळेत पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. जसे – भेटकार्ड तयार करणे, फोटो फ्रेम तयार करणे, लघुउद्योग व संबंधित माहिती जमा करणे, वर्ग सुशोभन करणे, पाण्याविषयीचे चित्र रंगवून पूर्ण करणे, माती पासून प्रतिकृती तयार करणे इत्यादी. | भेटकार्ड, फोटो फ्रेम, मातकाम यांसाठी आवश्यक साहित्य, पाणी या संदर्भाचे चित्र. माहिती जमा करण्यासाठी कागद | (१) स्वत: स्वीकारलेले काम निवडलेल्या सहकाऱ्यांसह आणि निर्धारित वेळेत व्यवस्थित पूर्ण करतो का? याचे निरीक्षण करावे. |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम | तंत्रज्ञान क्षेत्र<br>नियम पालन | • सूचना अथवा नियमांचे पालन करतो. | (१) संगणक प्रयोगशाळेत उपस्थित असतानाचे नियम समजावून सांगणे. संगणक सुरक्षितपणे चालू करणे, सुरक्षितपणे बंद करणे, आरोग्य विषयक दक्षता घेणे, माऊस आणि की–बोर्डची हाताळणी पद्धत याविषयी माहिती आणि नियम समजावून सांगणे. त्यानुसार सोप्या कृती करून घेणे. | संगणक, सूचना कार्डस् अथवा तक्ते | (१) संगणक कक्षात सांगितलेल्या नियमाप्रमाणे संगणक वापरतात. सुरक्षितपणे चालू बंद करतात. स्वतःच्या आरोग्याची काळजी घेतात. माऊस आणि की–बोर्डची हाताळणी व्यवस्थित करतात का? याचे निरीक्षण करणे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम | तंत्रज्ञान क्षेत्र<br>तर्क व अनुमान | • नियम पालन न केल्यास होणारे परिणाम समजतो. | (१) संगणकविषयक नियमांचे पालन न केल्यास होणारे परिणाम समजावून सांगावे.<br>उदा. संगणक प्रणालीत उद्भवणाऱ्या समस्या, डेटा डिलीट होणे, सुलभ कार्य न घडणे, रिसायकल बीनचा वापर, माहिती जतन (सेव्ह) न होणे, आरोग्य विषयक समस्या उद्भवणे (जसे – डोळे, कान, पाठ) याविषयी. | संगणक, संगणकाचे विविध भाग दाखवणारे तक्ते/चित्र. | (१) संगणक कक्षामध्ये संगणकावर काम करताना नेहमी होणाऱ्या चुका टाळतो का? याचे निरीक्षण करणे. |

CG 4 - बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**ध्येय :** सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

**क्षमता :** C 4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतींसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम | कौशल्या- धिष्ठित उपक्रम<br><br>सहकार्य | • सामायिक कार्य करताना गटातील इतरांविषयी दयाळूभाव आणि स्नेह दाखवून कार्य करतो. | (१) मुलांची ४ गटामध्ये विभागणी करून, त्यांना वर्गाच्या चार कोपऱ्यांत रांगेत उभे करावे. एका कोपऱ्यात अगोदर सजवलेली खेळणी दुसऱ्या कोपऱ्यात एकमेकांच्या मदतीने हातोहात पोचवायला सांगावी. त्यानंतर दुसरा गट पुढच्या कोपऱ्यात हातोहात साहित्य पोहचवेल असे सुचवावे.<br>(२) विशिष्ट दिवसाचे औचित्य साधून, बालवाटिकेतील बालकांसोबत स्नेहभोजनाचे आयोजन करावे. याप्रसंगी प्राणी, पक्ष्यांसाठी उर्वरित अन्न, पाणी ठेवणारे विद्यार्थी. छोटी बालके, प्राणी, वनस्पती यांविषयी दयाभाव, स्नेहभाव दाखवणारे विद्यार्थी, यांना समोर बोलावून सन्मानित करावे. त्यांनी केलेल्या कामावर आधारित त्यांना प्रश्न विचारावेत. | सहज उपलब्ध होणारी लहान- मोठी विविध आकाराची खेळणी, शैक्षणिक साधने | (१) सामूहिक काम करताना दयाळूभाव, स्नेह, काळजी दाखवतात याचे निरीक्षण करणे. |

**CG 4 -** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात

**ध्येय :** सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

**क्षमता :** C 4.7 इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेऊन, त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतात.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम | उत्पादक उपक्रम | • स्वतःपेक्षा वेगळ्या असलेल्या व्यक्तीबद्दल | (१) आपल्या भारत देशातील विविध राज्यांत राहणाऱ्या लोकांच्या वेशभूषेसह तयार केलेल्या बाहुल्या, क्रमशः दाखवून त्यांच्या राहणीतील वैशिष्ट्ये सांगावीत. बाहुल्यांचे | काश्मीर, तामिळनाडू, केरळ, राजस्थान, | (१) बाहुल्या पाहून रंग, केस, चेहऱ्याची ठेवण, कपडे इत्यादी |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | कुतूहल आणि स्वारस्य दाखवतो. | निरीक्षण करून आपापल्या प्रतिक्रिया देण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना बाहुल्या हाताळण्याचीही संधी द्यावी.<br>(२) राज्याच्या इतर भागात घरांची रचना, त्यामध्ये असणारा फरक, घराची वैशिष्ट्ये स्पष्ट करतात. | पंजाब, बंगाल, आसाम इत्यादी राज्यातील वेशभूषा तयार केलेल्या बाहुल्या. कोकणातील घरे, पक्की घरे, बांबू, माती, गवत, दगड, विटांनी बनविलेल्या घरांची चित्रे. | वैशिष्ट्यांविषयी जिज्ञासा दाखवतो का? याचे निरीक्षण करावे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम | उत्पादक उपक्रम<br>तुलना | • व्यक्तींमधील साम्यभेदांवर आधारित प्रश्न विचारतो. | (१) विविध राज्यांत राहणाऱ्या नागरिकांविषयी तयार केलेल्या बाहुल्या चित्र दाखवून/हाताळायला देऊन अथवा त्यातील साम्य आणि फरक यांविषयी माहिती विचारावी. प्रसंगानुरूप वेशभूषाही करून घेण्यास सांगतात. | काश्मीर, तामिळनाडू, केरळ, राजस्थान, पंजाब, गुजरात, | (१) दाखवलेल्या बाहुल्यांच्या संदर्भाने, त्यांतील साम्य आणि फरक यांवर |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | बंगाल, गोवा या राज्यांतील नागरिकांच्या (स्त्री– पुरुष) विविध माध्यमातून तयार केलेल्या बाहुल्या किंवा जाड पुठ्ठ्यावर चिकटवून तयार केलेली चित्रे. | जिज्ञासापूर्वक प्रश्न विचारतात का? याचे निरीक्षण करावे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम | उत्पादक उपक्रम<br><br>सामाजिक विकास एकरूपता | • समवयस्क मित्रांच्या वैविध्यपूर्ण गटांमधील साम्य आणि भेद माहीत असून देखील, त्यांच्यामध्ये सहजरीत्या मिसळतो. | (१) प्रत्येकाला ओल्या मातीचा एक गोळा द्यावा. त्या मातीपासून आपापल्या आवडीनुसार एक वस्तू तयार करायला सांगावी. तयार झालेल्या वस्तूंची एकत्र मांडणी करून, वस्तूतील साम्य आणि भेद यांविषयी एकमेकांशी मैत्रीपूर्ण चर्चा करण्याची संधी द्यावी. | भिजवलेली माती, पुठ्ठ्यांचे तुकडे | (१) समूहात वस्तू तयार करतात, एकत्र मांडलेल्या वस्तूंमधील साम्य–फरक यांविषयी खुल्या मनाने चर्चा करतात का, याचे निरीक्षण करावे आणि नोंदी कराव्यात. |

CG 5 - बालके उत्पादक कार्यांबाबत व सेवेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.

**ध्येय :** नैतिक विकास

**क्षमता :** C 5.1 इतरांना मदत करण्यासाठी, वयानुरूप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवतो आणि त्यामध्ये सहभागी होतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | अनिवार्य उपक्रम | कौशल्या–धिष्ठित उपक्रम, मदत सहकार्य | • अध्ययन–अध्यापन साहित्य निर्मितीमध्ये शिक्षकांना साहाय्य करतो. | (१) वर्गात मुलांच्या संख्येनुसार गट तयार करावेत. प्रत्येक गटाला साहित्य देऊन, स्वतंत्रपणे अध्ययन–अध्यापन साहित्य तयार करण्याविषयी माहिती सांगावी.<br>जसे – गट क्र. १ कार्डवर पाने, फुले, काड्या चिकटवून विविध आकार तयार करावेत.<br>जसे – गट क्र. २ कार्डवर विविध रंगाचे, वस्तूंचे ठसे द्यावेत.<br>जसे – गट क्र. ३ गोल आकारातील कागदांवर मुखवटे तयार करावे.<br>जसे – गट क्र. ४ रुमाल, कापूस, दोरा यांपासून बाहुल्या तयार कराव्या.<br>जसे – गट क्र. ५ नारळाच्या हिरव्या पात्यांपासून चटई तयार करणे.<br>जसे – गट क्र. ६ जाड कागदावर कापडाचे विविध प्रकारचे नमुने चिकटवावेत. तयार झालेल्या साहित्याचे प्रदर्शन भरवावे. | रंगीत जाड कागद, पाने, फुले, काड्या, डिंक, रुमाल, कापूस, दोरा, ठसे कामासाठी रंग व वस्तू, नारळाची पाने इत्यादी. | (१) प्रत्येक गटाने तयार केलेल्या साहित्याचे आणि सामूहिक प्रयत्नांचे निरीक्षण करावे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम | उत्पादक उपक्रम जीवन कौशल्य | • स्वयंपाकघरात धुणे, कापणे इत्यादी कामांत मदत करतो. | (१) कडधान्याची भेळ<br>आवश्यक साहित्य टेबलावर मांडावे. सर्व साहित्याची ओळख करून द्यावी. कडधान्याची भेळ कशी करणार आहोत, ही प्रक्रिया | मोड आलेली विविध कडधान्ये, लिंबू, मीठ, | (१) कडधान्याची भेळ तयार करताना धुणे, कापणे, एकत्रित करणे, |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | समजावून सांगावी. टोमॅटो, काकडी, कांदे, लिंबू इत्यादी वस्तू कापून दाखवाव्यात. वर्गातील मुलामुलींच्या मदतीने कडधान्याची भेळ तयार करावी. भेळेचे वाटप, स्वच्छता ही कामे वाटून द्यावीत. | टोमॅटो, पातेले, चाकू, चमचा, वाट्या अशा सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तू | वाटप करणे, स्वच्छता इत्यादी कामात सहभागी होतात का, याचे निरीक्षण करणे. |
| CG 6 - बालके स्वत: भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवतात.<br>**ध्येय :** नैतिक विकास<br>**क्षमता :** C 6.1 सर्व प्रकारच्या जीवांबाबत काळजी घेतो व त्यांच्या सोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करतो. | | | | | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम | शेतीपूरक व्यवसाय<br><br>सेवाभाव | • मांजरीचे, कुत्र्याचे पिल्लू यांसारख्या प्राण्यांचे संगोपन आणि काळजी घेण्याची जबाबदारी घेतो. | (१) जाड कागदावर चिकटवलेली रंगीत चित्रे/प्रतिकृती/बाहुल्या दाखवाव्यात. विविध प्राण्यांच्या पिल्लांचे संगोपन करण्याची पद्धत विचारावी. जसे – प्रतिकृतींपैकी कोणत्या प्राण्याच्या पिल्लाचे संगोपन करायला आवडेल? व का? असे प्रश्न विचारावेत. | मांजर, कुत्रा, कोंबडी, बदक यांच्या पिल्लांसह जाड कागदांवरील चित्रे/प्रतिकृती /बाहुल्या | (१) प्राणी ओळखणे. त्यांच्या पिल्लांचे संगोपन करण्याविषयी माहिती देण्याच्या पद्धतीचे, त्यांच्यासोबत राहण्यातील आनंद मिळवण्याची उत्सुकता यांचे निरीक्षण करावे. |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | ऐच्छिक उपक्रम | पर्यटन<br><br>आनंदाची अनुभूती | • निसर्गामध्ये फेरफटका मारताना झाडे आणि प्राणी यांचे निरीक्षण | (१) शाळेजवळील शेत, नदी, ओढ्याचा किनारा, बाग, रोपवाटिका, देवराई इत्यादींपैकी एखाद्या ठिकाणी क्षेत्रभेट आयोजित करावी. जाताना आणि येताना रस्त्याने दिसणाऱ्या प्राणी, पक्षी, वनस्पती यांचे निरीक्षण करू द्यावे. | क्षेत्रभेटीसाठी आवश्यक साहित्य | (१) शाळेजवळील शेत, नदी, ओढ्याचा किनारा, बाग, रोपवाटिका, देवराई इत्यादी पैकी एखाद्या |

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | करण्याचा आनंद घेतो. | वर्गात परतल्यावर पाहिलेल्या अनेक निसर्ग घटकांपैकी, सर्वाधिक आवडलेल्या वस्तूचे, घटकाचे वर्णन विचारावे. | | ठिकाणी क्षेत्रभेट आयोजित करावी.जाताना आणि येताना रस्त्यानी दिसणारे प्राणी, पक्षी, वनस्पती यांचे निरीक्षण करू द्यावे. वर्गात परतल्यावर पाहिलेल्या अनेक निसर्ग घटकांपैकी, सर्वाधिक आवडलेल्या वस्तू, घटकाचे वर्णन विचारावे. मित्र तसेच दिसलेले प्राणी, पक्षी, वनस्पती यांचे निरीक्षण करणे, त्यांची काळजी घेणे, त्यांच्या समवेत राहण्याचा आनंद मिळवणे अशा विद्यार्थी कृतींचे निरीक्षण करावे. |

# पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम - २०२४

## (वय वर्षे ३ ते ८)

## विषय : आरोग्य व शारीरिक शिक्षण

### प्रस्तावना

शिक्षण ही ज्ञान, कौशल्ये आणि मूल्यांच्या प्राप्तीची प्रक्रिया आहे. ज्ञान, कौशल्ये व अभिवृद्धी यांचे संपादन करणे म्हणजे शिक्षण. भारतीय अर्थशास्त्राचे जनक आचार्य चाणक्य (विष्णूगुप्त कौटिल्य) असे म्हणतात, की 'शिक्षण हा सर्वांत चांगला मित्र आहे, सुशिक्षित व्यक्तीचा सर्वत्र आदर केला जातो.' शिक्षण आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यावश्यक आहे. 'जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे आणि आपली मते विकसित करण्यास मदत करणे' हे शिक्षणाचे कार्य आहे. मानवाचे शरीर आणि मन निरोगी ठेवण्याच्या प्रक्रियेला 'शारीरिक शिक्षण' म्हणतात.

शारीरिक शिक्षण हा शिक्षणाचा एक मूलभूत पैलू आहे, जो शारीरिक तंदुरुस्ती आणि कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करतो. शारीरिक शिक्षण हे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक आरोग्य आणि सामाजिक कौशल्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य करते. शारीरिक शिक्षणाद्वारे शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकास होतो. शारीरिक शिक्षण हा आजच्या युगातील बालकांच्या सर्वांगीण विकासाचा अविभाज्य भाग बनला आहे. शारीरिक शिक्षणामुळे बालकांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. शारीरिक शिक्षणामध्ये व्यायामांवर जास्तीत जास्त भर दिला जातो.

शारीरिक शिक्षणामध्ये पायाभूत स्तर हा महत्त्वाचा स्तर आहे. पायाभूत स्तर हा सर्वांगीण विकासाचा पाया म्हणून कार्य करतो. असे म्हटले जाते, की ज्या इमारतीचा पाया भक्कम, ती इमारत भक्कमपणे उभी राहते, तसेच शारीरिक शिक्षणामध्ये पायाभूत स्तर उंचावला, तर प्राथमिक, शालेय, महाविद्यालयीन स्तर पण उंचावेल. शारीरिक शिक्षणाद्वारे लहानपणीच बौद्धिक, कारक, भावनिक व सामाजिक क्षेत्रांची बांधणी केली जाईल. पायाभूत स्तर म्हणजे बालवाटिका १, २, ३, इयत्ता पहिली, इयत्ता दुसरी या वर्षांच्या शैक्षणिक स्तरावर, आपण आरोग्य व शारीरिक शिक्षण यांचा विचार सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने घेत आहोत.

पायाभूत स्तरांमध्ये लहान मुलांच्या मेंदूच्या एकंदर विकासापैकी ८५% हून अधिक विकास वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत होत असतो. यावरून मेंदूच्या निकोप वाढीसाठी, या स्तरावर काळजी घेणे व उत्तेजन देणे महत्त्वाचे आहे. या मुलांना आयुष्यभर शैक्षणिक व्यवस्थेत सहभाग घेण्यासाठी सक्षम बनविण्याचे मूलभूत काम या स्तरावर होणे ही काळाची गरज आहे.

पायाभूत स्तरावर अध्ययन–अध्यापनाची संपूर्ण प्रक्रिया बालकेंद्रित असावी. या प्रक्रियेमध्ये राष्ट्र निर्माणाबद्दल लक्ष देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षणाची प्रक्रिया रंजक व आनंददायी व्हावी हा दृष्टिकोन समोर ठेवून कार्यवाही होणे अपेक्षित आहे. शिक्षण हे आनंददायी, खेळातून शिकण्याजोगे कसे होईल व बालकांच्या शारीरिक क्षमतांचा विकास कसा होईल याचा विचार शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात केला जाणार आहे. बालकांची मूलभूत व कारक कौशल्ये कशी वृद्धिंगत होतील, याकरता विविध उपक्रम करण्याचा प्रयत्न केलेला असेल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, शारीरिक शिक्षण इतर विषयांशी कसे जोडले जाईल याचाही विचार या अभ्यासक्रमात केला आहे. विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक व सामाजिक विकास व्हावा, हा दृष्टिकोन समोर ठेवून अभ्यासक्रम साचेबद्ध करण्यात आलेला आहे. बालकांनी केवळ शिकणेच महत्त्वाचे ठरणार नाही, तर कसे शिकायचे हे जास्त महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे मजकूर कमी करून तार्किक विचार करून, समस्या कशा सोडवायच्या याचा विचार केलेला आहे. विविध आकृती/तक्ता वापरून, वेगवेगळ्या तंत्रज्ञानाच्या द्वारे बालकांना ज्ञान देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सर्वसमावेक्षक अभ्यासक्रम तयार केला आहे, ज्यामध्ये भाषा, गणित व परिसर अभ्यास या विषयांची सांगड क्रीडा आणि स्वास्थ्य यांच्याबरोबर घालून संस्कृती व मूल्ये यांचा समावेश केला आहे. शिक्षणामुळे केवळ आकलन क्षमता विकसित झाली पाहिजेत असे नाही, तर मूलभूत क्षमता उदा. सामाजिक, नैतिक आणि भावनिक इत्यादी क्षमतांचाही विकास झाला पाहिजे. अभ्यासक्रम चित्ररूप व बालकांच्या कृतिशीलतेला संधी देणारा आहे.

बालकाच्या शारीरिक क्षमता विकसित व्हाव्यात, म्हणून अभ्यासक्रमात दिलेले उपक्रम नावीन्यपूर्ण आहेत व्यायाम प्रकारांची मांडणी सुटसुटीत व सोपी केली आहे. या अभ्यासक्रमात मैदानावरील उपक्रमांबरोबरच आरोग्याचा विकास होईल, या गोष्टीकडेसुद्धा लक्ष दिले आहे. बालकाची वैयक्तिक स्वच्छता उदा. हात धुण्यापासून स्वत:चे कपडे घालणे, याबरोबर योग्य व अयोग्य आहार, परिसराची जाणीव, सुरक्षिततेबद्दल उपाय उदा. स्व–सुरक्षा, स्वावलंबन यांकडे लक्ष दिलेले आहे.

शारीरिक सुदृढता व कारक कौशल्ये विकसित असलेला निरोगी व सकारात्मक सक्रिय जीवनशैली असणारा, राष्ट्रप्रेमाने भरलेला, विकसित नागरिक होण्यासाठी सक्षम पाया तयार करणे हे पायाभूत स्तरावर शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचे ध्येय आहे.

### २) ध्येय :

शारीरिक सुदृढता व कारक कौशल्ये विकसित असलेला निरोगी व सकारात्मक, तसेच सक्रिय जीवनशैली असणारा, सर्वार्थाने विकसित, देशभक्त/राष्ट्रभक्त नागरिक तयार होण्यासाठी सक्षम पाया तयार करणे हे पायाभूत स्तरावर शारीरिक शिक्षणाचे ध्येय आहे.

## ३) तत्त्वे :

| शारीरिक शिक्षणाची तत्त्वे | | | |
|---|---|---|---|
| १) | सर्वांगीण विकास | १०) | आहार |
| २) | सर्वसमावेशकता | ११) | मूलभूत कारक क्षमता |
| ३) | वैयक्तिक प्रगती | १२) | राष्ट्रभक्ती/देशभक्ती |
| ४) | सुरक्षितता | १३) | मनोरंजन |
| ५) | स्वच्छता व परिसर | १४) | फावल्या वेळेचा सदुपयोग |
| ६) | आरोग्य आणि निरामयता | १५) | जीवन कौशल्ये |
| ७) | हालचालींवर आधारित शिक्षण | १६) | नीतिमूल्ये |
| ८) | स्वावलंबन | १७) | शारीरिक सुदृढता |
| ९) | कौशल्य विकास | १८) | खेळ |

## ४) शारीरिक शिक्षणाची उद्दिष्टे :

### ३ ते ६ वर्षे उद्दिष्टे :

१) शारीरिक हालचालीतून शरीर सुदृढ करणे.

२) शारीरिक हालचालीतून मनोरंजन व आनंद मिळवणे.

३) आरोग्यविषयक चांगल्या सवयी अंगी बाणवणे.

४) योग्य व अयोग्य आहाराबद्दल ज्ञान देणे.

५) ताणतणाव दूर करून मानसिक शांतता व स्वास्थ्य मिळवणे.

६) पारंपरिक खेळांची आवड टिकवून ठेवणे.

७) आंतरिक ऊर्जेस वाव देणे.

८) स्वच्छताविषयक चांगल्या सवयी लावणे.

९) सांघिक भावना विकसित करून, संघ शक्तीची जाणीव करून देणे.

१०) सामाजिक जाणीव निर्माण करणे.

११) भारतीय संस्कृती, मूल्ये, परंपरा यांची जाण ठेवून, जोपासना करणे.

१२) सुरक्षिततेविषयक चांगल्या सवयी लावणे.

१३) राष्ट्रप्रेमाची जाणीव निर्माण करणे.

**६ ते ८ वर्षे उद्दिष्टे :**

१) मूलभूत हालचालींची ओळख करून देणे.

२) मुक्त हालचाली व खेळातून आनंद मिळवून देणे.

३) शारीरिक सुदृढतेची जाणीव निर्माण करणे.

४) योग्य शारीरिक स्थितीबद्दल जाणीव निर्माण करणे.

५) आरोग्यविषयक चांगल्या सवयी अंगी बाणवणे.

६) आंतरिक ऊर्जेस वाव देणे.

७) आहाराविषयक चांगल्या सवयी लावणे.

८) मैदान, क्रीडांगण, परिसर स्वच्छतेची जाणीव निर्माण करणे.

९) खेळ व व्यायामाची आवड निर्माण करणे.

१०) योग साधनेची (उदा. सूर्यनमस्काराची स्थिती, प्राणायाम, ध्यान) आवड निर्माण करणे.

११) खेळाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, मूल्ये, परंपरा यांची जाण ठेवून जोपासना करणे.

१२) खेळाच्या माध्यमातून देशप्रेमाची जाणीव निर्माण करणे.

१३) सुरक्षिततेविषयक चांगल्या सवयी लावणे.

१४) सामाजिक जाणीव निर्माण करणे.

१५) खेळाच्या माध्यमातून जीवन कौशल्ये विकसित करून, व्यक्तिमत्त्व विकास घडविणे.

**५) क्षेत्र :**

१) आरोग्य/निरामय आरोग्य

२) शारीरिक विविध हालचाली व योग्य शरीरस्थिती

३) आरोग्याधिष्ठित शारीरिक सुदृढता

४) कारक कौशल्ये

५) कृतिशील जीवनशैली

## ६) शारीरिक शिक्षण आणि पंचकोश पायाभूत स्तर :

पायाभूत स्तरात बालके तीन वर्षांपासून येत असतात. त्यामुळे त्यांच्या शारीरिक शिक्षणाविषयी खूप काळजीपूर्वक रचना करून, त्यांच्या वयाच्या अवस्थेला लक्षात घेऊन, या शिक्षणाची व्यवस्था करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने शारीरिक शिक्षण हा वेगळा भाग नसून, तो त्यांच्या दैनंदिन शालेय कामकाजाचाच भाग असावा. यात बालकांना आनंद प्राप्त व्हावा हा प्रमुख उद्देश ठेवून, कामकाज व्हावे असे वाटते. शारीरिक शिक्षणात देखील अन्नमयकोशासह उर्वरित सर्वकोश अंतर्भूत आहेत; ते कसे हे आपण बघू.

### १) अन्नमयकोश :

शारीरिक शिक्षण म्हटले की, त्यात प्राधान्याने अन्नमयकोशाचा विचार होतो हे निश्चित. बालके अतिशय कोवळ्या वयात पायाभूत स्तरात शाळेत येतात. त्यामुळे त्यांचे शारीरिक विकसन करत असताना, कोणत्याही प्रकारची दुखापत होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. सर्वांत प्रथम या विद्यार्थ्यांचे शरीर सुदृढ व्हावे या दृष्टीने त्यांच्या आहाराकडे लक्ष पुरवणे आवश्यक आहे. शाळेत बालके कोणत्या प्रकारचा आहार आणतात, हे अध्यापकांनी लक्षात घेणे आवश्यक असते. आहारविषयक चांगल्या सवयी लावून, त्याचा चांगला परिणाम त्यांच्या शरीरावर होईल हे पहावे. आहार चौरस असावा, म्हणून पालकांशी संपर्क करून, त्यांना या संबंधात जागरूक करणे आवश्यक आहे. बालकांनी सर्व प्रकारच्या आहाराचा स्वीकार करावा, म्हणून त्यांच्याशी अधून मधून संवादही केला पाहिजे. आहाराबरोबर बालकांमध्ये काही शारीरिक दोष आहेत का, याकडेही लक्ष द्यावे लागेल. जर असे असेल तर ते दूर करण्यासाठी पालकांशी संपर्क करावा.

बालकांनी पुरेशी विश्रांती अर्थात झोप घ्यावी याविषयीही पालकांशीच बोलावे लागेल. बालकांच्या वैयक्तिक स्वच्छतेविषयी पालक व अध्यापक यांनी जागरूक असावे. यामुळे बालकाचे शारीरिक पोषण योग्य होण्यास मदत होऊ शकते. हा अन्नमय कोशाचा सगळ्यात महत्त्वाचा भाग आहे.

शरीरातील इंद्रिये सुदृढ होण्यासाठी त्यांना योग्य त्या पद्धतीने, वारंवार सरावाने कार्यामध्ये गुंतवावे लागेल. त्यात पंच ज्ञानेंद्रिये अर्थात डोळा, कान, नाक, त्वचा आणि जीभ यांचा वापर करण्यासाठी काही क्रियाकलाप द्यावे लागतील. त्याचबरोबर पंचकर्मेंद्रिये हात, पाय, वाणी, पायु आणि उपस्थ यांच्याही सक्षमीकरणाकडे जाण्यासाठी काही क्रियाकलाप आयोजित करावे लागतील. यामुळे त्यांचा योग्य तो उपयोग सुरू होईल. बालकांच्या शारीरिक शक्ती, दम, बल आणि लवचिकता, यांच्या वाढीसाठी, तसेच स्नायूंच्या शक्तीच्या वाढीसाठी विविध क्रियाकलाप घेता येतील. त्यातील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे खेळ. बालके लहान वयात खेळण्यासाठी उत्सुक असतात. वरील शक्ती वाढण्यासाठी विविध पद्धतीच्या मैदानी खेळांची योजना करता

येईल, ज्यातून हळूहळू या शक्तींचा विकास होऊ शकतो. याशिवाय काही छोट्या छोट्या क्रिया कलापांची व्यवस्थाही करावी लागेल. उदाहरणार्थ–दोरीचा जिना चढणे, विशिष्ट उंचीवरून उडी मारणे, बसणे, मांडी घालून बसणे, हातामध्ये एखादी वस्तू घेऊन चालणे इत्यादी. यामुळे शारीरिक स्नायूंनाही बळकटी येऊ शकते. या सर्वांचा विचार करून, बालकाच्या शारीरिक क्षमतेत हळूहळू वाढ करत जाणे हे उपयोगी ठरेल.

२) **प्राणमयकोश :**

शारीरिक क्षमता वाढवत असताना, पंच ज्ञानेंद्रिये व पंचकर्मेंद्रिये यांच्या क्षमतेत अधिक तीव्रता आणावी लागेल, म्हणजेच त्यांच्या कौशल्यात वाढ करावी लागेल. उदाहरणार्थ संतुलनाचे क्रियाकलाप, हस्त–नेत्र, हस्त–पाद समन्वयाच्या गोष्टी, खेळण्यामध्ये चपळता आणणे, अधिक वेगाने धावणे, विटांवरून चालण्याचा प्रयत्न करणे, चेंडू खेळणे, विशिष्ट अंतरावर फेकणे, कमीत कमी वेळात एखादी क्रिया सफाईदारपणे पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे, या सर्व कौशल्यांचा त्यात समावेश होऊ शकतो, ज्यामुळे शारीरिक शक्तीच्याबरोबर, त्याचे इंद्रिय कौशल्य देखील विकसित होऊ शकेल, या सर्वांचा उपयोग उर्वरित विषयांमधील ज्ञानग्रहणामध्ये होणार आहे, हे आपण लक्षात घेऊया.

३) **मनोमयकोश :**

शारीरिक क्षमता व कौशल्य ही बालकांच्या सवयीचा भाग होणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ स्वच्छताविषयक सवयी, आहाराच्या सवयी, खेळताना एकमेकांशी जुळवून घेणे, छोट्या छोट्या कवायतींच्या प्रकारात सहकार्याने व समन्वयाने काम करण्याची सवय इत्यादी. थोडक्यात मनोमय कोशाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारच्या शिक्षेचा विचार न करता, अत्यंत समंजस पद्धतीने या सवयी बालकांना लावाव्या लागतील. त्याचबरोबर चुकीच्या सवयी काढण्याविषयी देखील हळूहळू प्रयत्न करावे लागतील. उदाहरणार्थ चॉकलेट खाणे, अयोग्य पदार्थाचे सेवन करणे हे कमी करावे लागेल. स्वच्छतेच्या बाबतीतली अनास्थादेखील दूर करावी लागेल; जेणेकरून त्यांचा शारीरिक विकास हा उत्तम प्रकारे होऊ शकेल. अर्थात, यामध्ये पालकांचाही सहभाग घ्यावा लागेल.

४) **विज्ञानमयकोश :**

शारीरिक क्षमता वृद्धिंगत होत असताना, बालके जे क्रियाकलाप करतात, त्याद्वारे त्यांच्या बौद्धिक विकसनाला देखील सुरूवात होऊ शकते. उदाहरणार्थ, खेळताना नेतृत्व करणे, आपला संघ जिंकेल यासाठी काही योजना करणे, सांगितलेले नियम लक्षात घेऊन त्याप्रमाणे खेळ खेळणे, छोट्या छोट्या अंतराची मापे लक्षात घेऊन, तशा पद्धतीने आपले काम करणे. उदाहरणार्थ, विशिष्ट चौकोनातूनच चालायचे असे सांगितल्यावर त्याचा उपयोग करणे, थोडक्यात सांगितलेली

गोष्ट समजून, त्या पद्धतीने शारीरिक क्रिया करणे आणि आवश्यक त्या ठिकाणी निर्णय घेणे, असे काही बिंदू यामध्ये लक्षात घेण्यासारखे आहेत.

**५) आनंदमयकोश :**

शारीरिक विकासात खेळाइतका आनंद क्वचितच अन्य ठिकाणी कुठे मिळू शकेल. त्यामुळे बालकांना मनमुराद खेळायला मिळाले, तर त्यातून होणारा आनंद हा महत्त्वाचा आहे. याशिवाय केव्हातरी निसर्गाच्या सहवासात घेऊन जाणे व तिथे निसर्गाच्या सान्निध्यात शारीरिक कृतींद्वारे काही क्रियाकलाप करणे; उदाहरणार्थ, पाण्यामध्ये खेळणे, छोट्या छोट्या झाडांच्या भोवती पारंब्यांना लटकणे, अशा क्रियाकलापांमधून बालके आनंद प्राप्त करू शकतील, याशिवाय एखादे छोटसे आव्हान जर दिले, तर ते पूर्ण करण्यासाठी बालके धडपडतात व पूर्ण केल्यावर परिपूर्तीचा आनंद घेतात, एक गोष्ट मात्र या ठिकाणी लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे पायाभूत स्तरावर शारीरिक स्पर्धा टाळल्या पाहिजेत, कारण स्पर्धेतून आनंद प्राप्त न होता ईर्षेत रूपांतर होते, म्हणूनच केवळ निखळ आनंद मिळण्यासाठी विविध क्रियाकलापांची योजना करावी हे महत्त्वाचे आहे.

| क्षेत्र – कोश | उद्दिष्ट | क्षमता |
|---|---|---|
| अन्नमय कोश | शारीरिक विकास | ज्ञानेंद्रिये – कर्मेंद्रिये, वैयक्तिक आरोग्य आणि स्वच्छता, आहार, निद्रा, चांगल्या सवयी, स्नायूंची व हाडांची ताकद, बळ, लवचिकता. |
| प्राणमय कोश | प्राणिक विकास/ कौशल्य विकास | संतुलित श्वसन क्रिया, प्राणांची एकाग्रता, दम, कार्यशक्ती, उत्साह, विजिगीषा, साहस, महत्त्वाकांक्षा, पराक्रम. |
| मनोमय कोश | मानसिक विकास/ कारक कौशल्य | संघ भावना, नेतृत्व, सद्गुण सदाचार, दया, करुणा, सहकार्य, संवेदनशीलता, समायोजन, एकाग्रता, शांती, बुद्धीच्या नियंत्रणात मन, द्वंद्वाची समाप्ती, तितिक्षा. |
| विज्ञानमय कोश | बौद्धिक विकास/ बोधात्मक विकास | ग्रहणशक्ती, धारणाशक्ती, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती, निरीक्षण, परीक्षण, तर्क, अनुमान, विश्लेषण, संश्लेषण, निर्णय. |
| आनंदमय कोश | आत्मिक विकास | अंतःकरण शुद्धी, आनंद, प्रेम, सर्जनशीलता, सौंदर्य दृष्टी, सांस्कृतिक संवर्धन. |

❑❑❑

**विकासक्षेत्र :** शारीरिक विकास (प्राणमय कोश)

**ध्येय : CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.

**क्षमता : C-1.1.1.1 - A** पोषण आहाराबाबत रुची व समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | आहार | अन्नपदार्थ, आरोग्यदायी सवयी | • खाण्यायोग्य, खाण्यास अयोग्य अन्नपदार्थ ओळखतो. | (१) खाण्यायोग्य अन्नपदार्थांची ओळख करून देणे. उदा. फळे, भाज्या, कडधान्ये, दूध-दुग्धजन्य पदार्थ.<br>(२) खाण्यास अयोग्य अन्नपदार्थांची ओळख करून देणे. उदा. चॉकलेट, केक, आईस्क्रिम, वेफर्स, शीतपेय.<br>(३) दृक्श्राव्य साहित्याच्या मदतीने योग्य/अयोग्य पदार्थांची ओळख करून देणे. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ, प्रतिकृती, चित्रे, कृतिपत्रिका, चित्रफीत | • निरीक्षण व नोंदी<br>• खाण्यायोग्य व अयोग्य पदार्थ ओळखतो. |
| **C-1.1.1.1-B** | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | आहार | अन्नपदार्थ, आरोग्यदायी सवयी | • मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतो व त्यांची नावे सांगतो. | (१) वेगवेगळ्या अन्नपदार्थांची नावे सांगता येण्यासाठी विविध कृतींची रचना करणे.<br>(२) मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतील, यासाठी कृतींची रचना करणे.<br>(३) अन्नपदार्थांवर आधारित गीत/गोष्ट सांगणे.<br>(४) गप्पागोष्टी करणे.<br>(५) अन्नपदार्थ न सांडता खाणे. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ, प्रतिकृती, चित्रे, कृतिपत्रिका, चित्रफीत | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **C-1.1.1.2** | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | आहार | पोषक अन्नपदार्थ, अपायकारक अन्नपदार्थ | • आरोग्यास पोषक व अपायकारक अशा काही | (१) आरोग्यास पोषक अन्नपदार्थांची नावे सांगता येणे. उदा. दूध-दुग्धजन्य पदार्थ, कडधान्ये, भाज्या, फळे इत्यादी. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ, प्रतिकृती, चित्रे, कृतिपत्रिका | • निरीक्षण तोंडी कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अन्नपदार्थांची नावे सांगतो. | (२) आरोग्यास अपायकारक अन्नपदार्थांची नावे सांगणे. उदा. चॉकलेट, केक, आईस्क्रिम, तळलेले पदार्थ, पॅकिंग फूड, शीतपेये.<br>(३) खेळाद्वारे आरोग्यास पोषक व अपायकारक अन्नपदार्थांची नावे सांगणे. | | |
| **C-1.1.2-1** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आहार | अन्नपदार्थ, आरोग्यदायी सवयी | • मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. (उदा., धान्य, फळे, भाज्या, डाळी, शेंगा, सुकामेवा (Nuts) दुधाचे पदार्थ. | (१) वेगवेगळे अन्नपदार्थ शिक्षक/पालक अशा मोठ्या व्यक्तींच्या मदतीने खातील; जसे की, वेगवेगळी फळे, भाज्या, धान्य, डाळी, शेंगा, दुधाचे पदार्थ.<br>(२) दिलेले वेगवेगळे अन्नपदार्थ आवडीने खातो. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ | • मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. |
| **C-1.1.2.2 – A** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आहार | पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थ ओळखतो. | • दुकानातील आरोग्यास पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थ ओळखतो. | (१) शिक्षक दुकानातील आरोग्यास पोषक व अपायकारक अन्नपदार्थ वर्गात आणतील व बालकांना त्यांचा परिचय करून देतील. उदा. धान्य, भाज्या, डाळी, शेंगा, दुधाचे पदार्थ, वेफर्स, कुरकुरे, केक, आईस्क्रिम, चॉकलेट, नुडल्स, शीतपेय. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ, प्रतिकृती, कृतिपत्रिका | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (२) वेगवेगळ्या अन्नपदार्थातील पोषक अन्नपदार्थ निवडण्यासाठी, शिक्षक बालकांना प्रोत्साहित करतील.<br>(३) खेळाद्वारे दुकानातील आरोग्यास पोषक व अपायकारक अन्नपदार्थ ओळखण्यास सांगणे. | | |
| **C-1.1.2.2 - B** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आहार | पोषक अन्नपदार्थ | • काही पदार्थ पोषक असण्यामागची कारणे स्पष्ट करतो. | (१) काही अन्नपदार्थ शरीरासाठी पोषक का असतात व काही अन्नपदार्थ पोषक का नसतात हे शिक्षक बालकांना गाणी, गप्पागोष्टींद्वारे समजावून देतील.<br>(२) वेगवेगळे अन्नपदार्थ पोषक का असतात हे बालके स्पष्ट करतील.<br>(३) पोषक अन्नपदार्थांची वेशभूषा करून, त्याबद्दल दोन वाक्ये बोलणे. | चार्ट, चित्रे, प्रत्यक्ष अन्नपदार्थ, चित्रफीत | • निरीक्षण, तोंडी कृती, मूल्यमापन |
| **C - 1.1.2.3** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आहार | अन्नपदार्थ निर्मिती | • (चित्रकृतींच्या मदतीने) साधी न्याहरी, स्नॅक्स बनवतो. | (१) बालके स्वत: वर्गामध्ये न्याहरी बनवण्याच्या विविध कृतींची चित्रे आणून, त्यांच्या मदतीने न्याहरी बनवतील.<br>(२) भेळ, शेंगदाणा लाडू यांसारखी न्याहरी बनवतील. | चित्रे, कृतिपत्रिका, प्रत्यक्ष न्याहरीचे साहित्य | • प्रात्यक्षिक, निरीक्षण |
| **C - 1.1.2.4** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आहार | चांगल्या सवयी | • अन्नपदार्थ न सांडता खातो. | (१) घरातून आणलेले अथवा वर्गात तयार केलेले वेगवेगळे अन्नपदार्थ न सांडता खातील. | विविध खाद्य/ अन्नपदार्थ | • न सांडता खाल्ले का याचे निरीक्षण |

**C - 1.1.3.1**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | आहार | पोषक आहार | • स्वत:हून विविध अन्नपदार्थ खातो. | (१) वेगवेगळे पोषक अन्नपदार्थ, स्वतःहून वर्गात आणतो.<br>(२) स्वत:हून विविध कडधान्ये, दुग्धजन्य पदार्थ, फळे, भाज्या इ. खातो. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ, प्रतिकृती, चित्रे, कृतिपत्रिका | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |

**C - 1.1.3.2 - A**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | आहार | पोषक आहार, वाईट सवयींना प्रतिबंध | • वेगवेगळ्या खाद्य–पदार्थांतील अन्नघटक ओळखतो आणि त्यांचे फायदे व दुष्परिणाम स्पष्ट करतो. | (१) आरोग्यदायी आणि अस्वास्थ्यकारक पदार्थांची उजळणी शिक्षक वर्गात करतात. शिक्षकांनी बालकांना ते कोणते आरोग्यदायी पदार्थ खातात हे विचारावे.<br>(२) आरोग्यदायी आणि अपायकारक अन्नपदार्थ वेगवेगळे करण्यासाठी शिक्षक वर्गात एक प्रात्यक्षिक सादर करतील. प्रत्येक बालक पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थांचे वर्गीकरण करतो. (जसे : चणे, फुटाणे, दाणे, लाडू, पिझ्झा, बर्गर, नूडल्स, बंद पाकिटातील पदार्थ इत्यादी)<br>(३) शिक्षक बालकांना विविध अन्नपदार्थांतील पोषकता आणि त्यांचे फायदे स्पष्ट करतील. उदा. दुधामुळे दात मजबूत होतात. केळीमुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते.<br>(४) शिक्षक बालकांना शरीरास अपायकारक अन्नपदार्थ व त्यांचे शरीरावर होणारे दुष्परिणाम स्पष्ट करतील. (जसे : चॉकलेट, कुरकुरे इत्यादी) | प्रत्यक्ष अन्नपदार्थ, प्रतिकृती, चित्रे, कृतिपत्रिका | • निरीक्षण, तोंडी कृती, मूल्यमापन |

C - 1.1.3.2 – B

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | आहार | पोषक आहार | • पोषक आहाराची काही गुण–वैशिष्ट्ये सांगतो. (अंडी, आणि डाळी शरीरास शक्ती देतात, पालकाची भाजी रक्त शुद्ध करते, दुधामुळे दात मजबूत होतात.) | (१) शिक्षक बालकांना पोषक आहाराचे महत्त्व सांगतील. (उदा., डाळी शक्तिवर्धक आहेत.)<br>(२) वेशभूषेसारख्या कृतीद्वारे आहाराची गुण–वैशिष्ट्ये सांगतो.<br>(३) गप्पागोष्टी. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ | • निरीक्षण, तोंडी कृती, मूल्यमापन |

C - 1.1.3.3

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | आहार | अन्नपदार्थ | • वरिष्ठांच्या साहाय्याने पोषक नाश्ता/न्याहरी तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतो. (उकडलेले चणे, मोड आलेली कडधान्ये घालून भेळ करतो.) | (१) परिसरात उपलब्ध कडधान्ये उकडून, भेळ तयार करणे. (उदा. हरभरे, मटकी, मूग इत्यादी.)<br>(२) विविध प्रकारचे पौष्टिक लाडू तयार करण्यास मदत करतात. (उदा. शेंगदाणा लाडू) | प्रत्यक्ष अन्नपदार्थ | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

C - 1.1.3.4

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | आहार | पोषक आहार | • योग्य प्रमाणात वाढलेले अन्न वाया न घालवता खातो. | (१) बालके मध्यान्ह भोजनाच्या वेळी पोषण आहार जितका पाहिजे आहे, तेवढाच घेतात व सगळा संपवतात.<br>(२) शिक्षक बालकांनी घेतलेला अन्नपदार्थ वाया न घालवता सगळा खातात की नाही, याकडे लक्ष देतात. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |
| **क्षमता : C - 1.1.4.1** पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही. | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | आहार | पोषक पदार्थ | • विविध गटातील अन्नपदार्थांचा आस्वाद घेतो. | (१) बालकांना विविध अन्नगटातील अन्नपदार्थांची नावे विचारतील.<br>(२) अन्नपदार्थांची नावे सांगतील व त्याचा आस्वाद घेतील. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ | • प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| **C 1.1.4.2 - A** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | आहार | अन्नघटक, आरोग्यदायी सवयी | • मोठ्यांच्या मदतीने परिचयाच्या पदार्थांमधील महत्वाचे घटक ओळखतो (उदा. वरणामधील डाळ आणि चटणीमधील दाणे.) | (१) वरणातील डाळ हा अन्नघटक आणि चटणीमधील दाणे, यांचे पोषणातील महत्त्व सांगणे.<br>(२) परिचयाच्या पदार्थांतील महत्त्वाचे घटक ओळखतात. उदा. चिक्कीमधील शेंगदाणे व गूळ हे पोषक पदार्थ आहेत, हे समजून घेतात. राजगिरा लाडूमधील राजगिरा व गूळ यांचे फायदे, भाजीपाला व फळे यांतील पोषक अन्नपदार्थ कोणता हे ओळखतात.<br>(३) ताटात दिलेले सर्व अन्नपदार्थ संपवतो.<br>(४) अन्नघटकांची माहिती देतात. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ<br>चित्र<br>दृक्‌श्राव्य यंत्र | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, तोंडी कृती, मूल्यमापन |

| C - 1.1.4.2 - B | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | आहार | अन्नघटक | • अन्नघटक आणि पोषकता यांमधील संबंध सांगतो. (उदा. चिक्कीमधील शेंगदाणे आणि गूळ आरोग्यासाठी चांगले असतात.) | (१) शिक्षकांनी बालकांना अन्नघटकांचा तक्ता दाखवून, त्यातील कोणते अन्नघटक पोषक आहेत व कोणते पोषक नाहीत हे विचारणे.<br>(२) बालके सांगतील व शिक्षकांनी आवश्यक तेथे दुरुस्ती/मार्गदर्शन करणे.<br>(३) अन्नघटकांची माहिती देतात. | अन्नपदार्थ तक्ता चित्र | • निरीक्षण, तोंडीकाम, कृती, मूल्यमापन |
| **C - 1.1.4.3** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | आहार | अन्नपदार्थ निर्मिती | • पाककृतींचा आधार घेऊन पौष्टिक न्याहरी/नाश्ता स्वतंत्रपणे बनवतो. | (१) बालके कुटुंबात बनणारे अन्नपदार्थ, स्वतः तयार करण्यासाठी, आवश्यक अन्नघटक आणून न्याहरी बनवतात. त्यासाठी शाळेत पाककला स्पर्धा घेण्यात यावी. उदा. मोड आलेल्या मटकीत कांदा, चटणी, मीठ, टोमॅटो, कोथिंबीर टाकून भेळ तयार करतात. दडपे पोहे, उकडलेल्या चण्यांचा चाट, आलू चाट इत्यादी. | न्याहरी बनवण्यासाठी लागणारे साहित्य. | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |
| **C - 1.1.4.4** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | आहार | चांगल्या सवयी | • आवश्यक तेवढेच अन्न मागतो. | (१) पोटाला भूक असेल, तेवढेच अन्न मागतात किंवा घेतात.<br>(२) आवश्यक तेवढेच अन्न खातो की नाही, याचे शिक्षक निरीक्षण करतात.<br>(३) पंगतीत वाया गेलेल्या अन्नावर चर्चा करतात. (गप्पागोष्टी) | | • निरीक्षण, पडताळा सूची |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **C - 1.1.5.1** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | आहार | पोषण आहार | • विविध पोषणविषयक गरजा पूर्ण करतो. | (१) शिक्षकांनी दररोज शाळेत येताना, बालकांनी आणलेल्या विविध खाद्यपदार्थांच्या नोंदी करणे.<br>(२) पोषणविषयक गरजा पूर्ण करणारे अन्नपदार्थ माहिती देणे. | अन्नपदार्थ तक्ता चित्रे | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |
| **C - 1.1.5.2 - A** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | आहार | योग्य व अयोग्य अन्नपदार्थ | • शिजवलेल्या अन्नपदार्थांतील अन्नघटकांचा अंदाज बांधतो. ते आरोग्यासाठी योग्य आहेत, की अयोग्य हे सांगतो. | (१) शिजवलेल्या अन्नपदार्थांतील घटकांचा अंदाज बांधतो. जसे : चपाती – गहू<br>(२) शिजवलेल्या अन्नपदार्थांतील घटक आरोग्या–साठी योग्य आहेत, की अयोग्य हे सांगतो.<br>(३) शिजवलेल्या योग्य अन्नपदार्थांच्या शब्दभेंड्या, यांसारखे शाब्दिक खेळ घेणे.<br>(४) अन्नघटकांची माहिती देतात. | प्रत्यक्ष अन्नपदार्थ तक्ते चित्रे. | • निरीक्षण, तोंडी कृती, मूल्यमापन |
| **C 1.1.5.2 - B** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | आहार | योग्य व अयोग्य अन्नपदार्थ, वाईट सवयींना प्रतिबंध | • बंद पाकिटातील अन्नपदार्थां–मधील घटक ओळखतो. (बिस्किट, वेफर्स, नूडल्स, आणि ते आरोग्यासाठी योग्य की अयोग्य हे सांगतो. | (१) बंद (Packing food) पाकिटामधील अन्नपदार्थातील अन्नघटक, त्याचे पोषणमूल्य आणि त्याचा आपल्या शरीरावर काय परिणाम होतो यावर शिक्षकांनी माहिती सांगणे. (गप्पागोष्टी)<br>(२) बालकांना खाऊची रिकामी पाकिटे आणण्यास सांगून, त्यातील पदार्थ आरोग्यासाठी योग्य की अयोग्य याचे वर्गीकरण घेतील. उदा. मसाला, बिस्किट, दूध, चॉकलेट, राजगिरा लाडू, चिक्की, वेफर्स इ.<br>(३) बंद पाकिटातील बाजारातील पदार्थ सतत खाण्याचे दुष्परिणाम समजावतात. | बिस्किट पुडा, नूडल्स, वेफर्स इ. | • निरीक्षण, पडताळा सूची, कृती, मूल्यमापन |

**ध्येय : CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.

**क्षमता : C - 1.2.1.1** स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका<br>१<br>(३ ते ४ वर्षे) | स्वच्छता | हातांची स्वच्छता | • शौचाला जाण्यापूर्वी व नंतर, तसेच जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुतो व पुसतो. | (१) हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवणे.<br>(२) चित्रफीत दाखवणे.<br>(३) गप्पागोष्टी करणे.<br>(४) शौचाला जाण्यापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुतो आणि पुसतो.<br>(५) जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन, हात धुतो व पुसतो. | प्रत्यक्ष कृती, चित्रे, तक्ते, स्वच्छतेची साधन सामग्री उदा. साबण, हॅण्डवॉश, पाणी, इ. दृक्‌श्राव्य माध्यम | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |
| **C - 1.2.1.2** | | | | | | |
| बालवाटिका<br>१<br>(३ ते ४ वर्षे) | स्वच्छता | कपडे व पादत्राणे | • स्वतः कपडे घालतो. बटण लावण्यासाठी व स्वतःच्या पायात चप्पल/बूट घालण्यासाठी मोठ्यांची मदत घेतो. | (१) बालकांना कपडे घालण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखवणे.<br>(२) बालक स्वतः कपडे घालतो.<br>(३) चप्पल किंवा बूट घालण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखवणे.<br>(४) चप्पल किंवा बूट घालण्याच्या योग्य पद्धतीची कृती करून घेणे. | प्रत्यक्ष कृती, चित्रे, तक्ते. | • मोठ्यांच्या मदतीने कपडे घालताना व चप्पल, बूट घालताना निरीक्षण करणे. प्रत्यक्ष कृती, निरीक्षण व कृती मूल्यमापन |
| **क्षमता : C - 1.2.2.1** स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो. | | | | | | |
| बालवाटिका<br>२<br>(४ ते ५ वर्षे) | स्वच्छता | हातांची स्वच्छता | • शौचाला जाण्यापूर्वी व नंतर तसेच | (१) जेवणापूर्वी व जेवणानंतर हात स्वच्छ धुणे व पुसणे, या क्रिया करण्यास शिक्षक प्रोत्साहित करतील. शौचापूर्वी व शौचावरून आल्यावर | पाणी, साबण, रुमाल, राख | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जेवणापूर्वी व नंतर हात धुतो आणि पुसतो. या क्रिया स्वतःहून करण्यास सुरुवात करतो. | साबणाने/राखेने हात स्वच्छ धुऊन, कोरडे करण्यास शिक्षक सांगतील.<br>(२) हात धुण्याची क्रिया बालकांनी स्वतःहून करावी.<br>(३) कृतियुक्त गीताद्वारे हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून घेणे. | | |
| **C - 1.2.2.2** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | चांगल्या सवयी | स्वतःची कामे करणे. | • मदतीशिवाय स्वतः कपडे चप्पल/बूट घालतो. | (१) बालकांना स्वतःला इतरांच्या मदतीशिवाय कपडे घालण्यास सांगणे. इतरांच्या मदतीशिवाय चप्पल आणि बूट योग्य प्रकारे घालण्याचा सराव करून घेणे. | चप्पल, बूट, कपडे | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **C - 1.2.2.3** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | चांगल्या सवयी | स्वतःची कामे करणे. | • स्वतःहून वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा योग्य वापर करण्यास सुरुवात करतो. (कंगवा, ब्रश) | (१) शिक्षक गप्पा गोष्टींच्या माध्यमातून टूथब्रश, कंगवा, दप्तर अशा वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा चांगला वापर करण्यास सांगतील. बालक स्वतः चांगला वापर करतील.<br>(२) वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा बालके योग्य वापर करण्यास सुरुवात करतील. | कंगवा, टूथब्रश, साबण/राख, रुमाल, तेल, पावडर, आरसा | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **ध्येय : CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>**क्षमता : C - 1.2.3.1** स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो. | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | स्वच्छता | वैयक्तिक स्वच्छता | • शौचाला जाण्यापूर्वी व नंतर तसेच जेवणापूर्वी व | (१) बालकांना घराप्रमाणे शाळेत शौचालयाबाहेर साबण, रुमाल उपलब्ध करून देऊन, अगोदर शिक्षकांनी स्वतः वापरून दाखवणे, त्याप्रमाणे बालकांकडून कृती करून घेणे. | साबण, रुमाल, पाणी इत्यादी विविध कृतींची चित्रे, सूचना | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| (५ ते ६ वर्षे) | | | नंतर नियमितपणे हात धुतो आणि पुसतो. | | फलक, तक्ता. | |
| **C - 1.2.3.2** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | कारक कौशल्य, आरोग्यदायी सवयी | मज्जा व स्नायू समन्वय, शिवणकाम | • देखरेखीखाली सुई-दोऱ्याचा वापर करून, सोपे शिवण-काम करायला सुरुवात करतो. | (१) बालक अगोदर मोठ्या सुईचा किंवा विणकामाच्या सुईचा वापर करून, मणी, पाने, फुले गुंफणे अशी कामे करतो. नंतर कापडातून सुई काढून दोरा वापरून शिवण्याचा प्रयत्न करतो. | मोठी सुई, विणकाम सुई, दोरा, फुले, मणी | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **C - 1.2.3.3** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | सुरक्षितता | साहित्य हाताळणी | • स्वत:हून वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा योग्य वापर करतो. | (१) केस विंचरल्यानंतर कंगवा जागेवर ठेवतो.<br>(२) दात घासल्यावर ब्रश व पेस्ट, मंजन नेहमीच्या जागेवर ठेवतो.<br>(३) तेल, पावडर, टॉवेल (रुमाल), बूट यांसारख्या वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा योग्य वापर करतो व जागच्या जागी ठेवतो. | कंगवा, ब्रश, तेल, पावडर, रुमाल, बूट | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **ध्येय : CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>**क्षमता : C - 1.2.4.1** स्वत:ची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो. | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | स्वच्छता | वैयक्तिक स्वच्छता | • शौचालयाचा योग्य वापर करतो. | (१) शौचालयाचा नियमित वापर करण्यासाठी शिक्षक सूचना देतील व महत्त्व सांगतील.<br>(२) शौचालयाचा नियमित व योग्य वापर बालके करतात का, याचे निरीक्षण करतील.<br>(३) शौचालयातील वैयक्तिक स्वच्छतेची साधन-सामग्री योग्य प्रकारे हाताळण्यास सांगतील.<br>(४) शौचालय स्वच्छ ठेवण्यास सांगतील. | तोंडी सूचना, चित्रे, तक्ते, सूचनाफलक, दृक्श्राव्य साधने. | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **C - 1.2.4.2** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | कारक कौशल्य | मज्जा व स्नायू समन्वय | • मोठ्यांच्या मदतीने सुई-दोऱ्याच्या साहाय्याने बटण लावतो आणि साधे शिवणकाम करतो. | (१) सुई-दोऱ्याच्या साहाय्याने बटण लावतील.<br>(२) सुई-दोऱ्याच्या साहाय्याने बटण लावणे व साधे शिवणकाम करतील.<br>(३) मणी, बटण दोऱ्यात ओवण्यास सांगतील.<br>(४) लांब सुईने फुलांचे हार तयार करण्यास शिकवतील. | सुई-दोरा, बटण, कापड, मणी. | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **C - 1.2.4.3** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | स्वच्छता | आरोग्यदायी सवयी | • स्वतःची काळजी घेणाऱ्या वस्तू व्यवस्थितपणे वापरतो. | (१) ज्या वस्तू वापरताना, स्वतःची काळजी घेतली पाहिजे, त्या वस्तू नीट वापरतो.<br>(२) काळजीपूर्वक वापराव्या लागणाऱ्या वस्तूंची योग्य काळजी घ्यायला शिकवतील. उदा. कपडे घडी घालणे शिकवतील.<br>(३) क्रीडा साहित्य योग्य जागी ठेवतात. | साबण, हँडवॉश रुमाल, कंगवा, बूट, शाळेचे दप्तर, पाण्याची बाटली, कपडे, क्रीडा, साहित्य | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **ध्येय : CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>**क्षमता : C - 1.2.5.1** स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतात. | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | स्वच्छता | वैयक्तिक स्वच्छता व स्वावलंबन | • स्वावलंबीपणे स्वतःची काळजी घेतो व स्वच्छता राखतो. | (१) स्वतःच्या शरीराची व वस्तूंची स्वच्छता राखणे, काळजी घेणे, याविषयी माहिती शिक्षक देतात.<br>(२) स्वतःची काळजी घेतो व स्वच्छता राखतो.<br>(३) गप्पागोष्टी, अभिनयाचा वापर करणे. | स्वच्छतेसाठी लागणारी साधने | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **C - 1.2.5.2** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | कारक-कौशल्य | मज्जा व स्नायू समन्वय | • स्वतंत्रपणे सुई-दोऱ्याच्या साहाय्याने बटण | (१) मोठी बटणे सुई-दोऱ्याच्या साहाय्याने लावतो.<br>(२) शिक्षक बालकांकडून साधे शिवणकाम करून घेतात. | सुई-दोरा, बटण, कापड | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | लावतो आणि साधे शिवणकाम करतो. | (३) दोऱ्यात मणी ओवून हार बनवणे.<br>(४) फुलांचा हार बनवणे. | | |
| **C-1.2.5.3** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | सुरक्षितता | साहित्य हाताळणी | • ज्या वस्तू वापरताना काळजी घ्यावी लागते, त्या वस्तू व्यवस्थित वापरतो. | (१) शिक्षक बालकांना ज्या वस्तू वापरताना स्वत:ची काळजी घेतली पाहिजे त्या वस्तू व्यवस्थितपणे कशा वापराव्यात याची माहिती देतात.<br>(२) ताटताटली, चाकू, सुई, नेलकटर या वस्तू व्यवस्थित वापरतो.<br>(३) अभिनय<br>(४) गप्पागोष्टी | हँडवॉश, साबण, ब्रश, कंगवा इत्यादी | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **ध्येय : CG - 1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>**क्षमता : C - 1.3.1.1** शाळा व वर्ग स्वच्छ आणि नीटनेटका ठेवतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे ) | सुरक्षितता | साहित्याची निगा | • स्वतःच्या वस्तू जसे – पिशवी, बाटली, बूट, रुमाल इत्यादींबाबत सजग असतो. | (१) या वर्गातील बालके शब्द पूर्णपणे वाचू शकत नसल्याने, शिक्षकांनी वस्तू ओळखण्यासाठी चित्रांचा वापर करणे.<br>(२) जर बालके स्वतःचे दप्तर, पाण्याची बाटली, जेवणाचा डबा आणत असतील, तर त्यांच्या प्रत्येक वस्तूला चिन्हांकित केले आहे, याची खात्री शिक्षकांनी करावी.<br>(३) सर्व वस्तूंना अनुक्रमे चिन्हांकित केले आहे की नाही, हे पाहून शिक्षक प्रत्येक वस्तू ठेवण्यासाठी जागा दर्शवतील.<br>(४) शिक्षक बालकांना त्यांच्या वस्तूंपर्यंत पोहोचण्यास मदत करतील. | छायाचित्र, चिन्हांकित वस्तू | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |

| C - 1.3.1.2 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | स्वच्छता | स्वच्छता साहित्य, साहित्याची निगा | • मोठ्यांच्या मदतीने अस्वच्छ (खरकटे) ताटल्या, भांडी ठरवलेल्या जागी ठेवतो. | (१) वापरलेल्या वस्तू उदा. ताटली, चमचा, पेला इ. ठेवण्यासाठी मोकळी जागा चिन्हांकित करणे.<br>(२) प्रत्येक वस्तू त्याच्या जागी कशी ठेवावी हे शिक्षकांनी वर्गात दाखवणे.<br>(३) बालकांनी ती वस्तू जागच्या जागी ठेवली आहे की नाही याची शिक्षकांनी खात्री करावी.<br>(४) सर्व वस्तूंचा वापर आणि स्थान निश्चिती दर्शवण्यासाठी वर्गात रोजच्या न्याहरीच्या वेळेचा विचार करण्याची संधी शिक्षकांनी द्यावी. | ताटल्या, भांडी, डबा, चमचे, वाटी इ. | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |

| C - 1.3.1.3 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | स्वच्छता | कचरापेटी | • इतरांच्या मदतीने कचरापेटीचा वापर करतो. | (१) कचरापेटीत टाकण्याजोग्या गोष्टींची छायाचित्रे ओळखण्यासाठी व ठेवण्यासाठी शिक्षक कचरापेटीत टाकण्यासाठीचे चित्र स्पष्टपणे चिन्हांकित करतात.<br>(२) बालके इतरांच्या मदतीने कचरापेटीचा वापर करतात. | कचरापेटी, खराब वस्तू, छायाचित्र, दृक्श्राव्य साधने | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |

| C-1.3.2.1 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | चांगल्या सवयी | स्वत:ची कामे स्वत: करणे. | • स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतो आणि योग्य जागेवरून घेतो. | (१) शिक्षक बालकांना त्यांच्या वस्तू ठरवलेल्या जागेवरून घ्यायला व ठेवायला सांगतात.<br>(२) बालक स्वत:च्या वस्तू योग्य जागी ठेवतो आणि योग्य जागेवरून घेतो. | पेले, ताटल्या, भांडी, विविध क्रीडा साहित्य जसे की, बॅट, बॉल, बॅडमिंटन रॅकेट, फूल, कवायत साहित्य | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **C - 1.3.2.2** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | चांगल्या सवयी | स्वत:ची कामे स्वत: करणे. | • स्वच्छ पेले, ताटल्या ओळखतो आणि वापरतो तसेच स्वतंत्रपणे अस्वच्छ (खरकटे) ताटल्या आणि भांडी ठरवलेल्या जागी ठेवतो. | (१) जेवल्यानंतर खरकटी भांडी, ताटल्या, भांडी धुवायच्या जागी नेऊन ठेवण्यास शिक्षक सांगतात.<br>(२) बालकांना स्वच्छ असलेल्या ताटल्या, पेले, भांडी वापरण्यास सांगतात.<br>(३) भांड्यांची स्वच्छता कशी ओळखावी हे सांगतात.<br>(४) बालक स्वच्छ पेले, ताटल्या ओळखतो आणि वापरतो, तसेच अस्वच्छ खरकटी भांडी ठरवलेल्या जागी ठेवतो. | पेले, ताट, वाटी विविध साहित्य | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |
| **C - 1.3.2.3** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | स्वच्छता | कचरापेटी | • कचरा टाकण्यासाठी कचरा पेटीचा वापर करायला सुरुवात करतो. | (१) शिक्षक कचरा टाकण्यासाठी कचरा पेटीचा वापर करायला सांगतात.<br>(२) बालके देखील कचरा टाकण्यासाठी कचरा पेटीचा वापर करतात. | कचरा पेटी | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |
| **C - 1.3.3.1** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | स्वच्छता | साहित्याची निगा | • स्वत:च्या वस्तूंची चांगल्या प्रकारे काळजी घेतो. | (१) शिक्षक स्वत:च्या वस्तू हाताळण्यास व त्यांची देखभाल करायला शिकवतील.<br>(२) दप्तरातील वस्तू व्यवस्थित ठेवण्यास सांगतील. | वापरातील विविध वस्तू, दप्तरातील विविध वस्तू, चित्रे, दृक्‌श्राव्य साधने | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **C - 1.3.3.2** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | स्वच्छता | साहित्य स्वच्छता | • स्वत:च्या ताटल्या आणि भांडी स्वच्छ करतो. | (१) शिक्षक बालकांना दुपारच्या जेवणानंतर स्वत:चा डबा, चमचा, ताटली पाण्याने स्वच्छ धुऊन, स्वच्छ करून, मगच दप्तरात ठेवण्यास सांगतील किंवा वर्गातील मांडणीवर ठेवण्यास सांगतील आणि विद्यार्थी तसे करतील. | मांडणी, ताटल्या, राख, साबण. | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |
| **C - 1.3.3.3** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | स्वच्छता | परिसर स्वच्छता | • कचरा टाकण्यासाठी नेहमी कचरा पेटीचा वापर करतो. | (१) शिक्षक बालकांना वर्गातील तसेच शालेय आवारातील कचरा, निरूपयोगी वस्तू उचलून कचराकुंडीत टाकण्यास सांगतील.<br>(२) बालक कचरा टाकण्यासाठी कचरा पेटीचा वापर करतो. | कचरापेटी झाडू, सुपली | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |
| **C - 1.3.4.1** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | चांगल्या सवयी | वस्तूंची निगा व काळजी | • अभ्यासाचे साहित्य काळजीपूर्वक हाताळतो. | (१) शिक्षक विद्यार्थ्यांना पुस्तके, पेन्सिल, स्टेशनरी कोठे व कशी ठेवावी हे समजावून सांगतील.<br>(२) विद्यार्थी अभ्यासाचे साहित्य काळजीपूर्वक हाताळतो.<br>(३) क्रीडा साहित्याचा योग्य क्रम घेणे. | चित्रे, तक्ता, क्रीडासाहित्य | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |
| **C - 1.3.4.2** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | स्वच्छता | परिसर स्वच्छता | • वर्गात आणि मैदानावर स्वच्छता | (१) शिक्षक विद्यार्थ्यांना वर्गातील व मैदानांवरील स्वच्छतेचे व अस्वच्छतेचे चित्र दाखवतील.<br>(२) त्यात कोणता परिसर चांगला दिसतो? त्यासाठी काय करावे लागेल यावर चर्चा करतील. | कचरापेटी, झाडू, खराटे, सुपली | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | राखण्यास सुरुवात करतो. | (३) शिक्षक सुरुवातीला स्वच्छता करणे, कचरा कचराकुंडीत टाकणे या कृती करून घेतील. | | |
| **C - 1.3.4.3** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | स्वच्छता | कचरा वर्गीकरण | • कचऱ्याचे सुका आणि ओला असे वर्गीकरण करायला सुरुवात करतो. | (१) शिक्षक ओला कचरा कोणत्या पेटीत व सुका कचरा कोणत्या पेटीत टाकायचा हे सांगतील.<br>(२) ओला व सुका कचरा ओळखण्यास सांगतील व त्याप्रमाणे कृती करण्यास सांगतील.<br>(३) समोर ठेवलेला ओला व सुका कचरा निवडून, योग्य कचरापेटीमध्ये टाकतील. | दोन रंगांच्या कचरापेट्या | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |
| **C - 1.3.5.1** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | शिष्टाचार | शाळेतील शिष्टाचार | • शाळेची मालमत्ता, फर्निचर, पुस्तके आणि इतर साहित्य यांची काळजी घेतो. | (१) शाळेतील वस्तू, वाचनालयातील पुस्तके, साहित्य व फर्निचर यांची काळजी घेण्यास शिक्षक शिकवतात.<br>(२) बालके शाळेतील साहित्याचा वापर काळजीपूर्वक करतात. शाळेतील साहित्याचे नुकसान होणार नाही अशा प्रकारे काळजीपूर्वक वापर करतात.<br>(३) चित्रफीत दाखवतात (विविध शिष्टाचार)<br>(४) शिष्टाचाराबाबत गप्पागोष्टी सागंतील. | वस्तू, पुस्तके, साहित्य, खडू, डस्टर विविध क्रीडा साहित्य बॅट, बॉल, फुटबॉल, बॅडमिंटन, रॅकेट, फूल, थाळी, रिंग कवायत साहित्य– ढोल, ड्रमस्टिक, झांज, डंबेल्स, घुंगूरकाठ्या, लेझीम, | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |

**C - 1.3.5.2**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | स्वच्छता | परिसर स्वच्छता | • वर्ग स्वच्छता आणि मैदान स्वच्छता यांमध्ये सहभागी होतो. | (१) शिक्षक आणि बालके मिळून वर्ग व परिसर स्वच्छता करतात.<br>(२) विद्यार्थी वर्ग स्वच्छता, परिसर स्वच्छतेसाठी जागरूक राहून प्रयत्न करतात.<br>(३) क्रीडांगण स्वच्छता, पाणी मारणे, झाडणे या कामात मदत करतो. जसे : लंगडी, खोखो, धावण्याचा मार्ग, कबड्डी मैदान | बाक, खुर्ची, झाडू, कचरा पेटी, सुका कचरा पेटी ओला कचरापेटी, वैद्यकीय कचरा पेटी | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन व पडताळा सूची |

**C - 1.3.5.3**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | स्वच्छता | कचरा वर्गीकरण | • योग्य प्रकारे कचऱ्याचे वर्गीकरण करतो. | (१) शिक्षक बालकांना ओला, सुका व वैद्यकीय कचऱ्याची माहिती देऊन, वर्गीकरणाचे महत्त्व सांगतात.<br>(२) बालके कचऱ्याचे वर्गीकरण करून, कचरापेटीत टाकतात. | सुका कचरा पेटी, ओला कचरा पेटी, वैद्यकीय कचरा पेटी | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |

**ध्येय : CG-1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
**क्षमता : C - 1.4.1.1** वस्तू आणि सोप्या साधनांचा सुरक्षितपणे वापर करतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | सुरक्षितता | साहित्याची हाताळणी | • आग, गॅस, सुरी, इलेक्ट्रिक प्लग्ज अशा धोकादायक गोष्टींना हात लावणे टाळतो. | (१) शिक्षक आग, गॅस, सुरी, इलेक्ट्रिक प्लग्ज अशा धोकादायक गोष्टींची जाणीव बालकांना करून देतील. विद्यार्थीदेखील त्या बाबी समजून घेतील व प्रत्यक्ष वस्तूंना हात लावणे टाळतील.<br>(२) आगीपासून बचावाचे प्रात्यक्षिक दाखवतात व करून घेतात. | वस्तूंचे चित्र, तक्ते, इलेक्ट्रिक साहित्य | • निरीक्षण |

| C - 1.4.2.1 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | सुरक्षितता | साहित्याची निगा | • कात्री, सुरी, काडेपेटी/ आगपेटी अशा धोकादायक आणि हानिकारक वस्तू काळजीपूर्वक हाताळतो. | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कात्री, सुरी, काडीपेटी अशा धोकादायक वस्तू काळजीपूर्वक व योग्य पद्धतीने वापराव्या, याविषयी प्रात्यक्षिकाद्वारे समजावून देणे.<br>(२) विद्यार्थी धोकादायक व हानिकारक वस्तूंविषयी माहिती जाणून घेतील. | कात्री, सुरी, काडीपेटी, इ. वस्तू | • निरीक्षण |
| **C - 1.4.3.1** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | सुरक्षितता | साहित्य हाताळणी | • कात्री, सुरी या वस्तू देखरेखीखाली वापरतो. | (१) शिक्षकांनी कात्री, सुरी या वस्तूंच्या वापराविषयी माहिती देणे.<br>(२) विद्यार्थी प्रात्यक्षिकाद्वारे कात्री, सुरी, शिक्षकांच्या देखरेखीखाली हाताळतील. | कात्री, सुरी, मेणबत्ती | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |
| **C - 1.4.4.1** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | सुरक्षितता | साहित्य हाताळणी | • नेलकटर आणि छोटी सुरी यांचा वापर देखरेखीखाली करतो. | (१) नेलकटर आणि छोटी सुरी यांचा वापर काळजीपूर्वक कसा करावा, याविषयी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे माहिती देणे.<br>(२) विद्यार्थी नेलकटर आणि छोट्या सुरींचा वापर शिक्षकांच्या देखरेखीखाली व घरी पालकांच्या उपस्थितीत करतील. | नेलकटर, छोटी सुरी | • निरीक्षण व पडताळा सूची |
| **C - 1.4.5.1** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | सुरक्षितता | साहित्य हाताळणी | • कात्री, नेलकटर आणि छोटी सुरी यांचा वापर | (१) कात्री, नेलकटर आणि छोटी सुरी यांचा वापर मदतीशिवाय कसा करावा, याबाबत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे समजावून देणे. | कात्री, नेलकटर, छोटी सुरी | • निरीक्षण व पडताळा सूची |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्वतंत्रपणे करतो. | (२) विद्यार्थी कात्री, नेलकटर आणि छोटी सुरी यांचा वापर मदतीशिवाय सुरक्षितपणे करतील. | | |
| **ध्येय : CG - 1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>**क्षमता : C - 1.5.1.1** हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्यरीतीने वागतो. (चालणे, धावणे, सायकल चालवणे.) | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | सुरक्षितता | रस्ता सुरक्षितता | • रस्त्यावरील सुरक्षितता महत्वाची आहे हे ओळखतो, रस्त्याने मोठ्यांचा हात पकडून चालतो. | (१) रस्त्यावरील सुरक्षितता महत्वाची आहे याची माहिती शिक्षकांनी बालकांना देणे.<br>(२) विद्यार्थी रस्त्यावरून चालताना मोठ्यांचा हात पकडून चालतो.<br>(३) विद्यार्थी रस्त्यावरील सुरक्षितता समजून घेतील व रस्त्याने चालताना मोठ्यांचा हात पकडून चालतील.<br>(४) प्रात्यक्षिक व चित्रफितीचा वापर करून रस्त्यावरील सुरक्षितता समजावून सांगणे. | चित्रे, मार्गदर्शक तक्ते, वाहतुकीच्या दिशादर्शक खुणा व सूचना–फलक, चित्रफीत | • निरीक्षण |
| **क्षमता : C - 1.5.2.1** हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्यरीतीने वागतो. (चालणे, धावणे, सायकल चालविणे.) | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | सुरक्षितता | रस्ता सुरक्षितता | • रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पाहतो, सोबतच्या मुलांचे किंवा प्रौढांचे हात पकडून सुरक्षितपणे चालतो. | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना, रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पहावे, तसेच बरोबरच्या मुलांचे किंवा प्रौढांचे हात पकडून सुरक्षितपणे चालण्याविषयी सांगणे.<br>(२) विद्यार्थी रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पाहतील व चालताना प्रौढांचे हात पकडून सुरक्षितपणे चालतील. | मार्गदर्शक तक्ते, वाहतुकीची नियमावली | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **C - 1.5.3.1 - A** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | सुरक्षितता | रहदारीचे नियम | • स्वतंत्रपणे रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळतो. (रस्त्याच्या कडेने चालणे, रस्ता ओलांडणे इ.) | (१) शिक्षक रस्त्याने चालतानाचे नियम आणि सुरक्षिततेसंबंधी समजावून सांगतात.<br>(२) रस्त्याच्या कडेने चालणे, रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूने बघणे, अंदाज घेणे यांबाबत माहिती देतात.<br>(३) विद्यार्थी रस्त्याने चालताना व रस्ता ओलांडताना नियमांचे पालन करतात. स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी घेतात. | व्हिडिओ क्लिप, तक्ते, चिन्हे | • कृती, मूल्यमापन व तोंडीकाम |
| **C - 1.5.3.1 - B** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | सुरक्षितता | रहदारीचे नियम | • वाहतुकीची चिन्हे ओळखतो. (सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, यू-टर्न पूल, रेल्वे पूल इ.) | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या चिन्हांची ओळख करून देणे. या चिन्हांचा अर्थ आणि त्या जागी कोणते नियम कसे पाळायचे हे समजावून सांगणे.<br>(२) विद्यार्थी सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, यूटर्न, पूल, रेल्वे क्रॉसिंग वगैरे चिन्हे ओळखतात.<br>(३) बालके सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, यूटर्न, पूल, रेल्वे क्रॉसिंग इ. चिन्हे पाहून चालताना नियम पाळतात.<br>(४) शिक्षक चित्रफितीद्वारे स्पष्ट करतात.<br>(५) मैदानावर रस्ता वाहतुकीचा प्रसंग तयार करून अभिनय करणे. | चित्रे, तक्ते, व्हिडिओ क्लिप, शैक्षणिक व्हिडिओ, वाहतूक चिन्हे | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **C - 1.5.4.1** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | सुरक्षितता | रहदारीचे नियम | • सायकल चालवताना व इतर वेळेस | (१) रस्त्यावरील सार्वजनिक वाहतुकीच्या नियमांची माहिती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना करून देणे.<br>(२) हात पकडून चालण्याचा सराव. | वाहतूक चिन्हे, चित्रे, तक्ता, रस्ता सुरक्षा | • निरीक्षण, तोंडी व कृती मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रस्त्यावर सार्वजनिक वाहतुकीचे नियम पाळतो. | (३) बालकांना सार्वजनिक वाहतुकीच्या नियम पालनाचे महत्त्व समजावून देतात.<br>(४) फूटपाथ व रस्त्यावर चालण्याचे नियम सांगतात व सराव करून घेतात.<br>(५) सायकलवर शाळेत येताना किंवा घरी जाताना सुरक्षेचे/वाहतुकीचे नियम पाळतो. | प्रात्यक्षिक | |
| **C - 1.5.5.1 - A** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | सुरक्षितता | रहदारीचे नियम | • रस्त्यावर चालताना आणि सायकल चालवताना वाहतुकीचे नियम पाळतो. | (१) शिक्षकांनी रस्त्यावर चालताना अणि सायकल चालवताना वाहतुकीचे नियम बालकांनी कसे पाळावे याविषयी माहिती देणे.<br>(२) बालके वाहतुकीचे नियम पाळतात. | वाहतूक नियम पोस्टर, चित्र | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन व तोंडीकाम |
| **C - 1.5.5.1 - B** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | सुरक्षितता | विविध संकेतचिन्हे व संभाव्य धोके | • सुरक्षिततेची चिन्हे ओळखतो आणि संभाव्य धोके टाळतो. (विद्युत, आग, दुरुस्ती, खोदकाम इ.) | (१) शिक्षकांनी बालकांना सुरक्षिततेच्या चिन्हांची ओळख करून देणे. त्यामुळे संभाव्य धोके टाळले जातील.<br>(२) प्रात्यक्षिक दाखवतील.<br>(३) रस्ता, घर, इमारत, मॉल, बाजार, कारखाने या ठिकाणच्या सुरक्षिततेच्या चिन्हांबाबत चर्चा करतील व माहिती देतील. | चित्रे, पोस्टर | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन,<br>• तोंडीकाम |

**ध्येय : CG - 1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.

**क्षमता : C - 1.6.1.1** असुरक्षित, धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत मागतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | सुरक्षितता | स्व-सुरक्षा | • परिचित आणि अपरिचित व्यक्ती यांतील फरक ओळखतो. | (१) शिक्षक विद्यार्थ्याला परिचित-अपरिचित लोकांविषयी माहिती देतात.<br>(२) विद्यार्थ्यांना आपले, परके यांची जाणीव होऊन त्याप्रमाणे वर्तन करतात.<br>(३) विद्यार्थी परिचित-अपरिचित यांच्यामध्ये वर्गीकरण करतात.<br>(४) शिक्षक विद्यार्थ्यांनी परिचित-अपरिचित यांच्यामध्ये केलेल्या वर्गीकरणाचे निरीक्षण करतात.<br>(५) दृक्श्राव्य माध्यमाद्वारे शिक्षकांनी विद्यार्थ्याला परिचित-अपरिचित यांची ओळख करून देणे. | प्रत्यक्ष लोक, चित्रे, चित्रफीत | • निरीक्षण व तोंडीकाम |
| **C - 1.6.2.1 - A** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | सुरक्षितता | स्व-सुरक्षा | • परिचित आणि विश्वासू व्यक्तींनी विचारपूस केल्यास वाटणारी अस्वस्थता व्यक्त करतो. | (१) आपल्या मनातील अस्वस्थता फक्त घरातील परिचित आणि विश्वासू प्रौढांपाशीच व्यक्त करावी, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.<br>(२) घरातील विश्वासू प्रौढांनी विचारपूस केल्यास मनातील गोष्टी गप्पांद्वारे सांगतो.<br>(३) आपल्या मनातील भावना, अस्वस्थता दाबून न ठेवता, ती आपल्या विश्वासू, परिचित माणसांपाशी व्यक्त करण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतील. | चित्र, तक्ते, चित्रफित | • निरीक्षण व तोंडीकाम |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (४) आपल्या मनातील भावना, अस्वस्थता अनोळखी अपरिचित व्यक्तीजवळ व्यक्त केल्यास होणाऱ्या संभाव्य धोक्यांबाबत, चित्र/चित्रफीत, तक्ते यांच्या माध्यमातून कल्पना देतील. | | |
| **C - 1.6.2.1 - B** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | सुरक्षितता | स्व–सुरक्षा | • अपरिचित व्यक्तींकडून खेळणी, चॉकलेट, पैसे आणि इतर वस्तू स्वीकारत नाहीत. | (१) अपरिचित व्यक्तींकडून खेळणी, चॉकलेट, आणि इतर वस्तू स्वीकारू नये, याबाबत शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.<br>(२) अपरिचित व्यक्तींकडून अशा कोणत्याही वस्तू स्वीकारल्यास, होणाऱ्या संभाव्य धोक्यांबाबत शिक्षक विद्यार्थ्यांना समजावून सांगतील. त्यासाठी आवश्यक तिथे चित्र, चित्रफितीचाही वापर करतील.<br>(३) कोणी काही अशा वस्तू दिल्याबाबतचे अनुभव आले का? याबाबत शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने बोलतील व विद्यार्थी आपल्या परिचित व्यक्तीसमोर, शिक्षकांसमोर मनमोकळेपणाने प्रतिसाद देतील.<br>(४) शिक्षकांनी मनातील भावना व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना विश्वास देणे, प्रोत्साहित करणे. | चित्र, चित्रफित तक्ते | • निरीक्षण, पडताळा सूची व तोंडीकाम |
| **C - 1.6.3.1 - A** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | सुरक्षितता | सुरक्षित व असुरक्षित स्पर्श | • सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श कळतो. | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श कसे ओळखावेत, याविषयी माहिती देणे.<br>(२) विद्यार्थी स्वतःहून सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श ओळखतील. | मुले, मुली गट व्हिडिओ चित्र | • निरीक्षण, प्रात्यक्षिक |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (३) मुला-मुलींचे गट करून, अशा सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्शाबाबत प्रात्यक्षिकातून माहिती देणे.<br>(४) सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्शाबाबत व्हिडिओद्वारा, चित्रांद्वारा माहिती देणे. | | |
| **C - 1.6.3.1 - B** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | सुरक्षितता | परिचित व अपरिचित व्यक्ती | • अपरिचित व्यक्तींपासून दूर राहतो. | (१) अपरिचित व्यक्तींपासून दक्षता घेण्याबाबत, दूर राहण्याबाबत, शिक्षक बालकांना समजावून सांगतील.<br>(२) अपरिचित व्यक्तींपासून दूर राहणाऱ्या, दक्षता बाळगणाऱ्या बालकांची माहिती मिळवून, त्यांचे कौतुक करतात व इतरांनाही तसे दक्ष राहण्याबाबत प्रोत्साहन देतात.<br>(३) अपरिचित व्यक्तींपासूनचा संभाव्य धोका ओळखून, त्यांच्यापासून दूर राहणे याबाबत दक्ष राहतात. | व्हिडिओ, चित्र, तक्ते | • वर्गकार्य, प्रात्यक्षिक |
| **C- 1.6.3.1 - C** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | सुरक्षितता | परिचित व अपरिचित व्यक्ती | • परिचित वरिष्ठ व्यक्तींकडे स्वतःहून अस्वस्थता, भीती व्यक्त करतो. | (१) आपल्या मनातील अस्वस्थता, भीती आपल्या परिचित वरिष्ठ व्यक्तींकडे निःसंकोचपणे व्यक्त करण्यासाठी शिक्षक बालकांना प्रोत्साहन देतात.<br>(२) बालक आपल्या मनातील अस्वस्थता, भीती, आपल्या परिचित मोठ्या व्यक्तींकडे स्वतःहून सांगितल्याचे फायदे समजून घेतात व निःसंकोचपणे व्यक्त होतात.<br>(३) गप्पागोष्टींद्वारे मनातील भावना व्यक्त करतात. | व्हिडिओ चित्र | • उपक्रम, प्रात्यक्षिक व तोंडीकाम |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **C - 1.6.3.2 - A** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | प्रथमोपचार | वरिष्ठांची मदत | • जखम झाल्यावर मोठ्यांची मदत मागतो. (उदा. खरचटणे, भाजणे, विजेचा धक्का) | (१) शिक्षक बालकांना जखम झाल्यानंतर मोठ्यांची मदत घ्यावी याविषयी सांगतात.<br>(२) त्यानुसार जखम झाल्यानंतर विद्यार्थी मोठ्यांची मदत घेतात. | व्हिडिओ, चित्र, मार्गदर्शक तक्ते | • निरीक्षण (मदतीसाठी आवाज देणे/ओरडणे), कृती प्रात्यक्षिक |
| **C - 1.6.3.2 - B** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | सुरक्षितता | व्यावसायिक मदतनीस व समाजसेवक | • आपत्कालीन परिस्थितीमध्ये समाजातील मदत करणाऱ्या व्यक्तींना ओळखतो. (डॉक्टर, अग्निशमन दल इ.) | (१) शिक्षकांनी आपत्कालीन परिस्थितीमध्ये समाजातील मदत करणाऱ्या व्यक्तींचा परिचय करून देतात. उदा. डॉक्टर, नर्स, अग्निशामक दल, समाजसेवक, स्वयंसेवक<br>(२) विद्यार्थी आपत्कालीन परिस्थितीमध्ये समाजातील मदत करणाऱ्या व्यक्तींना ओळखून त्यांच्याकडून मदत मागतो.<br>(३) ठरावीक आपत्कालीन परिस्थितीत कोणत्या व्यक्तीची मदत घ्यावी हे ओळखतो.<br>(४) चित्रफितीद्वारे आपत्कालीन परिस्थितीमध्ये, समाजातील मदत करणाऱ्या व्यक्तींचा परिचय करून देणे. | चित्रे, दृकश्राव्य साधने | • निरीक्षण, तोंडीकाम, कृती प्रात्यक्षिक |
| **C - 1.6.4.1** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | सुरक्षितता | स्व-सुरक्षा | • मोजक्या शब्दात प्रौढांची आणि समवयस्कांची मदत मागतो. | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मोजक्या शब्दांत प्रौढांची आणि समवयस्क व्यक्तींची मदत कशी मागावी याविषयी माहिती देणे.<br>(२) त्यानुसार विद्यार्थी मोजक्या शब्दांत प्रौढांची आणि समवयस्कांची मदत मागतात.<br>(३) सुरक्षित व असुरक्षित स्पर्श समजून विरोध करण्याचे मार्गदर्शन करतात. | असुरक्षित स्पर्श, मार्गदर्शक चित्र | • निरीक्षण, तोंडीकाम व कृती उपक्रम |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **C - 1.6.4.2** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | सुरक्षितता | प्रासंगिक सुरक्षा | • सुरक्षिततेचे मूलभूत नियम समजून घेऊन वागतो. (भाजल्या–नंतर जखम थंड पाण्याने धुतो.) | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचे मूलभूत नियम समजावून सांगणे.<br>(२) विद्यार्थी सुरक्षिततेचे मूलभूत नियम समजून घेऊन, त्यानुसार वागतात. उदा. भाजल्यावर जखम थंड पाण्याने धुतो.<br>(३) प्रत्यक्ष कृतीद्वारे सुरक्षिततेचे मूलभूत नियम समजावून देणे. | व्हिडिओ, कृती | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |
| **C - 1.6.5.1** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | सुरक्षितता | असुरक्षित स्पर्श व वर्तन | • अयोग्य स्पर्श आणि अयोग्य वर्तन दिसल्यास, त्याची तक्रार करतो आणि त्या व्यक्तीपासून दूर राहतो. | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अयोग्य स्पर्श आणि अयोग्य वर्तन दिसल्यास, त्याची तक्रार करायला सांगणे आणि त्या व्यक्तीपासून दूर राहण्यास सांगणे. | व्हिडिओ, चित्र | • निरीक्षण, कृती, प्रात्यक्षिक व तोंडी |
| **C - 1.6.5.2** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | सुरक्षितता | प्रासंगिक सुरक्षा | • सुरक्षिततेचे मूलभूत नियम समजून घेऊन वागतो. (भाजल्या–नंतर जखम थंड पाण्याने धुतो.) | (१) सुरक्षिततेचे मूलभूत नियम शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगणे.<br>(२) उदा. भाजल्यानंतर जखम थंड पाण्याने धुणे, याविषयी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगणे.<br>(३) विद्यार्थी सुरक्षिततेचे मूलभूत नियम समजून घेऊन वागतील. | व्हिडिओ कृती | • निरीक्षण व मूल्यमापन |

## विकास क्षेत्र : बौद्धिक विकास

**ध्येय : CG - 2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.

**क्षमता : C - 2.4** वेगवेगळे गंध आणि चव यांतील फरक ओळखतो.

**C - 2.4.1.1**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | ज्ञानेंद्रिये | गंध ओळख | • सुगंध आणि दुर्गंध ओळखतो. उदा. अत्तर, फुले, कचरा इ. | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना निरनिराळ्या वस्तूंचा गंध घेण्याची प्रत्यक्ष संधी देणे.<br>(२) मुलांना माहीत असलेल्या गंधाविषयी माहिती घेतील.<br>(३) सुगंध व दुर्गंध यांवर मुलांशी गप्पा मारणे व त्यातील फरक लक्षात आणून देणे. त्यातील हवासा वाटणारा गंध म्हणजे सुगंध व नकोसा वाटणारा गंध म्हणजे दुर्गंध असे प्रात्यक्षिकाद्वारे स्पष्ट करून सांगणे.<br>उदा. अत्तराचा सुगंध, फुलांचा सुगंध, कचऱ्याचा गंध, घरातील खराब झालेले अन्न. | फुले, अत्तर, अगरबत्ती इ., सडलेले अन्नपदार्थ | • निरीक्षण, पडताळा सूची |

**C - 2.4.1.2**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | ज्ञानेंद्रिये | चव ओळख | • गोड, खारट, कडू, आंबट, तिखट, तुरट चव ओळखतो. | (१) शिक्षकांनी वस्तू दाखवून त्या पदार्थांची चव विचारणे.<br>उदा. चिंच, लाडू, कारले, आवळा, मीठ इ.<br>(२) शिक्षकांनी चव सांगणे व त्या चवीचा कोणता पदार्थ आहे ते विचारणे.<br>उदा. गोड चव असणाऱ्या पदार्थांची नावे सांगा.<br>याप्रमाणे इतर चवींविषयी विचारतील. | चित्रे, तक्ते, प्रत्यक्ष वस्तू, चिंच, लाडू, कारले, आवळा, मीठ | • प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **C - 2.4.2.1** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | ज्ञानेंद्रिये | गंध व चव ओळख | • फूल, अत्तर, खाद्यपदार्थ यांच्या सुगंधांमधील फरक ओळखतो. | (१) शिक्षक विविध अनुभवांतून सुगंधांमधील फरक लक्षात आणून देतील.<br>उदा. वेगवेगळी फुले, पाने, फळे व त्यांच्यासारखा गंध असणारे अत्तराचे नमुने<br>(२) दररोजच्या जेवणातील खाद्यपदार्थांचा गंध व त्यांतील वेगळेपणाचा प्रत्यक्ष अनुभव देणे.<br>(३) खेळाच्या माध्यमातून सुगंधांमधील फरक ओळखण्यास सांगतील. उदा. आंधळी कोशिंबीर<br>(४) गप्पा/गोष्टी सांगतील. | फुले, पाने वेगवेगळे गंध असणारे खाद्यपदार्थ इ.<br>उदा. अगरबत्ती, अत्तर, वाळा | • निरीक्षण, तोंडी, प्रात्यक्षिक |
| **C - 2.4.2.2** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | ज्ञानेंद्रिये | चव ओळख | • वेगवेगळ्या प्रकारच्या खाद्यपदार्थांची चव व पोत (Texture) यांचा अनुभव घेतो. | (१) शिक्षक वेगवेगळ्या खाद्यपदार्थांच्या चवीचा अनुभव देतील.<br>(२) काळजी घेऊन, खाद्यपदार्थांना स्पर्श करण्याची संधी देतील, त्यातील फरक सांगतील.<br>उदा. वेगवेगळी फळे, भाजीपाला, फळभाज्या, धान्ये इ., | फळे, भाजीपाला, धान्ये इ. | • निरीक्षण, कृती |
| **C - 2.4.3.1** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | ज्ञानेंद्रिये | गंध ओळख | • धोकादर्शक गंध ओळखतो. उदा. धूर, सडलेली अंडी | (१) ज्या गंधामुळे आपल्याला त्रास व धोका निर्माण होईल असे गंध शिक्षक सांगतात.<br>(२) शिक्षक विद्यार्थ्यांना माहीत असलेल्या किंवा त्यांच्या अनुभवातील धोकादर्शक गंधांची चर्चा करतील. उदा. धूर, सडलेली अंडी, सडलेली भाजी, सडलेली फुले, खराब झालेले अन्न इ. | खराब अन्नपदार्थ, सडलेली अंडी | • तोंडी |

**ध्येय : CG - 2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.

**क्षमता : C - 2.5.1.1** विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | ज्ञानेंद्रिये | स्पर्शाची ओळख | • कठीण/ कडक, मऊ, गार, गरम, खडबडीत, गुळगुळीत स्पर्शांमधील फरक समजतो. | (१) शिक्षक विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वस्तूंचा स्पर्शाने अनुभव देतील व प्रत्येक स्पर्शातील फरक समजावतील.<br>(२) विद्यार्थी विविध प्रकारच्या वस्तूंचा स्पर्श ओळखतात.<br>(३) स्पर्शज्ञानासाठी प्रोत्साहन देतील. शाब्दिक खेळ, सांगा पाहू मी कोण?<br>उदा. मी आहे गरम. चव माझी गोड. पाहुणे आल्यानंतर मला आवडीने पितात – चहा. | भात, पाणी, फळा, खडू कापूस, दगड, स्पंज, साबण, फूल, लोकर इ., शाब्दिक खेळ/ कोडी | • निरीक्षण, तोंडी |

**क्षमता : C - 2.5.2.1**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | ज्ञानेंद्रिये | स्पर्शाची ओळख | • दोन वस्तूंमधील कठीण/ कडक, मऊ, गार, गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत अशी स्पर्शांची तुलना करू शकतो. | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वस्तूंचा स्पर्शाने अनुभव देणे.<br>(२) प्रत्येक स्पर्शातील तुलना समजावणे. उदा., दगड–कडक, फर/कापूस–मऊ, बर्फ/ पाणी–गार, गरम डबा – गरम (जसे – लापशी, चहा, दूध), खरखरीत – सॅन्ड पेपर, गुळगुळीत – संगमरवर, खडबडीत – दगड इत्यादी.<br>(२) विद्यार्थी विविध वस्तूंना स्पर्श करून, त्या स्पर्शातील फरक समजून घेतात.<br>(३) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या स्पर्शांची उदाहरणे विचारणे.<br>(४) खेळाद्वारे स्पर्शज्ञान जाणणे. | दगड, फर, कापूस, पाणी, सॅण्ड पेपर, संगमरवर | • निरीक्षण, तोंडी, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **क्षमता : C-2.5.3.1** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | ज्ञानेंद्रिये | स्पर्शाची ओळख | • ३ ते ५ वस्तूंची कठीण/ कडक, गार–गरम, मऊ, खरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शांनुसार क्रमवार मांडणी करू शकतो. (उदा. अति मऊ, मऊ, कठीण, अति कठीण) | (१) शिक्षक विद्यार्थ्यांना विविध वस्तूंचे स्पर्शज्ञान प्रत्यक्ष स्पर्श घडवून अनुभव देतात. उदा., कठीण वस्तूमध्ये कमी कठीण, जास्त कठीण या प्रकारे क्रमवार मांडणी करतात.<br>उदा., (१) लाकूड – दगड– लोखंड<br>(२) गार – पाणी,<br>अतिगार – बर्फ, यासांसारखे घटक<br>शिक्षक विद्यार्थ्यांना पाणी आणि बर्फ यांच्या प्रत्यक्ष स्पर्शातून गार–अतिगार असा अनुभव देतात.<br>(३) मऊ – कापूस<br>अति मऊ – फर/वेलवेट<br>गरम – कोमट अन्नपदार्थ<br>अति गरम – विस्तव, उकळलेले पाणी<br>(४) खेळाद्वारे स्पर्शातील फरक ओळखून वर्गीकरण करतो. | | • निरीक्षण, तोंडी, कृती, मूल्यमापन |
| **क्षमता : C-2.5.4.1** विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते. | | | | | | |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | ज्ञानेंद्रिये | स्पर्शाची ओळख | • स्पर्शांबाबत सूक्ष्मपणे तुलना करतो. जसे गुबगुबीत, केसाळ, विणलेली, | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुबगुबीत, केसाळ, विणलेली, काटेरी इत्यादी वस्तूंचा प्रत्यक्ष अनुभव करून देणे व त्यांच्या स्पर्शातील फरक सांगणे. त्यांच्या स्पर्शाची तुलना करणे. उदा., डोळे मिटून विद्यार्थी अनुभव घेतात व स्पर्श ओळखतात.<br>• मऊ – टेडी, फरची टोपी, स्पंज, कापूस, वेलवेट | टेडी, मफलर, कापूस, वेलवेट, झाडाची पाने, साली, भेंडी, चटई, चित्रे, प्रतिकृती, | • निरीक्षण, तोंडी कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | काटेरी, खडबडीत. | • खरखरीत – घासपेपर (सॅण्डपेपर), अननस, भेंडी.<br>• काटेरी – गुलाब, काटेकोरंटी, कोरफड, करवंद, एरंडाचे फळ, फणस.<br>• वेताचे विणलेले – कानटोपी, खुर्ची, झोपाळा, मफलर.<br>• केसाळ प्राण्यांच्या प्रतिकृती – टेडी बेअर, मेंढी, शेळी, गाय, बैल.<br>(२) दोन वेगवेगळ्या स्पर्शातील फरकांबाबत विद्यार्थ्यांशी चर्चा करतात व विद्यार्थी त्याबाबत फरक सांगतात.<br>(३) विविध प्रकारचे स्पर्श व वस्तूंचे वर्गीकरण वगैरे खेळ घेतात.<br>(४) शब्दकोड्याद्वारे स्पर्शज्ञान दृढ करणे. उदा. मी आहे कानटोपी, सांगा माझा स्पर्श कसा? | शब्दकोडी खेळ, फ्लॅशकार्ड | |
| **क्षमता : C- 2.5.5.1** विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते. | | | | | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | ज्ञानेंद्रिय | स्पर्शाची ओळख | • स्पर्शांबाबत सूक्ष्मपणे तुलना करतो.<br>जसे : गुबगुबीत, केसाळ, विणलेली, | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुबगुबीत, केसाळ, विणलेली, काटेरी इत्यादी प्रकारच्या स्पर्शांचा प्रत्यक्ष अनुभव करून देणे. त्या वेगवेगळ्या स्पर्शांतील फरक सांगणे.<br>जसे :<br>• गुबगुबीत – ससा, खेळणी, टेडी बेअर, बाहुली | खेळण्यातील ससा, टेडी बेअर, कापूस, स्पंज, फरशी, आरसा, पुस्तक, टोपली, चटई, पोते, नारळाची करवंटी, | • निरीक्षण, तोंडी, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | काटेरी, खडबडीत. | • केसाळ – केसाळ प्राण्यांच्या प्रतिकृती उदा., शेळी, करडू, अस्वल<br>• मऊ – कापूस, स्पंज<br>• गुळगुळीत – संगमरवर, आरसा, पुस्तक<br>• विणलेली – टोपल्या, वेताच्या विणलेल्या वस्तू – खुर्ची, झोपाळा, चटई, स्वेटर, मफलर इत्यादी.<br>• काटेरी – कोरफडीचे पान, गुलाबाची फांदी, वांग्याचे खोड.<br>• खडबडीत – घासपेपर, दगड, प्लॅस्टर केलेली भिंत, नारळाची करवंटी इत्यादी.<br>(२) विद्यार्थी स्पर्शाच्या फरकातील तुलना करतात.<br>(३) स्पर्शानुरूप वर्गीकरण करतात.<br>(४) खेळाद्वारे स्पर्शज्ञान देणे. | घासपेपर, दगड, गुलाबाचे, वांग्याच्या झाडाचे खोड, फांद्या इ.<br>शब्दकोडी खेळ, फ्लॅशकार्ड | |
| **ध्येय : CG - 2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.<br>**क्षमता : C - 2.6** बालक अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्याकरता, ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मिकरण करण्यास सुरुवात करतो.<br>**C - 2.6.1.1** | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | योग | श्वसनाचे व्यायाम | • जोराने श्वास बाहेर सोडणे. (उच्छ्वास) | (१) शिक्षक जोरात श्वास सोडण्याचे (उच्छ्वासाचे) प्रात्यक्षिक करून दाखवतील.<br>(२) विद्यार्थ्यांना उच्छ्वास कसा करावा ते सांगून प्रत्यक्ष कृतीची संधी देतील.<br>कृती : ५ वेळा श्वास घेण्याची व सोडण्याची कृती करून घेतील. छाती भरून लांब श्वास घेण्यास सांगतील व जोरात श्वास सोडण्यास सांगतील. | चटई, सतरंजी | • निरीक्षण, प्रात्यक्षिक |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **C - 2.6.2.1** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | योग | श्वसनाचे व्यायाम | • हलक्या वस्तू जोरात फुंकर घालून उडवतो. उदा. कागद | (१) शिक्षक हलक्या वस्तू जोरात फुंकर घालून उडवण्याची कृती करून दाखवतील.<br>उदा. कापूस उडवणे, कागदाचे तुकडे, फुगे, वाळलेली पाने याप्रमाणे<br>(२) विद्यार्थी शिक्षकांच्या कृतीचे निरीक्षण करून त्याप्रमाणे कृती करतील.<br>(३) आणखी कोणत्या वस्तू याप्रमाणे फुंकर घालून उडवता येतील का? यावर चर्चा करतील.<br>कृती :<br>• फुगलेला फुगा फुंकर मारून उडवणे.<br>• फुंकर घालून चेंडू घरंगळत नेणे.<br>• जमिनीवरील धूळ स्वच्छ करणे.<br>• स्ट्रॉच्या माध्यमातून पाण्यात बुडबुडे करणे. | कागद, कापूस, फुगा, पिसे, कागदाचे तुकडे इ. झाडाची वाळलेली पाने | • निरीक्षण, प्रात्यक्षिक |
| **C - 2.6.2.2** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | योग | श्वसनाचे व्यायाम | • अल्प काळासाठी स्थिर बसतो किंवा पडून राहू शकतो (शवासन करणे) | (१) शिक्षक विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने शवासनाचे प्रात्यक्षिक करून दाखवतील.<br>(२) विद्यार्थी शिक्षककृतीचे निरीक्षण करून, अनुकरणाने (शवासनाची) कृती करतील.<br>(३) शिक्षक विद्यार्थ्यांना योग्य वेळी, योग्य ठिकाणी सूचना देऊन, शवासनाची कृती अचूक करून घेतील. | आसन<br>योग चटई/mat | • निरीक्षण, प्रात्यक्षिक |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (४) शिक्षक विद्यार्थ्यांना काही विशिष्ट काळासाठी/अल्प काळासाठी शांतपणे, स्थिर बसण्याबाबत प्रत्यक्ष कृती करून दाखवतील.<br>(५) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचनेनुसार आणि शिक्षकांच्या कृतीचे अनुकरण करून, अल्पकाळासाठी स्थिर बसतील.<br>(६) ओंकार, प्रार्थना, श्लोक | | |
| **क्षमता : C - 2.6.3.1** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | योग | श्वसनाचे व्यायाम | • लयबद्ध– रीतीने श्वासोच्छ्वास | (१) शिक्षक विद्यार्थ्यांना लयबद्ध रीतीने श्वासोच्छ्वासाचे प्रात्यक्षिक करून दाखवतील. उदा. टाळ्या, चुटक्या वाजवून संगीताच्या ठेक्यावर.<br>(२) श्वास आणि उच्छ्वास योग्य रीतीने समजावून देऊन, शिक्षक विद्यार्थ्यांचे लक्ष श्वासाच्या लयबद्धतेकडे केंद्रित करतील.<br>(३) विद्यार्थ्यांना लयबद्धरीतीने श्वासोच्छ्वास करण्याची संधी देतील. (शिटी वाजवून)<br>(४) योग्य वेळी शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.<br>(५) शिक्षक विद्यार्थ्यांना चित्रफीतीद्वारे श्वासोच्छ्वासाची प्रात्यक्षिके दाखवतील.<br>उदा. योगाची श्वासोच्छ्वासाची चित्रफीत. | दृक्‌श्राव्य साधने, आसन | • निरीक्षण, प्रात्यक्षिक |

**C - 2.6.3.2**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | योग | श्वसनाचे व्यायाम, प्राणायाम सारख्या क्रिया | • स्थिर बसून अल्प–काळासाठी आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करतो/नियंत्रण ठेवतो. | १) शिक्षक विद्यार्थ्यांना स्थिर बसून अल्पकाळासाठी आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करण्याचे किंवा श्वासावर नियंत्रण ठेवण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवतील.<br>(२) शिक्षक विद्यार्थ्यांना अल्पकाळासाठी श्वासावर नियंत्रण ठेवण्याबाबत, लक्ष केंद्रित करण्यासाठी मार्गदर्शन (सोप्या भाषेत) करतील.<br>(३) विद्यार्थी स्थिर बसून, अल्पकाळासाठी आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करतील/नियंत्रण ठेवतील. उदा. ओमकार स्वत: म्हणतील.<br>(४) श्वास नियंत्रण योग्य रीतीने होण्यासाठी शिक्षक आवश्यक सराव घेतील. | दृक्श्राव्य साधने, आसन | • निरीक्षण, प्रात्यक्षिक |

**क्षमता : C - 2.6.4.1**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | योग | श्वसनाचे व्यायाम, प्राणायाम सारख्या क्रिया | • श्वास आत घेण्यापेक्षा श्वास बाहेर सोडण्याची प्रक्रिया सावकाश व जास्त काळा–साठी करू शकतो. | १) शिक्षक विद्यार्थ्यांना श्वास आत घेण्याची, तसेच सावकाश व जास्त काळासाठी श्वास बाहेर सोडण्याची क्रिया करून दाखवतात.<br>२) विद्यार्थी शिक्षकांचे निरीक्षण करून श्वास बाहेर सोडण्याची प्रक्रिया सावकाश व जास्त काळ करण्याचा प्रयत्न करतात. | चित्रे, तक्ते, चटई सतरंजी | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (३) श्वास बाहेर सोडण्याची प्रक्रिया सावकाश होण्यासाठी विविध कृती शिक्षक घेतील.<br>उदा.<br>१) स्वतः श्वास सावकाश सोडून दाखवणे.<br>उदा. 'म' कार घेणे. | | |
| **C - 2.6.4.2** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | योग | शांत बसणे | • स्थिर बसतो आणि अल्प काळासाठी आपल्या इतर ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांवर लक्ष केंद्रित करतो. | १) शिक्षक स्थिर बसून, आपल्या इतर ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांचा अनुभव सांगतात व विद्यार्थ्यांना करून दाखवतात.<br>२) विद्यार्थी शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे कृती करतात.<br>३) शिक्षक प्रश्न विचारून, ज्ञानेंद्रियांच्या संवेदनावर लक्ष केंद्रित करतील.<br>उदा.<br>१) परिसरातील कोणते आवाज तुला ऐकू आले?<br>२) तू ज्या चटईवर बसलास, त्याचा स्पर्श कसा आहे? (मऊ, खडबडीत) | चित्रे, तक्ता | • निरीक्षण, प्रात्यक्षिक |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३) परिसरामधून कोणकोणत्या गोष्टींचा वास येत आहे?<br>४) वर्गात दिसणाऱ्या/परिसरात दिसणाऱ्या वस्तूंची यादी बनव. | | |
| **क्षमता : C - 2.6.5.1** अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्याकरता ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकत्रिकरण करण्यास सुरुवात करणे. | | | | | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | योग | • श्वसनाचे व्यायाम | • अनुलोम–विलोम क्रिया करतो. | (१) शिक्षक विद्यार्थ्यांना अनुलोम विलोमची क्रिया करून दाखवतात.<br>(२) विद्यार्थी शिक्षकांबरोबर अनुलोम विलोमची क्रिया करतात.<br>(३) शिक्षक योग्य ठिकाणी मार्गदर्शन करतील.<br>(४) संगीत | चित्रे, मार्गदर्शक तक्ता | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| **C - 2.6.5.2** | | | | | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | योग | • शांत बसणे. | • स्थिर बसतो आणि स्वतःच्या विचारांचे निरीक्षण करतो. | (१) शिक्षक विद्यार्थ्यांना डोळे बंद करून, एकाग्र मनाने शांत स्थिर बसण्याबाबत सूचना देतील.<br>(२) शिक्षक विद्यार्थ्यांना शांत बसल्यानंतर, आता तुमच्या मनात काय विचार सुरू आहेत याचे निरीक्षण करण्यास सांगतील.<br>(३) शिक्षक आपल्या आवाजाकडे लक्ष देण्याबाबत सूचना देतील आणि विद्यार्थी या सूचनेप्रमाणे स्थिर बसून लक्ष एकाग्र करतील.<br>(४) जसे की, आपल्या आजूबाजूला कोणता आवाज येतो आहे ते ऐका आणि तो कशाचा आवाज आहे याचा विचार करा : | परिसरातील विविध वस्तू, उदा. टेबल, ग्लास, शाळेची घंटा, टाळ इ. ध्यान संगीत, आसन | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उदा.<br>• टाळांचा/झांजांचा आवाज<br>• पक्ष्यांचा आवाज<br>• टेबलावर हाताने काढलेला आवाज<br>• टाळीचा आवाज<br>• वर्गातील इतर विद्यार्थ्यांच्या हालचालींचा आवाज.<br>• शाळेच्या परिसरात ऐकू येणारे विविध आवाज, मुलांच्या चालण्याचा आवाज, गाडीच्या हॉर्नचा आवाज<br>(५) विद्यार्थी आपल्या मनात सुरू असलेल्या विचारांवर विचार करतील. सोप्या भाषेत/शब्दांत जमेल तसे सांगण्याचा प्रयत्न करतील.<br>(६) शिक्षक विद्यार्थ्यांना काही वाक्ये/प्रसंग सांगतील व त्यानंतर डोळे बंद करून विद्यार्थी एकाग्र मनाने त्यावर विचार करतील. | | |

## विकासात्मक क्षेत्र : शारीरिक विकास

**ध्येय : C G - 3** सुदृढ व लवचीक शरीर विकसित होते.

**क्षमता : C - 3.1.1.1** विशिष्ट कृती करताना ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | मूलभूत क्रीडा– कौशल्य | पकडणे/झेलणे | • चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू पायाने उडवणे (kick) या कृती नियंत्रणाद्वारे करतो. | (१) कमी अंतरावरून मोठ्या आकाराचा चेंडू/फुगा शिक्षकांनी जमिनीवरून घरंगळत फेकणे.<br>(२) बालके तो चेंडू दोन्ही हातांनी पकडण्याचा/कॅच करण्याचा प्रयत्न करतात.<br>(३) बालके समोरच्या दिशेने जमिनीवर टप्पा पडत आलेला चेंडू झेलण्याचा/पकडण्याचा प्रयत्न करतात. | विविध आकारांचे, रंगांचे व साहित्याचे (रबर, कागद, प्लॅस्टिक) चेंडू, फुगा, रिंग. | • कृती, मूल्यमापन, पडताळा सूची |
| **C - 3.1.1.1 - A** | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | मूलभूत क्रीडा– कौशल्य | फेकणे | • चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू पायाने उडवणे (kick) या कृती साध्या नियंत्रणाद्वारे करतो. | (१) बालके मोठ्या आकाराचा चेंडू दोन्ही हातांनी समोरच्या दिशेने फेकतात.<br>(२) बालके मोठ्या आकाराचा चेंडू दोन्ही हातांनी वरच्या दिशेने फेकतात.<br>(३) बालके मोठ्या आकाराचा चेंडू दोन्ही हातांनी दरवाजाच्या आत व बाहेर फेकतात. | विविध आकारांचे, रंगांचे व साहित्याचे (रबर, कागद, प्लॅस्टिक) चेंडू, फुगा, रिंग. | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |
| **C - 3.1.1.1 - B** | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | मूलभूत क्रीडा– कौशल्य | ढकलणे – पायाने ढकलणे (किकिंग) | • चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू पायाने उडवणे (kick) या कृती साध्या नियंत्रणाद्वारे करतो. | (१) बालके मोठ्या आकाराचा फुगा, चेंडू यांसारख्या वस्तू पायाने ढकलतात. (किक मारतात.)<br>(२) बालक मोठ्या आकाराच्या स्थिर चेंडूला एका पायाने ढकलतो. (किक मारतो.) | विविध आकारांचे, रंगांचे व साहित्याचे (रबर, कागद, प्लॅस्टिक) चेंडू, फुगा, रिंग. | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

**C - 3.1.2.1 - A**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मूलभूत क्रीडा कौशल्य | झेलणे (कॅचिंग) (Catching) | • मोठा चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने वेगाने चेंडू पुढे उडवणे या कृती जोर लावून करू शकतो. | (१) कमी अंतरावरून मध्यम आकाराचा चेंडू शिक्षकांनी फेकणे व बालकाने तो चेंडू दोन्ही हातांनी झेलण्याचा (पकडण्याचा) प्रयत्न करणे.<br>(२) एका जागेवर दोन्ही हातांनी चेंडू हवेत फेकणे व झेलणे. | मध्यम व मोठ्या आकाराचा चेंडू | • प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**C - 3.1.2.1 - B**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मूलभूत क्रीडा कौशल्य | फेकणे (Throwing) | • मोठा चेंडू व इतर (रिंग वगैरे) झेलणे, फेकणे आणि पायाने उडविणे या कृती जोर लावून करू शकतो. | (१) जवळच्या लक्ष्यावर चेंडू काही प्रमाणात अचूकतेने फेकणे.<br>(२) जोडीदाराकडे उंचावरून चेंडू फेकणे.<br>(३) भिंतीपासून ठरावीक अंतरावर उभे राहून, भिंतीवर ठरावीक ठिकाणी चेंडू फेकणे.<br>(४) बालकाने मोठ्या आकाराच्या चेंडूला पायाने ढकलणे. | मध्यम व मोठ्या आकाराचा चेंडू | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**C - 3.1.2.1 - C**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मूलभूत क्रीडा कौशल्य | पायाने ढकलणे (kicking) | • मोठा चेंडू व इतर (रिंग वगैरे) झेलणे, फेकणे आणि पायाने उडविणे या कृती जोर लावून करू शकतो. | (१) बालकाने मोठ्या आकाराच्या चेंडूला पायाने ढकलणे.<br>(२) समोरून घरंगळत आलेल्या चेंडूला पायाने ढकलणे. | मोठा चेंडू | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

| C - 3.1.2.1 - D | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **स्तर/इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** | **मूल्यमापन निर्देश** |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मूलभूत क्रीडा कौशल्य | नेम धरून फेकणे | • जवळच्या लक्ष्यावर चेंडू काही प्रमाणात अचूकतेने फेकतो. | (१) ठरावीक अंतरावरून बादलीत चेंडू टाकणे.<br>(२) जवळच्या लक्ष्यावरील लगोरी नेम धरून फोडणे. | चेंडू, बादली, लगोरीचे ठोकळे, दृक्श्राव्य साधने | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| **क्षमता : C - 3.1.3.1 - A** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | मूलभूत क्रीडा कौशल्य | झेलणे, पकडणे आणि उडवणे. | • वेगवेगळ्या आकाराचे चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने उडवणे या कृतींमध्ये सुधारणा करतो. | (१) जोडीदाराबरोबर समोरासमोर झेलायचा सराव करतात.<br>(२) समोरच्या दिशेने शिक्षक कमी अंतरावरून चेंडू (फुगे) सावकाश फेकतील व झेलण्याबाबत प्रात्यक्षिक करून दाखवतील.<br>(३) शिक्षकांनी फेकलेला चेंडू/फुगा झेलण्याचा/पकडण्याचा बालके प्रयत्न करतात. | विविध आकारांचे, रंगांचे व साहित्याचे (रबर, कागद, प्लॅस्टिक) चेंडू, फुगे | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, कृती मूल्यमापन |
| **C - 3.1.3.1 - B** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | मूलभूत क्रीडा कौशल्य | फेकणे | • वेगवेगळ्या आकारांचे चेंडू झेलणे, फेकणे आणि पायाने उडवणे या कृतींमध्ये सुधारणा करतो. | (१) बालके मध्यम आकाराचा चेंडू दोन–तीन पावले टाकून, एका हाताने समोरच्या दिशेत फेकतात.<br>(२) आपल्या जोडीदाराकडे जोर लावून चेंडू फेकण्याची क्रिया करतात.<br>(३) विशिष्ट अंतरावर कोन अथवा वस्तू ठेवून त्या वस्तूला चेंडूने उडवणे.<br>(४) चेंडू कडीमधून टाकणे. | मध्यम आकाराचे चेंडू<br>चेंडू<br>कोन | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

**C - 3.1.3.1 - C**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | किकिंग (पायाने ढकलणे) | • वेगवेगळ्या आकारांचे चेंडू झेलणे, फेकणे आणि पायाने उडवणे या कृतींमध्ये सुधारणा करतो. | (१) शिक्षकांनी एका पायाने चेंडूला किक मारण्याचे/ पायाने ढकलण्याबाबतचे प्रात्यक्षिक दाखवणे.<br>(२) एका पायाने चेंडूला किक मारणे.<br>(३) समोरून आलेल्या मोठ्या चेंडूला पायाने किक मारतील.<br>(४) भिंतीवर विशिष्ट ठिकाणी हळुवारपणे लाथ मारणे.<br>(५) विशिष्ट लक्ष्यावर चेंडू पायाने उडवणे. (किक मारणे)<br>जसे – रिंग, कोन, बाटली अशा उपलब्ध वस्तू इत्यादी.<br>(६) डब्बा ऐसपैस यांसारख्या पारंपरिक खेळांचा सराव घेणे. | मोठा चेंडू, विविध वस्तू, रिंग, कोन, बाटली इ. | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| **क्षमता : C - 3.1.4.1- A** | | | | | | |
| इ. १ ली | क्रीडा कौशल्य | मूलभूत कौशल्ये झेलणे. (Catching) | • एखादा खेळ, स्पर्धा इ. प्रसंगामध्ये चेंडू झेलणे, पकडणे आणि पायाने उडवणे या कृती सहजतेने करतो. | (१) शिक्षकांनी बालकांना खेळ, स्पर्धा अशा प्रसंगांमध्ये चेंडू झेलणे कृतींचे प्रात्यक्षिक दाखवणे.<br>(२) बालके शिक्षकांच्या सूचनांप्रमाणे प्रत्यक्ष कृती करतात.<br>(३) उदा. बालके गोलाकार उभे राहून एकमेकांकडे चेंडू फेकण्याचा व झेलण्याचा सराव करतात.<br>(४) डोक्यावर, छातीसमोर, कमरेजवळ, समोर, मागे, आजूबाजूला, पायाजवळ, चेंडू झेलण्याचा सराव.<br>(५) दोन्ही हाताने मोठा चेंडू व एका हाताने छोटा चेंडू झेलणे. | कोन, मोठा, मध्यम व छोट्या आकाराचा चेंडू | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**C - 3.1.4.1 - B**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली | क्रीडा कौशल्य | पकडणे. (Holding) | • एखादा खेळ, स्पर्धा इ. प्रसंगामध्ये चेंडू झेलणे, पकडणे आणि पायाने उडवणे या कृती सहजतेने करतो. | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून खालील प्रात्यक्षिके करून घेणे.<br>(२) उदा. घरंगळत आलेला चेंडू हाताने पकडणे; समोरच्या दिशेने वेगात आलेला चेंडू पकडणे, एखाद्या विद्यार्थ्याने पकडलेला चेंडू, दुसऱ्या विद्यार्थ्याने त्याच्या पकडीतून घेण्याचा प्रयत्न करणे.<br>(३) दोन्ही हाताने व एका हाताने पकडणे. | चेंडू | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**C - 3.1.4.1 - C**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली | क्रीडा कौशल्य | पायाने चेंडू मारणे (Kicking) | • एखादा खेळ, स्पर्धा इत्यादी प्रसंगांमध्ये चेंडू झेलणे, पकडणे आणि पायाने उडवणे या कृती सहजतेने करतो. | (१) शिक्षकांनी बालकांकडून खालील प्रात्यक्षिके करून घेणे.<br>(२) उदा. दोन कोनांमधून पायाने चेंडू मारणे, हवेतून येणाऱ्या चेंडूला पायाने मारणे, विशिष्ट लक्ष्यावर चेंडू पायाने मारणे.<br>(३) धावत येऊन चेंडू लाथाडणे.<br>(४) गड्याकडे चेंडू मारणे.<br>(५) ड्रिबलिंग सहित चेंडू नेणे. | कोन, चेंडू. | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**क्षमता : C - 3.1.5.1 - A**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री | क्रीडा कौशल्य | मूलभूत कौशल्य (१) झेलणे | एखादा खेळ, स्पर्धा इ. प्रसंगामध्ये चेंडू झेलणे, पकडणे आणि पायाने उडवणे (Kicking Balls) या कृती सहजतेने करतो. | (१) बालकांना गोलाकार उभे करणे. शिक्षकांनी मध्यभागी उभे राहून विद्यार्थ्यांकडे चेंडू फेकणे व विद्यार्थ्यांनी तो झेलणे.<br>(२) हवेत चेंडू उंच फेकणे व झेलणे.<br>(३) शिक्षकांनी बॅटने चेंडू मारणे व बालकांनी चेंडू झेलणे.<br>(४) दोन्ही हाताने व एका हाताने चेंडू झेलणे.<br>(५) चेंडू झेलणे वर, खाली, समोर, मागे, आजूबाजूला आलेला चेंडू झेलणे. | चेंडू, कोन | • प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

C - 3.1.5.1 - B

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री | क्रीडा कौशल्य | (२) पकडणे | एखादा खेळ, स्पर्धा इ. प्रसंगांमध्ये चेंडू झेलणे, पकडणे आणि पायाने उडवणे (Kicking Balls) या कृती सहजतेने करतो. | (१) मोठा चेंडू दोन्ही हाताने घट्ट पकडणे, दुसरा बालक तो चेंडू काढून घेण्याचा प्रयत्न करतो. (पकड घट्ट करणे.)<br>(२) एका हाताने चेंडू पकडणे.<br>(३) चेंडू रिंग झेल व पकडणे. | चेंडू, कोन | • प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

C - 3.1.5.1 - C

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री | क्रीडा कौशल्य | (३) पायाने चेंडू मारणे (Kicking) | एखादा खेळ स्पर्धा इ. प्रसंगांमध्ये चेंडू झेलणे, पकडणे आणि पायाने उडवणे (Kicking Balls) या कृती सहजतेने करतो. | (१) कोन ओळीत मांडून, त्यामधून पायाने चेंडू मारत लक्ष्यापर्यंत नेणे. (ड्रिबलिंग)<br>(२) हवेत चेंडू फेकून पायाने मारणे.<br>(३) धावत येऊन चेंडू लाथाडणे.<br>(४) गड्याकडे चेंडू मारणे (पासिंग) | चेंडू, कोन | • प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**ध्येय : C G - 3** सुदृढ व लवचीक शरीर विकसित होते.

**क्षमता : C - 3.2.1.1** विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | कारक कौशल्य | तोल | • आधाराने किंवा मदतीने एका पायावर उभे राहू शकतो. | (१) जमिनीवर कोन अथवा वस्तू ठेवून त्याभोवती धावण्यास सांगणे.<br>(२) नागमोडी धावण्याचे प्रात्यक्षिक/कृती करून घेणे.<br>(३) शरीराच्या वेगवेगळ्या भागांनी कशा प्रकारे तोल सांभाळू शकतो, याचा शोध घेणे. उदा., शरीराच्या कोणत्याही तीन भागांनी तोल सांभाळू शकतात का? याची प्रात्यक्षिक कृती करून घेणे. | विविध आकारांचे व रंगांचे चेंडू, कोन, उपलब्ध साहित्य, शिट्टी. | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (४) आता त्यापैकी शरीराच्या कोणत्याही दोन भागांनी तोल सांभाळण्याचे प्रात्यक्षिक/कृती करून घेणे.<br>(५) कोणत्याही एकाच पायावर तोल सांभाळण्याचे प्रात्यक्षिक/कृती करून घेणे.<br>(६) मनोरंजक खेळांद्वारे धावणे, नागमोडी धावणे, तोल सांभाळणे या कृती घेणे. | | |
| **C - 3.2.1.2** | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | कारक कौशल्य | संतुलन | • अल्प वेळासाठी एका पायावर संतुलन साधू शकतो. | (१) हात बाजूला असलेल्या स्थितीत, एका पायावर तोल सांभाळण्याचे प्रात्यक्षिक घेणे.<br>(२) मनोरंजक खेळाद्वारे, एका पायावर संतूलन साधून, जास्त वेळ उभे राहण्याची कृती घेणे. | शिट्टी, खंजिरी | • कृती, मूल्यमापन, पदनिश्चयन श्रेणी |
| **क्षमता : C - 3.2.2.1 - A** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | कारक कौशल्य | तोल (Balance) | • एका पायावर जास्त काळासाठी आधाराशिवाय उभे राहू शकतो. | (१) शिक्षक बालकांना एका पायावर आधाराशिवाय जास्त काळासाठी उभे राहण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवतील.<br>(२) बालके कृती करून दाखवतील.<br>(३) विटेवर एका पायावर उभे राहणे.<br>(४) लाकडी फळीवर एक पाय ठेवून चालणे. | वीट, ठोकळे, लाकडी फळी | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| **C - 3.2.2.1 - B** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | कारक कौशल्य | तोल (Balance) | • ४–५ पावले एका पायावर उड्या मारतो. (लंगडी घालतो.) | (१) शिक्षक बालकांना ४ ते ५ पावले एका पायावर उड्या मारण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवतात.<br>(२) बालके सूचनेप्रमाणे एका पायावर ४ ते ५ पावले उड्या मारतात.<br>(३) उदा. लंगडी खेळणे. | | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

C - 3.2.2.2

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | कारक कौशल्य | तोल (Balance) | • वेगवेगळ्या पृष्ठभागांवर संतुलन साधू शकतो. जसे : विटा, शिडी | (१) शिक्षक बालकांना वेगवेगळ्या पृष्ठभागांवर संतुलन साधून चालण्याचे प्रात्यक्षिक दाखवतात. उदा. हात बाजूला घेऊन विटांवरून चालणे, तोल सांभाळत शिडीवरून चढणे व उतरणे, चुन्याची रेघ ओढून तोल साधून चालणे, (हातात पाण्याचा ग्लास घेऊन.)<br>(२) बालके शिक्षकांच्या सूचनेप्रमाणे प्रात्यक्षिक करून दाखवतील. | विटा, चुना, दोरखंड, शिडी, पाण्याचा ग्लास | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| **क्षमता : C-3.2.3.1** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | शारीरिक सुदृढता | स्नायूंचा दमदारपणा, प्राणी, पक्षी उड्या | • १० ते १५ पावले एका पायावर उड्या मारतो. (लंगडी घालतो.) | (१) शिक्षकांनी बालकांना विविध कृती/प्रात्यक्षिक करण्याबाबत सांगणे. जसे की,<br>१) डोक्यावर, हातावर वस्तू ठेवून चालणे.<br>२) चांगले शारीरिक संतुलन ठेवून चालणे.<br>३) कमी अंतरांपर्यंत लंगडी घालणे.<br>(२) शिक्षकांनी बालकांना नागमोडी लंगडी घालण्यास सांगणे.<br>(३) शिक्षकांच्या सूचनेप्रमाणे बालकांनी प्रात्यक्षिक करणे. उदा. दोन्ही हात व दोन्ही गुडघे टेकलेल्या स्थितीत थांबणे. त्यानंतर फक्त उजवा हात आणि उजवा पाय यावरून तोल सांभाळणे. त्यानंतर डावा पाय व डावा हात यावरच तोल सांभाळणे.<br>(४) एका पायावर जास्त काळासाठी तोल सांभाळणे.<br>(५) वीट अथवा बिन बॅगवर वेगळ्या स्थिती घेऊन तोल सांभाळणे. | कोन, रिंग, विविध वस्तू (परिसरात उपलब्ध असतील त्या) वही, पुस्तक, रिंग वीट, बिनबॅग | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, मूल्यमापन. |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (६) एक आड एक पायावर उड्या मारत पुढे जाणे.<br>(७) प्राण्यांप्रमाणे उड्या मारणे. उदा. बेडूक, ससा, कांगारू.<br>(८) टिक्कर, बिल्लासारख्या पारंपरिक खेळांचा सराव घेणे. | | |
| **क्षमता : C - 3.2.3.2 - A** | | | | | | |
| बालवाटिका ३ | कारक–कौशल्य | तोल | • डोक्यावर, हातावर वस्तू ठेवून तोल सांभाळतो.<br>जसे – पुस्तक डोक्यावर ठेवून चालणे. | (१) शिक्षक डोक्यावर, हातावर वस्तू ठेवून तोल सांभाळायचे प्रात्यक्षिक करून दाखवतील.<br>(२) बालकांकडून खालीलप्रमाणे कृती/प्रात्यक्षिक करून घेतील.<br>(१) पुस्तक/वही डोक्यावर ठेवून तोल सांभाळणे.<br>(२) बोटांनी न पकडता तळहातावर मोठा चेंडू ठेवून त्याचा तोल सांभाळणे.<br>(३) डोक्यावर/हातावर ताट/प्लेट ठेवून तोल सांभाळणे. | पुस्तक, वही<br>मोठा चेंडू, प्लेट | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |
| **क्षमता : C-3.2.3.2 - B** | | | | | | |
| बालवाटिका ३ | कारक–कौशल्य | तोल, समन्वय वृक्षासन व विविध शरीर स्थिती (आसनांप्रमाणे) | • चांगले शारीरिक संतुलन दर्शवतो.<br>जसे – मदतीशिवाय सायकल चालवतो. | (१) शारीरिक संतुलन ठेवून विविध भौमितिक आकारांवरून चालणे, धावणे. उदा. आयत, गोल, त्रिकोण, नागमोडी चालणे, धावणे.<br>(२) वृक्षासनाद्वारे शारीरिक तोल सांभाळण्याचे प्रात्यक्षिक घेणे.<br>(३) मदतीने व मदतीशिवाय सायकल चालवणे. | प्लेट, वही, सायकल वस्तू | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

**क्षमता : C - 3.2.4.1**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली | शारीरिक सुदृढता | स्नायूंचा दमदारपणा, प्राणी व पक्षी उड्या | • सक्षमपणे एका पायावर उड्या मारतो आणि लंगडीचा खेळ खेळता येतो. | (१) लंगडीच्या २–३ उड्यांमध्ये किती अंतर पार करू शकतो हे पाहणे.<br>(२) गोलाकार, चौकोनी, त्रिकोणी अशा वेगवेगळ्या रचनेत समोर, मागे, पुढे, बाजूला लंगडी घालणे.<br>(३) बेडूक, ससा, कांगारू यांसारख्या प्राण्यांच्या उड्या मारणे, बदल चाल करणे.<br>(४) एका पायावर ताठ फ्लेमिंगो टेस्ट शिकवतात (............) | कोन, चुना, दोरी, दृक्श्राव्य साधने | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**क्षमता : C - 3.2.4.2 - A**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली | कारक कौशल्ये | शक्ती | • जड वस्तू जसे– खुर्ची/टेबल/ पिशवी योग्य तंत्राने आणि संतुलन साधत एका जागेवरून दुसरीकडे हलवतो/ठेवतो. | (१) शिक्षकाने खालील प्रमाणे बालकांकडून कृती करून घेणे.<br>(२) उदा. (१) एकात एक खुर्ची (५ ते ६) घालून ठेवणे व त्या सांगितलेल्या जागेवर सरकवत नेणे.<br>(३) सांगितलेल्या जागेवर टेबल सरकवत नेणे.<br>(४) बादलीत पाणी भरून, न सांडता संतुलन साधून सांगितलेल्या जागेवर उचलून नेणे.<br>(५) माती पिशवीत भरून एका जागेवरून सांगितलेल्या जागेवर संतुलनासह उचलून नेणे.<br>(६) डोक्यावर, खांद्यावर, पाठीवर वस्तू घेऊन संतुलन साधत चालणे. | बादली, माती, पिशवी, कोन | • प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **क्षमता : C - 3.2.4.2 - B** | | | | | | |
| इ. १ ली | कारक–कौशल्य | तोल | • गती प्राप्त करताना शारीरिक संतुलन सांभाळतो.<br>(उदा. सायकल, गतीने चालवतो.) | शिक्षकांनी बालकांकडून खालील प्रात्यक्षिक करून घेणे.<br>(१) डोक्यावर पुस्तक ठेवून, संतुलन सांभाळत वेगाने चालणे.<br>(२) सायकल गतीने चालवणे.<br>(३) कोन्समधून झिगझॅग करत संतुलन सांभाळत वेगाने धावणे.<br>(४) सहकाऱ्यांना हुलकावणी देत वेगाने पळणे.<br>(५) लिंबू चमचा शर्यत, बटाटा शर्यत<br>(६) जंगलजिम चढणे, उतरणे<br>(७) वेगात धावणे : गोलाकार, मागे<br>(८) गतीने पायऱ्या चढ–उतार करणे.<br>(९) कराटे किक व पंच<br>(१०) जिमनॅस्टिक : जंप, उडी. | पुस्तक, सायकल, कोन्स, लिंबू चमचा इत्यादी | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| **क्षमता : C - 3.2.5.1** | | | | | | |
| इ. २ री | क्रीडा कौशल्य | समन्वय | • दोरीच्या उड्या सहजतेने मारतो. | (१) एका पायाने सावकाश गतीने दोरीच्या उड्या मारतो.<br>(२) एका पायाने जलद गतीने दोरीच्या उड्या मारतो<br>(३) दोन्ही पायांनी जलद गतीने दोरीच्या उड्या मारतो.<br>(४) आडव्या दोरीवरून धावत येऊन उंच उडी मारतो. | दोरी | (१) निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

C - 3.2.5.2 - A

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री | खेळ | विविध खेळ (पारंपरिक व इतर) | • चपळता आणि संतुलन दर्शवतो. जसे : झाडावर चढणे, जंगल जिमवर खेळणे. | (१) जिन्यावरून चढ–उतार करणे.<br>(२) एक पायरी सोडून चढणे.<br>(३) दोरीवर चढणे.<br>(४) साध्या व लटकत्या शिडीवर चढणे.<br>(५) मानवी मनोऱ्यावर चढणे.<br>(६) उभा खो–खो खेळणे.<br>(७) चमचा–लिंबू खेळणे.<br>(८) Squash खेळणे.<br>(९) अडथळा शर्यत<br>(१०) लंगडी खेळणे<br>(११) विटी–दांडूचा खेळ खेळणे<br>(१२) जोड–साखळी खेळ खेळणे<br>(१३) तळ्यात–मळ्यात खेळ खेळणे<br>(१४) रुमाल–पाणी खेळ खेळणे इ.<br>(१५) पारंपरिक खेळ, जसे – फुगड्या, सूरपारंब्या, कांदाफोडी, सागरगोटे, लगोरी इत्यादी. | दोरी, शिडी, लटकती शिडी, चमचा, लिंबू, बॉल, रॅकेट, चुना, विटी, दांडू, रुमाल इत्यादी. | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

क्षमता : C - 3.2.5.2 - B

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री | कारक कौशल्य | तोल व संतुलन, सूर्यनमस्कार, फ्लेमिंगो टेस्ट | दुसरा पाय दुमडून एका पायावर एक मिनिटासाठी उभे राहू शकतो. जसे – ध्रुवासन | (१) बालके शिक्षकांनी दाखवल्याप्रमाणे योगासने करतील. उदा., ध्रुवासन, वृक्षासन, एकपादहस्तासन किंवा अर्धचन्द्रासन, कर्णासन.<br>(२) सूर्यनमस्कारासारख्या शारीरिक हालचाली करून घेणे. | योगा चटई/mat | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**ध्येय : C G - 3** सुदृढ व लवचीक शरीर विकसित होते.

**क्षमता : C - 3.3.1.1** हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | कारक कौशल्य | संतुलन | • साध्या कृतींमध्ये सूक्ष्म स्नायू, स्नायू विकास, हस्तनेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवतो. (उदा. गिरगिटणे, कागद फाडणे, चिकटवणे, मुक्तपणे रंगवणे, आणि मातकाम) | (१) ठोकळे किंवा बॉक्स, दगड यांसारख्या परिसरातील उपलब्ध साहित्यातून साध्या रचना करतील. | ठोकळे, ब्लॉक्स, दगड, बिया इ. | • कृती, मूल्यमापन |
| | | | | (२) कागदाची सोपी घडी घालण्याचे प्रात्यक्षिक करून घेतात. | कागद | |
| | | | | (३) छिद्रात छोट्या वस्तू बसवण्याचे प्रात्यक्षिक घेतात. | | |
| | | | | (४) मनोरंजक खेळाद्वारे मनोरे रचणे. उदा., रिंगांचा मनोरा, ठोकळ्याचा मनोरा, फरशीच्या लहान तुकड्यांचा मनोरा. | मनोऱ्याची रिंग, ठोकळे, फरशीचे तुकडे इत्यादी. | |
| | | | | (५) रांगोळी, माती, पाटी यांवर गिरगिटण्याचे प्रात्यक्षिक घेतात. | रांगोळी, माती, पाटी | |
| | | | | (६) स्नायूंच्या बळकटीसाठी रद्दी कागद फाडण्याची कृती घेतात. | रद्दी कागद | |
| | | | | (७) दिलेल्या चित्रावर वेगवेगळ्या वस्तू चिकटवणे. उदा., कागदाचे तुकडे चिकटवणे. | कागद, डिंक, खळ | |
| | | | | (८) साधीसोपी चित्रे मुक्तपणे रंगवणे. | तैलरंग/तेलखडू | |
| | | | | (९) मातकामावर आधारित विविध कृती घेतात. उदा., १) ढेकळं फोडणे, २) माती चाळणे, ३) माती मळणे, ४) मातीचे गोल तयार करणे. | माती, चाळणी | |
| | | | | (१०) परिसरात उपलब्ध असणाऱ्या एकत्र केलेल्या विविध वस्तू, बिया वेगवेगळ्या करणे. उदा.– खडे, खजूराच्या बिया, चिंचोके, पाने, फुले, बटणे, वेगवेगळ्या रंगांची झाकणे, चेंडू इत्यादी. | | |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (११) बालकांना विविध प्राण्यांसारखे चालायला सांगणे व त्यावर आधारित मनोरंजक खेळ व गाणी घेणे. उदा., हालचाली, उंटचाल, पायाच्या पंजावर चालणे, टाचांवर चालणे.<br>(१२) झोके घेणे.<br>(१३) गिरकी घेणे. पारंपरिक खेळांचे प्रात्यक्षिक घेणे.<br>(१४) खालील कृतींचे प्रात्यक्षिक घेणे.<br>१) एका हाताने ग्लास पकडणे.<br>२) अंगठा व बोटाने रंगीत खडू धरणे.<br>३) गिरगिटणे, रंगवणे यांसारख्या मनगटाशी निगडित कृतींमध्ये सहजतेने भाग घेणे.<br>४) मातकामात चेंडू/विविध आकार तयार करणे.<br>५) चमच्यातील पदार्थ न सांडता चमचा पकडणे.<br>६) मणी ओवणे, मोठी बटणे लावणे, बोथट कात्रीने, कागद कापणे. | पाने, फुले, झाकणे, चेंडू इत्यादी. विविध बिया<br>ग्लास, खडू<br>कात्री, पेपर, बटण | |
| **क्षमता : C - 3.3.2.1** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | कारक कौशल्य | हस्त व नेत्र समन्वय | • ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंचा वापर केला जातो, तसेच हस्त, नेत्र समन्वयात | (१) विविध आकाराचे कागद कापणे.<br>(२) मोठे मणी ओवणे.<br>(३) बटण लावणे.<br>(४) बाटलीचे झाकण लावणे आणि उघडणे.<br>(५) छोट्या छिद्रात स्क्रू बसवणे.<br>(६) मगने/ग्लासने बाटलीत पाणी भरणे. | कागद, कात्री, मणी, दोरा, बटण, बाटली, स्क्रू, क्रेयॉन, पाणी, मग, ग्लास, बादली, | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन, पडताळा सूची |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | काही प्रमाणात अचूकता लागते, अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो (उदा. मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे) बाटलीचे झाकण लावणे–उघडणे, क्रेयॉनचा वापर करून चित्र काढणे. | (७) बादलीत ठरावीक अंतरावरून चेंडू फेकणे.<br>(८) शिवणपाटी वापरणे.<br>(९) चेंडू हवेत फेकून हाताने एक टाळी वाजवून, चेंडू खाली येताच झेलणे. यात हळूहळू टाळ्यांची संख्या वाढवणे.<br>(१०) लाकडी फळीवर स्क्रू फिरवून बसवणे.<br>(११) क्रेयॉनचा वापर करून चित्र काढणे.<br>(१२) स्वतःचे जेवणाचे ताट न सांडता वाढून घेणे.<br>(१३) जेवताना किंवा खाताना चमच्याचा योग्य वापर करणे.<br>(१४) चित्रकलेच्या विविध साहित्याचा वापर करतो. जसे – क्रेयॉन्स, ब्रश, ठसेकाम.<br>(१५) ठोकळ्याच्या मदतीने पुस्तकात दाखवलेले वेगवेगळे आकार तयार करतो.<br>(१६) सरळरेषेवर आणि वक्ररेषेवर चालतात.<br>(१७) गुंतागुंतींच्या कृती जसे – रेषेवर कापणे, ओतणे, बटण लावणे इत्यादी कृती करतो.<br>(१८) लहान ठोकळ्यांचा मनोरा रचतो. (८ ते १० ठोकळे)<br>(१९) ठरावीक आकृतिबंध विचारात न घेता देखील शिवणपाटीवर दोरी ओवणे, फुलांची माळ गुंफणे इत्यादी कृती करतो.<br>(२०) एखाद्या गोष्टीच्या रचनेसाठी दोन्ही हातांचा वापर करतो. | चेंडू, शिवणपाटी, दोरा, लाकडी, फळी | |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (२१) ओळखता येतील अशी अक्षरे किंवा अंक यांचे लेखन करतो.<br>(२२) सातत्याने लेखनासाठी किंवा चित्र काढण्यासाठी एकाच हाताचा वापर करतो.<br>शिक्षक बालकांना वरील सर्व कृतींचे आधी प्रात्यक्षिक दाखवतील व बालके सूचनेप्रमाणे प्रत्यक्ष करतील. | | |
| **C - 3.3.3.1** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | कारक कौशल्य | स्नायू व मज्जा समन्वय | • जास्त अचूकता लागणाऱ्या कृती सूक्ष्म स्नायूंच्या समन्वयाने थोड्या मदतीसह करतो. (उदा. पेन्सिलने चित्र काढणे, सरळ रेषेवर छोटे मणी ओवणे, अक्षरांचे वाचनीय लेखन करणे, फुले ओवणे, बंदिस्त आकार रंगवताना रंग बाहेर जाऊ न देता रंगवणे. | (१) पारंपरिक खेळांच्या मदतीने हस्त–नेत्र समन्वय विकसित करून, स्नायूंची ताकद वाढवणे. उदा. काचापाणी, खडापाणी, सागरगोटे, दोरी–उड्या, विटी–दांडू, रुमालपाणी, झिम्मा–फुगडी, फुगड्यांचे विविध प्रकार, दोरीवर चढणे, भिंतीवर चढणे इत्यादी. | सागर गोटे, विटी–दांडू, रुमाल, दोर इत्यादी. | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| **क्षमता : C - 3.3.4.1** हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवितो. | | | | | | |
| इ. १ ली | कारक–कौशल्य विविध खेळ | हस्त व नेत्र समन्वय<br>मूळ खेळ, पारंपरिक खेळ, पूरक खेळ, परावर्तित खेळ,<br>––––– | • हस्त–नेत्र समन्वयासाठी आवश्यक असणाऱ्या कृती मदतीशिवाय करतो. (उदा., गिरवणे, नीटनेटके लेखन व चित्र काढणे, छोटा चेंडू झेलता येणे, भौमितिक आकार काढणे, वेगवेगळे आकृतिबंध तयार करता येणे.) | शिक्षकांनी हात व डोळे यांच्या समन्वयासाठी बालकांकडून खालील कृती करून घेणे.<br>(१) टप्पे घेणे.<br>(२) नेम मारणे.<br>(३) छोट्या आकाराचा चेंडू हवेत फेकून झेलणे.<br>(४) जमिनीवरून उसळी मारलेला चेंडू पकडणे.<br>(५) रिंग पकडणे.<br>(७) कॅचिंग करणे, बॅटिंग करणे, बॉलिंग करणे, फिल्डिंग करणे, डॉट मारणे, नेमबाजी.<br>(८) लोकरी गुंडाळणे, किकिंग करणे, लिस्टिंग करणे. भिंतीवर टप्पे घेणे.<br>(९) हवेत चेंडू फेकून, एक टाळी वाजवून खाली आलेला चेंडू पकडणे. (टाळ्यांची संख्या हळूहळू वाढवत जाणे.)<br>(१०) नेम धरून मारणे. | पेन्सिल, कागद, चेंडू, रांगोळी, मेहंदी, मणी, फुले, पाने, दोरा, रिंग, नटबोल्ट, लोकर, जाड सुई, रंग इत्यादी. | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| **C - 3.3.5.1** हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवितो. | | | | | | |
| इ. २ री | कारक कौशल्य, मूलभूत कारक कौशल्य | मज्जा व स्नायू समन्वय<br>सूक्ष्म स्नायू विकास | • सूक्ष्म स्नायूंवर जास्त अवधीसाठी ताबा लागणाऱ्या कृती जास्त अचूकतेने | (१) रस्सीखेच<br>(२) कॅरम<br>(३) Single bar / Double bar<br>(४) बॉलिंग | रस्सी, सुई–दोरा, सिंगल बार, डबल बार, तेलखडू, ब्रश, | • प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन, निरीक्षण, |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | कारक कौशल्य मूलभूत कारक कौशल्य<br><br>विविध खेळ | मज्जा व स्नायू समन्वय सूक्ष्म स्नायू विकास<br><br>लघु खेळ, शर्यती, पूरक खेळ, पारंपरिक खेळ, सांघिक खेळ | आणि तपशीलासह करतो. (उदा. सुईत दोरा ओवणे, शिवणकाम, चित्रकला रेखाटन करणे.) सूक्ष्म स्नायूंवर जास्त अवधीसाठी ताबा लागणाऱ्या कृती जास्त अचूकतेने आणि तपशिलासह करतो. (उदा. सुईत दोरा ओवणे, शिवणकाम, चित्रकला रेखाटन करणे.) | (५) ड्रिबलिंगसहित धावणे.<br>(६) हँडबॉल, हॉकी, फूटबॉल निरीक्षणावर कृती.<br>(७) उत्तेजक व्यायाम<br>(८) झाडून घेणे.<br>(९) रोप चढणे.<br>(१०) माती भरणे, शर्यत<br>(११) पाणी भरणे, शर्यत. | पाण्याचे रंग, डाळी, पाने, कागद, कापड, नटबोल्ट, लोकर, माती, मेहंदी रस्सी, सुई–दोरा, सिंगल बार, डबल बार, तेलखडू, ब्रश | |

**ध्येय : C G - 3** सुदृढ व लवचीक शरीर विकसित होते.

**क्षमता : C - 3.4.1.1 - A** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | विविध हालचाली | चालणे | • सरळ रेषेत चालतो. | (१) योग्य शरीरस्थिती ठेवून, समोरच्या दिशेने सरळ रेषेत चालणे.<br>(२) चालताना समोर, वर, बाजूला, टाळ्या वाजवत चालणे. | शिडी, बँड, घंटी/झांझ | • निरीक्षण |
| **C - 3.4.1.1 - B** | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | विविध हालचाली | चालणे | • उलट (मागे) चालतो. | (१) योग्य शरीरस्थिती ठेवून उलट (पाठीमागे) चालतो. | – | • प्रात्यक्षिक, पडताळा सूची |
| **C - 3.4.1.1 - C** | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | विविध हालचाली | चालणे | • पायाच्या चवड्यावर चालतो. (६ पेक्षा जास्त पावले) | (१) योग्य शरीरस्थितीसह टाचा न टेकवता पायाच्या चवड्यावर चालण्याची कृती करून घेणे. | – | • प्रात्यक्षिक |
| **C - 3.4.1.1 - D** | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | विविध हालचाली | चालणे | • दिशा व गती बदलून सहजतेने चालतो किंवा धावतो. | (१) सावकाश चालता चालता वेगाने चालणे, पुन्हा वेग कमी करणे, वेग खूप कमी करणे, खूप जास्त वेगाने चालणे, ठरावीक वेगाने गती वाढवणे, गती कमी करत करत चालणे, धावणे इ. ची कृती करणे. | शिटी, बँड, घंटी/झांझ | • निरीक्षण, कृती मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (२) चालताना दिशा बदलून हातांची स्थिती समोर वर, खाली, मागे व बाजूला करत धावणे, चालणे. सैनिक, रोबोटसारखे चालणे.<br>(३) एरोबिक्स (संगीतमय तालबद्ध हालचाली) | | |
| **क्षमता : C - 3.4.1.2 - A** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवितो. | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | विविध हालचाली | उड्या मारणे (कमी उंची), प्राणी–पक्षी उड्या | • एका जागी उड्या मारतो. छोट्या अडथळ्या–वरून उडी मारतो. | (१) एका जागेवर उडी मारणे.<br>(२) उंचावरून उडी मारून पायावर स्थिर उभे राहणे.<br>(३) एका जागेवर उड्या मारणे.<br>(४) कमी उंच व जास्त उंच उड्या मारणे.<br>(५) विविध आवाज करत जागेवर उंच उडी मारणे.<br>(६) उडी मारल्यानंतर हवेत असताना टाळ्या वाजवणे.<br>(७) छोट्या अडथळ्यावरून उडी मारणे.<br>(८) विविध प्राणी पक्ष्यांप्रमाणे उड्या मारणे. उदा. बेडूक उडी, ससा उडी. | शिटी, घंटी, झांज | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |
| **C - 3.4.1.2 - B** | | | | | | |
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | विविध हालचाली | उड्या मारणे (उंचीवरून) | • उंचावरून उडी मारून पायावर स्थिर उभा राहतो. (उंची अडीच ते तीन फूट) | (१) एक ते दीड फुटांवरून खाली उडी मारणे.<br>(२) अडीच ते तीन फुटांवरून उडी मारणे. | बेंच, टेबल, खुर्ची, स्टूल | • निरीक्षण, प्रात्यक्षिक |
| **C - 3.4.1.3** | | | | | | |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | विविध हालचाली | उड्या मारणे (उंचीवरून) | • हलकी वजने उचलून हालचाल करू शकतो. (उदा. जसे : लहान मग/पेला/तांब्या घेऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकतो.) | (१) हलकी वजने उचलून दुसऱ्या जागी नेऊन ठेवणे. जसे – पुस्तक, बाटली, मग, चेंडू, रबरी रिंग, परिसरातील उपलब्ध साहित्य.<br>(२) मनोरंजक खेळाद्वारे वरील विविध कृतींचे प्रात्यक्षिक करून घेणे. | चेंडू, रिंग, पाण्याची बाटली, रेती भरलेली बाटली, छोटा मग, पुस्तके इत्यादी. | • निरीक्षण, प्रात्यक्षिक<br>• कृती, मूल्यमापन |
| **क्षमता : C - 3.4.2.1 - A** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो. | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | कारक हालचाली | चालणे | • सरळ, नागमोडी, वक्र रेषेवर सहजतेने चालतो. | (१) शिक्षक बालकांना प्रात्यक्षिक करून दाखवतील.<br>(२) बालके प्रत्यक्ष कृती करतील.<br>(३) उदा., सरळरेषेवर चालणे, सरळरेषेवर वस्तू घेऊन चालणे, कोनचा वापर करून नागमोडी चालणे, वक्ररेषेवर चालणे (सदर कृती हातात एखादी वस्तू घेऊन करणे.) | चुना, कोन, दोरी, विविध वस्तू.<br>चुना, कोन, विविध वस्तू | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| **C - 3.4.2.1 - B** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | कारक हालचाली | तोल सांभाळून चालणे. | • ६ इंच रुंदीच्या फळीवरून तोल सांभाळून चालतो. | (१) शिक्षक बालकांना ६ इंच रुंदी असलेल्या फळीवरून तोल सांभाळून चालण्याचे प्रात्यक्षिक दाखवतील.<br>(२) बालके प्रत्यक्ष कृती करतील. | ६ इंच रुंद असलेली फळी | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**क्षमता : C - 3.4.2.1 - C** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | शारीरिक हालचाली | स्नायूंची ताकद व दमदारपणा | • एका वेळी एकाच पायाचा वापर करून जिन्यावरून सहजतेने चढ–उतार करतो. | (१) शिक्षकांनी बालकांना जिन्यावरून/लाकडी ठोकळा/विटा/स्टेजच्या पायऱ्या यांवरून एका पायाने चढ–उतार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवणे.<br>(२) शिक्षकांनी सांगितलेल्या सूचनेप्रमाणे कृती करतात. | विटा, ठोकळा, दृक्‌श्राव्य साधने | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती मूल्यमापन |
| **C - 3.4.2.1 - D** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | विविध हालचाली | जागा बदलत करायच्या हालचाली : रांगणे | • बोगद्यामध्ये अरुंद जागी रांगू शकतो. | (१) शिक्षक बालकांना अरुंद जागी रांगण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवतील.<br>(२) बालके शिक्षकांच्या सूचनेप्रमाणे प्रत्यक्ष कृती करतात.<br>(३) उदा., टायर, रिकामा ड्रम, नेट (जाळी) यांमधून जाणे.<br>(४) हातपाय टेकवून, ओणवे होऊन बालकाच्या खालून रांगत जाणे. | टायर, ड्रम, नेट इ. | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, गटकार्य |
| **क्षमता : C - 3.4.2.2** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवितो. | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | विविध हालचाली | जागा बदलत करायच्या हालचाली | • दोन्ही पायांवर प्राणी, पक्षी उड्या मारतात त्याप्रमाणे एखाद्या कमी उंचीच्या वस्तूवरून | (१) शिक्षक बालकांना दोन्ही पायांनी उडी मारण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवतात.<br>(२) शिक्षक बालकांना कमी उंचीच्या वस्तूवरून आधाराने किंवा आधार न घेता उडी मारण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवतात.<br>(३) उदा., कमी उंचीच्या ठोकळ्यावरून उडी मारणे, टायर वरून, स्टुलावरून, खुर्चीवरून उडी मारणे. | लाकडी ठोकळा, स्टूल, खुर्ची, टायर | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, गटकार्य, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एखाद्याचे साहाय्याने किंवा साहाय्य न घेता उडी मारतात. | (४) बालके शिक्षकांच्या सूचनेप्रमाणे प्रत्यक्ष कृती करतात.<br>(५) विविध प्राणी पक्ष्यांप्रमाणे उड्या मारणे. उदा. ससा, बेडूक. | | |
| **C - 3.4.2.3** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | शारीरिक सुदृढता | स्नायूंची ताकद | • शक्तीने एखादे काम करण्याची तयारी दर्शवतो. (जसे : वर्गातील छोट्या फर्निचरची हलवाहलवी करण्यास मदत करतो.) | (१) बालके शिक्षकांना वर्गातील कमी वजनाचे फर्निचर हलवण्यात मदत करतात.<br>(२) उदा., टायर ढकलणे, माती भरलेले छोटे ड्रम ढकलणे, पाण्याची बादली उचलून नेणे, फुलझाडांची कुंडी आदी. | वर्गातील सामान, बेंच, टायर, माती, ड्रम, बादली, पाणी, कुंडी आदी. | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |
| **क्षमता : C - 3.4.3.1 A** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो. | | | | | | |
| बालवाटिका ३ | कारक – कौशल्य | समन्वय | • शारीरिक हालचालींचा सहजतेने समन्वय साधत, चालतो, धावतो. | (१) उड्या मारत चालणे किंवा धावण्याचे प्रात्यक्षिक घेणे. उदा. सशाची उडी, पोते उडी, तीन पायांची शर्यत, बेडूकउडी, उंचउडी, पोहोच उडी, कांदाफोडी इत्यादी<br>(२) वस्तू घेऊन चालणे किंवा धावणे. उदा.<br>(१) डोक्यावर वही/पुस्तक अशी परिसरातील कोणतीही उपलब्ध वस्तू घेऊन चालणे.<br>(२) चमचा लिंबू<br>(३) चेंडू शर्यत/बटाटा शर्यत<br>(४) रिंग शर्यत | पोते, लिंबू चमचा, वही, पुस्तक, चेंडू (लहान, मोठे) बटाटा, रिंग<br>चेंडू (लहान/मोठे) | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका<br>३ | | | | (३) बालकांकडून खालील प्रकारची प्रात्यक्षिके/ कृती घेणे.<br>वाकणे, वळणे, उड्या मारणे, गिरकी घेणे, रोल करणे, लाथाडणे, फटकावणे.<br>(४) A, B, C ड्रिल्सच्या विविध प्रकारांचे प्रात्यक्षिक घेणे.<br>(५) वेगवेगळ्या साधनांवर तोल सांभाळणे.<br>उदा. बेंच, टेबल<br>(६) विविध इशाऱ्यांनुसार हालचाली करणे.<br>(७) विविध प्रकारे चेंडू हाताळणे.<br>उदा. फेकणे, झेलणे, लाथाडणे, फटकारणे.<br>(८) रिंग अथवा टायरमधून जाणे. | बेंच, टेबल<br>शिट्टी<br>चेंडू | |
| **क्षमता : C-3.4.3.1 - B** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो. | | | | | | |
| बालवाटिका<br>३ | शारीरिक सुदृढता | स्नायूंचा दमदारपणा | • हात डोक्यावर ताणून धरून, १० मीटरपर्यंत चवड्यावर चालतो. (ताडासन) | (१) चवड्यावर १० मीटरपर्यंत चालणे. कौशल्य प्राप्तीनंतर त्यावर आधारित स्पर्धा घेणे.<br>(२) हाताच्या वेगवेगळ्या स्थिती करून, चवड्यावर चालणे. उदा. हात वर करून/हात बाजूला करून/हात समोर करून/हात कमरेवर ठेवून चवड्यावर चालणे.<br>(३) हात डोक्यावर ताणून धरून १० मीटरपर्यंत चालणे.<br>(४) परिसरातील वस्तू घेऊन, चवड्यावर चालणे.<br>उदा. चेंडू, वही, बाटली, ताट इ.<br>शिक्षकांनी अगोदर स्वतः ताडासनाचे प्रात्यक्षिक करणे व त्यानंतर विद्यार्थ्यांकडून ताडासनाचे प्रात्यक्षिक करून घेणे. | शिट्टी, चेंडू, वही, बाटली, ताट इ. | • प्रात्यक्षिक, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

**C - 3.4.3.2**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ | शारीरिक सुदृढता | स्नायूंचा दमदारपणा | • साधारण उंचीवरून सहजतेने उडी मारतो. (दुसऱ्या किंवा तिसऱ्या पायरीवरून किंवा तीन फूटांच्या बाकावरून) | (१) साधारण उंचीवरून सहजतेने उडी मारणे.<br>(२) उडी मारल्यानंतर हवेत उडी असताना टाळ्या वाजवणे.<br>(३) जोडीदाराच्या समोर उभे राहणे, दोघांनी उडी मारून हवेत एकमेकांना टाळी देणे.<br>(४) कांगारूउडी, ससाउडी, बेडूकउडी, माकडउडी इत्यादी प्रकारच्या उड्यांचे प्रात्यक्षिक करून घेणे.<br>(५) वरच्या पायरीवरून खालच्या पायरीवर उडी मारणे. कौशल्य प्राप्तीनंतर पायऱ्यांची संख्या वाढविणे व दुसऱ्या किंवा तिसऱ्या पायरीवर उडी मारणे.<br>(६) खालून वरच्या पायरीवर उडी मारणे.<br>(७) पारंपरिक खेळाद्वारे प्रात्यक्षिक घेणे. उदा. कांदाफोडी, लंगडी इत्यादी.<br>(८) दोन फूटांच्या बाकावरून उडी मारणे. | शिट्टी, बाक टेबल, स्टुल, कोन | • प्रात्यक्षिक़, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

**C - 3.4.3.3**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ | शारीरिक सुदृढता | स्नायूंची ताकद | • खेळामध्ये ताकदीची आवश्यकता असलेल्या कृती सहजतेने करतो. (जसे : रस्सीखेच खेळतो) | (१) दोघांमध्ये एक दोरी घेऊन रस्सीखेच सारखे ओढण्याचा प्रयत्न करणे.<br>(२) एखादी वस्तू हाताने तसेच पायाने ढकलणे.<br>(३) जोडीदाराच्या पाठीला पाठ लावून खाली बसणे आणि एकमेकांना ढकलणे. | दोरी, चेंडू, फुटबॉल, बेंच इ. | • प्रात्यक्षिक़, निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

**क्षमता : C - 3.4.4.1 - A**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली | शारीरिक सुदृढता | हृदयाचा दमदारपणा | • विविध भूभागांवर सहजतेने किलोमीटर किंवा त्याहून जास्त चालतो. | शिक्षकांनी बालकांकडून खालीलप्रमाणे कृती करून घेणे.<br>(१) सपाट जागेवर चालणे.<br>(२) चिखलात चालणे.<br>(३) पायऱ्या चढणे, उतरणे.<br>(४) वाळूवर चालणे.<br>(५) पाण्यामधून चालणे, हळूहळू धावणे – चालणे.<br>(६) जंगलजीम<br>(७) मैदानात खड्ड्यात पाणी, टायर, विटा, चिखल, उंच अडथळे निर्माण करून अडथळीचे खेळ घेणे. लाकूड, डेस्क, बेंच, खुर्ची.<br>(८) गवतावरून, वाळलेल्या पानांवरून चालणे. | पाणी, टायर, वाळू, विटा | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**क्षमता : C - 3.4.4.1 - B**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली | शारीरिक सुदृढता | स्नायूंचा दमदारपणा, जागा बदलणाऱ्या हालचाली | • एक मिनिटापर्यंत ताडासनासारखी कृती करतो. | (१) शिक्षकांनी बालकांना ताडासन कशा प्रकारे करावे याचे प्रात्यक्षिक दाखवणे.<br>(२) बालके सूचनेप्रमाणे सांगितलेल्या वेळेपर्यंत ताडासनात स्थिर उभे राहण्याची कृती करतील.<br>(३) चवड्यावर/टाचेवर तोल सांभाळत उभे राहणे.<br>(४) वेगवेगळ्या पद्धतीने धावणे.<br>(५) जागा बदलत विविध हालचाली करणे. जसे – कोलांटीउडी, चक्रीउडी प्राणीचाली (खेकडा, उंटचाल) | स्टॉपवॉच, योगा चटई/mat | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **क्षमता : C - 3.4.4.2** | | | | | | |
| इ. १ ली | विविध हालचाली | जागा बदलत करावयाच्या हालचाली | • सहजतेने चढतो किंवा उतरतो. (छोट्या झाडावरून) | शिक्षकांनी बालकांसह खालील कृती करणे.<br>(१) पायऱ्यांवरून चढणे–उतरणे.<br>(२) छोट्या झाडावरून चढणे–उतरणे.<br>(३) शिडीवर चढणे–उतरणे.<br>(४) दोरीवर चढणे–उतरणे.<br>(५) पायरीवरून उडी मारणे.<br>(६) बाकावर चढणे–उतरणे. | शिडी, दोरी इत्यादी | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| **क्षमता : C - 3.4.4.3** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो. | | | | | | |
| इ. १ ली | शारीरिक सुदृढता<br><br>व्यायाम<br><br>विविध खेळ | स्नायूंची ताकद व दमदारपणा<br><br>पोषक व्यायम, भारतीय व्यायाम, लघु खेळ, सांघिक खेळ, शर्यती पूरक खेळ | • कामांमध्ये आणि खेळांमध्ये ताकद, सहनशक्ती आणि चिकाटी दाखवतो. (बागेमधल्या छोट्या कुंड्या उचलतो, पाण्याची बादली उचलतो, १५ मिनिटे धावतो.) | शिक्षक बालकांसह खालील कृती करतील.<br>(१) मातीने भरलेली छोटी बादली उचलणे.<br>(२) बागेमधल्या छोट्या कुंड्या उचलणे.<br>(३) पाण्याची बादली उचलणे व १० फुट नेणे.<br>(४) १५ मिनिटे धावणे.<br>(५) रस्सीखेच<br>(६) मल्लखांब, रोप मल्लखांब<br>(७) मानवी मनोरे रचणे.<br>(८) पोषक व्यायाम<br>(९) ताकदीचे लघु खेळ खेळतो. | रोप, मल्लखांब, कुंड्या, बादली, रस्सी | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

| क्षमता : **C - 3.4.5.1** विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवितो/दाखवितो. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **स्तर/इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** | **मूल्यमापन निर्देश** |
| इ. २ री | शारीरिक सुदृढता<br><br>सुदृढता चाचणी | हृदयाचा दमदारपणा | विविध भूभागांवर लांब अंतरापर्यंत (२ ते ३ किमी चालण्याची क्षमता आणि चिकाटी दाखवतो. | (१) प्रभात फेरी (सकाळचे चालणे.)<br>(२) पायऱ्या चढ-उतार<br>(३) बागेत फिरायला जाणे<br>(४) बाजारहाट करणे.<br>(५) चालणे/धावणे. | | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |
| क्षमता : **C - 3.4.5.2** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो. | | | | | | |
| इ. २ री | विविध हालचाली<br><br>विविध खेळ<br><br>व्यायाम | जागा बदलत सहकाऱ्यांसह सहसाहित्य<br><br>पारंपरिक खेळ, मुक्त खेळ, साहसी व्यायाम, गतिरोध --- | • विविध वस्तूंच्या बाजूने, तसेच वस्तूंवरून धावाधाव करू शकतो व वस्तूंवरून उड्या मारू शकतो. | (१)अडथळा शर्यत<br>(२) वाळूतून धावणे.<br>(३) दगडावरून चालणे.<br>(४) गवतावरून चालणे व पळणे.<br>(५) रस्त्यावरून चालणे.<br>(६) जंगलजिमवर पकडा-पकडी खेळणे.<br>(७) वाळलेल्या पानांवरून, चिखलातून पळणे.<br>(८) पाण्यातून पळणे.<br>(९) उड्या मारतो (टेबल, खुर्ची, ओटा, भिंत) काठी, विटा.<br>(१०) दोरीच्या उड्या.<br>(११) बेंचवरून, विटांवरून, कोनावरून उड्या मारणे. | जंगलजीम, टायर, कोन, नेट दोरी, टेबल, खुर्ची, काठी, भिंत, ओटा | • निरीक्षण, प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन<br>• निरीक्षण मूल्यमापन |

**क्षमता : C - 3.4.5.3** एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना, ताकद व चिकाटी दाखवितो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २ री | शारीरिक सुदृढता | हृदयाचा दमदारपणा | कामांमध्ये आणि खेळांमध्ये ताकद, सहनशक्ती आणि चिकाटी दाखवतो. (बागेमधील छोट्या कुंड्या उचलतो, पाण्याची बादली उचलतो, १५ मिनिटे धावतो.) | (१) बागेमधल्या कुंड्या, मातीचे घमेले उचलणे.<br>(२) ABC ब्रिक्स<br>(३) रस्सी खेच<br>(४) दोरीचा मल्लखांब, ॲरोबिक्स<br>(५) सूर्यनमस्कार<br>(६) मानवी मनोरा<br>(७) लोटणे–ओढणे<br>(८) भारतीय व्यायाम प्रकार<br>(९) १५ मिनिटे धावणे.<br>(१०) Cartwheel करणे. जिम्नॅस्टिक | बागेतल्या कुंड्या, माती, घमेले, दोरी, मल्लखांब, ठोसे मारण्याची पिशवी, (Punching bag) डंबेल्स, रस्सी, ॲरोबिक्स संगीत. | • प्रात्यक्षिक, कृती, मूल्यमापन |

**ध्येय : CG - 4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**क्षमता : - C 4.1.1.1** कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने, स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | जीवन कौशल्य | स्व–ओळख | • स्वतःची व्यक्ती (unique) म्हणून ओळख दर्शवतो आणि आवड सांगतो. (उदा. आवडता शर्ट, बॅग, वस्तू) | (१) शिक्षकांनी बालकांना त्यांचे नाव व आवडता रंग, पक्षी, खेळ यांविषयी विचारणे.<br>(२) शिक्षकांनी विचारल्याप्रमाणे बालके स्वतःचे नाव व इतर माहितीसांगतील.<br>(३) बालके स्वतःच्या शरीराच्या अवयवांची नावे सांगतील. | – | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन, तोंडीकाम |

**ध्येय : CG - 4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**क्षमता : C - 4.4.1.1** इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | नीतिमूल्य, चांगल्या सवयी, खेळ | सहभागिता, सहकार्य, सामूहिक खेळ | • इतर मुलांबरोबर खेळायला सुरुवात करतो. | (१) सांगितलेल्या खेळात आनंदाने सहभागी होतो.<br>(२) सामूहिक खेळात उत्साहाने सहभाग घेतो.<br>(३) गटात खेळताना सहखेळाडूंबरोबर सहकार्याची भावना ठेवतो.<br>(४) गटात धावणे, हत्ती-घोडा-पालखी आदी वेगवेगळ्या खेळांत सहभागी करून घेतात. | – | • निरीक्षण, मूल्यमापन |
| **क्षमता : C - 4.4.2.1** इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो. | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | नीतिमूल्ये | सहभागिता | • इतर मुलांबरोबर खेळताना आनंद घेतो. | (१) शिक्षक बालकांना मुक्त खेळण्याची संधी देतील.<br>(२) बालकांचे निरीक्षण करतील.<br>(३) बालक खेळताना आनंद घेतो आहे की नाही, हे पाहतील.<br>(४) उदा. चेंडू, रिंग पास करणे. | चेंडू, रिंग इत्यादी | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |
| **C - 4.4.3.1** इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो. | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | नीतिमूल्ये, खेळ | नेतृत्व, आत्मविश्वास, पर्यायी साहित्य, मुख्य खेळ | • इतर मुलांसोबत खेळायला सुरुवात करतो आणि खेळासंबंधी योजना आखतो. (उदा. काय खेळू, कसे खेळू, कधी खेळू) | (१) गटात सामूहिक खेळ खेळण्यास सांगितल्यावर खेळ ठरवतात.<br>(२) पर्यायी खेळ साहित्य वापरून, खेळ खेळण्याची योजना बनवतात.<br>(३) नवीन खेळ तयार करून, उपलब्ध साहित्याचा योग्य वापर करून, खेळाची योजना तयार करतात.<br>(४) खेळताना कोणी काय काय करायचे, हे ठरवतात व तसे खेळतात. | – | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **क्षमता : C - 4.4.4.1 - A** इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो. | | | | | | |
| बालवाटिका १ (६ ते ७ वर्षे) | नीतिमूल्ये | समंजसपणा, खिलाडूवृत्ती | • खेळादरम्यान इतरांच्या कल्पना स्वेच्छेने स्वीकारण्याची इच्छा दर्शवतो. | (१) गटाचा नेता सांगेल तसे खेळ खेळतात.<br>(२) सर्वांच्या विचाराने खेळाचे नियम ठरवतात.<br>(३) दिलेले काम योग्य रीतीने करतात. (जसे – गोलकीपर)<br>(४) बाद झाल्यास समंजसपणे मान्य करतात. | – | • निरीक्षण |
| **C - 4.4.4.1 - B** | | | | | | |
| १ ली (६ ते ७ वर्षे) | चांगल्या सवयी | नियम पालन | • इतरांसोबत खेळताना खेळाचे नियम पाळतो. | (१) सांगितलेल्या नियमांनुसार खेळ खेळतात.<br>(२) ठरवलेले खेळाच्या नियमांचे पालन करून, इतरांबरोबर खेळ खेळतात. | – | • निरीक्षण, पडताळा सूची |
| **C - 4.4.5.1** | | | | | | |
| १ ली (६ ते ७ वर्षे) | नीतिमूल्ये<br>जीवन कौशल्ये | नेतृत्व<br>चिकित्सक विचार | • इतरांसोबत खेळताना खेळाचे नियम तयार करतो आणि त्याचे पालन करतो. | (१) खेळाचे विशेष नियम तयार करण्यात पुढाकार घेतो.<br>(२) ठरवलेल्या नियमांचे पालन करतो.<br>(३) प्रसंगानुसार नियमांमधील बदल ठरवतो.<br>(४) आवश्यकतेनुसार खेळाची पद्धती बदलण्याचे ठरवतो. | – | • निरीक्षण, पदनिश्चयन श्रेणी |
| **ध्येय : CG - 4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>**क्षमता : C - 4.5.5.1 - A** शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो. | | | | | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | नीतिमूल्ये | धाडस | • एकत्र खेळताना किंवा काम करताना स्वतःचे मत मांडतो. | (१) गटात खेळताना आपले मत मांडतो.<br>(२) खेळण्याची पद्धती – नवीन रचना सांगतो.<br>(३) स्वतःला वाटत असलेली बाब सर्वांच्या समोर मांडतो. | – | • निरीक्षण |

| C - 4.5.5.1 - B शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **स्तर/इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** | **मूल्यमापन निर्देश** |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | नीतिमूल्ये<br>जीवन कौशल्ये | जिद्द–चिकाटी<br>सातत्य | • काम स्वीकारतो आणि ते पूर्ण करतो. | (१) दिलेले काम बालके स्वतःहून वाटून घेतात. (स्वच्छता)<br>(२) काम पूर्ण होईपर्यंत कामात सातत्य ठेवतात. (सामानाची आवरा–आवर)<br>(३) काम करण्यात जिद्द व चिकाटी दाखवतात. (मिशन परिसर स्वच्छता)<br>(४) एकदा ठरवलेले काम नियमितपणे, ठरावीक अंतराने पुन्हा पुन्हा करत राहतो. (वर्ग व मैदान स्वच्छता.) | – | • निरीक्षण |
| **क्षमता : C - 4.5.2.2 - A** शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो. | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | नीतिमूल्ये | शिस्त | • आपली वेळ येण्याची वाट बघतो. | (१) शिक्षक बालकांना रांगेत उभे राहून, क्रमवारीत कृती करण्यास सांगतात. (उदा. वजन व उंची घेणे.)<br>(२) बालके रांगेत उभे राहून, आपला क्रमांक येईपर्यंत वाट पाहतात व आपला क्रमांक आल्यावर कृती करतात. | वजन काटा व उंची, मापनाचे साधन | • निरीक्षण |
| **C - 4.5.2.2 - B** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | चांगल्या सवयी | मोठ्यांचे ऐकणे. | • साध्या लहान सूचनांचे पालन करतो. | (१) शिक्षक बालकांना मनोरंजक खेळ खेळताना काही लहान लहान सूचना करतात. (उदा. उभे राहणे, खाली बसणे, उडी मारणे, पुढे उडी मारणे, मागे उडी मारणे, डोक्यावर हात ठेवणे, सूचना पालनाचे खेळ इत्यादी)<br>(२) विद्यार्थी दिलेल्या सूचनांचे पालन करून खेळ खेळतात. | | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

**ध्येय : C G - 4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

**क्षमता : C - 4.7, C - 4.7.1.1** इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरज लक्षात घेऊन त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | नीतिमूल्ये | सहभागिता<br>सहकार्य | • बालक सर्व मुलांशी त्यांच्या पार्श्वभूमी व क्षमतांबद्दल विचार न करता खेळतो व संवाद साधतो. | (१) शिक्षक बालकांना गट बनवण्यास सांगतात.<br>(२) बालक शिक्षकांच्या सूचनेप्रमाणे जोडी बनवताना, त्याची पार्श्वभूमी व क्षमतांचा विचार न करता खेळतो व संवाद साधतो.<br>(३) गटांत जोडीने खेळताना सहकार्य करणेबाबत समजून कृती करायला सांगतात. | • क्रीडा साहित्य | • निरीक्षण, कृती व मूल्यमापन |

**ध्येय : C G - 7** बालके निरिक्षण व तार्किक विचाराने, सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.

**क्षमता : C - 7.1.1.1** वेगवेगळ्या वर्गांतील, गटांतील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध याचे निरीक्षण करतो व समजून घेतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | मुख्य खेळ | खेळ, खेळाडू, खेळांचे साहित्य | • वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो.<br>वस्तू – क्रीडा साहित्य<br>व्यक्ती – खेळाडू<br>चित्रे – खेळाडू<br>मैदान, खेळ, क्रीडा साहित्य, व्यायाम साहित्य,<br>घटना – स्पर्धा, सामने, मूलभूत कौशल्ये. | (१) शिक्षक बालकांना विविध खेळांची माहिती देतात. उदा. मैदानी खेळ<br>(२) शिक्षक बालकांना विविध खेळांतील खेळाडू व विविध साहित्यांची चित्रासहित माहिती देतात.<br>उदा. कुस्ती – पै. खाशाबा जाधव<br>हॉकी – मे. ध्यानचंद<br>क्रिकेट – सचिन तेंडुलकर<br>खेळ साहित्य<br>उदा. क्रिकेट – बॅट, स्टम्प, फुटबॉल, व्हॉलिबॉल<br>(३) बालक विविध खेळ, खेळाडू आणि खेळाचे साहित्य ओळखून शिक्षकांना सांगतो.<br>उदा. बॅट – क्रिकेट<br>रिंग – टेनिक्वाईट<br>फूल – बॅडमिंटन | विविध खेळाडूंचे तक्ते/आकृती, पोस्टर, विविध खेळांचे साहित्य उपलब्ध असेल तर दाखवणे. तक्ते/आकृती | • तोंडी, प्रात्याक्षिक |

**ध्येय : C - 7.1.1.3** – वेगवेगळ्या गटांतील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | खेळ | पर्यायी क्रीडा साहित्य | • पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळतो. (उदा. टेलिफोन म्हणून इतर वस्तू वापरतो.) | (१) पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळतो. जसे :<br>१) घोडा घोडा खेळताना काठी वापरतो.<br>२) चेंडू–फळी (बॅट) खेळताना कागदी चेंडू, रुमालाचा चेंडू वापरतो, बॅट म्हणून फळीचा वापर करतो. | खेळण्यासाठी आवश्यक वस्तू | • निरीक्षण पडताळा सूची |
| **C - 7.1.2.1** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मुख्य खेळ | खेळ, खेळाडू, खेळाचे साहित्य | • वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. नावासहित ओळखून, स्वतः त्याचे वर्णन करतो.<br>वस्तू – क्रीडा साहित्य<br>व्यक्ती – खेळाडू<br>चित्रे – खेळाडू<br>मैदान, खेळ, क्रीडा साहित्य, व्यायाम साहित्य,<br>घटना – स्पर्धा, सामने, मूलभूत कौशल्ये. | (१) शिक्षकांनी बालकांना विविध खेळ, खेळाडू, खेळातील साहित्य (क्रीडासाहित्य) आणि खेळातील घटना यांबद्दलची माहिती देणे.<br>(२) शिक्षक बालकांना विविध खेळ, खेळाडू, क्रीडा साहित्य आणि खेळातील घटना इत्यादींबद्दल ओळख करून देतात.<br>(३) बालके विविध खेळ, खेळाडू, क्रीडा साहित्य आणि खेळातील घटना इत्यादींचे वर्णन करतात.<br>(४) दोरीवर उड्या मारण्यासाठी काम करतो.<br>(५) एका हाताने जोर लावून चितपट्टी खेळ घेणे. | विविध खेळांचे चित्रे, तक्ते, आकृती, विविध खेळांतील खेळाडूंची चित्रे, विविध क्रीडा साहित्य, विविध खेळांतील घटनांचे तक्ते, चित्रे, उदाहरणे | • तोंडी, प्रात्यक्षिक |

| C - 7.1.2.3 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **स्तर/इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** | **मूल्यमापन निर्देश** |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | खेळ | पर्यायी क्रीडा साहित्य | • पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळतो. (उदा. टेलिफोन म्हणून इतर वस्तू वापरतो.) | पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळतो. जसे :<br>(१) चेंडूऐवजी रिकाम्या बाटलीचा वापर.<br>(२) रिकामा डबा वापरून फुटबॉल खेळणे.<br>(३) कापडाचा चेंडू वापरणे. | खेळण्यासाठी आवश्यक वस्तू | • निरीक्षण पडताळा सूची |
| **C - 7. 1.3.1** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | मुख्य खेळ | खेळ, खेळाडू, क्रीडासाहित्य | • लगतच्या परिसरातील वस्तू – क्रीडा साहित्य व्यक्ती – खेळाडू चित्रे – खेळाडू मैदान, खेळ, क्रीडा साहित्य, व्यायाम साहित्य, घटना – स्पर्धा, सामने, मूलभूत कौशल्ये. | (१) शिक्षक बालकांना सभोवताली असलेल्या पारंपरिक व मुख्य खेळ यांची माहिती आणि जाणीव करून देतात.<br>(२) बालक सभोवतालच्या खेळाच्या परिस्थितीची माहिती देतात.<br>(३) खेळातल्या विविध खेळांच्या आकृती काढून घेतात.<br>(४) बालके विविध खेळांच्या प्रतिकृतींची वैशिष्ट्ये सांगतात.<br>(५) बॅट, बॉल, फुटबॉल, रिंग इ. आकृती काढणे.<br>(६) खेळाडू व खेळ यांच्या जोड्या लावतात.<br>१) क्रिकेट – सचिन तेंडुलकर<br>२) कुस्ती – पै. खाशाबा जाधव<br>३) बॅडमिंटन – सायना नेहवाल | विविध खेळ, खेळाचे प्रकार, खेळाडू व साहित्य यांचे चित्र, तक्ते प्रात्यक्षिक | • तोंडी कृती उपक्रम |

**C - 7. 1. 3. 3**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | खेळ | पर्यायी क्रीडा साहित्य | • पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळतो. (उदा. टेलिफोन म्हणून इतर वस्तू वापरतो.) | पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळणे<br>(१) काठी वापरून हॉकी खेळणे.<br>(२) दोरी वापरून रिंग करणे.<br>(३) काठ्या वापरून स्टम्प तयार करणे.<br>(४) कापडाचा चेंडू वापरणे. | खेळण्यासाठी आवश्यक वस्तू | • निरीक्षण पडताळा सूची |
| **क्षमता : C - 7.1.3.4** वेगवेगळ्या वर्गातील/गटांतील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो. | | | | | | |
| इ. १ ली | खेळ | पर्यायी क्रीडा साहित्य | • पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळतो. (उदा. टेलिफोन म्हणून इतर वस्तू वापरतो.) | पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळणे<br>(१) चेंडू खेळताना चेंडूऐवजी कागद, प्लॅस्टिक.<br>(२) दोरी किंवा सुतळीचा वापर करून, रिंग तयार करणे.<br>(३) कागद, कापड, कापूस यांचा चेंडू तयार करणे. | खेळण्यासाठी आवश्यक वस्तू | • निरीक्षण पडताळा सूची |
| **क्षमता : C - 7.1.3.5** वेगवेगळ्या वर्गातील/गटांतील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो. | | | | | | |
| इ. २ री (७ ते ८ वर्षे) | खेळ | पर्यायी क्रीडा साहित्य | • पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळतो. (उदा. टेलिफोन म्हणून इतर वस्तू वापरतो.) | (१) पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळणे. जसे :<br>(१) क्रिकेट खेळताना फळीची बॅट, कागदी चेंडू, काठीचे स्टम्प<br>(२) फूटबॉल खेळताना चेंडू म्हणून रिकाम्या डब्याचा वापर. | फळी, काडी, कागदी डबे, पर्यायी साहित्य | • निरीक्षण |

**ध्येय : C - 7.1.4.1**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली | मुख्य खेळ | खेळ, खेळाडू, क्रीडा साहित्य | • वस्तू : क्रीडा साहित्य व्यक्ती : खेळाडू, चित्रे : खेळाडू, मैदान, खेळ क्रीडा साहित्य व्यायाम साहित्य. घटना-स्पर्धा, सामने, (मूलभूत कौशल्ये) | (१) सभोवतालच्या परिसरातील खेळ/खेळाडू/क्रीडा साहित्य यांची जाणीव करून देणे.<br>(२) कुस्तीच्या मैदानामधील लाल मातीचे वर्णन करणे.<br>(३) शाळेच्या मैदानामध्ये कबड्डी, खो-खो खेळाचे मैदान दाखविणे.<br>(५) लगोरीमध्ये नियम सांगतात.<br>(६) मैदान व क्रीडा साहित्य ओळखतात.<br>(७) मैदानी खेळ, खेळाडू व क्रीडा साहित्य यांच्या जोड्या जुळवतात. | विविध खेळ, खेळाडू, क्रीडा साहित्य यांच्या आकृत्या, तक्ते प्रात्यक्षिक साहित्य | • तोंडी प्रात्यक्षिक, कृती |
| **C -7.1.5.1** | | | | | | |
| इ. २ री | मुख्य खेळ | खेळ, खेळाडू, क्रीडा साहित्य | • लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती/चित्रे ओळखतो. वस्तू : क्रीडा साहित्य, व्यक्ती : खेळाडू चित्रे : मैदान, खेळ, क्रीडा साहित्य, व्यायाम साहित्य. | १) शिक्षक बालकांना सभोवतालच्या परिसरातील खेळ आणि वैशिष्ट्यांवरील साहित्य सांगतात.<br>२) बालक सभोवतालच्या परिसरातील असलेल्या खेळ आणि बारीकसारिक वैशिष्ट्ये सांगणे.<br>३) खेळ व क्रीडा साहित्यांची माहिती देतात.<br>४) खेळ व क्रीडा साहत्यांची माहिती देतात.<br>५) वेगवेगळे चेंडू व त्यांची खेळण्याची कौशल्ये शिकवणे. | विविध क्रीडा साहित्य विविध खेळ व खेळाडूंच्या प्रतिमा/चित्रे/तक्ते. | • तोंडी, प्रात्यक्षिक, कृती |

**ध्येय :** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.

**क्षमता : C - 7.2** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारण भाव समजून घेऊन, तो दर्शवणाऱ्या साध्या परिकल्पना मांडतो व त्यांच्या स्पष्टीकरणाकरता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेतो.

**C 7.2.1.4**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (६ ते ७ वर्षे) | जीवन कौशल्य | निर्णय क्षमता | • आवडी–निवडीनुसार प्राधान्यक्रम ठरवतो. | (१) आवडीप्रमाणे किंवा आवडीच्या खेळांमध्ये प्राधान्यक्रम ठरवून खेळणे.<br>(२) खेळताना साहित्याची प्राधान्यता ठरवणे. उदा. खेळ निवडणे, साहित्य निवडणे खेळाची जागा निवडणे. | खेळण्यासाठी योग्य साहित्य | • निरीक्षण, पडताळा सूची |
| **C. 7. 2. 2. 3** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | आरोग्य | ऋतू | • उन्हाळा आणि हिवाळा ओळखतो. | (१) शिक्षकांनी बालकांना ऋतुमानाप्रमाणे आहार, कपडे व शरीराची निगा यांविषयी माहिती देणे. जसे : हिवाळा : कानटोपी, स्वेटर, गरम कपडे. उन्हाळा : सुती कपडे, टोपी, स्कार्फने कान व चेहरा झाकणे.<br>(२) आहार– (१) उन्हाळा भरपूर पाणी पिणे, ताक सरबत व थंड प्रकृतीचे पदार्थ (२) हिवाळा– उष्ण प्रकृतीचे पदार्थ, स्निग्ध पदार्थ. | चित्रे, तक्ता, दृकश्राव्य साधने | • तोंडीकाम, गटकार्य |
| **C. 7. 2. 2. 4** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | जीवन कौशल्य | निर्णय क्षमता | • स्वतःचे प्राधान्यक्रम, आवड व्यक्त करतो आणि निवड करतो. | (१) स्वतःच्या आवडीनुसार खेळ ठरवणे.<br>(२) खेळाच्या साहित्याचा प्राधान्यक्रम ठरवणे.<br>(३) उदा. खेळ निवडणे, खेळण्यासाठी साहित्य – चेंडू, रिंग इत्यादी. | खेळण्यासाठी योग्य साहित्य | • निरीक्षण, पडताळा सूची |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| **C - 7. 2. 3. 3** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | आरोग्य | ऋतू | • उन्हाळा आणि हिवाळा ऋतुनुसार कपडे आणि अन्नपदार्थ ओळखतो. | (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बदलत्या ऋतुमानानुसार आहार, कपडे व शरीराची निगा यांविषयी माहिती देणे.<br>(२) जसे : हिवाळ्यात गरम कपडे, स्निग्ध पदार्थांचे सेवन करणे, तेलाने शरीराला मालीश करणे.<br>(३) उन्हाळ्यात सुती कपडे, टोपी, गॉगल, स्कार्फ, (चेहरा झाकण्यासाठी), भरपूर प्रमाणात पाण्याचा वापर, ताक, सरबत, थंड प्रकृतीचे पदार्थ. | चित्रे, तक्ते, दृक्‌श्राव्य साधने | • तोंडीकाम, गटकार्य |
| **C - 7. 2. 3. 4** | | | | | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | जीवन कौशल्य | निर्णय क्षमता | • स्वतःची आवड आणि प्राधान्यक्रम विचारात घेऊन जबाबदारीने निवड करतो. | (१) खेळण्याची जागा पाहून जबाबदारीने खेळ निवडणे.<br>(२) खेळ निवडून जबाबदारीने साहित्य निवडणे.<br>(३) खेळ निवडून जबाबदारीने संघ/जोडीदार निवडणे. उदा. रिले स्पर्धा इ. | खेळण्यासाठी योग्य साहित्य | • निरीक्षण व पडताळा सूची |
| **C - 7.2.4.3** | | | | | | |
| १ ली (६ ते ७ वर्षे) | आरोग्य | ऋतू | • उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, ऋतू यांतील फरक ओळखतो. | (१) शिक्षक बालकांना बदलणाऱ्या ऋतूंविषयी माहिती देतात.<br>(२) बालके वर्षभरात बदलत जाणाऱ्या उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या ऋतूंमध्ये फरक ओळखतात. | चित्रे, तक्ते दृक्‌श्राव्य साधने | • तोंडीकाम, गटकार्य |
| **क्षमता : C - 7.2.4.4** | | | | | | |
| १ ली (६ ते ७ वर्षे) | जीवन कौशल्य | निर्णय क्षमता | • खेळ/कृती-मध्ये सहभागी होतो. | (१) स्वतःचा आवडीचा खेळ निवडून आपला संघ/जोडीदार निवडून खेळणे.<br>(२) खेळासाठी योग्य क्रीडासाहित्य समजावणे. | खेळण्यासाठी योग्य साहित्य | • निरीक्षण व पडताळा सूची |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्वत:च्या आवडी-निवडी व प्राधान्यावर आधारित मित्र बनवतो. | उदा. लंगडी, रिले, ड्रम लोटणे इत्यादी.<br>(३) आपल्या आवडीने व्यायाम प्रकार आपल्या सहकाऱ्यांसह करण्यास सांगतात. | | |
| **क्षमता : C 7.2.5.4** निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारण भाव समजून घेऊन, तो दर्शवणाऱ्या साध्या परिकल्पना मांडतो व त्यांच्या स्पष्टीकरणाकरता निरीक्षणाचा आधार घेतो. | | | | | | |
| इ. २ री<br>(७ ते ८ वर्षे) | जीवन कौशल्य | निर्णय क्षमता | • स्वत:च्या आवडी, निवडी व प्राधान्या-प्रमाणे खेळ आणि खेळाशी संबंधित साहित्य निवडतो. | (१) आवडीचा खेळ निवडून, खेळाला लागणारे साहित्य निवडणे.<br>उदा. झेलणे/फेकणे यांसाठी चेंडू, रिंग वगैरे<br>(२) सहकाऱ्यांच्या साहाय्याने विविध साहित्यांसह (---) व्यायाम करतात. | खेळण्यासाठी योग्य साहित्य | • निरीक्षण व पडताळा सूची |
| **ध्येय :** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.<br>**क्षमता :** अध्ययन करण्यासाठी दैनंदिन जीवनातील सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो.<br>**C.7.3.2.1** | | | | | | |
| बालवाटीका<br>२<br>(४ ते ५ वर्षे) | जीवन कौशल्य | निर्णय क्षमता | • खेळताना बालक साधी साधने वापरण्याकडे कल दर्शवतो. | (१) शिक्षक बालकांना खेळाच्या साहित्यांमधून आवडीचे साहित्य निवडून खेळण्यास सांगतात.<br>(२) बालके खेळाच्या साहित्यातील साधे, सोपे व हातात बसतील असे साहित्य घेऊन खेळ खेळतील. जसे - छोटी बॅट, छोटा चेंडू इ. | छोटी बॅट, छोटा चेंडू फुगेरी गदा, फुगेरी फुटबॉल | • निरीक्षण व कृती मूल्यमापन |
| **C - 7.3.3.1** | | | | | | |
| बालवाटिका<br>३<br>(५ ते ६ वर्षे) | नीतिमूल्य | सक्रिय सहभाग | • मातीकाम किंवा शिल्पकला/कलाकाम | (१) शिक्षक बालकांना मातीच्या साहाय्याने खेळाचे साहित्य, विविध खेळ कसे बनवायचे ते समजावून सांगतात. | माती, पाणी, पट्टा | • निरीक्षण, पडताळा सूची |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | करताना योग्य कामासाठी योग्य साधने निवडतो. | (२) उदा. मातीच्या साहाय्याने क्रिकेटची बॅट तयार करणे.<br>(३) बालके समजून घेतात आणि कृती करतात.<br>(४) मातीच्या साहाय्याने विविध खेळ काढणे. (उदा. खो–खो, कबड्डी, कुस्ती) | | |
| **क्षमता : C - 7.3.4.1 - A** दैनंदिन जीवनातील परिस्थिती व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो. | | | | | | |
| इ. १ ली (६ ते ७ वर्षे) | खेळ | साहित्य खेळ | • कृती करताना परिणाम–कारकपणे साधनांचा वापर करतो. | (१) विविध साहित्य, पर्यायी वस्तू यांच्याद्वारे क्रीडा कौशल्यांचे सादरीकरण करताना सुयोग्य वापर करतो.<br>उदा. बॅटने फटका मारणे, हाताने फटका मारणे. चेंडू झेलण्यासाठी हात, रुमाल वापरणे.<br>(२) दोरी किंवा सुतळीचा वापर करून, रिंग तयार (हुलाहु खेळण्यासाठी) करून खेळणे. | आवश्यक/योग्य साहित्य | • निरीक्षण, पडताळा सूची |
| **C - 7.3.4.1 - B** | | | | | | |
| | खेळ | डिजिटल खेळ | • अध्ययन करताना डिजिटल साधनांचा सहज वापर करतो. (उदा. दृक्–श्राव्य साहित्य सुरू करणे, मध्येच थांबवणे.) | हस्त–नेत्राच्या साहाय्याने मोबाईल, टॅब इत्यादीवर खेळ खेळतो. (उदा. स्नेक, कार रेसिंग इ.) | आवश्यक डिजिटल व दृक्–श्राव्य साधने | • निरीक्षण, पडताळा सूची |

**क्षमता : 7.3.5.1 - A** दैनंदिन जीवनातील परिस्थिती व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | खेळ | पर्यायी साहित्य | • सोपी साधने तयार करतो व दैनंदिन कृतींमध्ये त्यांचा वापर करतो. | (१) लगोरी, क्रिकेट वगैरे खेळण्यासाठी उपलब्ध असलेल्या वस्तूंपासून, पर्यायी किंवा नवीन साहित्य तयार करणे.<br>उदा. नेमबाजीसाठी झाडाची फांदी वापरून गलोल तयार करणे. | आवश्यक योग्य साहित्य | • निरीक्षण व पडताळा सूची, कृती उपक्रम |
| **C 7.3.5.1 - B** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | खेळ | डिजिटल खेळ | • अध्ययन करताना डिजिटल साधनांचा सहज वापर करतो. (उदा. दृक्–श्राव्य साहित्य सुरू करणे, मध्येच थांबवणे.) | हस्त–नेत्राच्या साहाय्याने मोबाईल, टॅब इत्यादीवर खेळ खेळतो. (उदा. स्नेक, कार रेसिंग इ.) | आवश्यक डिजिटल व दृक्श्राव्य साधने | • निरीक्षण, पडताळा सूची |

**ध्येय :** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.

**क्षमता :** संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी, स्वतःचा आवाज, शरीर, जागा आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो.

**C - 12.2.1.1**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | मनोरंजन | मनोरंजनात्मक कृती | • स्वतःच्या आवाजाचा आणि शरीराचा वापर करून | (१) आवाजात चढ–उतार करणे, ध्वनी निर्माण करणे.<br>(२) मांडीवर चापटी मारत ध्वनी निर्माण करणे.<br>(३) पाय जमिनीवर आपटत, वेगवेगळे तालबद्ध आवाज करणे. | – | • निरीक्षण, |

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | तालबद्धतेचा शोध घेतो. (टाळ्या, चुटक्या, पावलांचा आवाज, हाताच्या लयबद्ध हालचाली, उड्या, बडबडगीतातील शब्दोच्चार) | | | |
| **C - 12.2.2.1** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मनोरंजन | मनोरंजनात्मक कृती | • स्वतःचा आवाज, शरीर, वाद्ये व इतर साधनांचा वापर करून, तालबद्धतेचा शोध घेताना द्रुत आणि संथ लय यांच्यात फरक करतो. | (१) टाळ्या, टाळ आवाज, विविध ध्वनी निर्मिती करण्याची वाद्ये/साहित्य यांच्या साहाय्याने तालबद्ध द्रुत व संथ लय निर्माण करतात. जसे :<br>१) सुरुवातीला सावकाश टाळी वाजवत, हळूहळू तिचा वेग वाढवणे.<br>२) शरीरावर मांडीवर हळूहळू व नंतर थोड्या जलद गतीने चापटी मारत ध्वनी लय निर्माण करणे.<br>३) डबे, ताटली, चिवरी, चमचे, दगड यामधून ध्वनी, लय निर्माण करणे. | विविध वाद्ये चमचे, ताटली, वाट्या, रिकामे डबे इ. | • निरीक्षण |

**ध्येय :** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.

**क्षमता :** स्मृती आणि मानसिक लवचिकता : नियंत्रित वातावरणामध्ये अध्ययनाला मदत होण्यासाठी योग्य कार्यकारी स्मृती/मानसिक लवचिकता (योग्य प्रकारे अवधान केंद्रित होणे/बदलणे) स्वयं-नियंत्रण (आवेगात्मक कृती/प्रतिसाद रोखणे) विकसित करतो.

**C - 13.2.1.2-B**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | आरोग्य | आरोग्यदायी सवयी | • दिनचर्येतील बदलांसोबत समायोजन करतो. | (१) रोजच्या दिनचर्येत बदल झाल्यास, जसे : सुट्टीचे दिवस, उन्हाळी सुट्टी, दिवाळी सुट्टी, गणपती सुट्टी. दरम्यान बदलत जाणाऱ्या दिनचर्येत समायोजन साधणे. | तक्ते, दिनचर्या | • तोंडीकाम, निरीक्षण |
| **C - 13.2.2.1- A** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | मुख्य खेळ | खेळ, खेळाडू व क्रीडा साहित्य माहिती | • स्वत:ला आवश्यक असणारे प्रसाधन साहित्य किंवा खेळणी यांची यादी म्हणून दाखवतो. | (१) शिक्षक बालकांना खेळासाठी लागणारे साहित्य यांची यादी विचारतात.<br>(२) बालके खेळ खेळण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची यादी म्हणून दाखवतात. | खेळाचे वेगवेगळे साहित्य उदा. चेंडू, छोटे व मोठे लाकडी ठोकळे, रिंग | • निरीक्षण व कृती, मूल्यमापन |
| **C - 13.2.2.1-B** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | बैठे खेळ | मनोरंजक खेळ | • स्मरणशक्तीचा खेळ आणि जोड्या लावा यांसारखे सोपे खेळ खेळतो. | (१) शिक्षक बालकांच्या स्मरणशक्तीला चालना देण्यासाठी, त्यांना डोळे बंद करुन शाळेत आधीच्या दिवशी केलेल्या कृतीचे स्मरण करण्यास सांगतात. समान रंग/आकाराचे चेंडू, रिंग, लाकडी ठोकळे यांच्या जोड्या लावणे.<br>(२) बालके शिक्षकांच्या सूचनेप्रमाणे कृती करतात. | वेगवेगळ्या रंगांचे, चेंडू, ठोकळे, रिंग, डंबेल्स इत्यादी. | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |
| **C - 13. 2. 2.2-A** | | | | | | |
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | जीवन कौशल्य | चिकित्सक विचार | • एखादी गोष्ट पहिल्यांदा करता न आल्यास मदतीने दूसरा मार्ग स्विकारुन | (१) एखादी वस्तू, जसे फुगे, चेंडू, रिंग थोड्या उंचावर टेबलाखाली, खुर्चीखाली ठेवून बालकास ती घेण्यास सांगणे.<br>(२) प्रथम प्रयत्नात जर ती वस्तू प्राप्त करता आली नाही, तर उंचावरील वस्तू काढण्यासाठी | फुगे, रिंग, चेंडू इ. | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

C - 13. 2. 3.2. A

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक लवचिकता दर्शवतात (उदा. पहिल्या प्रयत्नामध्ये उंचावर चढणे शक्य न झाल्यास, दुसरा मार्ग वापरतो किंवा दुसऱ्या व्यक्तींच्या मदतीने त्या वस्तूपर्यंत पोहोचतो.) | खुर्चीवर चढणे, स्टुलवर चढणे अथवा टेबल खुर्ची, कपाटाखालील वस्तू काठीच्या साहाय्याने घेण्याचा प्रयत्न करणे.<br>(३) प्रौढ व्यक्तींच्या साहाय्याने वस्तू घेण्याचा प्रयत्न करणे. | | |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | नीतिमूल्ये | सहभागिता/ समंजसपणा | • कृती किंवा खेळामध्ये नवीन नियमाप्रमाणे जुळवून घेतात. (उदा. प्रथम रंगाप्रमाणे व नंतर आकाराप्रमाणे कार्ड्स वेगवेगळी करणे.) | (१) नेहमी खेळल्या जाणाऱ्या खेळांमध्ये (मनोरंजक खेळ) जसे : पकडा-पकडी, विटी-दांडू, अमृत-विष, दगड-परी यांमध्ये नवीन नियम आल्यास, त्याचा स्वीकार करून, त्याप्रमाणे खेळ खेळण्यास जुळवून घेणे.<br>(२) जसे : बॉल-बॅट खेळताना खेळाचे मैदान ठरवणे. | आवश्यकतेनुसार | • निरीक्षण |

**C - 13.2.4.2–B**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | नीतिमूल्ये, कवायत संचलन | सहभागिता, रांग लावणे, सावधान–विश्राम | • ठरवलेल्या कृतींमध्ये सहभागी होतो आणि त्या सुधारण्यासाठी सूचना स्वीकारतो. | (१) शिक्षकांनी सांगितलेल्या कृती (जसे–उभे रहा, खाली बसा, डोक्यावर हात ठेवा, मागे बघा, वर बघा, उडी मारा, चवड्यावर उभे रहा.) करणे.<br>(२) बालकांनी केलेल्या कृती सुधारणे, शिक्षकांनी सुचवलेल्या सूचना स्वीकारणे.<br>(३) कवायत संचलन प्रकार योग्य प्रकारे करतात. | – | • निरीक्षण, कृती, मूल्यमापन |

**13.2.5.2-B**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | नीतिमूल्ये<br>कवायत संचलन | सहभागिता, समन्वय | • सर्व उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतो, सूचना आणि अभिप्रायांचे स्वागत करतो. | (१) वर्गात/मैदानात घेतल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांमध्ये सहभागी होतो. जसे खेळ, कागदाचे खेळ, चेंडू बनवणे, गटकार्य.<br>(२) उपक्रमांमध्ये केलेल्या सूचना आणि अभिप्रायांचा स्वीकार करणे.<br>(३) दहीने, बाहे मुडचा खेळ घेतात. | उपक्रमांनुसार साहित्याची निवड करावी. | • निरीक्षण व पडताळा सूची |

**ध्येय : CG-13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.

**क्षमता : CG-13.3** निरीक्षण, आश्चर्य, कुतूहल आणि अन्वेषण : वस्तूच्या सूक्ष्म बारकाव्याने निरीक्षण करतो, विविध ज्ञानेंद्रियांचा वापर करून अन्वेषण करतो व आश्चर्य दर्शवतो, वस्तू हाताळतो आणि प्रश्न विचारतो.

**C - 13.3.1.1**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | नीतिमूल्ये | सहभागिता, सकारात्मकता | • बागेमध्ये किंवा बाहेर आनंदाने वेळ घालवतो | (१) मुक्त खेळासाठी संधी देतात.<br>जसे : बागेमध्ये, मैदानात, परिसरात, समवयस्क मुलांसोबत खेळात आनंदाने सहभागी होतात. | | • निरीक्षण, पडताळा सूची |

**C - 13.3.4.1**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | नीतिमूल्ये, तालबद्ध कवायत | सहभागिता, विनासाहित्य कवायत | • खेळ, संगीत आणि नृत्य यांच्या माध्यमातून इतर बालकांबरोबर आनंदात सहभागी होतो. | (१) मैदानी खेळ, बैठे खेळ, विविध मनोरंजनात्मक हालचाली, तालबद्ध हालचाली, नृत्य आदी उपक्रम/कृती करून घेणे.<br>(२) वरील सर्व कृती/उपक्रमात समवयस्क बालकांसोबत आनंदाने सहभागी होतो.<br>(३) विनासाहित्य कवायत, उभे राहून व बैठे प्रकार करतात. | विविध खेळांचे साहित्य | • निरीक्षण, उपक्रम, कृती |

**ध्येय : CG-13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.

**क्षमता : CG-13.3** वर्गखोली नियामके : मन:पूर्वक व समजपूर्वक नियामके स्वीकारतो आणि पालन करतो.

**C - 13.4.1.1**

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ (३ ते ४ वर्षे) | नीतीमूल्ये<br>योग | आज्ञापालन<br>यम नियम | • वर्गातील नियमांसाठी प्रौढ व्यक्तींच्या वर्तनाचे निरीक्षण व नक्कल करतो. | (१) शिक्षक विद्यार्थ्यांना जे प्रौढांबद्दल नियम आहेत, ते एकदा समजावतात.<br>(२) प्रौढ व्यक्तीचा आदर करायचा.<br>(३) प्रौढ व्यक्तीशी खोट बोलायचे नाही.<br>(४) प्रौढ व्यक्तीची चेष्टा करायची नाही.<br>(५) प्रौढ व्यक्तींशी भांडायचे नाही.<br>(६) या नियमांची माहिती देतात व आचरण करायला सांगतात. | नियमांचे चित्रे | • निरीक्षण, पडताळा सूची |

**ध्येय : C - 13.4.2.1** – वेगवेगळ्या क्षमता वर्गखोली नियामके : मनपूर्वक व समजपूर्वक नियामके स्वीकारतो आणि पालन करतो.

| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ (४ ते ५ वर्षे) | चांगल्या सवयी | नियम पालन | • शिक्षकांनी दिलेल्या संकेतांनुसार वर्गातील नियम पाळतो. | शिक्षकांनी दिलेल्या संकेतांनुसार वर्गातील नियम पाळतो.<br>(१) जेवणाचा डबा जागच्या जागी ठेवणे.<br>(२) बूट–चप्पल जागेवर ठेवणे.<br>(३) खेळाचे साहित्य जागेवर ठेवणे.<br>(४) खेळायला जातना ओळीत जाणे इत्यादी. | – | • निरीक्षण व पडताळा सूची |

| C - 13.4.3.1-A | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स्तर/इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने | मूल्यमापन निर्देश |
| बालवाटिका ३ (५ ते ६ वर्षे) | चांगल्या सवयी | नियम पालन | • वर्गातील नियम पाळतो व इतरांना पाळण्यास मदत करतो. | (१) वर्गातील ठरवलेल्या नियमांचे पालन करणे व इतरांनाही नियम पाळण्यास सांगणे. जसे : रांगेत वर्गात येणे, रांगेत जाणे, ठरलेल्या जागी साहित्य ठेवणे, परवानगी घेऊन वर्गात येणे, वर्गाच्या बाहेर जाणे, ढकलाढकली न करणे, न रडणे. | तक्ते इ. | • निरीक्षण पडताळा सूची |
| **13.4.4.1 - A** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | चांगल्या सवयी | नियम पालन | • वर्गातील नियमांबद्दलच्या चर्चेमध्ये सहभागी होतो व त्याप्रमाणे वागतो. | (१) वर्गाचे नियम ठरवणे, खेळाचे नियम ठरवणे– बाबत उपक्रम आपसात चर्चेत सहभागी होतो. ठरलेल्या नियमांचे योग्य रीतीने पालन करतो. | – | • निरीक्षण पडताळा सूची |
| **13.4.4.1 - B** | | | | | | |
| इ. १ली (६ ते ७ वर्षे) | नीतिमूल्ये | इतरांना मदत | • वर्गातील कामांचे, जबाबदाऱ्यांचे तक्ते, पोस्टर्स स्वत: तयार करतो आणि त्याचे अनुकरण करतो. | (१) आपसात कामांचे वाटप करण्यात स्वत:हून पुढाकार घेतो. ठरवलेली कामे कोणी करायची त्याची यादी, तक्ते तयार करायचे काम स्वतः करतो. | तक्ते | • निरीक्षण पडताळा सूची |
| **13.4.5.1** | | | | | | |
| इ. २री (७ ते ८ वर्षे) | चांगल्या सवयी | नियमपालन | • वर्गाचे नियम तयार करण्याच्या चर्चेत सहभागी होतो. | (१) वर्गाचे नियम तयार करण्याच्या चर्चेत सहभाग घेतो. आपली मते मांडतो. सूचना सांगतो. स्वत: नियमपालन करण्याची तयारी दर्शवतो. | तक्ते | • निरीक्षण, पडताळा, सूची, कृती उपक्रम |

**टीप : इयत्ता पहिली ते पाचवीसाठी कब व बुलबुल आणि इयत्ता सहावी ते दहावीसाठी स्काऊट व गाईड हा विषय अनिवार्य करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट गाईड, मुंबई या संस्थेने तयार केलेला कब/बुलबुल आणि स्काऊट/गाईडचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.**

# श्रेयनामावली

## विषय : गणित

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पदनाम | शाळा/कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | रत्नप्रभा भालेराव | प्राचार्य | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भंडारा. |
| २) | अनुपमा तावशीकर | ज्येष्ठ अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी. |
| ३) | वृषाली गायकवाड | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती. |
| ४) | डॉ. प्रवीण मोहिते | विशेषाधिकारी | बालभारती, पुणे. |
| ५) | चंदन कुलकर्णी | कार्यक्रम अधिकारी | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ६) | सुषमा साठे | शिक्षण तज्ज्ञ | पुणे. |
| ७) | विवेक पुराणिक | सेवानिवृत्त मुख्याध्यापक | गणेश विद्यालय, टिटवाळा. |
| ८) | तरुबेन पोपट | सेवानिवृत्त मुख्याध्यापक | पुणे. |
| ९) | विठ्ठल गोरडे | सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी | खेड, जि. पुणे. |
| १०) | अरूण बैस | प्राथमिक पदवीधर | प्रा. प. जि. प. प्राथ. शाळा भिंगी, ता. जि. हिंगोली. |
| ११) | उमेश नेवसे | उपशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा वेल्हे बु., ता. वेल्हे, जि. पुणे. |
| १२) | प्रदीप गोडसे | सहशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा वेल्हे बु., ता. वेल्हे, जि. हिंगोली. |
| १३) | अभिजित बंगाळे | उपशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा वरूड बु., ता. जाफ्राबाद, जि. जालना. |
| १४) | कविता सिंग | प्रमुख | ओवर हिल्स प्री. स्कूल, पुणे. |

## विषय : कलाशिक्षण

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पदनाम | शाळा/कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | रविकिरण जाधव | विशेषाधिकारी | बालभारती, पुणे. |
| २) | डॉ. अश्विन किनारकर | सहशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा, बांद्रा, ता. रामटेक, जि. नागपूर. |
| ३) | पूनम बाळकृष्ण भोपळे | सहशिक्षक | विद्यामंदिर न्यू वाडदे, कोल्हापूर. |
| ४) | मुकुंद मिरगे | सहशिक्षक | स्वा. सावरकर मा. व उच्च मा. विद्यालय, बीड. |
| ५) | शिवाजी हांडे | सहशिक्षक | यशवंत विद्यालय, लातूर. |
| ६) | अनिल मस्के | सहायक शिक्षक | म. ए. सो. मुलांचे विद्यालय, पुणे. |
| ७) | भास्कर मोरे | सहशिक्षक | कै. इंदिराबाई देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, दणेगाव, ता. देगलूर, जि. नांदेड. |
| ८) | स्वाती अहिरे | सहशिक्षक | श्री. नृसिंह विद्यालय चास, ता. जि. नगर. |
| ९) | प्रगती भावसार | शिक्षणतज्ज्ञ | बाणेर, पुणे. |

## विषय : कार्यशिक्षण

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पदनाम | शाळा/कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | तेजस्विनी आळवेकर | वरिष्ठ अधिव्याख्याता | विज्ञान विभाग, र. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २) | मनीषा यादव | वरिष्ठ अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भंडारा. |
| ३) | रविकिरण जाधव | विशेषाधिकारी | बालभारती, पुणे. |
| ४) | डॉ. अजयकुमार लोळगे | सेवानिवृत्त विशेषाधिकारी, | बालभारती, पुणे. |
| ५) | नम्रता शेजाळ | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी. |
| ६) | प्रकाश पारखे | सहशिक्षक | बहुजन शिक्षण संघाचे सिद्धार्थ विद्यालय, संगमनेर. |
| ७) | विद्याधर म्हात्रे | सेवानिवृत्त कार्यानुभव शिक्षक | मुंबई पब्लिक स्कूल गोशाळा मार्ग, उच्च प्राथ. इंग्रजी शाळा, मुलुंड-पश्चिम, मुंबई-८० |
| ८) | नागसेन भालेराव | मुख्याध्यापक | जि. प. प्राथ. शाळा, पांगडी, ता. जि. गोंदिया. |
| ९) | रिटा सोनवत | विभागप्रमुख | मानव विकास विभाग, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई. |
| १०) | डॉ. तेजस्विनी मस्के | सहायक शिक्षक | सेवासदन कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर. |
| ११) | कीर्ती देशपांडे | मुख्याध्यापक | ओंकार बालवाडी, छ. संभाजीनगर. |
| १२) | सुनिता जाधव | मुख्याध्यापक | श्री सरस्वती शिशू विद्यामंदिर कर्वेनगर, पुणे. |
| १३) | वंदना फडतरे | उपशिक्षक | मृत्युंजय एज्यु. सोसायटी प्राथ. विभाग, सांगवी, पुणे. |
| १४) | भावना गवळी | प्रशिक्षक | विद्याभारती कोकण प्रांत अंबरनाथ, जि. ठाणे. |
| १५) | पल्लवी आपटे | संचालक | जिजाऊ शिशूवाटिका, देवरूख, जि. रत्नागिरी. |
| १६) | लिना तलाठी | शैक्षणिक सल्लागार | न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग, पुणे. |

## विषय : आरोग्य आणि शारीरिक शिक्षण

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पदनाम | शाळा/कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | डॉ. संदिप निकम | विशेषाधिकारी | बालभारती, पुणे. |
| २) | डॉ. स्वप्निल मडके | सहायक प्राध्यापक | शारीरिक शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| ३) | मुकुल देशपांडे | शारीरिक शिक्षक | श्री नरसिंग विद्यालय, आकोट, जि. अकोला. |
| ४) | बाळासाहेब बोडखे | प्र. मुख्याध्यापक | जि. प. प्राथ. शाळा खातगाव नं. २, ता. करमाळा, जि. सोलापूर. |
| ५) | प्रगती भावसार | शिक्षणतज्ज्ञ | बाणेर, पुणे. |
| ६) | नंदिनी भावे | मुख्याध्यापक | नूतन शिशू मंदिर, गोरगाव, मुंबई. |
| ७) | नीता जाधव | शारीरिक शिक्षण, शिक्षक | बृहन्मुंबई, महानगरपालिका, पंतनगर, मनपा इंग्रजी शाळा) |
| ८) | भाईदास सोमवंशी | प्र. मुख्याध्यापक | जि. प. प्राथ. शाळा, विष्णुनगर, ता. पाचोरा, जि. जळगाव. |
| ९) | निलेश झाडे | शारीरिक शिक्षक | श्रीमती लक्ष्मीबाई गणगणे, विद्यालय अकोट, जि. अकोला. |